# संस्कारादर्श.

## भाग १ ला.

संपादक,

**काशीनाथ वामन लेले.**

मुद्रक—

आत्माराम विठ्ठल योगी,

मुद्रणाचें व प्रकाशनाचें स्थल—

आत्माराम छापखाना ४६ कांदेवाडी, मुंबई.

प्रकाशक,

काशीनाथ वामन लेले.

तारीख २६ मार्च १९१५ इसवी.

(सर्व हक्क मालकानें स्वाधीन ठेविले आहेत.)

किंमत रुपये २॥-

# आशीर्वादपत्रिका.

हें पुस्तक

## चिरंजीव रा. वासुदेव आत्माराम प्रभु देसाई

ह्यांस

( त्यांच्या व्रतबंधाचे वेळीं होणाऱ्या धार्मिक अनुष्ठानोचा उद्देश व अर्थ त्यांस समजावा आणि त्यांची वागणूक आपल्या वाडवडिलांना व ब्राह्मण्याला शोभण्यासारखी धर्मनिष्ठेची रहावी एतदर्थ )

## श्रीमंत राजश्री आत्माराम वासुदेव प्रभु देसाई

व्हायकाउंट, गोवा, पेडणें

ह्यांच्या संमतीनें लिहून व छापून

# आशीर्वादादाखल

## ग्रंथकर्त्यानें अर्पण केलें आहे.

दीक्षित

मि॰ चैत्र शुद्ध १० शुक्रवार शके १८३७ राक्षसनाम संवत्सरे.

काशिनाथ वामन लेले,

सोमयाजी.

# संपादकाचे चार शब्द.

संस्कारादर्शाची प्रस्तावना आरंभीं 'संस्कार' ह्या मथळयाखालींच सविस्तर आलेली असल्यामुळें ती वेगळी लिहिण्याचें प्रयोजन च नाहीं. 'संस्कारादर्श' हा ग्रंथ लिहिण्याचें पुष्कळ दिवस मनांत होतें. परंतु, गेल्या फाल्गुन शुद्ध पंचमीपर्यंत मनांतील उद्देश सिद्धीस जाण्याचा भरंवसा यत्किंचितही वाटत नव्हता. तथापि सत्यसंकल्पाचा दाता जो भगवान् त्याच्या कृपेमुळें हा ग्रंथ आज प्रसिद्ध होत आहे. सुमारें तीन महिन्यांपूर्वीं गोवें प्रांतांतील पेडणें ह्या गांवीं राहणारे तेथील सरदार व्हायकाउंट श्रीमंत राजमान्य राजश्री आत्माराम वासुदेव प्रभु देसाई ह्यांनीं मुंबई मुक्कामीं एक विद्वान् गृहस्थ पाठवून मला आपल्या चिरंजीवाच्या व्रतबंधाकरितां येण्याविषयीं अगत्यानें निमंत्रण केलें व व्रतबंध कोणत्या महिन्यांत करावा ह्या गोष्टींतही माझा विचार त्यांनीं घेतला. "ह्या मंगलकार्याकरितां श्रीमंतांचे हजारों रुपये खर्च होतील. तेव्हां त्यांतच वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें माझ्या मनांत 'संस्कारादर्श' ह्या नांवाचा जो ग्रंथ लिहावयाचा आहे, त्यांतील 'उपनयन' ह्या द्विजकुलोत्पन्नाच्या मुख्य संस्काराकरितां अवश्य असलेल्या भागाच्या प्रकाशनास जर श्रीमंत हातभार लावतील तर उरलेल्या थोड्या अवधींतही रात्रीचा दिवस करून तेवढा भाग मी लिहून प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करीन." असें मीं श्रीमंतांस पत्रद्वारें कळविलें व ईश्वराच्या प्रेरणेमुळें श्रीमंतांकडून अनुकूल उत्तरही आलें. तथापि सांप्रतच्या स्थितीमध्यें त्यांचें नुसतें अनुकूल उत्तर येऊन ग्रंथ प्रसिद्ध होणें शक्य नव्हतें. परंतु, व्रतबंधाच्या वेळेस ग्रंथाचा हा भाग प्रसिद्ध व्हावा अशी श्रीमंतांना उत्कट इच्छा झाली व त्यांनीं फाल्गुन शुद्ध एकादशीच्या सुमारास बरीचशी रक्कमही पाठवून दिली. तेव्हां लगेच प्रथम कागद खरेदी केले व नंतर मजकूर लिहिण्यास आरंभ केला. परंतु, स्वतः लिहून हें काम मुदतींत तडीस जाणें शक्य नाहीं असें वाटल्यावरून आणि मुंबईस मी सांगेन

त्याप्रमाणें संस्कृत व मराठी मजकूर शुद्ध, जलद व सुवाच्य लिहिणारा दुर्मिळ आहे असें समजल्यावरून वांईहून वे. शा. सं. व्यंकटेश शास्त्री वझे ह्यांना लिहिण्याकरितां येण्याविषयीं मीं विनंति केली व ते फाल्गुन शुद्ध पौर्णिमेचे सुमारास येथें आल्यापासून माझ्या मताप्रमाणें काम नेटाला लागलें. शिमग्याच्या सणामुळें खिळे जुळणारीं माणसें मिळण्यासही फार अडचण पडली व हें काम आपल्या हातून पार पडत नाहीं असेंही मला वाटलें. येथील व पुण्यांतील कांहीं मोठमोठ्या छापखान्यांत पुस्तक छापण्याचें काम मुदतींत होईल अशा आशेनें त्या त्या छापखान्यांतील व्यवस्थापकांना विनंति करण्यांत आली. परंतु, पंधरा दिवसांत ह्या पुस्तकाच्या आकाराचीं चारशें पृष्ठें छापून देण्यास कोणीही कबूल होईना. येथील सुप्रसिद्ध निर्णयसागर छापखान्याच्या व्यवस्थापकांकडूनही खुलासा मागविला. परंतु, कितीही दर दिला तरी प्रत्येक महिन्यास पराकाष्ठा बत्तीसापासून अठ्ठेचाळीस पृष्ठें छापून देऊं, असें त्यांनीं कळविलें. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें खिळे जुळणारे व काम छापणारे वगैरे लोक सांपडतील तेथून, ते सांगतील ते पैसे व अटी कबूल करून, आणण्याविषयीं ग्रंथकर्त्यानें येथील आत्माराम छापखान्याचे व्यवस्थापकांस विनंति केली. त्याप्रमाणें रा. महादेव यशवंत पेठे ह्यांनीं पडेल तें काम हवें तेव्हां करण्याचें व तें शक्य तितकें चांगलें करण्याचें जर मनांत आणिलें नसतें तर हा ग्रंथ इतक्या मुदतींत घरच्याप्रमाणें वापरण्यास सांपडणाऱ्या आत्मारामछापखान्यांतूनही प्रसिद्ध होणें कधींही शक्य झालें नसतें. ह्यास्तव, सदर्हू छापखान्याचे व्यवस्थापक रा. पेठे ह्यांचे ह्या कामगिरीबद्दल प्रांजळपणें आभार मानणें भाग आहे.

हा भाग लिहून काढण्याचें काम सुमारें वीसपंचवीस दिवसांतच झालेलें आहे व आरंभापासून शेवटपर्यंतचीं सर्व प्रुफें स्वतः ग्रंथ-

लेखकांसच तपासावीं लागलीं आहेत. केवल मजकूर लिहिण्याचेंच काम लेखकाकडे असतें तर बरें झालें असतें. परंतु, तपासण्याचें सर्वच काम त्याला स्वतःच करणें भाग पडल्यामुळें ग्रंथामध्यें नजरचुकीमुळें कांहीं दोषही नेहमींपेक्षां जास्त प्रमाणांत राहण्याचा संभव आहे. इतकें काम इतक्या थोड्या मुदतींत व अडचणीच्या परिस्थितींत केवल ईश्वराच्या कृपेनेंच पार पडलेलें आहे हें जितकें खरें आहे तितकेंच श्रीमंत राजमान्य राजश्री आत्माराम वासुदेव प्रभु देसाई, व्हायक्काउंट पेडणे, ( गोंवा ) ह्यांची माझ्या हातून असला ग्रंथ प्रसिद्ध होण्यासंबंधाची उत्कट इच्छा आणि लगेच सढळ हातानें त्यांनीं केलेलें द्रव्यसाहाय्य ह्यांमुळेंच हा ग्रंथ आज प्रसिद्ध होत आहे असें ह्मणणेंही खरें आहे.

मनांत आल्यास योग्य प्रसंगीं धनाचा सद्व्ययही श्रीमान् लोकांना कसा करितां येतो व त्यामुळें लोकोपयोगी कामें कशीं होतात ह्याचें स्पष्ट उदाहरण माझ्या आजपर्यंतच्या अनुभवांत हें पहिलेंच आहे. आमच्या ब्राह्मण ज्ञातींतच ह्यांच्याप्रमाणें दुसरे अनेक श्रीमान्, जहागीरदार, इनामदार व संस्थानिक मला ओळखणारे आहेत व मीं आजपर्यंत पुष्कळांपाशीं महाभारत, ऋग्वेदसंहिता वगैरे मीं हातीं घेतलेले ग्रंथ संपूर्ण केल्याचें श्रेय घेण्याविषयीं विनंति केली आहे व 'आमच्या मनांत आल्यास आह्मांला कांहीं कठिण नाहीं.' असे स्पष्ट उद्गारही त्यांपैकीं कांहींनीं माझ्या समोर काढिले आहेत. ते त्यांचे उद्गार खरे होण्याचा सुयोग लवकरच येवो आणि ह्या ग्रंथाला मदत देणारे सद्गृहस्थ श्री, यश, विद्या, विनय, वित्त, आयुष्य आरोग्य आणि आज्ञाधारक संतति ह्यांनीं चिरकाल संपन्न राहोत अशी धर्मरूप सेतूनें जगताचें संरक्षण करणाऱ्या परमेश्वराजवळ प्रार्थना करून हे चार शब्द संपवितों.

मुंबई,
मित्ती चैत्र शु० ३ गुरुवार.
शके १८३७.

दीक्षित,
काशीनाथ वामन लेले.
सोमयाजी.

# विषयानुक्रमणिका.

——:०:——


| विषय | पृष्ठ. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| संस्कारांचा उपयोग. | १ | कर्मसामग्री | ५६ |
| संस्कारांची नांवें | ८ | पुण्याहवाचन | ५९ |
| संस्कारांचीं फळें. | १० | वेदांतील नक्षत्रमुहूर्त | ६१ |
| परिभाषा | १२ | पुण्याहवाचनाची पूर्वतयारी | ६२ |
| दक्षिणाद्रव्य | २६ | प्रस्थपलप्रमाण | ६६ |
| वराटिकामान | २६ | पंचरत्नें | ६६ |
| ताम्रमान | २७ | कलश | ६६ |
| रौप्यकमान | २८ | पंचपल्लव | ६७ |
| सुवर्णमान | २८ | सर्वौषधिगण | ६७ |
| राजतमान | २९ | कर्मदेवतांचीं नामें | ६७ |
| धनिकादिलक्षण | २९ | पुण्याहवाचनविधि | ६८ |
| कुशाहरणविधि | ३१ | पुण्याहवाचनाचें स्थल | ७१ |
| कर्मार्थ दर्भ रोज तोडावे | ३२ | पुण्याहवाचनाचा संकल्प | ७१ |
| पात्रवक्ष | ३६ | नांदीश्राद्ध | ७२ |
| आज्यस्थाली | ३७ | नांदीश्राद्ध कां आलें ? | ७४ |
| स्रुचीलक्षण | ३८ | भोजनानंतर व रात्रीं नांदीश्राद्ध | ७५ |
| पात्रशुद्धि | ४१ | नांदीश्राद्धार्थ दर्भ व दूर्वा | ७५ |
| द्रव्यप्रतिनिधि | ४२ | नांदीश्राद्धांतील देव | ७५ |
| गणेशपूजन | ४४ | नांदीश्राद्धाचे अधिकारी | ७६ |
| गणेशपूजनफल | ४७ | अंकुरारोपण | ७९ |
| पातित्यकारणें | ५१ | उपनयनकाल | ८० |
| ब्राह्मण्यरक्षण | ५४ | उपनयनतिथि | ८२ |
| ब्राह्मणाची च्युति | ५५ | उपनयनाला वार | ८३ |

| विषय. | पृष्ठ. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| उपनयनाला नक्षत्रें | ८५ | संस्काराभास | १२३ |
| उपनयनाधिकारी | ८६ | देवहेलन | १२४ |
| गायत्रीचा जप कोणीं करावा ? | ८७ | ब्राह्मण्य अथवा द्विजत्व | १२७ |
| उपनयनाकरितां मंडप | ८८ | पहिला, दुसरा व तिसरा जन्म | १२७ |
| मातृभोजन | ८९ | आचार | १३२ |
| मेखलादिधारण | ८९ | संध्यावंदन | १३४ |
| यज्ञोपवीत | ९० | पंचमहायज्ञ | १३९ |
| यज्ञोपवीतनिर्माण | ९० | ब्रह्मयज्ञ कसा करावा ? | १४३ |
| जानवें कोणतें अग्राह्य? | ९१ | ब्रह्मयज्ञाचें स्थल | १४५ |
| यज्ञोपवीतें कोणी किती घालावीं ? | ९१ | मध्यान्हीं ब्रह्मयज्ञ कसा करावा? | १४६ |
| उपवीतनिर्माण व उपवीतधारण | ९१ | ब्रह्मयज्ञाचीं अंगें | १४७ |
| यज्ञोपवीतसामर्थ्य | ९७ | ब्रह्मयज्ञाचे अनध्याय | १४८ |
| शुद्धिसामर्थ्य | ९८ | ब्रह्मयज्ञफल | १४९ |
| देवतावास्तव्य | १०१ | ब्रह्मयज्ञाचें पापराहित्य | १४९ |
| विप्रमृत्युकारण | १०५ | वेदत्यागदोष | १५० |
| आचार व अनाचार ह्यांचीं फळें | १०५ | वेदाध्ययनाचें फल | १५१ |
| सहज वस्तूंचीं आवश्यकता | १०६ | वेदवाक्याचें माहात्म्य | १५१ |
| मातापितरांशिवाय मूल जगणार कसें ? | १०८ | देवतांचें निवासस्थान | १५१ |
| | | प्रायश्चित्त | १५१ |
| कुमाराचें वस्त्र | १११ | वेदाध्ययन | १५३ |
| मेखला | १११ | तर्पण | १५७ |
| दंड | ११२ | कर्म, नातें व वारसा | १६० |
| ग्रहयज्ञ | ११२ | पूर्वजांसंबंधानें कर्तव्य | १६५ |
| ग्रहमीमांसा | ११५ | इतिहासाचीं मूलसूत्रें | १६७ |
| उपनयनसंस्कारसंकल्प | ११९ | वर्णाश्रमव्यवस्था | १७१ |
| शपथ | १२० | दैवाधीनं जगत्सर्वं | १७३ |

| विषय. | पृष्ठ. | विषय | पृष्ठ |
|---|---|---|---|
| मन्त्राधीनं तु दैवतं | १७३ | पुण्याहवाचनमंत्रार्थ | २१६ |
| नोस्तकांचा अनर्थ | १७७ | उपनयनमंत्रार्थ | २२३ |
| ग्रंथहानि | १८३ | अग्निकार्य | २२५ |
| अथर्ववेदलोप | १८४ | ग्रहयज्ञप्रयोग | २२७ |
| भिक्षा | १८६ | बलिदान | २३३ |
| ताराची पद्धत | १८७ | पुण्याहवाचनप्रयोग | २३६ |
| भिक्षाविधि | १८८ | मातृकापूजन | ४३२ |
| भिक्षासेवनविधि | १८९ | नांदीश्राद्ध | २४५ |
| शौच | १९१ | मंडपदेवताप्रतिष्ठा | २४७ |
| उपनेत्याचें कर्तव्य | १९२ | उपनयनप्रयोग | २४८ |
| अध्ययनधर्म | १९२ | अनुप्रवचनीयहोम | २५२ |
| गायत्रीची उत्पत्ति | १९३ | मेधाजननप्रयोग | २५३ |
| गायत्रीजपफल | १९४ | **अग्निमुखविधि.** | |
| इंद्रियदमन | १९४ | सिकतादोष | ४ |
| निषिद्धकर्म | १९५ | उपलेपन | ७ |
| स्त्रियांशीं वर्तन | १९६ | रेखालेखनसाधनें | ८ |
| अवश्य नियम | १९७ | अवोक्षणलक्षण | ९ |
| अवश्य कर्तव्यें | १९८ | अग्नि कोठला असावा ? | ९ |
| वर्ज्य गोष्टी | १९९ | अग्नि कोठें स्थापावा ? | ९ |
| शुक्ररक्षण | २०२ | अग्नीचें महत्त्व | ९ |
| शुक्रपातप्रायश्चित्त | २०३ | अग्निप्रणयनपात्र | १० |
| भिक्षायोग्य घरें | २०४ | कर्मसंबंधीं अग्नींचीं नांवें | १२ |
| धर्मलोपप्रायश्चित्त | २०५ | अग्निध्यान | १५ |
| स्त्रीस्वभाव | २०६ | अन्वाधान | १५ |
| ब्रह्मचारिधर्म | २०९ | परिस्तरण | १५ |
| ग्रहयज्ञमंत्राचा अर्थ | २१० | परिस्तरणप्रदेश | १६ |
| | | बर्हि | १६ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| इध्मकाष्ठसंख्या | १७ |
| इध्मवृक्षादि | १७ |
| शुल्ब | १९ |
| पात्रासादन | १९ |
| ब्रह्मा | २० |
| पवित्रकरण | २० |
| प्रोक्षणीसंस्कार | २१ |
| प्रोक्षण व अभ्युक्षण | २१ |
| दर्व्यासंस्कार | २१ |
| आज्यसंस्कार | २२ |
| परिधिपरिधान | २४ |
| परिधि किती दूर घालावे ? | २५ |
| परिषेक | २८ |
| समिध कशी धरावी | ३० |
| स्रुवा कसा धरावा ? | ३१ |
| आघारहोमादि | ३१ |
| राष्ट्रभृद्धोम | ३५ |
| होम करण्याचें स्थान | ३६ |
| यज्ञपुरुषाच्या जिव्हा | ३७ |
| उत्तरपरिषेक वगैरे | ३८ |
| दक्षिणा | ३८ |
| ब्रह्मयाची दक्षिणा | ३८ |
| अग्निपूजा | ३८ |
| विभूतिधारण | ३९ |
| यजनकर्म व राष्ट्रहित | ४० |
| हा जयहोम कोणीं करावा ? | ४१ |
| अभ्यातानहोम | ४१ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| जयसाधन | ४३ |
| राष्ट्रभृत्संज्ञक होम व त्याचें फल वगैरे | ४४ |
| उत्कर्षाकरितां राष्ट्रभृद्धोम | ४५ |
| ग्रामप्राप्तिकरितां राष्ट्रभृद्धोम | ४७ |
| राष्ट्रभृद्धोम कोठें करावा ? | ४८ |
| राष्ट्रभृद्धोम बलप्राप्तीचें साधन आहे. | ४८ |
| राष्ट्रप्राप्तीचें साधन | ४९ |
| राष्ट्र समर्थ होण्याचें साधन | ५० |
| युद्धामध्यें जय येण्याचें साधन | ५१ |
| उन्मादरोग नष्ट होण्याचें साधन | ५१ |
| गंधर्व व अप्सरा ह्यांचें निवासस्थान | ५४ |
| राष्ट्र कशाला ह्मणावें ? | ५४ |
| प्रायश्चित्तसंग्रह | ५७ |
| हविरुत्सेकप्रायश्चित्त | ८६ |
| होमाविच्छेदप्रायश्चित्त | ८९ |
| श्रौत प्रायश्चित्त | ९० |
| प्रायश्चित्तांतील सौत्रमंत्र | ९५ |
| शास्त्रान्तरोक्त प्रायश्चित्तें | ९६ |


## सूक्तानि.


| | |
|---|---|
| सौरसूक्तानि | १ |
| सौरभाषांतर | १२ |
| भस्मधारणविधि | २३ |
| त्रिसुपर्ण | २७ |

# संस्कारादर्श.

कोणतीही वस्तु अथवा कोणताही पदार्थ असंस्कृत अवस्थेमध्यें कसल्याही प्रकारच्या व्यवहाराला उपयोगीं पडत नाहीं असा सिद्धांत आहे; आणि ह्मणूनच ब्राह्मणादि वर्णांना संस्कार अवश्य आहेत. असंस्कृत वस्तु व्यवहारोपयोगी होत नाहीं हें सामान्य वाचकांच्या अंतःकरणांत बिंबण्याकरितां कांहीं उदाहरणें देणें अवश्य आहे. आतां मी ज्या टाकानें लिहीत आहें तो टाक लोखंडाचा आहे. हें लोखंड खाणींतून निघालेलें जसेंच्या तसेंच उपयोगांत आलेलें नाहीं. खाणींतून निघाल्यानंतर दाह, छेद, ताडन, पाटन इत्यादि अनेक प्रकारचे संस्कार झाल्यानंतर हें लोखंड लेखनोपयोगी झालेलें आहे. ह्या टाकाचा दांडा लांकडाचा आहे. हें लांकूडही असंस्कृत नाहीं. ह्या लांकडावर अनेक संस्कार झालेले आहेत. ज्या कागदावर मी हा मजकूर लिहीत आहें, तो कागद कापूस, झाडाच्या साली, ताग, इत्यादि द्रव्यांपैकीं एक अथवा अनेक द्रव्यांचा बनलेला आहे. अर्थात् ह्या द्रव्यावरही पुष्कळ संस्कार झाल्यानंतर त्यांना कागद हें स्वरूप प्राप्त झालें आहे. मी ज्या इमारतींत बसून हा मजकूर लिहीत आहें ती इमारत काष्ठें, लोखंड, चुना, माती, विटा, दगड वगैरे पदार्थांची झालेली आहे. परंतु, ह्यांपैकीं कोणताही पदार्थ जशाचा तसा इमारतीला उपयोगी पडलेला नाहीं. हा मजकूर ज्या धातूंच्या अक्षरांनीं छापिला जाणार आहे त्या धातुही अनेक संस्कारांनीं युक्त झाल्यानंतर वर्णरूप बनलेल्या आहेत. ह्या उदाहरणांवरून कोणतीही जड वस्तु असंस्कृत अवस्थेमध्यें व्यवहारोपयोगी होत नाहीं असें ठरतें. आतां व्यवहारांत उपयोगी पडणाऱ्या सजीव वस्तु असंस्कृत असतांना उपयोगी पडतात किंवा काय तें

पाहूं. आपणांला जर बैलाच्या अथवा घोड्याच्या गाडींत बसून जावयाचें असेल तर त्या बैलांना अथवा घोड्यांना शिकवून तयार करावें लागतें; आणि पत्र्या मारणें, नालबंदी करणें, धुणें, खरारा करणें, वगैरे संस्कार एकसारखे सुरू ठेवावे लागतात. पशुपक्षीही आपआपल्या अपत्यांचें संस्कार आपआपल्या पद्धतीप्रमाणें करीत असतात. अपत्य उत्पन्न होतांक्षणीं तें चाटून स्वच्छ करणें हा संस्कार गाई व म्हशी करण्यास चुकत नाहींत. मांजरें, कुत्री व अशाच प्रकारचे इतर प्राणी अपत्यांना स्थलांतरीं नेणें हा संस्कार करीत असतात आणि शेपटी हालवून उंदीर धरण्याचें शिक्षण मांजरें आपल्या अपत्यांना देतात. आणखी अशा प्रकारचीं उदाहरणें पुष्कळ देतां येतील; परंतु, जड पदार्थ व प्राणी असंस्कृत अवस्थेमध्यें व्यवहारोपयोगी होत नाहींत हें मनांत ठसण्याला हीं उदाहरणें पुरेशीं आहेत. वस्तूंवर किंवा पदार्थांवर ज्या मानानें संस्कार झालेले असतात त्या मानानें त्या वस्तूची किंवा पदार्थाची किंमत व उपयुक्तता अधिक होत असते. असंस्कृत कच्ची धातु ( उदाहरणार्थः लोखंड वगैरे ) गाड्यांच्या अथवा पाव्यांच्या मापानें मिळतें. मोठे मोठे गज, कांबी, कणें, पत्रे, खांब, नळ वगैरे लोखंड शेरानें अथवा मणानें विकतें. पोलाद हें लोखंडापेक्षां महाग मिळतें. घड्याळाच्या कमानी त्याहीपेक्षां महाग असतात; आणि शिवण्याकरितां उपयोगी पडणाऱ्या पोलादी सुया तर फारच महाग असतात. जें लोखंड एका रुपयाला दहा शेर मिळतें त्याच लोखंडाचें उत्तम लोहभस्म केलें असतां दहा रुपये तोळा विकतें. रुपयाचा पांच शेर मिळणारा अभ्रक सहस्र पुटांनीं संस्कृत झाल्यास शेंभर रुपये तोळा विकतो. हमाली वगैरे करणारा सामान्य मनुष्य दुसऱ्या कोणाच्या हातून उद्देश नसतांना प्राणाला मुकल्यास आरोपीकडून शेंदोनशें रुपये मयताच्या आप्ताला देवविण्यांत येतात; परंतु, गायकवाडांचे दिवाण कै. गंगा-

घरशास्त्री पटवर्धन हे पंढरपूरमुक्कामीं दुसऱ्या बाजीरावाच्या संमतीनें मारिले गेल्यामुळें त्यांचें मूल्य ह्मणून एक कोटी रुपये दुसऱ्या बाजीरावाकडून गायकवाडास मिळाले. असंस्कृत कुत्रीं गोळया घालून ठार मारिलीं जातात व त्याबद्दल एक कवडीही किंमत कोणाला दिली जात नाहीं. परंतु, कांहीं जातींचीं संस्कृत कुत्रीं हजार रुपयेपर्यंत किंमतीला चढतात. जितक्या लांबीचा व उंचीचा घोडा शंभर रुपयांना मिळतो तितक्याच लांबीच्या व उंचीच्या संस्कृत घोड्याची किंमत दहा हजार रुपयांपेक्षांही जास्त असते. पेशव्यांचे कारकीर्दींत रिसाल्यांतील मोठीं मोठीं घोडीं शेंपन्नास रुपये किंमतीपर्यंत चांगलीं मिळत. परंतु, त्याचवेळीं जर्दो चित्त्या ह्मणून जो घोडा तयार केला गेला त्याची किंमत एक लाख रुपयांपेक्षांही जास्त झाली. सारांश, किंमत व उपयुक्तता उत्तम प्रकारच्या संस्कारांवर अवलंबून आहे. काष्ठादि जड पदार्थ आणि अश्ववृषभादि पशु ह्यांना संस्कृत करण्याला मंत्राची अपेक्षा नसते. परंतु, परमेश्वरानें उत्पन्न केलेल्या मनुष्यांच्या संस्कारांना मंत्रांची आवश्यकता असते. काष्ठाचा संस्कार करण्याला सुतार लागत असतो; वाकस, किकरें, करवत, पटाशी, गुण्या, दरज, रंधा, गोलची, खतावणी, सामता इत्यादि साधनें त्याला लागत असतात आणि ज्याच्यावर संस्कार व्हावयाचा असतो तें लांकूड आणि संस्कार करणारा सुतार ह्यांचा प्रत्यक्ष संबंध ठरीव प्रकारानें उपकरणादिकांच्या द्वारानेंही होणें अवश्य असतें. हत्यारें हातीं न घेतां ज्याप्रमाणें सुताराला काष्ठाचा संस्कार करितां येणें शक्य नाहीं त्याचप्रमाणें मंत्ररूप हत्यार जवळ नसतांना पित्याच्या हातून पुत्राचा संस्कार होणें शक्य नाहीं. आज ह्या भरतखंडांतील लोक जवळ जवळ असंस्कृत असल्यामुळेंच सर्वस्वीं शोचनीय झालेले आहेत हें सुज्ञ व विचारी वाचकांच्या मनावर ठसविणें माझें कर्तव्य आहे. ह्मणून गर्भाधानादि किंवा उपनयनादि संस्का-

रांची योग्यता व आवश्यकता किती आहे हें कळण्याची पात्रता सामान्य वाचकांना येण्याकरितां संस्कारासंबंधानें विशेष खुलासा होणें अवश्य आहे.

वैदिकैः कर्मभिः पुण्यैर्निषेकादिर्द्विजन्मनाम् ।
कार्यः शरीरसंस्कारः पावनः प्रेत्य चेह च ॥२६॥अ.२म.

"वैदिक पुण्य कर्मांनीं द्विजांचा निषेकादि शरीरसंस्कार अवश्य केला पाहिजे. हा शरीरसंस्कार इहलोकीं व परलोकीं पावन करणारा आहे" असें ह्या श्लोकाचें तात्पर्य आहे. पुण्य ह्मणजे मंगलकारक अथवा सौभाग्यदायक. पावन ह्मणजे पापनाशक, अशुद्धिनाशक. निषेक ह्मणजे ओतणें, सिंचन करणें. निषेकसंस्कार ह्मणजे गर्भाधान संस्कार. गर्भाधान संस्कार जरी पतीनें भार्येच्या ठिकाणीं करावयाचा असतो तरी तो संस्कार मुख्यतः त्या पतीपासून त्या भार्येचे ठिकाणीं पुढें होणाऱ्या संततीचा आहे असें समजावें. हा क्षेत्रसंस्कारही आहे. क्षेत्र ह्मणजे बीज पेरण्याचें स्थान; अर्थात् गर्भाची स्थापना, गर्भाचें पोषण व वर्धन होण्याचें स्थान. कोणताही पदार्थ संस्कृत झाल्याशिवाय व्यवहारोपयोगीं होत नाहीं हें पूर्वीं स्पष्ट करून दाखविलेंच आहे. वैदिक कर्मांनीं गर्भाधानसंस्कार करावयाचा ह्मणजे वेदमंत्रप्रयोगांनीं गर्भाधानसंस्कार करावयाचा. पुण्यैः हें मनुवचनामध्यें विशेषण आहे. तेव्हां मंगलकारक अथवा भाग्यदायक वेदमंत्रप्रयोगांनीं द्विजांचा गर्भाधानसंस्कार होणें अवश्य आहे. नुसत्या उच्चाराच्या योगानें मंगलकारक मंत्रप्रयोगांनीं संस्कार झाला असें होणार नाहीं. मंत्रोच्चार जर यथाविधि झाला नाहीं, तर त्या मंत्रांच्या प्रयोगाला मांगल्य येणार नाहीं. ते मंत्रच दुर्बल होतील. तेव्हां ज्या द्विजाला आपल्या भार्येचे ठिकाणीं गर्भाधानसंस्कार करावयाचा असेल त्यानें तो संस्कार यथाविधि मंत्रोच्चारणपूर्वक होण्याविषयीं दक्षता अवश्य ठेविली पाहिजे. सांप्रत जे गर्भाधानादि संस्कार होत असतात त्यां-

पैकीं शंकडा निदान नव्याण्णवांना तरी संस्कार न ह्मणतां संस्कारांची नक्कल ह्मणणें यथार्थ होईल. संस्कार जर समंत्रक करावयाचा आहे तर संस्कार करणाऱ्यानेंच ते मंत्र ह्मणणें अवश्य आहे. एकानें कसेबसे मंत्र ह्मणणें व दुसऱ्यानें तंत्र करणें ह्या प्रकाराला संस्कार ह्मणतां येणार नाहीं. काष्ठाचा संस्कार करणाऱ्या सुतारानेंच ज्याप्रमाणें संस्काराचें साधन असलेलें हत्यार आपल्या हातीं घेऊन त्या काष्ठाचा संस्कार करावा लागतो त्याचप्रमाणें गर्भाधान संस्कार करणाऱ्यानें स्वतः यथाविधि मंत्रोच्चार करून तो संस्कार करणें अवश्य आहे. सांप्रत शेंकडा निदान नव्याण्णव लोक गर्भाधानसंस्कार करीतच नाहींत. शेतकऱ्यानें पेरणीचीच काळजी घेतली नाहीं ह्मणजे ज्याप्रमाणें येणाऱ्या पिकापासून त्याला लाभ होण्याचा संभव नाहीं त्याचप्रमाणें गर्भाधानसंस्काराचीच काळजी न घेणाऱ्यांना पुढें होणारी संतति लाभदायक होण्याचा संभव नाहीं. गर्भाधानाचे दिवशीं दिवसां जें होमहवन वगैरे केलें जातें तो गर्भाधानसंस्कार नव्हे. रजोदर्शनसमयीं जर कांहीं कुयोग असेल तर त्या कुयोगापासून होणारे अनर्थ टळण्याकरितां जी ऋतुशांति करीत असतात त्या शांतीचा तो होम असतो. गर्भाधानसंस्कार ह्मणजे निषेकसंस्कार. तो रात्रींच व्हावयाचा असतो. संस्कारांचें फल काय हें मनुस्मृतींतील पुढल्या वचनांत थोडक्यांत सांगितलेलें आहे.

गार्भैर्होमैर्जातकर्मचौडमौञ्जीनिबन्धनैः ।
बैजिकं गार्भिकं चैनो द्विजानामपमृज्यते ॥ ५७ ॥ २ ॥

" जातकर्म, चूडाकर्म व उपनयन ह्यांच्या योगानें गर्भाकरितां च गर्भावस्थेमध्यें होणाऱ्या संस्कारांनीं आणि होमांनीं द्विजांचा बीजसंबंधीं आणि गर्भसंबंधीं दोष झाडिला जात असतो " असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. ह्या वचनावरील टीका पाहण्यासारख्या आहेत. पुरुषाच्या ठिकाणीं असणारें शुक्र आणि स्त्रीच्या ठिकाणीं असलेलें

शोणित हीं दोन मिळून बीज होय. हीं स्वभावतः अशुद्ध असतात आणि गर्भ ज्यामध्यें धारण केला जातो तो गर्भाशयही दोषसंसर्गामुळें अशुद्धच झालेला असतो. म्हणून उत्पन्न होणाऱ्या संततीचे ठिकाणीं गर्भाशयसंबंधीं व बीजसंबंधीं दोष जडत असतात. तेव्हां ते दोष जडूं नयेत म्हणून गर्भाधानादि संस्कार अवश्य आहेत. कारण, वृक्षाच्या ठिकाणीं दोष उत्पन्न होऊं नये एतदर्थ पेरणीच्यावेळीं बीजच शुद्ध करून पेरणें बरें. सांप्रतची द्विजसंतति असंस्कृत असल्यामुळें तिच्या हातून कोणतेही कार्य नीट होत नाहीं. संस्कारानें वस्तूंचे ठिकाणीं केवळ डोळ्यानेंच दिसणारा फरक जरी न झाला तरी विशेष गुण मात्र संस्कारामुळें पदार्थांचे अंगीं हटकून येत असतात. साधें लोखंड व पोलाद ह्या दोहोंची गणना लोखंडांतच होते. परंतु, पोलाद साध्या लोखंडाला तोडितें. इतकेंच नव्हे परंतु, पाणी दिलेलें पोलाद पोलादाला तोडितें. पाणी दिलेलें पोलाद आणि पाणी न दिलेलें पोलाद ह्यांच्या स्वरूपांमध्यें डोळ्यांना दिसण्यासारखा फरक कांहीं एक नसतो. परंतु, असंस्कृत पोलाद तुटलें जातें व संस्कृत पोलाद तुटलें न जातां दुसऱ्याला तोडितें. तेव्हां पाणी हा संस्कार होय. हा संस्कार ज्याप्रमाणें झाला असेल त्याप्रमाणें पोलादाचे अंगीं शक्ति असते. असंस्कृत पोलाद दाबिलें म्हणजे दबलेंच जातें; तें पूर्वींप्रमाणें ताठ होत नाहीं.. संस्कृत पोलादाची गोष्ट तशी नसते. संस्कृत पोलादाच्या कमानी भारानें दबल्या जातात व फिरून पूर्वींप्रमाणें जशाच्या तशा होतात. कांहीं प्रकारचे संस्कृत पोलाद मुळीं वांकतच नाहीं. तें वांकवूं गेल्यास त्याचा तुकडा पडतो. अशीं अनेक प्रकारचीं संस्कृत पोलादें व्यवहाराकरितां हवीं असतात. गर्भाधानादि संस्कारांमुळें संततीच्या ठिकाणीं हे सर्व स्पृहणीय गुण उत्पन्न होतात. ज्या वेळेस जितके नमणेंच भाग असेल त्या वेळेला तितके नमतां येतें व वर घातलेला

भार दूर झाल्यावर किंवा ताण कमी झाल्यावर पूर्वीप्रमाणें होतां येतें. संस्कारदृढतेमुळें हत्रें तितकें वजन सोसूनही ताठ राहातां येतें आणि संस्कारांमुळेंच शरीर व मन चांगलें दृढ झालें असतां त्यावर कसल्याही प्रकारचे प्रहार किंवा आघात झाले तरी शरीराची व मनाची निर्विकार स्थिति कायम राहते. संस्कारांनीं तेजस्वीपणा हाही एक गुण अंगीं येतो. चरकीं धरिलेलें आणि चरकीं न धरिलेलें पात्र ह्यांच्या तेजस्वीपणामध्यें फारच अंतर असतें. तसेंच अंतर एकाच जातच्या संस्कृत व असंस्कृत व्यक्तींमध्यें असतें; आणि संस्कारामुळें ज्याच्या ठिकाणीं तेज आलेलें असतें त्याला पाहूनच लोकांच्या मनांत भय अथवा पूज्य बुद्धि उत्पन्न होत असते. तेव्हां संस्कारांचा उपयोग किती आहे हें एवढ्यावरून सहज समजेल.

स्वाध्यायेन व्रतैर्होमैस्त्रैविद्येनेज्यया सुतैः ।
महायज्ञैश्च यज्ञैश्च ब्राह्मीयं क्रियते तनुः ॥ २८ ॥ म० २,

"वेदाध्ययन, व्रतें, होम, वेदाध्ययनार्थ ब्रह्मचर्य, देवर्षिपितृतर्पण, पुत्रोत्पादन, पंचमहायज्ञ आणि यज्ञ ह्यांच्या योगानें ही तनु ब्रह्मप्राप्तीला योग्य केली जाते" हें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. हे सर्व संस्कारच आहेत. यथाविधि होणाऱ्या संस्कारांच्या योगानें जर अनंत कोटि ब्रह्मांडें व्यापून रहाणाऱ्या व त्यांवर अंमल चालविणाऱ्या ईश्वराची प्राप्ति होण्याची योग्यता अधिकारी मनुष्याला येत असते तर ब्रह्मांडांत अंतर्भूत होणारी कोणतीही गोष्ट प्राप्त करून घेण्याचें सामर्थ्य संस्कारांमुळें येत असते हें वेगळें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. संस्कार ह्मणजे वर्णाश्रमधर्म. वर्णाश्रमधर्म हेंच अभ्युदयाचें साधन होय असें श्रुतिस्मृतिग्रंथांत व श्रीमच्छंकराचार्यादिकांच्या भाष्यग्रंथांत सांगितलेलेंच आहे. ह्यास्तव, स्वतःचें व कुटुंब वगैरेंचें कल्याण करण्याची इच्छा धरणाऱ्या पुरुषानें स्वतःच्या व संततीच्या संस्कारासंबंधानें अतिशय दक्ष राहणें अवश्य आहे.

गर्भाधान हा जो संततीचा प्रथम संस्कार तो करणाऱ्या व्यक्तींनीं बीजशुद्धीसंबंधानें अतिशय काळजी बाळगिली पाहिजे. शुक्र व शोणित हीं अन्नपाण्यापासूनच उत्पन्न होणारीं आहेत. तेव्हां बीजशुद्धीची काळजी घेणें ह्मणजे अन्नपानादिकांसंबंधानें काळजी घेणें. आहारविहार हें स्वतंत्रच प्रकरण असल्यामुळें त्या प्रकरणाचा विचार स्वतंत्रच होणें अवश्य आहे.

**संस्काराः**

**श्रीगणेशाय नमः॥ गर्भाधानपुंसवनसीमन्तोन्नयनजातकर्मनामकरणान्नप्राशनचौलोपनयनानि चत्वारि वेदव्रतानि स्नानं सहधर्मचारिणीसंयोगः पञ्च महायज्ञा अष्टकाः पार्वणश्राद्धं श्रावण्याग्रहायणी चैत्र्याश्वयुजीति सप्त पाकयज्ञसंस्था अग्न्याधेयमग्निहोत्रं दर्शपूर्णमासौ चातुर्मास्यान्याग्रयणेष्टिर्निरूढपशुबन्धः सौत्रामणीति सप्त हविर्यज्ञसंस्था अग्निष्टोमोऽत्यग्निष्टोम उक्थ्यः षोडशी वाजपेयोऽतिरात्रोऽप्तोर्याम इति सप्त सोमयज्ञसंस्था इत्येते चत्वारिंशत्संस्कारा अष्टावात्मगुणा दया सर्वभूतेषु क्षान्तिरनसूया शौचमनायासो मांगल्यमकार्पण्यमस्पृहेति यस्यैते चत्वारिंशत्संस्कारा अष्टावात्मगुणाश्च स ब्रह्मणः सायुज्यमाप्नोति ॥**

ह्या गौतमधर्मसूत्रांत चाळीस संस्कार व आठ आत्मगुण ब्रह्मप्राप्तीचें कारण ह्मणून सांगितले आहेत. १ गर्भाधान, २ पुंसवन, ३ सीमंतोन्नयन, ४ जातकर्म, ५ नामकरण, ६ अन्नप्राशन, ७ चौल, ८ उपनयन, १२ चार वेदव्रतें, १३ समावर्तन, १४ विवाह, १५ देवयज्ञ, १६ पितृयज्ञ, १७ भूतयज्ञ, १८ मनुष्ययज्ञ व १९ ब्रह्मयज्ञ असे पांच महायज्ञ, २० अष्टका, २१ पार्वण स्थालीपाक, २२ मासिक श्राद्ध, २३ श्रवणाकर्म, २४ प्रत्यवरोहण, २५ शूलगव, व २६ आश्वयुजी कर्म, अशा सात पाकयज्ञ संस्था, २७ अग्न्या-

धान, २८ अग्निहोत्र, २९ दर्शपूर्णमास, ३० चातुर्मास्यें, ३१ आग्रयणेष्टि, ३२ निरूढपशुबंध व ३३ सौत्रामणी ह्या सात हविर्यज्ञसंस्था, ३४ आणि अग्निष्टोम, ३५ अत्याग्निष्टोम, ३६ उक्थ्य, ३७ षोडशी, ३८ वाजपेय, ३९ अतिरात्र व ४० अप्तोर्याम ह्या सात सोमसंस्था हे ते चाळीस संस्कार आहेत.

गर्भाधानं पुंसवनं सीमन्तो बलिरेव च ।
जातकृत्यं नामकर्म निष्क्रमोऽन्नाशनं तथा ॥
चौलकर्मोपनयनं तद्व्रतानां चतुष्टयम् ।
स्नानोद्वाहौ चाग्रयणमष्टकाश्च यथायथम् ॥
श्रावण्यमाश्वयुज्यं च मार्गशीर्ष्यं च पार्वणम् ।
उत्सर्गश्चाप्युपाकर्म महायज्ञाश्च नित्यकाः ॥
संस्कारा नियता एते ब्राह्मणस्य विशेषतः ॥
पञ्चविंशतिसंस्कारैः संस्कृता ये द्विजातयः ।
ते पवित्राश्च योग्याः स्युः श्राद्धादिषु सुयन्त्रिताः ॥

अशीं वचनें अंगिरःस्मृतीमध्यें आहेत. गौतमधर्मसूत्रांत जे चाळीस संस्कार सांगितले आहेत ते विवाहापर्यंत चवदा होतात व ह्या स्मृतीमध्यें विष्णुबलि व निष्क्रमण हे दोन संस्कार विवाहापर्यंतच्या संस्कारांत अधिक सांगितले असल्यामुळें विवाहापर्यंत सोळा व्हावयाचे; परंतु, चार वेदव्रतें मिळून एकच संस्कार मानिला असल्यामुळें तेरा राहातात. आग्रयणापासून पार्वणांत सहा मिळून एकोणीस, उत्सर्ग व उपाकर्म मिळून एक संस्कार ( उत्सर्ग ह्मणजे वेदोत्सर्जन ) आणि रोजचे पंचमहायज्ञ असे पंचवीस संस्कार अंगिरःस्मृतीमध्यें सांगितले आहेत. ह्या पंचवीस संस्कारांनीं जे ब्राह्मण संस्कृत झाले असतील तेच ब्राह्मण सदाचारसंपन्न असल्यास पवित्र व श्राद्धादिकांविषयीं योग्य होत. हे पंचवीस संस्कार विशेषतः ब्राह्मणाला नित्य आहेत.

संस्काररहिता ये तु तेषां जन्म निरर्थकम् ।

असें आश्वलायन मुनींचें वचन आहे व संस्काररहित द्विजांचा जन्म व्यर्थ होय असें ह्या वचनांत सांगितलें आहे.

भिन्न भिन्न स्मृतिग्रंथांतून वेगळे वेगळे संस्कार सांगितले आहेत. तथापि, ज्याच्या गृह्यसूत्रांत जे संस्कार सांगितलेले असतील ते त्यानें अभ्युदयाची इच्छा असल्यास सर्व केले पाहिजेत. नाहीं तर त्याचे अभ्युदयार्थ होणारे प्रयत्न व्यर्थ जातात असें

स्वे स्वे गृह्ये यथा प्रोक्तास्तथा संस्कृतयोऽखिलाः।
कर्तव्या भूतिकामेन नान्यथा सिद्धिमृच्छाति ॥

ह्या अत्रिवचनांत सांगितलें आहे.

## संस्कारांचीं फळें.

निषेकाद्बैजिकं चैनो गार्भिकं चापमृज्यते ।
क्षेत्रसंस्कारसिद्धिश्च गर्भाधानफलं स्मृतम् ॥ १ ॥
गर्भे भवेच्च पुंसूतेः पुंस्त्वस्य प्रतिपादनम् ।
निषेकफलवज्ज्ञेयं फलं सीमन्तकर्मणः ॥ २ ॥
गर्भाम्बुपानजो दोषो जातात्सर्वोऽपि नश्यति ।
आयुर्वर्चोभिवृद्धिश्च सिद्धिर्व्यवहृतेस्तथा ॥ ३ ॥
नामकर्मफलं त्वेतत्समुद्दिष्टं मनीषिभिः ।
सूर्यावलोकनादायुरभिवृद्धिर्भवेद्ध्रुवा ॥ ४ ॥
निष्क्रमादायुःश्रीवृद्धिरप्युद्दिष्टा मनीषिभिः
अन्नाशनान्मातृगर्भमलाशादपि शुध्यति ॥ ५ ॥
बलायुर्वर्चोवृद्धिश्च चूडाकर्मफलं स्मृतम् ।
उपनीतेः फलं चैतद्द्विजतासिद्धिपूर्विका ॥ ६ ॥
वेदाधीत्यधिकारस्य सिद्धिर्ऋषिभिरीरिता ।
देवपित्रृणापगमो विवाहस्य फलं स्मृतम् ॥ ७ ॥

अशा वचनें स्मृतिसंग्रहांत आहेत. "बीजसंबंधी व गर्भाशयसंबंधी दोष गर्भाधानसंस्कारानें नाहींसे होतात व क्षेत्रसंस्कार होतो. पुंसवनसंस्कारामुळें गर्भाचे ठिकाणीं वीर्यसंपन्नता प्राप्त होते. सीमंतो-

नयनसंस्काराचें फल गर्भाधानाच्या फलाप्रमाणें समजावें. गर्भाशयामध्यें असतांना तेथील उदकाचें वगैरे पान करावें लागल्यामुळें जो दोष उद्भवलेला असतो त्याचें निरसन जातकर्मनामक संस्कारानें होतें. आयुष्य व तेज ह्यांची अभिवृद्धि व व्यवहारसिद्धि हें जातकर्माचें फल होय. सूर्यावलोकनसंस्कारामुळें निःसंशय आयुष्याची अभिवृद्धि होतें. निष्क्रमणसंस्कारानें आयुष्य व संपत्ति ह्यांची वृद्धि होत असते (निष्क्रमण ह्मणजे घरांतून बाहेर पडणें). मातेच्या गर्भाशयामध्यें असतांना जें मलाचें प्राशन घडतें त्याचा दोष अन्नप्राशनानें नाहींसा होतो. बल, आयुष्य व तेज ह्यांची वृद्धि हें चौलकर्माचें फल होय. द्विजत्वसिद्धिपूर्वक वेदाध्ययनाचा अधिकार हें उपनयन संस्काराचें फल होय." असें वरील वचनांचें तात्पर्य आहे. हें संस्कारांचें फल लक्ष्यांत घेतलें असतां सांप्रत ह्या भरतवर्षांतील द्विज बलहीन, तेजोहीन, अल्पायु, दरिद्री व अनाचारी कां होतात हें समजण्यासारखें आहे.

गौतमधर्मसूत्रांत व इतर स्मृतिग्रंथांत अग्न्याधानादि हविर्याग, अग्निष्टोमादि सोमसंस्था, अष्टकादि पाकयज्ञ व पंचमहायज्ञ हे संस्कार ह्मणून सांगितले आहेत ही गोष्ट सर्वांनींच विशेष लक्ष्यांत ठेविली पाहिजे. सारांश, श्रौतस्मार्त कर्में ह्मणून जीं कल्पसूत्रांतून सांगितलेलीं असतात ते सर्व संस्कार होत. संस्कार, कर्म व यज्ञ हे शब्द प्रायः एकाच अर्थाचे वाचक आहेत.

हे संस्कार करीत असतांना ज्या कांहीं गोष्टी विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारख्या आहेत त्यांचें दिग्दर्शन ह्या ठिकाणीं अवश्य केलें पाहिजे. कारण, त्या गोष्टींकडे जर दुर्लक्ष्य केलें तर संस्कारच व्यर्थ होतात. ह्या गोष्टींना कर्मपरिभाषा असें नांव आहे व संस्काररत्नमालेमध्यें कारिकांच्या रूपानें ही परिभाषा ग्रथित केली आहे. त्या कारिका प्रथम देऊन नंतर त्यांचे मराठी तात्पर्य पुढें दिलें आहे.

स्नातः कुर्वीतोपवीती सर्वं कर्म पवित्रवान् ।
आचान्तः पुनराचामेत्तिलकी बद्धचूडकः ॥ १ ॥
श्रद्धया कर्म कुर्वीत धौतवस्त्रधरो भवेत् ।
अव्यग्रोऽलंकृतो मौनी दम्भासूयादिवर्जितः ॥ २ ॥
आपद्युक्तोऽपि शुद्धः सन्नेव कर्म समाचरेत् ।
जपहोमादिषु नरमन्यं नाकारणात्स्पृशेत् ॥ ३ ॥
अबुद्धिपूर्वसंस्पर्शश्चेत्तदा वायुपस्पृशेत् ।
बुद्धिपूर्वकसंस्पर्शे प्राणायामत्रयं चरेत् ॥ ४ ॥
वर्णत्रयस्य संस्पर्शादाचम्य प्रयतो भवेत् ।
संस्पर्शे प्रतिलोमानां स्नानमेव विधीयते ॥ ५ ॥
खल्वाटत्वादिदोषेण विशिखश्चेन्नरो भवेत् ।
कौशीं तदा धारयीत ब्रह्मग्रन्थियुतां शिखाम् ॥ ६ ॥
कार्येयं सप्तभिर्दर्भैर्धार्या श्रोत्रे तु दक्षिणे ।
नैकवासा न च द्वीपे नान्तराले कदाचन ॥ ७ ॥
श्रुतिस्मृत्युदितं कर्म न कुर्यादशुचिः क्वचित् ।
परितो वेष्टितो देशोऽद्भिर्यः स द्वीपमुच्यते ॥ ८ ॥
अनावृतस्तु यो देशः सोऽन्तरालं प्रकीर्तितम् ।
दानं प्रतिग्रहो होमो भोजनं बलिरेव च ॥ ९ ॥
साङ्गुष्ठेन सदा कार्यमसुरेभ्योऽन्यथा भवेत् ।
अप्रौढपादः कुर्वीत कृतास्वायाम एव च ॥ १० ॥
त्रिमात्रः प्रणवो वाच्यः कर्मारम्भे च सर्वदा ।
उपोषितः कर्म कुर्याद्विध्यनुज्ञे विना सदा ॥ ११ ॥
पेषणादिकयन्त्रेषु शब्दो यावत्प्रवर्तते ।
पतितान्त्यजचण्डालादीनां यावच्च शब्दकः ॥ १२ ॥
तावत्कर्म न कर्तव्यं तथा संध्याद्वयेऽपि च ।
संकीर्त्य मासपक्षादीन्निमित्तानि तथैव च ॥ १३ ॥
इदं कर्म करिष्येऽहमिति संकल्पमाचरेत् ।
यावन्ति कर्मसंबद्धान्यृक्षाणि स्युस्तु तावताम् ॥ १४ ॥

वारादीनामपि तथा युक्तं सर्वत्र कीर्तनम् ।
केनाचित्तु नवीनेन प्रोक्तमेतत्तु युक्तितः ॥ १५ ॥
कर्मण्यनियतैर्मन्त्रैः साध्ये साधारणोक्तितः ।
वारादीनां समुल्लेखो निर्वाह्योऽस्मिंस्तु कल्पके ॥१६॥
प्रायौगिकास्त्वेकभादेरेव कुर्वन्ति कीर्तनम् ।
अनुल्लङ्घ्य स्वशास्त्रोक्तविधिं कर्म समाचरेत् ॥ १७ ॥
कर्मान्यथा कृतं ज्ञात्वा तावदेव पुनश्चरेत् ।
प्रधानस्याक्रियायां तु साङ्गं तत्पुनराचरेत् ॥ १८ ॥
तदङ्गाकरणे प्रायश्चित्तमेव न कर्म तत् ।
प्राची दिशामनुक्तौ स्यादथ वैशान्युदक्स्मृता ॥ १९ ॥
अनुक्तौ प्रह्वतादीनां कर्तुरासीनता भवेत् ।
कर्त्रङ्गाणामनुक्तौ तु दक्षिणाङ्गं प्रकीर्तितम् ॥ २० ॥
चक्षुरादिषु नैतत्स्यादिति नारायणः सुधीः ।
कदङ्गस्पर्शने वामो हस्तोऽन्यस्पर्शनेऽन्यकः ॥ २१ ॥
नाभ्यधोऽङ्गान्यसन्ति स्युर्नाभ्यूर्ध्वं स्युस्तु सन्ति वै ।
नाभौ त्वन्यतरो हस्त इति ज्ञेयं विचक्षणैः ॥ २२ ॥
करे रोगो यदि तदोभयत्रोभावपि स्मृतौ ।
अवैधं नाभ्यधःस्पर्शं कर्मकाले न चाऽऽचरेत् ॥ २३ ॥
रक्तपूयोरेतआदिस्पर्शे स्नानं प्रकीर्तितम् ।
प्राक्संस्थं कर्म देवानामुदग्दिगपवर्गकम् ॥ २४ ॥
उदग्दिक्संस्थमथ वा प्राचीदिगपवर्गकम् ।
दक्षिणाशापवर्गं तु प्रत्यग्दिक्संस्थमेव हि ॥ २५ ॥
पित्र्यं कर्म प्रकर्तव्यं स्पष्टं यदि वचो भवेत् ।
अङ्गोपस्पर्शने वस्त्रदशासंस्पर्शने तथा ॥ २६ ॥
छेदने भेदने चैव निरासे खनने तथा ।
पैतृके राक्षसे रौद्रे नैर्ऋते चाऽऽभिचारिके ॥ २७ ॥
एतेषु वै निमित्तेषु जलोपस्पर्शनं भवेत् ।
अधोवातसमुत्सर्गे प्रहासेऽनृतभाषणे ॥ २८ ॥

मार्जारमूषकस्पर्श आक्रन्दे क्रोधसंभवे ।
निमित्तेष्वेषु सर्वेषु कर्म कुर्वन्नपः स्पृशेत् ॥ २९ ॥
यत्त्वोत्वाख्वोः स्नानमुक्तं तदन्यविषयं भवेत् ।
इति केचिद् बुधाः प्राहुरन्ये त्वित्थं समूचिरे ॥ ३० ॥
पुच्छान्यदेशसंस्पर्श उदकस्पर्शनं भवेत् ।
स्नानं तु पुच्छस्पर्शे स्यात्कर्मकाले च भोजने ॥ ३१ ॥
अबुद्धिस्पर्शविषये वार्युपस्पर्शनं भवेत् ।
बुद्धिपूर्वे तु स्नानं स्यादिति प्राहुः परे बुधाः ॥ ३२ ॥
सौम्याख्यादिशि कर्तव्यो निरासो देवकर्मसु ।
पितृकर्मसु याम्याख्यदिश्येष परिकीर्तितः ॥ ३३ ॥
दैवे कर्मणि सामन्ते प्रादक्षिण्यं प्रकीर्तितम् ।
पित्र्येऽप्येवं बुधैर्ज्ञेयं नेदं स्यात्परिषेचने ॥ ३४ ॥
अप्रादक्षिण्यमेव स्यात्तत्र सूत्रकृदुक्तितः ।
निवीतिता मानुषे स्याद्दैवे यज्ञोपवीतिता ॥ ३५ ॥
प्राचीनावीतिता तु स्यात्पित्र्ये स्पष्टं वचो यदि ।
स्मृत्युक्ताङ्गेषु विज्ञेये उभे स्मृत्युक्तरीतितः ॥ ३६ ॥
अप्रादक्षिण्यापसव्ये सूत्रोक्तनियमोऽत्र वा ।
हवनं भोजनं दानं श्राद्धं देवार्चनादि च ॥ ३७ ॥
बहिर्जानु न कार्यं स्यात्तद्वदाचमनं स्मृतम् ।
विहारः पृष्ठतो नैव प्रकर्तव्यः कदाचन ॥ ३८ ॥
पात्राण्याज्यं हविर्बर्हिरेतेष्वन्तः क्रमात्परम् ।
कर्तारस्तु बहिर्भूता एवैष्वन्तस्तु होमकृत् ॥ ३९ ॥
बहिर्भूतस्ततो ब्रह्माऽन्येभ्योऽन्तर्भूत ईरितः ।
सर्वेष्वेतेषु पत्न्यन्तस्ततोऽप्यन्तः पतिर्भवेत् ॥ ४० ॥
एतत्सर्वत्र विज्ञेयं विशेषाविधिना विना ।
अविज्ञातस्वरा मन्त्राः प्रयोक्तव्याः प्रयोक्तृभिः ॥ ४१ ॥
एकश्रुत्यैव सर्वत्र जयन्तस्वामिभाषणात् ।
ऋषिं च देवतां छन्दो विनियोगं मनोस्तथा ॥ ४२ ॥

विज्ञायैव क्रियाः कार्या याज्ञवल्क्यमुनिस्मृतेः ।
ऋषिश्छन्दो देवते च छन्दश्चर्षिश्च देवता ॥ ४३ ॥
ऋषिश्च देवता छन्द इत्येवं स्यात्त्रिधा क्रमः ।
सौत्रमन्त्रा वेदविद्भिर्वामदेवर्षयः स्मृताः ॥ ४४ ॥
लिङ्गोदितो भवेद्देवोऽस्पष्टे देवेऽनलः स्मृतः ।
सौत्रे ह्यृष्यादिविज्ञानं नेत्युक्तं पारिजातके ॥ ४५ ॥
वैतानिके मखे श्राद्धे ब्रह्मयज्ञे तथैव च ।
ऋष्याद्यवगतेर्नैवापेक्षाऽस्तीति पुरातनाः ॥ ४६ ॥
श्रौते श्राद्धे च मन्त्रादौ प्रणवोऽपि न हीष्यते ।
अन्ये त्वेतस्य वचसो निर्मूलत्वादिहापि च ॥ ४७ ॥
स्यादृष्यादिस्मृतिस्तारोच्चारणं चेति वै जगुः ।
मन्त्रान्त्यस्य त्वक्षरस्य पाठकाले हि कर्मणः ॥ ४८ ॥
सर्वत्रोपक्रमः कार्यः सूत्रकारस्य वाक्यतः ।
स्वाहाकारो हि मन्त्रान्ते नित्यो गार्ह्ये प्रकीर्तितः॥४९॥
पित्र्यमन्त्रेऽपि नो यत्र स्वधाकारनिदर्शनम् ।
स्वाहान्त एव तत्र स्यादिति भाष्यकृतेरितम् ॥ ५० ॥
मन्त्रादौ मन्त्रमध्ये वा स्वाहाशब्दोऽस्ति चेत्तदा ।
नान्ते प्रयोक्तव्य इति प्रोक्तवानाश्वलायनः ॥ ५१ ॥
भवेदव्यवधानेन देवतापदतः पुरा ।
स्वाहाकारस्य पाठश्चेत्तदा नान्ते भवेदयम् ॥ ५२ ॥
न चेद्भवेत्पाठ इत्थं तदाऽन्तेऽपि भवेत्स तु ।
स्वाहाधिमिति मन्त्रेऽस्मिन्नर्थे ह्यस्ति निदर्शनम् ॥५३॥
इदमेवानुसर्तव्यमत एव मनीषिभिः ।
मन्त्रान्ते या वह्निजाया सा तु मन्त्रस्वरूपिणी ॥ ५४ ॥
तदन्तेऽन्यां प्रयुञ्जीत सा होमाङ्गतया मता ।
शक्तिसंगमतन्त्रोक्तादेतस्माद्वाक्यतः पुनः ॥ ५५ ॥
स्वाहाशब्दं प्रयुञ्जीत तन्त्रस्य प्रबलत्वतः ।
विशेषोऽयं तन्त्रयुक्ते वैदिके होमकर्मणि ॥ ५६ ॥

जुहोतिविधिसंबद्धमन्त्रेष्वेष विधिः स्मृतः ।
स्वाहान्तो नाममन्त्रः स्यादमन्त्रास्वाहुतिष्वथो ॥५७॥
कर्मशिष्टोदकं कर्मसमाप्तौ तु परित्यजेत् ।
न त्वन्यत्रोपयुञ्जीताऽऽचमनक्षालनादिषु ॥ ५८ ॥
मन्त्रमुच्चारयेन्मन्त्रप्रतिपाद्यं तु शेषिणम् ।
संस्तुवंस्तन्मना भूत्वा स्यादेतदनुमन्त्रणम् ॥ ५९ ॥
आभिमुख्येक्षणाधिक्यादेतदेवाभिमन्त्रणम् ।
शेषिणश्चिन्तनं कुर्वन्सम्यक्स्थित्वा समीपतः ॥ ६० ॥
नतिमुद्रायुतो मन्त्रं पठेदियमुपस्थितिः ।
तिष्ठत्ताश्रवणं चेत्स्यादत्र सा नियता तदा ॥ ६१ ॥
अभिमर्शो मन्त्रपाठः संस्पर्शसमकालिकः ।
चतुःस्वरोच्चारणात्मा जपतीति विधौ जपः ॥ ६२ ॥
अभिमर्शानुमन्त्राभिमन्त्रोपस्थितिकर्मणाम् ।
प्रसाधितं जपत्वं हि व्याख्याकृद्भिरतस्त्वयम् ॥ ६३ ॥
चतुःस्वरत्वधर्मस्तु मन्त्रेष्वेतेष्वपि स्मृतः ।
ततोऽन्यत्र तु मन्त्राणां नियतैकश्रुतिर्भवेत् ॥ ६४ ॥
कात्यायनमतादत्रापि स्युर्वा स्वरसंयुताः ।
सर्वत्रैव न्यूङ्खसाम्नोश्चत्वारो नियताः स्वराः ॥ ६५ ॥
संवादप्रैषभिन्नानां मन्त्राणां स्यादुपांशुता ।
आश्रावणं प्रवरणं प्रत्याश्रावणमेव च ॥ ६६ ॥
श्रौत एवान्यपि ज्ञेयान्युच्चैरेव विचक्षणैः ।
कुर्यादुपनयादीनि विवाहान्तानि लौकिके ॥६७ ॥
प्रायश्चित्ताख्यकर्माणि काम्यकर्माणि वै तथा ।
औपासने लौकिके वा कर्तव्यानि सदा बुधैः ॥ ६८ ॥
उपाकर्मोत्सर्जने तु कुर्याच्छिष्ययुतो यदि ।
लौकिकाग्नौ तदा कुर्यादशिष्यश्चेत्स्ववह्निके ॥ ६९ ॥
गृह्यानले प्रकर्तव्यो होमः पारायणीयकः ।
पारायणस्य कर्ता चेदृत्विग्लोकानले तदा ॥ ७० ॥

अवशिष्टं गृह्यकर्म कार्यमौपासनेऽनले ।
औपासनाग्निसाध्येषु प्रजासंस्कारकर्मसु ॥ ७१ ॥
मुख्यकर्तुरभावेन यदि कर्त्रन्तरं भवेत् ।
लौकिकाग्नौ तदा कर्म न तु गृह्ये कदाचन ॥ ७२ ॥
सर्वाधानी भवेद्विप्रश्चेत्तदा तत्र लुप्यते ।
स्थालीपाकः पार्वणाख्य औपासनहुतिस्तथा ॥ ७३ ॥
मासिश्राद्धादि लौकाग्नाविति केचिद्बुधा जगुः ।
मासिश्राद्धं दक्षिणाग्नावष्टकादीनि लौकिके ॥ ७४ ॥
वैजयन्तीकृदाहेति प्राहुरन्येऽपि केचन ।
प्रजासंस्कारकर्माणि स्युर्लौकानल एव तु ॥ ७५ ॥
शास्त्रान्तरप्रोक्तचित्तहोमाः संधानहेतवः ।
नष्टस्य कर्मणो यस्मात्तस्मात्स्युर्गृह्य एव ते ॥ ७६ ॥
स्वतन्त्रत्वाल्लौकिकाग्नावेव शास्त्रान्तरेरितम् ।
ग्रहयज्ञादिकं कार्यं न तु गृह्यानले चरेत् ॥ ७७ ॥
गृह्यान्तरोक्तं लोकाग्नौ गृह्याग्नावथ वाऽऽचरेत् ।
पुनरग्न्याहितौ सर्वाधानिनो मथितानले ॥ ७८ ॥
आनीते श्रोत्रियागाराद्वाऽग्नौ ब्रह्मौदनक्रिया ।
विवाहे यदि निर्मन्थ्यस्तदाऽत्र स्यात्तु मन्थनम् ॥ ७९ ॥
यदि द्वितीयः पक्षः स्यात्स्वीकार्योऽत्र स एव तु ।
एवंरूपा व्यवस्था तु व्याख्याकृद्भिः प्रदर्शिता ॥ ८० ॥
बहुशुष्केन्धने चाग्नौ सुसमिद्धे विधूमके ।
साङ्गारे लेलिहाने च होतव्यं नान्यथा क्वचित् ॥ ८१ ॥
आज्यहोमे सूत्रकृता दर्व्येव विहिता यतः ।
अतस्तत्र भवेत्सैव न स्रुवेणाऽऽहुतिर्भवेत् ॥ ८२ ॥
साधनं क्षीरदध्यादिहोमे दर्वी स्रुवोऽथवा ।
सूत्रकृद्विहिते होमे द्रव्यस्य कठिनस्य तु ॥ ८३ ॥
दर्वी हस्तोऽथवा ज्ञेयः शान्त्यादौ हस्त एव तु ।
होमे शिष्टैरादृतोऽस्ति यतोऽस्तोऽत्र स एव हि ॥ ८४ ॥

हस्त एवाऽऽचार्यवाक्यादौपासनहुतौ भवेत् ।
होमद्रव्ये त्वनादिष्टे सर्वत्राऽऽज्यं प्रकीर्तितम् ॥ ८५ ॥
कण्ठोक्त्या समिधां स्याच्चेद्यत्र प्रादेशमात्रता ।
तत्रैव सा स्यादन्यत्र त्वैच्छिकीयं समीरिता ॥ ८६ ॥
ओषध्यः सक्तवः पुष्पं काष्ठं मूलं फलं तृणम् ।
एतद्धस्तेन होतव्यं नान्यत्किंचिदचोदनात् ॥ ८७ ॥
अनादेशे दक्षिणा गौर्हेम वा पूर्णपात्रकम् ।
देवकार्ये नैव देयं रजतं त्वश्रुजं हि तत् ॥ ८८ ॥
पात्रं पादोपसंस्पृष्टं प्रक्षाल्यं सर्वथा बुधैः ।
हुतं यन्मांसधौतेन तन्न भुङ्क्ते हि देवता ॥ ८९ ॥
पात्राणां शोधनं नातः कार्यं केवलहस्ततः ।
किं तु दर्भैस्तृणैर्वाऽपि पर्णैर्वा वाससाऽपि वा ॥९०॥
सर्वेषु धर्मकार्येषु पत्नी दक्षिणतो भवेत् ।
अभिषेके विप्रपादक्षालने वामतः स्मृता ॥९१॥
प्रभुः प्रथमकल्पस्य योऽनुकल्पेन वर्तते ।
स नाप्नोति फलं तस्य परत्रेति श्रुतिः स्मृतिः ॥९२॥
बह्वल्पं वा स्वगृह्योक्तं यस्य यावत्प्रचोदितम् ।
तस्य तावति शास्त्रार्थे कृते सर्वं कृतं भवेत् ॥९३॥
यन्नाम्नातं स्वशाखायां पारक्यमविरोधि यत् ।
आकांक्षितं शेषभूतमनुष्ठेयं विचक्षणैः ॥ ९४ ॥
तत्कृतौ फलवैशिष्ट्यं न दोषस्त्वकृतौ भवेत् ।
सामयाचारिका धर्मा देशजातिकुलोद्भवाः ॥९५॥
ग्रामाचाराः परिग्राह्या ये च शास्त्राविरोधिनः ।
युगधर्माः परिग्राह्याः सर्वत्रैव यथोचितम् ९६

इति संक्षेपेण परिभाषाः ।

कोणतेंही कर्म करण्याचे पूर्वी स्नान करून शेंडीलों गांठ मारावी; तिलक धारण करावा; यज्ञोपवीती करावी आणि दोनदा आचमन करून

पवित्र धारण करावें १. कर्म करितेवेळीं धौत वस्त्रें असावीं कर्म करणें तें श्रद्धेनें करावें; लक्ष्य कर्माकडेच ठेवावें; यथाशक्ति अलंकार धारण करावे; कर्माशिवाय दुसरें भाषण करूं नये; कर्म करणाऱ्याचे ठिकाणीं दांभिकपणा नसावा आणि मत्सर, द्वेष इत्यादिकांपासूनही अंतःकरण अलिप्त ठेवावें २. आपत्कालामध्यें सुद्धां शुद्ध असतांनाच कर्मानुष्ठान करीत जावें. जप, होम इत्यादि कर्में करितेवेळीं विनाकारण दुसऱ्या मनुष्याला स्पर्श करूं नये ३. न समजून जर कोणाचा स्पर्श झाला तर उदकस्पर्श करावा; परंतु, समजून उमजून स्पर्श केल्यास तीन प्राणायाम करावे ४. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या तीन वर्णांपैकीं कोणाचा स्पर्श झाल्यास आचमन केल्यानें शुद्धता प्राप्त होते; परंतु प्रतिलोमसंकर जातींपैकीं कोणाचा स्पर्श झाल्यास स्नानच करणें अवश्य आहे ५. ( प्रतिलोम संकर जाति ह्मणजे उच्च जातीच्या स्त्रीचे ठिकाणीं हीनजातीय पुरुषापासून झालेली प्रजा व त्याप्रजेची संतति ) टक्कल वगैरे दोषांमुळें जर शेंडी नसेल तर ब्रह्मगांठ मारिलेली सात दर्भांची शेंडी करून उजव्या कानावर असूं द्यावी. श्रुतिस्मृतिविहितकर्म केव्हांही अशुद्ध असतांना, एकच वस्त्र असतांना, बेटामध्यें अथवा अंतरालीं करूं नये ६, ७. अंतराल ह्मणजे उघडा प्रदेश ८, ९. दान, प्रतिग्रह, होम, भोजन व बलिदान हीं कर्में सर्वदा अंगुष्ठांसह करावीं; नाहीं तर तीं असुरांना पोंचतात. कर्म करिते वेळीं आसन मांडी असावी. गुडघे वर करून बसूं नये १०. विधि अथवा अनुज्ञा असल्याशिवाय भोजन करून कोणतेंही कर्म करूं नये. उपोषित असतांनाच कर्म करावें ११. जातें, उखळ पाटा इत्यादिकांचा शब्द होत असतांना आणि त्याचप्रमाणें पतित, अंत्यज, चंडाल इत्यादिकांचा शब्द होत असतांना कर्म करूं नये. त्याचप्रमाणें सूर्योदयकालीन व सूर्यास्तकालीन संध्या असतांनाही कर्म करूं नये १२. मास, पक्ष वगैरेंचा व निमित्तांचा उल्लेख

करूनच १३ इदं कर्म करिष्ये असा संकल्प करावा. कर्मकालीं असलेलें नक्षत्र १४, ग्रह, वार इत्यादिकांचाही उल्लेख करावा असें कोणाचें ह्मणणें आहे १५. अमुकच दिवसांनीं हें कर्म संपेल असा जेथें नियम नसतो तेथें सामान्यतः वेगळा वेगळा वारादिकांचा उल्लेख करणें बरें १६. परंतु, याज्ञिक लोक आरंभीं जें नक्षत्र वगैरे असेल तेवढ्याचाच उल्लेख करीत असतात. जें कर्म करावयाचें तें स्वशास्त्रोक्त विधीचें उल्लंघन न होऊं देतां करावें १७. कर्म भलत्याच रीतीनें झालें असें समजून आल्यावर तेवढेंच कर्म पुनः करावें. प्रधान कर्माचाच लोप झाल्यास अंगांसह तें कर्म करावें परंतु, केवळ अंगलोप झाल्यास प्रायश्चित्तानें निर्वाह होतो. पुनरपि तें अंगकर्म करण्याचें कारण नाहीं. जेथें दिशा उक्त नसेल तेथें पूर्व अथवा ईशान्य ग्राह्य होय १८, १९. जेथें वाकणें वगैरे सांगितलेलें नसेल तेथें बसून कर्म करावें. जेथें उजवें अथवा डावें अंग सांगितलेलें नसेल तेथें उजवें समजावें २०. परंतु, नेत्र, कान व नाकपुड्या ह्यांसंबंधानें हा नियम नाहीं असें नारायणाचें ह्मणणें आहे २१. नाभीच्या खालीं स्पर्श करणें झाल्यास डाव्या हातानें स्पर्श करावा; परंतु, नाभीच्या वरल्या भागाला स्पर्श करावयाचें झाल्यास उजव्या हाताची योजना करावी २२. एका हाताला कांहीं रोग वगैरे असल्यास हा नियम लागूं नाहीं. विधीशिवाय कर्मकालीं नाभीचे खालीं स्पर्श करूं नये २३. रक्त, पू, रेत इत्यादिकांचा स्पर्श झाल्यास स्नान उक्त आहे. देवकर्माचा आरंभ उत्तरेकडे व समाप्ति पूर्वेकडे करावी २४. किंवा देवकर्माची उत्तरेस समाप्ति व पूर्वेस आरंभ करावा. दक्षिणेकडे आरंभ व पश्चिमेकडे समाप्ति स्पष्ट वचन असल्यास पैतृक कर्माची करावी. अंगस्पर्श, वस्त्रदशास्पर्श २५, २६, छेदन, भेदन, निरसन, खनन आणि त्याचप्रमाणें पितृसंबंधीं, राक्षससंबंधीं, निर्ऋतिसंबंधी व रुद्रसंबंधी अथवा अभिचारसंबंधीं कर्म झाल्यास उदकस्पर्श करावा २७. कर्म करितांना वायु सरल्यास

झाल्य अथवा अनृत भाषण झाल्यास, उंदराचा अथवा मांजराचा स्पर्श झाल्यास, ओरडल्यास अथवा क्रोध आल्यास उदकस्पर्श करावा २८,२९. उंदीर व मांजर ह्यांच्या स्पर्शासंबंधानें अनेक मतें आहेत. कर्मकालीं व भोजनकालीं पुच्छाचा स्पर्श झाल्यास स्नान व इतर ठिकाणीं स्पर्श झाल्यास उदकस्पर्श ३०,३१. कोणी ह्मणतात आपली इच्छा नसतांना स्पर्श झाल्यास स्नान.समजून उमजून आपण उंदराला अथवा मांजराला स्पर्श केल्यास स्नान ३२. पितृकर्मामध्यें निरसन करणें तें दक्षिणेस करावें व देवकर्मामध्यें तें उत्तरेस करावें ३३. सभोंवतीं कांहीं करावयाचें असल्यास दैवकर्मामध्यें तें प्रदक्षिणिक करावें; परंतु, पितृकर्मामध्यें तें अप्रदक्षिण करावें.तथापि, परिषेका-संबंधानें मात्र हें लागूं नाहीं असें कोणी ह्मणतात ३४. परंतु, सूत्रकारांच्या आज्ञेप्रमाणें परिषेकही पितृकर्मामध्यें अप्रदक्षिणिकच ठरतो. मनुष्यकर्माला निवीती व दैवकर्माला यज्ञोपवीती असावी ३५. परंतु, पितृकर्माला स्पष्ट वचन असेल तर प्राचीनवीती असणें अवश्य आहे. स्मृत्युक्त अंगांविषयीं स्मृत्युक्तीप्रमाणें करावें. हवन, भोजन, दान, श्राद्ध, देवार्चन वगैरे कर्में ३६,३७ धुडघ्याबाहेर हात असतांना करूं नयेत. आचमनाचीही गोष्ट त्याचप्रमाणें. विहा-राकडे ( ह्मणजे अग्निशालेकडे ) पाठ करूं नये ३८. अग्नि, हवि, आज्य, पात्रें, पत्नी, यजमान, अध्वर्यु, ब्रह्मा व इतर कर्ते ह्यांमध्यें उत्तरोत्तर बाह्य समजावें ३९,४०. विशेष विधानाशिवाय हा न्याय सर्वत्र समजावा. ज्यांचे स्वर ठाऊक नाहींत ते मंत्र सर्व ठिकाणीं एक-श्रुतीनेंच ह्मणावे असें जयंत स्वामींचें मत आहे. मंत्राचा ऋषि,देवता, छंद व विनियोग ४१, ४२ जाणूनच कर्म करावीं असें याज्ञवल्क्य-वचन आहे. ऋषि, छंद व देवता, छंद, ऋषि व देवता ४३ आणि ऋषि, देवता व छंद असा तीन प्रकारचा क्रम आहे. सौत्र मंत्रांचा ऋषि वामदेव समजावा; मंत्रांतील लिंगावरून देवता समजावी; परंतु,

जेथें देवतालिंग स्पष्ट नसेल तेथें अग्नि देवता समजावी. सौत्र मंत्राला ऋषिप्रभृतींच्या ज्ञानाची आवश्यकता नाहीं असें पारिजातक ग्रंथांत सांगितलें आहे ४४,४५. त्रेताग्निसाध्य यज्ञ, श्राद्ध व ब्रह्मयज्ञ ह्या कर्मासंबंधानें ऋषिप्रभृतींच्या ज्ञानाची अपेक्षा नाहीं असें प्राचीन लोकांचें मत आहे ४६. श्रौत व श्राद्ध ह्या कर्मामध्यें मंत्राचे आरंभीं प्रणवाचेंही कारण नाहीं. परंतु, हें वचन निर्मूळ असल्यामुळें ह्या कर्मामध्येंही ऋष्यादिकांचें ज्ञान व प्रणवोच्चारण हीं अवश्य होत असें दुसरें ह्मणतात. मंत्राच्या शेवटल्या अक्षराचा उच्चार होतेवेळीं कर्माचा ४७,४८ सर्वत्र उपक्रम करावा असें सूत्रकारमत आहे. मंत्राच्या शेवटीं गृह्यसंबंधीं हवनकर्मामध्यें स्वाहाकार ह्मणावा; ४९ आणि जेथें स्वधाकार सांगितलेला नसेल तेथें पितृविषयक मंत्राचे शेवटींही स्वाहाकारच ह्मणावा; इतकेंच नव्हे, परंतु, पितृकर्मामध्येंही होम-मंत्राच्या अंतीं स्वाहाकारच ह्मणावा असें भाष्यकारांचें मत आहे ५०. मंत्राच्या आरंभीं किंवा मध्यें स्वाहाशब्द असल्यास तो अन्तीं योजण्याचें कारण नाहीं असें आश्वलायनानें सांगितलें आहे ५१. देवता-वाचक पदाचे पूर्वीं त्या पदाला चिकटूनच जर स्वाहाकाराचा पाठ असेल तर मात्र मंत्राच्या शेवटीं स्वाहाकार नको ५२, परंतु, तसें नसेल तर मंत्रांतीं स्वाहाकार अवश्य आहे. कारण, "स्वाहाधिमाधीताय स्वाहा" इत्यादि मंत्र हें ह्याविषयीं उदाहरण होय. ( हे मंत्र तैत्तिरीय संहितेच्या सप्तम काण्डांतील तिसऱ्या प्रपाठकाच्या पंधराव्या अनुवाकामध्यें आहेत. ) ५३. ह्याच न्यायाला अनुसरून विचारी लोकांनीं चालावें. मंत्रान्तीं असलेला "स्वाहा" शब्द मंत्र स्वरूपच होय ५४. ह्यास्तव, मंत्राच्या शेवटीं दुसरा योजावा; ह्मणजे तो होमांग होतो. शक्तिसंगमतंत्रांतील ह्या वाक्यावरून पुन्हा ५५ स्वाहाशब्द योजावा. कारण, तंत्र प्रबल आहे. तंत्रयुक्त वैदिक होमकर्मांत जुहोति-विधीनें संबद्ध जे मंत्र त्यांविषयीं हा विशेष विधि आहे. अमंत्रक

आहुतीमध्यें नाममंत्रच स्वाहान्त असावा ५६,५७. कर्म करून अवशिष्ट राहिलेलें उदक सर्व टाकून द्यावें. आचमन, प्रक्षालन इत्यादि उदककार्यांकडे त्याचा उपयोग करूं नये. ५८. प्रतिपाद्य जी देवता तिचें स्तवन करण्याच्या बुद्धीनें एकाग्र होऊन मंत्रोच्चार करणें हें अनुमंत्रण होय ५९. ह्यांतच आपण संमुख राहून आवाहित देवतेकडे पाहणें इतकें अधिक झाल्यानें अभिमंत्रण होतें. देवतेसमीप तिचें ध्यान करीत नतिमुद्रेनें उभें राहून मंत्रपाठ करणें झाला हें उपस्थान होय. उपतिष्ठते इत्यादि स्पष्ट शब्दांनीं जेथें उभें राहण्यास सांगितलें असेल तेथें मंत्रपाठसमयीं उभें राहावें ६०, ६१. स्पर्श असतांना होणाऱ्या मंत्रपाठाला अभिमर्श ह्मणतात. जेथें जपति असा विधि असेल तेथें चतुःस्वरयुक्त मंत्राचाच उच्चार अवश्य आहे ६२. अभिमर्शन, अनुमंत्रण, अभिमंत्रण व उपस्थान हीं जपकर्में असल्याचें व्याख्याकारांनीं सिद्ध केलें आहे ६३. ह्मणून ह्याही कर्मांतील मंत्रांना चतुःस्वरत्वधर्म अवश्य होय. ह्या चार कर्मांशिवाय इतर कर्मांतील मंत्रांचा पाठ एकश्रुतीनें करावा ६४. परंतु, कात्यायन मुनिच्या मतानें इतर कर्मांतीलही मंत्र स्वरयुक्तच असावे. न्यूंख व साम ह्यांविषयीं चार स्वर सर्वत्र नियत आहेत ६५. संवाद व प्रैष ह्यांविषयीं इतर मंत्र उपांशु ह्मणावे. आश्रावण, प्रत्याश्रावण व प्रवरण ६६ हींहीं श्रौतकर्मांमध्यें उच्च समजावीं. उपनयनापासून विवाहापर्यंतचीं कर्में लौकिक अग्नीवर करावीं ६७; प्रायश्चित्त कर्में व काम्य कर्में सर्वदा औपासन अथवा लौकिक अग्नीवर करावीं ६८; उपाकर्म व उत्सर्जन हीं कर्में शिष्यांसह करावयाचीं असल्यास लौकिकाग्नीवर आणि शिष्यांसह करावयाचीं नसल्यास स्वतःच्या अग्नीवर करावीं ६९. पारायणसंबंधी होम गृह्याग्नीवर करावा. परंतु, पारायणाचा कर्ता ऋत्विज असल्यास होम लौकिक अग्नीवरच करावा ७०. अवशिष्ट गृह्य कर्म औपासन अग्नीवर करावें; औपासन अग्नीनें साध्य जीं प्रजासंस्काररूप कर्में तीं कर-

णाऱ्या मुख्य कर्त्याचा अभाव असल्यामुळें ७१ जर दुसऱ्यानें करावयाची असली तर ती लौकिक अग्नीवरच करावी; गृह्याग्नीवर कधींही करूं नये ७२. सर्वाधानी ब्राह्मण असल्यास पार्वणस्थालीपाक व औपासन होम ह्यांचा लोप समजावा ७३. मासिक श्राद्धादि कर्मे लौकिकाग्नीवर करावीं असें कोणी ह्मणतात. परंतु, मासिश्राद्ध दक्षिणाग्नीवर व अष्टकादि कर्मे लौकिकाग्नीवर ७४ करावीं असें वैजयंतीकाराचें ह्मणणें आहे. प्रजासंस्कारकर्मे लौकिकाग्नीवरच करावीं असेंही कोणी ह्मणतात ७५. शास्त्रान्तरामध्यें सांगितलेलें प्रायश्चित्त होम नष्ट कर्माचें संधान करणारे असल्यामुळें गृह्याग्नीवर करावे ७६. शास्त्रान्तरानें विहित असलेलीं ग्रहयज्ञादि कर्मे स्वतंत्र असल्यामुळें लौकिक अग्नीवरच करावीं. तीं गृह्याग्नीवर करूं नयेत ७७. स्वकीय गृह्यसूत्राहून दुसऱ्या गृह्यसूत्रानें सांगितलेलें कर्म लौकिकाग्नीवर किंवा गृह्याग्नीवर करावें ७८. पुनराधान जर सर्वाधानी मनुष्याला करावयाचें असेल तर ब्रह्मौदन सिद्ध करणें तें मंथन करून काढिलेल्या अग्नीवर किंवा श्रोत्रियाच्या घरांतून आणिलेल्या अग्नीवर करावें. विवाहामध्यें जर मंथनापासून काढिलेलाच अग्नि विवाहहोमाचे वेळीं स्वीकारिलेला असेल तर, ह्या ब्रह्मौदन कर्मांतही तसाच अग्नि स्वीकारावा. परंतु, जर दुसरा पक्ष असेल तर तो स्वीकारावा. अशी व्यवस्था व्याख्याकारांनीं दर्शविली आहे ७९, ८०. ( दुसरा पक्ष ह्मणजे श्रोत्रिय ब्राह्मणाच्या घरांतून अग्नि आणण्याचा. सर्वाधान ह्मणजे श्रौत व स्मार्त अग्नीचें एकीकरण; आणि अर्धाधान ह्मणजे स्मार्ताग्नि व त्रेताग्नि भिन्न भिन्न असणें, पुष्कळ शुष्क इंधनांनीं युक्त, प्रदीप्त, धूमरहित, अंगारसंपन्न व ज्वाला निघत असलेल्या अग्नीमध्यें हवन करावें; असा अग्नि नसेल तर हवन करूं नये ८१. आज्यहोमाविषयीं सूत्रकारानें ज्या अर्थी दर्वीच सांगितलेली आहे त्याअर्थी तीच आज्यहोमाला घ्यावी. स्रुव्यानें आज्यहोम करूं नये ८२. क्षीर, दधि इत्यादिकांच्या

होमाचें साधन दर्वी अथवा स्रुवा. सूत्रकारांनीं सांगितलेल्या कठिन द्रव्याच्या हवनाविषयीं हस्त अथवा दर्वी हें साधन समजावें. परंतु शांस्यादिविषयक कठिन द्रव्याचें हवन हातानेंच करावें. कारण, त्याविषयीं हाताचाच शिष्टांनीं आदर केलेला आहे ८३, ८४. अथवा औपासनहोमाविषयीं सूत्रकारांच्या मताप्रमाणें हात हेंच साधन समजावें. जेथें होमद्रव्य सांगितलेलें नसेल तेथें सर्वत्र आज्यच समजावें ८५. ज्या ठिकाणीं प्रादेश हें समिधांच्या लांबीचें प्रमाण कंठरवानें सांगितलें असेल तेथेंच तें स्वीकारावें. जेथें तें प्रमाण सांगितलेलें नसेल तेथें त्यांची लांबी इच्छेवर अवलंबून आहे ८६. ओषधि, सातु, पुष्प, फल, काष्ठ, मूल, फल व तृण ह्यांचेंच हवन हातानें करावें. विधानाशिवाय इतर द्रव्यांचें हवन हातानें करूं नये ८७. जेथें दक्षिणाद्रव्याचा निर्देश नसेल तेथें गाय, तोळाभर सुवर्ण अथवा पूर्णपात्र ही दक्षिणा समजावी. देवकार्याला रौप्य दक्षिणा देऊंच नये. कारण, ते अश्रुजन्य आहे ८८. पादस्पृष्ट पात्र धुवावें. मांसानें धुतलेल्या पात्रानें केलेलें हवन देवता स्वीकारीत नाहींत ८९. ह्मणून पात्रांची शुद्धि केवल हातानें न करितां दर्भ, तृण, पानें, अथवा वस्त्र ह्यांपैकीं कशानें तरी करावी ९०. सर्व धर्मकार्यासंबंधानें पत्नी दक्षिणेस असावी. परंतु, अभिषेक आणि विप्रपादप्रक्षालन ह्या कर्मांविषयीं मात्र पत्नी डाव्या बाजूस असावी ९१. मुख्य पक्षाचें अवलंबन करण्यास समर्थ असूनही जो अनुकल्पाचें ह्मणजे गौण पक्षाचें अवलंबन करितो त्याला पारलौकिक फल प्राप्त होत नाहीं असें श्रुतिस्मृतींमध्यें सांगितलें आहे ९२. पुष्कळ अथवा थोडें असें ज्याच्या सूत्रांत जें सांगितलें असेल तें त्यानें केलें असतां सर्व कांहीं केल्यासारिखें होतें ९३. स्वशाखेंत सांगितलेलें नसून परशाखेंत सांगितलेलें, स्वशाखेशीं विरुद्ध नसलेलें व कर्मपूर्तीला अपेक्षित असें जें असेल तें परशाखोक्त करावें ९४. तें केल्यानें विशेष फल प्राप्त

होईल. परंतु, न केल्यानें कांहीं दोष घडणार नाहीं. वेदवेत्त्यांनीं सांगितलेले सामयाचारिक धर्म, देशधर्म, जातिधर्म व कुलधर्म हे अवश्य पाळिले पाहिजेत९५. शास्त्राशीं विरुद्ध नसलेले ग्रामाचार पाळावे आणि सर्व ठिकाणीं युगधर्मही उचित असतील ते पाळावे ९६. ह्याप्रमाणें संक्षपतः कर्मपरिभाषा आहे.

# दक्षिणेकरितां द्रव्याचें प्रमाण.

दक्षिणा ह्मणून गाई, वृषभ, वस्त्र, अश्व, रथ, नांगर इत्यादि त्या त्या कर्मासंबंधानें श्रौत व स्मार्त सूत्रांमध्यें उक्त आहेत. ह्या मुख्य दक्षिणा देण्याचें ज्याला सामर्थ्य नसेल किंवा त्या मिळण्याचा ज्याला संभव नसेल त्यानें मूल्याध्यायांत सांगितलेल्या मानानें द्रव्य द्यावें. मानें पांच आहेत; वराट, ताम्र, रौप्य, सुवर्ण व रजत.

१ गाय, २ वर, ३ वृष, ४ अनड्वान्, ५ धेनु, ६ अश्व, ७ हिरण्य, ८ वस्त्र, ९ छाग, १० अवि, ११ दासी, १२ निष्क, १३ गज, १४ नरवाहन व १५ गृह ह्या दक्षिणा येण्याचा संभव असतो. गोपालकृत मूल्याध्यायाच्या विवरणावरून गाय, वर वगैरेंच्या किमती वराटिकादि मानांनीं काय काय होतात तें पुढें दिलें आहे.

## वराटिकामान.

वराटिका ह्मणजे कवडी.

| | | | |
|---|---|---|---|
| २५६० | कवड्यां | ह्मणजे | १ गाय. |
| ५१२० | " | " | १ वर. |
| ७१५६ | " | " | १ वृष. |
| १०२४० | " | " | १ अनड्वान् अथवा १ गृह. |

| | | | |
|---|---|---|---|
| १२८०० | " | " | १ धेनु. |
| १९२०० | " | " | १ अश्व. |
| २००० | " | " | १ हिरण्य. |
| १२८० | " | " | १ वस्त्र. |
| ६४० | " | " | १ छाग. |
| ९६० | " | " | १ अवि. |
| ६४००० | " | " | १ दासी अथवा १ निष्क |
| ६४०००० | " | " | १ गज. |
| ६४०० | " | " | १ नरवाह्य यान. |

## ताम्रमान.

९६ गुंजा= १ तोळा.

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | तोळे तांबें | ह्मणजे | १ गाय. |
| ५४ | " | " | १ वर. |
| ८१ | " | " | १ वृष. |
| १०८ | " | " | १ अनड्वान् अथवा गृह |
| १३५ | " | " | १ धेनु. |
| २०३ | " | " | १ अश्व. |
| २१ | " | " | १ हिरण्य. |
| १३॥ | " | " | १ वस्त्र. |
| ७ | " | " | १ छाग. |
| ११ | " | " | १ अवि. |
| ६७५ | " | " | १ दासी अथवा निष्क. |
| ६१२८ | " | " | १ गज. |
| ६७॥ | " | " | १ नरवाह्य यान. |

## रौप्यकमान.

| | | | |
|---|---|---|---|
| २॥ गुंजा सुवर्ण | ह्मणजे | १ | गाय. |
| ६ ” | ” | १ | वर. |
| ७ ” | ” | १ | वृष. |
| १० ” | ” | १ | अनड्वान् अथवा गृह |
| १२॥ ” | ” | १ | धेनु |
| १९ ” | ” | १ | अश्व. |
| साडेपांच मासे ” | ” | १ | हिरण्य. |
| सवा गुंज ” | ” | १ | वस्त्र. |

| | |
|---|---|
| चतुर्थांश गाईचें मूल्य ह्मणजे | १ छाग. |
| छागाची दीडपट ह्मणजे | १ अवि. |
| पांच धेनु ह्मणजे | १ दासी अथवा निष्क. |
| ९८० गुंजा सुवर्ण ह्मणजे | १ गज. |
| धेनूच्या अर्धे मूल्य ह्मणजे | १ नरवाह्य यान. |

## सुवर्णमान.

| | |
|---|---|
| ४० मासे सुवर्ण ह्मणजे | १ गाय. |
| ८० मासे अथवा ९ तोळे सुवर्ण | १ वर. |
| साडेसात तोळे सुवर्ण ह्मणजे | १ वृष. |
| दहा तोळे सुवर्ण ह्मणजे | १ अनड्वान् अथवा गृह. |
| साडेबारा तोळे सुवर्ण ह्मणजे | १ धेनु. |
| पावणे एकवीस तोळे सुवर्ण ह्मणजे | १ अश्व. |
| सवाएकतीस मासे सुवर्ण ह्मणजे | १ हिरण्य. |
| वीस मासे सुवर्ण ह्मणजे | १ वस्त्र. |
| दहा मासे सुवर्ण ह्मणजे | १ छाग. |
| पंधरा मासे सुवर्ण ह्मणजे | १ अवि. |

| | |
|---|---|
| साडेबासष्ट तोळे सुवर्ण ह्मणजे | १ दासी अथवा निष्क. |
| पांचशे मासे सुवर्ण ह्मणजे | १ गज. |
| सव्वासहा तोळे सुवर्ण ह्मणजे | १ नरवाह्य यान. |

## राजतमान.

| | |
|---|---|
| ४० मासे रुपें ह्मणजे | १ गाय. |
| ८० मासे रुपें ह्मणजे | १ वर. |
| १२० मासे रुपें ह्मणजे | १ वृष. |
| १० तोळे रुपें ह्मणजे | १ अनड्वान् अथवा गृह. |
| साडेबारा तोळे रुपें ह्मणजे | १ धेनु. |
| पावणे एकवीस तोळे रुपें ह्मणजे | १ अश्व. |
| सवाएकतीस मासे रुपें ह्मणजे | १ हिरण्य. |
| वीस मासे रुपें ह्मणजे | १ वस्त्र. |
| दहा मासे रुपें ह्मणजे | १ छाग. |
| पंधरा मासे रुपें ह्मणजे | १ अवि. |
| साडेबासष्ट तोळे रुपें ह्मणजे | १ दासी अथवा निष्क. |
| ५०० मासे रुपें ह्मणजे | १ गज. |
| सव्वासहा तोळे रुपें ह्मणजे | १ नरवाह्य यान. |

## धनिकादिलक्षण.

दक्षिणा देण्याचीं जीं पांच मानें सांगितलीं तीं दरिद्री, श्रीमान् इत्यादि प्रकारच्या लोकांना अनुलक्षून सांगितलीं आहेत. ह्याकरितां धनिक कोण? दरिद्री कोण? वगैरे समजणें अवश्य आहे. धनिकादिकांच्या लक्षणासंबंधानें वराह पुराणांतील वचनें संस्काररत्नमालेंत घेतलीं आहेत तीं येणेंप्रमाणें:—

वर्धयित्वा धनं यस्तु तस्मादूर्ध्वसमपीह यः ।
न खादेत्संग्रहपरो धनिकः स उदाहृतः ॥ १ ॥

पोषणीयकुटुम्बस्य निर्वाहो यावता भवेत् ।
तावदेव सुखं येन लभ्यते प्रतिवार्षिकम् ॥
ऋणं यस्य तु नास्त्येव स मध्यम उदाहृतः ॥ २ ॥
धनं पूर्वापरं यस्य वर्तते बहुसंख्यया ।
अधिकस्यार्जको यः स्यात्सः महाधन उच्यते ॥ ३ ॥
सदाचाररतो विप्रो धनार्जनपराङ्मुखः ।
कुटुम्बयत्नमातिकः स दरिद्र इति स्मृतः ॥ ४ ॥
यस्य स्यादशनाभावः सदाचाररतस्य हि ।
महादरिद्रः स भवेद्वासोधान्यविवर्जितः ॥ ५ ॥
वर्धयित्वा धनं यस्तु ग्रासं वार्षिकमर्जयेत् ।
स वै धन्य इति प्रोक्तश्चैकवर्षेण यः पुमान् ॥ ६ ॥
वर्षद्वयमितं ग्रासं स हि धन्यतरः स्मृतः ॥ ७ ॥
अधिकस्यार्जको यः स्यात्स धन्यतम ईरितः ॥ ८ ॥
धनेनैव विना यस्तु ग्रासं वार्षिकमर्जयेत् ।
स वै धीर इति प्रोक्तस्तारतम्यं च पूर्ववत् ॥ ९ ॥

ह्या ठिकाणीं १ धनिक, २ मध्यम, ३ महाधन, ४ दरिद्र, ५ महादरिद्र, ६ धन्य, ७ धन्यतर, ८ धन्यतम व ९ धीर असले प्रकार सांगितले आहेत.

१ धनिक. जवळ असलेल्या द्रव्यावर व्याज वगैरे मिळवून त्यांतील एक घासही न खाता संग्रह करण्याविषयीं तत्पर.

२ मध्यम. ऋण न होतां पोषणीय कुटुंबापुरतें ज्याला प्रतिवर्षी सुखानें मिळतें तो.

३ महाधन. परंपरागत विपुल द्रव्य असून अधिक मिळविणारा.

४ दरिद्री. सदाचारसंपन्न, धनार्जनविमुख, कुटुंबी व द्रव्योपार्जनाविषयीं यत्न करण्याचें मनांतही न आणणारा.

५ महादरिद्र. सदाचारसंपन्न असून ज्याला खावयाला मिळत नाहीं व ज्याच्यापाशीं वस्त्रें व धान्य ह्यांचा अभाव आहे तो.

६ धन्य. भांडवल वाढवून त्या वाढीवर एक वर्षाच्या निर्वाहा-पुरतें अन्न मिळविणारा पुरुष.

७ धन्यतर. भांडवल वाढवून प्रत्येक वर्षी दोन वर्षें खर्चावयास पुरण्याइतकें मिळविणारा पुरुष.

८ धन्यतम. धन्यतरापेक्षांही अधिक मिळविणारा.

९ धीर. भांडवलावांचून वर्षाच्या निर्वाहापुरतें मिळावणारा.

धनिकापेक्षां द्विगुणित महाधनानें द्यावें व दरिद्रयापेक्षां अर्धे महादरिद्रयानें द्यावें असें वाराहपुराणांत सांगितलें आहे.

मध्यमादिकांनीं तारतम्य पाहून दक्षिणा द्यावी.

जो धनिक अथवा महाधन असून मी दरिद्री आहें असें सांगतें व योग्य दक्षिणा वगैरे देत नाहीं त्याला कर्मफल प्राप्त होत नाहीं असें

> प्रभुः प्रथमकल्पस्य योऽनुकल्पेन वर्तते ।
> स नाप्नोति फलं तस्य परत्रेति श्रुतिः स्मृतिः ॥

ह्या मनुवचनांत सांगितलें आहे. त्याचप्रमाणें

> वित्तशाठ्यं नरो यस्तु धने सति करोति यः ।
> स नाप्नोति फलं तत्र चोर एव प्रकीर्तितः ।

असें दुसरेंही एक पुराणवचन प्रसिद्ध आहे. ह्याचें तात्पर्य "द्रव्य असतांना जो पुरुष वित्तशाठ्य करितो त्याला त्या कर्माचें फल प्राप्त होत नाहीं. त्याला चोर असें ह्मटलें आहे" असें आहे.

# कुशाहरणविधि.

कोणतेंही श्रुतिस्मृतिविहित कर्म करावयाचें झाल्यास दर्भाशीं प्रसंग येतो. ह्याकरितां दर्भग्रहणाचा विधि कळणें अवश्य आहे.

> समित्पुष्पकुशादीनि ब्राह्मणः स्वयमाहरेत् ।
> शूद्रानीतैः क्रयक्रीतैः कर्मकुर्वन्पतत्यधः ॥

असें वचन शातातपस्मृतीमध्यें आहे. समिधा, दर्भ, फुलें वगैरे

वस्तु ब्राह्मणानें स्वतः आणाव्या. शूद्रानें आणिलेल्या अथवा विकत घेतलेल्या ह्या वस्तूंनीं कर्म करणाऱ्याला अधःपात प्राप्त होतो असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे.

## कर्माकरितां दर्भ रोज तोडावे.

**अहन्यहनि कर्मार्थं कुशच्छेदः प्रशस्यते ।**
**कुशा धृताये पूर्वत्र योग्याः स्युर्नोत्तरत्र ते ॥**

असें जाबलिमुनींचें वचन आहे. कर्माकरितां प्रत्यहीं दर्भ तोडावे. ापरलेले दर्भ कर्माला अयोग्य होत.

**कुशान्काशांश्च पुष्पाणि गवार्थं च तृणादिकम् ।**
**निषिद्धे चापि गृह्णीयादमावास्याहनि द्विजः ॥**

असें जाबालिवचन आहे. "कुश, काश, पुष्पें व गाईकरितां तृणादिक अमावास्येसारख्या निषिद्ध दिवशीं सुद्धां तोडण्यास हरकत नाहीं" असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. प्रत्यहीं कर्माकरितां दर्भादि-ग्रहण करण्यासंबंधानें हें वचन आहे. प्रत्येक दिवशीं दर्भ ताजे मिळण्याचा संभव नसल्यास

**मासि मास्याहृता दर्भास्तत्तन्मास्येव चोदिताः ।**

ह्या स्मृतिवचनाप्रमाणें ते प्रत्येक माहिन्यास एकदा काढावे. ह्मणजे तो महिना संपेपर्यंत ते दर्भ उपयोगीं पडतात. परंतु, प्रत्येक माहिन्यास सुद्धां दर्भ मिळण्याचा संभव नसल्यास श्रावणी अमावास्येला समन्त्रक उपटलेले दर्भ शिळे होत नाहींत. इतकेंच नव्हे परंतु, ते एकदा उपयोगांत आणिले असले तरी, पुनरपि दुसऱ्या कर्माकरितां त्यांचा वारंवार विनियोग करण्यास हरकत नाहीं असें

**दर्शे श्रावणमासस्य समन्त्रोत्पाटिताः कुशाः ।**
**अयातयामास्ते दर्भा नियोज्याः स्युः पुनः पुनः**

ह्या विष्णुवचनांत सांगितलें आहे. फिरून फिरून दर्भांचा विनियोग करावा असें ह्या ठिकाणीं सांगितलें आहे. परंतु, ज्या कर्मांना

योजिलेले गर्भ त्याज्य असें सांगितलेलें असेल त्या कर्मांत योजिलेले दर्भ श्रावणी अमावास्येला काढलेले असले तरी घेऊं नयेत.

अमायां नैव हिंस्यात्तु कुशांश्च समिधस्तथा ।
सर्वत्रावस्थिते सोमे हिंसायां ब्रह्महा भवेत् ॥
वनस्पतिगते सोमे यस्तु हिंस्याद्वनस्पतिम् ।
घोरायां ब्रह्महत्यायां युज्यते नात्र संशयः ॥

ह्या वचनामध्यें अमावास्येला दर्भ व समिधा तोडण्यास निषेध सांगितला आहे खरा;परंतु, केव्हां तरी पुढें होणाऱ्या कर्मांना उपयोगीं पडण्याकरितां संग्रहार्थ दर्भ व समिधा, अमावास्येला, सोम वनस्पतीचे ठिकाणीं असताना, तोडूं नयेत असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. दर्शेष्टि कर्तव्य असतांना अमावास्येलाच अन्वाधान करावें लागत असतें व इष्टीकरितां दर्भ व समिधा अमावास्येचेच दिवशीं अध्वर्यूला समंत्रक तोडाव्या लागतात. तेव्हां ह्या वचनांतील निषेध अशा प्रकारच्या वैध कृत्यांना लागूंच नाहीं. अमावास्येच्या दिवशीं प्रथम तीन मुहूर्तपर्यंत सूर्याचे ठिकाणीं, पुढें तीन मुहूर्तपर्यंत उदकाचे ठिकाणीं, पुढें तीन मुहूर्तपर्यंत गायींचे ठिकाणीं व पुढें तीन मुहूर्तपर्यंत वनस्पतींचे ठिकाणीं सोम वास्तव्य करीत असतो असें गरुडपुराणांतील

त्रिमुहूर्तं वसत्यर्के त्रिमुहूर्तं जले तथा ।
त्रिमुहूर्तं तथा गोषु त्रिमुहूर्तं वनस्पतौ ॥

ह्या वचनामध्यें सांगितलें आहे. तेव्हां अमावास्या लागल्यापासुन नऊ मुहूर्तांनंतर चंद्र वनस्पतीचे ठिकाणीं तीन मुहूर्तपर्यंत असतो असें ठरतें. दर्भच्छेदनाचा विधि कौशिकमुनींनीं

शुचौ देशे शुचिर्भूत्वा स्थित्वा पूर्वोत्तरामुखः ।
ॐकारेण तु मन्त्रेण कुशान्स्पृष्ट्वा द्विजोत्तमः ॥

**विरिञ्चिना सहोत्पन्न परमेष्ठिनिसर्गज ।**
**नुद सर्वाणि पापानि कुश स्वस्तिकरो भव ॥**
**इमं मन्त्रं समुच्चार्य ततः पूर्वोत्तरामुखः ।**
**हुंफट्कारेण दर्भांस्तु सकृच्छित्त्वा समुद्धरेत् ॥**

असा सांगितला आहे. शुद्ध देशामध्यें शुद्ध होऊन ईशान्यभिमुख उभें रहावें आणि प्रणवमंत्रानें ब्राह्मणानें दर्भांना स्पर्श करावा. नंतर ( विरिञ्चिना० भव ) हा मंत्र ह्मणून शेवटीं हुम् फट् असें ह्मणावें आणि एकदांच प्रयत्न करून दर्भ कापून काढावे. पितृकर्म, और्ध्वदेहिक व अभिचारकर्म ह्यांकरितां दर्भ हवे असल्यास ब्राह्मणानें दक्षिणाभिमुख होऊन व प्राचीनावीती करून ते कापावे, असें भरद्वाजश्रुतीमध्यें सांगितलेलें आहे.

पितृकर्म व देवकर्म ह्यांकरितां दर्भ घेणें तें ब्राह्मणानें साग्र, पवित्र, छिद्ररहित, कोमल व शुभ ठिकाणचें घ्यावे असें सांगणारें अंगिरामुनींचें

**अच्छिन्नाग्रान्पवित्रांश्च अच्छिद्रान्कोमलाञ्शुभान् ।**
**पितृदेवक्रियार्थं च समादद्यात्कुशान्द्विजः ॥**

हें वचन आहे. मार्गांतील, चितीवरील व यज्ञभूमींतील दर्भ आणि त्याचप्रमाणें आस्तरणाकडे, आसनाकडे व पिंडाकडे विनियुक्त झालेले दर्भ टाकून द्यावें असें

**पथि दर्भाश्चितौ दर्भा ये दर्भा यज्ञभूमिषु ।**
**स्तरणासनपिण्डेषु तेषां त्यागो विधीयते ॥**

ह्या हारीतवचनांत सांगितलें आहे. ब्रह्मयज्ञ व पितृतर्पण ह्या कर्मांकडे ज्यांचा विनियोग झालेला आहे आणि ज्यांना मूत्रपुरीषस्पर्श झालेला आहे ते दर्भ टाकावे असें

**ब्रह्मयज्ञे च ये दर्भा ये चैव पितृतर्पणे ।**
**हता मूत्रपुरीषाभ्यां तेषां त्यागो विधीयते ॥**

ह्या आपस्तंबवचनांत सांगितलेलें आहे. त्याचप्रमाणें अपवित्र, आंत दुसरा दर्भ असलेले, नखांनीं अग्र तोडिलेले, शिजविलेले व जळलेले दर्भ प्रयत्नानें वर्ज्य करावे असें पुढील स्मृतिवचनांत सांगितलें आहे.

अपूता गर्भिता दर्भा ये चाग्रच्छेदिता नखैः ।
क्वथिता अग्निदग्धाश्च कुशा वर्ज्याः प्रयत्नतः॥

वस्तुतः विचार केला असतां जेथें अनंतगर्भ दर्भच घ्यावे असें सांगितलें असेल त्या कर्माशिवाय इतर कर्मांचे ठिकाणीं सगर्भ दर्भ घेण्याला हरकत नाहीं.

याज्ञिक कर्मांमध्यें तृणशब्द येतो व तेथें दर्भ घेण्याचा परिपाठ आहे, तथापि तृण ह्मणजे साधारण गवत कां घेऊं नये अशी एक कोणाला शंका येत असते. परंतु दर्भ, कुश, कुतप व तृण हे प्रकार दर्भांतीलच होत. तुरे आलेले ते दर्भ, तुरे नसलेलें कुश, मुळांसह असलेलें कुतप आणि अग्र तुटलेले तृण असें

सप्रसूनाः स्मृता दर्भा अप्रसूनाः कुशाः स्मृताः ।
समूलाः कुतपाः प्रोक्ताश्छिन्नाग्रास्तृणसंज्ञिताः॥

ह्या कौशिकस्मृतींत सांगितलें आहे. डाव्या हातांत कुश असतांना आचमनाचा निषेध सांगितलेला आहे. तो केवळ डाव्या हातांतच पवित्रक असतांना निषेध आहे असें समजावें.

हातांत पवित्रक असतांना आचमन करूं नये. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ह्यांनीं अनुक्रमें सात, पांच, चार व दोन दर्भांचें पवित्रक करावें. अथवा चारी वर्णांना दोन दर्भांचें पवित्रकही उक्त आहे. पितृकर्मांमध्यें तीन दर्भांचें पवित्रक असावें. पवित्रधारण दोन पर्वांच्या मध्यें करावें. पवित्र हातांतून पडल्यास अघमर्षण-स्नानपूर्वक तीन प्राणायाम हें प्रायश्चित्त श्रुतिग्रंथामध्यें सांगितलेलें

आहे. वास्तव, पवित्रक घातल्यानंतर तें हातांतून गळूं न देण्याविषयीं जपावें. नित्य अथवा नैमित्तिक कर्म करितेवेळीं धारण केलेलें पवित्रक कर्मसमाप्तीनंतर गांठ सोडून टाकून द्यावें असें स्मृतिवचन आहे.

दर्भ अथवा कुश न मिळाल्यास काश, दूर्वा, भाताच्या पाती, सातूच्या पाती, गव्हाच्या पाती, नीवार व तृण, साळ्याच्या पाती, वाळा, बल्बज अथवा मोळ ह्यांतील जें मिळेल तें घ्यावें असें

कुशाभावे तु काशाः स्युः कुशाः काशाः समाः स्मृताः ।
काशाभावे ग्रहीतव्या अन्ये दर्भा यथोचितम्

ह्या हारीत वचनांत सांगितलें आहे.

## यज्ञियपात्रें, वृक्ष आणि पात्रलक्षणें.

पात्रें लांकडाचीं करावींत व तीं यज्ञिय वृक्षाचीं करावींत. स्रुवा खैराचा करावा. दर्वी खैराची, उंबराची किंवा पळसाची करावी. तेजस्वी होण्याची इच्छा असल्यास दर्वी खैराची करावी; अन्नाद्यकामी पुरुषानें उंबराची दर्वी करावी आणि वेदाध्ययनजन्य तेज प्राप्त होण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषानें दर्वी पळसाची करावी असें

खादिरी दर्वी तेजस्कामस्यौदुम्बर्यन्नाद्यकामस्य पालाशी ब्रह्मवर्चसकामस्य

ह्या बौधायनगृह्यसूत्रांत सांगितले आहे.

स्रुवा आत्रेय महर्षीच्या मतानें पळसाचा, आंगिरसाच्या मतानें खैराचा आणि अथर्वणच्या मतानें तांब्याचा करावा. परंतु, महर्षी; सर्वांच्याच मतानें अभिचारकर्म करणें झाल्यास स्रुवा लोखंडाचा करावा असें

पालाशेन स्रुवेणेत्यात्रेयः खादिरेणेत्याङ्गिरसस्ताम्रायसेनेत्याथर्वणः कार्ष्णायसेनाभिचरन्निति सार्वत्रिकम्

ह्या बौधायन गृह्यसूत्रांतच सांगितलें आहे. दर्वीची आकृति लोकामध्यें प्रसिद्ध आहे. दर्वी म्हणजे पळी. स्रुवा स्रुची अथवा दर्वी न

मिळाल्यास पळसाच्या मधल्या पानानें होम करावा असें

मध्यमेन पर्णेन जुहोति । स्रुग्घ्येषा ॥

ह्या तैत्तिरीय ब्राह्मणश्रुतींत सांगितलें आहे.

मुसळ खैराचें, उखळ पळसाचें किंवा दोन्हींही वारणवृक्षाचीं व तोही न मिळाल्यास कोणत्याही याज्ञिय वृक्षाचीं करावीं. आज्यस्थालीचें लक्षण छंदोगपरिशिष्टांत सांगितलें आहे तें येणेंप्रमाणेः–

आज्यस्थाली प्रकर्तव्या तैजसद्रव्यसंभवा ।
महीमयी वा कर्तव्या सर्वास्वाज्याहुतीषु च ॥
आज्यस्थाल्या : प्रमाणं तु यथाकामं तु कारयेत् ।
सुदृढामव्रणां भद्रामाज्यस्थालीं प्रचक्षते ॥

तैजस द्रव्य ह्मणजे अग्नीच्या तापानें वितळून जाणारें द्रव्य असें मनुभाष्यकार मेधातिथीचें ह्मणणें आहे. अर्थात्, धातु. "आज्यस्थाली तैजस द्रव्याची किंवा मृत्तिकेची करावी. आज्यस्थालीचें प्रमाण ज्या कर्माला जेवढें आज्य हवें असेल तेवढें मावण्यासारखें असावें व आज्यस्थाली बळकट, दिसण्यांत चांगली व व्रणरहित असावी." असें ह्या वचनांचें तात्पर्य आहे. आज्यस्थाली कांस्यधातूची असावी असेंही कोणी ह्मणतात. आज्यस्थाली मृत्तिकेची करावयाची असल्यास ती हातानें केलेली असावी; कुंभाराच्या चाकावर केलेली नसावी. कारण, कुंभाराच्या चाकानें तयार झालेलें मृन्मय पात्र आसुर असून हातानें केलेलें पात्र दैविक होय असें कर्मप्रदीप ग्रंथांतील

कुलालचक्रनिष्पन्नमासुरं मृन्मयं स्मृतम् ।
तदेव हस्तघटितं स्थाल्यादि दैविकं भवेत् ।

ह्या वचनांत सांगितलें आहे. आज्याहुति फारच असल्यास त्यांना पुरेसें आज्य एका आज्यस्थालींत मावण्याचा संभव नसतो.

ह्यास्तव, अनेक आज्यस्थाल्या कराव्या. याज्ञिक लोक आज्य-स्थालींतील संस्कृत आज्यामध्येंच दुसरें असंस्कृत आज्य घालून कर्म करीत असतात.

प्रणीता ही संज्ञा अग्नीच्या उत्तरेस ठेविल्या जाणाऱ्या उदकाला वस्तुतः आहे. तें उदक पात्राशिवाय ठेवितां येणें शक्य नाहीं. तेव्हां ज्या पात्रांत तें ठेविलें जातें त्या पात्राला प्रणीता असें नांव पडलें आहे. हें पात्र वडाचें किंवा रोहीतक वृक्षाचे करावें. प्रणीतापात्र ह्मणजे चौकोनी पाळें. ह्याच्या बाजूची लांबी सहा अंगुलें असावी; खोली तीन अंगुलें असावी; आंतले भोंकही चतुरस्र असावें; दांडा चार अंगुलें लांब असावा; अथवा मुळींच नसला तरीही हरकत नाहीं; परंतु, दंडरहित पात्र करावयाचें झाल्यास सर्व बाजूंनीं दोन अंगुलें जाडी कायम ठेवून बाकीचें सर्व बिल असावें. रोहीतक ह्मणजे रगतरोडा. स्रुचीचें लक्षण याज्ञिकांच्या मतानें येणेंप्रमाणें:

आयामं पञ्चधा कृत्वा चतुर्धा वाऽग्रतो द्वयोः ।
उपान्त्यः पात्रमित्युक्तो हविराश्रयभावतः ॥ १ ॥
उपान्त्यभागे विस्तारः स्वदैर्घ्येण समो भवेत् ।
सोऽञ्जल्याकृतिरुद्दिष्टो बिलमत्र च वर्तुलम् ॥ २ ॥
षडङ्गुलं बाहुमात्र्यां तदर्धेन च निम्नता ।
अरत्निमाने हस्तस्य तलमानं बिलं स्मृतम् ॥ ३ ॥
विस्तारार्धेन निम्नं स्यादन्त्यभागेऽथ निर्णयः ।
भागेऽन्तिमे भवेद्ग्रीवा दैर्घ्यार्धेन च विस्तृता ॥ ४ ॥
तस्या मुखं हंसमुखं हस्त्योष्ठमुखमेव वा ।
बिलात्प्रणालिका तावत्पर्यन्तार्थानुरूपतः ॥ ५ ॥
कर्णौ सशुषिरौ ग्रीवापार्श्वयोश्चोदितौ तथा ।
बिलस्य बुध्ने पद्मं स्यादथ दण्डस्य लक्षणम् ॥ ६ ॥
अवशिष्टास्त्रयो द्वौ वा भागौ दण्ड इतीर्यते ।

तस्य मूले भवेत्स्थूलः परिणाहो नवाङ्गुलः ॥ ७ ॥
अन्ते पञ्चाङ्गुलः श्लक्ष्णो यन्त्रतो वर्तुलो भवेत् ।
दंड एवं स्रुचां काकपुच्छत्वं समुदीरितम् । ८ ।
यथोशोभं स्रुचः कार्या इति बौधायनोऽब्रवीत् ।
शास्त्रान्तरात्तु विज्ञेयं विशेषान्तरमत्र यत् ॥ ९ ॥
प्रादेशमात्रताऽपि स्याद्बौधायनमतादितः ।
दण्डो भागद्वयेन स्यात्पात्रं भागद्वयेन च । १० ।
ऊर्ध्वमेकेन भागेन ग्रीवा चेति यथार्थतः ।
स्रुचः सह स्रुवेण स्युरुक्तवृक्षा अथापि वा ॥ ११ ॥

ह्या श्लोकांचें तात्पर्य येणेंप्रमाणें:—

स्रुचीकरितां जें प्रमाणयुक्त काष्ठ घेतलेलें असेल त्याच्या लांबीचे पांच अथवा चार भाग करावे. चवथा अथवा तिसरा जो उपान्त्य भाग त्यालाच पात्र अशी संज्ञा आहे. कारण, तोच भाग हवीचा आश्रय होय १. ह्या उपांत्य भागाचा विस्तार त्या भागाच्या लांबीइतकाच असावा. त्याची आकृति ओंझळीसारखी असावी. परंतु, बिळ वाटोळें असावें २. बाहुमात्री ह्मणजे खाकहात लांबीची स्रुची असल्यास बिल सहा अंगुळ विस्तीर्ण असावे आणि तीन अंगुळे खोल असावें. परंतु, अरत्निप्रमाण लांबीची स्रुची असल्यास तळहाता एवढे बिल असावें ३ आणि बिलाची खोली विस्ताराच्या निम्मे असावी. आतां शेवटल्या भागासंबंधानें निर्णय सांगतों. शेवटल्या भागामध्यें ग्रीवा करावी व तिची रुंदी लांबीपेक्षां निम्मे असावी ४. तिचें मुख हंसाच्या मुखाप्रमाणें अथवा हत्तीच्या ओंठाप्रमाणें असावें आणि बिलापासून तो मुखाच्या शेवटापर्यंत पात्राला अनुरूप अशी परनालिका करावी ५. ग्रीवेच्या दोन्हीं बाजूंस कान करावे व त्यांस भोंकें पाडावीं आणि बिलाच्या बुडाशीं पद्म खोदावें. आतां दंडाचें लक्षण सांगतों ६. पांच भाग केलेले असल्यास तीन, अथवा चार

भाग केलेले असल्यास दोन भाग अवशिष्ट राहतात. ह्यांनाच दंड असें ह्मणतात. दंड मुळाशीं जाड असावा; त्याचा परिघ नऊ अंगुळें मुळाशीं असावा ७ आणि शेवटाशीं ह्मणजे पात्रापाशीं दांड्याचा परिघ पांच अंगुळें असावा. सर्वही दांडा गुळगुळीत असावा आणि चरकीं न धरितां वाटोळा केलेला असावा. ह्याप्रमाणें स्रुचांचा दांडा कावळ्याच्या पुच्छाप्रमाणें होतो ८. शोभतील अशा स्रुच्या कराव्या असे बौधायनाचें ह्मणणें आहे. हा पक्ष स्वीकारिल्यास मुख, दांडा वगैरे भाग कसे करावे हे इतर ग्रंथांवरून समजून घ्यावें ९. बौधायनमतानें स्रुचांची लांबी प्रादेशमात्रही आहे. दोन भाग दंड, दोन भाग पात्र आणि शेवटला एक भाग ग्रीवा अशी व्यवस्था प्रादेशमात्रांत जाणावी. स्रुचा व स्रुवा हीं त्या त्या वृक्षाचीं करावीं किंवा ज्या वृक्षाच्या स्रुचा त्याच वृक्षाचा स्रुवा करावा १०, ११.

ह्या कारिकांच्या पूर्वी खैराचा उपक्रम झाला असल्यामुळें स्रुचा खैराच्या कराव्या; स्रुवाही खैराचा करावा किंवा ह्याविषयीं उक्त वृक्षांचीच योजना करावी असा शेवटल्या श्लोकार्धाचा अर्थ समजावा.

गृह्य कर्मांमध्यें वीतभर लांबीच्याच स्रुच्या कराव्या अशा अर्थाचें वचन असल्यामुळें स्रुची वीतभर लांबीचीच करावी व दर्वीप्रभृतींचीही लांबी तितकीच समजावी. वीत ह्मणजे बारा अंगुळें व कोणाच्या मतानें तेरा अंगुळें. गृह्य कर्मांमध्यें स्रुची प्रोक्षणीकरितां लागत असते. सूप कळकाचें अथवा देवनळाचें असावें; उखळ पळसाचें किंवा वारण वृक्षाचें असावें; मुसळही त्याचप्रमाणें व पाटावरवंटा दगडी. स्रुच्याचें छिद्र अर्धांगुळ असावें; मूड अंगुलप्रमाण असावें किंवा आंगठ्याचे पेराएवढें असावें. बिळ वाटोळें असावें आणि तेवढेंच पुष्कर असावें असें मंडनमिश्राचें ह्मणणें आहे.

स्थाली आठ अंगुळें असावी आणि प्रोक्षणी, चमस व आज्यपात्र हीं सहा सहा अंगुळें असावीं असें

अर्धाङ्गुलमितच्छिद्रः स्रुवस्त्वङ्गुलखुम्भवान् ।
अङ्गुष्ठपर्वणो यद्वा वृत्तं तन्मात्रपुष्करम् ॥

ह्या आश्वलायनस्मृतींत सांगितलें आहे. चरुहोम असल्यास मेक्षण अवश्य असतें. तें मेक्षण ज्या जातीच्या लाकडाचा इध्मा असेल त्याच जातीच्या लाकडाचें, वाटोळें, इध्म्याच्या निंमे लांब व अवदान देण्यास योग्य असें रुंद असावें ह्मणून

इध्मजातीयमिध्मार्धप्रमाणं मेक्षणं भवेत् ।
वृत्तं वार्क्षं च पृथ्वग्रमवदानक्रियाक्षमम् ॥

ह्या कात्यायनवचनांत सांगितलें आहे. इंधनाच्या जातीच्या लाकडाचें मेक्षण मिळालें नाहीं तर कोणत्याही याज्ञिय काष्ठाचें तें चालतें.

पूर्णाहुति वगैरे कर्मांकरितां जर दर्वी हवी असेल तर तिचें पुष्कर व लांबी हीं होमाच्या व अग्न्यायतनाच्या मानानें असावीं. एक तोळा तूप मावण्याइतकें दर्वीचें बिल असावें.

## पात्रशुद्धिप्रकार.

काष्ठमय, वेणुमय व पाषाणमय पात्रांना उच्छिष्ट पुरुषादिकांचा स्पर्श झालेला नसल्यास व त्यांना कसलाही लेप नसल्यास केवळ उदकानेंच तीं शुद्ध होतात. ह्या पात्रांस लेप असेल किंवा उच्छिष्ट पुरुषादिकांचा स्पर्श झालेला असेल तर तासण्यानें व प्रक्षालनानें तीं शुद्ध होतात. सुपाला लेप वगैरे असल्यास त्याचा त्यागच अवश्य आहे. लेपसहित काष्ठमय व पाषाणमय पात्रांना काकादिकांच्या मुखांचा स्पर्श झालेला असल्यास तीं पात्रें तासण्यानें शुद्ध होतात; परंतु, तीं निर्लेप असल्यास उष्णोदकानें क्षालन केलें असतां शुद्ध होतात. मार्जारव्यतिरिक्त इतर श्वापदांच्या मुखांचा स्पर्श झाला असल्यासही उष्णोदकानें प्रक्षालन झालें ह्मणजे पात्रें शुद्ध होतात. चंडालादिकांचा किंवा मूत्रपुरीषादिकांचा स्पर्श झाल्यास पात्रें टाकून

द्यावीं. सुवर्णमय, रौप्यमय, कांस्यमय व ताम्रमय सलेप पात्रांची शुद्धि अनुक्रमें उष्णोदिकानें, गोमयानें, भस्मानें व अम्लानें होते. परंतु, सुवर्णरजतव्यतिरिक्त इतर धातूंच्या पात्रांना काकादिकांच्या मुखांचा व शूद्रांचा स्पर्श झाल्यास तासण्यानें व प्रक्षालनानें तीं शुद्ध होतात. शूद्रांनीं ज्यांत भोजन केले असेल तीं पात्रें निर्लेप असलीं तरी त्यांची शुद्धि ह्याप्रमाणेंच समजावीं; परंतु, शूद्रोच्छिष्ट झालेलीं पात्रें सोन्यारुप्यांचीं असल्यास त्यांची शुद्धि तीं पात्रें तापविल्यानें व उष्णोदकानें प्रक्षालन केल्यानें होते. तथापि, सोन्याच्या व रुप्याच्या पात्रांनाही चंडालादिकांचा किंवा मूत्रपुरीषादिकांचा स्पर्श झालेला असल्यास तीं पुनः करावीं. किंवा गोमूत्रामध्यें सात दिवस ठेवून तापविल्यानें व उष्णोदकानें प्रक्षालन केल्यानें तीं शुद्ध होतात. नूतन मृण्मयपात्रांना उच्छिष्ट पुरुषादिकांचा स्पर्श झाला असल्यास उदकानें प्रक्षालन केल्यास तीं शुद्ध होतात. आज्यलेप असतांना उच्छिष्ट पुरुषादिकांचा स्पर्श झाल्यास तीं पुनरपि तापवावीं; परंतु, इतर द्रव्यांनीं तीं लिप्त झालेलीं असल्यास, उच्छिष्ट पुरुषादिकांचा त्यांना स्पर्श झालेला असल्यास व मूत्रपुरीषादिकांचाही त्यांना स्पर्श झालेला असल्यास त्या पात्रांचा त्याग करणेंच अवश्य आहे.

## द्रव्यप्रतिनिधि.

१ व्रीहि अथवा यव होमाला मुख्य होत. त्यांच्या अभावीं नीवार व गोधूम अनुक्रमें जाणावे. त्यांच्या अभावीं कळकाचें बी आणि त्यांच्या अभावीं उडीद, हरबरे, कोद्रु, इत्यादि निषिद्ध धान्यें सोडून कोणतेंही धान्य.

२ गाईचें तूप मुख्य. त्याच्या अभावीं म्हशीचें; त्याच्या अभावीं शेळीचें; त्याच्या अभावीं तिळाचें तेल; त्याच्या अभावीं रानतीळ, करडी, मोहऱ्या, मोहाचें बी, नारळ इत्यादिकांची तेलें. ह्यांतही

पहिल्या पहिल्याच्या अभावीं पुढलें पुढलें. परंतु, ह्यांच्यापैकीं कांहीं न मिळाल्यास सातु, व्रीहि व सावे ह्यांपैकीं एकाद्याचें पीठ पाण्यांत कालवून आज्याच्या ठिकाणीं त्याची योजना करावी. हाच न्याय अंजनासंबंधानें समजावा.

३ बर्हीविषयीं दर्भ मुख्य; त्यांच्या अभावीं काश; त्यांच्या अभावीं शरतृण; त्यांच्या अभावीं वाळा; त्यांच्या अभावीं अश्ववाल; त्यांच्या अभावीं मोळ; त्यांच्या अभावीं दूर्वा; त्यांच्या अभावीं अनुक्रमें सातु, सावे व ऊंस ह्यांच्या पाती व ह्यांच्याही अभावीं चिकाळूं झाडाचीं पानें.

४ समिधांविषयीं पळस मुख्य आणि इध्माविषयीं खैर मुख्य; त्याच्या अभावीं अश्वत्थ, उंबर, शमी, रुई, आघाडा वगैरे क्रमानें ग्राह्य. परंतु, ह्यांच्याही अभावीं कवठी, भावा, कदंब, निंब, करंज, सावरी, तिलक, कांचन, भोकरी, बिब्वा, शाकद्रुम इत्यादि निषिद्ध झाडें वर्ज्य करून अवशिष्ट राहिलेल्या शुद्ध वृक्षांचा उपयोग करावा.

५ गाईचें दुध मुख्य; त्याच्या अभावीं म्हशीचें; त्याच्या अभावीं शेळीचें; त्याच्या अभावीं गाईचें दही आणि त्याच्याही अभावीं सातु, व्रीही व सावे ह्यांपैकीं कशाचें तरी पाण्यांत कालविलेलें पीठ. कांहीं आचार्यांच्या मतानें गाईचें दूध न मिळाल्यास गाईचें दही घ्यावें; तें न मिळाल्यास म्हशीचें दूध; तें न मिळाल्यास शेळीचें दूध; तें न मिळाल्यास अनुक्रमें म्हशीचें व शेळीचें दही आणि तेंही न मिळाल्यास सातु, तांदुळ व सावे ह्यांपैकीं कशाचें तरी पाण्यांत कालविलेलें पीठ. दह्यासंबंधानें हाच न्याय समजावा.

६ पात्राविषयींही ज्या पात्राला जे वृक्ष सांगितले असतील ते मुख्य. परंतु, त्यांच्या अभावीं पूर्वनिर्दिष्ट कवठी वगैरे सोडून पात्र होण्याला योग्य असा कोणताही याज्ञिय वृक्ष घ्यावा.

# गणेशपूजन.

नि षु सीद गणपते गणेषु त्वामाहुर्विप्रतमं कवीनाम् ॥
न ऋते त्वत्क्रियते किंचनारे महामर्कं मघवञ्चित्रमर्च ।
गणानां त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनामुपमश्रवस्तमम् ।
ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत आ नः शृण्वन्नूतिभिः सीद सादनम् ।
स इज्जनेन स विशा स जन्मना स पुत्रैर्वाजं भरते धना नृभिः ।
देवानां यः पितरमाविवासति श्रद्धामना हविषा ब्रह्मणस्पतिम् ।

ह्या श्रुति गणेशपूजनाविषयीं प्रमाण आहेत. पहिल्या श्रुतीच्या उत्तरार्धांत तुझ्याशिवाय कोणतेंही कर्म केलें जात नाहीं. असें स्पष्ट सांगितलें आहे. "हे गणपते, तूं येथें आरूढ हो. तुला वेदवेत्ते गणांतील व कवींतील अत्यंत मुख्य ह्मणतात. तुझ्या पूजनावांचून कोणतेंही कर्म केलें जात नाहीं. हे धनसंपन्न, तूं तुझ्या पूजेलाच उपयोगी पडणारी अशी उत्कृष्ट द्रव्यसंपत्ति दे आणि आपलेंच अनेक प्रकारांनीं पूजन करून घे." असा पहिल्या मंत्राचा अर्थ आहे. आतां दुसऱ्या मंत्राचा अर्थ पाहूं. गण ह्मणजे समुदाय. समुदायांचा जो अधिपति तो गणपति. राष्ट्रामध्यें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अनुलोम व प्रतिलोम संकर इत्यादि मनुष्यांचे समुदाय असतात. सिंह, व्याघ्र, तरस, लांडगे, अस्वलें, चित्ते, महिष, वृषभ, सूकर इत्यादि पशूंचे समुदाय असतात. गृध्र, बगळे, कावळे, मयूर, कुक्कुट, उलूक इत्यादि बऱ्या वाईट पक्ष्यांचे समुदाय असतात. वृश्चिकादि स्वभावदुष्ट प्राण्यांचेही समुदाय असतात. देश उध्वस्त करणारे टोळ, धान्यावरील कृमि, पिकांच्या मुळाशीं होणारे कृमि, फळांत पडणारे कृमि, उदक दूषित करणारे कृमि, हवा दूषित करणारे कृमि आणि रोगादिकांच्या रूपानें शरीर दूषित करणारे कृमि असे अनेक प्राण्यांचे समुदाय असतात व त्यांच्या पासूनही भय असतें. मनुष्या-

दिकांच्या समुदायापासून तों उदक, हवा इत्यादिकांमध्यें अति सूक्ष्म रूपानें संचार करणाऱ्या प्राण्यांच्या समुदायापर्यंत जे समुदाय त्यांच्या पासून अथवा त्यांतील व्यक्तींपासून विघ्न उत्पन्न होण्याचा संभव असल्यामुळें ह्या सर्व प्राणिसमुदायांचा जो अधिपति त्यालाच आपण शरण जाणें अवश्य आहे. कारण, ज्याच्यापासून विघ्न होण्याचा संभव आहे असे प्राणिगणच अनेक असून प्रत्येक गणांत व्यक्तिही अनेक आहेत. तेव्हां कार्य निर्विघ्नपणें पार पडण्याकरितां प्रत्येक गणाची अथवा त्यांतील व्यक्तीची मर्जी संपादन करण्याचा यत्न करणें ही गोष्ट अत्यंत अशक्य होय. प्रत्येक प्राणिगणाच्या अधिपतीची पूजा करणेंही अशक्य होय. तेव्हां सर्व प्राणिगणांच्याही गणांचा जो अधिपति त्याचें पूजन करणें हाच मार्ग सुलभ असल्या-मुळें गणपतिपूजन करणें अवश्य होय. गणांचा गणपति ह्मणजे प्राणिसमुदायांच्याही समुदायाचा अधिपति. हवामहे ह्मणजे आह्मी बोलावीत आहों. त्वा ह्मणजे तुला. गणांच्याही गणांचा अधिपति असलेल्या तुला आह्मी बोलावीत आहों हा पहिल्या चार पदांचा अर्थ होय. आह्मी पूजनाकरितां प्रथम गणपतीचेंच कां आव्हान करावें? ह्याचें उत्तर जरी वर येऊन गेलेलेंच आहे तरी पुढल्या पदांच्या अर्थाचा विचार केला असतां तें आपोआप मिळण्यासारखें आहे. कारण, कार्य जें हातीं घेण्याचें ठरविलें असेल त्यांत विघ्न येऊं नये ही तजवीज प्रथम करणें अवश्य आहे ह्मणून गणपतीचें पूजन अवश्य झालें. परंतु, मंगल कार्ये करण्याचा उद्देश आपला अभ्युदय व्हावा हाच असणार ह्मणून अभ्युदय प्राप्त करून देणें ज्याच्या हातांत आहे त्याचेंच पूजन प्रथम करणें आपणांला अवश्य होय. गणपति हा कवींचाही कवि आहे. कवि ह्मणजे क्रांतदर्शी. क्रांत ह्मणजे पलीकडलें. आपल्या दृष्टीच्या टप्यांत नसलेलें; आपल्या भावा-

त्याच्या बाहेरचें, कालतः अथवा देशतःही दूर असलेलें. सारांश, भूत, वर्तमान व भविष्य ह्या तिन्ही प्रकारच्या कालामध्यें कोणत्याही प्रदेशांत, कोणत्याही वस्तूच्या ठिकाणीं जें कांहीं घडलें असेल, घडत असेल किंवा घडणार असेल तें सर्व जो जाणितो तो कवि आणि कवींचा कवि ह्मणजे असें ज्ञान असणाऱ्यांचाही मुख्य अधिपति. गणपति कवींचा कवि असल्यामुळें त्याचें पूजन करणें आपणांला अवश्य आहे. आतां, गणपतीच्याच पूजनापासून काय फायदा? राजाचें जर पूजन प्रथम केलें तर तो प्रसन्न झाला असतां आपला सर्व प्रकारानें अभ्युदय होईल; अशी शंका एकाद्यास येण्याचा संभव आहे. परंतु, आपण किती राजांचें पूजन करावें? इंद्रादि लोकपाल हे सर्व आपणांवर अंमल करणारे अधिपति आहेत. आणि मांडलिक व सार्वभौम असे दृश्य राजेही आहेत इतक्या सर्व राजांचें पूजन होणें शक्यही नाहीं व सर्वांना ह्यांचें पूजन करण्याचें सामर्थ्यही नाहीं. ह्यास्तव, राजामध्यें जो श्रेष्ठ ह्मणजे ज्येष्ठराज गणपति त्याचेंच पूजन केलें असतां कार्यभाग उरकण्यासारखा असल्यामुळें गणपतीचेंच पूजन प्रथम होणें अवश्य आहे. गणपति हा विद्यादाता आहे. ब्रह्म ह्मणजे वेद. सर्व कांहीं ज्ञान वेदांमध्यें भरलेलें आहे. ब्रह्माचेंही ब्रह्म ह्मणजे वेदांचाही अधिपति आणि ब्रह्मणां ब्रह्मणस्पति ह्मणजे वेदांच्याही वेदांचा अधिपति. तेव्हां वेदांच्याही वेदांचा अधिपति जो गणपति त्याचेंच पूजन करणें अवश्य आहे. शृण्वन् ह्मणजे लक्ष्य देत देत, ऐकत ऐकत. ऊति ह्मणजे रक्षणसाधनें. सादन ह्मणजे स्थान. नः ह्मणजे आमचें. सीद ह्मणजे बैस. श्रव ह्मणजे कीर्ति. ज्याची कीर्ति उपमेस पात्र आहे तो उपमश्रव आणि अत्यंत जो उपमश्रव तो उपमश्रवस्तम. आयुष्य, आरोग्य, संतति, सुख इत्यादि गोष्टी भक्तांना देण्यासंबंधानें पुष्कळांची कीर्ति असेल; परंतु, गणपतीची कीर्ति अत्यंत उपमेसच पात्र आहे. ह्मणून त्याचेंच पूजन करणें अवश्य आहे.

"हे ब्रह्मांचाही ब्रह्मणस्पति असलेल्या गणेशा, गणांचा गणपति, कवींचाही कवि, उपमश्रवस्तम आणि ज्येष्ठराज असलेल्या तुला आह्मी आव्हान करीत आहों. ह्यास्तव, आमच्या प्रार्थनेला मान देऊन रक्षणसाधनांसह तूं आपल्या स्थानावर आरूढ हो" हें गणानां त्वा ह्या मंत्राचें तात्पर्य आहे. गणपतीचें वास्तव्य जो आपल्या घरीं करवितो त्याला काय प्राप्त होत असतें हें स इज्जनेन ह्या मंत्रांत सांगितलें आहे. पितर ह्मणजे पालक. देवांचा पितर ह्मणजे देवांचा पालक. श्रद्धायुक्त ज्याचें मन आहे तो श्रद्धामना. हविषा ह्मणजे हविर्द्रव्यानें, पूजन साधनानें. मनामध्यें श्रद्धा ठेवून जो हवीच्या योगानें देवांच्या पालकाला ह्मणजे ब्रह्मणस्पतीला संतुष्ट करितो असें स इज्जनेन ह्या मंत्राच्या उत्तरार्धाचें तात्पर्य आहे. परंतु, जो गणपतीला संतुष्ट करितो किंवा आपल्या घरीं जो त्याचें वास्तव्य करवितो त्याला काय फल प्राप्त होत असतें हें मंत्राच्या पूर्वार्धांत सांगितलें आहे. मनुष्य नुसता निरोगी असून किंवा निर्भय असून काय उपयोग आहे? त्याला जर अन्नच नसेल किंवा अन्न असूनही तें खाण्याचें किंवा पचविण्याचें सामर्थ्य नसेल तर उपयोग काय? वाज ह्मणजे अन्न. भरते ह्मणजे सांठवून ठेवितो, धारण करितो, वृद्धिंगत करितो. गणपतीचें जो पूजन करितो तो अन्न धारण करितो ह्मणजे अन्न संपादन करण्यास तो समर्थ होतो; खाण्यासही तो समर्थ होतो आणि सेवन केलेलें अन्न त्याला सुखानें पचतेंही. परंतु, ज्याच्यापाशीं आप्त, इष्ट, सेवक वगैरे नाहींत त्याला नुसतें अन्न मिळविण्याचें सामर्थ्य असून तरी उपयोग काय आहे? उपभोग, सुखें, ऐश्वर्य ह्या गोष्टी पुरुषाला स्वतःकरितांच सर्व हव्या असतात असें नाहीं. आचार्य, वडील माणसें, मामे, सासरे, मित्र, संबंधी, बांधव इत्यादिकांकरितां संपत्ति हवी असते. ह्मणून केवल

अन्न मिळविणें ह्यांतच पुरुषार्थ नसून ते पोष्य वर्गांसह मिळविणें ह्यांत पुरुषार्थ आहे. ह्मणून नृभिः असें पद मंत्रामध्यें आहे. ह्मणजे गणपतीचें जो पूजन करितो त्याला वर निर्दिष्ट केलेल्या मनुष्यांसह अन्न प्राप्त होत असतें. हा वाजं भरते नृभिः ह्या पदांचा अर्थ होय. गणपतीच्या पूजनानें आचार्य, गुरुजन, श्वशुर, मातुल, संबंधी, बांधव इत्यादि एकदम उत्पन्न होऊन मिळतात असें नाहीं. ह्यांपैकीं प्रथम पुष्कळच असतात. परंतु, सर्वच आप्त, संबंधी, श्वशुर, मातुल इत्यादि आपल्यासंबंधानें हितबुद्धि धारण करणारे असतात असें नाहीं. हे आपला द्वेष करणारे असल्यास ते असण्यापेक्षां नसणेंच बरें, असें होतें व संसारही अत्यंत कष्टप्रद होतो. तेव्हां आचार्य, मातुल, संबंधी, बांधव, सेवक इत्यादि लोक आपणांला अनुकूल होणें ह्मणजेच ते आपणाला मिळणें. गणपतिपूजनामुळें अन्नप्राप्ति होते आणि ह्यांची अनुकूलता प्राप्त होते असें समजावें. अन्नप्राप्ति ही गोष्ट फार महत्वाची आहे. अन्न शेतामध्यें हवें तितकें उत्पन्न झालेलें असतें. परंतु, तें पदरांत पडण्याची मारामार होते. एकादे वेळेस उत्कृष्ट आलेलें पीकही टोळ नाहींसें करितात. शाळु ऊंस इत्यादि पिकांचा डुकरें, कोल्हीं इत्यादि श्वापदें फडशा पाडितात. उंदीर, कृमि व कीटक ह्यांचाही उपद्रव फार असतो. ह्यांचे तडाख्यांतुन जरी धान्य बचावलें तरी एकाद्या वेळेस धान्य काढण्याच्या ऐन हंगामाला पाऊस अतिशय पडून धान्याची नासाडी होते; अतिशय वारा सुटून पीक खालीं लोळतें; धान्य कापून शेतांत ठेविलें असतां पावसानें कुजून जातें. बुचाडें रचिल्यानंतरही तीं अग्नीनें दग्ध होण्याची भीति असते; अग्नीच्या तडाख्यांतून तीं बांचलीं तरी चोरांचें त्यांना भय असतें. त्यांतूनही पार पडून जरी धान्य पोतीं भरून तयार झालें तरी सुद्धां तें घरीं येईपर्यंत त्याला मार्गांत भय असतें. समु-

द्रांतुन अथवा खाडींतुन तें यावयाचें झाल्यास वादळानें जहाजांत अथवा मचव्यांत पाणी शिरण्याची किंवा मचवा बुडण्याची भीति असते आणि इतकेंही करून घरीं धान्य जरी आलें तरी त्याला कीड लागण्याची किंवा तें कुबटण्याची भीति असते. तेव्हां निर्विघ्नपणें धान्य पदरांत पडणें व तें सुखानें पचणें ह्या गोष्टी देवाच्या कृपेवर अवलंबून आहेत. धान्यही प्राप्त झालेलें आहे आणि सेवकादिकही अनुकूल आहेत; परंतु, जर द्रव्य नसेल तर ते अनुकूल असूनही व्हावा तसा त्यांचा उपयोग होणार नाहीं. वेळच्या वेळेवर त्यांना पगार देणें, कुटुंबांत अवश्य लागणारी वस्तु विकत आणणं इत्यादि गोष्टी द्रव्यानेंच साध्य होणाऱ्या आहेत. ह्याकरितां धनाची आवश्यकता आहे. ह्मणून गणपतीचें पूजन करणारा धनासह व मनुष्यांसह अन्न मिळवितो असें सांगितलें आहे. नुसते आप्त व संबंधी असूनही काम भागतें असें नाहीं. लोकांची अनुकूलता ही गोष्ट अवश्य आहे. अन्न आहे; द्रव्य आहे आणि इष्ट आप्त वगैरेंची अनुकूलताही आहे. परंतु गांवांतील, प्रांतांतील अथवा देशांतील लोक जर विरुद्ध असतील तर अन्नादिकांमुळें व्हावें तसें सुख होत नाहीं. गणपतीचें पूजन करणाऱ्याला लोकानुकूलताही प्राप्त होते हें जनेन ह्या पदानें दर्शविलें आहे. बरें; द्रव्य, अन्न, आप्त व लोक ह्या गोष्टी जरी असल्या तरी प्रजा नसल्यास त्यांच्यापासून आनंद होत नाहीं. ह्मणून विशा हें पद मंत्रामध्यें आहे आणि गणपतीचें पूजन करणारा प्रजेनेंही संपन्न होतो असें त्या पदानें दर्शविलें आहे. परंतु, नुसती प्रजा असून किंवा होऊन उपयोग काय? झालेली प्रजा जगली पाहिजे आणि जगूनही ती दुर्वृत्त निघालेली नसली पाहिजे. दुर्वृत्त प्रजा निघाल्यास अपत्यहीन लोकांपेक्षांही अतिशय दुःख होत असतें. ह्मणून पुत्ररूप प्रजेची आवश्यकता आहे. पुत्र ह्मणजे पुन्नामनरकापासून तारणारा.

**पुंनाम्नो नरकाद्यस्मात्पितरं त्रायते सुतः ।**
**तस्मात्पुत्र इति प्रोक्तः पितॄन्यः पाति सर्वतः ॥**

ह्या श्लोकामध्यें पुत्रशब्दाची व्युत्पत्ति दिलेली आहे. "पुन्नामनरकापासून ज्याअर्थीं सुत पित्याला तारितो त्याअर्थीं त्याला पुत्र अशी संज्ञा प्राप्त होते. कारण, तो पितरांचें सर्व बाजूंनीं परिपालन करितो" असें ह्या श्लोकांत सांगितलें आहे. मुलगा जर अनाचारी किंवा दुराचारी निघाला तर तो पितरांचा उद्धार काय करणार? जातिधर्म व कुलधर्म जर तो न पाळील तर पितरांना दुर्गति प्राप्त होण्यालाच तो कारण होईल; आणि कुलामध्यें पिंडोदकक्रियेचाच लोप होईल. तेव्हां आचारसंपन्न, धर्मनिष्ठ व देवपितृकार्याविषयीं तत्पर असे पुत्र असल्यासच पितरांचा उद्धार होणार आहे. गणपतीचें पूजन करणाऱ्याला असे पुत्र प्राप्त होतात व प्राप्त झालेले असे निपजतात हें मंत्रांतील पुत्रैः ह्या पदानें दर्शविलें आहे. लोकानुकूलता, इष्ट, आप्त इत्यादिकांची अनुकूलता, द्रव्यसाहाय्य व पुत्र ह्या गोष्टी जरी असल्या तरी नीच जातींत किंवा हीन कुलांत जन्म असल्यास ह्या गोष्टींपासून व्हावें तसें सुख होत नाहीं. हीन जातीमुळें अथवा हीन कुलामुळें कुलीन व उच्च जातीच्या लोकांना व्यक्ति तिरस्करणीय होत असते व लोकांतही व्हावी तशी मानमान्यता त्या व्यक्तीची होत नाहीं. ह्यामुळें उत्कृष्ट कुलामध्यें व जातीमध्यें जन्म होणें अवश्य आहे. उत्कृष्ट कुलामध्यें जन्म होणें ही गोष्ट जो मूळचाच हीनजातीय असेल त्याला शक्यच नाहीं. वर्तमान देह कायम असतांना ती गोष्ट घडणार कशी? वस्तुतः पाहतां ह्या मंत्रांत हविषा हें पद आहे आणि हवीचा संबंध द्विजाशिवाय इतरांशीं मुळींच नाहीं. तेव्हां गणपतिपूजनाची जी गोष्ट सांगितली आहे तीही द्विजकुलांत उत्पन्न झालेल्यांनाच अनुलक्षून सांगितलेली आहे. परंतु, केवल द्विजकुलांत उत्पन्न होण्यानेंही भागत नाहीं.

# पातित्यकारणें.

अकुर्वन्विहितं कर्म निन्दितं च समाचरन् ।
प्रसजंश्चेन्द्रियार्थेषु प्रायश्चित्तीयते नरः॥ ४४॥ अ० ११ ॥

असें मनुवचन आहे. "विहित कर्म न करणारा; निषिद्ध कर्म करणारा आणि विषयांच्या ठिकाणीं अत्यंत आसक्त असणारा पुरुष प्रायश्चित्ती होतो" असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. संध्यावंदन, पंचमहायज्ञ इत्यादि जीं कर्मे विहित आहेत तीं न करण्यामुळें पातित्य येतें. त्याचप्रमाणें सुरापानादि निषिद्ध कर्मे केल्यानें तात्काल पातित्य येतें. अत्यंत विषयासक्त पुरुष आपणांला अगम्य स्त्री कोणती व गम्य स्त्री कोणती हाही विचार करीत नाहीं.

चण्डालान्त्यस्त्रियो गत्वा भुक्त्वा च प्रतिगृह्य च ।
पतत्यज्ञानतो विप्रो ज्ञानात्साम्यं तु गच्छति ।

असें स्मृतिवचन आहे. "अज्ञानामुळें चंडाल व अंत्यज ह्यांच्या स्त्रियांशीं समागम झाल्यास किंवा ह्यांचें अन्न सेवन केल्यास किंवा ह्यांचा प्रतिग्रह घडल्यास विप्र पतित होतो. परंतु, ह्या गोष्टी समजून उमजून त्यानें केल्यास त्याला चंडालादिकांचें साम्यच प्राप्त होतें. ह्मणजे तो चांडाळ अथवा अंत्यजच होतो. विषयासक्तिमुळें चांडालत्व प्राप्त झाल्यास सर्वस्वीं हानि होत असते. ह्याविषयीं एक फारच मोठें ढळढळीत उदाहरण झालेलें आहे व त्यामुळें देशाचा तोटा झालेला आहे. कारण, एकादा अगदीं सामान्य मनुष्य पतित झाल्यास त्याला बहिष्कृत करितां येतें व फार तर त्याचें कुळच भ्रष्ट होतें. परंतु,एकादा जहागीरदार, संस्थानिक अथवा राजा भ्रष्ट झाल्यास त्याच्यावर ज्यांची उपजीविका असते तेही त्याच्या पातित्यदोषाकडे लक्ष्य देत नाहींत. पातित्यामुळें त्याचा तिरस्कार करणाऱ्या लोकांशींच ते वांकडे होतात आणि त्या मुख्य पतित व्यक्तीशीं अन्न-

व्यवहार, शरीरसंबंध इत्यादि संसर्ग समजून उमजून करून परिणामीं ह्या जहागिरींच्या, संस्थानाच्या अथवा राज्याच्या हानीला कारण होतात. छत्रपति महाराजांचे मुख्य प्रतिनिधि पेशवे असल्यामुळें व ह्या पेशव्यांचें वर्तन पातित्य आणणारें असल्यामुळें सर्व देशाची हानि झाली. प्रथम पेशवे आपल्या मालकाशीं सेवकाच्या खऱ्या खऱ्या नात्यानें वागत होते. ब्राह्मणाला राज्याचा अथवा ऐश्वर्याचा अभिलाष उत्पन्न होणें ही गोष्ट अत्यंत हानिकारक होय. पेशव्यांच्या पूर्वीपर्यंत राजांचे मंत्री ब्राह्मण पुष्कळ होते. परंतु, त्यांनीं ऐश्वर्याचा अभिलाष धरून राजेपणा मिरविला नाहीं. कारण ते, आचारभ्रष्ट व धर्मभ्रष्ट नसल्यामुळें त्यांना तशी दुर्बुद्धिच झाली नाहीं. बाळाजी विश्वनाथ भट हा पुरुष छत्रपति महाराजांचा आचारसंपन्न व हितकारक मंत्री होता. ह्याचा मुलगा जरी शौर्यादि गुणांनीं संपन्न निपजला तरी ब्राह्मणज्ञातीला कलंक लावणारी गोष्ट त्यानें केली. ती गोष्ट ह्मणजे भोग्य स्त्री ह्या नात्यानें यवनीचा स्वीकार. ह्या यवनीला बाजीराव बल्लाळापासून संततिही झाली. समागमाचें वेळीं जसें शुक्र स्त्रीच्या ठिकाणीं जात असतें तसेंच शुक्रच्युतीमुळें झालेल्या पोकळींत स्त्रीच्या कोठ्यांतलि द्रव्यांचे सूक्ष्म कणही पुरुषाच्या शरीरांत एकदम प्रविष्ट होतात. हा जो स्त्रीदेहांतील द्रव्यांचा पुरुषदेहामध्यें प्रवेश तो चांडालादि अगम्य स्त्रियांच्या समागमामुळें झाल्यास त्याचा परिणाम फारच भयंकर होतो. उपदंशादिरोग दूषित स्त्रीच्या समागमानंतर लगेच होतात ह्याचें तरी कारण हेंच होय. केवल स्पर्शापेक्षां समागमाचा दोष फार भयंकर आहे हें दुष्टस्त्रीमूलक उपदंशादिविकारांनीं ग्रस्त असलेल्या पुरुषांच्या उदाहरणांवरून सिद्धच आहे. ह्मणजे दुष्टस्त्रीसमागमानें पुरुष नखशिखांत दूषित होत असतो ही गोष्ट सर्वांच्या प्रत्ययाला येणारी आहे. चंडालस्त्रीच्या समा-

गमानें पुरुषाच्या शरीरांत चंडालदेहगत द्रव्यांचे कणच जर प्रत्यक्ष प्रविष्ट होत असतात ह्मणजे शरीरांचा भागचं जर ते बनत असतात तर चंडालस्त्रीसमागमानें पुरुष चंडाल होतो हें जें स्मृतिवचनांत सांगितलें आहे तें अगदीं बरोबर आहे. उपदंशग्रस्त झालेल्या मनुष्यानें रोगनाशक औषध जर ताबडतोब न घेतलें तर त्याच्या शरीरांतील सप्त धातु दूषित होतात व त्याची संततिहि दूषितच निपजते. ही गोष्ट प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध आहे. तेव्हां म्लेच्छ स्त्रीशीं समागम करणाऱ्या व दोषनिरसनार्थ प्रायश्चित्तही न करितां जन्मभर तेंच अत्यंत निंद्य कर्म करीत राहणाऱ्या बाजीराव बल्लाळाच्या ठिकाणीं ब्राह्मण्य राहिलें होतें कोठें ? उपदंशग्रस्त स्त्रीच्या समागमामुळें पुरुषाच्या शरीरांत प्रविष्ट झालेले दूषित कण जर पुरुषाला दूषित करीत असतात तर वारंवार यवनीचा समागम करणाऱ्या बाजीराव बल्लाळाचा देहरूप पिंडच यवनपिंड बनला होता ह्याविषयीं संशय घेण्यास अवकाश आहे कोठें? ज्याप्रमाणें उपदंशग्रस्त स्त्रीच्या समागमाबरोबर आंत प्रविष्ट होणाऱ्या द्रव्यकणामुळें पुरुष उपदंशग्रस्त होतो त्याचप्रमाणें यवनीच्या समागमामुळें तिच्या शरीरांतील प्रविष्ट झालेल्या द्रव्यकणांनीं बाजीराव म्लेच्छत्वानें ग्रस्त झाला. ज्याप्रमाणें हा म्लेच्छत्वानें ग्रस्त झाला त्याचप्रमाणें त्याच्या शरीरांतील मुख्य सारच विवाहित स्त्रीच्या शरीरामध्यें प्रविष्ट झाल्यामुळें तीही यवनीच्याच जातीची बनली आणि ह्या उभयतांपासून निपजलेली संततिही ह्यांच्या सतत संसर्गामुळें धर्मशास्त्रदृष्ट्या पतित झाली. अर्था-, ह्यांना वेदाधिकार किंवा वैदिककर्माधिकार राहिला नाहीं. संततीचे ठिकाणीं ब्राह्मण्य उरलें नसल्यामुळें ऐश्वर्यादिकांविषयीं अभिलाषबुद्धि संततीच्या ठिकाणीं उत्पन्न झाली. तिच्याशीं शरीरसंबंध करणाऱ्या लोकांची बुद्धि भ्रष्ट झाली व परिणामीं सर्व देश ।

हानि झाली. ह्यास्तव, ब्राह्मणानें विषयासक्त न होण्याविषयीं फार जपलें पाहिजे. म्लेच्छ स्त्रीशीं समागम करणाऱ्या पेशव्यांचा औरस वंश तीन पिढ्यांनींच नष्ट झाला ही खरोखर ईश्वराची कृपा होय असें एकाद्यानें ह्मटलें तर तें अगदीच अयोग्य ठरेल काय? द्विजेतरांनीं विषयासक्त झाल्यास ब्राह्मणाप्रमाणें त्यांची हानि होण्याचा संभव फार कमी असतो. ह्मणून विशेषतः ब्राह्मणांनीं मनोनिग्रह करण्याविषयीं अवश्य यत्न केला पाहिजे. कामासक्तीशिवायही पातित्य धर्मभ्रंशादिकार्यांमुळें येतें ह्याचें दिग्दर्शन पूर्वी झालेलेंच आहे. धर्मांतर करण्यामुळें बाटणें हाही इंद्रियनिग्रह नसल्याचाच परिणाम होय.

नारळीच्या शेंड्याला नारळ असतात. नारळ कधींही फणसासारखे खोडाला किंवा शेंगाबटाट्यांसारखें मुळाला लागत नाहींत. फलामध्यें नारिकेल फल श्रेष्ठ आहे. परंतु तें प्राप्त करून घेणाऱ्याला फार उंच चढावें लागतें. नारळीच्या वृक्षावर चढलेल्या व सावध राहिलेल्या मनुष्याला खालीं असलेल्या लोकांची स्थिति दिसूं लागते. परंतु,शेंड्याला पोंचलेल्या मनुष्याला फारच जपावें लागतें.त्यानें सर्वदा जागरूकच असलें पाहिजे. त्यानें केव्हांहि दुर्लक्ष्य होऊं देतां उपयोगी नाहीं. कारण, त्याचें दुर्लक्ष्य होऊं लागलें कीं तो अग्रापासून खालीं पडलाच ह्मणून समजावें. ब्राह्मण्य हें अतिशय उंच असलेल्या नारळीच्या झाडाचें फळ आहे. तें ईश्वरकृपेनें ज्याला जन्मतः व संस्कारतः प्राप्त झालेलें आहे त्यानें तें राखण्याविषयीं जपलें पाहिजे. मनुष्य जितक्या उंचीवरून खालीं पडतो तितका त्याचा खालीं जाण्याचा वेगही जास्त असतो.वर्ण व जाति हा एक राष्ट्र रक्षण करणारा चार मजली किल्ला आहे. ह्याच्या शेवटल्या चवथ्या मजल्यावर ब्राह्मण रहात असतात; तिसऱ्यावर क्षत्रिय रहात असतात; दुसऱ्यावर वैश्य रहात असतात व तळमजल्यावर शूद्र रहात असतात. ह्या इमारतीला

उंच जोतें असतें व जोत्याची उंची फार असल्यामुळें तळमजल्यांत प्रवेश होण्यालाही बऱ्याच पायऱ्या चढून जावें लागतें. ह्या पायऱ्या फार अरुंद असतात. ह्या अरुंद पायऱ्या हे स्पृश्य अनुलोम संकर होत आणि पायऱ्यांच्या खालीं सर्वांचें मलमूत्रादि वाहून नेणारें जें मोठें गटार अथवा नाला ते प्रतिलोम अस्पृश्य संकर होत. शेवटल्या चवथ्या मजल्यावरचा मनुष्य खालच्या सर्व लोकांची स्थिति पाहण्यास समर्थ असतो. परंतु, तो जर आचरणाकडे दुर्लक्ष केल्यामुळें एकदम खालीं घसरला तर मधल्या मजल्यावर न पडतां एकदम शेवटल्या गटारांत अथवा नाल्यांतच पडणार हें उघड आहे आणि प्रत्यक्ष उदाहरणांनींही हीच गोष्ट सिद्ध आहे.

मुंबईसारख्या शहरांतून इराणी लोकांचीं चहा वगैरेचीं दुकानें असतात. परंतु,अस्सल मराठे लोक ह्या दुकानांत प्रायः जात नाहींत. आचार भ्रष्ट ब्राह्मण ह्या दुकानांत जातात. सर्व जातीच्या लोकांसह भोजन केलेल्या एका ब्रह्मकुलोत्पन्नाला ब्राह्मणेतरांच्या ताब्यांत असलेल्या एका शिक्षण संस्थेची नोकरी सांभाळण्याकरितां प्रायश्चित्त घ्यावें लागलें. विलायतेस जाऊन आलेल्या ब्राह्मणांच्या संग्रहासंबंधानें कोणी विचारही करीत नाहींत; परंतु, विलायतेस जाऊन आलेल्या व्यक्तींच्या संग्रहासंबंधानें भाटे लोकांत मोठें रण माजून राहिलें होतें. विधवाविवाह करणारे लोक बहुतेक ब्राह्मणांतच आहेत. मूळचे जे इतर द्विज आहेत त्यांच्यामध्यें विधवाविवाह करणारे लोक नाहींत. द्विजेतर विधवेशीं विवाह करणारा एक ब्रह्मकुलोत्पन्नच पुण्यामध्यें निघाला. नामदार बसूनें जो विवाहविषयक कायद्याचा मसुदा आणिला होता त्याला ब्राह्मण लोकांची संमति होतीआणि सांप्रत मद्रास इलाख्यांत अशाच प्रकारचा एक धर्माविरुद्ध मसुदा एका ब्राह्मणानेंच आणिलेला आहे. सांरांश,ब्राह्मण एकदां आपल्या स्थाना-

पासून सुटला ह्मणजे तो मध्यंतरीं थांबत नाहीं. तो सर्वांचें मूत्र, पुरीष, खांकरे, शेंबूड, पूं इत्यादि वाहून नेणाऱ्या नाल्यांतच पडतो. जोत्यावरील पहिल्या मजल्यांत असलेल्या शूद्रांचे व पायऱ्यांवरील संकरांचें खांकरे, बडके वगैरे त्याच्यावरच पडतात; दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर असणारे वैश्य व क्षत्रिय ह्यांची मलमूत्रादि घाण त्यांच्यावरच पडतें आणि ह्या कारणामुळें भ्रष्ट झालेल्या ब्राह्मणांची अवस्था प्रायः सर्व लोकांपेक्षां हीन होते. ह्याकरितां ब्राह्मणानें आपल्या जन्माचें ह्मणजे ब्राह्मण्याचें संरक्षण अत्यंत दक्षतेनें करणें अवश्य आहे. हें ब्राह्मण्यसंरक्षण करण्याची बुद्धि बुद्धिदाता जो गणेश त्याच्या पूजनामुळें कायम राहते व नसल्यास उत्पन्न होते. ह्मणून जन्मना हें पद मंत्रामध्यें घातलेलें आहे. सारांश, लोक, संतति, पितरांचा उद्धार करणारे पुत्र, उत्तम कुलांत झालेला जन्म कायम राहणें, द्रव्य आणि इष्ट, आप्त, सेवक ह्यांसह अन्नप्राप्ति—देवांचा पालक जो ब्रह्मणस्पति त्यांचें श्रद्धापूर्वक वास्तव्य करणाऱ्याला अर्थात् पूजनद्वारा त्याला संतुष्ट करणाऱ्याला—होते असें शेवटल्य मंत्रांत सांगितलें आहे. आणि ह्मणूनच गणपतिपूजन अवश्य आहे.

अक्षतपुंजांवर अथवा पूगफलांवर किंवा अक्षतपुंजयुक्त पूगफलांवर गणेशादि देवांचें आवाहन करीत असतात. परंतु, विघ्ननिरसनार्थ व कल्याणप्राप्त्यर्थ जें गणेशादि देवतांचें पूजन व्हावयाचें त्यांसंबंधानें शक्य तितकी हेळसांड लोकांना ठाऊक नसल्यास मुळें त्यांच्या हातून होत असते. लोकांना समजून सांगितल्यास असली हेळसांड त्यांच्या हातून होणें शक्य नाहीं. परंतु, पुरोहित लोक ही गोष्ट समजून सांगत नाहींत व स्वतःही तसे वागत नाहींत. त्यामुळें देवतापूजन जें कल्याणदायक व्हावयाचें तें कल्याणनाशकच होण्याचा प्रसंग येतो. उदाहरणार्थः अक्षतपुंजावरच आवाहन देवतांचें व्हावयाचें असतें. अक्षत ह्मणजे क्षतरहित अर्थात तांदूळ

वगैरे. मोडकें धान्यं उपयोगी नाहीं. ज्या ठिकाणीं अक्षता असा शब्द येईल त्या ठिकाणीं कणी अथवा मोडका धान्यकण उपयोगी नाहीं. अक्षता निवडलेल्याच असल्या पाहिजेत. मंगलकार्य करणारा मनुष्य कितिही जरीं दरिद्री असला तरी अक्षता निवडलेल्या वापरण्यास तो असमर्थ असतो असें नाहीं. अक्षता, शुद्ध लाह्या, चांगल्या सुपाऱ्या, शुद्ध ठिकाणची मृत्तिका, दूर्वा व फुलें ह्या गोष्टींना विशेषसें द्रव्य लागतें असें नाहीं. परंतु, देवांच्या कृपेवर आपलें कल्याण अवलंबून आहे ही भावनाच असावी तितकी लोकांच्या मनांत दृढ नसल्या-मुळें अक्षतांच्या ऐवजी मोडकें तांदूळ, विवाहहोमसमयीं अवश्य असलेला जो लाजहोम त्याकरितां भडमुंजाच्या घरच्या आणिलेल्या अशुद्ध लाह्या, गटारांतील हरळी, डोक्यावर आणिलेलीं फुलें इत्यादि-कांचा समावेश मंगल कार्यांत होत असतो. गंधाकरितां चंदनाचें खोड कोणापाशीं नसतें असें नाहीं; किंवा गंध उगाळण्याला कोणाला सवड नसतें असेंही नाहीं. परंतु, पुरोहित लोक ह्यांची व्यवस्था करवीत असल्याचें दिसत नाहीं. अक्षता मंगलकार्याकरितां कुंकुमाक्त असल्या पाहिजेत. थोडासा केशरी रंग लाविल्यानें कुंकुमाक्त अक्षता हव्या तितक्या होतात. श्रीमंत लोकांच्या मंगलकार्यांतून केशराचा व्यय शेरांनीं होत असतो. परंतु, कुंकुमाक्त अक्षता ह्मणजे वाण्याच्या घरची मिळेल ती पिंजर मिसळूनच केल्या जातात. पिंजर त्याज्य आहे असें नाहीं. परंतु, कुंकुमाक्त अक्षता करणें हें विशेष खर्चाचें काम नसतांना तशी हलगरज कां करावी?

सुपाऱ्यांचीही गोष्ट त्याचप्रमाणें. बाजारांतून सामान आणणारे लोक सुपाऱ्या दोन प्रकारच्या आणीत असतात. खाण्याकरितां चांगल्या निवडून व याज्ञिक कर्माकरितां, हलक्या कोवळ्या, पोकळ, किडक्या, भोकें पडलेल्या, जाळीं असलेल्या, रंगविलेल्या व दिसण्यांतही वाईट असलेल्या सुपाऱ्या कांहीं लोक याज्ञिक कृत्यांकडे वापरीत असतात.

परंतु, हा भयंकर प्रमाद होय. मनुष्यांपेक्षां देव श्रेष्ठ आहेत व मंगल कार्य परिणामीं मंगलप्रद होणें ही गोष्ट सर्वस्वीं देवांच्या कृपेवरच अवलंबून आहे.अगदीं थोडका काल लोटेपर्यंत टिकणारें असें दृश्य क्षणभंगुर सुख ज्यांच्या मर्जीवर अवलंबून असतें त्या मनुष्यांचा संतोष होण्याकरितां आपण जितकें जपतो त्यापेक्षांही देवांची कृपासंपादन करण्याकरितां आपण ज्यास्त जपलें पाहिजे. परंतु, आपल्या हातून देवांची अनिर्वचनीय अवहेलनाच होत असते व ह्या अवहेलनेमुळें देवांचा कोप होऊन कांहीं वाईट गोष्ट झाली ह्मणजे लोकांची देवावरची श्रद्धा कमी होते. आपल्या कन्येला अखंड सुखसौभाग्य प्राप्त होण्याकरितां किंवा आपल्या मुलाला द्विजत्वसिद्धिपूर्वक वेदाध्ययनाधिकार व आयुरारोग्य प्राप्त होण्याकरितां जें आपण देवतांचें पूजन करितों त्याविषयी जावयाला होणाऱ्या मेजवानीइतकीही आपण काळजी बाळगीत नाहीं. मुलीला सुख देणें ही गोष्ट कांहींशीं जावयावर अवलंबून असते. ह्या जावयाला आपण घरीं भोजनाकरितां जर बोलाविलें तर आपण त्याची मर्जी संभाळण्य करितां फार जपत असतो. केर टाकलेल्या जाग्यावर मळानें भरलेलें घोंगडीचें फाटकें पटकूर बसण्याकरितां, फुटकें मडकें पाणी पिण्याकरितां, धुरकटलेली व अतिशय मळलेली फाटकी धाबळी नेसण्याकरितां, भोकें पडलेली, कुचकी व टाके गळत असलेली फाटकी पत्रावळ जेवणाकरितां, करपलेला भात, जळकी भाकरी, अंबलेली अमटी, घाणेरें तूप, वास येत असलेलें ताक इत्यादि पदार्थ खाण्याकरितां, हातपाय धुतलेले पाणी पिण्याकरितां व घाणेरड्या पिंजरेंत पाणी घालून केलेलें गंध लावण्याकरितां अशी व्यवस्था जर आपण जावयाच्या किंवा दुसऱ्या कोणाच्या मेजवानीकरितां ठेविली व भोजन झाल्यानंतर उकिरड्यावर टाकण्यालाच योग्य असलेलीं सडकीं पानें, किडकी सुपारी इत्यादि जिनसा तांबूलाकरितां त्याच्यापुढें ठेवून अत्तराच्या ऐवजीं मशालींतून खालीं

गळणारें अथवा समईंत शिलक असलेलें घाणेरडें तेल जर आपण त्याला अर्पण केलें तर त्याची मर्जी प्रसन्न होऊन आपलें कल्याण होण्याचा संभव तरी आहे काय? मग असें जर आहे तर न सारविलेली भूमि, घाणेरडा पाट, अळ्या असलेले टाकाउ मोडकें तांदुळ व कुचकी सुपारी ह्यावर जर आपण देवतेचें आवाहन करून तिला बसावयास सांगितलें आणि, घाणेरडीपिंजर मिसळलेले असडी तंदुलकण अक्षतांच्या स्थानीं योजून तसल्याच पिंजरेनें कसेंबसें पाणी घालून तयार केलेलें व अंगुष्ठाच्या मदतीचें दुसऱ्या बोटाच्या नखानें उडविलेलें गंध, मातीनें भरलेली गटारांतील हरळी, पाकळ्या गळत असलेलीं शिळीं फुलें, कुचक्या खारका, सडकी पानें, कुचकें खोबरें, घाणेरडा गुळ, उरापर्यंत कसेतरी हात उचलून केलेली नमस्काराची नक्कल इत्यादि उपचारांनीं जर त्या देवतेचें पूजन केलें तर ती देवता संतुष्ट न होतां क्रुद्ध होऊन आशीर्वाद देण्याचे ऐवजीं शाप देऊनच चालती होईल हें उघड आहे. ह्यास्तव, कल्याणप्राप्त्यर्थ जें देवतापूजन मंगलकार्यांत लोक करीत असतात तें शक्य तितकी काळजी घेऊनच केलें पाहिजे.

## स्वस्तिवाचन अथवा पुण्याहवाचन.

**संपूज्य गन्धमाल्याद्यैर्ब्राह्मणान्स्वस्ति वाचयेत् ।**
**धर्मकर्मणि मांगल्ये सङ्ग्रामेऽद्भुतदर्शने ॥ व्यासः ॥**

मांगल्य धर्मकर्म व संग्राम उपस्थित झाल्यास किंवा अद्भुतदर्शन झाल्यास गंधमाल्यादिकांनीं ब्राह्मणांचें पूजन करून त्यांच्या कडून स्वस्तिवाचन करवावें असें व्यासवचनाचें तात्पर्य आहे.

**अथ स्वस्तिवाचनमृद्धिपूर्तेष्वृद्धिर्विवाहान्ता अपत्यसंस्काराः प्रतिष्ठोद्यापने पूर्ते**

असें गृह्यपरिशिष्टांत सांगितलें आहे. "ऋद्धि व पूर्त ह्या कर्मांच्या

आरंभीं स्वस्तिवाचन करवावें. गर्भाधानापासून विवाहासुद्धां जे अपत्यसंस्कार त्यांना ऋद्धि असें ह्मणतात आणि प्रतिष्ठा व उद्यापन ह्या कर्मांना पूर्त असें ह्मणतात" असें वरील वचनाचें तात्पर्य आहे. ऋद्धि ह्मणजे समृद्धि. आपल्या संस्कारांना समृद्धि अशी संज्ञा आहे. आपणांला धान्यसमृद्धि करावयाची असल्यास जमीन नांगरण्यापासून अतिशय दक्षता ठेवावी लागत असते; नाहीं तर हानि होण्याचा प्रसंग येतो. त्याचप्रमाणें प्रत्यक्ष समृद्धीचें कारण जे अपत्यसंस्कार त्यांचें अनुष्ठान अत्यंत काळजीनेंच केलें पाहिजे. नाहींतर संस्कारहीन अपत्यें स्वतःच्या व कुलाच्या हानीला कारण होतील. स्वस्तिवाचनालाच पुण्याहवाचन अशी संज्ञा इतर स्मृतींमध्यें आहे.

पुण्याहवाचनं सर्वं ब्राह्मणस्य विधीयते ।
तदेव च निरोंकारं कुर्यात्क्षत्रियवैश्ययोः ॥ यमः ॥

"ओंकारसहित पुण्याहवाचन ब्राह्मणालाच विहित आहे. क्षत्रिय वैश्याचें पुण्याहवाचन ओंकाररहित करावें" असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे.

शुभे कर्मणि पुण्याहवाचने कलशद्वयम् ।
स्थापयेदशुभे त्वेकमिति यज्ञविदो विदुः ॥

असें वचन संग्रहामध्यें आहे. "शुभकर्माविषयीं होणाऱ्या पुण्याहवाचनामध्यें दोन कलशांची व अशुभ कर्मासंबंधानें होणाऱ्या पुण्याहवाचनामध्यें एका कलशाची स्थापना करावी असें यज्ञवेत्ते ह्मणतात" हें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. ह्यावरून स्वस्तिवाचनालाच पुण्याहवाचन ही संज्ञा असल्याचें सिद्ध होत आहे. पुण्याह ह्मणजे पुण्य दिवस. ज्या कर्माला जो दिवस उक्त असेल त्या कर्मासंबंधानें तो पुण्याह समजावयाचा. त्या दिवशीं जर कांहीं अन्य कालदोष असले तर ते ब्राह्मणांकडून पुण्याहवाचन करविल्यानें नाहींसे होतात ह्मणूनही पुण्याहवाचन अवश्य आहे. पुण्याह

भवन्तो ब्रुवन्तु" ह्मणून यजमान ब्राह्मणांची प्रार्थना करीत असतो आणि "ओं पुण्याहं" असें ब्राह्मण त्याच्या प्रार्थनेनंतर ह्मणत असतात. त्याचप्रमाणें "स्वस्ति भवन्तो ब्रुवन्तु अशी प्रार्थना ब्राह्मणांची यजमानानें केल्यानंतर "ओं स्वस्ति" असें ब्राह्मण ह्मणत असतात. असा प्रकार ज्या कर्मामध्यें आहे त्या कर्माला पुण्याहवाचन अथवा स्वस्तिवाचन ही संज्ञा असणें योग्यच आहे. पुण्याहवाचन व पुण्याह ह्या शब्दांवरून कर्मानुष्ठानाला अथवा कर्मानुष्ठानाच्या आरंभाला पुण्य कालाची अर्थात् मुहूर्ताची अपेक्षा आहे असें दिसतें. पुण्याहवाचन केल्यास मुहूर्तसंबंधी दोषांचेंही निरसन व्हावयाचें असतें. ह्मणून पुण्याहवाचन शक्य तितकें यथाविधिच होणें अवश्य आहे.

## मुहूर्तविचार.

वेदामध्यें नक्षत्रांना उद्देशून मुहूर्तविचार केलेला आहे. तथापि त्याकडे ज्योतिर्विदांचें लक्ष्य गेल्याचें दिसत नाहीं. कारण, कोणत्याही मुहूर्त ग्रंथांत नक्षत्रविषयक वैदिक मुहूर्ताचा विचार केलेला नाहीं. परंतु, श्रुतिसंमत नक्षत्रविषयक मुहूर्त समजणें अवश्य आहे.

तैत्तिरीय ब्राह्मण. कांड १. प्रपाठक ५ अनुवाक १.

**यत्पुण्यं नक्षत्रम् । तद्बट्कुर्वीतोपव्युषम् । यदा वै सूर्य उदेति । अथ नक्षत्रं नैति । यावति तत्र सूर्यो गच्छेत् । यत्र जघन्यं पश्येत् । तावति कुर्वीत यत्कारी स्यात् । पुण्याह एव कुरुते ।एव ऽ ह वै यज्ञेषुं च शतद्युम्नं च मात्स्यो निरवसाययाञ्चकार ॥**

ह्या वरील विद्यारण्यांचें भाष्य येणेंप्रमाणें:—

**ज्योतिः शास्त्रप्रसिद्ध्या कर्तुः स्वस्य क्रियमाणस्य कर्मण आनुकूल्येन पुण्यं यन्नक्षत्रमस्ति उप व्युषमुषःकालसमीपे तन्नक्षत्रं बट्कुर्वीत बाढं कुर्वीत आकाशे सूर्यो दयदेशादूर्ध्वमेता-**

चाति दूरे तन्नक्षत्रं तिष्ठतीति बुद्धौ दृढनिश्चयं कुर्यात्। उपव्युषमित्येतस्यैवाभिप्रायः स्पष्टीक्रियते। यस्मिन्काले सूर्य उदेति तस्मिन्काले तन्नक्षत्रं पुरुषो नैति न प्राप्नोति। सूर्यप्रकाशेन तिरोहितत्वाद्द्रष्टुं न शक्यत इत्युदयात्प्रागेव नक्षत्रदर्शनकाले तस्य स्थानविशेषं निश्चिनुयात्। तच्च नक्षत्रं यावत्प्राच्यामुदयं प्राप्य पश्चिमाभिमुखं गच्छति। तथा सति यस्मिन्देशे नक्षत्रस्थानं स्वेन निश्चितं तस्थानात्प्राचीनः समीपदेशस्तन्नक्षत्रापेक्षया जघन्यः। तस्मिञ्जघन्यदेशे यावति काले सूर्यो गच्छेत्तावति काले स्वेन कर्तव्यं कर्म कुर्यात्। यत्कर्म करोतीति यत्कारी तादृशश्चिकीर्षुः पुरुषस्तस्मिन्काले प्रारभेत। तथा सति सत्स्वपि शास्त्रोक्तेषु कालदोषेषु तेषां दोषाणामुपशमादयं पुरुषः पुण्याह एव तत्कृतवान्भवति। तदेतत्सांप्रदायिकम्। यस्मान्मात्स्यो नाम कश्चिदृषिर्यज्ञेषुनामकं शतद्युम्नं च पुरुषमीदृशे मुहूर्ते कारयित्वा निःशेषेण श्रेष्ठ्यं प्रापयामास।

ह्या भाष्यांचें तात्पर्य येणें प्रमाणें:—

"ज्योतिःशास्त्रावरून कर्त्याला व कर्माला अनुकूळ ह्या नात्यानें जें पुण्यनक्षत्र असेल तें सूर्योदयाचें पूर्वी आकाशामध्यें पूर्वेकडून पश्चिमेकडे किती आलेलें आहे हें पहावें व जेथें तें आलें असेल तें स्थान कायम करावें. कारण, सूर्योदयानंतर तें नक्षत्र दिसेनासें होईल. तेव्हां सूर्योदयापर्यंत तें नक्षत्र जेथें आलें असेल तेथें सूर्य येईपर्यंत त्या नक्षत्रावर-उक्त असलेलें कर्म करावें. ह्मणजे तें कर्म पुण्यदिवसावरच होतें. अशा प्रकारच्या मुहूर्तावर कर्म करवून यज्ञेषु व शतद्युम्न ह्यांना मात्स्य महर्षींनीं श्रेष्ठत्व संपादन करून दिलें." असें ह्या भाष्याचें तात्पर्य आहे. तथापि, भाष्यांत दर्शविलेल्या तात्पर्यापेक्षां श्रुतीचें तात्पर्य अधिक आहे असें मला वाटतें. कारण, भाष्यकारांनीं दर्शविल्याप्रमाणेंच श्रुतीचें तात्पर्य मानिल्यास सूर्यास्त झाल्यावर नक्षत्रें दिसूं लागल्यानंतर ज्या नक्षत्रांचा उषःकालापर्यंत

उदय होईल तेवढींच नक्षत्रें उषःकालीं दिसतील. त्यांतही उषःकालाचे जवळ ज्या नक्षत्राचा उदय होईल तें नक्षत्र नक्षत्रदर्शन असेपर्यंत विशेष वर येण्याचा संभव नसल्यामुळें कर्माला उपयोगीं पडणार नाहीं. त्याचप्रमाणें नक्षत्रदर्शनाबरोबर उगवणारें एकादें नक्षत्रही उषःकालाचे जवळ ह्मणजे सूर्योदयाचे पूर्वी नक्षत्रें दिसण्याच्या शेवटल्या क्षणीं दिसणार नाहीं.

चवदा अथवा पंधरा नक्षत्रें उषःकालीं क्षितिजावर असण्याचा संभव नसल्यामुळें त्या नक्षत्रावर जें कर्म कर्तव्य असेल तें करितां येणार नाहीं. उदाहरणार्थः—स्वतंत्र पशुयाग रेवतीवर करावा असें श्रुतींत सांगितलें आहे व ब्राह्मणांला वसंत काळ कोणत्याही कर्माविषयीं विशेष उक्त आहे. तेव्हां उत्तराभाद्रपदा, रेवती व अश्विनी ह्या नक्षत्रांवर सूर्य असतांना व रेवती हें नक्षत्र चंद्राला भोग्य असतांना सूर्योदयाचें पूर्वीं उषःकालीं तें दिसेलच असा नियम नाहीं. तेव्हां तस्माद्रेवत्यां पशूनां कुर्वीत ही श्रुति ह्या मुहूर्तासंबंधानें व्यर्थ होऊं लागेल. त्याचप्रमाणें उत्तराभाद्रपदा हें नक्षत्र आधानाला उक्त आहे. वसंत ऋतूमध्यें ब्राह्मणानें अग्न्याधान करावें अशी श्रुति आहे व पौर्णिमा आणि अमावास्या हीं पर्वें आधानाला उक्त आहेत.

**ऋतुर्नक्षत्रं पर्व तत्समृद्धं**

असें सूत्र आहे. ऋतु, नक्षत्र व पर्व असा योग हा उत्तम मुहूर्त असा ह्या सूत्राचा अर्थ आहे. उत्तराभाद्रपदा हें आधाननक्षत्र फाल्गुनवद्य अमावास्येस प्रायः असतें. तेव्हां वसंत ऋतुही

**मीनमेषयोर्वसन्तः**

ह्या बौधायनवचनाप्रमाणें असतोच. परंतु, सूर्य उत्तराभाद्रपदा नक्षत्रावरच पुष्कळ वेळां फाल्गुनी अमावास्येस असण्याचा संभव असल्यामुळें व उत्तराभाद्रपदा नक्षत्र उषःकालीं क्षितिजावर असण्याचा

संभव नसल्याकारणानें ऋतु, नक्षत्र व पर्व हा योग अग्न्याधानाला लाभण्याचा पुष्कळ वेळां असंभव होईल. तेव्हां हा विरोध टाळण्याकरितां श्रुतीचा अर्थ सरळ रीतीनेंच थोडासा वेगळा केला असतां भाष्यकारांनीं दर्शविलेल्या तात्पर्यापेक्षां अधिक तात्पर्य कसें निघत आहे तें पाहूं.

**यत्पुण्यं नक्षत्रम् । तद्वट्कुर्वीतोपव्युषम् ।**

ह्या वाक्यांचा अर्थ जसा भाष्यकारांनीं केलेला आहे तसाच आहे.

**यदा वै सूर्य उदेति । अथ नक्षत्रं नैति ।**

ह्या वाक्यांचा अर्थ सरळ वेगळा होत आहे. यदा ह्मणजे जेव्हां, जेव्हांपासून. अथ ह्मणजे नंतर अथवा तेव्हांपासून. सूर्योदय झाला ह्मणजे नक्षत्र क्षितिजावर येत नाहीं. ह्मणजे सूर्योदयानंतर नक्षत्र उगवत नाहीं. उगवणें व मावळणें हा व्यवहार आपण दर्शन व अदर्शन ह्यांवरच अवलंबून असल्याचें समजतो. तेव्हां उषःकालीं क्षितिजावर नसणारीं जीं नक्षत्रें त्यांच्यासंबंधानें (यदा वै० नैति) हीं दोन वाक्यें आहेत असें समजावें.

**यावति तत्र सूर्यो गच्छेत् । यत्र जघन्यं पश्येत् ।**

ह्या वाक्यांपैकीं पहिल्या वाक्याचा अर्थ भाष्यकारांच्या व्याख्यानाप्रमाणें करण्यासही हरकत नाहीं. ह्मणजे यावति० गच्छेत् हें वाक्य सूर्योदयाचें पूर्वी असणाऱ्या नक्षत्रदर्शनकालाच्या शेवटल्या क्षणांत जें पुण्य नक्षत्र स्थानतः निश्चिलें केलें असेल त्या नक्षत्रासंबंधानें आहे. (यत्र जघन्यं पश्येत्) हें वाक्य (अथ नक्षत्रं नैति) ह्या वाक्यांत जें पुण्यनक्षत्र निर्दिष्ट आहे त्या नक्षत्रासंबंधानें आहे. ह्मणजे सूर्योदयानंतर जें पुण्यनक्षत्र क्षितिजावर आलें असेल परंतु, सूर्यप्रकाशामुळें अदृश्य असेल तें नक्षत्र जेथें असतांना सूर्यास्त होईल तेथें सूर्य येईपर्यंत त्या नक्षत्राच्या मुहूर्तावर जें कर्म करावयाचें असेल तें करावें.

श्रुतींमध्यें कर्माच्या आरंभाचा काल अथवा कर्मकाल रात्रीं प्रायः सांगितलेला नाहीं. प्रातः, संगव, मध्यंदिन, अपराण्ह व सायं हे जे दिवसांचे पांच भाग त्यांत कर्म करावें असें श्रुतिसूत्रांतून सामान्यतः सांगितलेलें असतें. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतचा जो काल त्याच्या पांच विभागांना अनुक्रमें प्रातः, संगव इत्यादि संज्ञा आहेत. ह्या पांच कालांपैकीं कोणत्याही दोन कालांच्या मधला संधिकाल कर्माला वर्ज्य असल्यामुळें पांच भाग श्रुतीमध्यें वेगळे वेगळे सांगावे लागले आहेत. नक्षत्रोपस्थान , ध्रुवोपस्थान इत्यादि कर्मांखेरीज रात्रीं कर्मकाल प्रायः सांगितलेला नसतो. तेव्हां रात्रीं जेथें काल वाचनिक असेल तेथेंच घ्यावयाचा असतो. जेथें कालनिर्देश विशेष केलेला नसेल तेथें सूर्य क्षितिजावर असलेलाच काल घ्यावयाचा असतो.

आतां एकंदर श्रुतिवाक्यांवरून जें ठरत आहे तें येणेंप्रमाणें:—

वेगळया वेगळया कर्मांना वेगळीं वेगळीं नक्षत्रें सांगितलेलीं आहेत. ज्या कर्माला जें नक्षत्र सांगितलें असेल त्या कर्मासंबंधानें तें पुण्य नक्षत्र होय. हीं पुण्यनक्षत्रें चंद्रभोग्य असतांना कर्में करावयाचीं असतात. सर्वच चंद्रभोग्य नक्षत्रें उषःकालीं सर्व दिवसांमध्यें दृष्टीं पडतील असा नियम नसतो. उषःकालानंतरच कांहीं कालानें जीं क्षितिजावर येणार तीं उषःकालीं कोठून दिसणार? तेव्हां जें पुण्यनक्षत्र सूर्योदयानंतर क्षितिजावर येईल त्या नक्षत्रावर उक्त असलेलीं कर्में व्हावयाचीं कशीं? हा प्रश्न उपस्थित होत आहे. तेव्हां सूर्योदयानंतर जें पुण्य नक्षत्र क्षितिजावर येणार तें सूर्यास्तानंतर आकाशांतील ज्या प्रदेशांत दिसूं लागेल त्या प्रदेशांत सूर्य येईपर्यंत त्या नक्षत्रावरील उक्त कर्म करावें. हें ह्या श्रुतीचें तात्पर्य आहे.

## स्वस्तिवाचनापूर्वींची इतिकर्तव्यता.

“ जेथें पुण्याहवाचन करावयाचें असेल तेथें सारवून रांगोळी

घालावी आणि खालीं एकएक प्रस्थ धान्य घालून त्यांवर दोन कलश स्थापावे. त्या कलशांपैकीं एक दक्षिणेस स्थापावा व दुसरा उत्तरेस स्थापावा. उत्तरेकडील कलशामध्यें तांदूळ, अक्षता, द्रव्य, दूर्वा, पुष्पें व चंदन हीं घालावीं. पात्रें सर्व कुंकुमाक्त ह्मणजे केशर लाविलेलीं असावीं. अक्षताही केशर लाविलेल्या असाव्या. कलशामध्यें जें उदक घालावयाचें तें पुण्य तीर्थाचें घालावें व त्यांत सुवर्ण, फल, पुष्पें इत्यादि वस्तु घालाव्या आणि कलशावर अक्षतांनीं भरलेलें पात्र ठेवावें" असें हारीतस्मृतींत सांगितलें आहे.

## प्रस्थ व पल ह्यांचें प्रमाण.

पल ह्मणजे मूठभर. चार पलें ह्मणजे एक कुडव. चार कुडव ह्मणजे एक प्रस्थ. चार प्रस्थ ह्मणजे एक आढक व चार आढक ह्मणजे एक द्रोण. पसा ह्मणजे दोन पलें अथवा दोन मुठी.

## पंचरत्नें व कलश.

सुवर्णाचे, रुप्याचे, तांब्याचे अथवा मृण्मय कलश लक्षणसंपन्न असावे. सुवर्ण, रौप्य, मोतीं, माणिक्य व प्रवाळ हीं सर्व देवांना प्रिय असलेलीं पंचरत्नें होत असें विष्णुधर्मोत्तरांतील

हेमराजततान्म्रा वा मृण्मया लक्षणान्विताः ।
सुवर्णं रजतं मुक्ता माणिक्यं च प्रवालकम् ।
पञ्चरत्नमिति ख्यातं समस्तसुरवल्लभम् ॥

ह्या वचनांत सांगितलें आहे.

सुवर्णाशिवाय कोणत्याही रत्नाचा अभाव असल्यास सुवर्णाची योजना करावी असें.

अभावे सर्वरत्नानां हेम सर्वत्र योजयेत् ।

ह्या आदित्य पुराणांतील वचनांत सांगितलें आहे.

## पंचपल्लव व त्वचा.

न्यग्रोधपिप्पलप्लक्षजम्बूचूततरूद्भवाः ।
पल्लवाः पञ्च विज्ञेयास्त्वक्तेषामपीष्यते ॥

असें वचन ब्रह्मांडपुराणांत आहे. " वड, पिंपळ, पायरी, जांभूळ व अंबा ह्या वृक्षांचे पल्लव अथवा त्वचा कलशामध्यें घालणें योग्य आहे " असें ह्या वचनावरून ठरतें.

## सर्वौषधिगण.

कुष्ठं मांसी हरिद्रे द्वे मुरा शैलेयचन्दनम् ।
सटीचम्पकमुस्ताश्च सर्वौषधिगणः स्मृतः ॥

असें वचन छंदोगपरिशिष्टांत आहे व त्याचा अर्थ " कोष्ठ, जटामांसी, हळद, दारुहळद, मोरवेल, शिलारस, पांढरा चंदन, कचोरा, चाफ्याची साल व नागरमोथे हा सर्वौषधिगण होय " असा आहे.

## कर्मदेवतानामानि.

बौधायनसूत्रांत कर्मदेवतांचीं नावें सांगितलेलीं आहेत. तें सूत्र येणेंप्रमाणें:—

अथ पुण्याहदेवता व्याख्यास्यामो विवाहस्याग्निरौपासनस्याग्निसूर्यप्रजापतयः स्थालीपाकस्याग्निर्गर्भाधानस्य ब्रह्मा पुंसवनस्य प्रजापतिः सीमन्तस्य धाता विष्णुर्बलेर्विष्णुर्जातकर्मणो मृत्युर्नामकर्मणः सविता तस्यान्ते प्रजापतिरुपनिष्क्रमणस्य सविता तस्यान्ते चित्रियाण्यन्नप्राशनस्य सविता चौलस्य केशिनस्तस्यान्ते प्रजापतिरुपनयनस्येन्द्रः श्रद्धामेधे अन्ते विसर्गे सुश्रवाः पुनरुपनयनस्याग्निरथ यदि ब्रह्मचार्यव्रत्यमाचरेत्तस्मिन्नपायहोमे सविता समावर्तनस्य श्रीरिन्द्रो वा शूलगवस्येशानः प्रत्यवरोहणस्य सवितोपाकर्मणि व्रतेषु च सविता वास्तुहोमस्य वास्तोष्पतिरन्ते प्रजापतिरहुतहोमस्येन्द्रोऽन्ते प्रजापतिरायुष्यहोमस्याग्निरायुष्मान्नक्षत्रहोमस्य नक्षत्रेष्टिसूक्ताऽष्टमो

प्रदोषस्येशान आग्रयणस्याग्रयणदेवताः सर्पबलेः सर्पा एकोद्दिष्टस्यान्ते प्रजापतिस्तडागादीनां वरुणो यक्षबलेर्यक्षा ग्रहशान्तिहोमस्यादित्यादिनवग्रहा नागारितन्त्रहोमे ब्रह्मादयः प्रीयन्तामित्येवमेवान्येषां होमानां याज्यानुवाक्ययोर्देवताऽसौ प्रीयतामिति सूतकान्ते प्रथमोदकान्ते प्रजापतिः कूश्माण्डहोमस्यादित्यादयश्चान्द्रायणस्याग्न्यादयोऽग्न्याधेयस्याग्न्यादयोऽग्निष्टोम इन्द्र एवमनादिष्टकर्मसु प्रजापतिरित्याह भगवान्बौधायनः ॥

ह्या बौधायनसूत्राचा अर्थ सामान्य वाचकांना समजण्यासारखा आहे.

## पुण्याहवाचनविधि.

अथातः पुण्याहवाचनं व्याख्यास्यामः शुचौ समे देशे दूर्वा धारयमाणाश्चत्वारो ब्राह्मणाः प्रशस्ता अरिक्तहस्ताः प्राङ्मुखास्तिष्ठन्ति तेषां दक्षिणत उदङ्मुखोऽपिहितमुदकुम्भं धारयन्वाचयिता तस्य दक्षिणं बाहुमाश्रित्य पत्नयस्तिष्ठन्ति ततः सपवित्रेषु विप्रपाणिषु जलं दद्यादोमाप इति शिवा आपः सन्त्विति ते प्रत्यूचुस्ततो गन्धा इति गन्धं ददाति सुगन्धाः पान्त्विति प्रतिगृह्णन्ति ततः सुमनस इति पुष्पाणि ददाति सौमनस्यमस्त्विति प्रतिगृह्णन्ति ततोऽक्षता इत्यक्षतान्ददाति अक्षतं चारिष्टं चास्त्विति प्रतिगृह्णन्ति ततो दक्षिणा इति दक्षिणां ददाति स्वस्ति दक्षिणाः पान्तु बहु देयं चास्त्विति प्रतिगृह्णन्ति । ततो वाचयिता दक्षिणं जानु भूमौ निधाय सव्यमुत्थाप्योदङ्मुख इडा देवहूरिति जपित्वोदकुम्भमादाय पोत्तिष्ठति।ततो मनः समाधीयतामिति वदति समाहितमनसः स्म इति विप्राः प्रत्यूचुस्ततो वाचयिता प्रसीदन्तु भवन्त इति वदति प्रसन्नाःस्म इति विप्राः प्रत्यूचुस्ततो वाचयिता शान्तिरस्तु पुष्टिरस्तु तुष्टिरस्तु वृद्धिरस्त्वविघ्नमस्त्वायुष्यमस्त्वारोग्यमस्तु शिवं कर्मास्त्विति वदति तथास्त्विति विप्राः प्रत्यूचुः कर्म यद्देवत्यं भवति तस्य नाम गृह्णात्यसौ प्रीयतामिति । ततः पुण्याहं भवन्तो ब्रुवन्त्वित्यों पुण्याहमिति

विप्राः प्रत्याहुस्ततःस्वस्ति भवन्तो ब्रुवन्त्वित्यों स्वस्तीति विप्राः प्रत्याहुस्तत ऋद्धिं भवन्तो ब्रुवन्त्वित्योमृध्यतामोत विप्राः प्रत्याहुः सर्वाणि त्रिस्त्रिर्वाचयति । ततो विप्रा उपविश्य सुरभिमत्याब्लिङ्गाभिर्वारुणीभिर्हैरण्यवर्णाभिः पावमानीभिश्च वाचयितारमभिषिञ्चेयुस्ततो वाचयिता भूर्भुवःसुवरोमिति जपतीत्याह भगवान्बौधायनः ॥

ह्याचें तात्पर्य येणें प्रमाणें:—"आतां ह्यानंतर पुण्याहवाचन सांगतो. शुद्ध व चढउतार नसलेल्या अशा सारख्या प्रदेशावर दूर्वा व दर्भ धारण करणाऱ्या, रिक्तहस्त नसलेल्या व प्रशस्त असलेल्या चार ब्राह्मणांनीं प्राङ्मुख उभें रहावें. त्यांच्या दक्षिणेस यजमानानें उदकपूर्ण परंतु झाकलेला कलश हातांत घेऊन उदङ्मुख असावें. त्याच्या उजव्या हाताला स्पर्श करून पत्न्या असाव्या. तदनंतर पवित्रयुक्त विप्रहस्तांवर ॐ आपः असें ह्मणून कर्त्यानें उदक द्यावें व शिवा आपः सन्तु असें ब्राह्मणांनीं प्रतिवचन द्यावें. तदनंतर गंधाः असें ह्मणून कर्त्यानें गंध द्यावें. नंतर सुगंधाः पांतु असें ह्मणून ब्राह्मणांनीं त्याचा स्वीकार करावा. तदनंतर सुमनसः असें ह्मणून यजमानानें पुष्पें द्यावीं. नंतर सौमनस्यमस्तु असें ह्मणून ब्राह्मणांनीं त्यांचा प्रतिग्रह करावा. तदनंतर अक्षताः असें ह्मणून अक्षता द्याव्या. तदनंतर अक्षतं चारिष्टं चास्तु असें ह्मणून ब्राह्मणांनीं त्यांचा स्वीकार करावा. तदनंतर दक्षिणाः असें ह्मणून यजमानांनीं दक्षिणा द्यावी व स्वस्ति दक्षिणाः पांतु बहु देयं चास्तु असें ह्मणून ब्राह्मणांनीं ती स्वीकारावी. तदनंतर यजमानानें उजवा गुडघा भूमीला लावून व डावा उभा करून उदङ्मुख असतांनाच हातांत उदकपूर्ण कलश घेऊन इडा देवहूः ह्या मंत्राचा जप करून उभें रहावें. नंतर मनः समाधीयतां असें यजमानानें ह्मणावें. तदनंतर समाहितमनसः स्मः असें ब्राह्मणांनीं प्रतिवचन द्यावें. तद-

नंतर यजमानानें प्रसीदन्तु भवन्तः असें ह्मणावें. नंतर ब्राह्मणांनीं प्रसन्नाः स्मः असें प्रत्युत्तर द्यावें. तदनंतर यजमानानें शांतिरस्तु, पुष्टिरस्तु, तुष्टिरस्तु, वृद्धिरस्तु, अविघ्नमस्तु, आयुष्यमस्तु, आरोग्यमस्तु, शिवं कर्मास्तु असें ह्मणावें. ब्राह्मणांनीं तथास्तु असें प्रतिवचन देत रहावें. तदनंतर ज्या देवतेला अनुलक्षून कर्म असेल त्या देवतेचें प्रथमान्त नाम घेऊन प्रीयतां असें यजमानानें ह्मणावें. तदनंतर पुण्याहं भवन्तो ब्रुवंतु असें यजमानानें ह्मणावें. ओं पुण्याहं असें विप्रांनीं ह्मणावें. नंतर स्वस्ति भवन्तो ब्रुवन्तु असें यजमानानें ह्मणावें. ओं स्वस्ति असें ब्राह्मणांनीं ह्मणावें. नंतर ऋद्धिं भवन्तो ब्रुवन्तु असें यजमानानें ह्मणावें. नंतर ओमृध्यतां असें विप्रांनीं ह्मणावें. ह्या सर्वांचें वाचन तीन तीन वेळां यजमानानें करावें. तदनंतर विप्रांनीं बसावें आणि सुरभिशब्द असलेली ऋचा, अब्लिंग ज्यांत आहे अशा ऋचा, वरुणदेवतेच्या ऋचा, हिरण्यवर्णाः ह्या ऋचा व पावमानी ऋचा ह्यांच्या योगानें, यजमानाला अभिषेक करावा व तदनंतर यजमानानें भूर्भुवःसुवरोम् असें ह्मणावें."

प्रशस्त ब्राह्मण ह्मणजे त्या दिवशीं श्राद्ध भोजन न स्वीकारिलेले व दुसरा प्रतिग्रह न घेतलेले वगैरे. सुरभिमती ऋचा ह्मणजे दधिक्राव्णो अकारिषं हा मंत्र; अब्लिंग ऋचा ह्मणजे आपोहिष्ठादि मंत्र; वारुणी ऋचा ह्मणजे यच्चिद्धि ते इत्यादि मंत्र; हिरण्यवर्णा ऋचा ह्मणजे हिरण्यवर्णाः शुचयः पावकाः इत्यादि मंत्र आणि पावमानी ऋचा ह्मणजे पवमानः सुवर्जनः ह्या अनुवाकांतील मंत्र.

बौधायनसूत्रोक्त पुण्याहवाचन एवढेंच आहे. परंतु, सांप्रत हें करण्याचा विशेष आचार दिसत नाहीं. ह्यास्तव, सर्व शिष्ट लोक जें करीत असतात त्याचा प्रयोग दर्शविणें अवश्य आहे.

# पुण्याहवाचनाचें स्थल व संकल्प.

जेथें पुण्याहवाचन करावयाचें असेल ती भूमि गोमयानें सारवून पुण्याहवाचनदेवतांकरितां त्या भूमीवरील कांहीं प्रदेशावर रांगोळी घातलेली असावी व त्या प्रदेशाच्या उत्तरेस पुण्याहवाचनाला लागणारी सर्व सामग्री ठेविलेली असावी आणि रांगोळी घालून भूषित केलेलें जें स्थल त्याच्या पश्चिमेस यजमान, पत्नी व संस्कार ज्या अपत्याचा करावयाचा असेल तें अपत्य ह्यांना बसावयास पुरण्याइतकें पीठ वस्त्रानें आच्छादित करून ठेवावें. सपत्नीक कर्त्यानें आपलीं नित्य कर्में अगोदर करावीं. तदनंतर त्यानें दुसरें मांगलिक स्नान करावें. चांगले अलंकार घालावे व शेंडीला गांठ मारून त्या वस्त्रानें आच्छादिलेल्या पीठावर पूर्वाभिमुख बसावें. आपल्या उजव्या बाजूस पत्नीला पूर्वाभिमुखच बसवावें. ह्यांच्या दक्षिणेस निदान सहा तरी ब्राह्मण उत्तरेकडे तोंड करून बसवावे. अथवा स्वतःच्या उत्तरेस पूर्वाभिमुख बसवावे. पुत्रादिकांच्या संस्काराकरितां जें संस्कारकर्मांग पुण्याहवाचन असेल त्याचे वेळीं पत्नीच्या दक्षिणेस संस्कार ज्याचा करावयाचा असेल त्या अपत्याला बसवावें. तदनंतर अपत्य पीठावर बसावयाचें पूर्वींच इष्टदेवतांना, गृहदेवतांना, घरांतील गुरुजनांना व ब्राह्मणांना नमस्कार करावा. देवतांना फलतांबूलादि समर्पण करून नंतर नमस्कार करावा. ब्राह्मणांना नमस्कार करिते वेळीं यावतीर्वै देवताः हा मंत्र ह्मणावा. नंतर हातांत पवित्रकें घालून आचमन करावें व प्राणायाम करावा. तदनंतर इष्ट देवतादिकांना नमस्कार करून सुमुखश्च इत्यादि मंगलश्लोक ह्मणावे. देश व काल ह्यांचा उल्लेख करावा. नंतर जें कर्म करावयाचें असेल त्याचा उल्लेख द्वितीयांत करून करिष्ये असें ह्मणावें. तदनंतर तदंगत्वेन पुण्याहवाचनं मातृकापूजनं नान्दीश्राद्धं च करिष्ये असा संकल्प करावा.

पुण्याहवाचनाचे प्रकार दोन आहेत. बहिर्भूत पुण्याहवाचन आणि अंतरंग पुण्याहवाचन. ज्या कर्माकरितां पुण्याहवाचन करावयाचें असेल त्या कर्माला आरंभ झाल्यानंतर ह्मणजे प्रधानसंकल्प केल्यानंतर जें पुण्याहवाचन केलें जातें त्याला अंतरंग पुण्याहवाचन असें ह्मणतात. परंतु, कर्माचा संकल्प होण्यापूर्वी जर पुण्याहवाचन करावयाचें असेल तर त्याला बहिर्भूत पुण्याहवाचन ह्मणतात. असें बहिर्भूत पुण्याहवाचन असल्यास अमुकं कर्म कर्तुमादौ पुण्याहवाचनं मातृकापूजनं नान्दीश्राद्धं च करिष्ये असा संकल्प करावा आणि नंतर त्या संकल्पाप्रमाणें पुण्याहवाचन वगैरे झाल्यावर प्रधानसंकल्प करावा.

संकल्प कसा करावा? हें सांगितलें. सुतसंस्कारांमध्यें उपनयनसंस्कार हा फार महत्त्वाचा संस्कार आहे. तेव्हां त्या संस्काराचा संकल्प सांगणें व त्या संस्काराचा प्रयोग सांगणें अवश्य आहे. परंतु, तो सांगण्यापूर्वी उपनयन संस्काराचा काल कोणता? काम्य काल कोणता? उपनयनाला उक्त तिथि कोणत्या? गुरुबळ वगैरेंची आवश्यकता आहे किंवा नाहीं? उपनयन करण्याचे अधिकारी कोण? उपनयन संस्काराला सामग्री काय लागते? इत्यादि गोष्टींचा विचार होणें अवश्य आहे. तथापि, तो नांदीश्राद्धप्रकरण सांगितल्यानंतर करूं.

## नांदीश्राद्ध.

ह्यालाच आभ्युदयिक श्राद्ध असें ह्मणतात. अभ्युदय ह्मणजे ऐहिक उत्कर्ष. अभ्युदय हें ज्याचें फल आहे तें आभ्युदयिक. गर्भाधानादि गर्भसंस्कार, जातकर्मादि अपत्यसंस्कार, वापी, कूप, तडाग, आराम इत्यादिकांचा उत्सर्ग वगैरे पूर्त कर्मे, देवप्रतिष्ठा, व्रतोद्यापन, वानप्रस्थादि आश्रमांचा स्वीकार, तुलापुरुषादि महादानें वगैरे, नूतनगृहप्रवेश, कांडव्रतें, राजाभिषेक, शान्तिक व पौष्टिक कर्मे, अग्न्याधानादि श्रौत कर्मे, उपाकर्म व उत्सर्जन, पार्वणस्थालीपाक,

श्रवणाकर्म इत्यादिकांचा प्रथम प्रयोग आणि उत्सव वगैरे कर्तव्य असतांना हें नांदीश्राद्ध करावें. व्रतोद्यापन आणि अनिष्ट ग्रहांची पीडा वगैरे निवृत्त होण्याकरितां शान्ति वगैरे कर्तव्य असल्यास नांदीश्राद्ध करूं नये. कारण, शाकलकारिकांमध्यें त्याविषयीं निषेध आहे असें कोणी ह्मणतात. परंतु, हें मत अनेक स्मृतींशीं व प्रामाणिक ग्रंथांशीं विरुद्ध असल्यामुळें अग्राह्य असेंही कोणी ह्मणतात.

एकाचे अनेक संस्कार एकानेंच करावयाचे असतांना व त्यांचें अनुष्ठान एकाच वेळीं उपस्थित झालें असतांना सर्व संस्कारांच्या पूर्वी नांदीश्राद्ध व मातृकापूजन हीं एकदाच करावीं. प्रत्येक संस्काराला त्यांची आवृत्ति नको. उदाहरणार्थः सांप्रत जातकर्मादि संस्कार पुष्कळांचेच झालेले नसतात व ते उपनयनाच्याच वेळेला सर्व व्हावयाचे असतात. अशा वेळीं मातृकापूजन व नांदीश्राद्ध हीं एकदाच करावीं. त्याचप्रमाणें ज्या पातकांना पुनःसंस्कारपूर्वक प्रायश्चित्त उक्त आहे अशा पातकांच्या निरसनार्थ जातकर्मादि संस्कार पुनः कर्तव्य झाल्यास त्यांचें एकाच कालीं अनुष्ठान होणारें असेल तर नांदीश्राद्ध व मातृकापूजन हीं एकदाच करावीं. त्याचप्रमाणें देशांतराला गेलेला कोणी मनुष्य पुष्कळ दिवस पत्ता न लागल्यामुळें परलोकीं गेला अशा समजुतीवर जर त्याच्या आप्तानें त्याचा उत्तर संस्कार केला आणि नंतर जर तो परत आला तर त्याचेही जातकर्मादि संस्कार करावे लागतात व ते एकाच कालीं व्हावयाचे असतात. अशा प्रसंगीं मातृकापूजन व नांदीश्राद्ध हीं एकदाच.

गणशः क्रियमाणानां मातृणां पूजनं सकृत् ।
सकृदेव भवेच्छ्राद्धमादौ न पृथगादिषु ॥

असें वचन ब्रह्मपुराणामध्यें आहे. समुदायानें संस्कार कर्तव्य झाल्यास मातृकापूजन व नांदीश्राद्ध हीं सर्व संस्कारांच्या आरंभीं

एकदाच करावीं; प्रत्येकाच्या आरंभीं हीं वेगळीं वेगळीं करण्याचें कारण नाहीं असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. अनेक अपत्यांचे एकदम संस्कार करणें प्राप्त झाल्यास तद्विषयक हें वचन आहे असें बोपदेव ह्मणतो. मातृकापूजन व नांदीश्राद्ध हीं दोन्हीं स्वतंत्र आहेत असें ह्या वचनावरून दिसतें; ह्मणून हीं दोन्हीं कर्मे अगदीं स्वतंत्र आहेत असें मानावयाचें असल्यास दोहोंचाही संकल्प अगदीं वेगळा वेगळा करावा.

यत्र यत्र भवेच्छ्राद्धं तत्र तत्र च मातरः ।

असें वचन आहे. जेथें जेथें नांदीश्राद्ध तेथें तेथें मातृकापूजन असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. ह्या वचनावरून मातृकापूजन हें नांदीश्राद्धांचें अंगच ठरत आहे. तेव्हां हा पक्ष स्वीकारिल्यास मातृकापूजनाचा वेगळा संकल्प नको.

नांदीश्राद्धामध्यें गौर्यादि षोडश मातृका, ब्राम्ह्यादि सप्त मातृका आणि गणपत्यादि चतुष्टय अशा ज्या मातृकापूजनांतील सत्तावीस देवता आहेत त्यांना अनुलक्षून दक्षिणा वगैरे द्यावी लागत असल्यामुळें नांदीश्राद्धांगच मातृकापूजन आहे हें ह्मणणें सयुक्तिक आहे.

## नांदीश्राद्धकाल.

नांदीश्राद्धामध्यें पार्वणें तीन; मातृपार्वण, पितृपार्वण व मातामहपार्वण. ज्या दिवशीं कर्माला आरंभ करावयाचा असेल त्याच्या आदल्या दिवशीं मातृपार्वण करावें; कर्मारंभदिवशीं पितृपार्वण करावें आणि कर्मसमाप्तीच्या दुसऱ्या दिवशीं मातामहपार्वण करावें.

असें होणें शक्य नसल्यास कर्मारंभाच्या पूर्वीचेच जे तीन दिवस त्या तीन दिवसांपैकीं पहिल्या दिवशीं मातृपार्वण, दुसऱ्या दिवशीं पितृपार्वण आणि तिसऱ्या दिवशीं मातामहपार्वण करावें.

हें शक्य नसल्यास कर्मारंभदिवसाच्या आदल्याच दिवशीं पूर्वाह्ण-

समयीं मातृपार्वण, मध्यान्हसमयीं पितृपार्वण व अपराण्हसमयीं मातामहपार्वण करावें.

अशीहि व्यवस्था होणें शक्य नसल्यास कर्मारंभदिवसाच्या आदल्याच दिवशीं पूर्वाण्हांतच तिन्हीं पार्वणें तंत्रानें करावीं.

हेंही होणें शक्य नसल्यास कर्मारंभदिवशींच पूर्वाण्हामध्यें तिन्हीं पार्वणें तंत्रानें करावीं.

## भोजनानंतर व रात्रींही नांदीश्राद्ध.

पुत्रजन्म झाल्यास त्या पुत्राचा जातकर्मसंस्कार करणें अवश्य आहे. पुत्रजन्म पूर्वाण्हसमयींच, दिवसांच किंवा पिता उपोषित असतांनाच होईल असा नियम नाहीं आणि जातकर्मसंस्काराला तर नांदीश्राद्ध अवश्य आहे. ह्यास्तव, पुत्रजन्म झाला असतां पित्यानें जरी पूर्वी भोजन केलेलें असलें आणि रात्रीची वेळ जरी असली तरी नांदीश्राद्ध करावें.

## नांदीश्राद्धार्थ दर्भ व दूर्वा.

यज्ञादि कर्तव्य असतांना अवश्य जें नांदीश्राद्ध त्याकरितां मूलरहित दर्भ हस्तामध्यें धारण करावे. विवाहादि मंगल कर्मांच्या आरंभीं कर्तव्य जें नांदीश्राद्ध त्यावेळीं दर्भांच्या स्थानीं दूर्वा घ्यावा.

## नांदीश्राद्धांतील देव.

अग्न्याधान, सोमयाग इत्यादि संस्कारांकरितां होणारें जें नांदीश्राद्ध त्याचे देव दक्षक्रतु आणि इतर कर्मांकरितां होणाऱ्या नांदीश्राद्धाचे देव सत्यवसू असें कोणी ह्मणतात. गर्भाधान, पुंसवन व सीमन्तोन्नयन ह्या संस्कारांमध्येंहि दक्षक्रतुच असें कोणाचें मत आहे आणि गर्भाधान, पुंसवन, सीमन्तोन्नयन व सोमयाग ह्यांमध्येंच दक्षक्रतु, दुसऱ्या कर्मांमध्यें ते नाहींत असेंही कोणाचें मत आहे.

# नांदीश्राद्धाचे अधिकारी.

पुत्राच्या प्रथम विवाहापर्यंतचे जे सुतसंस्कार त्यांमध्यें नांदीश्राद्ध पित्यानेंच करावें. पहिल्या विवाहानंतर होणाऱ्या पुढल्या विवाहाचें नांदीश्राद्ध ज्याचें त्यानेंच करावें. पित्रादि सर्व अधिकाऱ्यांचा अभाव असल्यास प्रथम विवाहाचेंही नांदीश्राद्ध ज्याचें त्यानेंच करावें. प्रवासादिकामुळें पिता जवळ नसल्यास ज्येष्ठ भ्रात्याला नांदीश्राद्ध करण्याचा प्रसंग येईल. ह्यास्तव, त्यानें आपल्या पित्याच्या पितरांना उद्देशून नांदीश्राद्ध करावें. पिता जिवंत असून पितामह संनिध नसल्यास पिता, प्रपितामह व वृद्ध प्रपितामह ह्यांना उद्देशून पार्वण करावें. मातृपार्वण व मातामहपार्वण ह्यांच्यासंबंधानेंही हाच न्याय समजावा. पिता, माता व मातामह हे सर्व जिवंत असल्यास नांदीश्राद्धाचेंच प्रयोजन नाहीं. सर्व अधिकाऱ्यांचाच अभाव असल्यामुळें मातेलाच जर कन्येचा विवाह करण्याचा प्रसंग आला तर तिनें स्वतः संकल्प करून स्वस्तिवाचन, नांदीश्राद्ध इत्यादि सर्व ब्राह्मणद्वारा करवावें असें प्रयोगपारिजातक ग्रंथांत सांगितलें आहे. समावर्तन संस्काराचेंही नांदीश्राद्ध स्वतःच करावें असें कोणी ह्मणतात. ज्याची माता, पिता व मातामह हीं जिवंत नसतील त्यानें आपल्या अपत्याच्या संस्कारामध्यें स्वतःची माता वगैरेंना उद्देशून तीन पार्वणें करावीं. माता जिवंत असल्यास मातृपार्वणाचा लोप आणि मातामह जिवंत असल्यास मातामहपार्वणाचा लोप. माता व मातामह जिवंत असल्यास केवल पितृपार्वणानेंच नांदीश्राद्धाची सिद्धि होते. पिता व माता जिवंत असल्यास मातामहपार्वणानेंच नांदीश्राद्धाची पूर्तता होते. पिता व मातामह जिवंत असल्यास देवरहित मातृपार्वणानेंच नांदीश्राद्ध होतें. ज्याचा पणजा जिवंत असेल त्यानें पिता, पितामह व वृद्ध प्रपितामह ह्यांना उद्देशून पितृपार्वण करावें. ज्याचा आजा व

पणजा जिवंत असेल त्यानें आपला पिता, वृद्ध प्रपितामह व अति-द्ध प्रपितामह ह्या तिघांना उद्देशून पितृपार्वण करावें. मातृपार्वण व मातामहपार्वण ह्यांविषयींही हाच न्याय समजावा. सापत्न माता मृत असल्यास तिच्यासहितच मातृपार्वण करावें. त्याच-प्रमाणें आपली माता जिवंत असूनही सावत्र आई, सावत्र आजी व सावत्र पणजी ह्या मृत असल्यास आपली आजी व पणजी ह्यांच्यासह सापत्न माता घेतल्यानें मातृपार्वणाचा निर्वाह होतो असें कोणी ह्मणतात. परंतु, तें ह्मणणें बरोबर नाहीं. कारण, सापत्न माता ही एकोद्दिष्ट देवता असल्यामुळें पार्वणामध्यें तिचा प्रवेश होणें शक्य नाहीं. आपली मुख्य मातामही वगैरे जिवंत असल्यास त्यांच्या सव-तींसह मातामहपार्वणाचे वेळीं सपत्नीकत्वाची सिद्धि होते असें कोणी ह्मणतात. तिन्हीं वर्गांतील पहिले जिवंत असल्यास सुतसंस्कारांमध्यें नांदीश्राद्धाचा लोपच होय. त्याचप्रमाणें स्वतःच्या प्रथम विवाहानंत-रच्या विवाहाचें अंग ह्मणून नांदीश्राद्ध करणाऱ्या जीवत्पितृकानें पित्याच्या जनकादिकांना उद्देशून पार्वण करावें. ज्याचा बाप व आजा जिवंत असेल त्यानें आज्याच्या पित्रादिकांना उद्देशून पार्वण करावें. अशा प्रसंगीं पित्याच्या स्थानीं पितामहाचा निर्देश कराव-याचा. मातृपार्वण व मातामहपार्वण ह्यांविषयींही हाच न्याय सम-जावा. जातकर्मनिमित्तक जें पुरुषार्थ नांदीश्राद्ध त्यासंबंधानेंही हाच न्याय समजावा. जातकर्मांगभूत द्वितीय नांदीश्राद्ध आणि पुत्राच्या प्रथमविवाहाच्या अंगभूत असलेलें नांदीश्राद्ध हीं दोन नांदीश्राद्धें सुतसंस्कारांच्या अंगभूत असलेल्या नांदीश्राद्धाप्रमाणेंच करावीं असें एक मत आहे. सुतसंस्कार ह्मणजे विवाह व पुत्रजन्म ह्यांशिवाय इतर सुतसंस्कार. ह्याप्रमाणें प्रथम विवाह आणि पुत्रजन्म ह्यांचे वेळींही येभ्य एव पिता दद्यात् ह्या शास्त्राच्या अनुरोधानेंच नांदी-

श्राद्ध होतें असें दुसरें मत आहे. सुतसंस्कारव्यतिरिक्त कर्मांमध्यें येभ्य एव पिता दद्यात् ह्या शास्त्रावरून पित्याच्या पितामहादिकांना उद्देशून एक पार्वण आणि आपली माता व मातामह जिवंत नसल्यास त्यांच्या उद्देशानें दोन पार्वणें करावीं असें कोणी ह्मणतात. परंतु, तें ह्मणणें बरोबर नाहीं. जेव्हां पितृव्य, मातुल इत्यादिक कन्येचा विवाह, कुमाराचें उपनयन किंवा उपनयन झालेल्याचा प्रथम विवाह करतील तेव्हां संस्कार्य व्यक्तींचा पिता, माता व मातामह जिवंत नसल्यास त्या संस्कार्य व्यक्तीच्याच पित्रादिकांना उद्देशून तीन पार्वणें करावीं. सोदर ज्येष्ठ भ्रात्याला कनिष्ठ भ्रात्याच्या संस्कारासंबंधानें नांदीश्राद्ध करण्याचा प्रसंग आल्यास विशेष कांहीं नाहीं. कारण, त्याचे पित्रादिक आणि संस्कार्य व्यक्तीचे पित्रादिक एकच असतात. सावत्र भाऊ जर ज्येष्ठ असेल तर संस्कार्य व्यक्तीच्या मात्रादिकांना उद्देशून मातृपार्वण करावें असें कोणी ह्मणतात. मातृपार्वणाचा लोपच करावा असेंही कोणाचें मत आहे. चुलत्याला वगैरे नांदीश्राद्ध कर्तव्य झाल्यास सर्व पार्वणांमध्यें "संस्कार्यस्य" असा सविशेषण प्रयोग होणें अवश्य आहे. संस्कार्य व्यक्तीचा पिता, माता व मातामह जिवंत असल्यास त्या संस्कार्य व्यक्तीचा जो पिता त्याच्या पित्रादिकांना उद्देशून तीन पार्वणें होणें अवश्य आहे. त्याचप्रमाणें प्रथम विवाहामध्येंही पिता संनिध नसल्यास व दुसऱ्या कर्त्याचा अभाव असल्यास वरालाच नांदीश्राद्ध करण्याचा प्रसंग प्राप्त होणार. अशा प्रसंगीं जीवत्पितृक वरानें पित्याच्या पित्रादिकांना उद्देशून पार्वण करावें आणि मातृपार्वण व मातामहपार्वण ह्यांसंबंधानेंही हाच न्याय समजावा असेंही कोणी ह्मणतात. परंतु, त्या त्या वर्गांतील प्रथम जिवंत असल्यास त्या त्या पार्वणाचा लोपच करावा असेंही कोणाचें मत आहे.

**आत्मीकृत्य सुवर्णेन परकीयां तु कन्यकाम् ।**
**धर्म्येण विधिना दातुमसगोत्रेऽपि युज्यते ॥**

असें वचन स्कंदपुराणामध्यें आहे आणि

**अनाथां कन्यकां दत्त्वा सदृशेनार्धिके वरे ।**
**द्विगुणं फलमाप्नोति कन्यादाने यदीरितम् ॥**

असें विष्णुधर्मोत्तरवचन आहे. ह्यामुळें अथवा दुसऱ्या कांहीं कारणांमुळें किंवा दानाधिकारी जो असेल त्याला दान करण्याची अडचण असल्याकारणानें तूं ह्या कन्येचें दान कर अशी त्यानें प्रार्थना केल्यामुळें जो दुसऱ्याच्या कन्येचें दान करण्याची इच्छा करीत असतो त्यानेंही संस्कार्य जी कन्या तिच्या पित्रादिकांना उद्देशून किंवा तिचा पिता जिवंत असल्यास तिच्या मात्रादिकांना उद्देशून यथासंभव पार्वणें करावीं. दत्तक पुत्राला जर जनक पित्याचें कांहीं रिक्थ प्राप्त झालें असेल तर त्यानें दोन्ही पिते, दोन्ही पितामह व दोन्ही प्रपितामह ह्यांना उद्देशून पार्वण करावें; इतर पार्वणांचीही व्यवस्था ह्याप्रमाणेंच समजावी. परंतु, जनक पित्याचें रिक्थ घेण्याचा अधिकार नसल्यास ह्मणजे

**गोत्ररिक्थे जनयितुर्न भजेद्दत्रिमः सुतः ।**

( दत्तक पुत्रानें जनक पित्याच्या गोत्राचा व रिक्थाचा स्वीकार करूं नये ) ह्या शास्त्रावरून दत्तक पुत्राला जनक पित्याचें रिक्थ प्राप्त झालें नसल्यास पालक कुलाशींच संबद्ध असलेल्या पित्रादिकांनाच उद्देशून त्यानें नांदीश्राद्ध करावें.

## अंकुरारोपण.

गर्भाधानापासून तों नामकर्मासुद्धां जे संस्कार ते सोडून अन्नप्राशनापासून विवाहसंस्कारासुद्धां जे अपत्य संस्कार आणि नूतनगृहप्रवेशादि इतर शुभ कर्में कर्तव्य असतांना कर्मारंभ दिवसाच्या

पूर्वी सात, पांच, तीन अथवा एक दिवस अंकुरार्पण करावें व तें रात्रीं कल्याणसंज्ञक प्रथम मुहूर्तावर करावें. कारण,

**रात्रौ मुहूर्ते कल्याणे प्रथमेऽङ्कुररोपणम् ।**

असें शौनकवचन आहे.

**ओषधीनां हि सर्वासां चन्द्रः प्रोक्तोऽधिदैवतम् ।**
**तस्मात्सर्वप्रयत्नेन रात्रावङ्कुररोपणम् ।**

असेंही शौनकवचनच आहे. सर्व ओषधींचा अधिपति चंद्र असल्यामुळें सर्व प्रयत्नानें रात्रींच अंकुरारोपण करावें असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. अति नर्डाचें मंगलकार्य असल्यास ह्मणजे कार्य करण्याचें ठरल्यापासून तें होण्याला एकाद्या दिवसाचाही अवकाश नसल्यास कर्मारंभदिवशीं दिवसांही अंकुरारोपण करावें असेंही

**आत्यन्तिकेषु कार्येषु सद्योऽह्नयङ्कुररोपणम् ।**

ह्या बृहस्पतिवचनावरून कोणी ह्मणत असतात.

**निषेकं गर्भसंस्कारं जातकर्म च नाम च ।**
**हित्वाऽङ्कुरारोपणं स्यादन्यत्र शुभकर्मसु ॥**

असें शौनकवचन आहे आणि त्या वचनाचें तात्पर्य गर्भाधान, गर्भसंस्कार, जातकर्म व नामकर्म हीं सोडून इतर शुभ कर्में कर्तव्य असतांना अंकुरारोपण करावें-असें आहे. हें अंकुरारोपण करण्याचा आचार सर्वत्र दिसत नाहीं.

## उपनयनकाल.

वसन्ते ब्राह्मणमुपनयीत ग्रीष्मे राजन्यं शरदि वैश्यम्

अशी श्रुति आहे. आश्वलायनसूत्रामध्यें

उदगयन आपूर्यमाणपक्षे कल्याणे नक्षत्रे चौलकर्मोपनयनगोदानविवाहाः

असें सांगितलें आहे. कल्याणनक्षत्र ह्मणजे ज्योतिःशास्त्रानें उक्त असलेलें नक्षत्र असें वृत्तिकाराचें ह्मणणें आहे.

**माघादिशुक्रान्तकपञ्चमासाः साधारणा वा सकलद्विजानाम्**

असें वचन गर्ग मुनींचें आहे. माघादि पांच मास सर्व द्विजांना उपनयनाविषयीं साधारण उक्त आहेत असा ह्या वचनाचा आशय आहे. माघादि पांच महिने जरी उपनयनाला प्रशस्त सांगितले आहेत तरी मीनराशीला सूर्य गेल्यापासून तों मिथुनराशीला जाईपर्यंतचा काल प्रशस्त होय. कारण, त्या कालामध्यें वसंत ऋतु सांपडतो.

**मीनमेषयोर्मेषवृषयोर्वा वसन्तः**

असें बौधायनसूत्र आहे. शिवाय,

**मृगकुम्भगते भानौ मध्यमं मीनमेषयोः ।**
**उत्तमं गोयुगस्थेऽर्के ह्यधमं चोपनायनम् ॥**

ह्या बृहस्पतिवचनामध्यें "मकर व कुंभ संक्रांति असतांना उपनयन करणें मध्यम, मीन व मेष संक्रांति असतांना उपनयन उत्तम व वृषभ आणि मिथुन संक्रांति असतांना उपनयन करणें अधम" असें सांगितलें आहे. चैत्रामध्यें मीन संक्रांति हा तर उपनयनाला अति उत्तम काल होय. हा काल असल्यास इतर कालदोषांकडे लक्ष्य देण्याचें मुळींच कारण नाहीं. असें सांगणारीं स्मृतिवचनें पुष्कळ आहेत. त्यांपैकीं कांहींचा उल्लेख येथें करितों.

**गोचराष्टकवर्गाभ्यां गुरुशुद्धिर्न लभ्यते ।**
**तद्वोपनयनं कार्यं चैत्रे मीनगते रवौ ॥ १ ॥**
**शुक्रे नष्टे तथाजीवे दुर्बले चन्द्रभास्करे ।**
**व्रतोपनयनं कार्यं चैत्रे मीनगते रवौ ॥ २ ॥**

अशीं बृहस्पतिवचनें आहेत. गोचर व अष्टक वर्ग ह्यांनीं गुरुबल येत नसल्यास चैत्रांत मीन संक्रांति असतांना उपनयन करावें १. शुक्र व गुरु ह्यांचें अस्त असतांना व त्याचप्रमाणें रविचंद्रांचें बल नसतांनाही मीन राशीस सूर्य असतांना चैत्रांत उपनयन करावें २. असा ह्या वचनांचा आशय आहे.

**जन्मभाद्दुष्टगे सिंहे नीचे वा शत्रुगे गुरौ ।**
**मौंजीबन्धः शुभः प्रोक्तश्चैत्रे मीनगते रवौ ॥ १ ॥**

असें वचन मौंजीपटलामध्यें आहे. "जन्मलग्नापासून गुरु अनिष्ट स्थानीं असतांना, सिंह राशीस असतांना, नीच स्थानीं असतांना अथवा षष्ठ स्थानीं असतांना चैत्रांत मीन संक्रांति असल्यास मौंजी-बंध शुभ सांगितला आहे" असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे.

ज्येष्ठ महिन्यांत ज्येष्ठ पुत्राचें उपनयन करूं नये. केल्यास तें मृत्युप्रद होतें असें गर्गवचन आहे.

विवाह व उपनयन ह्यांविषयीं जन्ममास वर्ज्य करावा असें एक स्मृतिवचन आहे.

## उपनयनाला योग्य तिथि.

**तृतीया पञ्चमी षष्ठी द्वितीया वाऽपि सप्तमी ।**
**पक्षयोरुभयोश्चैव विशेषेण सुपूजिताः ॥**
**धर्मकामौ सिते पक्षे कृष्णे च प्रथमा तथा ।**
**कृष्णे त्रयोदशीं केचिदिच्छन्ति मुनयस्तथा ॥**
**द्वादश्यैकादशी चैव मध्यमे च प्रचक्षते ॥**

अशीं नृसिंहवचनें ज्योतिर्निबंधांत आहेत. द्वितीया, तृतीया, पंचमी, षष्ठी व सप्तमी ह्या दोन्ही पक्षांतील तिथि विशेषतः प्रशस्त होत. शुक्ल पक्षांतील दशमी व त्रयोदशी आणि कृष्णपक्षांतील प्रतिपदा व त्रयोदशी ह्याही प्रशस्त असें कोणी ह्मणतात. द्वादशी दोन्ही पक्षांतील उक्त असेंही कोणाचें ह्मणणें आहे. तथापि, मुलाचें वय जास्त जाहलें असल्यास कृष्णपक्षांतील प्रतिपदा, द्वादशी व त्रयो-दशी ह्या तिथि ग्राह्य समजाव्यात.

**त्रयोदश्यादिचतुष्कं सप्तम्यादित्रयं चतुर्थी च ।**
**अष्टौ गलग्रहास्त्याज्या गर्गस्य मते तथा षष्ठी ॥**

"त्रयोदशीपासून चार, सप्तमीपासून तीन आणि चतुर्थी ह्या

आठ तिथींना गलग्रह ह्मणतात. गर्गांच्या मतानें षष्ठीही गलग्रहच होय.' असें तात्पर्य आहे.

अनध्यायाच्या मागचा व पुढचा दिवस हे उपनयनाला वर्ज्य होत. सोपपदा तिथि उपनयनाला वर्ज्य सांगितल्या आहेत. ज्येष्ठ शुक्ल द्वितीया, आश्विन शुद्ध दशमी आणि माघशुक्लपक्षांतील द्वादशी व चतुर्थी ह्या तिथि सोपपदा होत.

## उपनयनाला योग्य वार.

गुरुशुक्रबुधानां तु वाराः श्रेष्ठतमाः स्मृताः ।
अधमः सोमवारस्तु सूर्यवारस्तु मध्यमः ॥
वारौ मन्दारयोर्वर्ज्यौ कृष्णे वर्ज्यो निशापतेः ।
अस्तं गतस्य सौम्यस्य वारो वर्ज्यो द्विजन्मनाम् ॥

असें नारद स्मृतीमध्यें सांगितलेलें आहे. बुधादि तीन वार श्रेष्ठ, रविवार मध्यम व सोमवार कनिष्ठ, मंगल व शनि हे वार वर्ज्य; कृष्ण पक्षांतील सोमवारही वर्ज्य आणि बुध अस्तंगत असल्यास त्याचाही वार वर्ज्य. असें ह्या वचनांचें तात्पर्य आहे.

सर्वेषां जीवशुक्रज्ञवाराः प्रोक्ता व्रते शुभाः ।
चन्द्रार्कौ मध्यमौ ज्ञेयौ सामबाहुजयोः कुजः ॥
शाखाधिपतिवारश्च शाखाधिपबलं तथा ।
शाखाधिपतिलग्नं च दुर्लभं त्रितयं व्रते ॥

अशीं स्मृतिवचनें आहेत. बुधादि तीन वार सर्वांनाच उपनयनाविषयीं शुभ होत. रवि व चंद्र मध्यम. सामवेदी व क्षत्रिय ह्यांना मंगळवार उत्तम. शाखाधिपतीचा वार, शाखाधिपतीचें लग्न आणि शाखाधिपतीचें बल हीं तीन उपनयनाविषयीं दुर्लभ होत. शाखाधिपति ह्मणजे वेदाधिपति. गुरु, शुक्र, मंगल व बुध हे अनुक्रमें ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद ह्यांचे अधिपति होत.

शाखाधिपे बलिनि केन्द्रगते च मौञ्जी-
बन्धस्तदीयदिवसेषु शुभाय क्लृप्तः ।
अस्मिन्बलेन रहिते तु पुनर्द्विजानां
स्याद्वर्णसंकर इति प्रवदन्ति तज्ज्ञाः ॥

असें वृद्ध गार्ग्यवचन मदनरत्नग्रंथांत घेतलें आहे. शाखाधिपति बली व केंद्रीं असल्यास त्याच्या दिवसावर उपनयन शुभकारक होतें; नाहीं तर तें वर्णसंकराला कारण होतें असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे;

सदाऽनुकूले चैकस्मिन्वर्णेशे बलशालिनि ।
ब्राह्मणादेः प्रकुर्वीत कुमारं व्रतचारिणम् ॥
पती सितेज्यौ विप्राणां नृपाणां कुजभास्करौ ।
वैश्यानां शशभृत्सौम्याविति वर्णाधिपाः स्मृताः ॥

अशीं पराशरवचनें आहेत. एक वर्णाधिपति बलाढ्य व अनुकूल असल्यास ब्राह्मणादिकांच्या पुत्रांचें उपनयन करावें. गुरुशुक्र हे ब्राह्मणांचे, रविमंगल हे क्षत्रियांचे व चंद्रबुध हे वैश्यांचे वर्णाधिपति होत.

बालस्य बलहीनोऽपि शान्त्या जीवो बलप्रदः ।
यथोक्तवत्सरे कार्यमनुक्ते नोपनायनम् ॥

असें नारदवचन आहे. गुरुबल नसल्यास शांति करावी; परंतु, उपनयनाला उक्त असलेलें वर्ष टळूं देऊं नये असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. तथापि कांहींचे मत वेगळें आहे, परंतु, उक्त संवत्सराचें अतिक्रमण होऊं देऊं नये ह्या विषयीं बहुमत आहे.

धनुर्मीनकुलीरस्थो जीवो जन्मान्त्यमृत्युगः ।
अतिसौख्यं बटोः कुर्याद्वसिष्ठवचनं यथा ॥

असें भरद्वाजवचन आहे. वृश्चिक, धनु व मीन ह्या राशींत असलेला गुरु जन्म, अष्टम अथवा द्वादश स्थानीं असला तरी बटूला सुखकारक होतो असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे.

# उपनयनास योग्य नक्षत्रें.

श्रेष्ठान्यर्कत्रयान्त्येज्यचन्द्रादित्युत्तराणि च ।
विष्णुत्रयाश्विमित्राब्जयोनिभान्युपनायने ॥

असें नारदवचन आहे. रेवती, अश्विनी, रोहिणी, मृग, पुनर्वसु, पुष्य, तीन उत्तरा, हस्तादि तीन, अनुराधा, श्रवण, धनिष्ठा आणि शततारका हीं नक्षत्रें प्रशस्त होत.

त्रिषूत्तरेषु रोहिण्यां हस्ते मैत्रे च वासवे ।
त्वाष्ट्रे सौम्यपुनर्वस्वोरुत्तमं ह्युपनायनम् ।

असें बृहस्पतिवचन आहे. रोहिणी, मृग, पुनर्वसु, तीन उत्तरा, हस्त, चित्रा, अनुराधा आणि धनिष्ठा ह्यांवर अपनयन उत्तम.

मूले हस्तत्रये सार्पे शैवे पूर्वात्रये तथा ।
ऋग्वेदाध्यायिनां शस्तं मेखलाबन्धनं बुधैः ॥
पुष्ये पुनर्वसौ पौष्णे हस्ते मैत्रे शशाङ्कगे ।
ध्रुवेषु च प्रशस्तं स्याद्यजुषां मौञ्जिबन्धनम् ॥
पुष्यवासवहस्ताश्विशिवविष्णूत्तरात्रयम् ।
प्रशस्तं मेखलाबन्धे वटूनां सामवेदिनाम् ॥
मृगमैत्राश्विनीहस्तरेवत्यदितिवासवम् ।
अथर्ववेदिनां शस्तो भगणोऽयं व्रतार्पणे ॥

अशीं वचनें ज्योतिर्निबंधांत आहेत. ऋग्वेद्यांना उपनयनाविषयीं आर्द्रा, आश्लेषा, हस्त, चित्रा, स्वाती, तीन पूर्वा व मूळ हीं प्रशस्त होत; यजुर्वेद्यांना रोहिणी, मृग, पुनर्वसू, पुष्य, तीन उत्तरा, हस्त, च अनुराधा हीं प्रशस्त होत; सामवेद्यांना आश्विनी, आर्द्रा, पुष्य, हस्त, ज्येष्ठा, तीन उत्तरा व श्रवण हीं प्रशस्त होत आणि अथर्ववेद्यांना रेवती, अश्विनी, मृग, पुनर्वसू, हस्त अनुराधा व ज्येष्ठा हीं प्रशस्त होत.

वेदोक्त नक्षत्र न मिळाल्यास भरणी, कृत्तिका, मघा, विशाखा,

ज्येष्ठा व शततारका हीं नक्षत्रें ध्याज्यीं असें सारसमुच्चयांत सांगितलें आहे. वैधृति, व्यतिपात, परिघाचा पहिला अर्धा भाग, विष्कंभ व वज्र ह्यांच्या पहिल्या तीन घटिका, व्याघाताच्या नऊ घटिका, शूलाच्या पांच घटिका आणि गंड व अतिगंड ह्यांच्या सहा सहा घटिका शुभ कार्याविषयीं वर्ज्य होत.

शकुनि व विष्टि हीं करणें वर्ज्य करावीं.

उपनयन पूर्वाण्हामध्यें मुख्य, मध्यान्हसमयीं मध्यम व अपराण्हामध्यें अधम.

ग्रहण, भूकंप, धूमकेतु, उल्कापात इत्यादि दोष प्राप्त झाल्यास कोणाच्या मतानें दहा दिवस व कोणाच्या मतानें तेरा दिवस उपनयन करूं नये असें गर्गवचन आहे. परंतु, संकट असल्यास तीन दिवस तरी वर्ज्य करावें असें चंडेश्वराचें ह्मणणें आहे.

हे काल पुष्कळ सांगितले आहेत. तथापि, ज्याच्या सूत्रांत जो काल सांगितला असेल तो त्याला मुख्य होय.

## उपनयनाधिकारी.

**पिता पितामहो भ्राता ज्ञातयो गोत्रजाग्रजाः ।**
**उपनायेऽधिकारी स्यात्पूर्वाभावे परः परः ॥**

असें वचन वृद्धगर्गस्मृतीमध्यें आहे. "बाप, आजा, भाऊ, ज्ञाती, गोत्रज व ब्राह्मण हे उपनयन करणारे अधिकारी होत; पहिल्या पहिल्याच्या अभावीं पुढला पुढला असें समजावें" हें तात्पर्य होय.

**पितैवोपनयेत्पुत्रं तदभावे पितुः पिता ।**
**तदभावे पितुर्भ्राता तदभावे तु सोदरः ॥**

ह्याचा अर्थ सुलभ आहे.

पिता जर अविद्वान् असेल तर उपनयन विद्वान् ब्राह्मणानें करावें. उपनयन करणारा ब्राह्मण कसा असावा हें शौनक महर्षींनीं

**कुमारस्योपनयनं श्रुताभिजनवृत्तवान् ।**
**तपसा धूतनिःशेषपाप्मा कुर्याद्द्विजोत्तमः ॥**

ह्या वचनांत सांगितलें आहे. विद्या, कुल व आचरण ह्यांनीं संपन्न आणि तपाच्या योगानें निष्पाप झालेल्या ब्राह्मणानें कुमाराचें उपनयन करावें.

व्यास महर्षींनीं उपनयनकर्ता कसा असावा हें

**वेदैकनिष्ठं धर्मज्ञं कुलीनं श्रोत्रियं शुचिम् ।**
**स्वशाखाढ्यमनालस्यं विप्रं कर्तारमीप्सितम् ॥**

ह्या वचनानें दर्शविलें आहे. केवल वेदाविषयींच तत्पर, धर्मज्ञ, कुलीन, श्रोत्रिय, शुचि, परंपरागत प्राप्त झालेल्या वेदशाखेचें अध्ययन केलेला आणि निरलस असा विप्र उपनयनकर्ता असणें इष्ट आहे असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे.

ज्याला उपनयन करावयाचें असेल त्यानें व ज्याचें उपनयन व्हावयाचें असेल त्यानें तीन तीन कृच्छ्रें प्रायश्चित्त अधिकार प्राप्त होण्याकरितां केलें पाहिजे असें

**कृच्छ्रत्रयं चोपनेता त्रीन्कृच्छ्रांश्च बटुश्चरेत्**

ह्या बृहद्विष्णुस्मृतींतील वचनांत सांगितलें आहे.

गायत्र्युपदेशाचा अधिकार प्राप्त होण्याकरितां अग्निपवित्रांचा जप करून बारा हजार गायत्रीजप करावा असें

**सावित्रीमभ्यसेदग्निपवित्राणि च संस्मरन् ।**
**गुरुर्द्वादशसाहस्रां सावित्रीं प्रजपेत्ततः ।**
**स्वाधिकारार्थमेवास्याः प्रदानार्थं हि तत्स्मृतम् ॥**

ह्या बृहद्विष्णुस्मृतींत सांगितलें आहे.

## गायत्रीजप कोणी करावा ?

गायत्रीचा उपदेश करण्याचा अधिकार प्राप्त होण्याकरितां कर्त्यानें बारा हजार गायत्रीजप करावा असें वरील वचनांत सांगितलें आहे.

परंतु, हा जपही पुष्कळ लोक ब्राह्मणद्वाराच करवीत असतात. वस्तुतः विचार केला असतां मानासिक दोषांचें निरसन होऊन बुद्धि शुद्ध होण्याकरितां जो जप सांगितलेला आहे तो ब्राह्मणद्वारा केल्यानें कर्त्याच्या मनाची शुद्धि होणार कशी? उन्माद रोग हा मानसिक व्याधि आहे. ज्याला हा मानसिक व्याधि झाला असेल त्यानें स्वतः औषध न घेतां प्रतिनिधिद्वारा औषध घेतल्यानें त्याचा उन्माद रोग नाहींसा होणें ज्याप्रमाणें असंभवनीय होय त्याचप्रमाणें स्वतःला अधिकार प्राप्त होण्याकरितां अवश्य जो जप तो ब्राह्मणद्वारा करविल्यानें अधिकार प्राप्त होणें असंभवनीय आहे. जप करणारा ब्राह्मण आचारसंपन्न व मंत्रांतील सर्व अक्षरें प्रत्येक वेळां उच्चारिलीं गेलीं आहेत किंवा नाहींत ही काळजी बाळगणारा पाहिजे. सांप्रत, जप, एकादशिनी इत्यादि ब्राह्मणद्वारा करविणें ह्मणजे जवळ जवळ त्या अनुष्ठानाची थट्टाच करण्यासारखें आहे. शिवाय, जपाची व एकादशिनीची दक्षिणा शंभर वर्षांपूर्वींचीच सांप्रत ( चौपट पांचपट महागाई झाली असूनही ) कायम असल्यामुळें ब्राह्मणांच्या हांतून जप वगैरे नीट होणें शक्यही नाहीं.

## उपनयनाकरितां मंडप.

मंडपाला चार द्वारें करावीं व तो औरस चौरस सोळा हात, बारा हात, अगर आठ हात असावा. हीं प्रमाणें घरांच्या मानानें समजावीं. घर मोठें असल्यास सोळा हात मंडप, मध्यम असल्यास बारा हात व लहान असल्यास आठ हात. मंडप घराच्या द्वाराशीं करावा. घराच्या द्वाराशीं मंडप केल्यास वेदि ( ह्मणजे बहुले ) मंडपाच्या बाहेर.

**आचार्यस्य पदैः षड्भिश्चतुर्भिरथ वा पदैः ।**
**आयामविस्तारवती बटोर्वेदी करोन्नता ॥ १ ॥**

लम्बा भित्तिर्द्विहस्ता स्यादुन्नता त्रिदशाङ्गुला ।
प्रत्यग्वेद्यां च सा कार्या विस्ताराद्द्वादशांगुला ॥ २॥
अष्टावष्टौ प्रकुर्वीत सोपानान्यथ पार्श्वयोः ।
तन्मध्ये कलशाकारमिति यज्ञविदां मतम् ॥ ३ ॥

अशीं वचनें संग्रहांत आहेत. परंतु, ह्या वचनाप्रमाणें सांप्रत कोणी वेदि करीत नाहींत. विवाहाच्या वेदीप्रमाणें वेदि करितात.

## मातृभोजन.

मात्रा सहोपनयने विवाहे भार्यया सह ।
अन्यत्र सहभुक्तिश्चेत्पातित्यं प्राप्नुयान्नरः ॥

असें वचन संग्रहांत आहे. "उपनयनामध्यें मातेसह व विवाहामध्यें भार्येसह भोजन करावें. ह्याशिवाय, सहभोजन करणारा पुरुष पतित होतो " असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. मातेसह भोजन उपनयनामध्यें विहित आहे; ह्मणून उपनयनसंस्कार संपेपर्यंत जितकीं भोजनें होतील तितकीं मातेसह करावीं असें समजूं नयें.

## मेखलादिधारण.

मेखलामजिनं दण्डमुपवीतं च सर्वदा ।
कटिसूत्रं च कौपीनं ब्रह्मचारी तु धारयेत् ॥

असें वचन आहे. ह्यावरून "ब्रह्मचाऱ्यानें मेखला, अजिन, दंड, यज्ञोपवीत, कटिसूत्र व कौपीन हीं सर्व धारण करावीं" असें ठरत आहे. मेखला ह्मणजे मोळाची अथवा दुसऱ्या उक्त वस्तूची तिपेडी वळलेली दोरी. अजिन ह्मणजे कातडें व कौपीन ह्मणजे लंगोटी.

सांप्रत विवाह झालेले कांहीं कांहीं गृहस्थाश्रमी पुरुष कटिसूत्र बांधीत असतात. परंतु,

गृहस्थः कुरुते कर्म वैदिकं वाऽथ तान्त्रिकम् ।
कटिबन्धनसंयुक्तं तत्सर्वं निष्फलं भवेत् ॥

असें वचन असल्यामुळें गृहस्थानें कटिबंधन करूं नयें असें ठरतें.

# यज्ञोपवीत.

**कार्पासमुपवीतं स्याद्विप्रस्योर्ध्ववृतं त्रिवृत् ।**

असें मनुवचन आहे. ह्यावरून कापसाचें जानवें असावें असें ठरतें. तथापि,

**कार्पासक्षौमगोवालशाणवल्कतृणादिकम् ।**
**यथा संभवतो धार्यमुपवीतं द्विजातिभिः ॥**

असें वचन देवलस्मृतीमध्यें आहे. ह्यावरून कापूस, ताग, अंबाडा, गाईचे केस, झाडाची त्वचा, तृण इत्यादिकही यज्ञोपवीताकरितां ग्राह्य आहेत. ब्राह्मणाला कार्पासोपवीत मुख्य होय.

# यज्ञोपवीतनिर्माणप्रकार.

**त्रिवृदूर्ध्ववृतं कुर्यात्तन्तुत्रयमधोवृतम् ।**
**त्रिवृतं तूपवीतं स्यात्तस्यैको ग्रन्थिरिष्यते ॥**

असें वचन भृगुस्मृतीमध्यें आहे. वृत ह्मणजे वळलेलें. ह्या वचनाचा अर्थ नीट लक्ष्यांत येण्याकरितां ऊर्ध्ववृत आणि अधोवृत ह्या शब्दांचे अर्थ समजले पाहिजेत.

**करेण दक्षिणेनोर्ध्वं गतेन त्रिगुणीकृतम् ।**
**वलितं ब्राह्मणैः सूत्रं शास्त्र ऊर्ध्ववृतं स्मृतम् ॥**

अशी ऊर्ध्ववृत शब्दाची व्याख्या संग्रहकारानें दिली आहे. काढिलेल्या सुताची तिस्ती करून पीळ घालावयाचा. तो पीळ उताण्या डाव्या हातावर टोक ठेऊन व त्यावर पालथा उजवा हात वर नेऊन घालावयाचा, ह्मणजे ऊर्ध्ववृत होतें. ह्या पिळाला बाहेरचा पीळ असें ह्मणतात. अधोवृत ह्मणजे ह्याच्या उलट. अर्थात् उजवा हात वर नेण्याच्या ऐवजीं खालीं खालीं आणावयाचा. ह्या पिळाला आंतला पीळ असें ह्मणतात. "सूत काढिल्यानंतर तें त्रिगुणित करून आंतील पीळ घालावा; ह्मणजे यज्ञोपवीत होतें. त्याला एक गांठ देणें इष्ट आहे." हा भृगुवचनाचा आशय होय.

## जानवें कोणतें अग्राह्य.

" विधवेनें केलेलें, अनध्याय असतांना केलेलें, तुटलेलें, कमरे-खालीं गेलेलें आणि भोजनानंतर केलेलें जानवें टाकून द्यावें." असें

विधवारचितं सूत्रमनध्यायकृतं च यत् ।
विच्छिन्नं चाप्यधो यातं भुक्त्वा निर्मितमुत्सृजेत् ॥

ह्या देवलवचनांत सांगितलें आहे.

## यज्ञोपवीतें कोणी किती घालावीं.

उपवीतं बटोरेकं द्वे तथेतरयोः स्मृते ।
एकमेव यतीनां स्यादिति शास्त्रविनिश्चयः ॥

असें देवलवचन आहे व त्याचा अर्थ " ब्रह्मचाऱ्यानें एक जानवें घालावें; गृहस्थ व वानप्रस्थ ह्यांनीं दोन घालावीं आणि त्रिदंडी संन्याशानें एक घालावें असा शास्त्रनिश्चय आहे."

## उपवीतनिर्माण व उपवीतधारण.

बौधायनसूत्रामध्यें उपवीतनिर्माणाचा व उपवीतधारणाचा विधि सांगितला आहे. तो येणेप्रमाणें:—

अथातो यज्ञोपवीतक्रियां व्याख्यास्यामो ब्राह्मणेन तत्कन्यया वा कृतं सूत्रमानीय भूरिति प्रथमां षण्णवतिं मिनोति भुव इति द्वितीयां सुवरिति तृतीयां मीत्वा पलाशपत्रे संस्थाप्यापोहिष्ठेति तिसृभिर्हिरण्यवर्णाः शुचयः पावका इति चतसृभिः पवमानः सुवर्जन इत्येतेनानुवाकेन सावित्र्याचाभिषिक्तं वामहस्ते कृत्वा त्रिः संताड्य भूरग्निं चेत्येतैस्त्रिभिर्वलितं कृत्वा भूर्भुवः स्वश्चन्द्रमसं चेत्येतेन ग्रन्थिं कृत्वोंकारमग्निं नागान्सोमं पितॄन्प्रजापतिं वायुं सूर्यं विश्वान्देवान्नवतन्तुषु क्रमेण विन्यस्य संपूजयेद्देवस्य त्वेत्युपवीतमादायोद्वयं तमसस्परीत्यादित्याय दर्शयित्वा यज्ञोपवीतं परमं पवित्रं प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात्

**आयुष्यमग्र्यं प्रतिमुञ्च शुभ्रं यज्ञोपवीतं बलमस्तु तेज इति धारयेदित्याह भगवान्बौधायनः ।**

ह्याचें तात्पर्य येणेंप्रमाणें:—"आतां यज्ञोपवीतक्रिया सांगतों. ब्राह्मणानें किंवा ब्राह्मणाच्या कन्येनें काढिलेलें सूत आणून भूः या मंत्रानें पहिली शहाण्णवी मोजावी; भुवः ह्या मंत्रानें दुसरी शहाण्णवी मोजावी; आणि सुवः या मंत्रानें तिसरी शहाण्णवी मोजावी. नंतर पळसाच्या पानावर जानवें ठेवावें. तदनंतर आपोहिष्ठा ह्या तीन ऋचांनीं, हिरण्यवर्णाः ह्या चार ऋचांनीं, पवमानः सुवर्जनः ह्या अनुवाकानें आणि गायत्रीमंत्रानें त्यावर अभिषेक करून तें डाव्या हातावर घ्यावें. नंतर त्याला तीन वेळ ताडन करावें. तदनंतर भूरग्नि च ह्या तीन मंत्रानीं त्याला पीळ घालावा. तदनंतर भूर्भुवःस्वश्चन्द्रमसं च ह्या मंत्रानें गाठ मारावी. नंतर नऊ तंतूंचे ठिकाणीं क्रमानें ओंकार, अग्नि, नाग, यम, पितर, प्रजापाति, वायु, सूर्य, व विश्वेदेव ह्यांचा न्यास करून यज्ञोपवीताचें पूजन करावें. नंतर देवस्य त्वा ह्या मंत्रानें उपवीत घेऊन उद्वयं तमसस्परि ह्या मंत्रानें तें सूर्याला दाखवावें आणि नंतर यज्ञोपवीतं परमं० मस्तु तेजः ह्या मंत्रानें तें धारण करावें. असें भगवान् बोधायन ऋषींचें ह्मणणें आहे." यज्ञोपवीतमंत्र दुसरीकडे अर्थासह दिलेला आहे. त्यावरून ह्या बौधायनसूत्राचा अर्थ अधिक व्यक्त होईल. ह्या बोधायनसूत्रांत सांगितल्याप्रमाणें यज्ञोपवीत होण्याचा संभव नसल्यास देवलमहर्षींनींही एक प्रकार सांगितला आहे. तो येणेंप्रमाणें:—

**ग्रामान्निष्क्रम्य संख्याय षण्णवत्यङ्गुलीषु तत् ।**
**तावत्त्रिगुणितं सूत्रं प्रक्षाल्याब्लिङ्गकैस्त्रिभिः ॥ १ ॥**
**देवागारेऽथ वा गोष्ठे नद्यां वाऽन्यत्र वा शुचौ ।**
**सावित्र्या त्रिवृतं कुर्यान्नवतन्तु तु तद्भवेत् ॥ २ ॥**
**कार्पासं त्रिवृतं श्लक्ष्णं निदध्याद्वामहस्तके ।**
**सावित्र्या दशकृत्वोऽद्भिर्मन्त्रिताभिस्तदुक्षयेत् ॥ ३ ॥**

हरिब्रह्मेश्वरेभ्यश्च प्रणम्य परिपूज्य च ।
यज्ञोपवीतमिति वा व्याहृत्यावाऽपि धारयेत् ॥ ४ ॥

ह्या वचनाचें तात्पर्य येणेंप्रमाणें:—"गावाबाहेर जाऊन डाव्या हाताचीं चार बोटें उदक सोडितेवेळीं जशीं जुळलेलीं असतात तशीं जुळावीं. आणि काढिलेलें सूत त्या चार अंगुलींच्या भोंवतीं शहाण्णव वेढे गुंडाळावें. शहाण्णव वेढे झाल्यानंतर जें सूत चातीला अथवा दुसऱ्या कशाला अवशिष्ट राहिलेलें असेल तें न तोडितां दुहेरी करितेवेळीं आपण जसें वस्त्र परत फिरवितों तसें परत फिरवावें; ह्मणजे डाव्या हाताच्या चार बोटांना गुंडाळलेलें सूत हळूंहळूं मोकळें करून त्या मोकळ्या होत जाणाऱ्या सुताशीं ह्या मुरडून घेतलेल्या सुताचा संयोग करून सूत न तुटूं देतां डाव्या हाताला गुंडाळलेलें सूत संपेपर्यंत दुहेरी करावें नंतर तसेंच पुनरपि तिहेरी करावें. तदनंतर धागा एकच असतांना शहाण्णव चवंगे लांबीची तिस्ति झाल्यानंतर, आपोहिष्ठा ह्या तीन मंत्रांनीं तिचें प्रक्षालन करावें. नंतर देवालयांत गोठ्यांत, नदीवर अथवा दुसऱ्या शुद्ध ठिकाणीं पुनरपि तें गायत्रीमंत्रानें त्रिगुणित करावें. ह्मणजे तें सूत नऊपदरीं होईल. असें नऊ पदरीं झालेलें व पीळ घातलें गेलेलें जें कापसाचें सूत त्याची तीनपदरी माळ [illegible]नी व दोन टोंकानीं ते तीन पदर आंत घेऊन गांठ मारावी. तदनंतर दहा वेळ गायत्री मंत्र ह्मणून अभिमंत्रित केलेल्या उदकानें तें प्रोक्षण करावें आणि विष्णु, ब्रह्मा व शिव ह्यांना प्रणाम करून व त्यांचें (मनानें) पूजन करून यज्ञोपवीतं ह्या बौधायनसूत्रोक्त मंत्रानें किंवा व्याहृतिमंत्रानें तें धारण करावें."

हें तात्पर्य लक्षांत घेतलें असतां जानवें कसें करावें हें समजेल. सूत काढण्यापासून तों गांठ मारून यज्ञोपवीत तयार होईपर्यंत सर्व कांहीं अमंत्रकच करावें. तदनंतर गायत्रीमंत्रानें अथवा आपोहिष्ठा ह्या

मंत्रांनीं उदक अभिमंत्रित करून त्या उदकाच्या योगानें गायत्री-मंत्रानेंच दहा वेळां त्या यज्ञोपवीतावर अभ्युक्षण करावें आणि नंतर यज्ञोपवीतं ह्या मंत्रानें अथवा व्याहृतींनीं तें धारण करावें असें स्मृत्यर्णव ग्रंथांत सांगितलें आहे. कौषीतकि शाखेमध्यें यज्ञोपवीतधारणमंत्र

**यज्ञोपवीतेनोपव्ययामि दीर्घायुत्वाय सुप्रजास्त्वाय सुवीर्याय सर्वेषां वेदानामाधिपत्याय यशसे ब्रह्मवर्चसाय**

असा सांगितला आहे. यज्ञकर्मनिष्ठ द्विज ज्याला परमात्मा असें ह्मणतात त्याचें हें उपवीत असल्यामुळें यज्ञोपवीत ही संज्ञा ह्याला प्राप्त झाली आहे असें स्मृतिसारांतील

**यज्ञाख्यः परमात्मा य उच्यते चैव होतृभिः ।**
**उपवीतं ततोऽस्येदं तस्माद्यज्ञोपवीतकम् ॥**

ह्या वचनांत सांगितलें आहे. स्मृतिसारग्रंथामध्यें यज्ञोपवीतासंबंधानें फारच महत्वाचा मजकूर आहे. तो येणेंप्रमाणें :—

**ज्ञातृविज्ञेययोरैक्यमविजानन्द्विजोत्तमः ।**
**न त्यजेदात्मनः सूत्रं ब्राह्मं ब्रह्मविनिर्मितम् १**
**सिसृक्षुरेक पत्राग्रे समासीनः शिवः स्वयम् ।**
**दृष्ट्वा गुणमयीं मायां सूत्ररूपामिवाकरोत् २**
**तया तदात्मकं विष्णुं सृष्ट्वा पालं दिवौकसाम् ।**
**स्वयं ब्रह्माऽभवद्रुद्रो रुद्रश्चास्य क्षयाय सः ३**
**ज्ञानात्मकेन हरिणा ब्रह्मात्मनि शिवेऽव्यये ।**
**तत्सूत्रमुपवीतत्वाद्ब्रह्मसूत्रमिति स्मृतम् ४**
**यज्ञेन चोपवीतत्वाद्यज्ञसूत्रं विदुर्बुधाः ।**
**तदाज्ञयाऽऽवृतत्वाच्च ब्रह्मणा ब्रह्मसूत्रकम् ५**
**तावल्लोकास्त्रयो वेदास्त्रयो देवास्त्रयोऽग्नयः ।**
**शिवसृष्टास्त्रयो वर्णास्त्रिवृत्सूत्रं समाश्रयेत् ६**
**तद्ग्रन्थ्यग्रं च सावित्री वेदमाता शिवाज्ञया ७**
**एवं द्वादशदैवत्यं ब्रह्मसूत्रं द्विजन्मनाम् ।**

ब्रह्माऽग्रे कल्पयामास वेदार्हाणामनुत्तमम् ८
येनांसे धृतमात्रेण ब्रह्मसूत्रेण ते द्विजाः ।
भवन्ति ब्राह्मणा नाम वेदार्हाश्च त्रयस्त्विह ९
यावत्प्रभृति वामांसे ब्रह्मसूत्रं द्विजस्य तत् ।
गुरुः प्रतिष्ठापयति काले प्रभृति संयतः १०
तावत्प्रभृति तस्यैव पिताऽऽचार्यः स उच्यते ।
माता च तस्य सावित्री द्वितीयं जन्म चोच्यते ११
आकटेस्तत्प्रमाणं स्याद्दीर्घं तु सुस्थितं तथा ।
आयुर्हरत्यतिह्रस्वमतिदीर्घं तपोहरम् १२
सिद्धार्थफलमानेन स्थूलं स्यादुपवीतकम् ।
यशोहरमतिस्थूलमतिसूक्ष्मं धनापहम् १३
पवित्रं परमं शुद्धमायुष्यं च शुभावहम् ।
औजस्यं ब्रह्मवर्चस्यं ब्रह्मसूत्रं तथोदितम् १४
यज्ञोपवीतं परमं पवित्रं
विभूषणं ब्राह्मणलक्षणं च ।
पद्मासनस्थेन पितामहेन
उत्पादितं पङ्कजनालसूत्रात् १५
यज्ञोपवीतस्योत्पत्तिं जानाति ब्राह्मणो न चेत् ।
स वै वहति भाराय पुस्तकानि यथा वृषः १६

"ह्यांचें तात्पर्य येणेंप्रमाणें :—

ज्ञात व ज्ञेय ह्यांचें ऐक्य न जाणणाऱ्या ब्राह्मणानें ब्रह्मदेवानें निर्मिलेलें जें आपलें ब्रह्मसूत्र तें टाकूं नये १. जगताच्या उत्पत्तीचे पूर्वीं एकटेच शिव बसले असतांना सृष्टि उत्पन्न करण्याचें त्यांनीं मनांत आणिलें. तेव्हां गुणमयी माया स्रष्टव्य ह्मणून ह्मणजे उत्पन्न करण्यास योग्य ह्मणून प्रथमतः त्यांच्या लक्ष्यांत आली व त्या शंकरांनीं ती गुणमयी महामाया जशी कांहीं सूत्ररूप व उत्पन्न केली २. त्या मायेच्या योगानं मायात्मक विष्णु देवाचा पालक त्यांनीं उत्पन्न केला. तदनंतर सृष्टीची

इच्छा झाल्यामुळें स्वतःच ब्रह्मरूप बनलेले ते शिव रुद्र झाले. ह्या जगताच्या क्षयाकरितां रुद्ररूप होय ३. ज्ञानात्मक हरीनें ब्रह्मरूप अविनाशी शिवाचे ठिकाणीं तें सूत्र +उपवीत केल्यामुळें त्याला ब्रह्मसूत्र असें नांव पडलें ४; यज्ञानें तें उपवीत केल्यामुळें त्याला यज्ञसूत्र अशी संज्ञा प्राप्त झाली व त्याचप्रमाणें ब्रह्मस्वरूप शिवाच्या आज्ञेन ब्रह्मदेवानें तें आवृत+ केल्यामुळें त्याला ब्रह्मसूत्र असें ह्मणतात ५. तेव्हांपासून तीन लोक, तीन वेद, तीन देव, तीन अग्नि आणि शिवनिर्मित तीन वर्ण त्रिवृत्सूत्राचें ह्मणजे यज्ञोपवीताचें अवलंबन करूं लागले ६. नादयुक्त त्रिमात्र प्रणव त्या यज्ञोपवीताच्या ग्रंथीचा आश्रय करूं लागला. त्याचप्रमाणें शिवाच्या आज्ञेनें वेदमाता सावित्री त्याच्या ग्रंथीच्या अग्राचा आश्रय करूं लागली ७. ह्याप्रमाणें द्वादश देवतांनीं युक्त असलेलें सर्वोत्कृष्ट ब्रह्मसूत्र वेदयोग्य द्विजांकरितां ब्रह्मदेवानें प्रथम निर्माण केलें ८. तें ब्रह्मसूत्र (डाव्या) खांद्यावर धारण केल्यानेंच ते (ब्रह्मकुलोत्पन्न) द्विज ब्राह्मण होतात व त्यांच्याचमुळें इहलोकीं तीन वर्ण वेदाधिकारी होतात ९. जेव्हांपासून द्विजाच्या डाव्या खांद्यावर उक्त कालीं गुरु तें ब्रह्मसूत्र स्थापन करितो तेव्हांपासून तो आचार्यच त्या द्विजाचा पिता होतो. सावित्री हीच त्याची माता होते व त्या उपनयनसंस्काराला दुसरा जन्म असें ह्मणतात १०, ११. ह्या यज्ञोपवीताच्या लांबीचें प्रमाण कमरेपर्यंत आहे. फार आखूड यज्ञोपवीत आयुष्याचें व फार लांब यज्ञोपवीत तपाचें हरण करितें १२. यज्ञोपवीताच्या एका पदराची जाडी मोहरी एवढी असावी. अति जाड यज्ञोपवीत यशाचा व अति सूक्ष्म यज्ञोपवीत धनाचा नाश करितें १३. हें ब्रह्मसूत्र अत्यंत पवित्र, परम शुद्ध, अतिशय आयुर्वर्धक, अति शुभकारक, अतिशय ओज उत्पन्न करणारें व वेदाध्ययनजन्य तेज वृद्धिंगत करणारें आहे १४. परम पवित्र यज्ञोपवीत हें एक विशिष्ट भूषण

असून ब्राह्मणाचें चिन्ह आहे व तें कमलासन ब्रह्मदेवानें कमलनालाच्या सूत्रापासून उत्पन्न केलें आहे १५. यज्ञोपवीताची उत्पत्ति जर ब्राह्मण जाणीत नसेल तर तो भार वहाणाऱ्या बैलाप्रमाणें ग्रंथांचा भार वाहणारा आहे असें समजावें १६.

उपवीत अथवा आवृत करणें ह्मणजे डाव्या खांद्यावर व उजव्या हाताखालीं दैविक कर्माला जसें यज्ञोपवीत असतें तसें करणें.

## यज्ञोपवीतसामर्थ्य.

**यज्ञोपवीतं परमं पवित्रं प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात् ।**
**आयुष्यमग्र्यं प्रतिमुञ्च शुभ्रं यज्ञोपवीतं बलमस्तु तेजः ।।**

असा मंत्र बौधायनसूत्रांत पूर्वी येऊन गेलेलाच आहे. जें परम पवित्र यज्ञोपवीत पूर्वी ब्रह्मदेवासह उत्पन्न झालेलें आहे,आयुर्वर्धक वस्तूंमध्यें जें श्रेष्ठ आहे व जें शुभ्र ह्मणजे निर्मळ आहे तें यज्ञोपवीत तूं धारण कर. तेंच तुझें बल व तेज असो." हें ह्या मंत्राचें तात्पर्य आहे. ब्राह्मण जर हें यज्ञोपवीत खऱ्याखऱ्या रीतीनें कायम ठेवण्याचा यत्न करितील तर ते स्वतःचा व सर्व जगताचा उद्धार करण्यास समर्थ होतील.परंतु, सांप्रत ह्या यज्ञोपवीताच्या सामर्थ्याची पुष्कळांना माहिती नसल्यामुळें त्याच्या संरक्षणाची तजवीज व्हावी तशी होत नाहीं व त्यामुळें ब्राह्मणांचा व्हावा तसा अभ्युदय होत नाहीं.

वस्तूच्या ठिकाणीं जें सामर्थ्य असतें तें ती वस्तु ज्या मानानें निर्मल असेल त्या मानानें असतें. मलामुळें वस्तूचें सामर्थ्य नाहींसें होत असतें. यज्ञोपवीत हें नवगुणित व तीनपदरी सूत्ररूप असतें. त्याचें सामर्थ्य स्पष्ट करून दाखविण्याकरितां आपण दोरीचेंच उदाहरण घेऊं. देशावर ताग, अंबाडी वगैरे झाडांच्या सालींच्या दोऱ्या होत असतात. ह्या सालींमध्यें तंतु असतात व तंतूंशिवाय इतर द्रव्य

असतें. सालींतील इतर द्रव्यांपासून तंतु अलग केले ह्मणजे ते बळकट होतात. सालींतील जो घातुक अंश असतो तो वेगळा होण्याकरितां साली अथवा सालीसुद्धां काडें पाण्यांत भिजत घालावीं लागतात. त्यामुळें सालींतील तंतु, इतर भागांपासून लवकर अलग काढितां येतात. उदक हें एक मोठें शुद्धीचें साधन आहे. स्वच्छ उदकामुळें घातुक कीटकांचा नाश होत असतो. हे गंगोदकावरून सिद्ध झालेलें आहे. जी शुद्ध वस्तु आपलें आयुष्य वाढविण्याला कारण होत असते तीच शुद्ध वस्तु स्वभावतः अशुद्ध असलेल्या कीटकादिकांच्या नाशाचें कारण होत असते. कापूर, सुगंधी द्रव्यें इत्यादिकांनीं मनुष्यांना आरोग्य प्राप्त होतें. परंतु, घातुक कीटकांचा ह्याच शुद्ध द्रव्यांमुळें नाश होत असतो. शरीरांतून जीव निघून गेला असतां ज्याप्रमाणें शरीर आपोआप कुजूं लागतें त्याचप्रमाणें उदकाच्या सतत संसर्गामुळें सालीच्या ठिकाणीं असलेल्या घातुक जीवांचा नाश होऊं लागला असतां तंतूंशिवाय इतर द्रव्य कुजूं लागतें व तंतूंपासून अलग होतें. अशा रीतीनें अलग होऊं लागलेले तंतु त्या मळापासून अगदीं अलिप्त केले असतां फार बळकट होतात. तागा जितका धुवावा तितकी त्याची दोरी अधिक बळकट होतें. काथ्याचीही गोष्ट अशीच आहे. नारळाच्या सालीमध्यें तंतु व भुसा अशीं दोन द्रव्यें एकमेकांत मिसळलेलीं असतात. त्यांपैकीं तंतु-रूप द्रव्य उपयोगीं असतें व भुसा त्या मानानें निरुपयोगी असतो. हे तंतु अलग होण्याकरितां साल भिजत घातली ह्मणजे तंतूंपासून भुसा अलग होऊं लागतो. काथ्या चांगला बळकट करावयाचा ह्मणजे तंतूंना भुशाचा मुळींच संपर्क राहूं द्यावयाचा नाहीं. भुशाचा यत्किंचितही संपर्क नसलेली काथ्याची दोरी बोटाइतक्या जाडीची जितक्या शक्तीचें काम करील तितक्या शक्तीचें काम भुसा न

काढिलेल्या काथ्याच्या मणगटाइतक्या जाड दोरानेंही होणार नाहीं. कारण, भुसा हें जें मलरूप द्रव्य तें स्वतः विनाशी असतें व आपल्या संसर्गानें तंतूंचेंही सामर्थ्य तें कमी करितें.

बहूनामप्यसाराणां संहतिः कार्यसाधिका ।
तृणैरावेष्ट्यते रज्जुर्यया नागोऽपि बध्यते ॥

हें सुभाषित लक्ष्यांत ठेवण्यासारिखें आहे. स्वतः व्यक्तिशः निर्बल असलेल्याही वस्तूंचा संघ फार प्रबळ होत असतो व त्या संघामुळें मोठीं मोठीं सामर्थ्याचीं कामें होत असतात. व्यक्तिशः "निर्बल असलेल्या तृणांची दोरी वळली जाते व तिच्या योगानें गजही बांधून ठेविला जातो." असें ह्या सुभाषिताचें तात्पर्य आहे. तंतूंमध्यें मळ हा स्वभावतःच परकी असतो. तो परकी मळ दूर झाल्याशिवाय तंतूंचें परस्पर ऐक्यच होत नाहीं. दोन तंतूंमध्यें मळाची अडचण कायम असते. ती नाहींशी झाली ह्मणजे दोन तंतूंचें ऐक्य होतें व अनेक तंतु एकरूप होऊन मोठें सामर्थ्य उत्पन्न होतें. तेव्हां सामर्थ्य उत्पन्न करण्याकरितां अगोदर ब्राह्मणानें आपल्या ठिकाणचे मळ नाहींसे केले पाहिजेत. नारळाच्या तंतूंच्या बरोबरच ज्याप्रमाणें भुसा उत्पन्न होतो त्याचप्रमाणें चांगल्या वस्तूबरोबर संसर्गानें त्या वस्तूचा अथवा दुसऱ्याचा घात करणारी वस्तुही उत्पन्न होत असते असा प्रायः नियम आहे. भुइमुगाचा दाणा खाण्याला मधुर लागतो. परंतु, विषतुल्य कडु भागही त्याच्याच दोन पाकळ्यांमध्यें असतो. सुगंधि चंदनावर सर्पाचें वास्तव्य असतें. सुवासिक केतकीचें ठिकाणीं भुजंग रहातात. मणिरत्न ज्या सर्पाचे ठिकाणीं असतें त्याच सर्पाचे ठिकाणीं भयंकर जालिम विष असतें. शेतकऱ्यानें बीजासंबंधानें कितीही काळजी घेतली व जमीन कितीही निर्मळ केली तरी पिकाबरोबर घातुक तृण वगैरे उत्पन्न होतेंच व तें वारंवार शेतकऱ्याला काढून टाकावें

लागत असतें. सारांश, घातुक पदार्थांची उत्पत्ति फार होतअसते व त्यांच्यापासून चांगल्या वस्तूंचें संरक्षण करण्याकरितां फारच काळजी घेणें अवश्य असतें. यज्ञोपवीताचे ठिकाणीं तीन देव, तीन अग्नि, तीन वेद, प्रणव व वेदमाता सावित्री ह्यांचें वास्तव्य असतें असें वर दिलेल्या स्मृतिप्रकाशांतील वचनांत स्पष्ट सांगितलेंच आहे. धर्मनिष्ठ लोकांच्या घरीं देव असतात; देवांच्या स्थानाकरितां देवगृह ह्मणून एक घरांतील स्वतंत्र भागच वेगळा असतो व तो शक्य तितका शुद्ध राखिलेला असतो. देवघराच्या इमारतींतही देव ठेवण्याचें स्थान वेगळेंच असतें व त्या स्थानामध्यें देवघरा मांडून त्यांत कमळामध्यें देव ठेविलेले असतात. देवालयांतही बाहेरील अवार, सभामंडप, गाभारा व सिंहासन असे चार भाग उत्तरोत्तर अधिक शुद्ध असतात व अत्यंत अंतस्थ शुद्ध भाग जें सिंहासन त्यावर देवाची मूर्ति ठेविलेली असते. देवालयाच्या बाहेरील आवारामध्यें पादत्राणें व वर्णबाह्य लोक ह्यांचा प्रवेश होत असतो. सभामंडपांत जोडे व वर्णबाह्य लोक जात नाहींत. सभामंडपाला लागून जें मुख्य देवालय असतें त्याच्या पायऱ्या चढून गाभाऱ्याचे बाहेरच्या बाजूच्या जाग्यामध्यें सभामंडपांत प्रविष्ट होणाऱ्याही सर्वांचा प्रवेश होत नाहीं. गाभाऱ्यामध्यें ब्राह्मणाशिवाय इतरांचा प्रवेश होत नाहीं व गाभाऱ्यांत प्रवेश करणारे ब्राह्मणही प्रवेशकालीं शुचिच असावे लागतात. अंगरखा, पागोटें वगैरे असतांना ब्राह्मणांना गाभाऱ्यांत जातां येत नाहीं व स्नान करून शुद्ध वस्त्र परिधान केलेल्या ब्राह्मणाशिवाय सिंहासनावरील देवाला कोणीही स्पर्श करीत नाहीं. कोल्हापुरच्या अंबाबाईचे गाभाऱ्यांत स्नान करून शुचि झालेल्या ब्राह्मणांशिवाय इतरांचा प्रवेश होत नाहीं; नरसोबाचे वाडीस गंगेमध्यें स्नान केल्यावर तशाच शुद्ध स्थितींत असलेल्या ब्राह्मणाशिवाय

इतराला पादुकांवर पाणी घालण्याची मनाई आहे. त्र्यंबकेश्वरी सोव-ळ्या ओवळ्याचा फारच बंदोबस्त आहे व रामेश्वराच्या गाभाऱ्यांत तर ठरीव पुजाऱ्यांशिवाय इतर कोणाचाही प्रवेश होत नाहीं. कारण, देवाच्या मूर्तीला अथवा प्रतिमेला जातितः अथवा आचा-रतः अशुद्ध असलेल्या पुरुषाचा स्पर्श झाल्यास तेथें देवत्वच रहात नाहीं. मूर्तीला विटाळ झाल्यास पुनरपि संप्रोक्षणविधि अथवा अर्चा करावी लागत असते. घरच्या देवघऱ्यांतील देवांना ओवळ्यानें कोणी शिवत नाहीं; बायकांना तुळशीची पूजा करावयाची अस-ल्यास ती त्या आंथरुणांतील वस्त्रावर न करितां सोवळ्यानेंच करीत असतात व देवांना अर्पण करावयाचा नैवेद्यही शुद्ध राहूनच करावा लागतो. ह्या गोष्टी प्रसिद्ध आहेत. ज्याला जें ठिकाण आवडत नाहीं तें टाळण्याचा तो प्रयत्न करीत असतो. मद्यमांसाच्या दुकानांवरून जाण्यासही ब्राह्मण दबकतात; गांवांतील लोकांचा घाणेरडा मैला टाकण्याचें ठिकाण शक्य तितकें लोक टाळीत असतात व कधीं त्या ठिकाणावरून निरुपायास्तव जाण्याचा प्रसंगच आल्यास नाकाला पदर लावून तो प्रदेश फारच त्वरेनें लोक चालून जातात. सामान्यतः परतंत्र असलेल्या मानवांचा हा प्रकार झाला. देवता तर सर्वस्वीं स्वतंत्रच आहेत. तेव्हां त्यांना जे पदार्थ आवडत नाहींत; त्यांना जें स्थान अप्रिय असतें व जें वर्तन त्यांना खपत नाहीं त्या पदार्थापासून, त्या स्थानापासून अथवा तसें वर्तन करणाऱ्यापासून त्या निघून जातील हें उघड आहे. ह्यास्तव, यज्ञोपवीताचे ठिकाणीं असणाऱ्या देवता कायम रहाण्यास तें यज्ञोपवीत धारण करणाऱ्या व्यक्तीचे ठिकाणीं देवतांना अप्रिय असें कांहीं एक असतां उप-योगीं नाहीं हें उघड आहे. देवतांचें वास्तव्य कोठें असतें व कोठें नसतें हें समजलें ह्मणजे देवताश्रित यज्ञोपवीत धारण करणाऱ्या

ब्राह्मणांनीं कोणतें आचरण वर्ज्य केलें पाहिजे हें समजेल.

**यावतीर्वै देवतास्ताः सर्वा वेदविदि ब्राह्मणे वसन्ति ।**

अशी श्रुति तैत्तिरीय आरण्यकांत असल्यामुळें वेदवेत्त्या ब्राह्मणांच्या ठिकाणीं सर्व देवतांचें वास्तव्य असतें असें ठरतें. तेव्हां यज्ञोपवीताचा आश्रय करणाऱ्या सर्व देवता आपल्यापाशीं असाव्या व त्यांच्या प्रसादामुळें आपणांला सामर्थ्य प्राप्त व्हावें अशी इच्छा करणाऱ्या ब्राह्मणानें वेदाचें अवलंबन अवश्य केलें पाहिजे. तेव्हां वेदाध्ययन यथाशक्ति न करणाऱ्या ब्राह्मणाचे ठिकाणीं देवतांचें वास्तव्य असणें शक्य नाहीं. परमेश्वरानें जेव्हां चातुर्वर्ण्य उत्पन्न केलें तेव्हां अग्निदेवता व ब्राह्मण ह्यांची उत्पत्ति मुखापासून केली; इंद्रदेवता व क्षत्रिय ह्यांची उत्पत्ति बाहूंपासून केली; विश्वेदेव आणि वैश्य ह्यांची उत्पत्ति त्यानें मांड्यापासून केली आणि पायांपासून कोणतीही देवता उत्पन्न न करितां त्यानें शूद्रवर्णाची उत्पत्ति केली. ह्मणून शूद्रवर्णाशीं देवतेचा संबंध नाहीं. ह्यास्तव, देवतेशीं संबंधनसलेल्या शूद्राशीं ब्राह्मणाचा विशेष संसर्ग झाल्यानें त्याच्यापासून देवता जाऊं लागतील. पतित, पातित्य, पतन इत्यादि शब्द धर्मशास्त्र ग्रंथांमध्यें असतात व ब्राह्मण पतित झाला असें ह्मणण्यांतही येतें. परंतु, पतित व अपतित ह्यांच्या बाह्य आकारांमध्यें कांहीं फरक दिसत नाहीं. पतित ह्मणजे पडलेला. ज्या ब्राह्मणाला आपण पतित समजतो तो कांहीं वृक्षादिकांवरून पडलेला असतो असें नाहीं. त्याच्या ठिकाणीं ज्या देवतांचें वास्तव्य असतें त्या देवता त्याला सोडून गेल्या ह्मणजे तो पतित होतो. पतितापासून देवता निघून जात असल्यामुळेंच पतितसंसर्ग सर्वथा वर्ज्य होय. वेदवेत्त्या ब्राह्मणाचे ठिकाणीं देवतांचें वास्तव्य असतें अशी श्रुति असल्यामुळें जो ब्राह्मण वेदवेत्ता नाहीं त्याच्यापाशीं देवतांचें वास्तव्य नसतें हें न्यायानेंच प्राप्त आहे आणि ह्मणूनच

**योऽनधीत्य द्विजो वेदमन्यत्र कुरुते श्रमम् ।**
**स जीवन्नेव शूद्रत्वमाशु गच्छति सान्वयः ॥**

ह्या मनुवचनामध्यें वेदाध्ययन न करितां इतर विषयासंबंधानें परिश्रम करणारा द्विज वंशजांसह सत्वर शूद्र होतो असें सांगितलें आहे. सारांश, वेदाध्ययनाचा संबंध नसणें ह्मणजे देवतासंबंध नसणें व देवतासंबंध नसणें ह्मणजे शूद्रत्व प्राप्त होणें हें उघड आहे. देवमूर्तींना अथवा देवलिंगांना लोक शूद्रस्पर्श होऊं देत नाहींत व झाला असतां निघून गेलेलें देवत्व प्राप्त होण्याकरितां पुनरपि अर्चा करावी लागत असते. शूद्रसंपर्कानें ज्याप्रमाणें मूर्तींपासून देवत्व नष्ट होतें त्याचप्रमाणें शूद्रसंपर्कापासुन ब्राह्मणाच्या ठिकाणीं असलेलें देवतासांनिध्य जातें.

**पद्यु ह वा एतच्छ्मशानं यच्छूद्रस्तस्माच्छूद्रसमीपे नाध्येतव्यम्।**

अशी श्रुति आहे व ह्या श्रुतींत शूद्राचे समीप वेदाध्ययन करूं नये असें सांगितलें आहे. ह्मणजे देवता ज्याचे पाशीं नाहींत त्याचे समीप आपलें आश्रयस्थानही असणें देवतांना खपत नाहीं. देवतांचें मुख्य आश्रयस्थान मंत्र आहेत व ते मंत्र ब्राह्मणापाशीं असतात ह्मणून ब्राह्मण देवतांचें वसतिस्थान आहे. शूद्रांचे समीप वेदाध्ययन केल्यानें वेदाचीं अक्षरें घोकिलीं असतां पाठ येत नाहींत; किंवा आलेली विसरतात असा प्रकार नाहीं. परंतु, शूद्राचे समीप केलेल्या वेदाध्ययनामुळें त्या द्विजाचे ठिकाणीं असलेल्या वेदाचें वेदत्व नष्ट होतें; ह्मणजे वेदाचें सामर्थ्य नष्ट होतें. सामर्थ्य ह्मणून जी वस्तु आहे ती ताजव्यांत टाकून तोलिता येण्यासारिखी नाहीं. विद्युत्प्रवाह नष्ट झाला असतां ज्याप्रमाणें विजेनें चालणारीं यंत्रें जशीच्या तशींच असतांनाही निरुपयोगी होतात त्याचप्रमाणें शूद्रादिकांच्या संपर्कामुळें सामर्थ्यहीन झालेले वेदग्रंथ निरुपयोगी होतात. सारांश, आचारहीन वेद ह्मणजे जीवन नसलेलें शरीर, वाफनसलेलें

एंजिन, वीर्य नसलेला पुरुष, अथवा वारा निघून गेलेली रबरी धाव होय. शूद्रांनीं ब्राह्मणांचें कांहीं बुडविलें आहे ह्मणून शूद्रसंपर्क ब्राह्मणांनीं करूं नये असें सांगितलेलें नाहीं. परंतु, देवतारहित जो शूद्र त्याच्या संपर्कामुळें ब्राह्मणांचें सामर्थ्य नष्ट होऊन सर्वांचीच हानि होत असल्यामुळें शूद्रसंपर्क विशेषतः अध्ययनकालीं ब्राह्मणांना वर्ज्य सांगितलेला आहे.

**नाविस्पष्टमधीयीत न शूद्रजनसंनिधौ ॥ ९९ ॥अ०४॥**

ह्या मनुवचनामध्यें शूद्राचे संनिध वेदाध्ययनाचा निषेध सांगितला आहे. वेदाध्ययन न केलेला ब्राह्मण प्रतिग्रहास योग्य नाहीं.

**शूद्रान्नरसपुष्टाङ्गो ह्यधीयानोऽपि नित्यशः ।**
**जुह्वन्वापि जपन्वाऽपि गतिमूर्ध्वां न विन्दति ॥ २५ ॥**
**शूद्रान्नेनोदरस्थेन यः कश्चिन्म्रियते द्विजः ।**
**स भवेत्सूकरो ग्राम्यस्तस्य वा जायते कुले ॥ २६ ॥**
**शूद्रान्नेन तु भुक्तेन मैथुनं योऽधिगच्छति ।**
**यस्यान्नं तस्य ते पुत्रा न च स्वर्गार्हको भवेत्२७अ०६॥**

अशीं वचनें वसिष्ठस्मृतीमध्यें आहेत. "शूद्रान्नानें ज्याचें शरीर पुष्ट झालेलें आहें तो ब्राह्मण जरी जप व होम करणारा असला तरी त्याला परलोकप्राप्ति होत नाहीं २५. उदरांत शूद्रान्न असतांना जो कोणी द्विज मरतो तो ग्रामसूकर होतो किंवा त्या शूद्राच्या कुलांत जन्मास येतो २६. शूद्रान्न उदरांत असतांना जो स्त्रीसमागम करितो त्याला त्या समागमापासून पुत्र झाल्यास ते ज्या शूद्राचें अन्न ह्यानें सेवन केलें असेल त्याचे समजावे. तो स्वर्गयोग्य होत नाहीं" २७. असें ह्या वचनांचें तात्पर्य आहे. केवल शूद्रान्नाचा व शूद्रसंसर्गाचा जर इतका दोष सांगितला आहे तर सांप्रत जे बरेच अनाचार प्रचारांत आल्यासारिखे झाले आहेत त्या अनाचारांनीं संपन्न असलेल्या ब्राह्मणाच्या ठिकाणीं देवतांचें वास्तव्य असणार कोठून?

ह्यास्तव, देवताश्रित यज्ञोपवीत धारण करणाऱ्या ब्राह्मणानें आपल्या कल्याणाकरितां आचारसंपन्न व वेदाध्ययनसंपन्न असणें अत्यंत अवश्य आहे. ब्राह्मणांच्या ठिकाणीं जर दीर्घायु करणारें यज्ञोपवीत वगैरे आहे व त्यांचे ठिकाणीं जर देवतांचें वास्तव्य आहे तर ब्राह्मणाला मुळीं मृत्युच येऊं नये. परंतु, वेदशास्त्रवेत्त्या ब्राह्मणांनाही मृत्युप्राप्त होत असतो. तेव्हां याचें कारण काय? असें महर्षींनीं भृगूला विचारिलें असतां भृगुमहर्षींनीं ब्राह्मणांना मृत्यु येण्याचें कारण

अनभ्यासाच्च वेदानामाचारस्य च वर्जनात् ।
आलस्यादन्नदोषाच्च मृत्युर्विप्राञ्जिघांसति॥

असें सांगितलें आहे. मनुस्मृतीच्या पांचव्या अध्यायांत हें वचन आहे. "वेदाभ्यास व सदाचार ह्यांचा अभाव, आळस व अन्नदोष हीं चार कारणें ब्राह्मणांना मृत्यु येण्याचीं आहेत." असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. अनाचारी ब्राह्मणाच्या ठिकाणीं देवता रहात नाहींत. त्याला शाप देऊन त्या चालत्या होतात. ह्मणून ब्राह्मणांना मृत्यु अकालीं सुद्धां येतो. सांप्रत विचार केला असतां हीं चारी कारणें कमी अधिक मानानें अनेक ब्राह्मणकुटुंबांत दृष्टीं पडत असतात. ह्यास्तव, सर्वच ब्राह्मणांनीं ह्या कारणापासून शक्य तितकें अलिप्त रहाण्याचा यत्न केला पाहिजे. ह्मणजे यथाशक्ति वेदाध्ययन, आचारपरिपालन, आलस्यत्याग व निषिद्ध अन्न वर्ज्य करणें ह्या चार गोष्टींविषयीं खबरदारी घेतली पाहिजे.

## आचाराचें व अनाचाराचें फळ.

आचाराल्लभते ह्यायुराचारादीप्सिताः प्रजाः ।
आचाराद्धनमक्षय्यमाचारो हन्त्यलक्षणम् ॥ १५६ ॥
दुराचारो हि पुरुषो लोके भवति निन्दितः ।
दुःखभागी च सततं व्याधितोऽल्पायुरेव च ॥१५७॥

सर्वलक्षणहीनोऽपि यः सदाचारवान्नरः ।
श्रद्दधानोऽनसूयश्च शतं वर्षाणि जीवति १५८ ॥ अ०॥

अशीं वचनें मनुस्मृतीमध्यें आहेत. "आचारामुळें आयुष्य, उत्कृष्ट संतति व अक्षय्य संपत्ति प्राप्त होते व दौर्भाग्यसूचक एकादें अशुभ लक्षण जरी शरीरावर असलें तरी त्याचा अनिष्ट परिणाम आचारामुळं होत नाहीं १५६. दुराचारी पुरुषाची लोकामध्यें निंदा होत असते; त्याला नेहेमीं दुःखें भोगावीं लागतात; तो व्याधिग्रस्त असतो व त्याला अकालीं मृत्यु येतो १५७. परंतु, कोणतेंही जरी शुभ लक्षण नसलें तरी शास्त्रावर श्रद्धा ठेवून सदाचारानें वागणारा व मत्सरबुद्धीलाहि धारण न करणारा पुरुष शंभर वर्षें वांचतो" असें ह्या वचनांचें तात्पर्य आहे. तेव्हां आचारसंपन्न राहून यज्ञोपवीताच्या आश्रयाला असलेल्या देवतांचें वास्तव्य ब्राह्मणानें कायम ठेविलें ह्मणजे त्याला यज्ञोपवीतधारणाचें पूर्वीं सांगितलेलें फल प्राप्त झालेंच पाहिजे.

## जन्माबरोबर उत्पन्न झालेल्या वस्तूंची आवश्यकता.

यज्ञोपवीतधारणाचा जो मंत्र बौधायनसूत्रांत सांगितला आहे त्यांत यज्ञोपवीत हें पूर्वी ब्रह्मदेवाबरोबर उत्पन्न झालें आहे असें सांगितलें आहे आणि आयुर्वर्धक साधनामध्यें यज्ञोपवीत हें श्रेष्ठ साधन असें ह्मटलें आहे. ब्रह्मदेवाचें आयुष्य दोन परार्ध काल कोटीपर्यंत आहे. ह्याचें कारण त्यानें स्वतःच्या देहाबरोबर उत्पन्न झालेल्या यज्ञोपवीताचें उत्तम रीतीनें संरक्षण केलें आहे हें होय. देहाबरोबर जें संरक्षक व कल्याणकारक साधन उत्पन्न झालेलें असतें तें सोडून दिलें असतां पुरुष जिवंत असूनही मृतवत्‌च होतो. ह्यास्तव, पुरुषानें

स्वतःच्या देहाबरोबर जें परमेश्वरानें संरक्षक साधन उत्पन्न करून ठेविलें असेल त्यापासून कधींही कोणी वियुक्त होणें योग्य नाहीं. कुंतीचा पुत्र कर्ण. हा सूर्यापासून कवचकुंडलांसह उत्पन्न झाला होता. कवचकुंडलें ह्याच्या देहाचीं संरक्षक होतीं व त्यामुळें देवादिकांपासूनही त्याला भय नव्हतें. परंतु, इंद्रापासून वासवी शक्ति घेऊन जेव्हां कर्णानें त्याला कवचकुंडलें काढून दिलीं तेव्हां रक्षणसाधन नष्ट झाल्यामुळें अर्जुनाच्या हातून त्याचा वध झाला. सारांश, ब्रह्मदेवानें बरोबर उत्पन्न झालेलें यज्ञोपवीत आचारभ्रंशादि कारणांमुळें भ्रष्ट न होऊं देता एकसारखें उत्तम रीतीनें धारण केलेलें असल्यामुळें (चार युगांचे दोन हजार फेरे ह्मणजे एक अहोरात्र ह्या मानानें) शंभर वर्षे तो जिवंत रहात असतो. ब्राह्मणाला द्विजत्वाची प्राप्ति उपनयनसंस्कारामुळें होत असते. उपनयनसंस्कार हा ब्राह्मणाचा मुख्य जन्म व सावित्री ही ब्राह्मणाची दुसरा श्रेष्ठ जन्म देणारी माता. उपनयनसंस्कारामध्यें गायत्रीमंत्राचा उपदेश होण्याचे पूर्वी यज्ञोपवीतधारण समंत्रक होत असतें ही गोष्ट विशेष लक्ष्यांत ठेविली पाहिजे. तेव्हां जन्मासह उत्पन्न झालेल्या यज्ञोपवीताची ज्यानें परवा केली नाहीं त्यावर त्या यज्ञोपवीताच्या ठिकाणीं असणाऱ्या देवतांचा अनुग्रह कसा होणार ? व त्याच्या यज्ञोपवीताचे ठिकाणीं ह्या देवता तरी कशा राहणार ? ह्यास्तव, देहाबरोबर उत्पन्न झालेले हस्तपादादि अवयव ज्याप्रमाणें नष्ट झाले असतां मनुष्य जिवंत असूनही मृतवत् होय त्याचप्रमाणें जन्माबरोबर उत्पन्न झालेलें यज्ञोपवीत नष्ट झालें असतां ब्राह्मण जिवंत असूनही मृतवत् होत. पाय गेलेला, खुळपा, अंधळा, बहिरा, मुका, नाक झडलेला, जीभ सडलेला, दांत पडलेला व ओठ तुटलेला मनुष्य ज्याप्रमाणें जिवंत असूनही स्वतःचें पोषण करण्यास अथवा स्वतःचें संरक्षण करण्यास समर्थ नसल्यामुळें

अथवा जगतांत त्याचा उपयोग कोणत्याच प्रकारचा होणें शक्य नसल्यामुळें जिवंत असूनही व्यर्थ त्याचप्रमाणें जन्माबरोबर उत्पन्न झालेल्या यज्ञोपवीतांचें संरक्षण करणारा ब्राह्मण देवतानुग्रहरहित असल्यामुळें व्यर्थ होय.

## आईबापांशिवाय मूल जगणार कसें ?

उपनयनसंस्कार हा द्विजांचा मुख्य जन्म. हा जन्म देणारी माता सावित्री देवता होय आणि पिता आचार्य होय.

> **उपनीय तु यः शिष्यं वेदमध्यापयेद्द्विजः ।**
> **सकल्पं सरहस्यं च तमाचार्यं प्रचक्षते ॥**

असें वचन मनुस्मृतींमध्यें आहे. " शिष्याचें उपनयन करून त्याला कल्पसूत्रासह व उपनिषदांसह त्याच्या शाखेचें जो अध्ययन सांगतो तो आचार्य होय " असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. जन्म होतांक्षणीं जर बालकाचा मातेपासून वियोग झाला तर बालकाचें संरक्षण होणें फारच दुर्घट असतें. त्याचप्रमाणें उपनयनरूप जन्म प्राप्त होताक्षणीं ती जन्म देणारी सावित्री माता जर कुमारानें सोडून दिली तर त्याचें संगोपन व्हावयाचें कसें ? निपजतांक्षणीं ज्यांची माता पर लोकीं जाते त्या मुलांपैकीं एकादें मूल वर घातलेल्या दुधानें जिवंत रहातें. परंतु, त्याला जर वर दूधही मुळींच मिळालें नाहीं तर तें एक दिवसही जिवंत रहाण्याचा संभव नाहीं. सांप्रत पुष्कळ ब्राह्मणांचा उपनयन संस्कार होत असतो व त्यावेळीं गायत्रीमंत्राचा त्यांना उपदेशही होतो. परंतु, त्या गायत्रीमंत्राचा जप उपनयन हा संस्कार होताक्षणींच करण्याचें ते सोडून देतात. कारण संध्यावंदन कर्मच जर केलें जात नाहीं तर गायत्री जप कोठून होणार ? गायत्रीजप हें कुमाराला जिवंत ठेवणारें वेदमातेचें स्तन्य होय. मातेच्या दुधाचे ऐवजीं गाईचें दूध पोषणास उपयोगीं पडतें. परंतु, उपन-

यनकालीं वैदिक जन्म देणारी माता कधींही मरत नसल्यामुळें तिच्या ऐवजीं कुमाराचें संगोपन कोणी करावें ही व्यवस्था श्रुतिस्मृतींत सांगितलेली नाहीं. ह्यामुळें उपनयन झाल्यावर गायत्रीजपयुक्त संध्यावंदन कर्म न करणाऱ्या ब्राह्मणाची स्थिति उपजतांक्षणीं मातेचा वियोग झालेल्या व वरदूधही मिळण्याची सोय नसलेल्या बालकाच्या स्थितीप्रमाणें अत्यंत शोचनीय होते. जपयुक्त संध्यावंदन कर्माची परवा ब्राह्मण लोक करीत नसल्यामुळें त्यांचें खरें खरें पोषण करणाऱ्या मातेशीं त्यांचा वियोग होतो आणि वेदाध्ययनार्थ आचार्याचाही आश्रय ते करीत नसल्यामुळें बापापासूनही उपजतांक्षणीं त्यांची ताडातोड होते. उपजतांक्षणीं अरण्यांत टाकून दिल्या गेलेल्या शकुंतलेचें पालन पोषण करणारे महर्षि कण्व सुदैवानें तिला प्राप्त झालें होते. परंतु, उपनयनसंस्कार होतांक्षणीं श्रेष्ठ आईबापांचा वियोग करून घेणाऱ्या द्विजांचें पालन पोषण करण्यास कोणीही पुढें येत नाहीं. त्यामुळें अरण्यांत पडलेल्या शकुंतलेची स्थिति तिला कण्वमहर्षीसारख्यानें आश्रमांत नेलें नसतें तर जी झाली असती तीच सांप्रत बहुतेक ब्राह्मणांची झालेली आहे व ह्मणूनच ब्राह्मण लोक सांप्रत अत्यंत हीन व दीन झालेले आहेत.

**सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ।**
**अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥**

असा भगवानांनीं गीतेमध्यें अर्जुनाच्या निमित्तानें आह्मांला उपदेश केलेला आहे व तो पदरचा केलेला नसून ब्रह्मदेवानें जो प्रजा उत्पन्न केल्यानंतर त्यांना केला तोच केला आहे. प्रजा ~~सहयज्ञ~~च उत्पन्न झालेल्या आहेत. ह्मणजे यज्ञ हे प्रजांच्या उत्पत्तीबरोबर हस्तपादादि अवयवांप्रमाणें उत्पन्न झालेले आहेत. हे देहाबरोबर उत्पन्न झालेले यज्ञ जर त्रैवर्णिकांनीं सोडिले तर त्यांची अवस्था हस्तपादादि अव-

यज्ञांनीं हीन झालेल्या मनुष्याची जी अवस्था वर निर्दिष्ट केली आहे तशीच होणार. ब्रह्मदेवानें त्रैवर्णिक प्रजांना अभ्युदयाचें साधन ह्मणून यज्ञच सांगितलें आहे. दुसऱ्या साधनाकडे त्यानें बोट दर्शविलेंच नाहीं. तेव्हां ज्या साधनांकडे ब्रह्मदेवानें बोट दाखविलें नाहीं तें जर अभ्युदयाकरितां त्रैवर्णिक स्वीकारूं लागले आणि जें ब्रह्मदेवानें सांगितलें आहे तें साधन जर ते स्वीकारीनासे झाले तर त्रैवर्णिकांचा अभ्युदय होणार कोठून? सह यज्ञैः किंवा यज्ञैः सह अशीं पदें घातलीं असतीं तर छंदोभंग होत नव्हता व समास होणारा नसल्यामुळें त्या पदांचा अर्थ समजणेंही ज्यास्त सुलभ झालें असतें. परंतु, भगवानांनीं समजून उमजून "सहयज्ञाः" असा समास योजून त्रैवर्णिक प्रजांचें विशेषण करण्याचा उद्देश हस्तपादादि अवयवांसह ज्याप्रमाणें पुरुषाची उत्पत्ति होत असते त्याप्रमाणें यज्ञांसह त्रैवर्णिकांची उत्पत्ति झाली असें—आणि देहाच्या बरोबर उत्पन्न झालेल्या हस्तपादादिकांची ज्याप्रमाणें पुरुषाला अत्यंत आवश्यकता आहे त्याचप्रमाणें स्वतः बरोबर उत्पन्न झालेल्या यज्ञांची त्रैवर्णिकांच्या जीवनादिकांस अत्यंत आवश्यकता आहे असें---दर्शविणें हा होय. यज्ञांचीच जर उत्पत्ति द्विजांच्या देहाबरोबर झालेली आहे तर यज्ञोपवीताशिवाय यज्ञकर्म होणें शक्यच नसल्यामुळें यज्ञोपवीताचीही उत्पत्ति त्रैवर्णिकांच्या जन्माबरोबरच होणें अवश्य आहे आणि ह्मणूनच गायत्रीमंत्रोपदेशरूप श्रेष्ठ जन्म प्राप्त होण्याचें पूर्वीच यज्ञोपवीतधारण गृह्यसूत्रादिकांत सांगितलें आहे. यज्ञ ह्मणजे पंचमहायज्ञ व इतर संस्कार. यज्ञोपवीत ह्या नांवावरूनही जानव्याचा संबंध पंचमहायज्ञादि ब्रह्मकर्मांशीं असल्याचें कोणाच्याही लक्ष्यांत येण्यासारखें आहे. यज्ञाचा संबंध नसतांना यज्ञोपवीत धारण करणें ही गोष्ट सौभाग्याशीं संबंध नसलेल्या स्त्रीनें कुंकु-

मतिलकादि सौभाग्यालंकारधारण करण्याप्रमाणेंच उपहासास्पद होय. सारांश, द्विजांनीं यज्ञोपवीताचे ठिकाणीं असलेल्या देवतांचा अनुग्रह प्राप्त होण्याकरितां खरें खरें यज्ञोपवीत धारण करून आपणांला श्रेष्ठ जन्म देणाऱ्या गायत्रीमंत्ररूप मातेचें व वेदाध्ययन सांगणाऱ्या आचार्याचें अवलंबन करणें अवश्य आहे.

## कुमाराचें वस्त्र कसलें असावें ?

" ब्राह्मणस्य कार्पासं वासः " असें वसिष्ठ स्मृतीमध्यें सांगितलें आहे व " ब्राह्मणानें कार्पास वस्त्र धारण करावें " असा त्या वसिष्ठ-वचनाचा आशय आहे. परंतु, अहत वस्त्र असावें असें गृह्य सूत्रांतून सांगितलें आहे. ह्यास्तव, अहत वस्त्र ह्मणजे काय हें सर्वांना समजणें अवश्य आहे.

ईषद्धौतं नवं श्वेतं सदशं यन्न धारितम् ।
अहतं तद्विजानीयात्सर्वकर्मसु पावनम् ।

असें प्रचेतसमुनींचें वचन आहे. "नूतन, पूर्वीं न वापरलेलें, श्वेतवर्ण, दशांसहित व एकदा धुतलेलें जें वस्त्र तें अहत वस्त्र समजावें. कोणत्याही कर्माविषयीं अहत वस्त्र पवित्र होय" हें त्या वचनाचें तात्पर्य आहे. उत्तरीय वस्त्राचे ऐवजीं हरणाचें किंवा हरिणीचें कृष्णवर्ण कातडें असावें असें सांगितलें आहे.

## मेखला.

त्रिवृन्मौञ्जी समा श्लक्ष्णा कार्या विप्रस्य मेखला ।
क्षत्रियस्य तु मौर्वी ज्या वैश्यस्य शणतान्तवी ४२ ॥ अ० २॥

असें मनुवचन आहे. " ब्राह्मणाची मेखला मोळाची करावी. ती तिपेडी असावी; गुळगुळीत असावी आणि सर्व पदरांची जाडी सारखी ठेवून मेखला कोठें बारीक व कोठें लठ्ठ अशीं न होऊं देतां सर्व सारखी करावी " असें ब्राह्मणासंबंधानें मनूंनीं सांगितलें आहे.

# दंड.

ब्राह्मणो बैल्वपालाशौ क्षत्रियो वटखादिरौ ।
पैप्पलौदुम्बरौ वैश्यो दण्डानर्हन्ति धर्मतः ॥ ४५ ॥ अ० २॥

असें मनुवचन आहे. "ब्राह्मणानें पळसाचा अथवा बेलाचा दंड घ्यावा; क्षत्रियानें वडाचा अथवा खैराचा दंड धारण करावा आणि वैश्यानें पिंपळाचा अथवा उंबराचा दंड स्वीकारावा" असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे.

केशान्तिको ब्राह्मणस्य दण्डः कार्यः प्रमाणतः ।
ललाटसंमितो राज्ञः स्यात्तु नासान्तिको विशः॥४६॥२॥

असें मनुवचन आहे. "ब्राह्मणाच्या दंडाची लांबी त्याच्या पायापासून मस्तकावरील केशांपर्यंत असावी; क्षत्रियाच्या दंडाची लांबी कपाळापर्यंत असावी आणि वैश्याच्या दंडाची लांबी नाकाच्या अंतापर्यंत असावी" असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे.

ऋजवस्ते तु सर्वे स्युरव्रणाः सौम्यदर्शनाः ।
अनुद्वेगकरा नृणां सत्वचोऽनग्निदूषिताः ॥ ४७ ॥ २ ॥

असें मनुवचन आहे. "त्या सर्वेही दंडांना कोठें भोक वगैरे नसावें; ते दिसण्यात सौम्य असावे; त्यांच्या दर्शनामुळें लोकांना उद्वेग उत्पन्न होऊं नये; त्यांची त्वचा शाबूद असावी आणि अग्नीनें ते दूषित झालेले नसावें" असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे.

# ग्रहयज्ञ.

मण्डपस्थापनदिनात्पुरा ग्रहमखं चरेत् ।
दशाहे वाऽथ सप्ताहे ततः प्राङ्नैव तं चरेत् ॥

असें वचन ज्योतिःसागरामध्यें आहे. "मंडपस्थापनेपूर्वी दहा अथवा सात दिवस ग्रहयज्ञ करावा; त्याच्या पूर्वी करूं नये." असा ह्या वचनाचा आशय आहे. ग्रहयज्ञविधान याज्ञवल्क्यस्मृतीमध्यें आहे. तें असें:—

श्रीकामः शान्तिकामो वा ग्रहयज्ञं समाचरेत् ।
वृष्ट्यायुष्पुष्टिकामो वा तथैवाभिचरन्रिपून् ॥ २९४ ॥
सूर्यः सोमो महीपुत्रः सोमपुत्रो बृहस्पतिः ।
शुक्रः शनैश्चरो राहुः केतुश्चेति ग्रहाः स्मृताः॥ २९५ ।
ताम्रकात्स्फटिकाद्रक्तचन्दनात्स्वर्णकादुभौ ।
रजतादयसः सीसात्कांस्यात्कार्या ग्रहाः क्रमात्॥२९६॥
स्ववर्णैर्वा पटे लेख्या गन्धमण्डलकेऽपि वा ।
यथावर्णं प्रदेयानि वासांसि कुसुमानि च ।
गन्धाश्च बलयश्चैव धूपो देयश्च गुग्गुलुः ॥ २९७ ॥
कर्तव्या मन्त्रवन्तश्च चरवः प्रतिदैवतम् ।
आकृष्णेन इमं देवा अग्निर्मूर्धा दिवः ककुत् ।
उद्बुध्यस्वेति च वचो यथासंख्यं प्रकीर्तिताः ॥२९८॥
बृहस्पते अतियदर्यस्तथैवान्नात्परिस्रुतः ।
शं नोदेवीस्तथा काण्डात्केतुं कृण्वन्निमा अपि ॥२९९॥
अर्कः पलाशः खदिरस्त्वपामार्गोऽथ पिप्पलः ।
उदुम्बरः शमी दूर्वाः कुशाश्च समिधः क्रमात् ॥३००॥
एकैकस्याष्टशतकमष्टाविंशतिरेव वा ।
होतव्या मधुसर्पिर्भ्यां दध्ना क्षीरेण संयुताः ॥ ३०१ ॥
गुडौदनं पायसं च हविष्यं क्षीरषाष्टिकम् ।
दध्योदनं घृताद्यं च कृसरामिषचित्रकम् ॥ ३०२ ॥
दद्याद्ग्रहक्रमादेतद्द्विजेभ्यो भोजनं बुधः ।
शक्तितो वा यथालाभं संस्कृत्य विधिपूर्वकम्॥३०३॥
धेनुः शङ्खस्तथाऽनड्वान्हेम वासो हयः क्रमात् ।
कृष्णा गौरायसं छाग एता वै दक्षिणाः स्मृताः॥३०४॥
यश्च यस्य यदा दुःस्थः स तं यत्नेन पूजयेत् ।
ब्रह्मणैषां वरो दत्तः पूजिताः पूजयिष्यथ ॥ ३०५ ॥
ग्रहाधीना नरेन्द्राणामुच्छ्रयाः पतनानि च ।
भावाभावौ च जगतस्तस्मात्पूज्यतमा ग्रहाः ॥३०६॥

" फलप्रदानाविषयीं तयार झालेलें जें पातक त्याच्या निवारणाला शांति असें ह्मणतात. ऐश्वर्याची, शांतीची, वृष्टीची, आयुष्याची, पुष्टीची अथवा शत्रुनाशाची ज्याला इच्छा असेल त्यानें ग्रहयज्ञ करावा २९३,२९४. रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि, राहु व केतु हे ग्रह होत २९५. सूर्याची प्रतिमा तांब्याची करावी; चंद्राची स्फटिकाची करावी; मंगळाची प्रतिमा रक्तचंदनाची करावी; बुध व गुरु ह्यांच्या प्रतिमा सोन्याच्या कराव्या; शुक्राची प्रतिमा रुप्याची करावी; शनीची प्रतिमा लोखंडी करावी; राहूची प्रतिमा शिशाची करावी आणि केतूची प्रतिमा काशाची करावी. प्रतिमा करावयाचें सामर्थ्य नसल्यास त्या त्या ग्रहांच्या रंगाचीं चित्रें वस्त्रावर काढावीं; किंवा तसेंहीं होणें शक्य नसल्यास गंधांच्या मंडळावर ग्रह काढावे २९६. ज्या ज्या ग्रहाचा जो जो वर्ग असेल त्या त्या ग्रहाला त्या त्या रंगाचीं वस्त्रें, पुष्पें, गंध व बलि हीं अर्पण करावीं आणि धूपाकरितां गुग्गुलु द्यावा. नंतर प्रत्येक ग्रहदेवतेप्रीत्यर्थ चरूचा होम करावा २९७. आकृष्णेन इत्यादि मंत्र नऊ ग्रहांचे होत २९८,२९९. (ज्याच्या शाखेंत जसा ह्या मंत्रांचा पाठ असेल तसे मंत्र त्यानें ह्मणावे) रुई, पळस, खैर, अघाडा, पिंपळ, उंबर, शमी, दूर्वा आणि दर्भ ह्या ग्रहांच्या समिधा क्रमानें होत ३००. एकेका ग्रहाला उद्देशूनएकशेंआठ अथवा अठ्ठावीस समिधांचें हवन करावें. त्या समिधा मध, तूप, दहीं व दूध ह्यांनीं माखलेल्या असाव्या ३०१. ग्रहांच्या प्रीत्यर्थ ब्राह्मणांना भोजन घालावयाचें तें येणेंप्रमाणें. सूर्यप्रीत्यर्थ गुळ व ओदन, चंद्राकरितां दुधांत शिजविलेला भात; मंगळाकरितां हविष्य; बुधाकरितां दूध व साठ्या तांदुळाचा भात; गुरूकरितां दहींभात; शुक्राकरितां तूपभात; शनीकरितां कृसर ह्मणजे तिलमिश्र ओदन; राहूकरितां आमिष आणि केतूकरितां चित्रान्न. मुख्य पदार्थ न मिळाल्यास जे

पदार्थ मिळतील त्यांच्या योगानें ब्राह्मणभोजन घालावें ३०२,३०३. नवी व्यालेली गाय, शंख, गाडा ओढण्यास समर्थ असलेला बैल, सुवर्ण, वस्त्र, अश्व, काळी गाय, लोखंड व शेळी ह्या दक्षिणा क्रमानें समजाव्या ३०४. सर्व ग्रहांचें पूजन करण्यास सामर्थ्य नसेल तर जो ग्रह ज्याला अनिष्ट असेल त्यानें त्यांचें यथाविधि पूजन करावें. कारण, "तुमचें पूजन झालें असतां तुम्ही ही पूजा करणाऱ्याचे मनोरथ सिद्धीस न्याल" असा ब्रह्मदेवानें त्यांना वर दिला आहे ३०५. राजांचें ऐश्वर्य, विपत्ति, जगताचा उदय आणि जगताचा प्रलय ह्या गोष्टी ग्रहांवरच अवलंबून असल्यामुळें ग्रह अत्यंत पूज्य होत. ३०६ ग्रहांच्या पूजनासंबंधानें मत्स्यपुराणप्रभृति पुराणग्रंथांतून पुष्कळ वचनें आहेत. परंतु, प्रसिद्ध याज्ञवल्क्यस्मृतींतील वचनें येथें दिलीं आहेत वेदामध्यें ग्रहांचा उल्लेख कोठें कोठें आहे. परंतु, रवि, चंद्र, गुरु व राहु ह्यांचाच प्रायः तो आढळतो. ह्यांशिवाय इतर ग्रहांचा उल्लेख माझ्या आढळण्यांत नाहीं. सूर्यादिकांना ग्रह ही संज्ञा आहे. ह्यावरूनच त्यांचा परिणाम प्राण्यावर होत असतो असें ठरतें. ग्रह ह्मणजे ग्रहण; पकडणें. समुद्राला येणाऱ्या भरतीओहोटीवरून जसें चंद्राचें आकर्षण असल्याचें स्पष्ट समजतें तसें सूर्यादि ग्रहांचें असलेलें आकर्षण समजत नाहीं. परंतु, त्यांचें आकर्षण आहे आणि ह्मणूनच त्यांना ग्रह अशी संज्ञा आहे. पाश्चात्य लोक सूर्याच्या भोंवतीं फिरणाऱ्यांना ग्रह असें ह्मणतात; सूर्याला ते ग्रह मानीत नाहींत. परंतु, आर्यांच्या ज्योतिःशास्त्रामध्यें ग्रह हीं जी संज्ञा आलेली आहे ती मुख्य व त्याच्या भोंवतीं फिरणारे अशा समजुतीनें आलेली नाहीं. जे आकर्षण करितात, पछाडितात, ग्रस्त करितात अथवा कचाट्यांत धरितात ते ग्रह. अशा दृष्टीनें ग्रहसंज्ञा स्वयंप्रकाश रवि व परप्रकाश चंद्रादिक ह्यांना प्राप्त झालेली आहे. आमच्या ज्योतिःशास्त्रांत रवीला ग्रह

अशी संज्ञा असल्यामुळें इंग्रजी तऱ्हेनें खगोलाचें ज्ञान झालेले लोक नाक मुरडीत असतात. परंतु ,ज्याच्या आकर्षणाचा परिणाम भूतलावरील सर्व सचेतन व अचेतन वस्तूंवर होतो त्याला ग्रह अशी अन्वर्थक संज्ञा आमच्या ज्योतिःशास्त्रांत दिलेली आहे. पाश्चात्य ज्योतिष्यांच्या मतानें चंद्र हा सूर्याच्या भोंवतीं फिरणारी जी पृथ्वी तिच्या भोंवतीं फिरणारा असल्यामुळें उपग्रह मानिलेला आहे. परंतु, आमच्या ज्योतिःशास्त्रामध्यें त्याला मोठा ग्रह मानिलेला आहे. कारण, त्याचें आकर्षण सर्वांपेक्षां जास्त आहे. मुहूर्त वगैरेंची भिस्त विशेषतः चंद्रावर असण्याचें कारण तरी हेंच. राशिकुंडली म्हणून एक स्वतंत्र कुंडली असण्याचें कारण तरी हेंच. वधूवरांमध्यें जे वर्ण, वश्य इत्यादिकांसंबंधानें गुण बघत असतात त्याचें मूळ चंद्रच असण्याचें कारण तरी हेंच. नक्षत्रांमध्यें चंद्र श्रेष्ठ असें श्रुतिस्मृतींत असण्याचें कारण हेंच होय. नक्षत्राच्या ताऱ्यांपेक्षां चंद्राचा आकार, वजन वगैरे अधिक आहे असें समजून चंद्र श्रेष्ठ असें म्हटलेलें नाहीं. प्रायः प्रत्येक कार्याला चंद्रबल अवश्य पाहत असतात ह्याचें कारणही हेंच होय.

शुक्राचा प्रकाश नक्षत्रांच्या प्रकाशापेक्षां अधिक आहे. गुरु, शनि इत्यादिकांपेक्षां शुक्र वस्तुतः जरी लहान आहे तरी दिसण्यांत मोठा आहे. कारण, आपणांला तो गुरुशनींपेक्षां जवळ आहे. रात्रीं प्रकाशित होणाऱ्यांमध्यें चंद्राच्या खालोखाल शुक्राचाच प्रकाश असतो हें प्रत्यक्ष सिद्ध आहे. ह्या कारणामुळें चंद्राच्या खालोखाल शुक्राचें बल असलें पाहिजे असें वाटतें. परंतु, ज्योतिःशास्त्रांत शुक्रबल असा शब्दच आढळत नाहीं. रविबल, चंद्रबल व गुरुबल अशीं तीनच ग्रहांचीं बलें आमच्या ज्योतिःशास्त्रामध्यें विचाराकरितां घेतलेलीं आहेत. शुक्रबल न मानण्याचें कारण शुक्र हा क्षितिजावर

फारच कमी असतो व शुक्र हा जेव्हां उदित असतो तेव्हांही तो सरासरी अहोरात्रकालाच्या अष्टमांशकालापेक्षां क्षितिजावर जास्त नसतो. सुमारें सात अष्टमांशकालपर्यंत तो सूर्यप्रभेनें आच्छादितच असतो. जेव्हां तो अस्तंगत असतो तेव्हां तो क्षितिजावर मुळींच नसतो हें उघडच आहे. क्षितिजावर शुक्राचें अस्तित्व फारच कमी असल्यामुळें हा दिसण्यांत जरी मोठा आहे तरी त्याचें बल मानिलेलें नाहीं. उदय व अस्त हेंच त्याचें बल व बलाभाव ह्मणून मानिले आहेत. शुक्र हा कोणत्याही तार्‍यांपेक्षां अधिक प्रकाशणारा असल्यामुळें त्याच्या आकर्षणाचा परिणाम होतच असतो; ह्मणून त्याच्या उदयास्तांचा विचार केलेला असतो. बुध हा शुक्रापेक्षांही कमी कालपर्यंत क्षितिजावर असल्यामुळें व तो दिसण्यांतही फार लहान असल्यामुळें त्याचें आकर्षणच कमी असतें; ह्मणून त्याच्या अस्ताचा विचार मुहूर्तासंबंधानें प्रायः कोणीही करीत नाहींत. शिवाय, त्याचा आकार चंद्र सोडून कोणत्याही ग्रहापेक्षां फारच कमी आहे. मंगळ हा पृथ्वीच्या जवळ आहे; ह्मणून त्याच्या बलाबलाचा विचार मुहूर्तामध्यें अवश्य असावा असें वाटतें; परंतु, तो शुक्रापेक्षांही पृथ्वीपासून जवळ जवळ दुप्पट लांब असल्यामुळें व त्याचा आकारही शुक्राच्या आकारापेक्षां कमी असल्यामुळें बल ह्मणून त्याच्या आकर्षणाचा विचार केला नाहीं. गुरु हा तर मंगळापेक्षां फारच लांब आहे. तथापि, त्याच्या बलाचा विचार मुहूर्तज्योतिषामध्यें अवश्य केलेला असतो. ह्याचें कारण सूर्याशिवाय त्याच्याइतका मोठा ग्रह कोणीही नाहीं हे होय. ह्याचा आकार मंगळापेक्षां सुमारें वीसपट आणि शुक्रापेक्षां बारापट असल्यामुळें ह्याच्या बलाबलाचा विचार मुहूर्तांत केलेला असतो. शनीचें बल कोणी पहात नाहींत. ह्याचें कारण तो गुरूपेक्षांही दुप्पट लांब आहे आणि आकारानें जरी रवीशिवाय इतर ग्रहांपेक्षां मोठा आहे तरी

गुरूपेक्षां लहान आहे. गुरुबल पाहण्याचें कारण दुसरेंही आहे.

बृहस्पतिः प्रथमं जायमानः । महो ज्योतिषः परमे व्योमन् ।
सप्तास्यस्तुविजातो रवेण । विसप्तरश्मिरधमत्तमांसि १
बृहस्पतिः समजयद्वसूनि । महो व्रजान्गोमतो देव एषः ।
अपः सिषासन्सुवरप्रतीत्तः । बृहस्पतिर्हन्त्यमित्रमर्कैः २

अशी श्रुति तैत्तिरीय ब्राह्मणामध्यें आहे. ह्या श्रुतीकडे लक्ष्य दिलें असतां ह्या सूर्यमालेचा मुख्य उत्पादकच बृहस्पति असावा असें दिसतें. "बृहस्पति जेव्हां प्रथम उत्पन्न झाला तेव्हां तो अतिउंच आकाशामध्यें फारच प्रकाशमान होता. परंतु, त्याचा, ध्वनीनें युक्त असा स्फोट झाला व तो सप्तास्य झाला; ह्मणजे त्याचे सात विभाग झाले. ( अस्=फेंकणें ह्या धातूपासून सप्तास्य ह्या ठिकाणाचा अस्य शब्द आहे. अस्य=बाहेर फेंकला गेलेला भाग. ज्याचे सात भाग बाहेर फेंकले गेलेले आहेत तो सप्तास्य. ) सप्तकिरणांनीं युक्त असलेला सूर्यही तोच झाला व त्यानें अंधकाराचा नाश केला." असें पहिल्या मंत्रांत सांगितलें आहे. ज्योतिषो महः ह्मणजे कोणत्याही प्रकाशमान ज्योतीपेक्षां अत्यंत प्रकाशमान. भाष्यकारांनींही ( अन्यदीयात्प्रकाशादत्यन्तं महान्भासते । ) असा ह्या दोन पदांचा अर्थ केलेला आहे. बृहस्पतीचेच जे सात विभाग झाले त्यांतील मुख्य विभागच सूर्य असें मानिल्याशिवाय ज्योतिषो महः हीं पदें बृहस्पतीसंबंधानें सुसंगत होणार नाहींत आणि सप्तरश्मिः हें विशेषणही बृहस्पतीला यथार्थ लागू होणार नाहीं. आतां दुसऱ्या मंत्रांतील कांहीं पदांचा विचार करूं. बृहस्पति हा वृष्टि करण्याकरितां सर्वदा स्वर्गामध्यें राहिलेला आहे असें दुसऱ्या मंत्राच्या तिसऱ्या वाक्यांत सांगितलेलें आहे आणि आदित्याज्जायते वृष्टिः अशी मनुस्मृति असून "याभिरादित्यस्तपति रश्मिभिस्ताभिः पर्जन्यो वर्षति" अशी श्रुतिही आहे. ह्यावरूनही सूर्य हा बृहस्पती-

रूप तेजोगोळकांतीलच मुख्य भाग असें होत आहे. चवथ्या वाक्यामध्यें बृहस्पति अर्कांच्या योगानें शत्रूचा वध करितो असें ह्मटलें आहे. अर्क ह्मणजे किरणें. सूर्यकिरणांच्या योगानें घातुक प्राण्यांचा नाश होतो ही गोष्ट प्रसिद्ध आहे. त्यावरूनही सूर्य ह्मणजे मूळच्या बृहस्पतीचाच मुख्य भाग. एका मोठ्या तेजोगोलाचा ध्वनियुक्त स्फोट होऊन सात भाग वेगळे वेगळे फेंकिले गेले हें ह्या श्रुतीवरून सिद्ध होत आहे. बृहस्पति हा एक मुख्य भाग कायम राहून त्याच्याशिवाय सात भाग बाहेर गेले किंवा त्याच्यासुद्धां सात भाग झाले हें ह्या श्रुतीवरून निश्चित होत नाहीं. एकंदर सात भाग झाले असें मानिल्यास रवि, बुध, गुरु, शुक्र, पृथ्वी, हर्शेल व नेपचून हे ते सात भाग होत असें समजावें. शनि हा सूर्यापासून निघाला असें समजावें. मंगळ व चंद्र हे पुनरपि पृथ्वीपासूनच वेगळे निघालेले दोन भाग होत. तस्मात्, बृहस्पतिच श्रेष्ठ असल्यामुळें त्याच्या बलाचा विचार मुहूर्तामध्यें केलेला असतो. चैत्रामध्यें मीनार्क असल्यास गुरुबलाची आवश्यकता नाहीं ह्याचें कारण--गुरु हा मीनराशीचा अधिपति आहे व सूर्य हें मूळचें गुरूचेंच रूप आहे--हें होय. अस्तु. चंद्रबल पाहण्याचें कारण त्याचें आकर्षण सर्वांपेक्षां जास्त हें होय. रविबल पाहण्याचें कारण उघड आहे आणि उपनयनाला ह्मणजे द्विजाच्या मुख्य जन्माला गुरुबलच पाहण्याचीं मुख्य कारणें वर दिलीं आहेत. ग्रहयज्ञांतील ग्रहस्थापनेमध्यें सर्वांच्या मध्यभागीं रवीची स्थापना करीत असतात ही गोष्ट विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे.

## उपनयनसंस्कारसंकल्प.

**अस्य कुमारस्य द्विजत्वसिद्धिपूर्वकवेदाध्ययनाधिकारसिद्धिद्वारा श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थमाचार्यपैतृकसावित्रीमातृकमुपनयताख्यं संस्कारं करिष्ये ।**

असा संकल्प संस्काररत्नमालेमध्यें दिलेला आहे. संस्कारकौस्तुभामध्यें "श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं द्विजत्वसिद्धया वेदाध्ययनाधिकारार्थमुपनयनं करिष्ये ।" असा संकल्प दिलेला आहे. हा दोन्ही ठिकाणचा संकल्प फार महत्त्वाचा आहे. सांप्रत वेदाध्ययन करून रहाण्याचे दिवस नाहींत असें जो तो ब्रह्मकुलोत्पन्न ह्मणूं लागला आहे आणि शेंकडा एकही ब्राह्मणानें आपल्या परंपरागत शाखेचें संपूर्ण अध्ययन केलेलें नसतें ही गोष्ट प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध आहे. तेव्हां वेदाध्ययनाची जर खरोखर आवश्यकताच नसेल तर उपनयनसंस्कार हा द्विजत्वसिद्धिपूर्वक वेदाध्ययनाचा अधिकार प्राप्त होण्याकरितांच असल्यामुळें तो ज्या कुलांत वेदाध्ययनाची जरूर वाटत नसेल त्या कुलांत करूंच नये असें माझें पुष्कळ दिवसांपासूनचें ह्मणणें आहे. ज्याला कसल्याही प्रवाही अथवा निश्चल उदकांतून जावयाचें नाहीं त्यानें बसण्याकरितां ह्मणून नाव तयार करणें ज्याप्रमाणें व्यर्थ होय त्याचप्रमाणें ज्यांना वेदाध्ययनच नव्हे तर संध्याही अवश्य वाटत नाहीं त्यांनीं आपल्या मुलांचा उपनयन संस्कार करणें व्यर्थ होय. उपनयन संस्काराचा संकल्प वरीलप्रमाणें आहे. तो संकल्प फिरवितां येत नाहीं. परंतु, संकल्प करून तसें न वागणें ही गोष्ट अति भयंकर आहे.

## शपथ करणें.

शपथ करणें ही गोष्ट शिष्ट लोक निंद्य मानितात आणि संभावित लोक खरी गोष्टही शपथेवर सांगत नाहींत. राजदरबारीं दोन पक्षकारांमध्यें कांहीं तंटा चालूं असल्यास त्याच्याशीं संबंध असलेल्या इया लोकांची जबानी व्हावयाची असते त्यांना न्यायदरबाराच्या पद्धतीप्रमाणें शपथ घ्यावी लागते. परंतु, ती मामुली शपथ होय. विशेष शपथ घेण्यास संभावित लोक तयार होत नाहींत. वादीचें

मी कांहीं देणें नाहीं वगैरे मजकूर जबानीमध्यें पुष्कळ लोक सांगतात. परंतु, गंगेंत उभें राहून, हातांत मूल घेऊन किंवा देवाचा निर्माल्य हातीं घेऊन तोच मजकूर शपथेवर सांगण्यास महारही तयार नसतात. शेतांत उभें राहून शेतकरी शपथ वहात नाहीं. धान्य असलेल्या खळ्यामध्यें असतांना कोणीही शपथ वाहणार नाहीं. हातांत धान्य घेऊन खोटी शपथ करण्यास चांडाळांचेंही धैर्य होत नाहीं. धान्याच्या राशीवर बसून खरी शपथ वहाण्यासही कोणी कबूल होत नाहीं. हातांत धान्य घेऊन, हातांत पाणी घेऊन, हातांत मुलें माणसें धरून किंवा देवासमोर खरी शपथ वहाण्याचेंही धैर्य एखाद्याचेंच होतें. परंतु, आपण ब्राह्मण लोक उपनयनसंस्काराच्या संकल्पाचे वेळीं काय प्रकार करीत असतों इकडे लक्ष्य द्या. "ह्या कुमाराला द्विजत्व प्राप्त होऊन वेदाध्ययनाचा अधिकार प्राप्त होण्याच्या द्वारानें परमेश्वर प्रसन्न व्हावा एतदर्थ आचार्य हाच ज्यांतील पिता व सावित्री हीच ज्यांतील माता असा उपनयनसंज्ञक संस्कार मी ह्या कुमाराचा करितों" असा उपनयनसंकल्पाचा अर्थ आहे. हा संकल्प करण्याचे पूर्वी इष्ट देवता, कुलदेवता, ग्रामदेवता इत्यादिकांची-मनांत आणिलेलें मंगलकार्य निर्विघ्नपणें पार पडण्यासाठीं-दक्षिणातांबूलसमर्पणपूर्वक प्रार्थना करावी लागत असते. ही प्रार्थना अनेकांच्या समक्ष होत असते. जो तो आपल्या शक्तीप्रमाणें आपले इष्ट, मित्र, आप्त, बांधव व ब्राह्मण ह्यांना संकल्पाचे वेळीं बोलावून आणीत असतो. ब्राह्मण व आप्त वगैरे भोंवतालीं बसलेले असतात. दीपरूप अग्निदेवता संनिधच ठेविलेली असते. ज्या पीठावर बसावयाचें असतें त्या पीठावरही कोठें कोठें धान्य घातलेलें असतें. हातांत सर्वदेवतारूप उदक घेतलेलें असतें. धान्यामध्यें श्रेष्ठ जे तांदुळ तेही हातांत घेतलेले असतात. संकल्प करणाऱ्या-

ची बायको आणि ज्याच्याकरितां संकल्प करावयाचा तें अपत्य ह्यांचा प्रत्यक्ष स्पर्श झालेला असतो. ह्मणजे वेदाध्ययन मुलाला सांगण्याचा ज्याचा उद्देश मुळींच नसतो तो मनुष्य सर्व देवतांसमक्ष, विद्वान् ब्राह्मणांच्या साक्षीनें, आप्त, इष्ट मित्र वगैरेंना साक्षी ठेवून, धान्यराशीवर बसून, मुलें माणसें अगदीं जवळ चिकटून घेऊन, बायकोवरही तितकीच जबाबदारी आहे हें तिच्या मनांत बिंबविण्याकरितां आपल्या हाताला तिचा हात लावून घेऊन, हातांत धान्य घेऊन व सर्व देवतारूप उदक घेऊन वेदाध्ययनाचा अधिकार प्राप्त होण्याकरितां मी ह्याचा उपनयन संस्कार करणार अशी अति भयंकर खोटी शपथ करीत असतो. त्यावेळीं समीप असलेल्या इष्टमित्रांपैकीं कोणीही त्या शपथेप्रमाणें वागण्याविषयीं त्याला नुसतें सुचवीत देखील नाहींत. अमक्या अमक्या मनुष्यानें खोटी शपथ वाहिल्यामुळें त्याची अमुक अमुक हानि झाली अशा प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टी सर्व ठिकाणीं कांहींना कांहीं तरी ठाऊक असतात. तथापि संकल्प करितेवेळीं आपण काय करीत आहों ह्याचें भान कोणालाही रहात नाहीं. ह्यास्तव, देवतादिकांसमोर असली खोटी शपथ करून त्यांचा भयंकर क्रोध संपादन करण्यापेक्षां त्या उपनयन-संस्काराची व ब्राह्मण्याची गरज न बाळगणें हेंच श्रेयस्कर नव्हे काय? तथापि उपनयन संस्कार जर अवश्य करावयाचा असेल तर ह्या भयंकर संकल्पांतून मुक्त होण्यापेक्षां आपली जी परंपरागत वेदशाखा असेल तिचें अध्ययन मुलांकडून करविणें अवश्य आहे. वेद कंठगत करणें जर कठिण असेल तर स्वशाखेचें गुरुपूर्वक अध्ययन, एकदा गुरूनें सांगणें व तें तीन वेळां शिष्यानें ह्मणणें अशा रीतीनें तरी संपवून टाकावें. प्रत्येक महिन्याला सुमारें वीस स्वाध्याय दिवस असतात. एक वेळ दोनदान चार चार अक्षरें गुरूनें सांगणें व तीन वेळां शिष्यानें ह्मणणें अशा रीतीनें रोज दोन तास खर्च

केल्यास महिना दहा अध्यायांची संथा होईल व सुमारें एका वर्षांत शाखा संपून जाईल. दोन तासांपेक्षां जास्त वेळ बसल्यास वर्षापेक्षांही दिवस कमी लागतील. ह्यास्तव, उपनयनसंस्कार करणाऱ्यांनीं आपल्या मुलांकडून अशा रीतीनें तरी शाखाध्ययन अवश्य करवावें; म्हणजे परमेश्वराचा विशेष कोप होणार नाहीं.

## संस्काराभास.

ह्या लेखकाला पौरोहित्य करण्याचे प्रसंग अनेक वेळां आलेले असल्यामुळें संस्कारप्रसंगीं देवतांची कशी अवहेलना होत असते व संस्कार हें कृत्य अतिमहत्वाचें असतांना त्याची कशी थट्टा उडविली जात असते हें पुरें पुरें त्याला ठाऊक आहे आणि म्हणूनच असला अनिष्ट प्रकार न होऊं देण्याविषयीं संस्कार करणाऱ्या प्रत्येक यजमानानें दक्ष असलें पाहिजे अशी त्याची विनंति आहे. पुण्याहवाचनाचे वेळीं गणपति, वरुण, इत्यादि मोठ्यामोठ्या देवतांचें आवाहन झालेलें असतें. परंतु, देवता अदृश्य असल्यामुळें यजमान व ब्राह्मण ह्या दोघांनाही तेथें कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं समर्थ असलेले देव आपल्या बोलावण्यावरून आलेले आहेत हें भान नसतें. ह्यामुळें पुरोहित बुवा लवकर उरकण्याकरितां कशींवशीं वेडींवांकडीं अक्षरें तोंडांतून भराभर काढीत असतात. जें मंत्र यजमानानेंच म्हणावयाचें असतात ते मंत्र त्या त्या वेळीं वास्तविक यजमानाकडून म्हणविले पाहिजेत. ही गोष्ट कोणाच्याच लक्ष्यांत येत नाहीं. जानव्याचा मंत्र ज्याला येत नसतो तो जानवें दुसऱ्याकडून मंत्रून घेतो आणि जानवें घालण्याचा मंत्र ज्याचा त्याला स्वतःच म्हणावा लागत असतो. ही नेहमींच्या परिचयांतील गोष्टही संस्काराचे वेळीं यजमान व उपाध्याय ह्यांच्या लक्ष्यांत रहात नाहीं. ज्याला यज्ञोपवीताचा मंत्र येत नाहीं त्याच्यापाशीं जानवें देणें व दुसऱ्यानें लांब राहून कसा

वसा मंत्र ह्मणणें ह्या प्रकारानें जानवें मंतरलें गेलें असें कोणीही समजत नाहीं. तेव्हां यज्ञोपवीताचा संस्कार करणाऱ्यानेंच ज्याप्रमाणें संस्कारक मंत्र उच्चारण्याची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणें कुमाराचे उपनयनादि संस्कार करणाऱ्यानेंच संस्कारक मंत्र उच्चारण्याची आवश्यकतां आहे. तेव्हां अपत्यांचा संस्कार करणाऱ्यानें ह्मणावयाचें मंत्र त्याला तोंडानें येत नसल्यास उपाध्यायानें त्याच्या धारणाशक्तीचें मान पाहून त्याच्याकडून ते मंत्र त्यावेळीं ह्मणवावे. असें केलें तरच संस्कार होईल; नाहीं तर संस्कारच होणार नाहीं. सांप्रत संस्कार करणारा मंत्र ह्मणत नाहीं व त्याला मंत्र येत नसल्यामुळें ब्राह्मणांनाही मंत्र यथाविधि उच्चारिले जाण्याची जबाबदारी वाटत नाहीं. यजमानानें ह्मणावयाचे मंत्र ब्राह्मण स्वतः ह्मणत असतात व त्यावेळीं यजमान घरीं आलेल्या पाहुण्याशीं किंवा दुसऱ्या कोणाशीं तरी चालू असलेल्या समारंभासंबंधानें कांहीं तरी भलत्याच गोष्टी बोलत असतो. कार्यांत विघ्न न येण्याकरितां जर देवांची पूजनपूर्वक प्रार्थना करावयाची आहे तर ती प्रार्थना करिते वेळीं योग्य ती मुद्रा यजमानाची असली पाहिजे व त्याचें वर्तनही त्या मंगल कृत्याला साजण्यासारखेंच असलें पाहिजे. देवतांचें आवाहन करून त्या संमुख बसविल्यानंतर भलत्याच चेष्टा त्यांच्या समोर करीत राहिल्यानें त्यांचा आशीर्वाद मिळण्याचे ऐवजीं शाप मात्र मिळेल. तिसऱ्या वर्गाच्या न्यायाधीशापुढें जबानी वगैरे देण्याचा किंवा त्याच्या मर्जीवर अवलंबून असलेली एकादी गोष्ट करून घेण्याचा जर कोणाला प्रसंग आला तर तो त्या न्यायाधीशाशी अति अदबीनें वागत असतो. जबानी देतांना न्यायाधीशाशिवाय दुसरीकडे पाहणें, हंसणें, जबानीशीं संबंध नसलेल्या भलत्याच गोष्टी तिऱ्हाइशीं करीत राहणें, उर्मटपणानें अथवा उद्वेजक स्वरानें जबानी देणें, जबानी

देतांना न्यायाधीशाकडे पाठ करणें, काडी ओढून विडी पेटविणें व ओढणें, चंची सोडून तंबाखु खाऊं लागणें, तपकीर ओढणें इत्यादिकांपैकीं कोणतीही गोष्ट जबानी देणाऱ्याच्या हातून घडण्यानें जर न्यायाधीशाची बेअदबी होत असते तर संस्कारकाळीं ज्या कर्मदेवतांची प्रीति संपादन करण्याकरितां अनुष्ठान चाललेलें असत त्या अनुष्ठानाचे वेळीं अनुष्ठान करणाऱ्यानेंच जर भलते भलते चाळे केले तर त्या कर्मदेवतांचा कोपच होईल. सर्व पृथ्वीचा अधिपति एकच सार्वभौम राजा आहे अशी कल्पना केली असतां तिसऱ्या वर्गाच्या न्यायाधीशापाशीं त्याच्या तेजाचा कितवा अंश येत असतो हें सहज समजण्यासारखें आहे. समुद्रवलयांकित सर्व पृथ्वीचा एकच चक्रवर्ती सार्वभौम राजा आहे अशी कल्पना केल्यास त्याच्यापेक्षां मनुष्य गंधर्व शतपट श्रेष्ठ असतो. मनुष्यगंधर्वापेक्षां देवगंधर्व शतपट श्रेष्ठ असतो. देवगंधर्वापेक्षां चिरलोकलोक पितर शतपट श्रेष्ठ असतात. त्या पितरांपेक्षां आजानजान देव शतपट श्रेष्ठ असतात आणि त्या देवांपेक्षां कर्मदेव शतपट श्रेष्ठ असतात. तेव्हां प्रत्यक्ष सार्वभौम राजापुढें जाऊन---आपणांला आपल्या अपराधाबद्दल त्यानें क्षमा करावी ह्मणून—त्याची प्रार्थना करण्याचा प्रसंग आल्यास आपणांला जितकें अदबीनें वागावें लागेल त्याच्यापेक्षां खर्वपट ह्मणजे सहस्रकोटिपट श्रेष्ठ असलेल्या कर्मदेवांच्या समोर आपणांला व्यवस्थित व अदबीनें वागलें पाहिजे, ही भावना एकसारखी मनांत बाळगूनच संस्कार करणाऱ्या यजमानांनीं व उपाध्यायांनीं वागावें हें श्रेयस्कर होय. समुद्रवलयांकित पृथ्वीच्या अधिपतीपेक्षां कर्मदेवता सहस्रकोटिपट श्रेष्ठ असतात हें तैत्तरीयोपनिषदाच्या ब्रह्मवल्लींतील आठव्या खंडांत सांगितलें आहे.

यजमानाकडून संस्कारसमयीं मंत्र न ह्मणवितां उपाध्यायानेंच

ते ह्मणावयाचे असा श्रीमंती (?) प्रघात पडल्यामुळें यजमानांना या संस्कारसमयीं वेगळया गोष्टी करण्याची फुरसत सांपडते. मंत्र ह्मणण्याचा प्रचार सुरू केल्यास संस्कारसमयीं दुसऱ्याच गोष्टी यजमानानें करण्याचा अनिष्ट प्रकार आपोआप बंद होईल. संस्कारसमयीं मंत्र उच्चारणें ज्या यजमानांना शक्य नसेल त्यांनीं निदान उपाध्याय काय मंत्र ह्मणत आहे इकडे एकाग्र चित्त ठेवणें तरी अवश्य आहे आणि उपाध्यायाकडून उच्चारिल्या जाणाऱ्या मंत्रांतील प्रत्येक अक्षर मनामध्यें उच्चारणें अवश्य आहे. उपाध्यायानेंही आपण मंत्र ह्मणत असतांना यजमानाला आपलें ह्मणणें ऐकून मनामध्यें त्या मंत्रांतील अक्षरें क्रमानें उच्चारितां येतील अशा रीतीनें ते मंत्र सावकाश ह्मटले पाहिजेत. परंतु, सांप्रत पुष्कळ ठिकाणीं योग्य प्रकारानें मंत्रच उच्चारिले जात नाहींत.

गायत्र्युपदेश हें उपनयन संस्कारांतील मुख्य कर्म होय. ह्या कर्माचे वेळीं वेदाध्ययनसंबंधीं सर्व नियमांचें परिपालन अवश्य केलें पाहिजे आणि चित्त अतिशय शुद्ध व एकाग्र ठेऊन उपदेश केला पाहिजे. परंतु, गायत्र्युपदेश व तदंगभूत कर्म चालू असतांना समारंभाकरितां आलेल्या लोकांचें आदरातिथ्य करण्यांत यजमान गुंतलेला असतो. समारंभाला आलेल्या मनुष्याची आपण आलों आहों हें यजमानाला समजावें अशी इच्छा असते. त्यामुळें समारंभाला येतांना किंवा परत जातांना तो यजमानाचें लक्ष्य आपणाकडे ओढण्याची व्यवस्था करीत असतो व यजमानही नुसतें डोकें थोडें खालीं करणें, हंसणें, छातीपर्यंत हात नेणें, हात जोडून डोक्यापर्यंत नेणें व त्याला बरें वाटेल असे शब्द बोलणें इत्यादि प्रकारांपैकीं एकादा प्रकार करून त्याची बोळवण करीत असतो. गायत्र्युपदेश करणें ह्मणजे जन्म देणें होय. ह्यास्तव, स्त्रीचे ठिकाणीं शुक्राची स्थापना करितेवेळीं ज्याप्रमाणें स्थापना करणारा दुसऱ्या कोणाशींही बोलत नाहीं व

अगदीं एकाग्र असतो त्याचप्रमाणें गायत्र्युपदेशाचे वेळीं व तदंगभूत कर्माच्या अनुष्ठानाचे वेळीं उपदेश करणाऱ्यानें अत्यंत एकाग्र व दक्ष असलें पाहिजे. शुक्रस्थापनेचे वेळीं अस्वलाचें चित्र स्त्रीच्या डोळ्यासमोर असल्यामुळें होणाऱ्या अपत्याचा एक पंजा हुबेहुब अस्वलाच्या पंजासारखाच झाला; समागमाचे वेळीं शिपायांची कवाइत लक्ष्यांत आल्यामुळें मुलगा शिपाई निपजला; ऋतुस्नात झाल्यावर रस्त्यांत उभ्या असलेल्या एका शिद्याकडे लक्ष्य गेल्यामुळें एका साध्वी ब्राह्मणी स्त्रीलाही अपत्य एका शिद्याप्रमाणेंच झालें; इत्यादि उदाहरणें जर इतिहासप्रसिद्ध आहेत तर गायत्र्युपदेश व तदंगभूत कर्मं ह्यांचे वेळीं संस्कार करणारा व कुमार ह्यांपैकीं एकाचें अथवा दोहोंचेंही लक्ष्य दुसऱ्याच गोष्टीकडे असल्यास परिणाम चांगला कसा होईल ? अत्यंत शुद्ध, दक्ष व एकाग्र राहूनच पित्यानें पुत्राचा उपनयन संस्कार केला पाहिजे.

## ब्राह्मण्य अथवा द्विजत्व.

**जन्मना जायते शूद्रः संस्कारैर्द्विज उच्यते।**

असें स्मृतिवचन आहे. ह्यावरून ब्रह्मकुलोत्पन्नही जन्मतः शूद्रतुल्यच असतो व उपनयन संस्काराच्या योगानें त्याला द्विजत्व प्राप्त होत असतें असें ठरतें.

**मातुरग्रेऽधिजननं द्वितीयं मौञ्जिबन्धने ॥**
**तृतीयं यज्ञदीक्षायां द्विजस्य श्रुतिचोदनात् ॥ १६९ ॥ अ०२॥**

असें मनुवचन आहे. " मातेपासून पहिला जन्म होत असतो; मौञ्जीबंधनसमयीं दुसरा जन्म होत असतो आणि यज्ञदीक्षेचे वेळीं द्विजाचा तिसरा जन्म होत असतो. " असें ह्या वचनांत सांगितलें आहे.

**नाभिव्याहारयेद्ब्रह्म स्वधानिनयनादृते ।**

शूद्रेण हि समस्तावद्यावद्वेदे न जायते ॥ १७२ ॥ अ० २ ॥

असेंही मनुवचन आहे. ब्रह्म ह्मणजे वेद. "वेदे न जायते" अशीं पदें वचनामध्यें आहेत. " वेदामध्यें उत्पन्न होण्यापूर्वीं ह्मणजे उपनयन होण्यापूर्वीं द्विजकुलोत्पन्नही शूद्रतुल्य असतो. " असें ह्या वचनांत सांगितलें आहे.

उपाध्यायाद्दशाचार्य आचार्याणां शतं पिता ।
सहस्रं तु पितॄन्माता गौरवेणातिरिच्यते ॥ १४५ ॥ अ० २

असें मनुवचन आहे. ह्या मनुवचनांत पित्याची योग्यता आचार्यापेक्षां शतपट असल्याचें सांगितलें आहे.

उत्पादकब्रह्मदात्रोर्गरीयान्ब्रह्मदः पिता ।
ब्रह्म जन्म हि विप्रस्य प्रेत्य चेह च शाश्वतम् १४६ अ० २

ह्या मनुवचनांत "जनकापेक्षां उपनयन करून वेदप्रदान करणारा आचार्य श्रेष्ठ. कारण, वेदग्रहणाकरितां जो विप्राचा जन्म तो इहपरलोकींही शाश्वत आहे " असें सांगितलें आहे.

कामान्माता पिता चैनं यदुत्पादयतो मिथः ।
संभूतिं तस्य तां विद्याद्यद्योनावभिजायते ॥ १४७ ॥
आचार्यस्त्वस्य यां जातिं विधिवद्वेदपारगः ।
उत्पादयति सावित्र्या सा सत्या साऽजराऽमरा ॥ १४८ ।

ह्या मनुवचनांमध्यें उपनयनसंस्कारानें होणारा जो वेदाध्ययनाकरितां जन्म तोच खरा व अजरामर जन्म असें ह्मटलें आहे आणि रतिसुखार्थ प्रवृत्त झालेल्या मातापितरांपासून प्राप्त होणारा जो जन्म तो केवळ मनुष्यदेह देणारा जन्म होय असें सांगितलें आहे. ह्यावरून ब्राह्मण्यप्राप्ति किती महत्त्वाची आहे हें कळेल.

उत्तमाङ्गोद्भवाज्ज्यैष्ठ्याद्ब्रह्मणश्चैव धारणात् ।
सर्वस्यैवास्य सर्गस्य धर्मतो ब्राह्मणः प्रभुः ॥ ९३ ॥ अ० १

" परमेश्वराच्या मुखरूप श्रेष्ठ अवयवापासून उत्पन्न झाल्यामुळें,

इतर वर्णांच्या पूर्वी उत्पन्न झाल्यामुळें आणि वेदाचें धारण करीत असल्यामुळें ह्या सर्व जगताचा अधिपति धर्मतः ब्राह्मण होय" असें ह्या मनुवचनांत सांगितलें आहे.

तं हि स्वयम्भूः स्वादास्यात्तपस्तप्त्वाऽऽदितोऽसृजत्।
हव्यकव्याभिवाह्याय सर्वस्यास्य च गुप्तये ॥ ९४ ॥

"त्या ब्राह्मणाला स्वयंभू ब्रह्मदेवानें तपश्चर्या करून दैविक व पैतृक कर्मांकरितां आणि ह्या सर्व जगताच्या रक्षणाकरितां स्वतः-च्या मुखापासून उत्पन्न केलें आहे." असें ह्या मनुवचनांत सांगितलें आहे. ह्यावरून ब्राह्मणावर जगताच्या रक्षणाची केवढी जबाबदारी आहे हें वाचकांच्या लक्ष्यांत येईल. ब्रह्मदेवासारख्या निष्कलंक व अत्यंत पवित्र जगत्स्रष्ट्यानें तपश्चर्या करून ज्याची उत्पत्ति केली त्यानें त्या उत्पत्तीचें चीज करून दाखविणें अवश्य आहे.

यस्यास्येन सदाऽश्नन्ति हव्यानि त्रिदिवौकसः ।
कव्यानि चैव पितरः किं भूतमधिकं ततः ॥९५॥अ०१

"ज्याच्या मुखानें देव आणि पितर आपआपलें अन्न सेवन करितात त्या ब्राह्मणापेक्षां जगतामध्यें कोण बरें श्रेष्ठ असणार आहे?" असा ह्या मनुवचनाचा आशय आहे. ब्राह्मणाचें मुख हें जर देवपितरांचें अन्नसेवनाचें द्वार होय तर त्या द्वाराचा देवांना व पितरांना न आवडणाऱ्या गोष्टींशीं संसर्गही होतां उपयोगी नाहीं हें उघड आहे.

यक्षरक्षःपिशाचान्नं मद्यं मांसं सुरासवम् ।
तद्ब्राह्मणेन नात्तव्यं देवानामश्नता हविः ॥

असें मनुवचन आहे. "मद्य, मांस, सुरा व आसव हें यक्ष, राक्षस व पिशाच ह्यांचें अन्न होय. हें अन्न, देवांचें हवि सेवन करणाऱ्या ब्राह्मणानें सेवन करूं नये." असें ह्या वचनांत सांगितलें आहे. ह्यावरूनच देवांना जें प्रिय नाहीं त्याचा संसर्ग ब्राह्मणानें आपल्या मुखाशीं होऊं देतां उपयोगीं नाहीं. सांप्रत ब्राह्मणांना श्रेष्ठत्व हवें आहे. परंतु, श्रेष्ठ-

त्याचें मूळ आचरणामध्यें आहे ही गोष्ट त्यांच्या लक्ष्यांत नाहीं.

उत्पत्तिरेव विप्रस्य मूर्तिधर्मस्य शाश्वती ।
स हि धर्मार्थमुत्पन्नो ब्रह्मभूयाय कल्पते ॥ ९८ ॥ १ ॥

"ब्राह्मणाची उत्पत्ति ही केवल धर्माची शाश्वती मूर्ति आहे. कारण, तो धर्माकरितांच उत्पन्न झाला आहे आणि ह्मणूनच तो मोक्ष-प्राप्तीला योग्य आहे" असें ह्या मनुवचनाचें तात्पर्य आहे. ब्राह्मणाची उत्पत्ति धर्माकरितां आहे आणि त्याचा देह ह्मणजे केवल धर्माचाच शाश्वत देह आहे असें जर ह्या वचनांत सांगितलें आहे तर धर्मविरुद्ध गोष्टींचा संबंध ब्राह्मणाच्या देहाशीं होतां उपयोगींच नाहीं. ब्राह्मण हा धर्माकरितां उत्पन्न झाला आहे असें जर ह्या वचनांत सांगितलें आहे तर धर्मसंरक्षणार्थ आयुष्य खर्चीं घालणें हेंच ब्राह्मणाचें कर्तव्य होय. ज्याच्याकरितां जें उत्पन्न झालेलें असतें तें त्याच्यापासून प्राप्त न होईल तर उत्पादक त्याच्या संरक्षणाची काळजी घेत नाहीं. उदाहरणार्थः शेतकऱ्यानें कणसें मिळण्याकरितां शाळू वगैरे धान्य पेरिलेलें असतें. अत्यंत श्रम करून जें बीं पेरलें व ज्या बियाचे अंकुरही बरोबर आले त्यांना पुढें जर कणसें आलीं नाहींत किंवा कणसांच्या ऐवजीं काहिनीच उत्पन्न झाली तर शेतकरी काहिनी झालेलीं ताटें (बाकीचें पीक बिघडूं नये ह्मणून) भराभर उपटून टाकीत असतो आणि एकादे वेळेस शेतांत पेरिलेलें बीं चांगलें जोमाचें न दिसल्यास व ह्या उगवलेल्या जित्राबापासून चांगलें पीक येण्याची आशा नाहीं असें शेतकऱ्याला वाटल्यास तो तें पीक लहान आहे तोंच उपटून, नांगरून अथवा कुळवून टाकून दुसरें बीं पेरीत असतो ही गोष्ट तर ठिकठिकाणीं लोकांच्या दृष्टोत्पत्तीस येणारी आहे. मग जगत् उत्पन्न करणाऱ्या विधात्याला सामान्य शेतकऱ्या-इतकी ही अक्कल नाहीं असें कसें ह्मणतां येईल ? ह्या विधात्यानें धर्मसंरक्षणाकरितांच जर ब्राह्मणाची उत्पत्ति केली आहे तर ब्राह्मणाच्या

झातून धर्मसंरक्षण होत नाहीं असें त्याला आढळून येतांक्षणीं त्यानें हें ब्राह्मणजातिरूप पीक ह्या भूतलरूप शेतापासून मृत्युरूप नांगरानें खणून काढणेंच योग्य नाहीं काय ? परंतु, परमेश्वर शेकडो अपराध सहन करणारा दयाळु असल्यामुळें तो ब्राह्मणरूप पीक एकदम खणून काढीत नाहीं. ह्यास्तव, शेतकरी ज्याप्रमाणें कडका पडलेलें शाळवाचें कोंवळें पीक एकदम नांगरून टाकून दुसऱ्या पिकाकरितां जमीन साफ करून ठेवितो त्याचप्रमाणें ह्या विश्वरूप क्षेत्रांत वेगळीं वेगळीं जातिरूप पिकें उत्पन्न करणाऱ्या विधात्याकडून आपण नामशेष होण्याची पाळी येऊं नये एतदर्थ ब्राह्मणांनीं आपण कशाकरितां उत्पन्न झालों आहों हें सदैव लक्ष्यांत ठेवून उत्पादकाचा यत्न सिद्धीस नेण्याविषयीं शक्य तितका यत्न केला पाहिजे.

ब्राह्मणो जायमानो हि पृथिव्यामधिजायते ।
ईश्वरः सर्वभूतानां धर्मकोशस्य गुप्तये ॥ ९९ ॥ अ० १

ब्राह्मण जन्मतःच पृथ्वीमध्यें श्रेष्ठ असतो. कारण, तो सर्व भूतांचा अधिपति आहे व धर्मकोशाच्या रक्षणाकरितां तो उत्पन्न झाला आहे असें ह्या वचनांत सांगितलें आहे.

सर्वं स्वं ब्राह्मणस्येदं यत्किञ्चिज्जगतीगतम् ।
श्रैष्ठ्येनाभिजनेनेदं सर्वं वै ब्राह्मणोऽर्हति ॥ १०० ॥
स्वमेव ब्राह्मणो भुङ्क्ते स्वं वस्ते स्वं ददाति च ।
आनृशंस्याद्ब्राह्मणस्य भुञ्जते हीतरे जनाः ॥ १०१ ॥ १ ॥

अशीं मनुवचनें आहेत. "ह्या जगतामध्यें जें ह्मणून कांहीं धन आहे तें ब्राह्मणाचें आहे. कारण, श्रेष्ठत्वामुळें व उत्कृष्ट स्थानापासून ह्याचा जन्म असल्यामुळें ब्राह्मण सर्व विश्वांतील संपत्तीला पात्र आहे." असें ह्या पहिल्या वचनांत सांगितलें असून "ब्राह्मण स्वतःचेंच खातो, स्वतःचेंच नेसतो आणि दुसऱ्याचें घेऊन जरी

त्यानें तिसऱ्याला दिलें तरी तो स्वतःचेंच देतो. त्याच्या दयालुते- मुळें इतरांना अन्न वगैरे मिळत असतें." असें दुसऱ्या वचनाचें तात्पर्य आहे. ह्यावरून ब्राह्मणाची योग्यता किती आहे हें सहज समजण्यासारखें आहे. परंतु, सांप्रतचे ब्रह्मकुलोत्पन्न ब्राह्मण्याच्या रक्ष- णाची पर्वा करीत नाहींत. ह्मणून ते सर्वांपेक्षां श्रेष्ठ ठरण्याची गोष्ट बाजूलाच राहिली असून सर्वांपेक्षां निकृष्ट मात्र आज झालें आहेत. वेदमंत्र जरी ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या तिघांपाशीं आहेत तरी अध्ययन व अध्यापन ह्यांचा अधिकार ब्राह्मणांनाच अस- ल्यामुळें पूर्णपणें वेदाचा अधिकार ब्राह्मणांनाच आहे. परंतु, ब्राह्मण आचारहीन होत असल्यामुळें मंत्रांचें सामर्थ्य त्यांच्यापाशीं रहात नाहीं.

आचारः परमो धर्मः सर्वेषामिति निश्चयः ।
हीनाचारपरीतात्मा प्रेत्य चेह विनश्यति ॥ १ ॥
नैनं तपांसि न ब्रह्म नाग्निहोत्रं न दक्षिणाः ।
हीनाचाराश्रितं भ्रष्टं तारयन्ति कथंचन ॥ २ ॥
आचारहीनं न पुनन्ति वेदा यद्यप्यधीताः सह षड्भिरङ्गैः ।
छन्दांस्येनं मृत्युकाले त्यजन्ति नीडं शकुन्ता इव जातपक्षाः ॥ ३ ॥

अशीं वचनें वसिष्ठस्मृतीच्या सहाव्या अध्यायामध्यें आहेत. "आचार हाच सर्वांचा श्रेष्ठ धर्म असा सिद्धांत आहे. आचारहीन पुरुषाचा इहलोकीं व परलोकीं नाश होतो १ तप, वेद, अग्निहोत्र व दक्षिणा आचारहीन भ्रष्ट पुरुषाला तारण्यास कोणत्याही प्रकारे समर्थ होत नाहींत २. सहा अंगांसह पढलेले वेदही आचारहीन पुरुषाला पवित्र करीत नाहींत; इतकेंच नव्हे परंतु, पंख फुटलेले पक्षी ज्याप्रमाणें घरटें सोडून चालते होतात त्याप्रमाणें मृत्युकालीं आचारभ्रष्ट पुरुषाला वेद सोडून जातात" ३. असें ह्या वचनांचें

तात्पर्य आहे. विश्वामित्र राजा लक्षावधि सैन्य घेऊन वसिष्ठांच्या आश्रमांत आला. परंतु, आचारसंपन्न वसिष्ठ महर्षींपुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. साप, विंचू इत्यादिकांचें विष हरण करणारे सामान्य मंत्रही ज्यांच्यापाशीं असतात त्यांना सुद्धां त्या त्या मंत्रांच्या संरक्षणाकरितां अवश्य असलेले आचार पाळावे लागतात. त्या आचारसंरक्षणामध्यें कांहीं प्रमाद झाल्यास मंत्र तोंडानें येत असूनही त्यांचा उपयोग होत नाहीं. अशा गोष्टी जर प्रत्यक्ष आहेत तर असल्या मंत्रांपेक्षां अनंतपट श्रेष्ठ जे वेदमंत्र त्यांचें सामर्थ्य आचारहीन पुरुषाचे ठिकाणीं राहणार कोठून? ह्याचकरितां मनुस्मृतीमध्यें आचाराचें श्रेष्ठत्व प्रतिपादिलें आहे.

**आचारः परमो धर्मः श्रुत्युक्तः स्मार्त एव च ।**
**तस्मादस्मिन्सदा युक्तो नित्यं स्यादात्मवान्द्विजः १०८**
**आचाराद्विच्युतो विप्रो न वेदफलमश्नुते ।**
**आचारेण तु संयुक्तः संपूर्णफलभाग्भवेत् ॥ १०९ ॥ १॥**

अशीं मनुवचनें आहेत. श्रुति व स्मृति ह्यांमध्यें उक्त असलेला आचार हा श्रेष्ठ धर्म होय. ह्यास्तव, आपलें हित इच्छिणाऱ्या द्विजानें ह्या आचाराविषयीं सर्वदा तत्पर असलें पाहिजे. आचारभ्रष्ट विप्राला वेदफल प्राप्त होत नाहीं; आचारसंपन्न विप्राला वेदाचें संपूर्ण फल प्राप्त होतें असें" ह्या मनुवचनांचें तात्पर्य आहे.

**सावित्रीमात्रसारोऽपि वरं विप्रः सुयन्त्रितः ।**
**नायन्त्रितस्त्रिवेदोऽपि सर्वाशी सर्वविक्रयी ॥११८॥२॥**

असें मनुवचन आहे."केवळ गायत्रीमंत्र जाणणाराही सदाचारसंपन्न विप्र तीन वेदांचें अध्ययन केलेल्या परंतु, सर्व पदार्थ खाणाऱ्या व सर्व पदार्थ विकणाऱ्या आचारहीन विप्रापेक्षां श्रेष्ठ" असें ह्या वचनांत सांगितलें आहे. सारांश, आचारहीन पुरुषाला वेदमंत्राचा उपयोग कांहीं एक होणार नाहीं.

विद्या ब्राह्मणमेत्याह शेवधिष्टेऽस्मि रक्ष माम् ।
असूयकाय मां मा दास्तथा स्यां वीर्यवत्तमा ॥११४॥
यमेव तु शुचिं विद्यान्नियतं ब्रह्मचारिणम् ।
तस्मै मां ब्रूहि विप्राय निधिपायाप्रमादिने ११५अ०२.

अशीं मनुवचनें आहेत. "विद्या ब्राह्मणाकडे जाऊन ह्मणाली "मी तुझें सर्व प्रकारचें भांडार आहें. तूं माझें संरक्षण कर. तूं निंदकाप्रत मला अर्पण करूं नकोस; ह्मणजे मी अतिशय वीर्यसंपन्न होईन ११. जो शिष्य शुद्ध, जितेंद्रिय व ब्रह्मचारी असेल त्याच प्रमादरहित व विद्यारूप निधीचें रक्षण करणाऱ्या ब्राह्मणाप्रत तूं मला अर्पण कर" असें ह्या वचनांचें तात्पर्य आहे.

विद्या ह वै ब्राह्मणमाजगाम
गोपाय मा शेवधिष्टेऽहमस्मि ।
असूयकायानृजवेऽयताय
न मां ब्रूया वीर्यवती तथा स्याम् ॥
यमेव विद्याः शुचिमप्रमत्तं
मेधाविनं ब्रह्मचर्योपपन्नम् ।
यस्ते न द्रुह्येत्कतमच्चनाह
तस्मै मा ब्रूया निधिपाय ब्रह्मन् ॥

अशी श्रुतिही आहे. ह्या श्रुतीचें तात्पर्य वरील स्मृतिवचवचनांत येऊन गेलेलेंच आहे. सारांश, आचारहीन पुरुषाचे ठिकाणीं वेदविद्येचें वीर्य रहात नाहीं असें श्रुतिस्मृतींवरून सिद्ध आहे.

## संध्यावंदन.

अहरहः सन्ध्यामुपासीत यः सन्ध्यामुपास्ते ब्रह्मैव तदुपास्ते ।

अशी श्रुति आहे. संध्योपासना प्रत्यहीं करावी हा पहिल्या वाक्याचा अर्थ असून जो संध्योपासना करितो तो त्या ब्रह्माचीच उपासना करितो असा दुसऱ्या वाक्याचा आशय आहे. पहिलें विधिवाक्य आहे. तेव्हां प्रत्यहीं जो संध्या करणार नाहीं तो

**विहितस्याननुष्ठानान्निन्दितस्य च सेवनात् ।**
**अनिग्रहाच्चेन्द्रियाणां नरः पतनमृच्छति ॥**

ह्या स्मृतिवचनाप्रमाणें पतित होईल. ह्यास्तव, संध्यावंदन कर्म ब्राह्मणानें अवश्य केलें पाहिजे.

**सन्ध्याहीनोऽशुचिर्नित्यमनर्हः सर्वकर्मसु ।**
**यदन्यत्कुरुते कर्म न तस्य फलभाग्भवेत् ॥**

असें वचन दक्षस्मृतीमध्यें आहे "संध्याहीन पुरुष नित्य अशुचि असतो; ह्मणून तो कोणतेंही कर्म करण्याला योग्य नसतो. सारांश, तो जें जें कांहीं दुसरें कर्म करितो त्याचें फल त्याला प्राप्त होत नाहीं" असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. सांप्रत द्विजवर्गांतील लोक सुखप्राप्तिकरितां व दुःखनिवृत्तीकरितां खटपट करीत आहेत. परंतु, कोणाच्याच खटपटीला यावें तसें यश येत नाहीं. यश न येण्याचीं कारणें अनेक असतील. परंतु, संध्यावंदन न करितां केलेलें कोणतेंही कर्म निष्फल होत असल्यामुळें स्वतःच्या अथवा देशाच्या कल्याणाकरितां ह्मणून ज्या खटपटी द्विजांच्या हातून होत आहेत त्या यशस्वी न होण्याचें कारण खटपटी करणाऱ्या द्विजांची संध्यावंदनकर्मपराङ्मुखता हें ठरत आहे. भरतवर्षांतील लोकांच्या कल्याणाकरितां राष्ट्रीय, प्रांतिक इत्यादि सभा भरविणें, व्याख्यानें देणें, लेख प्रसिद्ध करणें इत्यादि चळवळी सुरू होऊन दोन तपांपेक्षांही अधिक वर्षें होऊन गेलीं आहेत. परंतु, ह्या चळवळी सुरू होण्यापूर्वीं देशांतील लोकांच्या कल्याणाची जी स्थिति होती त्यापेक्षां ह्या चळवळीच्या प्रभावानें कांहीं जास्त चांगली झाली आहे असें जर ह्मणावें तर उलटच प्रकार दृष्टीं पडतो. ह्या चळवळी सुरू झाल्यानंतर जमीनधारा वाढलेला आहे. मद्यपानाच्या व्यसनांत लोक अधिकाधिकच डुबूं लागले आहेत. सोन्याच्या व रुप्याच्या

नाण्यांतील किंमतींत फेरफार झाल्यामुळें ह्या देशांतील द्रव्य ज्या कार्याकरितां एकपटच परदेशांत जात होतें त्या कार्याकरितां सरळ दीडपट जाऊं लागलें आहे. लष्करी खर्च अवाढव्य वाढला आहे. मोहाचीं फुलें वगैरे संबंधानें कायदे पसार झाले आहेत. शिक्षणसंस्थांतून विद्यार्थ्यांना शिक्षणाकरितां द्यावी लागणारी रक्कम वाढली आहे. जमीनीवरील शेतकऱ्याचें स्वत्व डळमळित करण्यासंबंधाचा कायदा पसार झाला आहे. गळिताचीं धान्यें अधिकअधिकच बाहेर जाऊं लागल्यामुळें तेल वगैरे पदार्थ देशांत महागले आहेत. सभाबंदीसंबंधानें कायदे निर्माण झाले आहेत. देशांतील परंपरागत वैद्यकीला नडणारे कायदे पसार होत आहेत. लेखनस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य ह्या गोष्टी जवळ जवळ नामशेष झाल्या आहेत आणि कुळकर्णीवतनासारख्या इतरही कांहीं गोष्टी घडून आल्या आहेत. तेव्हां ह्या चळवळींनीं देशाचा फायदा तो काय झाला? ह्या चळवळींमध्यें मुख्य पुढाकार घेणारे जे कांहीं द्विज अथवा द्विज ह्मणविणारे असतील त्यांपैकीं संध्या करणारे शेंकडा पांच तरी आहेत काय? एका नामदारांनीं अतिशय अटापिट करून शिक्षणसंबंधीं मसुदा आणिला. परंतु, 'याचा परिणाम काय झाला? वरील दक्षस्मृतीमध्यें नामदारांच्या कृतीचा जो परिणाम होईल ह्मणून सांगितला आहे तोच झाला. कारण, त्या नामदारांना देशाची स्थिति कळूं लागल्यापासून तों अखेरपर्यंत त्यांनीं एकदा तरी कधीं संध्या केली होती असें छातीला हात लावून सांगण्यास एक तरी कोणी तयार आहे काय? संध्या न करणाऱ्या मनुष्याचें दुसरेंही कर्म निष्फल होतें असें सांगणाऱ्या स्मृतिवचनाचें प्रत्यंतर ठिकठिकाणीं येत असतें. परंतु, पुढारी ह्मणून गणल्या जाणाऱ्या द्विजांच्या गांवींही ही गोष्ट येत नाहीं.

**रक्षाꣳसि ह वा पुरोनुवाके तपोऽग्रमतिष्ठन्त तान्प्रजापतिर्वरेणोपामन्त्रयत तानि वरमवृणीतादित्यो नो योद्धा इति तान्प्रा-**

जापतिरब्रवीद्योधयध्वमिति तस्मादुत्तिष्ठन्तꣳ ह वा तानि रक्षाꣳस्यादित्यं योधयन्ति यावदस्तमन्वगात्तानि ह वा एतानि रक्षाꣳसि गायत्रियाऽभिमन्त्रितेनाम्भसा शाम्यन्ति तदु ह वा एते ब्रह्मवादिनः पूर्वाभिमुखाः सन्ध्यायां गायत्रियाऽभिमन्त्रिता आप ऊर्ध्वं विक्षिपन्ति ता एता आपो वज्री भूत्वा तानि रक्षाꣳसि मन्देहारुणे द्वीपे प्रक्षिपन्ति यत्प्रदक्षिणं प्रक्रमन्ति तेन पाप्मानमवधून्वन्त्युद्यन्तमस्तंयन्तमादित्यमभिध्यायन्कुर्वन्ब्राह्मणो विद्वान्सकलं भद्रमश्नुतेऽसावादित्यो ब्रह्मेति ब्रह्मैव सन्ब्रह्माप्येति य एवं वेद ।

अशी श्रुति तैत्तिरीय आरण्यकाच्या दुसऱ्या प्रपाठकामध्यें आहे. ह्या श्रुतीचें तात्पर्य येणेंप्रमाणें:—"पूर्वी राक्षसांनीं श्रेष्ठ तपश्चर्या केली असतां त्यांच्यावर प्रजापति प्रसन्न होऊन 'वर मागा' असें त्यांना ह्मणाला. तेव्हां "सूर्याशीं युद्ध करण्याचें सामर्थ्य आह्मांला प्राप्त व्हावें" असा त्यांनीं वर मागितला व प्रजापतीनेंही तो त्यांना दिला-ह्यामुळें सूर्योदयापासून तों सूर्यास्तापर्यंत ते राक्षस सूर्याशीं युद्ध करूं लागले. त्या ह्या राक्षसांचा गायत्रीमंत्रानें अभिमंत्रित केलेल्या उदकानें नाश होत असतो. ह्मणून वेदवेत्ते लोक संध्यासमयीं पूर्वाभिमुख होऊन गायत्रीमंत्रानें अभिमंत्रित केलेलें उदक वर फेंकीत असतात. हें उदक वज्र होतें आणि त्या राक्षसांना मंदेहारुण द्वीपामध्यें फेंकून देतें. उदक वर टाकिल्यानंतर द्विज प्रदक्षिणा फिरत असतात. त्यामुळें त्यांच्या हातून घडलेलें राक्षसनाशाचें पातक नष्ट होत असतें. ह्यास्तव, उदयकालीं व अस्तकालीं आदित्याचें ध्यान करणारा (ह्मणजे संध्यावंदन कर्म करणारा) जो विद्वान् ब्राह्मण त्याचें सर्वप्रकारें कल्याण होत असतें आणि हा आदित्यच ब्रह्म आहे असें जाणून जो संध्यावंदन कर्म करितो तो पूर्वीही ब्रह्मरूप असल्यामुळें ब्रह्माचेच ठिकाणीं जाऊन मिळतो."

संध्यावंदन कर्म करणाऱ्या ब्राह्मणाचें सर्वप्रकारें कल्याण होतें असें ह्या श्रुतिमध्यें स्पष्ट सांगितलें आहे. तेव्हां आपलें सर्वप्रकारें कल्याण व्हावें अशी ज्याची इच्छा असेल त्यानें प्रत्यहीं संध्यावंदन अवश्य केलें पाहिजे.

न तिष्ठति तु यः पूर्वां नोपास्ते यश्च पश्चिमाम् ।
स शूद्रवद्बहिष्कार्यः सर्वस्माद्द्विजकर्मणः ॥ १०३ ॥ अ० २

असें मनुवचन आहे. "जो प्रातःकालीं व सायंकालीं संध्यावंदनकर्म करीत नाहीं त्याला शूद्राप्रमाणें सर्व द्विजकर्मांपासून बहिष्कार घालावा." असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. ह्यास्तव, शूद्रसाम्य प्राप्त होऊं नये एतदर्थ ब्राह्मणानें सकाळसंध्याकाळ संध्या अवश्य केली पाहिजे.

पूर्वां सन्ध्यां जपंस्तिष्ठन्नैशमेनो व्यपोहति ।
पश्चिमां तु समासीनो मलं हन्ति दिवा कृतम् ॥

"प्रातःसंध्या करणारा पुरुष रात्रीं अज्ञानतः घडलेल्या पातकाचें निरसन करीत असतो आणि सायसंध्या करणारा द्विज दिवसां न कळत घडलेल्या पातकाचा नाश करीत" असतो. असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे.

दिवा वा यदि वा रात्रौ यदज्ञानकृतं भवेत् ।
त्रिकालसन्ध्याकरणात्तत्सर्वं विप्रणश्यति ॥

असें याज्ञवल्क्यवचनही आहे. दिवसां अथवा रात्रीं अज्ञानामुळें जें पातक घडलेलें असतें तें सर्व त्रिकालसंध्या केल्यानें नाहींसें होतें." असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. संध्यावंदनकर्मांतील मंत्रांमध्यें अशा प्रकारचा अर्थ स्पष्ट आहे.

ऋषींना दीर्घ आयुष्याची प्राप्ति दीर्घ संध्यांमुळें झाली असेंही मनुवचन आहे. दीर्घआयुष्य, धन व ब्रह्मवर्चस हीं वेदमाता जी सावित्री तिच्या कृपेनें प्राप्त होत असतात. संध्यावंदनामध्यें मुख्यतः वेदमाता गायत्रीचीच उपासना आहे. आयुष्य कोणाला नको आहे असें

नाहीं; तें सर्वांना हवेंच आहे. मग जगतांतील सर्व वस्तूपेक्षां अत्यंत प्रिय जें आयुष्य तें प्राप्त होण्याचा संध्यावंदन हा उपाय अगदीं सोपा व बिनखर्चाचा असतांना त्या उपायाकडे दुर्लक्ष्य करून चिरकाल जगण्याची इच्छा करणाऱ्या ब्राह्मणांना काय ह्मणावें हेंच मला समजत नाहीं.

## पंचमहायज्ञ.

अध्यापनं ब्रह्मयज्ञः पितृयज्ञस्तु तर्पणम् ।
होमो दैवो बलिर्भौतो नृयज्ञोऽतिथिपूजनम् ॥ ७० ॥
पञ्चैतान्यो महायज्ञान्न हापयति शक्तितः ।
स गृहेऽपि वसन्नित्यं सूनादोषैर्न लिप्यते ॥ ७१ ॥
देवतातिथिभृत्यानां पितृणामात्मनश्च यः ।
न निर्वपति पञ्चानामुच्छ्वसन्न स जीवति ॥ ७२ ॥
अहुतं च हुतं चैव तथा प्रहुतमेव च ।
ब्राह्मयं हुतं प्राशितं च पञ्च यज्ञान्प्रचक्षते ॥ ७३ ॥
जपोऽहुतो हुतो होमः प्रहुतो भौतिको बलिः ।
ब्राह्मयं हुतं द्विजाग्र्यार्चा प्राशितं पितृतर्पणम् ॥ ७४ ॥
स्वाध्याये नित्ययुक्तः स्याद्दैवे चैवेह कर्माणि ।
दैवे कर्मणि युक्तो हि बिभर्तीदं चराचरम् ॥ ७६ ॥
स्वाध्यायेनार्चयेतर्षीन्होमैर्देवान्यथाविधि ।
पितॄञ्छ्राद्धैश्च नॄनन्नैर्भूतानि बलिकर्मणा ॥ ८१ ॥३॥

अशीं मनुवचनें आहेत. "ब्रह्मयज्ञ ह्मणजे अध्ययन व अध्यापन. पितृयज्ञ ह्मणजे तर्पण. दैवयज्ञ ह्मणजे होम. भौतयज्ञ ह्मणजे बलि आणि मनुष्ययज्ञ ह्मणजे अतिथि पूजन ७०. हे पंचमहायज्ञ जो न टाकितां यथाशक्ति नित्य करितो तो गृहामध्यें असूनही अवश्य होणाऱ्या हिंसादोषांनीं लिप्त होत नाहीं ७१. देवता, अतिथि, पोष्य वर्ग, पितर आणि आत्मा ह्मणजे ब्रह्म ह्यांना उद्देशून जो होम वगैरे करीत नाहीं तो श्वास क

प्रश्वास करीत असूनही मृतच होय असें समजावें ७२. अहुत, हुत, प्रहुत, ब्राम्ह्यहुत आणि प्राशित ह्यांना पंचमहायज्ञ असें ह्मणतात ७३. अहुत ह्मणजे ब्रह्मयज्ञसंज्ञक जप. हुत ह्मणजे देवयज्ञसंज्ञक होम. प्रहुत ह्मणजे भूतयज्ञसंज्ञक भौतिक बलि. ब्राह्म्यहुत ह्मणजे ब्राह्मणाचें अर्चन आणि प्राशित ह्मणजे पितृतर्पण ७४. वेदाध्ययनासंबंधानें व होम-रूप दैवकर्मासंबंधानें पुरुषानें नेहेमीं तत्पर असावें. कारण, देवयज्ञनिष्ठ पुरुष ह्या स्थावरजंगमात्मक जगताचें पोषण करीत असतो ७६. यथा-विधि वेदाध्ययनानें ऋषींचें, होमांनीं देवांचें, श्राद्धांनीं पितरांचें, अन्नांनीं मनुष्यांचें आणि बलिदानानें भूतांचें अर्चन करावें' ८१ असें ह्या वचनांचें तात्पर्य आहे. पंचमहायज्ञ न करणारा पुरुष जिवंत असूनही मेल्याप्रमाणें होय असें बहात्तराव्या वचनांत स्पष्ट सांगितलें आहे आणि प्रत्यहीं देवयज्ञरूप होम करणारा मनुष्य ह्या चराचर जगताचें पोषण करीत असतो असें पंचाहत्तराव्या वचनामध्यें सांगितलें आहे. यथाविधि देवयज्ञ करणारा पुरुष जगताचें पोषण कसें करितो ही शंका राहूं नये ह्मणून

अग्नौ प्रास्ताहुतिः सम्यगादित्यमुपतिष्ठते ।
आदित्याज्जायते वृष्टिर्वृष्टेरन्नं ततः प्रजाः ॥७६ ॥ ३ ॥

असें वचन पुढेंच आहे. “ अग्नीमध्यें यथाविधि अर्पण केलेली आहुति सूर्याप्रत जाते; सूर्यापासून वृष्टि होते; वृष्टीपासून अन्न उत्पन्न होतें आणि त्या अन्नामुळें प्रजांची उत्पत्ति व त्यांचें पोषण होतें ” असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. सारांश, प्रत्यहीं देवयज्ञरूप होम करणारा द्विज चराचर जगताचें पोषण करीत असतो असें जें सांगितलें आहे तें अगदीं योग्य आहे. पंचमहायज्ञासंबंधानें असलेल्या श्रुतींचा आतां विचार करूं.

## पंचमहायज्ञश्रुति.

अजान्ह वै पृश्नीᳬस्तपस्यमानान्ब्रह्म स्वयंभ्वभ्यानर्षत्त ऋष-

योऽभवन्तदृषीणामृषित्वं तां देवतामुपातिष्ठन्त यज्ञकामास्त एतं ब्रह्मयज्ञमपश्यन्तमाहरन्तेनायजन्त यदृचोऽध्यगीषत ताः पयआहुतयो देवानामभवन्यद्यजूꣳषि घृताहुतयो यत्सामानि सोमाहुतयो यदथर्वाङ्गिरसो मध्वाहुतयो यद्ब्राह्मणानीतिहासान्पुराणानि कल्पान्गाथा नाराशꣳसीर्मेदाहुतयो देवानामभवन्ताभिः क्षुधं पाप्मानमपाघ्नन्नपहतपाप्मानो देवाः स्वर्गं लोकमायन्ब्रह्मणः सायुज्यमृषयोऽगच्छन् ।

" अजपृश्नि तप करीत असतांना स्वयंभू ब्रह्म कांहीं रूप धारण करून त्यांच्यासंमुख ( अभ्यानर्षत् ) आलें. स्वयंभु ब्रह्म ह्मणजे वेद त्यांच्याकडे आल्यामुळें ते अज पृश्नि ऋषि झाले. तस्मात्, इतरही ऋषींचें ऋषित्व वेदाच्या आगमनामुळें ह्मणजे स्फूर्तीमुळेंच आहे. तदनंतर कांहीं एक यज्ञ करण्याची इच्छा झाल्यामुळें त्या स्वयंभु ब्रह्मरूप देवतेचीच त्यांनीं उपासना केली. तेव्हां ह्या ब्रह्मयज्ञाचीच त्यांना स्फूर्ति झाली. नंतर त्या यज्ञाचें त्यांनीं अनुष्ठान केलें व त्याच्या योगानें देवांचें पूजन केलें. त्या ब्रह्मयज्ञामध्यें ऋषींनीं ज्या ऋचांचें अध्ययन केलें त्या ऋचांच्या अध्ययनामुळें देव दुधाच्या आहुतींनीं जसे संतुष्ट व्हावे तसे संतुष्ट झाले. त्याचप्रमाणें त्या ऋषींनीं ह्मटलेले यजु घृताहुतींप्रमाणें, त्यांनीं ह्मटलेलीं सामें सोमाहुतींप्रमाणें आणि त्यांनीं पढलेले अथर्वमंत्र मध्वाहुतींप्रमाणें झाले आणि ब्राह्मणें, इतिहास, पुराणें, कल्प, गाथा व नाराशंसी ह्यांचें जें अध्ययन त्या ऋषींनीं केलें त्या अध्ययनाच्या योगानें मेदाच्या आहुति मिळाल्याप्रमाणें देव तृप्त झाले. त्या आहुतींच्या योगानें देवांनीं क्षुधारूप पापाचाही नाश केला. सारांश, वेदाध्ययनजन्य तृप्तीमुळें देवांची तहानभूकही नाहींशी झाली व ते स्वर्गाला गेले आणि त्या ब्रह्मयज्ञरूप अध्ययनामुळें त्या ऋषींना ब्रह्मसायुज्य प्राप्त झालें. " असें ह्या श्रुतीचें तात्पर्य आहे.

पञ्च वा एते महायज्ञाः सतति प्रतायन्ते सतति संतिष्ठन्ते देवयज्ञः पितृयज्ञो भूतयज्ञो मनुष्ययज्ञो ब्रह्मयज्ञः इति यदग्नौ जुहोत्यपि समिधं तद्देवयज्ञः संतिष्ठते । यत्पितृभ्यः स्वधा करोत्यप्यपस्तत्पितृयज्ञः संतिष्ठते यद्भूतेभ्यो बलिꣳ हरति तद्भूतयज्ञः संतिष्ठते यद्ब्राह्मणेभ्योऽन्नं ददाति तन्मनुयष्ययज्ञः संतिष्ठते यत्स्वाध्यायमधीयीतैकामप्यृचं यजुः साम वा तद्ब्रह्मयज्ञः संतिष्ठते यदृचोऽधीते पयसः कूल्या अस्य पितॄन्स्वधा अभिवहन्ति यद्यजूꣳषि घृतस्य कूल्या यत्सामानि सोम एभ्यः पवते यदथर्वाङ्गिरसो मधोः कूल्या यद्ब्राह्मणानीतिहासान्पुराणानि कल्पान्गाथा नाराशꣳसीर्मेदसः कूल्या अस्य पितॄन्स्वधा अभिवहन्ति यदृचोऽधीते पयआहुतिभिरेव तद्देवाꣳस्तर्पयति यद्यजूꣳषि घृताहुतिभिर्यत्सामानि सोमाहुतिभिर्यदथर्वाङ्गिरसो मध्वाहुतिभियद्ब्राह्मणानीतिहासान्पुराणानि कल्पान्गाथा नाराशꣳसीर्मेदाहुतिभिरेव तद्देवाꣳस्तर्पयति त एनं तृप्ता आयुषा तेजसा वर्चसा श्रिया यशसा ब्रह्मवर्चसेनान्नाद्येन च तर्पयन्ति ।

ह्या श्रुतीचें तात्पर्य येणेंप्रमाणें:—"ह्या पंचमहायज्ञांचें अनुष्ठान प्रत्यहीं होत असतें व ह्यांचीं समाप्तिही प्रत्यहीं होत असते. अग्नीमध्यें निदान एक समिध जरी देवांच्या उद्देशानें अर्पण केली तरी तेवढ्यानें देवयज्ञाची पूर्तता होते. पितरांच्या उद्देशानें उदक जरी अर्पण केलें तरी तेवढ्यानें पितृयज्ञ होतो. भूतांना उद्देशून बलिदान केल्यानें भूतयज्ञाची पूर्तता होते. निदान तीन ब्राह्मणांना अन्न दिल्यानें मनुष्ययज्ञाची पूर्तता होते आणि परंपरागत वेदशाखेपैकीं एकाद्या जरी ऋचेचें, यजूचें अथवा सामाचें अध्ययन झालें तरी तेवढ्यानें ब्रह्मयज्ञाची पूर्तता होते. ऋचा, यजु, साम व अथर्वमंत्र ह्यांच्या योगानें अनुक्रमें पितरांना उद्देशून दुग्धकुल्या घृतकुल्या, सोमकुल्या व मधुकुल्या वाहूं लागतात आणि ब्राह्मणें,

इतिहास, पुराणें, कल्प, गाथा व नाराशंसी ह्यांच्या योगानें पितरांना उद्देशून मेदाच्या कुल्या वाहूं लागतात. त्याचप्रमाणे ह्या ऋगादिकांच्या अध्ययनामुळें ब्रह्मयज्ञ करणारा अनुक्रमें दुधाच्या, घृताच्या, सोमाच्या, मधाच्या व मेदाच्या आहुतींनीं देवांना तृप्त करितों व ब्रह्मयज्ञामुळें तृप्त झालेले देव त्या ब्रह्मयज्ञ करणाऱ्याला आयुष्य, तेज, बल, संपत्ति, यश, वेदसामर्थ्य आणि अन्नपचनसामर्थ्य देऊन तृप्त करितात. "असें ह्या श्रुतीचें तात्पर्य आहे. तेव्हां अर्थातच आयुष्य, तेज, बल, संपत्ति इत्यादिकांच्या प्राप्तीचें साधन जो ब्रह्मयज्ञ तो यथाविधि करणें हें प्रत्येक द्विजाचें अवश्य कर्तव्य आहे." ब्रह्मयज्ञासंबंधानें श्रुति फारच आहेत.

## ब्रह्मयज्ञ कसा करावा ?

**ब्रह्मयज्ञेन यक्ष्यमाणः प्राच्यां दिशि ग्रामादच्छदिर्दर्श उदीच्यां प्रागुदीच्यां वोदित आदित्ये दक्षिणत उपवीयोपविश्य हस्तावविनिज्य त्रिराचामेद्द्विः परिमृज्य सकृदुपस्पृश्य शिरश्चक्षुषी नासिके श्रोत्रे हृदयमालभ्य यात्त्रिराचामति तेन ऋचः प्रीणाति यद्द्विः परिमृजाति तेन यजूंषि यत्सकृदुपस्पृशति तेन सामानि यत्सव्यं पाणिं पादौ प्रोक्षति यच्छिरश्चक्षुषी नासिके श्रोत्रे हृदयमालभते तेनाथर्वाङ्गिरसो ब्राह्मणानीतिहासान्पुराणानि कल्पान्गाथा नाराशंसीः प्रीणाति दर्भाणां महदुपस्तीर्योपस्थं कृत्वा प्राङासीनः स्वाध्यायमधीयीतापां वा एष ओषधीनां रसो यद्दर्भाः सरसमेव ब्रह्म कुरुते दक्षिणोत्तरौ पाणी पादौ कृत्वा सपवित्रावोमिति प्रतिपद्यत एतद्वै यजुस्त्रयीं विद्यां प्रत्येषा वागेतत्परममक्षरं तदेतदृचाऽभ्युक्तमृचो अक्षरे परमे व्योमन्यस्मिन्देवा अधि विश्वे निषेदुर्यस्तन्न वेद किमृचा करिष्यति य इत्तद्विदुस्त इमे समासत इति त्रीनेव प्रायुङ्क्त भूर्भुवः स्वरित्याहैतद्वै वाचः सत्यं यदेव वाचः सत्यं**

तत्प्रायुङ्क्ताथ सावित्रीं गायत्रीं त्रिरन्वाह पच्छोऽर्धर्चशोऽनवानꣳसविता श्रियः प्रसविता श्रियमेवाप्नोत्यथो प्रज्ञातयैव प्रतिपदा छदाꣳसि प्रतिपद्यते ॥ ११ ॥

"ब्रह्मयज्ञ कर्तव्य असतांना गांवाच्या पूर्वेस, उत्तरेस किंवा ईशान्येस गांवांतील घरांचा आच्छादक भाग दिसेनासा होईपर्यंत जावें आणि सूर्योदय झाल्यावर यज्ञोपवीती करून खालीं बसावें. नंतर दोन्हीं हात धुवून तीन वेळां आचमन करावें. तदनंतर पुनरपि दोनदां हात धुवावे. नंतर ओठांना उदकस्पर्श करून मस्तक, नेत्र, नाकपुड्या, कान व हृदय ह्यांनाही स्पर्श करावा. त्रिराचमन केल्यानें ऋङ्मत्र, दोनदां हात धुतल्यानें यजुर्मंत्र, ओठांना एकदां उदकस्पर्श केल्यानें साममंत्र आणि मस्तक, नेत्र, नासिका, कान व हृदय ह्यांना स्पर्श केल्यानें अथर्वमंत्र, ब्राह्मणें, इतिहास, पुराणें, गाथा व नाराशंसी संतुष्ट होतात. ( ह्मणजे ह्यांच्या अभिमानिनी देवता संतुष्ट होतात.) नंतर दर्भांचें चांगलें मोठें आसन पसरून त्याच्यावर आसनमांडी घालून प्राङ्मुख बसावें आणि वेदाध्ययन करावें, दर्भ हे उदक व ओषधि ह्यांचें सार आहे. तेव्हां दर्भावर बसून पढलेला वेद सरस ह्मणजे फलदानसमर्थ होतो. डाव्या पायावर उजवा पाय उताणा ठेवून आणि डाव्या गुडघ्यावर उत्तान ठेविलेल्या डाव्या हातावर उजवा हात पालथा ठेवून व तशा प्रकारच्या हातामध्यें पवित्रकें असतांना ॐ ह्मणून आरंभ करावा. कारण, प्रणवरूप यजुर्मंत्र हा तीन वेदांचा प्रतिनिधि आहे आणि हा प्रणवच सर्व वाणी आहे. इतकेंच नव्हे परंतु, प्रणव अविनाशि असें परब्रह्मस्वरूपच असल्याचें एका मंत्रांत सांगितलें आहे. (ऋचो अक्षरे ०) ही ती ऋचा होय. सर्वोत्कृष्ट रक्षक जें प्रणवाक्षर त्याचे ठिकाणीं सर्व ऋचा राहिलेल्या आहेत; इतकेंच नव्हे परंतु, सर्व देवांनींही त्या प्रणवाक्षराचा विशेष आश्रय केलेला आहे. तेव्हां

ज्याला तो प्रणव ठाऊक नाहीं त्याला केवल ऋचेचा उपयोग काय होणार आहे? जे तें अक्षर जाणितात ते चांगले सुखानें राहतात. प्रणवानें आरंभ केल्यानंतर भूर्भुवःस्वः अशा तीन व्याहृतींचा उच्चार करावा. ह्मणजे तीन वेदांचें अध्ययन केल्यासारखें होतें. कारण, व्याहृती हें वाणीचें सत्य स्वरूप होय. ह्यास्तव, व्याहृतींचा उच्चार केल्यानें वाणीच्या सत्यस्वरूपाचा उच्चार केल्यासारखें होतें. नंतर सविता जिची देवता आहे अशी गायत्री तीन वेळां ह्मणावी. प्रथम प्रत्येक पादाला थांबून थांबून ह्मणावी; नंतर अर्ध्या ऋचेवर दम खाऊन ह्मणावी आणि नंतर आरंभापासून शेवटपर्यंत मध्यें कोठेंही विराम न करितां संपूर्ण ह्मणावी. त्या ऋचेमध्यें प्रतिपाद्य जो सविता तो श्रीचा प्रेरक असल्यामुळें ब्रह्मयज्ञाचें अनुष्ठान करणाऱ्याला श्री प्राप्त होतच असते. (हें एका दिवसाचें विधान होय.) त्यानंतर दुसऱ्या दिवशीं जें अध्ययन करावयाचें तें पूर्वदिवशीं जितकें केल्याचें आपण स्मरण ठेविलें असेल तेथूनच आरंभ करून अध्ययन करावें." असें ह्या श्रुतीचें तात्पर्य आहे.

## ब्रह्मयज्ञाचें स्थल.

**ग्रामे मनसा स्वाध्यायमधीयीत दिवा नक्तं वेति ह स्माह शौच आह्नेय उतारण्येऽबल उत वाचोत तिष्ठन्नुत व्रजन्नुतासीन उत शयानोऽधीयीतैव स्वाध्यायं तपस्वी पुण्यो भवति य एवं विद्वान्त्स्वाध्यायमधीते नमो ब्रह्मणे नमो अस्त्वग्नये नमः पृथिव्यै नम ओषधीभ्यः । नमो वाचे नमो वाचस्पतये नमो विष्णवे बृहते करोमि ॥ १२ ॥**

गांवाच्या बाहेर जाणें शक्य नसल्यास गांवांत ब्रह्मयज्ञरूप वेदाध्ययन मनानेंच करावें. सूर्योदय होतांक्षणीं ब्रह्मयज्ञाला आरंभ होणें शक्य नसल्यास संपूर्ण दिवसांत केव्हां तरी अथवा रात्रीं

सुद्धां ब्रह्मयज्ञ करावा असें शौच आन्हेय महर्षीचें मत आहे. अरण्यांतही ब्रह्मयज्ञ शब्दोच्चारपूर्वक होणें अशक्य असल्यास मनानें करावा किंवा हूंहूं उच्चार करून करावा. सांगितल्याप्रमाणें बसून ब्रह्मयज्ञ करण्याची शक्ति नसल्यास उभ्यानें, चालतांना, कसें तरी बसून अथवा आडवें पडून सुद्धां ब्रह्मयज्ञरूप वेदाध्ययन करावेंच करावें. अशक्तपक्षीं अशा प्रकारच्या अध्ययनानेंही पुरुषाला अध्ययनफल प्राप्त होतें व तो पंक्तिपावन होतो. शेवटीं 'नमो ब्रह्मणे' ही ऋचा ह्मणावी. ब्रह्म, अग्नि, पृथ्वी, ओषधि, सरस्वती, वाचस्पति व महाविष्णु ह्यांना मी नमस्कार करितों असा ह्या ऋचेचा अर्थ आहे.

## मध्याह्नसमयीं ब्रह्मयज्ञ कसा करावा ?

**मध्यन्दिने प्रबलमधीयीतासौ खलु वावैष आदित्यो यद्ब्राह्मणस्तस्मात्तर्हि तेक्ष्णिष्ठं तपति तदेषाऽभ्युक्ता । चित्रं देवानामुदगादनीकं चक्षुर्मित्रस्य वरुणस्याग्नेः । आप्रा द्यावापृथिवी अन्तरिक्षꣳसूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्चेति स वा एष यज्ञः सद्यः प्रतायते सद्यः संतिष्ठते तस्य प्राक्सायमवभृथो नमो ब्रह्मण इति परिधानीयां त्रिरन्वाहाप उपस्पृश्य गृहानेति ततो यत्किंच ददाति सा दक्षिणा ॥ १३ ॥**

मध्यान्हसमयीं उच्च स्वरानें ब्रह्मयज्ञ करावा. कारण, ब्रह्मयज्ञानुष्ठान करणारा ब्राह्मण आदित्यच होय. मध्यदिनसमयीं सूर्य अतिशय प्रखर तपत असतो; ह्मणून ब्राह्मणानेंही त्यावेळीं जोरानें अध्ययन करावें. सूर्याच्या माहात्म्यासंबंधानें एक ऋचा आहे ती अशी:—

अनेक वर्णांनीं युक्त असें किरणसमूहाला आधारभूत असलेलें मंडल पूर्वदिशेला उदय पावलेलें आहे. तें मंडल मित्र, वरुण व अग्नि ह्यांचें चक्षुरिंद्रिय आहे आणि किरणांच्या योगानें तें मंडल त्रैलोक्य व्यापून राहिलें आहे. त्या मंडलाचे ठिकाणीं असलेला सूर्य हाच जगतांतील

स्थावर व जंगम प्राण्यांचा आत्मा आहे. (ह्मणजे त्यांच्या शरीरांचे ठिकाणीं जीवरूपानें राहिलेला आहे.) त्या ह्या यज्ञाचा आरंभ व समाप्ति हीं एकाच दिवसांत होत असतात. समाप्तिसमयीं नमो ब्रह्मणे ही ऋचा ह्मणून हा ब्रह्मयज्ञ संपवावा. नंतर उदकस्पर्श करून घरीं यावें आणि घरीं आल्यावर दक्षिणेकरितां कांहीं द्यावें.

## अनध्यायकारणें हींच ब्रह्मयज्ञाचीं अंगें होत.

तस्य वा एतस्य यज्ञस्य मेघो हविर्धानं विद्युदग्निर्वर्षꣳ हविः स्तनयित्नुर्वषट्कारो यदवस्फूर्जति सोऽनुवषट्कारो वायुरात्माऽमावास्या स्विष्टकृद्य एवं विद्वान्मेघे वर्षति विद्योतमाने स्तनयत्यवस्फूर्जति पवमाने वायावमावास्यायाꣳस्वाध्यायमधीते तप एव तत्तप्यते तपो हि स्वाध्याय इत्युत्तमं नाकꣳरोहत्युत्तमः समानानां भवति यावन्तꣳ ह वा इमां वित्तस्य पूर्णां ददत्स्वर्गं लोकं जयति तावन्तं लोकं जयति भूयाꣳसं चाक्षय्यं चाप पुनर्मृत्युं जयति ब्रह्मणः सायुज्यं गच्छति ॥ १४ ॥

(सोमयागामध्यें हविर्धान, अग्नि, हवि, वषट्कार, अनुवषट्कार, यजमान व स्विष्टकृत् हीं असतात. हविर्धान ह्मणजे हवि ठेवण्याचें स्थान.) त्या ह्या ब्रह्मयज्ञाचें हविर्धान मेघ होय. विद्युल्लताच अग्नि होय; वृष्टि हेंच हवि होय; गडगडणें हाच वषट्कार होय; विजांचा कडकडाट हाच अनुवषट्कार होय; वायु हाच यजमान होय आणि अमावास्याच स्विष्टकृत् होय. असें जाणणारा जो विप्र तो मेघवृष्टि होत असतांना, विजा लवत असतांना, गडगडत असतांना, विजांचा कडकडाट होत असतांना, उत्पातरूप वायु सुटला असतांना, व अमावास्या असतांनाही ब्रह्मयज्ञरूप वेदाध्ययन करितो तो तपच करितो. कारण, वेदाध्ययन हें तपच आहे. अशा रीतीनें कोणताही अनध्याय न पाळितां केलेल्या ह्या ब्रह्मयज्ञामुळें विप्राला

उत्तम स्वर्गाची प्राप्ति होते. तो आपल्या बरोबरीच्या लोकांमध्यें श्रेष्ठ होतो. वित्तानें भरलेलीही पृथ्वी ब्राह्मणांना दान दिल्यानें जितकें सुखोपभोग फलप्राप्त होणें शक्य आहे तितकें ह्याला प्राप्त होतें. जेथून परत येण्याचें भय उरत नाहीं असें अक्षय्य स्थान त्याला प्राप्त होतें. तें प्राप्त झाल्यानंतर तो जन्ममरणांपासून मुक्त होतो; ह्मणजे ब्रह्माप्रत प्राप्त होतो.

## ब्रह्मयज्ञाचे अनध्याय वगैरे.

तस्य वा एतस्य यज्ञस्य द्वावनध्यायौ यदात्माऽशुचिर्यद्देशः समृद्धिर्दैवतानिच्छ एवं विद्वान्महारात्र उषस्युदिते व्रजꣳस्तिष्ठन्नासीनः शयानोऽरण्ये ग्रामे वा यावत्तरसꣳ स्वाध्यायमधीते सर्वाँल्लोकाञ्जयति सर्वाँल्लोकाननृणोऽनुसंचरति तदेषाऽभ्युक्ता । अनृणाः अस्मिन्ननृणा परस्मिꣳस्तृतीये लोके अनृणाः स्याम । ये देवयाना उत पितृयाणाः सर्वान्पथा अनृणा आक्षीयेमेत्यग्निं वै जातं पाप्मा जग्राह तं देवा आहुतीभिः पाप्मानमपाघ्नन्नाहुतीनां यज्ञेन यज्ञस्य दक्षिणाभिर्दाक्षिणानां ब्राह्मणेन ब्राह्मणस्य छन्दोभिश्छन्दसाꣳस्वाध्यायेनापहत पाप्मा स्वाध्यायो देवपवित्रं वा एतत्तं योऽनूत्सृजत्यभागो वाचि भवत्यभागो नाके तदेषाऽभ्युक्ता । यस्तित्याज सखिविदꣳ सखायं न तस्य वाच्यपि भागो अस्ति । यदीꣳ शृणोत्यलकꣳ शृणोति न हि प्रवेद सुकृतस्य पन्थामिति तस्मात्स्वाध्यायोऽध्येतव्यो यं यं क्रतुमधीते तेन तेनास्येष्टं भवत्यग्नेर्वायोरादित्यस्य सायुज्यं गच्छति तदेषाऽभ्युक्ता । ये अर्वाङुत वा पुराणे वेदं विद्वाꣳसमभितो वदन्त्यादित्यमेव ते परिवदन्ति सर्वे अग्निं द्वितीयं तृतीयं च हꣳस मिति यावतीर्वै देवतास्ताः सर्वा वेदविदि ब्राह्मणे वसन्ति तस्माद्ब्राह्मणेभ्यो वेदविद्भ्यो दिवे दिवे नमस्कुर्यान्नाश्लीलं कीर्तयेदेता एव देवताः प्रीणाति ॥ १५ ॥

त्या ह्या ब्रह्मयज्ञाला अनध्याय कारणें दोनच आहेत. कर्ता स्वतः अशुद्ध असणें हें एक अनध्यायाचें कारण आणि देश अशुद्ध असणें हें दुसरें कारण. देवताच ह्या यज्ञाची सामग्री होय.

## ब्रह्मयज्ञाचें फल.

असें जाणणारा जो पुरुष मोठ्या रात्रीं, उषःकालीं, सूर्योदय झाल्यावर, अरण्यांत किंवा गांवांत, बसला असतांना, उभा असतांना, हिंडत असतांना अथवा पडलेला असतांना यथाशक्ति ब्रह्मयज्ञरूप वेदाध्ययन करितो त्याला सर्व इष्ट लोक प्राप्त होतात; आणि तो सर्व लोकांमध्यें ऋणमुक्त होऊन संचार करितो. ह्याविषयीं एक ऋचा आहे ती येणेंप्रमाणें:—भूलोकीं, अंतरिक्षलोकीं व स्वर्गलोकींही ब्रह्मयज्ञाच्या सामर्थ्यानें आह्मी अनृणी असावें आणि देवयान व पितृयाण ह्मणून जे सर्व मार्ग आहेत ते सर्व मार्ग ऋणमुक्त असल्यामुळें आह्मांला प्राप्त व्हावें.

## ब्रह्मयज्ञाचें पापराहित्य.

अग्नि उत्पन्न होतांक्षणीं त्याला पापानें ग्रस्त केलें (कारण, अग्नि पाप्यांचें पाप निरसन करण्याकरितां उत्पन्न झाला आहे आणि मृन्मय पात्राची शुद्धि पुनरपि पाकानें होतें असें स्मृतिकारांनींही सांगितलें आहे. ज्याप्रमाणें अत्यंत मलिन वस्त्र थोड्या पाण्यांत धुतलें असतां वस्त्राचा मळ सर्व उदकामध्येंच जातो व त्यामुळें उदकच मळानें भरून जातें त्याचप्रमाणें शोधक अग्नीमध्येंच सर्व पातक प्रविष्ट झालें व अग्नि पापानें ग्रस्त झाला.) अग्नीचे ठिकाणीं प्रविष्ट झालेलें जें पातक तें पातक आहुतींच्या योगानें देवांनीं नाहींसें केलें. तेव्हां त्या आहुति पातकानें ग्रस्त झाल्या असतांना यज्ञांच्या योगानें आहुतींचें पातक नाहींसें झालें; तेव्हां यज्ञ पापग्रस्त झाला. यज्ञांच्या पापाचें निरसन दक्षिणांच्या योगानें झालें; तेव्हा दक्षिणा पापग्रस्त झाल्या. दक्षिणांचें पातक ब्राह्मणाच्या योगानें

नाहींसें झालें; ह्यामुळें ब्राह्मण पापग्रस्त झाला. तेव्हां ब्राह्मणाचें पातक छंदानें नाहींसें केलें. परंतु, छंद पापग्रस्त झाले. तेव्हां छंदांचें पातक स्वकीयशाखारूप स्वाध्यायानें ब्राह्मणांनीं नाहींसें केलें. स्वाध्याय ह्मणजे स्वकीयशाखारूप वेदाचें अध्ययन. त्याचे ठिकाणीं पापाचा स्पर्श होणें शक्य नाहीं. अशा प्रकारच्या स्वाध्यायाला आरंभ करून जो नंतर त्याचा त्याग करितो त्याला वाणीचें फळ मिळत नाहीं; मग स्वर्ग प्राप्त होण्याचें भाग्य त्याचें कोठून असणार? सारांश, अनायासानें महाफलदायक ब्रह्मयज्ञाचा अधिकार प्राप्त झाला असतांना हातीं आलेलें रत्न टाकून देणाऱ्या पुरुषाप्रमाणें जो ह्या ब्रह्मयज्ञाचा त्याग करितो तो भाग्यहीन होय हें उघडच आहे. ह्याविषयीं एक ऋचा आहे ती (अर्थदृष्ट्या) येणेंप्रमाणें:-

## वेदत्यागाचा दोष.

जो पुरुष केवळ वाणीनेंच निष्पन्न होणारें ह्मणजे उच्चारिलें जाणारें वेदाध्ययन करितो त्याचें मित्राप्रमाणें वेद रक्षण करितो; ह्मणजे त्याच्या सर्व पातकाचा क्षय करून मोक्षापर्यंत उत्तम गति देऊन वेद त्याचें संरक्षण करितो. वेदाध्ययनकर्ता आपला मित्र होय असें स्वाध्याय समजतो. ह्मणून स्वाध्याय हा सखिवित् ह्मणजे मित्र जाणणारा होय. स्वाध्याय ह्मणजे स्वशाखारूपवेदही त्या पुरुषाचा सखा होतो; ह्मणजे निरंतर यथाविधि वेदाध्ययन करणाऱ्याच्या अधीनच वेद होतो. ह्याप्रमाणें मित्र जाणणाऱ्या व प्रत्यक्ष मित्र असलेल्या स्वाध्यायाचा ज्यानें त्याग केला त्याचें वाणीच्या ठिकाणींही भाग्य नसतें. त्यानें जरी पुष्कळ शास्त्रांचें श्रवण केलें तरी त्या श्रवणापासून त्याला कांहीं एक उपयोग होत नाहीं. कारण, वेदव्यतिरिक्त इतर पुष्कळ केलेल्या श्रवणापासून वेदत्यागी पुरुषाला पुण्य मार्गाचें ज्ञान होतच नाहीं.

## वेदाध्ययनाचें फल.

तस्मात्, वेदाचें अध्ययन करावें. ज्या ज्या क्रतूचें ( क्रतुविषयक वेदभागाचें ) पुरुष अध्ययन करितो तो तो क्रतु केल्याचें फल त्याला प्राप्त होतें. (याग तीन प्रकारचा आहे. कायिक, वाचिक व मानसिक. वेदाध्ययन करणाऱ्याच्या हातून वाचिक याग होत असतो ह्याबद्दल वादच नाहीं. परंतु, वेदाध्ययन करणाऱ्याला जर अर्थ समजत असेल तर अध्ययनकालीं अर्थाकडे अनुसंधान ठेवि-ल्यास मानस यागही त्याच्या हातून घडणारच. द्रव्य नसल्यामुळें कायिक यज्ञ न घडेल तर न घडो. द्रव्यार्जन जो करील त्याला त्याचाही अधिकार प्राप्त होईल. परंतु, द्रव्यहीन पुरुषाला वाचिक यागानेंही प्रत्यक्ष यागाचें फल प्राप्त होत असतें व त्यामुळें ) अग्नि, वायु व सूर्य ह्यांचें सायुज्य त्याला प्राप्त होतें. वेदवेत्त्याच्या माहात्म्या-संबंधानें एक ऋचा आहे ती येणेंप्रमाणें:—

## वेदवेत्त्याचें माहात्म्य.

जे मूर्ख अर्वाचीन अथवा प्राचीन वेदवेत्त्या ( ह्मणजे पाठतः व अर्थतः वेद जाणणाऱ्या ) पुरुषाची निंदा करितात; ते सर्वही आदि-त्यांचीच निंदा करितात; दुसऱ्या अग्नीचीही त्यांच्या हातून निंदा होते आणि वायूचीही निंदा केल्याचें त्यांच्या हातून पातक घडतें.

## देवतांचें निवासस्थान.

वेदवेत्ता ब्राह्मण ह्मणजे सूर्य, अग्नि व वायु ह्यांचें रूप होय. हें वर सांगितलेंच आहे. परंतु, वस्तुतः विचार केला असतां ज्या ह्मणून कांहीं देवता आहेत त्या सर्व पाठतः व अर्थतः वेद जाण-णाऱ्या ब्राह्मणाचे ठिकाणीं वास्तव्य करीत असतात. ( कारण, प्रत्येक मंत्रामध्यें एकेका देवतेचें प्रतिपादन असतें आणि ते सर्वही मंत्र आणि मंत्रप्रतिपाद्य देवता अध्ययन करणाऱ्या पुरुषाच्या वाणीच्या ठिकाणीं व वेद पाठ येऊन तो जाणणाऱ्या पुरुषाच्या

मंत्राच्या ठिकाणीं असतात. ह्यामुळें वेदवेत्ता ब्राह्मण सर्व देवतारूप असतो.) ह्मणून वेदवेत्त्या ब्राह्मणांना प्रत्यहीं नमस्कार करावा. त्यांची कांहीं अश्लील गोष्ट खरी असो किंवा नसो, आपण उच्चारूं नये. वेदवेत्त्या ब्राह्मणांचा सत्कार केल्यानें सत्कार करणारा सर्व देवतांना संतुष्ट करीत असतो. असें ह्या श्रुतीचें तात्पर्य आहे.

## प्रायश्चित्त.

**रिच्यत इव वा एष प्रेव रिच्यते यो याजयति प्रति वा गृह्णाति याजयित्वा प्रतिगृह्य वाऽनश्नन्त्रिः स्वाध्यायं वेदमधीयीत त्रिरात्रं वा सावित्रीं गायत्रीमन्वातिरेचयति वरो दक्षिणा वरेणैव वरꣳ स्पृणोत्यात्मा हि वरः ॥ १६ ॥**

वेदाध्ययन करणाऱ्याही ब्राह्मणांच्या हातून विपत्तीमुळें अथवा लोभामुळें अयाज्य याजन, निषिद्ध प्रतिग्रह इत्यादि प्रकारचीं पातकें घडत असतात. जो अयाज्ययाजन करितो; किंवा जो निषिद्ध प्रतिग्रह करितो तो पुरुष इहलोकीं कीर्तिशून्य होतो. ह्यास्तव, त्या पातकाचें निरसन करण्याकरितां उपोषित राहून स्वशाखारूप वेदाच्या तीन आवृत्ति कराव्या; अथवा हें होणें, शक्य नसल्यास उपोषित राहून तीन दिवस सविता ज्याची देवता आहे त्या गायत्रीमंत्राचा एकसारखा जप करून त्या पातकाची निवृत्ति करावी. ह्या प्रायश्चित्ताला वर ह्मणजे गाय ही दक्षिणा होय. ही श्रेष्ठ दक्षिणा दिल्यानें श्रेष्ठ ब्राह्मण प्रसन्न होतो. कारण, वर हा आत्माच आहे.

**तुहे हवा एष छन्दाꣳसि यो याजयति स येन यज्ञक्रतुना याजयेत्सोऽरण्यं परेत्य शुचौ देशे स्वाध्यायमेवैनमधीयन्नासीत तस्यानशनं दीक्षा स्थानमुपसद आसनꣳ सुत्या वाग्जुहूर्मन उपभृद्धृतिर्ध्रुवा प्राणो हविः सामाध्वर्युः स वा एष यज्ञः प्राणदक्षिणोऽनन्तदक्षिणः समृद्धतरः ॥ १७ ॥**

जो पुरुष आपत्तीमुळें प्राणरक्षण होईनासें झाल्यास प्राणरक्षणार्थ

अयाज्य पुरुषाचेंही याजन करितो तो आपल्यापाशीं असलेले मंत्र निष्फल करितो. ह्यास्तव, त्यानें ज्या यज्ञक्रतूचें आर्त्विज्य केलें असेल त्या यज्ञक्रतूचें प्रतिपादन करणाऱ्या वेदभागाचें अध्ययन अरण्यांत जाऊन शुद्ध प्रदेशाच्या ठिकाणीं करीत रहावें. भोजनपरित्याग हीच त्याची दीक्षा होय. शुद्धप्रदेशरूपस्थान ह्याच त्याच्या उपसत्संज्ञक इष्टि होत. त्याचें बसणें हीच सुत्या होय. (सुत्या ह्मणजे सोमाचा रस काढणें.) वाणी हीच जुहूसंज्ञक स्रुची होय; मन हीच उपभृत् होय; अनुष्ठाननिश्चय हीच ध्रुवा होय; प्राणच हवि होय आणि सामच अध्वर्यु होय. हा जो भावनारूप यज्ञ त्याची देहान्तसमयीं प्राणपरित्याग हीच दक्षिणा होय आणि प्राणरूप दक्षिणा असल्यामुळें अनंत दक्षिणेनें संपन्न असलेला हा यज्ञ अतिशय समृद्ध होय.

ब्रह्मयज्ञाचें माहात्म्य किती आहे व ब्राह्मणाचें कल्याण ब्रह्मयज्ञावर कसें अवलंबून आहे ही गोष्ट इतक्या वाटाघाटींवरून कोणाच्याही लक्ष्यांत येईल. पंचमहायज्ञांतील मनुष्ययज्ञ व भूतयज्ञ हे दरिद्री पुरुषाच्या हातून होणें शक्य नाहीं. कारण, मनुष्ययज्ञाकरितां निदान तीन ब्राह्मणांना तरी अन्न दिलें पाहिजे आणि भूतांना बलि अर्पण करण्यासही अन्न पाहिजे. ह्याकरितां ब्रह्मयज्ञाविषयीं आणि केवळ होमाविषयीं तरी नित्य तत्पर असावें. असें ह्या पंचमहायज्ञ प्रकरणाच्या आरंभींच दिलेल्या मनुवचनांत (श्लो० ७५ अ० ३) सांगितलें आहे.

तैत्तिरीयोपनिषदांतील शिक्षावल्लीमध्यें जो नवमानुवाक आहे तो श्रीशंकराचार्यांच्या भाष्यासह अध्ययन व ब्रह्मचर्य ह्यांसंबंधानें विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे.

**ऋतं च स्वाध्यायप्रवचने चासत्यं च स्वाध्यायप्रवचने च। तपश्च स्वाध्यायप्रवचने च। दमश्च स्वाध्यायप्रवचने च। शमश्च स्वाध्यायप्रवचने च। अग्नयश्च स्वाध्यायप्रवचने च।**

अग्निहोत्रं च स्वाध्यायप्रवचने च अतिथयश्च स्वाध्याय-प्रवचने च मानुषं च स्वाध्यायप्रवचने च। प्रजा च स्वाध्यायप्रववने च प्रजनश्च स्वाध्यायप्रवचने च। प्रजातिश्च स्वाध्यायप्रवचने च । सत्यमिति सत्यवचा राथीतरः। तप इति तपोनित्यः पौरुशिष्टिः । स्वाध्यायप्रवचने एवेति नाको मौद्गल्यः । तद्धि तपस्तद्धि तपः ॥ १ ॥

(भाष्य )विज्ञानादेवाप्नोति स्वाराज्यमित्युक्तत्वात्श्रौतस्मार्तानां कर्मणामानर्थक्यं प्राप्तमित्यतस्तन्मा प्रापदिति कर्मणां पुरुषार्थं प्रति साधनत्वप्रदर्शनार्थमिहोपन्यासः । ऋतमिति व्याख्यातम् । स्वाध्यायः अध्ययनम् । प्रवचनमध्यापनं ब्रह्मयज्ञो वा । एतानि ऋतादीनि अनुष्ठेयानीति वाक्यशेषः । सत्यं च सत्यवचनं यथाव्याख्यातार्थं वा । तपः कृच्छ्रादि । दमो बाह्यकरणोपशमः । शमोऽन्तःकरणोपशमः । अग्नयश्चाधातव्याः अग्निहोत्रं च होतव्यम् । अतिथयश्च पूज्याः । मानुषमिति लौकिकः संव्यवहारः । तच्च यथाप्राप्तमनुष्ठेयम् । प्रजाश्चोत्पाद्या । प्रजनः प्रजननमृतौ भार्यागमनमित्यर्थः । प्रजातिः पौत्रोत्पत्तिपुत्रोनिवेशयितव्य इत्येतत् । सर्वैरेतैः कर्मभिर्युक्तस्यापि स्वाध्यायप्रवचने यत्नतोऽनुष्ठेये इत्येवमर्थं सर्वेण सह स्वाध्यायप्रवचनग्रहणम् । स्वाध्यायाधीनं ह्यर्थज्ञानम् । अर्थज्ञानायत्तं च परं श्रेयः । प्रवचनं च तदविस्मरणार्थं धर्मवृद्ध्यर्थं च । अतः स्वाध्यायप्रवचनयोरादरः कार्यः । सत्यमिति सत्यमेवानुष्ठेयमिति सत्यवचाः सत्यमेव वचो यस्य सोऽयं सत्यवचा नाम वा तद्यस्य । राथीत रथीनरो गोत्रोराथीतर आचार्यो मन्यते। तप इति तप एव कर्तव्यमिति तपोनित्यस्तपसि नित्यस्तपःपरस्तपोनित्य इति वा नाम । पौरुशिष्टिः पुरुशिष्टस्यापत्यं पौरुशिष्टिराचार्यो मन्यते । स्वाध्यायप्रवचने एव अनुष्ठेये इति नाको नामतो मुद्गलस्यापत्यं मौद्गल्य आचार्यो मन्यते। तद्धि तपस्तद्धि तपः । यस्मात्स्वाध्यायप्रवचने एव तपस्तस्मात्ते

एवानुष्ठेय इति । उक्तानामपि सत्यतपःस्वाध्यायप्रवचनानां पुनर्ग्रहणमादरार्थम् ॥

भाष्याचें भाषांतर येणेंप्रमाणें:—विज्ञानानेंच स्वाराज्यप्राप्ति होते असें ब्रह्माच्या अनुवाकांत सांगितलें असल्यामुळें श्रौतस्मार्त कर्में व्यर्थ होत असें कोणाला वाटण्याचा संभव आहे. परंतु, तसें होऊं नये एतदर्थ श्रौतस्मार्त कर्में मोक्षरूप पुरुषार्थाचें साधन हें दर्शविण्याकरितां ह्या अनुवाकांत त्यांचा उपन्यास केलेला आहे. ऋत ह्मणजे अध्ययन आणि प्रवचन ह्मणजे अध्यापन अथवा ब्रह्मयज्ञ. (उपासक जर अध्यापनामध्यें गुंतून राहिला तर उपासनानुष्ठान संभवनीय नसल्यामुळें आणि अध्यापन हें काम्य असल्यामुळें त न केल्यानें प्रत्यवाय लागण्याचा संभव नसल्यामुळें प्रवचनशब्दाचा अर्थ अध्यापन असा करणें अयोग्य होईल म्हणून प्रवचन ह्मणजे ब्रह्मयज्ञ असा अर्थ भाष्यकारांनीं केलेला आहे) ऋतादिकांचें अनुष्ठान अवश्य केलें पाहिजे. सत्य ह्मणजे सत्यवचन; अथवा सत्यवचनाचें व्याख्यान पूर्वीं दर्शविल्याप्रमाणें. (अर्थात् सत्य ह्मणजे वाणीनें व देहानें घडणारें विहित कर्म) तप ह्मणजे कृच्छ्र वगैरे. दम ह्मणजे चक्षुरादि बाह्य इंद्रियांचें संयमन. शम ह्मणजे अंतःकरणाचा निग्रह. अग्न्याधान संस्कार अवश्य केला पाहिजे. अग्निहोत्र ह्मणजे सायंप्रातर्होमरूप कर्म अवश्य केलें पाहिजे. अतिथींचें पूजन केलें पाहिजे. मानुष ह्मणजे (विवाहादि कार्यांमध्यें बंधुप्रभृतींचा मानपान वगैरे करण्यासंबंधाचा) लौकिक आचार. हें कर्म प्राप्त होईल त्याप्रमाणें अवश्य केलें पाहिजे. प्रजोत्पादन अवश्य केलें पाहिजे. ऋतुकालीं भार्यागमनही अवश्य केलं पाहिजे. ह्या सर्व कर्मांनीं जरी पुरुष संपन्न असला तरी वेदाध्ययन व ब्रह्मयज्ञ हीं कर्में त्यानें प्रयत्नानें अवश्य केलींच पाहिजेत हें दर्शविण्याकरितां ऋत, सत्य इत्यादिकांपैकीं प्रत्येकाबरोबर स्वाध्यायप्रवचननिर्देश केलेला आहे. अर्थज्ञान हें

वेदाध्ययनावर अवलंबून आहे व अर्थज्ञानावर परम श्रेय अवलंबून आहे. प्रवचन हें त्या वेदाचें विस्मरण न होण्याकरितां व धर्मवृद्धीकरितां आहे. तस्मात्, वेदाध्ययन ह्मणजे वेदग्रहणार्थ अध्ययन आणि ब्रह्मयज्ञ ह्यांसंबंधानें पुरुषानें विशेष दक्ष असल पाहिजे. ज्याचें भाषण सत्यच आहे तो सत्यवचा अथवा सत्यवचा हें त्याचें नांव होय. राथीतर ह्मणजे रथीतर गोत्रामध्यें उत्पन्न झालेला. सत्याचेंच अनुष्ठान करावें असें सत्यवचा राथीतर आचार्य मानीत आहे. तपोनित्य ह्मणजे तपोनिष्ठ; अथवा तपोनित्य हें नाम होय. पौरुशिष्टि ह्मणजे पुरुशिष्टाचें अपत्य. तपोनित्य पौरुशिष्टि आचार्य तपाचेंच अनुष्ठान करावें असें मानितो. नाक हें नाम होय. मौद्गल्य ह्मणजे मुद्गलाचें अपत्य. वेदग्रहणार्थ अध्ययन व ब्रह्मयज्ञ ह्याच कर्मांचें अनुष्ठान अवश्य केलें पाहिजे असें नाक मौद्गल्य आचार्य मानितो. कारण, अध्ययन व ब्रह्मयज्ञ हेंच तप होय आणि ह्मणून त्याचेंच अनुष्ठान करणें अवश्य होय. सत्य, तप, स्वाध्याय व प्रवचन ह्यांचा पुनः निर्देश केलेला आहे तो त्या कर्मांचा आदर विशेष करावा हें दर्शविण्याकरितां केलेला आहे. (ह्मणजे हीं कर्में सर्वांपेक्षां उत्कृष्ट होत. हें दर्शविण्याकरितां केलेला आहे.)

आचार्यानें शिष्याला वेदाध्ययन सांगितल्यानंतर ज्या गोष्टींचा शिष्याला उपदेश करावा ह्मणून शिक्षावल्लीच्या अकराव्या अनुवाकांत सांगितलें आहे त्यांत स्वाध्यायान्मा प्रमदः असें एक उपदेशवाक्य आहे. अध्ययनानें ग्रहण केलेला जो वेद त्याचें विस्मरण होऊं देऊं नको हें ह्या वाक्याचें तात्पर्य होय. कारण,

ब्रह्मोज्झता वेदनिन्दा कौटसाक्ष्यं सुहृद्वधः ।
गर्हितानाद्ययोर्जग्धिः सुरापानसमानि षट् ॥

ह्या स्मृतिवचनामध्यें वेदाचा त्याग हें पातक सुरापानसम सांगितलें आहे. त्याचप्रमाणें

ब्रह्महत्यासमं ज्ञेयमधीतस्य च नाशनम् ।

असेंही स्मृतिवचन आहे. अध्ययनाचें विस्मरण झालें असतां ब्रह्महत्यातुल्य पातक लागतें असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. ( ब्रह्मोज्झे मे किल्बिषम् ? ) अशीही श्रुति आहे. "वेद विसरलेल्या पुरुषाचे ठिकाणीं माझें पातक जावों" असें ह्या श्रुतीचें तात्पर्य आहे.

सर्व प्रकारचा केर, कचरा, घाण वगैरे टाकण्याकरितां ज्याप्रमाणें उकिरड्याची योजना केलेली असते ह्मणजे उकिरडा हें ज्याप्रमाणें सर्व प्रकारच्या घाणीचें भांडार होय त्याचप्रमाणें वेदाचें विस्मरण झालेला पुरुष सर्वप्रकारच्या पातकांचें विश्रांतिस्थान होय. वेदाध्ययन केल्यानंतरही वेदाचें विस्मरण होणें ही गोष्ट जर इतकी दोषावह सांगितली आहे तर मुळींच वेदाध्ययन व ब्रह्मयज्ञ हीं कर्में न करणारा ब्राह्मण केवढ्या मोठ्या भयंकर पातकाची जोड करीत असतो हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. ह्मणूनच आचार्यानें शिष्याला करावयाचा उपदेश हा ज्यांतील मुख्य प्रतिपाद्य विषय आहे त्या शिक्षावल्लीच्या अकराव्या अनुवाकामध्यें स्वाध्यायान्मा प्रमदः । हें एकदा सांगितलें असूनही पुनरपि

स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम् ।

( वेदाध्ययन व ब्रह्मयज्ञ ह्या दोन कर्मांविषयीं कधींही प्रमाद होऊं देऊं नको. हीं कर्म नियमानें केलींच पाहिजेत) असें बजावून सांगितलें आहे. ह्यास्तव, वेदाध्ययन व ब्रह्मयज्ञ हीं कर्में द्विजानें अवश्य केलींच पाहिजेत.

# तर्पण.

देवयज्ञ, पितृयज्ञ, भूतयज्ञ, मनुष्ययज्ञ व ब्रह्मयज्ञ ह्यांना पंचमहायज्ञ असें ह्मणतात. देवयज्ञ ह्मणजे सायंप्रातर्होम, पितृयज्ञ ह्मणजे पितरांच्या उद्देशानें निदान पाणी तरी सोडणें ह्मणजे तर्पण तरी

करणें; भूतयज्ञ ह्मणजे भूतांना उद्देशून बलिदान करणें; मनुष्ययज्ञ ह्मणजे तीन ब्राह्मणांना तरी अन्न घालणें आणि ब्रह्मयज्ञ ह्मणजे आपली जी परंपरागत वेदशाखा असेल त्या शाखेचें यथाशक्ति विधिपूर्वक अध्ययन करणें. तैत्तिरीयशाखी लोकांच्या वैश्वदेवामध्येंच देव, पितर, भूत व मनुष्य ह्यांना उद्देशून आहुति आहेत. तेव्हां ज्यांना अनुकूलता नसेल किंवा विधुरत्वादि कारणानें साग्निकत्व नसल्यामुळें ज्यांच्या हातून सायंप्रातर्होमरूप देवयज्ञ होणें शक्य नसेल त्यांच्या देवयज्ञाची पूर्तता वैश्वदेवानेंही होते. त्याचप्रमाणें ज्यांना पितरांच्या उद्देशानें रोज श्राद्ध करण्याची अनुकूलता नसेल त्यांचा पितृयज्ञ वैश्वदेवांतील पितरांच्या उद्देशानें दिल्या जाणाऱ्या आहुतीमुळें व तर्पणामुळें होतो. भूतबलि हा वैश्वदेवानंतर होतच असतो व ह्यालाच काकबलि असें ह्मणतात. ज्याला तीन ब्राह्मणांना प्रत्यहीं अन्न घालण्याचें सामर्थ्य नसतें, ज्यांना भिक्षाही ब्राह्मणांना घालण्याची शक्ति नसते, अथवा ज्यांना माधुकरी सुद्धां घालण्याचें सामर्थ्य नसतें त्यांचा मनुष्ययज्ञ वैश्वदेवामध्यें मनुष्यांना उद्देशून दिल्या जाणाऱ्या आहुतीनें होतो; परंतु, ब्रह्मयज्ञाला मात्र प्रत्यहीं वेदाध्ययनाशिवाय दुसरी कांहीं सोयच नाहीं. ब्रह्मयज्ञ व तर्पण ह्या दोहोंची योग्यता सारखीच समजली जातें. कांहींच्या मतानें तर तर्पण हें ब्रह्मयज्ञाचेंच अंग होय.

आयुष्य, तेज, कांति, संपत्ति व यश ह्यांची प्राप्ति होणें हें ब्रह्मयज्ञाचें फल होय आणि तर्पणाचेंही हेंच फल होय. आयुष्य, तेज, संपत्ति वगैरे गोष्टी कोणाला नको आहेत? प्रत्येकाला त्या हव्याच असतात. तेव्हां ब्रह्मयज्ञादिकांच्या फलासंबंधानें श्रद्धा असो अथवा नसो तीं कर्में केल्यानें अपाय तर होणारच नाहीं; झाला तर उपायच होईल. ह्मणून पंचमहायज्ञांच्या फलासंबंधानें जरी संशय असला तरी फल नाहीं अशी खात्री कोणालाच देता येणें शक्य नसल्यामुळें

पंचमहायज्ञ करणें हीच गोष्ट सर्वांना हितावह होय. आयुष्य, प्रजा, धन, विद्या, स्वर्ग, मोक्ष व राज्य ह्या गोष्टी पितरांच्या प्रसादामुळें प्राप्त होत असतात असेंही स्मृतिवचन आहे. तेव्हां पितृतर्पण सर्वांनींच प्रत्यहीं करणें हितावह होय. ह्या तर्पणरूप एकाच कर्मामध्यें देव, ऋषि, आचार्य व पितर ह्यांचें तर्पण आश्वलायन सूत्रांत सांगितलें आहे. हिरण्यकेशिसूत्रांत देव, ऋषि, आचार्य व पितर असे चार विभाग नसून देव, ऋषि व पितर असे तीनच विभाग आहेत. ह्मणजे आश्वलायन सूत्रांत आचार्य ह्मणून ज्यांचा उल्लेख आहे त्यांचा अथवा त्यांच्यासारख्यांचा उल्लेख पितर ह्मणून आहे. आश्वलायनसूत्रांतही आचार्य हे पितरांपैकींच आहेत. कारण, प्राचीनावीती असें त्यांच्या तर्पणाचे वेळीं प्रथम ह्मटलें आहे. जो जीवत्पितृक असतो त्याला आचार्यसंज्ञक पितरांचे तर्पण अवश्य असतेंच. पिता जिवंत असल्यामुळें पूर्वजांचें व इतर नातेवाइकांचें तर्पण त्याला करावें लागत नाहीं. सारांश, वेदादिप्रवर्तक आचार्य व जनकादि पितर हा एकच वर्ग हिरण्यकेशि सूत्रांत मानिलेला आहे. पितृत्रयी, मातृत्रयी, सापत्नमाता, मातामहापासून तीन, मातामहीपासून तीन, पत्नी, सुत, दुहिता, पितृव्य, मातुल, पितृभगिनी, मातृभगिनी, आत्मभगिनी, श्वशुर, गुरु व आप्त हा तर्पणाचा व पिंडदानाचा क्रम आहे. ह्यांमध्यें प्रथम पिता आहे. तेव्हां मातामह जिवंत असल्यास ज्याप्रमाणें मातुःपितामह व मातुःप्रपितामह ह्यांचें तर्पण ते मृत असतांनाही होत नाहीं त्याचप्रमाणें प्रथम जो पिता तो जिवंत असल्यास कोणाचेंच तर्पण करावें लागत नाहीं. पितृप्रभृति जे पितृगण वर सांगितले त्यांमध्यें जे जे जिवंत असतील ते ते सोडून देऊन ज्याप्रमाणें बाकीच्यांचेंच तर्पण करावें लागतें त्याचप्रमाणें पिता जिवंत असल्यास पितृप्रभृति पितरांचें तर्पण सोडून देऊन आचार्यसंज्ञक पितरांचें तर्पण नित्य करावेंच लागतें. सारांश,

पिता जिवंत असला तरी आचार्यांचें अथवा आचार्यसंज्ञक पितरांचें तर्पण प्रत्येकाला आहेच.

## क्रम, नातें व वारसा.

ज्यांचें नातें जितकें जवळ किंवा ज्यांच्या मालमत्तेवर आपला वारसा जवळ त्यांचें तर्पण आधीं आणि ज्यांचे नातें लांब व ज्यांच्या मालमत्तेवर आपला वारसा लांब त्यांचें तर्पण मागून असा प्रकार वरील क्रमाप्रमाणें आहे. नातेवाईक अशा सर्व पितरांमध्यें पिता श्रेष्ठ असल्यामुळें पित्याचें तर्पण अगोदर. पित्याचें जितके उपकार पुत्रावर असतात तितके दुसरे कोणाचेही नसतात. राज्य, संस्थान, जहागीर, इनाम, मिरास, संपत्ति, घरदार, भांडेंकुंडें, पुस्तकादि संपत्ति वगैरेंपैकीं कांहीं तरी पित्यानें पुत्राकरितां ठेविलेलें असतें. तेव्हां पित्याचे उपकार सहजच पुत्राच्या दृष्टीं पडत असतात. परंतु, वरील गोष्टींपैकीं कांहीं एक जरी पित्यानें ठेविलेलें नसलें तरी पित्याचे उपकार पुत्रावर असतात. ते उपकार ह्मणजे जन्मानंतर पालन, पोषण, विद्यादान वगैरें. शिक्षणाचे वय होण्यापूर्वींच ज्याचा पिता निवर्तला असेल त्याच्यावर अथवा उत्पन्न होताक्षणींच किंवा गर्भाशयांत असतांनाच ज्या बालकाचा पिता निवर्तला असेल त्याच्यावर पित्याचे उपकार कोणते असा प्रश्न कोणी करितल. परंतु, पित्यानें आपणांला द्विजयोनींत किंवा ब्राह्मणयोनींत जन्म दिला आहे हा सुद्धां पित्याचा उपकार फार मोठा आहे आणि ह्या मोठ्या उपकाराकरितांच पित्यानें कांहीं एक मालमत्ता न ठेवितां जरी कर्जच ठेविलेलें असलें तरी तें सुद्धां फेडणें पुत्राचें कर्तव्य म्हणून शास्त्रानें ठरलेलें आहे. तेव्हां आह्मांला बापानें कांहीं ठेविलें नाहीं. मग आह्मी कशाला त्याचें तर्पण अथवा श्राद्ध करावें " असें ह्मणणें व्यर्थ होय. पिता आमचा विषयासक्त होऊन आमच्या मातेशीं रत झाला; आमच्या उत्पत्तीच्या

उद्देशानें तो रत झालाच नव्हता असेंही एकाद्याला वाटण्याचा संभव आहे. परंतु, कामांध होऊनच पिता रत झाला होता असें जरी क्षण-भर गृहीत धरिलें तरी सुद्धां पित्याचे आपणांवर उपकार आहेतच व त्याची फेड शास्त्रानें दर्शविलेल्या मार्गाशिवाय इतर मार्गानें होणें शक्य नाहीं. पित्यापासून मातेचे ठिकाणीं गर्भ राहून जे आपण जन्मास आलों ते आपण मातेच्या गर्भाशयांत रेताबरोबर प्रविष्ट होण्यापूर्वी पित्याच्या शरीरामध्यें होतो ह्याबद्दल वाद नाहीं. गर्भाश-यांत शिरण्यापूर्वी पित्याच्या शरीरामध्यें आपण शुक्र धातूचे ठिकाणीं होतो. ज्या शुक्राचे ठिकाणीं आपण सूक्ष्म अवस्थेमध्यें होतो तें शुक्र कामांधतेमुळें कां होईना आपल्या पित्यानें आपल्या मातेच्या ठिकाणीं जें सिंचन केलें तें जर इतरत्र म्हणजे वेश्या-दिकाचें ठिकाणीं त्यानें सिंचन केलें असतें तर आपण द्विजत्वाला, ब्राम्हण्याला अथवा कुलीनत्वाला मुकलों असतों. तेव्हां पित्यानें स्वतःची कामवासना तृप्त करण्याकरितांच विवाह केला होता व कामवासनेनेंच त्यानें आपण ज्या शुक्रामध्यें होतो तें शुक्र आपल्या मातेच्या गर्भाशयांत ठेविलें होतें असें जरी मानिलें तरी पित्याचे आपण ऋणी ठरलोंच. पित्यानें जर विवाह केला नसता किंवा विवाह करूनही जर आपण ज्यांत होतों तें शुक्र वेश्यादिकांचे ठिकाणीं टाकिलें असतें किंवा इतर कांहीं रीतीनें तें त्याच्या शरीरापासून बाहेर गेलें असतें तर आपण मोरीच्या घाणेरड्या पाण्याबरोबर कोठें तरी नरकांत वगैरे जाऊन पडलों असतों व विष्ठादिकांतील कृमि झालों असतों. ह्यास्तव, पित्याचे उपकार पुत्राच्या हातून शास्त्रदृष्ट मार्गाशिवाय अन्य रीतीनें फिटणें शक्य नाहीं. ते उपकार फेडणें म्हणजे आपण विवाह करून पुत्र उत्पन्न करणें व त्या पुत्राचेंही वीर्य भलत्याच ठिकाणीं न जाईल अशा रीतीनें त्याला शिक्षण देऊन त्याची विषयवासना भोंवतालच्या स्थितीमुळें अनावर होण्यापूर्वी

त्याचा विवाह कुलीन घराण्यांतील कन्येशीं करून देणें होय.

जातिभेद नको म्हणणाऱ्या कांहीं द्विजकुलोत्पन्न लोकांना द्विजत्वाची अथवा ब्राह्मण्याची किंमत वाटत नसल्यामुळें पित्यानें आपणाला तें दिल्याबद्दल त्याचे उपकार मानण्याचें कारण नाहीं असें त्यांच्या वर्तनावरून म्हणता येण्यासारखें आहे. परंतु, पित्याच्या उपकाराचेंच उत्कृष्ट फल आपणाला मिळालें आहे व आपण त्याचा उपभोग घेत आहों ही गोष्ट त्यांच्या लक्ष्यांत आलेली नाहीं. जातिभेद कोणाच्या मतानें इष्ट नसेना ही. परंतु, सर्व महाराष्ट्र जरी आपण धुंडाळून पाहिलें तरी द्विजेतरांमध्यें व पांढरपेशे नसणाऱ्यांमध्यें द्विजांप्रमाणें अथवा ब्राह्मणाप्रमाणें बुद्धिमान्, कर्तृत्ववान्, विचारी, लोकहितार्थ झटणारे व ज्ञानाचा प्रसार करणारे लोक आढळतच नाहींत. महाराष्ट्रांत द्विजांपेक्षां द्विजेतरांची अथवा ब्राह्मणांपेक्षां ब्राह्मणेतरांची संख्या वीसपट आहे व सरकारानें कोणालाही ज्ञानसंपादन करण्याचा मार्ग मोकळा ठेविला आहे. कोल्हापूर, बडोदें, देवास, सावंतवाडी इत्यादि ब्राह्मणेतरांच्या संस्थानांतून ब्राह्मणेतरांना शिक्षण देण्याचे प्रयत्न सुरू आहेत व ब्राह्मणेतरांना शिक्षण मिळण्याच्या सवलती नादार वगैरेच्या बाबतींत ब्राह्मणांपेक्षां अधिक आहेत. मग इतक्या गोष्टी असतांना व ब्राह्मणेतरांची संख्या वीसपट असतांना विश्वविद्यालयाच्या परीक्षांचे किताब मिळविणारे ब्राह्मणेतर ब्राह्मणांपेक्षां वीसपट राहोच परंतु, ब्राह्मणांच्या चतुर्थांश सुद्धा कां नाहींत? त्याचप्रमाणें, रानडे, मंडलिक, देशमुख, मोडक, भांडारकर, कृष्ण शास्त्री चिपळूणकर, विष्णु शास्त्री चिपळूणकर, आपटे, गोळे, आगरकर, गोखले, देवधर, राजवाडे, विजापूरकर, ओक, वैद्य, टिळक, छत्रे इत्यादिकांप्रमाणें ब्राह्मणेतरांत अद्यापि कां दृष्टीं पडत नाहींत? सारांश, आपण द्विजकुलांत उत्पन्न झालों म्हणून आपणाला इतरांचा उद्धार करण्याची बुद्धि अथवा सामर्थ्य प्राप्त झालें

आहे आणि म्हणूनच वृत्तपत्रें मासिकें, पाक्षिकें वगैरेंच्या द्वारानें, सभा वगैरे भरवून व्याख्यानादिकांच्या द्वारानें व इतर प्रकारांनीं लोक-शिक्षण देता येत आहे. आपल्या पित्यांनीं व पूर्वजांनीं सवर्ण विवाह करून आपली कामवासना स्वस्त्रीसमागमानें तृप्त करून घेतल्याचेंच फल आपण ब्राह्मणेतरांपेक्षां गुणी निघालों हें आहे. पित्यानें सवर्ण स्त्रीशीं विवाह न करितां किंवा मुळींच विवाह न करितां अथवा विवाह करूनही आपण ज्या शुक्रांशांत होतों तो शुक्रांश स्वस्त्रीचे ठिकाणीं न ठेवितां अतिशूद्र, शूद्र इत्यादि जातीं-पैकीं एकाद्या जातीच्या स्त्रीचे ठिकाणीं जर ठेविला असतां तर आपली अवस्था आज काय असती ? वेश्या अथवा द्विजेतर जातीच्या स्वैरिणी स्त्रिया ह्यांच्यापाशीं ब्राह्मणांचा समागम झाल्यामुळें उत्पन्न झालेल्या व्यक्ति बुद्धिमान् निपजत असल्याचें क्वचित् दृष्टी पडतें. परंतु, ह्या संकरजन्य व्यक्ति जरी बुद्धिमान् निपजल्या तरी हाडाच्या फार वाईट असतात; ब्राह्मणांचा म्हणजे ज्ञानदानादि कृत्यें करणाऱ्या वर्गाचा ह्या व्यक्ति द्वेष करितात; ब्राह्मणांशीं द्वेष व ब्राह्मणांचें नुक-सान करण्याचें व्रत ह्या व्यक्ति स्वीकारीत असल्यामुळें देशांत ज्ञानप्रसार होण्याला व देशहित होण्याला ह्यांच्या हातून समजून अथवा न समजून विरोधच होत असतो व ज्या जातीमध्यें ह्या संकरजन्य व्यक्ति समाविष्ट झालेल्या असतात त्या जातीच्या हिता-करितांही ह्या झटत नसून त्यांच्याकरितां ब्राह्मणच झटत असतात. मद्यपानामुळें प्रत्यक्ष अनर्थ आज ब्राह्मणेतरांवर ओढवत आहेत व त्यांच्या संसाराची व समाजाची राखरांगोळी होत आहे. ब्राह्मणांमध्यें हें व्यसन नाहीं व ब्राह्मण वर्गाचा ह्या व्यसनामुळें घातही होत नाहीं. परंतु, मद्यपाननिषेधाचे पुढारी ब्राह्मण आहेत; त्यांकरितां लव्हाट्यांसारखे पदवीधर ब्राह्मण गळ्यांत झोळी अडकवून भिक्षा मागत आहेत; ह्या चळवळीबद्दल सरकारी अधिकाऱ्यांच्या कृपेचा

अभावही ब्राह्मणच संपादित आहेत व दंडाची अथवा कारागृहाची शिक्षा ब्राह्मणांनींच भोगिलेली आहे. कोल्हापूर, बडोदें वगैरे संस्थामध्यें जा. तेथील अधिपतींना वेदोक्त दिसत आहे व त्यामुळें त्यांच्या संस्थानांतून दुही उत्पन्न झालेली आहे. परंतु, आपल्या जातभाईंच्या संसाराचें वाटोळें करणाऱ्या मद्याच्या विरुद्ध मोहीम करण्याचें व्रत स्वीकारण्यास एकही ब्राह्मणेतर संस्थानिक अथवा जहागीरदार तयार नाहीं. शिक्षणाची कमतरता अथवा उणीव ब्राह्मणेतरांमध्यें आहे; परंतु, ह तांत कंकण बांधून शिक्षण सक्तीचें व मोफत होण्याची अविश्रांत खटपट सरकारच्या वरिष्ठ दरबारांत एक ब्राह्मणच करीत होता. परंतु, ब्राह्मणेतर लोक व ज्ञानप्रसार करण्याबद्दल प्रशंसेस पात्र झालेल्या सरकारचे प्रतिनिधिच त्यांच्या मार्गांत आडवे पडले आहेत. फार कशाला? आपल्या समजुतीनें एका ब्राह्मणेतराधिष्ठित संस्थानाचें कल्याण व्हावें ह्या बुद्धीनें लेख लिहून कारागृहवास पतकरण्यास आगरकर, रानडे, भिडे वगैरे ब्राह्मणच तयार झाले ना? कै० मल्हारराव गायकवाडांना खटल्याच्या खर्चाकरितां एक लाख रुपये पुण्यांतील सार्वजनिक सभा पाठवील ह्मणून छातीनें तार करणारा ब्राह्मणच होता.

सारांश, द्विजत्व अथवा ब्राह्मण्य आपणांला मिळालें हें पित्याच्या (आपल्या हातून कधींही न फिटणाऱ्या) उपकारांचें फल होय हें सर्व सुधारणावादी लोकांनीं लक्ष्यांत ठेविलें पाहिजे आणि पित्याचें तर्पण अवश्य केलें पाहिजे. शूद्र वर्णांतील लोकांवरही त्यांच्या पित्याचें अत्यंत उपकार आहेतच. कारण, पित्यानें जर सवर्ण स्त्रीशीं विवाह न करितां वेगळ्या रीतीनें आपली कामवासना तृप्त केली असती तर शूद्रयोनीपेक्षांही हीन योनि त्यांना प्राप्त झाली असती. ह्यास्तव, शूद्र अथवा द्विजेतर संस्थानिक, जहागिरदार इत्यादिकांनींही पित्याचे आपल्यावर अनंत उपकार आहेत हें विसरतां नये. कारण,

आपल्या पित्यानें जर स्वस्त्रीशीं रत होऊन तिचे ठिकाणीं आपली स्थापना केली नसती तर आपणांला राजेपणा प्राप्त झाला नसता हे त्यांनीं विसरतां कामा नयें. पित्याच्या स्वस्त्रीसमागमरूप गुणा-मुळें आपण राज्याधिकारी झालों व दुसरा आपल्याचप्रमाणें पित्याचे ठिकाणीं पूर्वी असतांना ह्मणजे पितृशरीरस्थशुक्रगतत्त्व ह्या न्यायानें आपलें व इतरांचें पित्याशीं नातें सारखेंच असतांना आपली स्थापना पित्यानें स्वस्त्रीचे ठिकाणीं केल्यामुळें आपण राज्याधिकारी होऊन महाराज ह्या मोठ्या पदवीस पात्र झालें व दुसऱ्याची स्थापना पित्यानें उच्च वर्णाच्या स्त्रीचे ठिकाणीं जरी केली होती तरी ती विवाहित भार्या नसल्यामुळें तिच्या ठिकाणीं आपल्याच पित्याला जें मूल झालें तें आकृतिप्रमृतींनी जरी पित्यासारखें आहे तरी तें आपल्यासारखें सत्ताधारित्वादि गोष्टींनी संपन्न नाहीं ही गोष्ट आजमित्तीसही एका महाराजांना सहज कळण्यासारखी आहे. तेव्हां पित्याचे आपल्यावर उपकार नाहींत असें द्विजेतरांना तरी कसें ह्मणतां येईल ? अर्थात्, त्यांनींही आपल्या पित्याचें तर्पण त्यांच्या प्रमाणेंच देवब्राह्मणादिकांचें संतर्पण करण्याच्या द्वारानें यथाशक्ति प्रत्यहीं करणें अवश्य आहे.

मातापितरांमध्यें श्रेष्ठ कोण ह्याबद्दल जरी भवति न भवति करितां अली तरी माता ही केवळ कातड्याची पिशवी असून पुत्र हा मुख्यतः पित्याचाच होय असें जें देवांनीं आकाशवाणीच्या द्वारानें दुष्यंताला सांगितलें तेंच सत्य आहे व ह्मणूनच पित्याचें तर्पण इतर सर्व नातेवाइकांपेक्षां आपण प्रथम करणें अवश्य आहे.

## पूर्वजांसंबंधानें कर्तव्य.

शास्त्रदृष्ट मार्गाशिवाय अन्य मार्गानें जन्मभर कितीही खटपट केली तरी ज्यांची फेड होणें शक्य नाहीं असे अनंत उपकार कोणत्याही जातीच्या व कोणत्याही स्थितींतील पुत्रावर त्याच्या पित्याचे झालेले असल्यामुळें ज्याचा पिता इतरांच्या अथवा समाजाच्या दृष्टीनें प्रशं-

सनीय नसतो तोही आपल्या पित्याच्या हातचे लेख, आपल्या पित्यानें वापरलेली भांडींकुंडीं अथवा आपल्या पित्यानें अंगावर घातलेलीं भूषणें आपल्या संग्रहीं ठेवीत असतो. लाकुडतोड्या सुद्धां आपल्या बापाची कुऱ्हाड मोठ्या अभिमानानें जपून ठेवीत असतो व इतर कारागीरलोकही आपल्या बापाची काम करण्याची हत्यारें अगदीं जपून ठेवीत असतात. ज्यांच्या पित्याची कांहीं दृश्य कृति शिलक नसेल ते निदान आपल्या पित्याची तसबीर तरी आपल्या संग्रहीं ठेवितात व आपल्या शक्तीप्रमाणें ती तसबीर चितान्याकडून मोठी करवून व तिला रंग वगैरे देऊन भिंगांत बसवीत असतात. पित्यानें एकादें देवालय बांधिलें असल्यास त्याचा जीर्णोद्धार करण्यास पुत्राला मोठी हौस वाटत असते; पित्यानें बांधिलेलें घर दुरुस्त करण्यास पुत्राला आनंद वाटतो व वडिलार्जित घर अगदीं एका बाजूस कोनपड्यांत असलें तरी ते पडल्यावर अनुकूल परिस्थितींतील पुत्रही दुसऱ्या चांगल्या मोठ्या व स्वस्त मिळणाऱ्या जाग्यावर घर बांधण्याचे ऐवजीं वडिलार्जित जाग्यावर अडचणींत इमारत बांधितात असें दृष्टीस पडतें. पुण्यापाशीं वानवडीचे हद्दींत असलेल्या पूर्वजांच्या छत्रीचा जीर्णोद्धार सांप्रतच्या श्रीमंत माधव महाराज शिंद्यांनीं लाखों रुपये खर्चून केला आहे; गायकवाड संस्थानांतील सांप्रतच्या महाराजांनीं पूर्वजांच्या सर्व इमारती दुरुस्त ठेविल्या आहेत; सांप्रतच्या सचिवांनीं पूर्वजांच्या सर्व धर्मशाळा, किल्ले व इमारती अगदीं दुरुस्त ठेविल्या आहेत व इतरांनींही असेंच केलेलें आहे. पटवर्धन संस्थानिकांनीं तर आपल्या मूळ पुरुषाची पडशीही जतन करून ठेविली असल्याचें कळतें. तुम्ही कोणत्याही राज्यांत, संस्थानांत, जहागिरींत, इनामतींत अथवा धनाढ्य कुंटुंबांत जा; पूर्वजांबद्दल अभिमान बाळगून त्यांच्या कृतीचें संरक्षण त्या त्या वंशजांनीं केलें आहे असें तुम्हाला दृष्टीस पडेल. पूर्वजांचा अभिमान बाळगून त्यांच्या

कृतीचें संरक्षण करणें व त्यांचा कित्तापुढें चालविणें ही श्रेष्ठ स्वर्गस्थ पितरांना अत्यंत तृप्त आणि आनंदित करणारी असल्यामुळें तसें करणें हें एक उत्तम प्रकारचें पितृतर्पण आहे. हें पितृतर्पण ज्या समाजांत नाहीं अथवा ज्या घराण्यांत नाहीं त्या समाजाचा अथवा घराण्याचा विनाशकाल अगदीं समीप आला आहे असें सर्वांनींच पूर्णपणें लक्ष्यांत ठेवावें. ज्या राष्ट्रांत पूर्वजांविषयीं अभिमान नष्ट होऊं लागला तें राष्ट्र मरणाच्या पंथाला लागलें म्हणून निर्भ्रांत समजावें असें थोरथोर मुत्सद्यांचें म्हणणें आहे.

## इतिहासाचीं मूल सूत्रें.

पंचमहायज्ञांतील नित्य तर्पण म्हणजे त्या त्या लोकांच्या प्राचीन इतिहासाचीं मूलसूत्रें आहेत. हीं मूलसूत्रें पुढें ठेवून अध्ययनाच्या व उद्योगाच्या साहाय्यानें आपआपल्या समाजाचा अति विस्तृत, मनोरंजक, उत्साहदायक आणि अभ्युदयकारक असा इतिहास बुद्धिमान, उद्योगी व विद्यासंपन्न लोकांना लिहितां येईल व तो इतिहास कोणत्याही देशाच्या इतिहासापेक्षां अधिकच उपयोगी होईल.

पितृतर्पणांतील पितृगणांमध्यें सामान्य पितृगण व विशिष्ट पितृगण असे दोन प्रकार आहेत. त्या त्या सूत्राच्या सर्व अनुयायी लोकांना ज्यांचें तर्पण करावें लागतें ते सामान्य पितृगण आणि जनक, जननी इत्यादि विशिष्ट पितृगण. जनक, जननी, इत्यादि विशिष्ट पितृगणही सहोदर भ्रात्यांचे श्वशुरादि अपवाद खेरीज करून सर्व सामान्यच असतात. त्याचप्रमाणें एका सूत्राच्या अनुयायी लोकांचे आचार्यसंज्ञक पितृगण सामान्य असतात. आपआपल्या विशिष्ट पितृगणापेक्षां सामान्य पितृगण श्रेष्ठ असतात व प्राचीन असतात. चुलत भावांचें नातें ज्यांमध्यें परस्पर असतें त्यांचा जनक जरी प्रत्येकाचा भिन्नभिन्न असतो तरी पितामह, प्रपितामह वगैरे एकच असतात.

सुमंतु, जैमिनि, वैशंपायन व पैल हे वेदप्रवर्तक आचार्य; त्याचप्रमाणें, सूत्रें, भाष्यें, भारत व महाभारत ह्यांचे प्रवर्तक धर्माचार्य; त्याचप्रमाणें जानंति, बाहवि, गार्ग्य, गौतम, शाकल्य, बाभ्रव्य, मांडव्य, मांडूकेय, गार्गी वाचक्नवी, वडवा प्रातिथेयी, सुलभा मैत्रेयी, कहोळ, कौषीतक, महाकौषीतक, पैंग्य, महापैंग्य, सुयज्ञ, शांखायन, ऐतरेय, महैतरेय, शाकल, बाष्कल, सुजातवक्त्र, औदवाहि, महौदवाहि, सौजामि, शौनक, आश्वलायन व इतर सर्व सामान्य आचार्य हे सर्व आश्वलायनसूत्रानुयायी लोकांचें सामान्य पितृगण होत. ह्या प्रत्येक नांवामध्यें फार मोठा इतिहास भरलेला आहे. सुमंतुप्रभृति चार मुनि अनुक्रमें अथर्व, साम, यजु व ऋक् ह्या वेदांचे मुख्य प्रवर्तक आहेत. तेव्हां ह्यांचे तर्पण करण्याचें कारण वैदिक धर्माचें मूळ जे वेद त्यांचे प्रवर्तक असणें हें होय. तेव्हां बापाची कृति ज्याप्रमाणें पुत्र संभाळून ठेवीत असतो त्याचप्रमाणें प्रत्येकाच्या बापाला ज्यांचें तर्पण करावें लागत होतें त्या सुमंतुप्रभृति ऋषींनीं प्रवृत्त केलेल्या वेदांचें रक्षण करणें हें सर्वांचें कर्तव्य होय. सुमंतुप्रभृति आचार्यांचें वेदप्रवर्तक गुरु जे वेदव्यास त्यांचें तर्पण त्यांच्या नांवाचा निर्देश करून आश्वलायन सूत्रांत सांगितलेलें नाहीं. परंतु, **भारतमहाभारतधर्माचार्याः** ह्यामध्यें त्यांचा उल्लेख आलेला आहे. हिरण्यकेशिसूत्र मध्यें कृष्णद्वैपायन हें नांव ऋषिगणामध्यें स्वतंत्रच आहे. आश्वलायन सूत्रांत आश्वलायन हें नांव ज्याप्रमाणें प्रत्यक्ष आलें असून ये चान्ये आचार्याः ह्या वेदांनीं इतर वेदांवरील व इतर वेदशाखांवरील सूत्रकारांचा उल्लेख आहे त्याचप्रमाणें सत्याषाढ सूत्रामध्यें सत्याषाढ हें नांव प्रत्यक्ष असून सूत्रकार, प्रवचनकर्ते, आचार्य व ऋषि ह्यांचा सामान्य उल्लेख आहे. त्यांत इतर सूत्रकार वगैरेंचा अंतर्भाव होतो. महाभारतकार वेदव्यास ह्यांचा निर्देश कोठें प्रत्यक्ष तर कोठें

गह भारतधर्माचार्य ह्मणून आलेला आहे व महाभारतप्रवर्तक वैशं-पायनाचा उल्लेख आश्वलायन व हिरण्यकेशी ह्या दोन्हीं सूत्रांमध्यें आहे. परंतु, दोन्ही ठिकाणीं हें नांव मुख्यतः यजुर्वेदप्रवर्तक ह्मणून आलेलें आहे. हे सर्वही वेदप्रवर्तक आचार्य वेदव्यासांचेच शिष्य होत. अर्थात वेदव्यास हे चारी वेदांचे मुख्य प्रवर्तक होत. आज जगतांत जं कांहीं वैदिकधर्मसंबंधीं संस्कृत सारस्वत आहे तें सर्व भगवान् वेदव्यासामुळें आहे आणि ह्मणूनच व्यासोच्छिष्टं जगत्सर्वं असा सिद्धांत आहे. चारी वेदांचे प्रवर्तक जे वेदव्यास त्यांनींच महाभारत हा ग्रंथ वेदाधिकार नसलेल्या लोकांना सर्व वेदांतील रहस्य समजण्याकरितां व त्यांच्या अभ्युदयाकरितां केलेला असल्यामुळें महाभारताला पांचवा वेद अशी संज्ञा आहे.

धर्मे चार्थे च कामे च मोक्षे च भरतर्षभ ।
यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित् ॥

असें आदिपर्वाच्या बासष्ठाव्या अध्यायाचे शेवटीं वैशंपायनमहर्षीनीं जनमेजयाला सांगितलें आहे. "धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्या चतुर्विध पुरुषार्थासंबंधानें जे ह्या ग्रंथांत आहे तेंच इतर सर्व ग्रंथांत आहे व जें ह्यांत नाहीं तें दुसऱ्या कोणत्याही ग्रंथांत नाहीं" असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. हा महाभारत ग्रंथ द्विजेतरांकरितां व स्त्रियांकरितांच वेदव्यासांनीं केलेला आहे असें नसून द्विजांनाही तो अवश्य आहे. कारण, इतिहासपुराणांशिवाय वेदाचा खरा अर्थ कळणें शक्य नाहीं व केवल वेदाध्ययन केलेल्या द्विजाची गणना मनुस्मृतीवरून शिष्टांत होणें शक्य नाहीं. कारण,

धर्मेणाधिगतो यैस्तु वेदः सपरिबृंहणः ।
ते शिष्टा ब्राह्मणा ज्ञेयाः श्रुतिप्रत्यक्षहेतवः ॥

असें मनुवचन आहे. इतिहासपुराणांसह ज्यांनीं धर्मानें वेदाचें अध्ययन केलें असेल ते शिष्ट ब्राह्मण असें ह्या वचनांत सांगितलें

आहे. चारीवेद, अष्टादश पुराणें व महाभारत ह्यांचे आचार्य भगवान् व्यास असल्यामुळें त्यांच्यासारखा ह्या वैदिकधर्मी राष्ट्रावर उपकार करणारा महात्मा सृष्टीच्या आरंभापासून आजपर्यंत जगतांत दुसरा कोणी झाला नाहीं व पुढेही जगताच्या अंतापर्यंत दुसरा कोणी होण्याचा संभव नाहीं. ह्यास्तव, जन्मदात्या मातापितरांपेक्षां जो आपणांला अत्यंत पूज्य व ज्याचें तर्पण आपले वाडवडील शेकडो पिढ्या करीत आले असून आपण प्रत्यहीं करीत आहों त्यानें आपणांकरितां करून ठेविलेली महाभारतरूप ग्रंथसंपत्ति संग्रहीं ठेवणें व त्या संपत्तीचा देशामध्यें फैलाव करणें हें भरतवर्षांत जन्मास आलेल्या प्रत्येकाचें कर्तव्य ठरत आहे आणि ह्मणूनच बापाची कृति संभाळण्याकरितां किंवा त्याच्या कृतीचा जीर्णोद्धार करण्याकरितां पुत्र ज्याप्रमाणें इतर गोष्टींकडे दुर्लक्ष्य करून द्रव्याचा विनियोग यथाशक्ति पित्याच्या कृतीकरितां आनंदानें करीत असतो त्याचप्रमाणें श्रीवेदव्यासांच्या महाभारतादि ग्रंथांच्या प्रसाराकरितां यथाशक्ति द्रव्याचा विनियोग करणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

य इदं भारतं राजन्वाचकाय प्रयच्छति ।
तेन सर्वा मही दत्ता भवेत्सागरमेखला ॥

असें वचन महाभारतांत आहे. हें वैशंपायन महर्षींचें जनमेजय राजाला सांगणें आहे. "हे राजा, हें भारत जो वाचकाला अर्पण करितो त्यानें समुद्रवलयांकित सर्व पृथ्वीचें दान दिल्यासारखें होतें" असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. ह्या वचनांतील वाचकाय महत्वाचें आहे. ह्मणजे केवल स्नानसंध्या करीत राहून पुस्तकें गुंडाळून ठेवणाऱ्याला भारत दिल्यानें पृथ्वीदानाचें फल येणार नाहीं असें ह्या वचनावरून उघड होत आहे. महाभारतांत महर्षि वेदव्यासांनीं लोकांच्या उद्धाराकरितां जो उपदेश केला आहे त्याचा फैलाव होणें ही गोष्ट अवश्य आहे. प्राचीनकालीं जेव्हां संस्कृत भाषा लोकांच्या

व्यवहारांतली होती तेव्हां केवळ महाभारताचें संस्कृत पुस्तक वाचकाला देण्यानें दानाचा उद्देश सिद्धीस जात असे. परंतु, संस्कृत भाषेचा प्रचार, जैन व बौद्ध ह्यां(ची सत्ता जेव्हां सुमारें अडीच हजार वर्षांपूर्वी देशामध्यें झाली तेव्हां त्या सत्ताधीशां)नीं नाहींसा केला व पाली वगैरेसारख्या अपभ्रष्ट भाषा विशेष प्रचारांत आणिल्या. ह्या ठिकाणीं प्रसंगोपात्त जैन व बौद्ध लोकांचा उद्देश स्पष्ट करून सांगणें अवश्य आहे.

वैदिक धर्म हें ह्या राष्ट्राच्याच नव्हे परंतु, संपूर्ण भूतलावरील राष्ट्रांच्या अभ्युदयाचें मुख्य साधन पूर्वी होतें व सर्व पृथ्वीभर पूर्वी वैदिक धर्मच होता. पुढें लोकांचें दुर्लक्ष्य ह्या धर्माकडे झाल्यामुळें कालगतीनें हिंदुस्थानाशिवाय इतरत्र वैदिक धर्म राहिला नाहीं. हिंदुस्थानांतीलच रहिवाशी लोकांनीं त्याचें संरक्षण केलें. हा प्रकार जैन व बौद्ध ह्यांची सत्ता स्थापन होऊन त्यांच्या मताचा प्रसार होईपर्यंत कायम होता व ह्या भारत राष्ट्राचा उत्कर्ष तोंपर्यंत कायम होता. वैदिक धर्मविरोधी जैनांची व बौद्धांची सत्ता ह्या देशांत होई तोंपर्यंत ह्या देशावर इतर देशांतील लोकांची स्वारी झाल्याचें उदाहरण जगतांतील कोणत्याही देशाच्या इतिहासांत सांपडणें शक्य नाहीं. जैन व बौद्ध ह्यांची सत्ता देशांत सुरू झाल्यानंतरच परक्यांच्या स्वाऱ्या ह्या देशावर होण्यास आरंभ झालेला आहे. देशाच्या अवनतीचें कारणही जैन व बौद्ध ह्यांची प्राचीन काळीं झालेली सत्ता हेंच होय. ब्राम्हणांचें वर्चस्व क्षत्रियांना सहन न होणें हें जैन व बौद्ध मतें निघण्याचें मूळ कारण होय.

## वर्णाश्रमव्यवस्था.

ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ह्यांची उत्पत्ति अनुक्रमें परमेश्वराचें मुख, बाहु, मांड्या व पाय ह्यांपासून झाली. हेच चार वर्ण होत. ह्याशिवाय इतर संकर जाति होत. अध्ययन, यजन, दान, अध्यापन,

याजन व प्रतिग्रह हीं षट्कर्में होत आणि चार वर्णांपैकीं पहिले तीन हे द्विज असून चवथा शूद्र हा एकजाति होय. द्विज म्हणजे दोनदां उत्पन्न होणारे आणि एकजाति म्हणजे केवळ जनक-जननींच्या पासूनच एकदां उत्पन्न होणार. परमेश्वराच्या मुखादि अवयवांपासून केवळ ब्रम्हणादिकच उत्पन्न झाले असें नाहीं. अग्नि, गायत्री छंद, रथंतर साम व ब्राम्हण ह्यांची उत्पत्ति परमेश्वरानें आपल्या मुखापासून केली; इंद्र देवता, त्रिष्टुप् छंद, बृहत्साम व क्षत्रिय ह्यांची उत्पत्ति परमेश्वरानें आपल्या बाहूंपासून केली; विश्वे देव, जगती छंद, वैरूप साम व वैश्य ह्यांची उत्पत्ति परमे-श्वरानें आपल्या मध्यभागापासून म्हणजे मांड्यांपासून केली आणि अनुष्टुप् छंद, वैराज साम व शूद्र ह्यांची उत्पत्ति परमेश्वरानें पायांपासून केली. वर्णांपैकीं ब्राम्हणाची उत्पत्ति अग्निदेवतापूर्वक, क्षत्रियाची उत्पत्ति इंद्रदेवतापूर्वक वैश्यांची उत्पत्ति विश्वेदेवांच्या उत्पत्तीचे बरोबर झालेली आहे. परंतु, शूद्रांच्या उत्पत्तीचे पूर्वीं कोणत्याही देवतेची उत्पत्ति पायांपासून झालेली नाहीं. वेद हे यज्ञाकरितांच प्रवृत्त झालेले असल्यामुळें यज्ञाधिकार नसल्यामुळे शूद्रांना वेदाधिकार नाहीं आणि म्हणून द्विजत्वसिद्धिपूर्वक वेदाधिकार प्राप्त होण्याकरितां अवश्य असलेला उपनयन संस्कारही शूद्रांना नाहीं. उपनयन-संस्कारामुळें ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य ह्यांना दुसरा जन्म प्राप्त होत असतो म्हणून तो द्विज आणि शूद्रांचा उपनयन संस्कारच होत नसल्यामुळें तो एकजाति. आचार्य हा दुसरा जन्म देणारा पिता होय आणि गायत्री ( मंत्रदेवता ) ही माता होय. दोन जन्मांपैकीं मातापितरांपासून प्राप्त होणारा प्रथम जन्म असत्य, जराग्रस्त व विनाशी असून दुसरा जन्म सत्य, अजर व अमर होय. शूद्रांची उत्पत्ति देवतेबरोबर झालेली नाहीं व देवता संतुष्ट झाल्याशिवाय मर्त्यांचें कल्याण होणें शक्य नाहीं. वैदिक धर्मामध्यें देवताप्रसाद प्राप्त

होण्याकरितां यज्ञाची म्हणजे समंत्रक संस्कारांची अवश्यकता सांगितलेली आहे. तेव्हां यज्ञाधिकार व वेदाधिकार नसलेल्या शूद्रांनीं कल्याणाकरितां वेदयज्ञाधिकारी द्विजांची शुश्रूषा करणें अवश्य आहे कारण, राजा संतुष्ट होण्याकरितां ज्याप्रमाणें राजांचे संनिध असलेल्या राजसेवकांचा संतोष अवश्य संपादावा लागतो त्याचप्रमाणें यज्ञामध्यें देवांना हविर्भाग अर्पण करणाऱ्या अथवा करविणाऱ्या द्विजांना (देवांची कृपा होण्याकरितां) शूद्रांनीं संतुष्ट राखणें अवश्य आहे. कोणत्याही देशांतील कोणत्याही धर्माच्या लोकांचा समाज पहा; जगताचा चालक परमेश्वर असें जिकडे तिकडे मान्य झालेलें आहे व त्या त्या धर्मांतील लोक आपआपल्या मतांप्रमाणें कल्याणाकरितां देवाचीच उपासना करीत असल्याचें दृष्टीं पडत आहे. सार्वभौमसत्ता पृथ्वीवर आज जरी ख्रिस्ती लोकांची गाजत आहे तरी ते लोक आपआपल्या देवालयांतून व घरीं प्रायश्चित्तादिकांच्या द्वारानें ईश्वरकृपा संपादन करण्याचा यत्न करीत असतातच. सारांश, सर्व जगत् देवांच्या अधीन आहे.

## दैवाधीनं जगत्सर्वं

हा सिद्धांत सर्वत्र मान्य आहे व तोच भगवद्गीतादि ग्रंथांमध्यें प्रतिपादिलेला आहे. तेव्हां जगतांत असणाऱ्या लोकांनीं कल्याणाकरितां देवताकृपा संपादन करणें अवश्य आहे. परंतु, वैदिकधर्माच्या

## मन्त्राधीनं तु दैवतम् ।

ह्या सिद्धांताप्रमाणें मंत्राच्या अधीन देवता असल्यानें त्या मंत्रांचा संबंध ज्यांच्याशीं आहे त्यांना म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्यांना संतुष्ट राखण्यांतच शूद्रांचें कल्याण होणारें असल्यामुळें द्विजांची शुश्रूषा हाच शूद्रांचा मुख्य धर्म असें श्रुतिस्मृतिपुराणग्रंथांत सांगितलेलें आहे. महायज्ञ व यज्ञ हे सर्व शरीरशुद्ध्यर्थ संस्कारच आहेत.

ह्यांनाच कर्म अशीही संज्ञा आहे. शरीरशुद्धि होणें व ती कायम राहणें ह्या गोष्टी शूद्रांनाही अवश्य आहेतच. परंतु, शूद्रांची शरीरशुद्धि अथवा शरीरसंस्कृति पुराणोक्त कर्मांवर अवलंबून असते व द्विजांची शरीरशुद्धि अथवा शरीरसंस्कृति वैदिक कर्मांनीं होत असते. वेद हे ईश्वराचे निःश्वास आहेत. अर्थात, वेदप्रणेता प्रत्यक्ष ईश्वरच आहे. वेदांचा संबंध द्विजांशीं असतो. म्हणून द्विज हे ईश्वराचे प्रतिनिधि मानिले जातात. आपणांला जर सार्वभौम राजाला अर्ज करावयाचा असला तर तो प्रत्यक्ष करितां येत नाहीं. तो अर्ज त्याच्या प्रतिनिधीच्यांच द्वारानें आपणांला पाठवावा लागतो. प्रतिनिधीला संतुष्ट राखून त्याचे हातीं अर्ज देणें एवढेंच आपलें कर्तव्य असतें. त्याचप्रमाणें सार्वभौम राजाला जर कांहीं आपल्या प्रजेला कळवावयाचें असलें तर तो आपल्या प्रतिनिधीला तें प्रथम कळवितो व त्या प्रतिनिधींच्या शब्दांनीं ती सार्वभौम राजाची आज्ञा लोकांना कळत असते. ह्मणजे राजप्रतिनिधिच लोकांना राजाच्या ठिकाणीं असतो. कारण, राजाची आज्ञा त्याच्या हातीं येतें व राजाकडे जाणारे अर्जही त्याच्या द्वारानेंच जावयाचे असतात. तेव्हां ज्याप्रमाणें राजप्रतिनिधिच लोकांना राजाप्रमाणें पूज्य असतो त्याचप्रमाणें शूद्रांना देवप्रतिनिधि द्विजच पूज्य असतात. शूद्रांनीं द्विजांची शुश्रूषा न करणें किंवा त्यांचें न ऐकणें ह्मणजे राजप्रतिनिधींचा हुकूम खालील प्रजेनें अमान्य करण्यासारखेंच होय. प्रतिनिधिद्वारा होणारा हुकूम प्रजा मानीनाशी झाल्यास ज्याप्रमाणें राष्ट्रामध्यें अनर्थ होत असतात त्याचप्रमाणें द्विजांचें शूद्र ऐकेनासे झाल्यास समाजामध्यें अनर्थ होत असतात. हेच अनर्थ आज हिंदुस्थानचे लोक भोगीत आहेत. द्विजांनीं आपलें वर्तन आपल्या अधिकाराला साजेलसें न ठेवणें हेंही शूद्रांमध्यें द्विजांना मान न मिळण्याचें एक मुख्य कारण आहे.

**यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धनः ।**

तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसंगः समाचर ॥

असें वचन गीतेमध्यें आहे. यज्ञार्थ कर्माशिवाय इतर कर्म ह्या लोकांच्या बंधाला कारण होत असते असें पूर्वार्धाचें तात्पर्य आहे. ह्या वचनांतील यज्ञार्थात् हें पद भगवान् श्रीकृष्णांनीं जें योजिलें आहे तें फार महत्त्वाचें आहे. शूद्रवर्गालाही बंधविमोचक कर्म कोणतें तें ह्या पदानें दर्शविलें आहे. भगवान् श्रीशंकराचार्यांनीं यज्ञार्थात् ह्यांतील यज्ञशब्दाचा अर्थ यज्ञो वै विष्णुः ह्या श्रुतीच्या आधारानें ईश्वर असा केला आहे. तो त्रैवर्णिकांना अनुलक्षून केलेला आहे. यज्ञाख्यात्कर्मणोऽन्यत्र असें ह्मटलें असतें तर शूद्रांना यज्ञाधिकार नसल्यामुळें शूद्राचें जें कर्म तें बंधकच ठरण्याचा प्रसंग आला असता. ह्मणून भगवान् श्रीकृष्णांनीं यज्ञार्थात् असें ह्मटलें आहे. गीतेमध्यें जे अनेक प्रकारचे यज्ञ सांगितले आहेत ते बहुतेक द्विजांनांच अनुलक्षून सांगितलेले आहेत.

ह्या अनेक प्रकारच्या यज्ञांपैकीं अधिकारानुरूप कोणत्याही एक अथवा अनेक यज्ञांशीं ज्यांचा संबंध असतो त्यांचीच धर्मनिष्ठ द्विजांमध्यें गणना होत असते. शूद्रांना यज्ञाचा अधिकार नाहीं आणि यज्ञाशीं संबंध असल्याशिवाय द्विजांचे ठिकाणीं खरेखर द्विजत्व रहाण्याचा संभव नसतो. तेव्हां द्विज ह्मणजे यज्ञकर्मनिष्ठ हें ठरलेलेंच आहे आणि ह्मणून यज्ञकर्मनिष्ठ द्विजांची शुश्रूषा हें जें शूद्रकर्म तें यज्ञार्थच कर्म होत असल्याचें ठरत आहे.

पूर्वीं जीं षट्कर्में सांगितलीं त्या सर्वांचा अधिकार द्विजांपैकीं फक्त ब्राह्मणांनाच आहे. क्षत्रिय व वैश्य ह्यांना यजन, अध्ययन व दान ह्या तीनच कर्मांचा अधिकार आहे. याजन, अध्यापन व प्रतिग्रह ह्या तीन कर्मांचा अधिकार क्षत्रिय व वैश्य ह्यांना नाहीं. ब्राह्मणांचें वर्चस्व जें जैनमतप्रवर्तक महावीर व बौद्धमतप्रवर्तक गौतम बुद्ध ह्यांना असह्य झालें तें ह्या कर्मासंबंधाचें. वर्णानां ब्राह्मणो गुरुः

हें महावीरादि जैनांना व गौतमादि बौद्धांना सहन होईना.

वास्तविक विचार केला असतां ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या तिन्ही द्विजांपैकीं प्रत्येकाला कांहीं गोष्टींमध्यें असामान्य वर्चस्व आहेच. वैश्यवर्णाचा धर्म कृषि, गौरक्ष्य व वाणिज्य हा ठरलेला आहे. शेतकी, व्यापार व पशुपालन ह्या गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. व्यापार व शेतकी ही कोणत्याही देशाच्या अभ्युदयाचीं मुख्य साधनें आहेत. व्यापाराच्या वर्चस्वाची योग्यता सांप्रत जवळ जवळ राजसत्तेप्रमाणेंच मानिली जात आहे. तेव्हां व्यापारसंबंधीं, शेतकीसंबंधीं व सावकारी, पशुपालन वगैरेसंबंधानें सामान्य वर्चस्व वैश्य वर्गाकडे होतें. हें वर्चस्व ब्राह्मणांना कधींही असह्य झालें नाहीं व कधींही ब्राह्मणांनीं वैश्यांच्या ह्या वर्चस्वाचा अभिलाष धरिला नाहीं. लोकांवर सत्ता चालविण्याचा, दंड करण्याचा व ऐश्वर्याचा उपभोग घेण्याचा असामान्य अधिकार क्षत्रियांकडे होता. त्यबद्दल ब्राह्मणांनीं कधींही क्षत्रियांचा मत्सर केलेला नाहीं व कधींही सत्तादिकांचा अभिलाष धरिलेला नाहीं. वेनासारख्या प्रजापीडक क्षत्रियांचें पारिपत्य ज्या ब्राह्मणांनीं केलें त्यांनीं त्याच्याच देहापासून पुत्र उत्पन्न करून त्याला राज्याभिषेक केला व आपण तपोवनाचा मार्ग स्वीकारिला. राजांकडे कोणी महर्षि आले ह्मणजे राजे त्यांच्या सत्काराकरितां त्यांना राज्य अर्पण करीत असत; परंतु, जातेवेळीं तें राज्य ते महर्षि व्यवस्था पाहण्याकरितां उलट त्यांच्याच हवालीं करीत. कोणत्याही ऋषीनें सत्काराकरितां दिलेल्या राज्याचा अभिलाष धरिलेला नाहीं. स्वप्नामध्येंही दिलेलें राज्य प्रत्यक्ष घेऊन दक्षिणेची भरती होण्याकरितां अत्यंत असह्य व अनिर्वचनीय दुःख दानशूर सार्वभौम क्षत्रिय राजाला ब्राह्मणानें दिल्याचें एकच उदाहरण अत्यंत प्राचीन इतिहासांत आहे. परंतु, तो मूळचा ब्राह्मण नसून क्षत्रियच होता ही गोष्ट विसरतां कामा नये.

जन्मतः क्षत्रिय असलेली व्यक्ति जरी अनुपम तपश्चर्येमुळें ब्राह्मण झाली तरी तिच्या ठिकाणीं किति क्रूरता कायम रहात असते व त्यामुळें लोकांना कसें दुःख भोगावें लागतें हें विश्वामित्र महर्षींच्या उदाहरणावरून कोणाच्याही लक्ष्यांत येण्यासारखें आहे. मूळचा ब्राह्मण प्रत्यक्ष जाग्रदवस्थेंत उदकपूर्वक अर्पण केलेलेंही राज्य परत देत असे; मग स्वप्नांत दिलेलें घेण्याचा अभिलाष खऱ्या ब्राह्मणाला कोठून उत्पन्न होणार? कारण, सत्ताधीशत्व, दंडधारित्व इत्यादि असामान्य अधिकार केवळ क्षत्रियांचे आहेत. फार कशाला? श्रीछत्रपति शिवाजी महाराजांनीं एका ब्राह्मणाला संपूर्ण राज्याची भिक्षा लेखी घातली असतांनाही व तो ब्राह्मण महावीरबौद्धादिकांच्या कारकीर्दीचे मानेनें अगदीं अर्वाचीन असूनही त्यानें तें ब्राह्मणाचें राज्य ह्मणून रक्षण करण्याकरितां देणाऱ्याच्याच हवालीं केलें व स्वतः झोळीच पत्करिली. तेव्हां वास्तविक विचार केला असतां वेद पढविणें, यज्ञामध्यें आर्त्विज्य करणें व प्रतिग्रह घेणें ह्यांविषयीं हा असामान्य अधिकार जो ब्राह्मणांचा आहे तो क्षत्रियांना असह्य होण्याचें कारण नव्हतें. ब्राह्मणांनीं क्षत्रियांच्या अधिकाराचा अभिलाष केला नत्यामुळें ब्राह्मणांचें गुरुत्व ह्मणजे मानपात्रता क्षत्रियांना असह्य झालीं हें बरें झालें नाहीं. परंतु, यौवन, धनसंपत्ति, प्रभुत्व व अविवेक ह्या गोष्टींपैकीं कोणतीही एक गोष्ट अनर्थाला कारण होत असते. जैनबौद्धमतोत्पत्तिकालीन क्षत्रिय सत्ताधीशांचे ठिकाणीं हीं चारी कारणें एकवटलीं असल्यामुळें ब्राह्मणांचे मानधनरूप वर्चस्व क्षत्रियांनीं झुगारून दिलें व ही गोष्ट ह्या राष्ट्राच्या ऱ्हासाला कारण झाली. रत्नजडित सिंहासनावर आरूढ होऊन कोट्यवधि लोकांवर सत्ता गाजविणाऱ्या रणवीरधीर क्षत्रियांना, (लज्जा राखण्याकरितां धड लंगोटी ही जवळ नसलेल्या, हजामत

वाढलेल्या व मान न वांकवितां ताठ चालणाऱ्या ब्राह्मणांपुढें डोकें लववितें व त्याचा पथ्यकारक परंतु, कधीं कधीं भर दरबारांत होत असल्यामुळें अप्रिय वाटणारा उपदेश ऐकून घेणें ह्या गोष्टी आपली योग्यता कमी करणाऱ्या आहेत असें वाटूं लागलें आणि ह्मणून त्यांनीं ब्राह्मणांचें गुरुत्व नष्ट करण्याचा विडा उचलिला. सत्ता, ऐश्वर्य, व्यापार, शेतकी वगैरेंचा मुख्य संबंध ब्राह्मणांशीं नसल्यामुळें उत्पन्न वगैरे जप्त करण्याच्या धमकीनें ब्राह्मणांना पादाक्रांत करण्याची युक्ति शक्यच नव्हती. कारण, जें जप्त करितां येईल असें दृश्य व जड ऐश्वर्य ब्राह्मणांच्या पाशीं नव्हतेंच. तेव्हां ब्राह्मणांच्या गुरुत्वाचें मूळ वेदप्रामाण्यावर अवलंबून असल्यामुळें वेदच अप्रमाण ठरविण्याची शक्कल त्यांनीं काढिली. राज्यव्यवस्थेकरितां व लोकव्यवहार सुरळीत चालण्याकरितां ब्राह्मणविरोधी सत्ताधीशांना वेदांतील तत्वें हवींच होतीं. परंतु, तीं वेदांतील ह्मणून घेणें त्यांना इष्ट नव्हतें. कारण हीं, तत्वें वेदांतील ह्मणून मान्य केल्यास वेदप्रामाण्य डोक्यावर बसणार आणि वेदप्रामाण्य डोक्यावर बसलें ह्मणजे ब्राह्मणांचें वर्चस्व आलेंच. कारण, वेदांत जिकडे तिकडे यज्ञ आणि ते तर ब्राह्मणांशिवाय होणें शक्य नाहीं. ह्याकरितां, ब्राह्मणविरोधी जैन व बौद्ध सत्ताधीशांनीं व्यवहार चालण्याकरितां अपभ्रष्ट भाषेंत दुसरे ग्रंथ रचिले. ज्यांनीं पाली भाषेंत ग्रंथ रचना केली त्यांना त्यावेळीं प्रचारांत असलेली संस्कृत भाषा उत्तम येत होती. परंतु, संस्कृत भाषेंत ग्रंथरचना केल्यास राज्यसत्ता, व्यापार, सावकारी, शेतकी इत्यादिकांपासून अलग राहणारे व अध्ययनाध्यापनांतच काळ घालविणारे ब्राह्मणच केव्हांही विद्या पढविण्यास रिकामे सांपडणारे असल्यामुळें पुढें मागें आपले अनुयायी आपलेच ग्रंथ समजून घेण्याकरितां वैदिकधर्मी ब्राह्मणांकडे जातील व पुनरपि लोकांवर ब्राह्मणांचें वर्चस्व होऊन आपण केलेला खटाटोप व्यर्थ होईल. ह्या

करितां, ब्राह्मण ज्या भाषेला म्लेच्छ भाषा म्हणतील व जिचा तिरस्कार करितील त्या भाषेंत रचना करणें बरें असें समजून जैनबौद्धांनीं आपले ग्रंथ अपभ्रष्ट भाषेंत लिहून ठेविले. जो दुसऱ्याकरितां खाडा तयार करितो तो स्वतः त्या खाड्यांत पडतो असा ईश्वरी नेमानेम असल्यामुळें गुरुत्वरूप ब्राह्मणांचें वर्चस्व नष्ट करणाऱ्या बौद्धांनीं द्विजत्वरूप स्वतःचें वर्चस्व तर प्रथमच नष्ट केलें आणि संन्यासादिकांचा अधिकार मनुष्यमात्राला आहे असें त्यांना कबूल करावें लागलें. वर्णाश्रमव्यवस्था कायम ठेवून ब्राह्मणांचें वर्चस्व नष्ट करितां येणें मुळींच शक्य नसल्यामुळें वर्णभेद व जातिभेद त्यांना सत्तेच्या जोरावरच नष्ट करणें भाग पडलें. त्यामुळें वर्णांमध्यें परस्पर संकर होऊं लागले; आनुवंशिक संस्कार नष्ट झाल्यामुळें सर्व कला व सर्व विद्या ऱ्हास पावल्या; शौर्य नष्ट होऊं लागलें; व्यापारांतील रहस्य कळेनासें झालें आणि अशा रीतीनें सर्व प्रकारें राष्ट्राच्या अनर्थाचें मूळ दृढ होऊन ह्या देशावर परकी लोकांची सत्ता चालू होण्याचा मार्ग खुला झाला. बौद्ध व जैन ह्यांच्या सत्तेला आरंभ झाल्यापासून कुमारिल भट्ट व शंकराचार्य ह्यांची कारकीर्द सुरू होईपर्यंत हजार वर्षांपेक्षां ज्यास्त काळ लोटल्यामुळें वैदिक धर्माची फारच दैना झाली. ‘ अहिंसा परमो धर्मः ’ असें ह्या जैनांचें व बौद्धांचें मुख्य तत्त्व असल्याचा बोभाटा आहे. हातामध्यें कुंचा घेऊन संचार करणारे व आठघडी वस्त्रांतून पाणी गाळून घेणारे हे लोक हिंसेपासून पूर्ण अलिप्त असले पाहिजेत अशी भलतीच समजूत एखाद्याची होण्याचा संभव आहे. परंतु, ह्या लोकांची सत्ता देशांत असतांना ह्यांचा जुलूम असह्य झाल्यामुळें हजारों द्विजांना चितारोहण करून स्वतःला जाळून घेण्याचा प्रसंग आलेला आहे. हें तत्त्व प्रतिपादन करणारा शुद्धोदनाचा पुत्र स्वतः गौतमबुद्ध डुकराचें मांस—पराकाष्ठेचें अजीर्ण होईपर्यंत सेवन केल्यामुळें—मेल्याचें इतिहासांत नमूद आहे.

बौद्धांना स्वतः मांस भक्षण हवेंच होतें. परंतु, ब्राह्मणांचे यज्ञ बंद करण्याकरितां त्यांनीं अहिंसेचें अव्यवहार्य ढोंग स्वीकारिलें होतें. कुंचा हालवितांना हजारों कीटक मरतात व पाणी गाळतांना शेकडों प्राणी मुकतात ही गोष्ट ह्यांच्या गांवींही नसतें. ह्या सत्ताधीशांनीं युद्धामध्यें हजारों लाखों लोकांचे खून केले आहेत. धान्याची मिसळ करून विकणें, व्यापारांत शक्य तितकी लबाडी करणें, पैशाची अफरातफर करणें इत्यादि गोष्टी ह्यांच्या मतानें हिंसेंत येत नाहींत. मांस खाणारा, विकणारा, अनुमोदन देणारा, पशु फाडणारा व पशु मारणारा हे सर्व घातकच असें स्मृतिग्रंथांत सांगितलें असल्यामुळें व मांसावर ताव झोडण्याची सवलत राहून अहिंसेचा डिंडिम ह्यांना वाजविणें अवश्य असल्यामुळें स्मृति ग्रंथही ह्यांनीं अप्रमाण मानिले. वर्णाश्रमधर्मप्रतिपादन स्मृतिग्रंथांत आहे हें-ते ग्रंथ ह्यांच्या मतानें-अप्रमाण ठरण्याचें मुख्य कारण होय. अस्तु. ह्या अहिंसाधारी क्षत्रियकुलोत्पन्न बौद्ध सत्ताधीशांच्या कारकीर्दींत क्षत्रिय व वैश्य हे दोन वर्ण जवळ जवळ नष्ट झाले. वेदांचा नायनाट करणें हें तर ह्यांचें मुख्य व्रत. "लुच्चा ब्राह्मणांनीं लोकांना फसविण्याकरितां वेद रचिले. "यज्ञांत मारिलेल्या पशूला जर स्वर्ग मिळतो तर हे ब्राह्मण आपल्या बापाचाच वध यज्ञांत कां करीत नाहींत? श्राद्ध करून ब्राह्मणांना भोजन घातलें असतां जर परलोकीं असलेले पितर तृप्त होतात तर कोणी प्रवासाला निघाला असतां त्यानें बरोबर शिधासामग्री घेणें व्यर्थ होय. कारण, त्यानें आपल्या घरीं ब्राह्मणांना भोजन घालण्याची व्यवस्था करून जावें म्हणजे त्याला मार्गामध्यें तें भोजन पोंचेल." असल्या प्रकारचीं व्याख्यानें सत्तेच्या जोरावर बौद्धांनीं सुरू केलीं व लोकांना वैदिक धर्मापासून परावृत्त केलें. दरिद्री ब्राह्मणांपुढें मात्र ह्यांचा कांहीं इलाज चालेना. वैश्य व शूद्र ह्यांना कांहीं ब्राह्मणांचें वर्चस्व असह्य झालें नव्हतें. कारण,

शूद्रांना सर्वच द्विजांची शुश्रूषा करावी लागत असल्यामुळें केवळ ब्राह्मणांचेंच श्रेष्ठत्व नाकबूल करावयाचें आणि क्षत्रियवैश्यांचें कबूल करावयाचें अशी त्यांची समजूत होणें शक्यच नव्हतें. वैश्य जरी शूद्रापेक्षां श्रेष्ठ होते तरी क्षत्रियापेक्षां त्यांची योग्यता धर्मदृष्ट्या कमीच होती. कारण, राजसूय, अश्वमेध इत्यादि यज्ञांचा अधिकार केवळ क्षत्रियांचाच असे; क्षत्रियाच्या कन्येशीं त्यांना विवाह करितां येत नसे आणि क्षत्रियाप्रमाणें वानप्रस्थाश्रमाचाही त्यांना अधिकार नसे. उत्कृष्ट रीतीनें स्वधर्माचरण करणाऱ्या राजाला राजर्षि ही पदवी प्राप्त होत असे; परंतु, वैश्याला ऋषि ही पदवी मिळत नसे आणि क्षत्रियापाशीं असलेली धनुर्विद्याही प्रायः वैश्यांपाशीं नसे. ह्या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या कारणांमुळें क्षत्रिय हे आपल्यापेक्षां श्रेष्ठ असें वैश्यांना मानणें भागच असे. तेव्हां क्षत्रियांचें वर्चस्व जर धार्मिक बाबींमध्यें वैश्यांना कबूल करणें भाग पडे तर केवळ ब्राह्मणांचेंच वर्चस्व त्यांना असह्य होण्याचें कारण नव्हतें. परंतु, क्षत्रियांना ब्राह्मणांपेक्षां इतर कोणी श्रेष्ठ नसल्यामुळें व दारिद्र्य पत्करिलेले ब्राह्मण लोककल्याणाकरितां क्षत्रियांची कधींच परवा बाळगीत नसल्यामुळें क्षत्रियांना ब्राह्मणांचें वर्चस्व सहन होईना. अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, चातुर्मास्यें इत्यादि यज्ञांत पशुवधाचा संबंध नसतो. परंतु, हे यज्ञ ब्राह्मणांशिवाय होत नाहींत. ह्मणून एकंदर यज्ञकर्मांवरच त्यांना गदा आणणें भाग पडलें. वेद, स्मृतिग्रंथ, भारतादि इतिहास ग्रंथ व पुराणें ह्यांचा नायनाट केल्यावांचून ब्राह्मणांचें वर्चस्व नष्ट होणें शक्य नाहीं अशी बौद्धांची समजूत असल्यामुळें वेदाध्ययन सांगणाऱ्या ब्राह्मणांचें अग्रहार ह्यांनीं जप्त केले; यज्ञकर्मं सक्तीनें बंद केलीं; संस्कार करण्याकरितां ब्राह्मणांना बोलावणाऱ्या लोकांची गणना राजद्रोही लोकांत होऊं लागली व वैदिकधर्मी ब्राह्मणांना मदत करणारा सत्ताधीशांना अप्रिय होऊं

लागला. मांडलिक राजाला व त्यांच्या पदरीं असलेल्या क्षत्रियांना मुख्य सत्ताधीशांच्या मताचें विरुद्ध वागल्यास राज्य जाण्याचें भय असल्यामुळें तेही निरुपायास्तव संस्कारभ्रष्ट व ह्मणून क्षत्रियत्वापासून भ्रष्ट झाले व वैश्यही आपल्या व्यापारावर, सावकारीवर व शेतकीवर गदा येईल ह्या भीतीनें स्वतःची इच्छा नसतांनाही ब्राह्मणांपासून अलग होऊन द्विजत्वापासून भ्रष्ट झाले. वैदिकधर्मी ब्राह्मणांचा उपहास वर निर्दिष्ट केलेल्या यज्ञादिविषयक विरुद्ध कोट्या करून कोणीही करूं लागला; ब्राह्मणांचा अपमान करणेंही गोष्ट इतरांना भूषणावह झाली व ब्राह्मणांच्या यज्ञादि कर्मांची थट्टा उडविणाऱ्यांची राजदरबारी बडेजाव होऊं लागली. अशी असह्य स्थिति प्राप्त झाल्यामुळें वैदिक धर्माच्या रक्षणाकरितां ब्राह्मणांनीं वैतागानें वनवास पत्करिला व अत्यंत कष्टानें आपल्या कांहीं धर्मग्रंथांचें रक्षण केलें.

ब्रह्म मात्र सर्वत्र सम आहे. जगत् हें सर्वत्र विषमच आहे व जगतांतील वैषम्य काढून टाकण्याचा यत्न करणें ह्मणजे जगताचें जगत्त्व नाहींसें करण्याचा अर्थात जगताचा संहार करण्याचा यत्न करणें होय. जगतांतील व्यवहार सुरळीत चालूं रहाण्यास अवश्य असलेलें जें वैषम्य तें ईश्वरप्रणीत जे तीन वेद त्यांच्या प्रामाण्यावरून स्वतःसिद्ध असल्याचें वैदिकधर्मी लोक समजतात. “ईश्वरानें आपल्या कर्मांप्रमाणें जी योनि व जी स्थिति आपणांला दिली आहे त्याच योनीमध्यें व स्थितीमध्यें ईश्वरानें घालून दिलेल्या नियमाप्रमाणें वागणें हें आपलें कर्तव्य आहे. तें आपण योग्य रीतीनें बजाविलें असतां आपला उत्कर्ष होणारच आहे ’ असें समजून पूर्वीचे वैदिकधर्मी लोक जात्यादि स्वाभाविक गोष्टींनीं हीन असलेल्यांचा तिरस्कार व उच्च असलेल्यांचा मत्सर करीत नसत आणि ह्यामुळें वैदिकधर्मी भारतवर्षीतील लोकांचा योगक्षेम जैनबौद्धांच्या सत्तेपर्यंत

उत्कृष्ट रीतीनें चालत असे. ह्या सत्ताधीशांना ब्राह्मणांचें वर्चस्व असह्य झालें व त्यांनीं केवळ ब्राह्मणवर्णाचा किंवा केवळ भारतवर्षाचाच नव्हे परंतु, सर्व जगताचा घात केला.

आज वैदिकधर्मी सारस्वतासंबंधानें चमत्कारिक प्रकार दृष्टीस पडतो. गृह्यसूत्रांतून तर्पणप्रकरणांत जीं आचार्यांचीं नांवें आलीं आहेत त्यांपैकीं पुष्कळांचे ग्रंथ आज मुळींच नाहींत. श्रुति, स्मृति व सूत्रें हेच ग्रंथ जर वैदिक धर्माचा पाया आहेत तर ह्या ग्रंथावरील टीका ग्रंथ, व्याख्या ग्रंथ किंवा भाष्यग्रंथ आणि श्रुतिस्मृतिप्रभृतींच्या आधारानें लिहिलेले हेमाद्रि, निर्णयसिंधु इत्यादिकांसारखे धर्मशास्त्रविषयक ग्रंथ नास्तिक सत्ताधीशांच्या पूर्व कालांतील मुळींच नाहींत. श्रुतिप्रभृति प्रमाणभूत ग्रंथावर भाष्यग्रंथ व वृत्तिग्रंथ नास्तिक सत्ताधीशांच्या पूर्वी मुळींच नव्हते असें ह्मणतांच येणार नाहीं. कारण, कौंडिण्यवृत्ति, ऋग्वेदभाष्य वगैरे ग्रंथांचा उल्लेख तर्पणांत आहे. तेव्हां मुख्यत: वर्णाश्रमधर्माचें प्रतिपादन ज्यांत आहे असे ग्रंथ नास्तिकांनीं नाहींसे केले किंवा नाहींसे होऊं दिले असें ह्मटल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. जेवढे ग्रंथ ब्राह्मणांनीं तोंडपाठ ठेविले होते तेवढेच नास्तिक सत्ताधीशांच्या कारकीर्दींत राहिले. त्या ग्रंथांवरील भाष्यादि ग्रंथ ब्राह्मणांना तोंडपाठ नसल्यामुळें नाहींसे झाले. नास्तिक सत्ताधीशांनीं हे ग्रंथ जाणूनबुजून नाहींसे केले असले पाहिजेत किंवा ते कीटकांच्या भक्ष्यस्थानीं पडूं दिले पाहिजेत दुसरें अनुमान नाहीं. सांप्रत ज्याप्रमाणें सरकारी अधिकाऱ्यांना अप्रिय होणारीं पुस्तकें हद्दींतून नाहींशीं करितां येतात त्याचप्रमाणें नास्तिक सत्ताधीशांचे कारकीर्दींत त्यांना अप्रिय झालेल्या ग्रंथांची वाट लागली. पाठ येणारे ग्रंथ नष्ट करणें शक्य नसल्यामुळें कांहीं वेदशाखा, कांहीं सूत्रें, कांहीं स्मृत्या, कांहीं पुराणें व रामायण, महाभारत वगैरे कांहीं इतिहास ग्रंथ राहिले. इतर ग्रंथ बौद्धांनीं व जैनांनीं नाहींसे केले.

ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, व अथर्ववेद ह्या चार वेदांच्या प्रत्येकीं जरी अनेक शाखा आहेत तरी एकेक मुख्य शाखा असते. सूत्रग्रंथांतून चारी वेदांच्या मुख्य शाखांचे आरंभ दिलेले आहेत. त्यांमध्यें 'शं नो देवीरभिष्टये' असा अर्थ वेदाच्या मुख्य शाखेचा आरंभ दिलेला आहे. परंतु, सांप्रत जी अथर्ववेदाची संहिता प्रसिद्ध झालेली आहे तिचा आरंभ 'ये त्रिषप्ताः परियन्ति असा आहे; 'शं नो देवी' असा नाहीं; अर्थात् अथर्ववेदाच्या मुख्य शाखेचा ह्या नास्तिकांनीं नायनाट केला. मुख्य अथर्ववेदी ब्राह्मणांचा उपयोग राजकारणामध्यें क्षत्रियांना विशेष होत असे. कारण, शान्तिक, पौष्टिक व बऱ्यावाईट काम्य कर्मांना उपयोगीं पडणारे मंत्र अथर्ववेदाच्या मुख्य शाखेमध्यें विशेष होते. ह्या शाखेचे ब्राह्मण मंत्रशाखी असल्यामुळें त्यांना क्षत्रियांकडून मोठेमोठे अग्रहार असत. ते कायम राहणें क्षत्रिय राजांच्या मर्जीवर असे. शिवाय जारणमारणादि प्रयोगांच्या अनुष्ठानामुळें ह्यांचा राजांशीं निकट संबंध असे. मोहन, वशीकरण वगैरे कांहीं गोष्टी ह्या अथर्ववेदी ब्राह्मणांच्याच द्वारानें बौद्धांमध्यें शिरल्या व त्या सिद्धि ह्या नांवानें प्रसिद्ध झाल्या. वर्णभ्रंशतेमुळें पुढें त्या सिद्धि नष्ट झाल्या व बौद्धांच्या अंमलाच्या शेवटीं शेवटीं तर त्या सिद्धींची थट्टाच झाली. सांप्रत अमेरिकेमध्यें वेदमंत्रांचीं भाषांतरें मूलमंत्रांइतकींच सामर्थ्यसंपन्न मानून तिकडील कांहीं लोक उक्त तंत्रांसह त्या भाषांतराचाच जप वगैरे करीत असतात. असाच प्रकार बाद्धांमध्यें व जैनांमध्यें प्राकृतभाषाप्राधान्यानें झाला व मूळ नष्ट होऊन गेलें. कथासरित्सागर, मालतीमाधव इत्यादि काव्यनाटकग्रंथ हे आमच्या ह्मणण्याला साक्ष देणारे आहेत. बौद्ध राजांचे कारकीर्दीत मुख्य अथर्ववेदी ब्राह्मण त्यांच्या निकट संबंधामुळें हळूंहळूं आपल्या यजमानाच्या मताचेच बनले आणि ब्राह्मण्याला मुकले; ह्मणून अथर्ववेदाची मुख्य शाखा लुप्त झाली. "ये त्रिषप्ताः परियन्ति"

येथून सुरू होणारी एक अवांतर शाखामात्र ह्या तडाक्यांतून वांचली असें दिसतें. तथापि, शंकराचार्यांच्या कारकीर्दीचे वेळींही ह्या अथर्ववेदशाखेचें संपूर्ण अध्ययन करणारे ब्राह्मण विरळाच दिसतात. ह्या अथर्ववेदावर भाष्यादि ग्रंथ अतिशय होते. परंतु, त्या सर्वांचा प्रायः लोपच झालेला आहे. शंकराचार्यांच्या पूर्वींचें कोणत्याही वेदावरील भाष्य सांपडत नाहीं ह्याचें कारण, वेदविरोधी बौद्धादिकांची सत्ता हेंच होय. सुश्रुत, चरक, नाट्यशास्त्र वगैरे ग्रंथ बौद्धांच्या कारकीर्दींतून वांचले ह्याचें कारण, त्यांतील प्रतिपाद्य विषयांचा संबंध धर्माशीं नव्हता हें होय. तर्पणांतील आचार्यांची संख्या लक्ष्यांत घेतली असतां बौद्धांच्या कारकीर्दीनंतर जें वैदिक सारस्वत उरलें तें बौद्धपूर्व वैदिक सारस्वताच्या पासंगालाही पुरणार नाहीं इतकेंच उरलें आहे. ह्यावरून 'अहिंसा परमो धर्मः' हें भ्रामक तत्त्व उराशीं बाळगणाऱ्या ह्या नास्तिकांनीं किती भयंकर हिंसा केलेली आहे व एकंदर जगताचा किती घात केलेला आहे हें वाचकांच्या सहज लक्ष्यांत येईल. श्रीमच्छंकराचार्यांनीं वर्णाश्रमधर्माची स्थापना करून जर तर्पणाचा प्रचार पुढें कायम राखिला नसता तर आज आहे हेंही सारस्वत कायम राहिलें नसतें. पूर्वजांचें वैभव, विद्वत्ता, उद्योगतत्परता इत्यादि गोष्टी डोळ्यांपुढें असल्या ह्मणजे वंशज तसेच निपजून समाजाचा उत्कर्ष होत राहतो. ह्यास्तव, आपला उत्कर्ष कायम राखण्याकरितां तर्पण, आंतील नांवांमध्यें केवढा मोठा अर्थ भरलेला आहे इकडे लक्ष्य देऊन, द्विजमात्रानें प्रत्यहीं करणें अवश्य आहे.

## ब्रह्मचारिधर्म.

ब्रह्म म्हणजे वेद. वेदाध्ययनाकरितां अवश्य जें आचरण त्याला ब्रह्मचर्य असें म्हणतात. ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ व संन्यास

हे चार आश्रम आहेत. त्यांपैकीं ब्रम्हचर्याश्रम हा मुख्यतः विद्या-संपादनार्थच आहे आणि अध्ययनाला अडथळा येऊं नये किंवा अध्ययन निष्फल होऊं नये एतदर्थ ब्रह्मचर्याश्रमाला अनुलक्षून कांहीं विधिनिषेधही सांगितलेले आहेत. ह्या विधिनिषेधांचें परिपालन न केल्यास आश्रमापासून ब्रम्हचारी भ्रष्ट होतो. ह्यास्तव, ब्रम्हचाऱ्याचे धर्म काय आहेत हें समजणें अवश्य आहे.

प्रतिगृह्येप्सितं दण्डमुपस्थाय च भास्करम्।
प्रदक्षिणं परीत्याग्निं चरेद्भैक्षं यथाविधि ॥ ४८ ॥ अ०२

असें मनुवचन आहे. उपनयनसमयीं आपल्या वर्णाला अनुसरून जो प्रशस्त दंड आपण स्वीकारिला असेल तो घेऊन सूर्योपस्थान ब्रह्मचाऱ्यानें करावें आणि अग्नीला प्रदक्षिणा करून यथाविधि भैक्ष-याचना करावी. असें ह्या मनुवचनाचें तात्पर्य आहे. ‘भिक्षाणां समूहो भैक्षं अशी भैक्षशब्दाची व्युत्पत्ति आहे. अशी व्युत्पत्ति असल्यामुळें एकाच घरामध्यें उदरपोषणापुरती भिक्षा ब्रह्मचाऱ्याला मिळणें इष्ट दिसत नाहीं. शिवाय,

भैक्षेण वर्तयेन्नित्यं नैकान्नादी भवेद्व्रती ।
भैक्षेण व्रतिनो वृत्तिरुपवासस्समा स्मृता ॥ १८८॥अ०२

असें मनुवचन पुढें आहे. ह्या वचनामध्यें ब्रम्हचाऱ्यानें एकाचें अन्न खाऊं नयें असें स्पष्ट सांगितलें आहे. ह्यावरून कांहीं कांहीं विद्यार्थी अन्नाची भिक्षा न मागतां आज ह्याच्या घरीं तर उद्यां त्याच्या घरीं अशा रीतीनें वार लावून जेवीत असल्याचें जें दृष्टीं पडतें तें विद्यार्थी व त्यांना वार देणारे गृहस्थाश्रमी ह्या उभयतां-नाही युक्त नाहीं. कारण, सर्वांच्या घरीं भोजनकाल एक ठरलेलाच असतो असें नाहीं. नैमित्तिक कर्मामुळें अथवा इतर कांहीं व्याव-हारिक निमित्तामुळें भोजनकाल अनेक वेळां टळतो; म्हणजे एकाच्या घरचा सुद्धां भोजनकाल सर्वदा एकच कायम राहण्याचा संभ

नसतो. अनेकांच्या घरचा भोजनकाल अगदीं सारखा नसतो हें प्रसिद्ध आहे. तेव्हां विद्यार्थी ज्याप्रमाणें लवकर अथवा उशीरां येईल त्याप्रमाणें गुरुजीनें आपल्या माध्याह्निकाची व्यवस्था प्रत्यहीं लावणें ही गोष्ट अशक्य आहे. शिवाय, एकाच विद्यार्थ्याला एकाच गुरुजीनें अध्ययन सांगणें असा प्रकार कोठेंही शक्य नसतो. अनेक विद्यार्थ्यांना मिळून अध्ययन सांगणारा एक असतो. तेव्हां जितके विद्यार्थी एका गुरुपाशीं पढणारे तितक्या सर्वांना एका दिवशीं एका-च्याच घरीं वार मिळणें ही गोष्ट शक्य नाहीं. ह्यामुळें सर्व विद्यार्थी एका वेळीं भोजन करून अध्ययनाला येणेंच शक्य नाहीं. भिक्षेचा प्रचार असला म्हणजे एकावेळीं विद्यार्थी भोजन करून अध्ययनाला तयार असणें शक्य आहे. वाराच्या पद्धतीमुळें विद्यार्थी जास्त वेळही कधीं कधीं बाहेर जाण्याचा संभव आहे. भोजनाला शेजारी बसण्याचा प्रसंग येत असल्यामुळें घरचा मालक त्याला कांहीं तरी काम सांगेल व त्यामुळें विद्यार्थ्याला कधीं कधीं पाट मांडणें, पत्रावळी लावणें, पानें कापणें, द्रोण लावणें, कोणाला बोलावून आणणें, कधीं कधीं वाढून घेणें, वाढणें, अडल्या पडल्यास बाजार करणें, निरोप सांगणें वगैरे वगैरे कामें करावीं लागतील. ह्यामुळें अध्ययनाला अडथळा होईल. मधुकरी मागण्याकरितां मनुष्य आल्यास एकादे वेळीं घरांत कितीही जरी अडचण असली तरी त्या विद्यार्थ्याला कस-ल्याही प्रकारचें काम कोणीही सांगत नाहीं. शिवाय, माधुकरी घाल-णारे लोक मधुकरी घालणें हें आपलें कर्तव्य समजत असतात. माधुकरी विद्यार्थ्यांना आपण घालितों म्हणजे आपण त्यांच्यावर उपकार करितो अशी बुद्धि कोणाचीही नसते. त्याचप्रमाणें माधुकरी मागणाराही स्वतःला माधुकरी घालणाऱ्यांचा ऋणी समजत नाहीं. वाराची गोष्ट तशी नाहीं. वार देणारा पुरुष विद्यार्थ्यांवर उपकार करण्याच्या बुद्धीनें वार देत असतो आणि वारावर जेवणाराही

विद्यार्थी स्वतःला उपकृत समजत असतो. हा विचार विद्यार्थ्यासंबंधानें झाला. वाराला येणाऱ्या विद्यार्थ्यांचें कुल, गोत्र, आचरण वगैरेंची माहिती पुरीपुरी लायेलच अशी खात्री नसल्यामुळें वारकरी विद्यार्थ्यांना पंक्तीला घेऊन भोजन करणें गृहस्थाश्रमी पुरुषाला इष्ट नाहीं. शिवाय, वारकरी विद्यार्थी ज्या लोकांच्या घरीं भोजनास जात असतो त्या सर्वांचें आचरण परस्पर सर्वांनाच पटणारें असतें किंवा अन्न सर्वांच्याच समजुतीनें सर्वांचें ग्रहण करण्यास योग्य असतें असाही नियम नाहीं. ह्यामुळें जे गृहस्थाश्रमी धर्मनिष्ठ पुरुष धर्मरक्षणार्थ परान्न वर्ज्य करीत असतात त्यांनाही वारकऱ्याच्या द्वारानें भलत्याच लोकांचा (ज्यांचा स्पर्श झालेलें उदकही अग्राह्य होय अशा लोकांचा) संसर्ग होत असतो. ह्यास्तव, सांप्रत अथवा केव्हांही विद्यार्थ्यांनीं वारानें जेवणें व विद्यार्थ्यांना वार देणें ह्या दोन्ही गोष्टी अनिष्ट होत.

भवत्पूर्वं चरेद्भैक्षमुपनीतो द्विजोत्तमः ।
भवन्मध्यं तु राजन्यो वैश्यस्तु भवदुत्तरम् ॥ ४९ ॥

उपनीत ब्राह्मणानें 'भवति भिक्षां देहि', क्षत्रियानें 'भिक्षां भवति देहि' आणि वैश्यानें 'भिक्षां देहि भवति' असें वाक्य उच्चारून भिक्षा मागावी असें ह्या वचनांत सांगितलें आहे.

मातरं वा स्वसारं वा मातुर्वा भगिनीं निजाम् ।
भिक्षेत भिक्षां प्रथमं या चैनं नावमानयेत् ५०

प्रथम भिक्षेला आरंभ करावयाचा तो आईपासून, बहिणीपासून अथवा मावशीपासून करावा अथवा जी कोणी नाहीं ह्मणणार नाहीं तिच्यापासून करावा. असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. ह्यावरून उपनयन झालेल्या द्विजानें घरीं न राहतां वेदाध्ययनाकरितां गुरुगृहींच वास्तव्य केलें पाहिजे असें ठरतें. उपनयनामध्यें प्रथम भिक्षा मागण्यासंबंधाचा हा नियम आहे असें टीकाकार ह्मणतात. आणि 'प्रथमं' ह्या पदावरून तसा अर्थ होणेंही शक्य

आहे. कार्यारंभसमयीं नाट लागणें बरें नव्हे अशी जी समजूत आहे त्याला हें वचन प्रमाण आहे.

समाहृत्य तु तद्भैक्षं यावदर्थममायया ।
निवेद्य गुरवेऽश्नीयादाचम्य प्राङ्मुखः शुचिः ॥५१॥ २

पुष्कळांकडून मिळून आपल्यापुरती भिक्षा आणून ती गुरूला निष्कपटपणें निवेदन करावी आणि गुरूची अनुज्ञा झाल्यावर आचमनपूर्वक शुद्ध असतांना पूर्वेकडे तोंड करून ती सेवन करावी. असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. आपणांला पुरण्याइतकीच भिक्षा आणावी असें जें ह्या वचनांत सांगितलें आहे तें महत्त्वाचें आहे. जास्त भिक्षा आणणाऱ्या विद्यार्थ्याचें आचरण, भिक्षान्नरूप भांडवल जवळ राहणारें असल्यामुळें, बिघडण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणें 'अमायया' हें पद महत्त्वाचें आहे. विद्यार्थ्यानें आणिलेली भिक्षा सर्व अथवा अंशतः स्वीकारण्याचा गुरूला अधिकार आहे. तेव्हां भिक्षा जास्त मागून आणणें व त्यापैकीं स्वतःला पुरेशी दुसरीकडे ठेवून उरलेली गुरूला निवेदन करणें किंवा झोळीमध्यें कोणी लाडू वगैरे घातल्यास तो भाकरीच्या तुकड्यांनीं अथवा सामान्य अन्नानें झांकून ती भिक्षा गुरूला निवेदन करणें हें कपट होय. असल्या कपटाचा ह्या वचनांत निषेध सांगितला आहे. भैक्ष आणिल्यानंतर व तें स्वीकारण्याविषयीं गुरूनें अनुज्ञा दिल्यानंतर आचमन करावें आणि शुचि असतांना भोजन करावें असें जें ह्या वचनांत सांगितलें आहे तिकडे पुष्कळांचें लक्ष्य जात नाहीं. भोजनकालीं शुचि असावें ही गोष्ट सांप्रत पुष्कळांच्या गांवींही नसते. मेधातिथींनीं 'शुचिः' ह्या पदाचें व्याख्यान करिते वेळीं

चाण्डालादिदर्शनमशुचिदेशाक्रमणनिष्ठीवनादि कृताचमनस्य भोजनकालेऽनेन निषिध्यते

असें ह्मटलें आहे. 'आचमन केल्यानंतर भोजनाच्या सुरवातीपर्यंत अशुद्ध देशावर गमन करूं नये; थुंकणें, नाक शिंकरणें

वगैरे ही वर्ज्य करावें आणि चांडालादिकांचें दर्शनही वर्ज्य करावें' असें ह्या व्याख्यानाचें तात्पर्य आहे. ही शुद्धि ब्रह्मचाऱ्याप्रमाणें इतर आश्रमांतील लोकांनाही अवश्य आहे.

**प्रक्षाल्य हस्तौ पादौ च त्रिः पिबेदम्बु वीक्षितम् ।**

असें भोजन प्रकरण चालूं असतांना दक्षस्मृतींत सांगितलेलें आहे. हातपाय धुवून तीन वेळां आचमन करावें असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. भोजनकालीं हातपाय धुवून तीन चुळा भरल्यानंतर शुद्ध वस्त्र नेसण्याचा प्रघात आहे. अस्पृश्य लोकांचें दर्शनही भोजनकालीं उपयोगी नाहीं असें मेधातिथीनें स्पष्ट ह्मटलें आहे.

**उपनीय गुरुः शिष्यं शिक्षयेच्छौचमादितः ।**
**आचारमग्निकार्यं च सन्ध्योपासनमेव च ॥ ६ ॥ २॥**

असें मनुवचन आहे. शिष्याचें उपनयन करून गुरूनें प्रथमतः त्याला शौच अर्थात् शुद्धिकरण शिकवावें आणि नंतर आचार, अग्निकार्य व संध्योपासना हीं शिकवावीं. असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. शौचप्रकरण मनुस्मृतीच्या पांचव्या अध्यायामध्यें आहे.

**दिवाकीर्तिमुदक्यां च पतितं सूतिकां तथा ।**
**शवं तत्स्पृष्टिनं चैव स्पृष्ट्वा स्नानेन शुद्ध्यति ॥८५॥ ५**

दिवाकीर्ति ह्मणजे दिवसांचा ज्याचें नांव प्रसंग पडल्यास घेण्याची अनुज्ञा आहे तो; अर्थात् अस्पृश्य जाति; चांडाल. उदक्या ह्मणजे रजस्वला. पतितशब्दाचा अर्थ महापातकी असा टीकाकारांनीं केलेला आहे. सूतिका ह्मणजे दहा दिवसांतील बाळंतीण; शव व शवाला स्पर्श करणारा ह्यांचा स्पर्श झाल्यास स्नानानें शुद्धि होते. ज्याला जें कर्म निषिद्ध आहे तें वारंवार करणारा जो असेल तो पतित, असाही पतितशब्दाचा अर्थ ह्या ठिकाणीं मानावा. टीकाकारांनीं प्रायश्चित्तानें शुद्ध न होणारा महापातकी असा पतित-शब्दाचा अर्थ केलेला आहे. निषिद्ध कर्म वारंवार करणारा व विहित प्रायश्चित्त न करणारा ह्याच कोटीमध्यें येत असतो.

आचम्य प्रयतो नित्यं जपेदशुचिदर्शने ।
सौरान्मन्त्रान्यथोत्साहं पावमानीश्च शक्तितः ॥८६॥ ५

चांडाल, रजस्वला, पतित, बाळंतीण, शव व शवस्पृष्ट हे अशुचि शब्दानें ह्या ठिकाणीं विवक्षित आहेत. चांडालादिकांपैकीं कोणीही दृष्टीं पडल्यास श्राद्ध, देवपूजा इत्यादि धर्मकृत्य करण्यास प्रवृत्त झालेल्या पुरुषानें सौर मंत्रांचा व पवमान मंत्रांचा आचमनपूर्वक यथाशक्ति जप करावा. असा टीकाकारांनीं ह्या वचनाचा अर्थ केलेला आहे. परंतु, चांडालादिकाचें केव्हांही दर्शन झालें असतां आचमनपूर्वक शुद्ध होऊन सौर व पवमानमंत्र जपावे असा ह्या वचनाचा अर्थ मला वाटत आहे आणि ब्रह्मचाऱ्यासंबंधानें तर तोच अवश्य आहे. जपादि कर्म करण्याकरितां स्नानाचमनादिकांनीं जो शुद्ध झाला आहे तो असा 'प्रयतः' ह्या पदाचा अर्थ टीकाकारांनीं केलेला आहे. परंतु, असा अर्थ घेतल्यास 'नित्यं' ह्या पदाचें स्वारस्य राहत नाहीं. तथापि टीकाकारांचेंही व्याख्यान अग्राह्य नाहीं. मेधातिथींनीं दोन्हीं व्याख्यानें दाखविलीं आहेत. कोणतेंही व्याख्यान घेतलें तरी चांडालादिकांपैकीं एकाद्याचें दर्शन कर्मार्थ प्रवृत्त झाल्यावरही होण्याचा संभव वारंवार असल्यामुळें सौर मंत्र व पवमान मंत्र ब्रह्मचाऱ्याला पाठ येणें अवश्य आहे. कारण, शुद्धीकरितांच ह्या मंत्रांची आवश्यकता आहे. ह्मणूनच वेदाध्ययन न करणाऱ्याही अनेक द्विजकुलांमध्यें सौर, पवमान, पुरुषसूक्त, रुद्र, त्रिसुपर्ण इत्यादि शिकविलें जातच असतें. झास्तव, अडचणीमुळें परंपरागत वेदशाखा जरी तोंडानें पाठ येत नसली तरी चांडालादिकांचा स्पर्श दर्शन इत्यादिकांमुळें प्राप्त होणाऱ्या अशुद्धीचें निरसन होण्याकरितां सूर्यमंत्र, पवमानमंत्र वगैरे शुद्धिकारक मंत्र द्विजाला पाठ येणें अवश्य आहे. द्रव्यशुद्धीसंबंधानेंही कांहीं गोष्टी ब्रह्मचाऱ्यानें लक्ष्यांत ठेवण्यासारख्या आहेत. परंतु, त्या पुष्कळच असल्यामुळें येथें सांगितल्या नाहींत.

उपनीय गुरुः शिष्यं शिक्षयेच्छौचमादितः ।
आचारमग्निकार्यं च सन्ध्योपासनमेव च ॥ ६९ ॥ २

हें वचन पूर्वीं दिलेलेंच आहे. ह्या वचनामध्यें 'उपनीय शिक्षयेत्' अशीं पदें असल्यामुळें उपनयन करणाऱ्यानें कुमाराला प्रथमतः शुद्धिकर्म, आचार, अग्निकार्य व संध्योपासन ह्यांचें शिक्षण दिलेंच पाहिजे असें ठरतें. शौचादिकांचें शिक्षण कुमाराला दिल्याशिवाय उपनयनसंस्कार करणाऱ्यांच्या कर्तव्याची परिसमाप्ति होतच नाहीं हें द्विजमात्रानें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे.

## अध्ययनधर्म.

अध्येष्यमाणस्त्वाचार्यो यथाशास्त्रमुदङ्मुखः ।
ब्रह्माञ्जलिकृतोऽध्याप्यो लघुवासा जितेन्द्रियः॥७०॥२

वेदाध्ययन करावयाचें असतांना ब्रह्मचाऱ्यानें यथाशास्त्र अध्ययन करावें; शुद्ध व हलकें वस्त्र परिधान करावें; जितेंद्रिय असावें; उत्तरेकडे तोंड करून बसावें आणि अशा रीतीनें शिष्य बसल्यानंतर व त्यानें ब्रह्माञ्जलि केल्यानंतर गुरुनें त्याला अध्ययन सांगावें. ब्रह्माञ्जलीचें लक्षण पुढल्याच वचनांत दिलेलें आहे. वेदाध्ययनाच्या आरंभीं व शेवटीं सर्वदा गुरूचे प्रथम पाय धरावे आणि नंतर दोन्ही हात आंत पोकळी ठेवून एकमेकांना जोडावे ह्मणजे केळफुलासारखी आकृति करावी. ह्याला ब्रह्माञ्जलि ह्मणतात. ब्रह्माञ्जलीच्या पूर्वीं गुरूचे पाय धरावे असें सांगितलें आहे. परंतु, पाय धरितेवेळीं उजवा हात डाव्या हाताच्या वर मनगट व कोंपर ह्यांच्यामध्यें ठेवावा आणि अशा रीतीनें स्वस्तिकाकार हात करून दोन हातांनीं गुरूचे दोन पाय धरावे. स्वस्तिकाकार हात केले ह्मणजेच उजवा पाय उजव्या हातानें व डावा पाय डाव्या हातानें समोर बसलेल्या शिष्याला धरितां येतो. गुरूच्या उजव्या पायाला डावा हात व

डाव्या पायाला उजवा हात शिष्यानें लावावयाचा नाहीं; ह्मणून स्वस्तिकाकार हात करावे लागतात.

ब्राह्मणः प्रणवं कुर्यादाद्यावन्ते च सर्वदा ।
स्रवत्यनोंकृतं पूर्वं परस्ताच्च विशीर्यति ॥ ७४ ॥ २ ॥

वेदाध्ययनाच्या आरंभीं व शेवटीं प्रणवाचा उच्चार करावा. पूर्वी प्रणवाशिवाय अध्ययनाला आरंभ केल्यास अध्ययनामध्यें स्वरवर्णादिकांच्या चुका होऊं लागतात आणि शेवटीं प्रणवोच्चार न केल्यानें आलेलेंही विसरतें.

प्राक्कूलान्पर्युपासीनः पवित्रैश्चैव पावितः ।
प्राणायामैस्त्रिभिः पूतस्तत ओंकारमर्हति ॥ ७५ ॥ २ ॥

प्रागग्र दर्भांवर बसून दोन्ही हातांत असलेल्या दर्भांनीं पवित्र झाल्यावर आणि तीन प्राणायामांनीं शुद्ध झाल्यावर प्रणवोच्चार करण्याचा अधिकार प्राप्त होतो. असें ह्या वचनांत सांगितलें आहे. हा वेदाध्ययनारंभविधि सांप्रत पुष्कळांना ठाऊक नाहीं; अर्थात्च ह्या विधीचें उल्लंघन होऊन झालेलें वेदाध्ययन निरुपयोगी होतें.

अकारं चाप्युकारं च मकारं च प्रजापतिः ।
वेदत्रयान्निरदुहद्भूर्भुवः स्वरितीति च ॥ ७६ ॥ २ ॥

अकार, उकार व मकार हे प्रणवाचे अंश आहेत आणि भूः,भुवः व स्वः ह्या तीन व्याहृति आहेत. ब्रह्मदेवानें ह्या तीन अंशांपैकीं एकेक अंश व तीन व्याहृतींपैकीं एकेक व्याहृति अशीं दोनदोन अनुक्रमें ऋक्, यजु व साम ह्या तीन वेदांपासून उत्पन्न केलीं. असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे.

त्रिभ्य एव तु वेदेभ्यः पादं पादमदूदुहत् ।
तदित्यृचोऽस्याः सावित्र्याः परमेष्ठी प्रजापतिः ॥७७॥

जिची देवता सविता आहे अशी जी'तत्' ह्या पदापासून सुरूं होणारी गायत्री छंदाची ऋचा तिचा एकेक पाद परमेष्ठी प्रजा-

पर्तनें अनुक्रमें ऋक्, यजु व साम ह्या तीन वेदांपासून साररूपानें काढिलेला आहे.

एतदक्षरमेतां च जपन्व्याहृतिपूर्विकाम्।
सन्ध्ययोर्वेदविद्विप्रो वेदपुण्येन युज्यते॥

तें प्रणवाक्षर आणि व्याहृतिपूर्वक ही ऋचा दोन्ही संध्यांचे वेळीं जपणाऱ्या वेदज्ञ ब्राह्मणाला वेदाध्ययनाचें पुण्य प्राप्त होतें. असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. ह्मणूनच संध्यावंदनसमयीं धर्मनिष्ठ लोक शक्य तितका गायत्रीजप अधिक करीत असतात.

एतयर्चा विसंयुक्तः काले च क्रियया स्वया।
ब्रह्मक्षत्रियविड्योनिर्गर्हणां याति साधुषु॥ ८०॥ २॥

गायत्रीमंत्रहीन व स्वकर्महीन द्विज साधूंच्या निंदेस पात्र होतो असें ह्या वचनांत सांगितलें आहे.

ओंकारपूर्विकास्तिस्रो महाव्याहृतयोऽव्ययाः।
त्रिपदा चैव सावित्री विज्ञेयं ब्रह्मणो मुखम्॥ ८१॥ २॥

ओंकारपूर्वक तीन अविनाशी महाव्याहृति आणि त्रिपदा सावित्री हें ब्रह्मप्राप्तीचें द्वार होय असें समजावें. हें ह्या वचनाचें तात्पर्य होय. ह्या वचनामध्यें (ओंकारपूर्विका व्याहृतयः) अशीं पदें आहेत. ह्यापासून प्रथम ओंकार व नंतर तीन महाव्याहृति म्हणाव्याच्या असें ठरतें आणि अठ्याहत्तराव्या वचनामध्यें 'व्याहृतिपूर्विकाम्' असें गायत्रीला विशेषण आहे. तस्मात्, प्रथम प्रणव, नंतर व्याहृति व नंतर गायत्री असा क्रम मनुस्मृतीवरूनच ठरतो.

## इंद्रियदमन.

इंद्रियाणां विचरतां विषयेष्वपहारिषु।
संयमे यत्नमातिष्ठेद्विद्वान्यन्तेव वाजिनाम्॥ ८८॥ २॥

पुरुषांना आपल्या अधीन करणाऱ्या विषयांच्या ठिकाणीं संचार करणाऱ्या इंद्रियांच्या संयमनाविषयीं प्राज्ञ मनुष्यानें अश्व आवरून

धरण्याचा यत्न करणाऱ्या सारथ्याप्रमाणें यत्न करावा. असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. श्रवणेंद्रिय, त्वगिंद्रिय, चक्षुरिंद्रिय, रसनेंद्रिय व घ्राणेंद्रिय हीं पांच ज्ञानेंद्रियें असून पायु, उपस्थ, हात, पाय व वाणी हीं पांच कर्मेंद्रियें होत. मन हें अकरावें आहे व तें कर्मेंद्रिय असून ज्ञानेंद्रियही आहे. मनाला जिंकिलें असतां ज्ञानेंद्रियांचें व कर्मेंद्रियांचें संयमन होतें. ब्रह्मचाऱ्यानें जितेंद्रिय राहिल्याशिवाय त्याला ज्ञानप्राप्ति होणें शक्य नाहीं. ह्यास्तव, जितेंद्रिय कोणाला ह्मणावें हें समजणें अवश्य आहे.

श्रुत्वा स्पृष्ट्वा च दृष्ट्वा च भुक्त्वा घ्रात्वा व यो नरः।
न हृष्यति ग्लायति वा स विज्ञेयो जितेन्द्रियः॥ ९८ ॥

कसल्याही श्रवणानें, स्पर्शानें, दर्शनानें, खाण्यानें व वासानें ज्याला हर्ष अथवा खेद होत नाहीं तो जितेंद्रिय होय. असें ह्या वचनांत सांगितलें आहे.

इंद्रियाणां तु सर्वेषां यद्येकं क्षरतीन्द्रियम्।
तेनास्य क्षरति प्रज्ञा दृतेः पादादिवोदकम्॥ ९९ ॥ २

सर्व ज्ञानेंद्रियांपैकीं एक ज्ञानेंद्रिय जर विषयाकडे वळूं लागलें तर पखालीच्या अथवा डोलच्या एका भोंकांतून ज्याप्रमाणें सर्व उदक गळून जातें त्याप्रमाणें त्याप्रमाणें पुरुषाचें सर्व धैर्य नाहींसें होतें. ह्यास्तव,

वशेकृत्वेन्द्रियग्रामं संयम्य च मनस्तथा।
सर्वान्संसाधयेदर्थानक्षिण्वन्योगतस्तनुम्॥ १०० ॥ २ ॥

इंद्रियें व मन ह्यांचें संयमन करून शरीराला पीडा न होऊं देतां शास्त्रदृष्ट उपायानें सर्व पुरुषार्थ पुरुषानें प्राप्त करून घ्यावे.

## ब्रह्मचाऱ्याचें नित्य कर्म.

अग्नीन्धनमधःशय्या भैक्षचर्या गुरोर्हितम्।
आसमावर्तनात्कुर्यात्कृतोपनयनो द्विजः॥ १०८ ॥ २ ॥

ह्या वचनामध्यें ब्रह्मचाऱ्याचीं नित्य कर्में संक्षेपतः सांगितलेलीं आहेत. सकाळ संध्याकाळ अग्नि प्रदीप्त करून होम देणें, भिक्षाचरण करणें, पलंग वगैरेवर न निजतां खालीं निजणें आणि गुरूची शुश्रूषा करणें ह्या गोष्टी समावर्तनसंस्कार होईपर्यंत उपनयन झालेल्या द्विजाला अवश्य केल्या पाहिजेत.

शय्यासनेऽध्याचरिते श्रेयसा न समाविशेत् ।
शय्यासनस्थश्चैवैनं प्रत्युत्थायाभिवादयेत् ॥ ११९ ॥

आपल्यापेक्षां विद्येनें वगैरे अधिक असलेल्या पुरुषानें स्वीकारिलेल्या शय्येवर अथवा आसनावर बसूं नये आणि आपल्यापेक्षां मोठा आल्यास आपण जर त्यावेळीं शय्येवर व आसनावर असलों तर तेथून उठून त्याला अभिवंदन करावें. कारण, मोठा मनुष्य येऊं लागला असतां तरुणाचे प्राण देहांतून बाहेर जाण्याची इच्छा करूं लागतात. परंतु, प्रत्युत्थान व अभिवादन ह्यांच्या योगानें तरुणाला ते जागच्या जागीं ठेवितां येतात असें

ऊर्ध्वं प्राणा ह्युत्क्रामन्ति यूनः स्थविर आयति ।
प्रत्युत्थानाभिवादाभ्यां पुनस्तान्प्रतिपद्यते ॥ १२० ॥ २ ॥

ह्या मनुवचनांत सांगितलें आहे आणि कोणी वृद्ध आल्यास उठून जो सर्वदा त्याला अभिवंदन करण्याविषयीं तत्पर असतो त्याचें आयुष्य, विद्या, यश व बळ ह्यांची अभिवृद्धि होते असें

अभिवादनशीलस्य नित्यं वृद्धोपसेविनः ।
चत्वारि तस्य वर्धन्ते आयुर्विद्या यशो बलम् ॥१२१॥२॥

ह्या मनुवचनांत सांगितलें आहे.

## स्त्रियांशीं वर्तन कसें करावें ?

परपत्नी तु या स्त्री स्यादसंबन्धा च योनितः ।
तां ब्रूयाद्भवतीत्येवं सुभगे भगिनीति च ॥ १२९ ॥२॥

आपल्या नात्यांतील नसलेली अशी जी कोणी स्त्री परपत्नी असेल

तिच्याशीं बोलण्याचा केवल ब्रह्मचाऱ्यालाच नव्हे परंतु, कोणालाही प्रसंग आल्यास 'ताई, बाई, माई' अशा प्रकारें संबोधून भाषण करावें. असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. हा उपदेश केवल ब्रह्मचाऱ्याकरितांच नसून गृहस्थाश्रम्याकरितांही आहे आणि ह्मणूनच स्त्रीशब्द न घालतां परपत्नी असा शब्द घातलेला आहे. स्वस्त्रीशिवाय इतर कोणत्याही नातेवाईक नसलेल्या विवाहित स्त्रीशीं भाषण करण्याचा प्रसंग आल्यास भगिनी समजून तिच्याशीं भाषण करावें. हा उपदेश सर्वांनींच विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे.

मातुलांश्च पितृव्यांश्च श्वशुरानृत्विजो गुरून् ।
असावहमिति ब्रूयात्प्रत्युत्थाय यवीयसः ॥१३०॥२॥

मामे, चुलते, सासरे, ऋत्विज व गुरु हे जरी वयानें आपणापेक्षा लहान असले तरी ते आले असतां उठावें आणि 'हा मी अमुक अमुक' असें त्यांना ह्मणावें.

मातृष्वसा मातुलानी श्वश्रूरथ पितृष्वसा ।
संपूज्या गुरुपत्नीवत्समास्ता गुरुभार्यया ॥१३१॥२॥

मावशी, मामी, सासू आणि आत्याबाई ह्यांना गुरुपत्नीप्रमाणें मान द्यावा. कारण, त्या गुरुपत्नीप्रमाणेंच पूज्य आहेत.

भ्रातुर्भार्योपसंग्राह्या सवर्णाऽहन्यहन्यपि ।
विप्रोष्य तूपसंग्राह्या ज्ञातिसंबन्धियोषितः ॥ १३२ ॥

ज्येष्ठ भ्रात्याच्या सवर्ण भार्येचें पादाभिवंदन प्रत्यहीं करावें आणि प्रवासाहून आल्यानंतर पितृकुलांतील व मातृकुलांतील ज्येष्ठ स्त्रियांचेंही पादाभिवंदन करावें.

पितुर्भगिन्यां मातुश्च ज्यायस्यां च स्वसर्यपि ।
मातृवद्वृत्तिमातिष्ठेन्माता ताभ्यो गरीयसी॥१३३॥२॥

"आत्याबाई, मावशी आणि वडील सख्खी बहीण ह्यांच्याशीं मातेप्रमाणें वागणूक करावी. परंतु, ह्यांच्यापेक्षां माता श्रेष्ठ होय.

ह्यास्तव, ह्यांच्या आज्ञेचा मातेच्या आज्ञेशीं विरोध येऊं लागल्यास त्यांची आज्ञा न मानितां मातेचीच आज्ञा मान्य करावी" असें ह्या मनुवचनाचें तात्पर्य आहे.

## उपनयनानंतर अवश्य कर्तव्यें.

कृतोपनयस्यास्य व्रतादेशनमिष्यते ।
ब्रह्मणो ग्रहणं चैव क्रमेण विधिपूर्वकम् ॥ १७३ ॥ २

ह्या कुमाराचें उपनयन झाल्यानंतर त्याला ब्रह्मचर्याश्रमामध्यें ज्या नियमांचें अवश्य परिपालन केलें पाहिजे. त्या नियमांचा उपदेश करणें इष्ट आहे आणि नंतर संहिता, ब्राह्मण व आरण्यक ह्या क्रमानें यानें वेदाध्ययन यथाविधि करणें अवश्य आहे.

सेवेतेमांस्तु नियमान्ब्रह्मचारी गुरौ वसन् ।
संनियम्येन्द्रियग्रामं तपोवृद्ध्यर्थमात्मनः ॥ १७५ ॥ २

गुरुगृहीं वेदाध्ययनाकरितां वस्ती करणाऱ्या ब्रह्मचाऱ्यानें आपलें तप वृद्धिंगत होण्याकरितां इंद्रियांचें संयमन करून पुढें सांगितल्या जाणाऱ्या नियमांचें परिपालन करावें.

## ब्रह्मचाऱ्यानें अवश्य पाळण्याचे नियम.

नित्यं स्नात्वा शुचिः कुर्याद्देवर्षिपितृतर्पणम् ।
देवताभ्यर्चनं चैव समिदाधानमेव च ॥ १७६ ॥

"प्रत्यहीं स्नान करून शुचि व्हावें व शुचि असतांना देव, ऋषि व पितर ह्यांचें तर्पण करावें; देवतांचें पूजन करावें आणि अग्नीमध्यें समिधा घाल्या (ह्मणजे अग्निकार्य करावें)" असें ह्या वचनांत सांगितलें आहे. ब्रह्मचाऱ्यानें प्रत्यहीं देवर्षिपितृतर्पण करावें असें जें ह्या ठिकाणीं सांगितलें आहे तें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. जीवत्पितृकाला तर्पण करण्याचें कारण नाहीं अशी एक खुळी समजूत कांहीं लोकांची झालेली असते व पितृतर्पण ह्मणजे बाप, आजा

इत्यादिकांचेंच तर्पण असें ते समजतात. परंतु, पितृतर्पण ह्मणजे बाप, अजा इत्यादिकांचेंच तर्पण असा अर्थ नसून गृह्यसूत्रामध्यें प्राचीनावीती करून ज्या आचार्यांचें तर्पण करण्यास सांगितलेलें असतें ते आचार्य ह्या ठिकाणीं पितृशब्दानें विवक्षित आहेत. पिता, पितामह, प्रपितामह इत्यादि पितरांचें तर्पण हा आचार्यतर्पणांतीलच एक भाग होय असें समजावें. ह्यास्तव, जीवत्पितृक ब्रह्मचाऱ्यानें देव, ऋषि व आचार्य ह्यांचें तर्पण प्रत्यहीं अवश्य केलेंच पाहिजे. ह्मणजे ब्रह्मचारी आश्वलायनसूत्रानुयायी ऋग्वेदी असल्यास प्रजापतिस्तृप्यतु येथपासून ये चान्ये आचार्यास्ते सर्वे तृप्यन्तु येथपर्यंत त्यानें तर्पण अवश्य केलेंच पाहिजे.

**वर्जयेन्मधु मांसं च गन्धं माल्यं रसान्स्त्रियः ।**
**शुक्तानि यानि सर्वाणि प्राणिनां चैव हिंसनम् ॥ १७७ ॥**

मद्य, मांस, सुगंधि द्रव्यें, पुष्पें, उत्कट रस, स्त्रिया, कोणताही आंबलेला पदार्थ आणि प्राण्यांची हिंसा ह्या गोष्टी वर्ज्य कराव्या असें ह्या वचनांत सांगितलें आहे. परंतु, ह्या वचनाच्या अर्थासंबंधानें थोडासा खुलासा होणें अवश्य आहे. सामान्य गंध ब्रह्मचाऱ्याला वर्ज्य नाहीं. कापूर, अगुरु, कस्तूरी इत्यादि उत्कटगंधयुक्त द्रव्यें वर्ज्य आहेत. तथापि आपल्या जाण्याच्या मार्गानें अथवा वास्तव्य करण्याच्या ठिकाणीं सुगंधि पुष्पें, सुगंधि द्रव्यें इत्यादिकांचा सुवास आपोआप आल्यास त्याचें सेवन झाल्यामुळें ब्रह्मचारी प्रायश्चित्तार्ह होतो असें समजूं नये. सुगंधि द्रव्यांची उटी वगैरे त्यानें लावूं नये. त्याचप्रमाणें देवतापूजन ब्रह्मचाऱ्याला सांगितलें आहे. तेव्हां पूजेचे वेळीं देवाला वाहिलेलीं सुगंधि पुष्पें, धूप, उदबत्ती इत्यादिकांचा सुवास ब्रह्मचाऱ्याला वर्ज्य आहे असेंही नाहीं. भोगबुद्धीनें त्यानें सुगंधाचा स्वीकार करूं नये. पुष्पांचीही गोष्ट ह्याप्रमाणेंच समजावी. रस वर्ज्य करावे ह्मणजे काय? कोणत्याही पदार्थामध्यें रस हा अस-

णारच. ह्यास्तव, स्वभावतःच अति गोड वगैरे असलेले पदार्थ वर्ज्य करावे. मिष्टान्न वर्ज्य करावें असही 'रसान्वर्जयेत' ह्या पदांचा अर्थ टीकाकारांनीं केलेला आहे. त्याचप्रमाणें रस म्हणजे शृंगारादि रस असाही अर्थ कांहीं टीकाकारांनीं केलेला आहे, 'नाटकादिप्रेक्षणेन काव्यश्रवणेन वा रसपुष्टिर्न कर्तव्या' असें टीकाकारांचें म्हणणें आहे तें बरोबर आहे. नाटकें पाहणें, ऐकणें व शृंगारादि रसांचा पोष करणारे ग्रंथवाचणें ब्रह्मचाऱ्यानें वर्ज्य करावे. त्याचप्रमाणें स्त्रिया वर्ज्य कराव्या. स्त्रिया वर्ज्य कराव्या म्हणजे पूर्वीच्या वचनांत जें कांहीं स्त्रियांचें पादाभिवंदन सांगितलें आहे तें वर्ज्य करावें असें समजावयाचें नाहीं. कामवासना उत्पन्न होईल अशा रीतीनें स्त्रीचा संसर्ग करूं नये. शुक्त म्हणजे स्वभावतः मधुर असून नंतर आंबलेले पदार्थ.

अभ्यङ्गमञ्जनं चाक्ष्णोरुपानच्छत्रधारणम् ।
कामं क्रोधं च लोभं च नर्तनं गीतवादनम् ॥
द्यूतं च जनवादं च परिवादं तथाऽनृतम् ।
स्त्रीणां च प्रेक्षणालम्भमुपघातं परस्य च ॥ १७९ ॥ २ ॥

अभ्यंग, डोळ्यामध्यें अंजन, चर्मपादुका, छत्री, शब्दस्पर्शादि विषयांपैकीं कोणत्याही विषयाची आसक्ति, लोभ, मोह, द्यूतक्रीडा, कारण नसतांना लौकिक गोष्टींची वाटाघाट, ग्राम, देश इत्यादिकांतील बातम्या काढणें किंवा विचारणें, असत्य, स्त्रियांच्या विशिष्ट अवयवाकडे पाहणें व स्त्रियांचें आलिंगन ह्या गोष्टी ब्रह्मचाऱ्यानें वर्ज्य कराव्या आणि कोणालाही अपकार करूं नये. असें ह्या वचनांत सांगितलें आहे. अभ्यंग म्हणजे मस्तकाला व शरीराला तेल वगैरे मर्दन करणें किंवा लावणें. डोळ्यांत कांहीं रोग नसतांना सुर्मा वगैर घालणें. छत्री स्वतःही धरूं नये किंवा दुसऱ्याकडूनही ब्रह्मचाऱ्यानें धरून घेऊं नये. स्त्रिया वर्ज्य कराव्या हें पूर्वीच्या वचनांत सांगितलें असल्यामुळें येथील कामशब्दाचा अर्थ सुरतक्रीडा असा

नसून शब्द, स्पर्श इत्यादि विषयांपैकीं कोणत्याही विषयाची आसक्ति असा आहे. 'नर्तनं' ह्या पदाचें व्याख्यान मेधातिथींनीं 'सामान्य लोकांना आनंद होण्याकरितां हावभाव करणें आणि नाटकांत भूमिका वगैरे घेणें.' असें केलें आहे. गीत व वाद्य ह्यांचा संबंध ब्रह्मचाऱ्यानें वर्ज्य करावा असें सांगितलें आहे. अर्थातच नाच, तमाशा, नाटक वगैरे पाहणें ही गोष्ट ब्रह्मचारिधर्माला निषिद्ध होय. परंतु, सांप्रत विद्यार्थ्यांचें वर्तन ह्या वचनाच्या विरुद्ध असतें. विद्यार्थी कादंबऱ्या वचतात, नाटकें पाहतात, विद्यार्थिदशेंतही नाटकें स्वतः करितात; पाठशालादिकांतून वार्षिक अथवा षाण्मासिक संमेलनें करून त्या समयीं पाठशाळांचे चालकच समजूनउमजून गायन-वादनाशीं विद्यार्थ्यांचा संबंध आणीत असतात आणि काव्यनाटकांचें शिक्षणही शाळांतून दिलें जात असतें. रघुवंश, कुमारसंभव इत्यादि काव्यें आणि त्याचप्रमाणें शाकुंतल, उत्तररामचरित इत्यादि नाटकें शाळांतून शिकविलीं जात असतात हें प्रसिद्ध आहे. द्यूत ब्रह्मचाऱ्याला वर्ज्य आहे. परंतु, चढाओढीचे खेळ कधीं कधीं विद्यार्थ्यांकरितां नेमिलेले असतात व त्यांत त्यांना बक्षिसेंही मिळतात. जनवार्ता ह्मणजे लौकिक गोष्टींसंबंधानें वादविवाद. हा तर विद्यार्थ्यांमध्यें हवा तितका चालूंच असतो. परिवाद ह्मणजे देशवार्ता वगैरे. वृत्तपत्रें, चालू लौकिक गोष्टींनीं भरलेलीं मासिकें वगैरे विद्यार्थ्यांनीं वाचण्याकरितां कांहीं कांहीं शाळांतून व्यवस्था केलेली असते व कोठें कोठें तर विद्यार्थ्यांकडूनच मासिक वगैरे काढिलें जात असतें. त्याचप्रमाणें स्त्रियांचें दर्शन ब्रह्मचाऱ्यांना वर्ज्य असतांनाही तरुण विद्यार्थी व तरुणी स्त्रिया ह्यांना कोठें कोठें तर एकाच ठिकाणीं शिक्षण दिलें जात असतें. त्याचप्रमाणें स्त्रियांचीं चित्रें असलेलीं पुस्तकें विद्यार्थ्यांच्या वाचण्यांत येतात व अलीकडील मासिक पुस्तकें प्रसिद्ध करणारे लोक तर कोणी मुखपृष्ठावर तर कोणी

आंतल्या बाजूस विद्यार्थ्यांची कामवासना प्रबल करणारीं स्त्रियांचीं चित्रें घातल्याशिवाय आपलें पुस्तकप्रकाशत्वच पुरें झालें असें समजत नाहींत. ह्या मुळें व वर निर्दिष्ट केलेल्याही इतर कारणांमुळें विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धक्का बसतो व ते अकालीं मृत्युमुखीं पडतात.

**एका शय्यीत सर्वत्र न रेतः स्कन्दयेत्क्वचित् ।**
**कामाद्धि स्कन्दयन्रेतो हिनस्ति व्रतमात्मनः ॥ १८८ ॥**

कोठेंही शय्येवर एकट्यानेंच निजावें. ब्रह्मचारि दशेमध्यें एका अंथरुणावर एकापेक्षां अधिक विद्यार्थ्यांनीं कोठही व कधींही पडूं नये आणि कधींही शुक्रपात करूं नये. इच्छेनें रेतःपात करणारा ब्रह्मचारी आपल्या ब्रह्मचर्यव्रताचा नाश करीत असतो असें ह्या वचनांत सांगितलें आहे. ह्या वचनांतील सर्वत्रशब्दाचा अर्थ नंदनपंडितांनीं मातापितरांच्याही समीप असा केला आहे. व्रत ह्मणजे ब्रह्मचर्य असा अर्थ सर्वज्ञ नारायणांनीं केला असून रेतःपातामुळें ब्रह्मचर्यव्रताचा नाश झाल्यास ब्रह्मचाऱ्याचें पुनरुपनयन करावें असें त्यांनीं अवश्य सांगितलें आहे. ' कामाद्धि स्कन्दयन्रेतः ' ह्या पदाचें व्याख्यान मेधातिथींनीं

**इच्छा अत्र कामः । हस्तव्यापारादिना अयोनौ मैथुनेन च रेतः शुक्रं स्कन्दयन् ।**

असें केलें आहे आणि सर्वज्ञ नारायणांनीं

**कामतस्तु स्त्रियं दृष्ट्वापि स्कन्दनेन व्रतहानिः ।**

असें केलें आहे. सांप्रतचा जो विद्यार्थिवर्ग आहे त्यामध्यें शेंकडा नव्वदांपेक्षां अधिक व्यक्ति ह्या वचनांत ज्या गोष्टीचा निषेध सांगितलेला आहे ही गोष्ट मुद्दाम करीत असतात व त्यामुळें विद्यार्थ्यांचीं चक्षुरादि इंद्रियें क्षीण होत जाऊन सर्वही विद्यार्थी मरणाकडे धांव घेत असतात. केवल स्त्रियांच्या दर्शनामुळें जर असले अनर्थ होत

असतात तर काव्यें, नाटकें, स्त्रियांचीं चित्रें ज्यांत आहेत अशीं पुस्तकें इत्यादिकांपासून विद्यार्थिवर्ग शक्य तितका अलिप्त ठेवण्याची खटपट करणें हें शिक्षणखात्याकडील अधिकाऱ्यांचें व देशांतील पुढाऱ्यांचें कर्तव्य आहे.

**स्वप्ने सिक्त्वा ब्रह्मचारी द्विजः शुक्रमकामतः ।**
**स्नात्वाऽर्कमर्चयित्वा त्रिः पुनर्मामित्यृचं जपेत् ॥१८१॥२॥**

इच्छा नसतांना स्वप्नामध्यें शुक्रच्युति झाल्यास ब्रह्मचाऱ्यानें स्नान करून सूर्याचें पूजन करावें आणि

**पुनर्मामैत्विन्द्रियं पुनरायुः पुनर्भगः । पुनर्ब्राह्मणमैतु मा पुनर्द्रविणमैतु मा ।**

ह्या ऋचेचा तीन वेळां जप करावा. असें ह्या वचनांत सांगितलें आहे. इंद्रियसामर्थ्य, आयुष्य, भाग्य, ब्राह्मण्य व धन हीं मला पुनरपि प्राप्त होवोत असें ज्याअर्थीं ह्या ऋचेंत निर्दिष्ट केलें आहे त्याअर्थीं इच्छा नसतांनाही स्वप्नामध्यें शुक्रच्युति झालेला ब्रह्मचारी इंद्रियसामर्थ्य, आयुष्य, द्विजत्व व संपत्ति ह्यांना मुकत असतो असें ठरत आहे. मग समजून उमजून शुक्रपात करणाऱ्या विद्यार्थ्यांचीं चक्षुरादि इंद्रियें क्षीण होतात; ते भाग्यसंपन्न निपजत नाहींत; जन्मभर दरिद्री असतात; ब्राह्मण्याची त्यांना पर्वा नसते आणि ते अल्पायु असतांनाच मृत्युमुखीं पडतात ह्यांत आश्चर्य तें कोणतें? इच्छा नसतांनाही स्वप्नांत झालेल्या शुक्रच्युतीनें जर ब्राह्मण्याची अथवा द्विजत्वाची हानि होत आहे तर समजून उमजून शुक्रपात करणाऱ्याच्या द्विजत्वाची जी हानि होत असते ती भरून काढण्याकरितां त्याचा पुनरपि उपनयनसंस्कार होणें अवश्यच आहे.

**उदकुम्भं सुमनसो गोशकृन्मृत्तिकाकुशान् ।**
**आहरेद्यावदर्थानि भैक्षं चाहरहश्चरेत् ॥ १८२ ॥ २ ॥**

गुरुगृहीं ब्रह्मचाऱ्यानें रहावें हें ठरलेलेंच आहे. गुरूकरितां

ब्रह्मचाऱ्यानें जितक्या हव्या असतील तितक्या पाण्याच्या घागरी, पुष्पें त्यांच्या अग्निहोत्रादि कार्याकरितां गाईचें शेण, शौचादि कार्याकरितां मृत्तिका आणि दर्भ आणीत जावे व स्वतःच्या उपजीविकेकरितां प्रत्यहीं माधुकरी मागावी.

वेदयज्ञैरहीनानां प्रशस्तानां स्वकर्मसु ।
ब्रह्मचार्याहरेद्भैक्षं गृहेभ्यः प्रयतोऽन्वहम् ॥ १८३ ॥

वेदाध्ययनापासून व अधिकार असतांना यज्ञकर्मापासून जे पराङ्मुख नसतात आणि जे स्वकर्मनिष्ठ असतात त्यांच्याच घरांतून ब्रह्मचाऱ्यानें शुचि राहून प्रत्यहीं भिक्षा आणावी.

गुरोः कुले न भिक्षेत न ज्ञातिकुलबन्धुषु ।
अलाभे त्वन्यगेहानां पूर्वं पूर्वं विवर्जयेत् ॥ १८४ ॥
सर्वं वापि चरेद्ग्रामं पूर्वोक्तानामसंभवे ।
नियम्य प्रयतो वाचमभिशस्तांस्तु वर्जयेत् ॥ १८५ ॥ २ ॥

गुरुकुलामध्यें भिक्षा मागूं नये आणि त्याचप्रमाणें पितृव्यांतील जे पितृपक्षीय व मातुलादि मातृपक्षीय ह्यांच्याही कुलामध्यें भिक्षा मागूं नये. परंतु, ज्या गांवामध्यें गुरु राहतो त्या गांवांतील सर्वच घरें जर गुरूचीं संबंधी किंवा आपल्या बापाशीं किंवा मातेशीं नातें असणारीं असलीं तर पहिलें पहिलें वर्ज्य करावें. ह्मणजे प्रथम मातृपक्षीय जे मातुलादिक त्यांच्या नातेवाइकांकडे माधुकरीला जावें, ते नसल्यास मातुलादिकांकडे जावें, ते नसल्यास पितृव्यादिकांकडे जावें अथवा पितृव्य वगैरे सुद्धां कोणी नसल्यास मधुकरीकरितां सर्व गांव हिंडावा. परंतु, भिक्षा मागण्याचें वाक्य खेरीज करून दुसरें कसलेंही भाषण करूं नये आणि उपजीविकेकरितां सबंध गांव फिरण्याचा जरी प्रसंग आला तरी पातकी ह्मणून ज्यांच्याबद्दल बोभाटा असेल त्यांचीं घरें भिक्षेकरितां त्यानें वर्ज्य करावीं.

दूराद्गाहृत्य समिधः संनिदध्याद्विहायसि ।
सायंप्रातश्च जुहुयात्ताभिरग्निमतन्द्रितः ॥ १८६ ॥

समिधा लांबून आणाव्या, त्या भूमीवर न ठेवितां कोठें तरी वर ठेवाव्या आणि त्यांच्या योगानें सांजसकाळ ब्रह्मचाऱ्यानें दक्ष राहून अग्निकार्य करीत असावें.

अकृत्वा भैक्षचरणमसमिध्य च पावकम् ।
अनातुरः सप्तरात्रमवकीर्णिव्रतं चरेत् १८७ ॥ २ ॥

व्याधि नसतांना भिक्षा मागितल्याशिवाय व अग्निकार्य केल्याशिवाय सात अहोरात्र लोटल्यास ब्रह्मचाऱ्यानें अवकीर्णीला अनुलक्षून सांगितलेले प्रायश्चित्त करावें. अवकीर्णी ह्मणजे स्त्रीसमागम केलेला ब्रह्मचारी.

श्रेयःसु गुरुवद्वृत्तिं नित्यमेव समाचरेत् ।
गुरुपुत्रेषु चार्येषु गुरोश्चैव स्वबन्धुषु ॥

आपल्यापेक्षां जे विद्यादिकांनीं श्रेष्ठ असतील त्यांच्याशीं, आर्य गुरुपुत्रांशीं आणि गुरूच्या बांधवांशीं ब्रह्मचाऱ्यानें गुरुप्रमाणेंच वर्तन ठेवावें.

उत्सादनं च गात्राणां स्नापनोच्छिष्टभोजने ।
न कुर्याद्गुरुपुत्रस्य पादयोश्चावनेजनम् २०९ ॥ २

अंग चोळणें, स्नान घालणें, उच्छिष्ट सेवन करणें आणि पाय धुणें ह्या गोष्टी गुरुपुत्रांसंबंधानें वर्ज्य कराव्या.

गुरुवत्प्रतिपूज्यास्तु सवर्णा गुरुयोषितः ।
असवर्णास्तु संपूज्याः प्रत्युत्थानाभिवादनैः ॥२१०॥२

गुरूच्या असवर्ण स्त्रियांना गुरुप्रमाणेंच मान द्यावा. परंतु, गुरूच्या सवर्ण स्त्रियांना फक्त प्रत्युत्थान व अभिवादन हांनींच मान द्यावा.

अभ्यञ्जनं स्थापनं च गात्रोत्सादनमेव च ।

**गुरुपत्न्या न कार्याणि केशानां च प्रसाधनम् ॥२११॥**

गुरुपत्नीच्या अंगाला तेल लावणें, तिला स्नान घालणें, तिचें अंग चोळणें आणि तिची वेणीफणी करणें ह्या गोष्टी वर्ज्य कराव्या. ( सारांश, शरीरस्पर्शानें साध्य होणारी अशी कसलीही शुश्रूषा गुरुपत्नीची शिष्यानें करूं नये.)

**गुरुपत्नी तु युवतिर्नाभिवाद्येह पादयोः ।**
**पूर्णविंशतिवर्षेण गुणदोषौ विजानता ॥ २१२ ॥**

गुरुपत्नी जर तरुणी ह्मणजे विटाळ न गेलेली असली अर्थात् वृद्ध नसली तर बाल्यावस्था संपलेल्या आणि कामजन्य सुखदुःख समजूं लागलेल्या ब्रह्मचाऱ्यानें तिच्या पायांना स्पर्श करून अभिवंदन करूं नये. कारण,

**स्वभाव एष नारीणां नराणामिह दूषणम् ।**
**अतोऽर्थान्न प्रमाद्यन्ति प्रमदासु विपश्चितः ॥ २१३ ॥**

पुरुषांच्या ठिकाणीं कामवासनोत्पत्तिरूप दोष उत्पन्न करणें हा स्त्रियांचा स्वभाव आहे. ह्याकरितां, विवेकी लोक स्त्रियांसंबंधानें कधींही बेसावध राहत नाहींत.

ह्या वचनावरील मेधातिर्थीच्या व्याख्यानांतील मजकूर येणेंप्रमाणें:

**न प्रमाद्यन्ति दूरत एव स्त्रियः परिहरन्ति । प्रमादः स्पर्शादिकरणं वस्तुस्वभावोऽयं यस्तरुणी स्पृष्टा कामकृतं चित्तसंक्षोभं जनयति । तत्र चित्तसंक्षोभोऽपि प्रतिषिद्धः । तिष्ठतु तावदपरो ग्राम्यधर्मसंरम्भः ।**

ह्याचें तात्पर्य येणेंप्रमाणें:—विवेकी लोक स्त्रियांपासून फारच दूर राहत असतात. प्रमाद ह्मणजे स्त्रीला स्पर्श वगैरे करणें अथवा तिचा स्पर्श वगैरे होऊं देणें. तरुणीचा स्पर्श झाला असतां पुरुषाचें अंतःकरण कामवासनेमुळें क्षुब्ध होत असते. हा वस्तुस्वभाव आहे. ( स्त्रियांच्याकडे कांहीं दोष आहे अशांतला प्रकार नाहीं.

घृत सन्निध आल्यास तें पातळ करणें हा ज्याप्रमाणें अग्नीचा स्वभाव होय त्याचप्रमाणें पुरुष जवळ असल्यास त्याला धैर्यापासून च्युत करणें हा तरुणी स्त्रियांचा स्वाभाविक धर्म होय. ह्यामुळें मानसिक व शारीरिक व्यापार जिच्या ठिकाणीं मुळींच नाहींत अशी गाढ झोंपेंत असलेली ही तरुणी स्त्री पुरुषाला धैर्यापासून च्युत करीत असते).

अविद्वांसमलं लोके विद्वांसमपि वा पुनः ।
प्रमदा ह्युत्पथं नेतुं कामक्रोधवशानुगम् ॥ २१४ ॥२॥

कामक्रोधांच्या तावडींत सांपडणारा पुरुष अविद्वान् असो अथवा विद्वान् असो; त्याला उन्मार्गाला नेण्यास स्त्रिया समर्थ आहेतच. ह्या वचनावरील मेधातिथींचें व्याख्यान येणेंप्रमाणें:—

न चैतन्मन्तव्यं नियमितानि येन चिरमिन्द्रियाणि अतिगुरुपातकं गुरुदारेषु दुष्टेन भावेन प्रेक्षणमपीति य एवं वेद तस्य न दोषः पादस्पर्शादाविति । यत एवंविधानपि दोषान्यो जानीते यो वा न किंचिज्जानीते तौ स्त्रीविषये समानौ यतो नात्र विद्वत्ता प्रभवति । शक्नुवन्ति स्त्रियः सर्वमुत्पथममार्गं लोकशास्त्रविरुद्धं विषयं नेतुं प्रापयितुं कामक्रोधवशानुगं सन्तम् । कामक्रोधाभ्यां यः संबध्यत इत्यर्थः । अवस्थाविशेषोपलक्षणार्थं चैतत् । अत्यन्तबालमत्यन्तवृद्धं च प्राप्तयोगप्रकर्षणं च वर्जयित्वा येन निरन्वयमुज्झिताः संसारपुरुषधर्मास्तद्व्यतिरेकेण न कश्चित्पुरुषोऽस्ति यः स्त्रीभिर्नाकृष्यते अयस्कान्तेनेव लोहः । न चात्र स्त्रीणां प्रभविष्णुता । वस्तुस्वाभाव्यात्तरुणी जनदर्शने पुंसामुन्मथ्यते चित्तं विशेषतो ब्रह्मचारिणामिति ।

ह्याचें तात्पर्य येणें प्रमाणें:—ज्यानें पुष्कळ वर्षेंपर्यंत एकसारखें इंद्रियाचें संयमन केलेलें असेल व गुरुपत्नीकडे दुष्ट भावनेनें पाहणें सुद्धां अतिमहापातक होय असें जो समजत असेल त्यानें वृद्ध नस-

लेल्या गुरुपत्नीच्या पायांना स्पर्श केल्यास त्याला दोष लागणार नाहीं असें समजूं नये. कारण, अशा प्रकारचे दोष जो जाणीत असतो व जो जाणीत नाहीं त्या दोघांचीही स्थिति स्त्रीविषयीं सारखीच. कारण, स्त्रीविषयीं विद्वत्ता असणें किंवा नसणें ही कांहीं मोठीशी महत्वाची गोष्ट नाहीं. पुरुष विद्वान् असो किंवा अविद्वान् असो कामाच्या व क्रोधाच्या तावडींत सांपडणाऱ्या कोणत्याही पुरुषाला कुमार्गाप्रत म्हणजे शास्त्रदृष्ट्या व लोकदृष्ट्या निंद्य असलेल्या विषयाप्रत नेण्यास स्त्रिया समर्थ असतात. 'काम व क्रोध ह्यांच्याशीं ज्याचा संबंध असतो तो' हा 'कामक्रोधवशानुगं' ह्या पदाचा अर्थ होय. 'कामक्रोधवशानुगं' हें पद वयाच्या विशेष अवस्थेचें उपलक्षण आहे. ज्याच्या ठिकाणीं कामवासना उत्पन्न झाली नाहीं असा जो अत्यंत बाल आणि त्याचप्रमाणें कामवासना ज्याच्या ठिकाणीं राहिलेली नाहीं असा जो अत्यंत वृद्ध व त्याचप्रमाणें उत्कृष्ट योगाभ्यास साधून झालेला व त्या स्थितींत असलेला पुरुष हे मात्र स्त्रियांच्या दर्शनामुळें उन्मार्गाला जाणारे नाहींत. सारांश, संसारी पुरुषाच्या धर्मांचा ज्यानें समूळ त्याग केलेला आहे अशा पुरुषा शिवाय स्त्रियांच्या योगानें मोहित न होणारा असा कोणीही दुसरा पुरुष जगतामध्यें नाहीं. लोहाला आकर्षण करून घेणें हा ज्याप्रमाणें लोहचुंबकाचा स्वभाव होय त्याचप्रमाणें पुरुषाला धैर्यापासून च्युत करणें हा स्त्रियांचा स्वभाव होय. पुरुषानें क्षुब्ध होणें ह्याविषयीं स्त्रियांच्याकडे समजून उमजून कांहीं कर्तव्य नसतें; स्त्रीमूर्तिरूप जी वस्तु तिचे ठिकाणीं असलेल्या स्वाभाविक धर्मामुळेंच पुरुष मोहित होत असतात. सारांश, वस्तुस्वभावच असा असल्यामुळें यौवनसंपन्न स्त्री दृष्टीं पडतांक्षणीं पुरुषाचें आणि विशेषतः ब्रह्मचाऱ्याचें चित्त क्षुब्ध होत असतें. हें मेधातिथीचें म्हणणें सर्व विद्यार्थ्यांनीं लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

रोगार्तिरङ्गना तृष्णा गम्भीरमपि मानवम् ।

उत्तानतां नयन्त्याशु सूर्यांशव इवाम्बुजम् ॥

असें वचन योगवासिष्ठामध्यें आहे. मनुष्य गंभीर जरी असला तरी सूर्यकिरणें ज्याप्रमाणें कमळ उताणें करून टाकितात त्याप्रमाणें रागद्वेष, तृष्णा आणि अंगना ह्या त्याला तेव्हांच उताणा पाडितात. ह्या स्तव,

मात्रा स्वस्रा दुहित्रा वा न विविक्तासनो भवेत् ।
बलवानिन्द्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ॥ २१५ ॥ २॥

निर्जन प्रदेशामध्यें माता, भगिनी अथवा कन्या असतां तेथें पुरुषानें बसूं नये. कारण, प्रबळ इंद्रियसमुदाय विद्वानालाही खेंचतो, मग इतरांची कथा काय? असें ह्या श्लोकाचें तात्पर्य आहे. 'विद्वांसं' ह्या पदाचा अर्थ मेधातिथींनीं 'शास्त्रनिगृहीतात्मानमपि' असा केलेला आहे. 'शास्त्रपरिचयामुळें मनोनिग्रह केलेल्याला' हें त्यांच्या व्याख्यानाचें तात्पर्य होय. ह्या वचनावरील व्याख्यानांत मेधातिथि ह्मणतोः--

**निर्जने शून्ये गृहादौ नासीत नापि निःशङ्कमङ्गस्पर्शादि कुर्यात् । अतिचपलो हीन्द्रियसङ्घातो विद्वांसमपि शास्त्रनिगृहीतात्मानमपि कर्षति हरति परतन्त्रीकरोति ।**

राघवानंद ह्मणतोः—

**अहो बलवानिन्द्रियग्रामो यतो मातृदुहित्रोस्त्रिंशद्वत्सरान्तरेऽपि पुत्रादेर्मैथुनादिसंभावना तत्र अन्यासु का कथेति ।**

ह्याचें तात्पर्यः—बबबबब!!! शर्थ आहे ह्या इंद्रियांची! अहो माता व पुत्र ह्यांच्यामध्यें किंवा बाप व कन्या ह्यांच्यामध्यें तीस वर्षांचें अंतर असतांनाही जर परस्पर समागम संभवनीय आहे तर इतर स्त्रियांसंबंधानें गोष्ट पाहिजे कशाला?

नंदनपंडित ह्मणतोः—

**जितेन्द्रियस्य मे मात्रादिभिर्विविक्तासनं किं दूषणं करिष्यतीति न मन्तव्यं येन बलवानिन्द्रियग्रामो विद्वांसमपि कर्षतीति**

ऍ: मी जितेंद्रिय आहें. माता वगैरेबरोबर जरी मी एकांतांत असलों तरी त्यापासून मला काय अपाय होणार आहे? असा अभिमान बाळगण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण, जबरदस्त इंद्रियें विद्वानालाही आपल्या मुठींत आणितात.

“ मातापितर, आचार्य व अग्नि ह्यांची शुश्रूषा ब्रह्मचाऱ्यानें करणें हें त्याचें मुख्य कर्तव्य होय” इत्यादि प्रकारचा अर्थ दर्शविणारीं वचनें पुष्कळ आहेत. परंतु, विस्तरभयास्तव तीं येथें दिलीं नाहींत.

# ग्रहयज्ञांतील मंत्रांचा अर्थ.

**आकृष्णेन० पश्यन्॥** कृष्णवर्णे अंतरिक्षमार्गानें वारंवार येणारा आणि अमृत व मर्त्य ह्यांची स्थापना करणारा सविता देव भुवनें प्रकाशित करीत करीत सुवर्णनिर्मित रथानें आमच्याजवळ येत आहे.

**आप्यायस्व० संगथे॥** हे सोमा, तूं वृद्धिगत हो; सर्व बाजूंनीं तुला वीर्य प्राप्त होवो आणि तूं आम्हांला अन्न प्राप्त करून देण्याविषयींही दक्ष रहा.

**शुक्रः शुशु० न ज्योतिः॥** हा शुभ्रवर्ण अग्नि सूर्याप्रमाणें सर्वप्रकाशक असून सूर्याच्या तेजाप्रमाणें स्वकीय तेजानें अंडकपालें भरून काढणारा आहे.

**केतुं कृण्वन्० रजायथाः॥** मानवहो, अज्ञानी प्राण्याला ज्ञान देणारा व रूपरहित पदार्थांचें रूप व्यक्त करणारा हा सूर्यरूप इंद्र किरणांसह प्रत्यहीं उत्पन्न होत असतो.

**इन्द्रं वो विश्व० केवलः॥** सर्व जनांपेक्षां श्रेष्ठ असलेल्या इंद्राला आम्ही तुमच्याकरितां बोलावीत आहों. ह्यास्तव, तो केवल आमचाच असो.

**मोचुणः परा० सह** ॥ अति बलाढ्य व वध पावण्यास दुर्घट असलेल्या निर्ऋतीच्या हातून आमचा वध न होवो. आमच्या वासने-सह त्याचा नाश होवो.

**उषो वाजं० वन्हयः** ॥ हे उषे, मनुष्य यजमानापाशीं जें हवीरूप चित्र अन्न आहे तें तूं स्वीकार आणि त्यामुळें जें यज्ञनिर्वाहक यज-मान तुझी स्तुति करीत आहेत त्या यजमानांचे यज्ञ तूं उपद्रवर-हित शेवटास ने.

**अग्निं दूतं० सुक्रतुम्** ॥ बोलावणारा, सर्वधनसंपन्न, ह्या यज्ञाचा निष्पादक असल्यामुळें सत्कर्मशील आणि दूत जो अग्नि त्याला आम्हीं वरितों.

**अप्सुमे ० भेषजीः** ॥ सर्व औषधें व सर्व जगताला सुख देणारा अग्नि उदकांत असल्याचें व उदक सर्वौषधरूप असल्याचें मला सोमानें सांगितलें आहे.

**स्योना पृ० सप्रथः** ॥ हे पृथिवि, तूं विस्तीर्ण, कंटकरहित आणि निवेशस्थानभूत हो व आम्हांला सर्व बाजूंनीं विस्तृत असा आश्रय दे.

**इदं विष्णु० पांसुरे** ॥ विष्णूनें जेव्हां ह्या जगतावर संचार केला तेव्हां तीन प्रकारांनीं त्यानें पाऊल टाकिलें. त्याच्या धूलियुक्त पाद-स्थानांत हें सर्व जगत् मावलेलें आहे.

**जातवेदसे ० त्यग्निः** ॥ जातवेद अग्नीकरितां आम्ही सोमरस काढू. वैर धरणाऱ्या शत्रूचें धन तो दग्ध करो; आणि नावेच्या योगानें ज्याप्रमाणें नदींतून पार पडतां येतें त्याप्रमाणें सर्व असह्य दुःखांपा-सून व दुःखमूलक पातकांपासून तो अग्नि आम्हांला पार पाडो.

**एषो उषा०बृहत्** ॥ ही अपूर्व व प्रिय उषा स्वर्गापासून प्रकाशत आहे. हे अश्विनीकुमारांनो, मी तुमची पुष्कळ स्तुति करितों.

**इन्द्रं विश्वा० पतिम्** ॥ समुद्राप्रमाणें व्यापक, अतिरथी, अन्नांचा

अधिपति व सज्जनांचा रक्षक असलेल्या इंद्राला आमच्या सर्व स्तुतींनीं वृद्धिंगत केलें आहे.

**सोमो धेनुं ० शदस्मै** ॥ जो ह्या सोमाला हवि अर्पण करील त्याला हा सोम धेनु, शीघ्रगामी अश्व आणि लौकिक कर्मामध्यें निष्णात, घरंदाज, यागाच्या अनुष्ठानाविषयीं तत्पर, सभ्य आणि पूर्वजांची कीर्ति वृद्धिंगत करणारा पुत्र देतो.

**तमीशानं ० स्वस्तये** ॥ ऐश्वर्यसंपन्न, चराचरांचा अधिपति व कर्मांनीं प्रसन्न होणाऱ्या त्या इंद्राला आह्मी रक्षणाकरितां आव्हान करीत आहों. आमच्या धनांची अभिवृद्धि होऊन आमचें कल्याण होईल अशा रीतीनें परोपद्रवरहित पूषा आमचें रक्षण करणारा होवो.

**बृहस्पते अति ० चित्रम्** ॥ हे सत्यामुळें उत्पन्न झालेल्या बृहस्पते, श्रेष्ठ ब्राह्मण ज्या ब्रह्मवर्चसरूप तेजाला मान देत असतो आणि जें ज्ञानयुक्त ब्रह्मवर्चस ब्राह्मणांचे ठिकाणीं विशेषतः झळकत असत व जें तेज आपल्या आश्रयभूत पुरुषाला देदीप्यमान करीत असतें तें संपादन करण्यास योग्य असलेलें ब्रह्मवर्चसरूप धन तूं आमच्या ठिकाणीं ठेव.

**गौरीर्मिमाय० व्योमन्** ॥ ही शब्दब्रह्मरूप वाणी–घटादि द्रव्यांना तत्तद्वस्तुवाचक ह्या नात्यानें निष्पन्न करीत आहे; ( ह्मणजे घटादि द्रव्यें शब्दब्रह्मरूप वाणीनें निर्दिष्ट होत असल्यामुळें तीच त्यांना उत्पन्न करणारी आहे. ) ही प्रणवस्वरूपामुळें एकरूप आहे. सुप् व तिङ् ह्या भेदानें ती दोन पादांनीं युक्त आहे. ( सुप् ह्मणजे प्रथमादि सात विभक्ति ज्याला लागतात तें नाम, विशेषण वगैरे आणि तिङ् ह्मणजे क्रियापद. ) नाम, आख्यात, उपसर्ग व निपात ह्या भेदानें ती चतुष्पदी आहे. संबोधनासह आठ विभक्तींमुळें ती अष्टापदी आहे. नाभीसह ऊर, कंठ इत्यादि नऊ स्थानांच्या ठिकाणीं

प्रधान असलेली ती वाणी नंतर नानाप्रकारांनीं अभिव्यक्त होऊं लागली असतां उत्कृष्ट जें हृदयाकाश अथवा मूलाधारचक्र त्याच्या ठिकाणीं हजारों ध्वनिरूप प्रकारांनीं ती संपन्न होत असते.

**यदक्रन्दः ० अर्वन् ॥** हे अश्वा, ज्याअर्थी तूं अंतरिक्षापासून अथवा सर्व मनोरथ पूर्ण करणाऱ्या उदकापासून प्रथम उत्पन्न होत असतोस, ज्याअर्थी श्येनाच्या पंखाप्रमाणें तुझे पंख तुझ्या शीघ्र गतीला साधनभूत आहेत आणि तुझे बाहु ज्याअर्थी हरिणाच्या बाहूं-प्रमाणें वेगसंपन्न आहेत आणि ज्याअर्थी तूं यजमानावर अनुग्रह करण्याकरितां मोठा शब्द केलेला आहेस त्याअर्थी तुझा जन्म सर्वांच्या प्रशंसेसच पात्र आहे.

**विष्णोर्नुकं ० रुगाय ॥** ज्या विष्णूनें पृथ्वीप्रभृति तीन लोक उत्पन्न केले, ज्या विष्णूनें त्रैलोक्याला आधारभूत असलेलें अति विस्तीर्ण अंतरिक्ष निर्माण केलें, जो स्वतः उत्पन्न केलेल्या त्रैलोक्या-मध्यें तीन प्रकारांनीं संचार करूं लागला आणि ह्मणूनच मोठे मोठे ज्याची प्रशंसा करूं लागले त्या विष्णूचे पराक्रम मी वर्णिले आहेत.

**इन्द्र श्रेष्ठानि० मन्हाम् ॥** हे इंद्रा, श्रेष्ठ धनें तूं आह्मांला दे. कर्मानुष्ठानाच्या दक्षतेसंबंधानें तूं आमची ख्याति कर. तूं आह्मांला उत्कृष्ट भाग्य दे. तूं दिलेलीं धनें वृद्धिंगत होण्याविषयींही तूं व्यवस्था कर. आमचे पुत्र सुरक्षित ठेव. आमच्या वाणीचे ठिकाणीं तूं माधुर्य दे आणि चांगले दिवस तूं आमच्या दृष्टीं पाड.

**गणानां त्वा० सादनम् ॥** हे ब्रह्मणस्पते, देवादिगणांचा संबंधी, स्वकीयांचा अधिपति, त्रिकालज्ञान्यांमध्येंही श्रेष्ठ, अतिशय उपमेस पात्र अशा कीर्तीनें संपन्न, श्रेष्ठ लोकांमध्येंही झळकणारा आणि मंत्रांचा स्वामी असलेल्या तुला आह्मी ह्या कर्मामध्यें आव्हान करीत आहों. ह्यास्तव, आमच्या स्तुति ऐकून तूं आमच्या रक्षणाकरितां यज्ञशालेमध्यें येऊन बैस.

**कया न० वृता** ॥ सर्वदा वृद्धिंगत होणारा, पूज्य आणि मित्र असलेला इंद्र बुद्धिपूर्वक केल्या जाणाऱ्या ह्या अनुष्ठानामुळें आणि ह्या संतर्पणामुळें आह्मांला संमुख होवो.

**क्षेत्रस्य पतिना० तीदृशे** ॥ सर्व प्राण्यांचें हित करणाऱ्या क्षेत्रपतीच्या साहाय्यानें आह्मी क्षेत्र प्राप्त करून घेऊं. तो क्षेत्रपति आह्मांला पोषण करणारें असें गवाश्वादि पशुरूप धन देवो. अशा प्रकारचें धन त्याच्याकडून मिळत असल्यामुळें तो आह्मांला सुख देत आहे.

**तदस्तु मित्रावरुणा० सादनाय** ॥ हे मित्रावरुण हो, हें सूक्त स्तुतिरूप होवो. हे अग्ने, सुखप्राप्ति व दुःखनिरसन हें फळ ह्या शंसनामुळें आह्मांला प्राप्त होवो. (शंसन ह्मणजे स्तवन) आह्मांला सुस्थिति व तिची अविच्छिन्नता प्राप्त होवो. विश्वाचा आश्रय असलेल्या त्या प्रकाशमान प्रचंड सूर्याला आह्मी नमस्कार करितों.

**त्र्यम्बकं० मृतात्** ॥ सुगंधि व पुष्टिवर्धक अशा तुज त्र्यंबकाचें आह्मी यजन करीत आहों. ज्याप्रमाणें खर्बुज पक्व झालें असतां देंठापासून सुटतें त्याप्रमाणें मृत्यूपासून तूं आह्मांला मुक्त कर; मोक्षापासून तूं आह्मांला मुक्त करूं नकोस.

**आदित्प्र० दिवा** ॥ स्वर्गलोकामध्यें जेव्हां हा इंद्र सूर्यरूपानें प्रकाशत असतो तेव्हां निवासाचें कारण असलेलें व झळकणारें अक्षय्य तेज सर्व लोक अवलोकन करीत असतात.

**वास्तोष्पते० चतुष्पदे** ॥ हे वास्तुपालका देवा, आह्मांकडे लक्ष्य दे. तूं आह्मांला आरोग्यदायक हो आणि तुझ्या कृपेनें येथें आमचें वास्तव्य सुखावह होवो. ज्याची आह्मी याचना करीत आहों तें तूं आम्हांला दे आणि तूं आमच्या मनुष्यांना व पशूंना सुखकर हो.

**अग्निर्मूर्धा० जिन्वति** ॥ देवांमध्यें श्रेष्ठ, स्वर्गलोकाचा उन्नत प्रदेश आणि पृथ्वीचा अधिपति असलेला हा अग्नि स्थावरजंगमात्मक भूतांना तृप्त करो.

**शमग्नि० धः ॥** आपल्या गार्हपत्यादि विभूतींमुळें अग्नि आह्मांला आरोग्य अथवा सुख देवो. सर्वप्रेरक आदित्य, आह्मांला सुख होईल अशारीतीनें, प्रकाशत जावो. वायु आह्मांला उपद्रव न होईल अशारीतीनें वाहो आणि हे देव आमच्या शत्रूचें निरसन करोत.

**तव वाय० वृणीमहे ॥** हे यज्ञाधिपते वायो, हे विचित्र कर्म करणाऱ्या, हे ब्रह्मदेवाच्या जावया, रक्षणाविषयीं आह्मी तुझ्यावर अवलंबून आहों.

**यमाय० अरंकृतः ॥** हे ऋत्विजांनों, यमाकरितां तुह्मी सोम कुटून रस तयार करा आणि यमाकरितां हवीचें हवन करा. हा सोम अग्नीचा दूत आहे. अलंकाररूप अनेक द्रव्यांनीं संपन्न असलेला हा यज्ञ यमालाच पोंचत असतो.

**उद्बुध्यध्वं० येवः ॥** एकचित्तानें वागणाऱ्या व एकाच ठिकाणीं राहणाऱ्या सर्व ऋत्विजांनों, नीट जागे व्हा. अग्नि नीट प्रज्वलित करा. दधिक्रा, अग्नि व उषा ह्या तुह्मां देवतांना इंद्रासह मी रक्षणार्थ आव्हान करीत आहें.

**इन्द्राणी० उत्तरः ॥** सौभाग्यसंपन्न ह्मणून प्रसिद्ध असलेल्या ह्या स्त्रियांमध्यें इंद्राणीच खरीखरी सौभाग्यवती असें मीं ऐकिलें आहे. कारण, जगतामध्यें श्रेष्ठ असलेला तिचा पति इंद्र इतर प्राण्यांप्रमाणें वार्द्धक्य येऊन मरत नाहीं.

**प्रजापते० रयीणाम् ॥** हे प्रजापते, तूंच ह्या सर्व भूतांचें आकलन करून हीं उत्पन्न करण्यास समर्थ आहेस; तुझ्याशिवाय दुसरा कोणी समर्थ नाहीं. ज्या उद्देशानें आम्ही तुला हवि अर्पण करीत आहों तो आमचा उद्देश सिद्धीस जावो आणि आम्हांला धनाधिपत्य प्राप्त होवो.

**आ यं गौ०स्वः ॥** तेजानें संपन्न झालेला हा गमनशील सूर्य उदयाचलाप्रत प्राप्त झाला आहे आणि हा प्रकाशद्वारा पृथ्वीप्रत प्राप्त होत असून स्वर्गलोकाकडे जात आहे.

**ब्रह्मज० विवः ॥** सृष्टीच्या आरंभीं जगदाकारानें उत्पन्न होणारें हें ब्रह्मच आदित्य झालें आहे आणि मर्यादारूप चार दिशा त्यानें व्याप्त केल्या आहेत. त्याच आदित्यानें आपल्या आधारावर असलेलीं जगतें तोलून धरिलीं आहेत आणि त्यानेंच स्थूल व सूक्ष्म प्राण्यांचें उत्पत्तिस्थान असलेलें ब्रह्मांड उत्पन्न केलें आहे.

**तत्त्वायामि० प्रमोषीः ॥** हे वरुणा, प्रौढ स्तोत्रांनीं स्तुति करणारा मी तें आयुष्य मागत आहें. हविच्या योगानें यजमान त्याची इच्छा करीत असतो. येथें आह्मांला काय हवें आहे हें तूं मनांत आण आणि अनेकांच्या स्तुतीस पात्र असणाऱ्या हे वरुणा, तूं आमचें आयुष्य कमी करूं नको.

## पुण्याहवाचनमंत्रांचा अर्थ.

**मही द्यौः ० भरीमभिः ॥** प्रचंड स्वर्ग व पृथ्वी हीं आमच्या ह्या यज्ञाला सिंचन करण्याची इच्छा करोत आणि पोषणसाधनांनीं आह्मांला भरून काढोत.

**भद्रं कर्णे० यदायुः ॥** हे यागपात्र देवहो, कानांनीं आह्मीं चांगलें ऐकावें; नेत्रांनीं आह्मीं चांगलें पहावें; दृढ अवयवांनीं व शरीरांनीं संपन्न होऊन आह्मी तुमची स्तुति करीत रहावें आणि ब्रह्मदेवानें ठरविलेलें पूर्ण आयुष्य आह्मांला प्राप्त व्हावें.

**द्रविणोदा० दीर्घमायुः ॥** जंगम व स्थावर धन, वीर्ययुक्त अन्न आणि दीर्घ आयुष्य द्रविणोदा अग्नि आह्मांला देवो.

**स्वस्ति न इन्द्रो० धातु ॥** महाकीर्तिमान् इंद्र, सर्वज्ञ पूषा, अकुंठित आयुधानें संपन्न असलेला गरुड आणि देवपालक बृहस्पति हे आमचें कल्याण करोत.

**हिरण्यरूपः०त्यन्नमस्मै ॥** तो अपान्नपात्संज्ञक अग्नि सुवर्णमय शरीरानें व सुवर्णमय इंद्रियांनीं युक्त असून सुवर्णसदृश कांतीनेंही

संपन्न आहे हा हिरण्मय स्थानावर बसून झळकत आहे आणि हा हिरण्य देणारा अग्नि ह्या यजमानाला अन्न देत आहे.

**उद्गातेव० मावद** ॥ हे कपिंजलपक्ष्या, उद्गाता ज्याप्रमाणें सामगायन करीत असतो त्याप्रमाणें तूं गायनाचा सूर काढीत असतोस आणि ब्रह्मणाच्छंसी ऋत्विज ज्याप्रमाणें प्रातःसवन, मध्यान्हसवन व तृतीयसवन ह्या तीन सवनांमध्यें शस्त्रें ह्मणत असतो त्याप्रमाणें तूं वेदध्वनि करीत आहेस. ह्यास्तव, वळू घोडा घोड्याजवळ जाऊन जसा शब्द करीत असतो तसा, हे पक्ष्या, तूंही कल्याणकारक शब्द कर. हे पक्ष्या, तूं सर्वस्वीं आमचें कल्याण होईल अशा रीतीनें शब्द कर.

**शुक्रेभिः० रत्नूनाः** ॥ निर्मळ तेजांनीं अंतरिक्ष व्यापणारा, कर्मकर्त्या यजमान्याला प्रशंसनीय व शोधक तेजांनीं शुद्ध करणारा आणि दीप्तिरूप वस्त्र परिधान करणारा अग्नि कर्मनिष्ठ पुरुषांना दीर्घायु करीत असतो व त्यांना संपूर्ण संपत्ति देत असतो.

**इळामग्ने० त्वस्मे** ॥ हे अग्ने, ज्या ठिकाणीं पुष्कळ उद्योग होणें शक्य आहे, जेथें गाई चांगल्या निपजण्याचा संभव आहे अशी भूमि तूं मला कायमची संपादन करून दे. आह्मांला संतान वृद्धिंगत करणारा प्रजोत्पादनसमर्थ पुत्र प्राप्त होवो आणि, हे अग्ने, तुझा आह्मांवर अनुग्रह होवो.

**युवा सुवासाः० देवयन्तः** ॥ दृढ अवयव आणि उत्कृष्ट वस्त्र ह्यांनीं युक्त असलेला व दोरीनें परिवेष्टिलेला हा यूप येत आहे. हा यूप तयार होऊं लागला असतां सर्व वृक्षांमध्यें श्रेष्ठ होतो आणि एकाग्र चित्तानें अनुष्ठान करणारे व देवांची इच्छा करणारे अध्वर्युप्रभृति ज्ञानी व दूरदर्शी ऋत्विज त्याला उभा करीत असतात.

**यस्त्वा हृदा० मह्याम्** ॥ हे जातवेदा, गुणप्रशंसाशील अंतःकरणान तुला अविनाशी समजणारा जो मी मर्त्य तुला आव्हान

करीत आहे त्या माझ्या ठिकाणीं तूं पुत्रपौत्रादि प्रजांमुळें प्राप्त होणारी कीर्ति स्थापन कर. हे अग्ने, तुझ्या प्रसादामुळें मला संतानाविच्छेदरूप अमृतत्व ( ह्मणजे अमरत्व ) प्राप्त होवो.

**यस्मै त्वं० नशते** ॥ हे जातवेदा, ज्या पुण्यकर्म करणाऱ्या यजमानावर तूं कृपादृष्टीनें अनुग्रह करीत असतोस त्या यजमानाला अश्व, पुत्र, वीर व गाई ह्यांनीं युक्त अशी संपत्ति प्राप्त होत असते.

**स हि रत्नानि०मीमहे** ॥ भजनास योग्य असलेला तो सविता देव हवि अर्पण करणाऱ्याला रत्नें देत असतो. ह्यास्तव, त्या भजनीय देवापाशीं आह्मी धनाची याचना करीत आहों.

**स्वस्तये वायु० भवन्तु नः** ॥ वायूचें, भुवनाचा जो अधिपति आहे त्या सोमाचें आणि सर्व देवगणांनीं युक्त असलेल्या बृहस्पतीचें आह्मी कल्याणाकरितां स्तवन करीत आहों. आदित्यापासून आमचें कल्याण होवो.

**वास्तोष्पते प्रत० जुषस्व** ॥ हे वास्तुपालका देवा, तूं आमचा अभ्युदय व आमचें धन वृद्धिंगत करणारा हो. हे सोमाप्रमाणें आल्हाद देणाऱ्या, तुझ्याशीं सख्य असल्यामुळें आह्मीं गाई, अश्व इत्यादि पशूंसहित अविनाशी व्हावें. पुत्रांचा सांभाळ करणाऱ्या पित्याप्रमाणें तूं आमचा सांभाळ कर.

**वास्तोष्पते० सदा नः** ॥ हे वास्तुपालका देवा, सुखावह, रमणीय व धनसंपन्न असें जें तूं देणार असलेलें स्थान तें आह्मांला प्राप्त होवो. योगक्षेमासंबंधानें तूं आमची काळजी घेत जा आणि सर्वदा कल्याणकारक उपायांनीं तूं आमचें रक्षण करीत जा.

**अमीवहा० एधि नः** ॥ हे गृहपालका, हवें तें रूप धारण करणारा व रोगांचा नाश करणारा तूं आमचा सुखकर मित्र हो.

**समुद्रज्येष्ठाः० मवन्तु** ॥ ज्यांमध्यें समुद्र श्रेष्ठ होय, ज्या सर्वदा गमन करणाऱ्या असून शुद्धि करण्याकरितां अंतरिक्षांतून जात

असतात आणि मनोरथ परिपूर्ण करणारा इंद्र ज्यांना मुक्त करीत असतो त्या उदकदेवता येथें स्थित असलेल्या माझें रक्षण करो.

**या आपो० मवन्तु** ॥ ज्या अंतरिक्षामध्यें असतात, ज्या नदी-प्रभृतींच्या रूपानें गमन करीत असतात, ज्या खणण्यामुळें उत्पन्न झालेल्या असतात आणि ज्यांचा प्रादुर्भाव आपोआपच होत असतो अशा ज्या समुद्राला जाऊन मिळणाऱ्या उदकदेवता त्या माझें रक्षण करोत.

**यासां राजा० मामवन्तु** ॥ ज्यांचा अधिपति वरुण लोकांचें खरें खोटें पहात पहात अंतरिक्षलोकांतून संचार करीत असतो आणि ज्यांच्यापासून मधुररसाचा स्राव होत असतो अशा ज्या स्वतः शुचि व दुसऱ्याला शुद्ध करणाऱ्या उदकदेवता त्या, ह्याठि-काणीं माझें रक्षण करोत.

**यासु राजा०मवन्तु** ॥ ज्यांचे ठिकाणीं वरुण राजा व सोम हे राहत असतात, ज्यांच्यामध्यें राहून सर्व देव अन्नरस सेवन कर-णारे असतात आणि वैश्वानर अग्नि ज्यांच्या ठिकाणीं प्रविष्ट झालेला आहे त्या उदकदेवता येथें माझें रक्षण करोत.

**उपास्मै० यक्षते** ॥ हे यज्ञनायकांनो, देवांना उद्देशून यागाची इच्छा करणाऱ्या व रसरूप होऊं लागलेल्या ह्या सोमाकरितां तुम्ही उपगान करा.

**अभि ते० देवयुक्** ॥ हे सोमा, क्रीडनशील रुद्रांकरितां अथर्व-ऋषींनीं तुझ्या देवेच्छु रसाचा मधानें व गाईच्या दुधानें संस्कार केला.

**सनः० धीभ्यः** ॥ हे देदीप्यमान सोमा, आमच्या गाई, आमचीं माणसें, आमचे अश्व आणि आमच्या ओषधि ह्यांना हितावह होईल अशा रीतीनें तूं द्रवरूप हो.

**बभ्रवे० मर्चत** ॥ हे स्तवन करणाऱ्यांनो बभ्रुवर्ण, अथवा कधीं

कर्धी अरुणवर्ण असणाऱ्या, बलाढ्य व स्वर्गनिवासी सोमाकरितां तुह्मी स्तुतिरूप वाणीचा उच्चार करा.

**हस्तच्युत॰ मधु** ॥ हे ऋत्विजांनो, हातापासून सुटलेल्या पाषाणांनीं निघालेला हा सोमरस तुह्मी दशापवित्रानें गाळा आणि ह्या मधुर सोमामध्यें तुह्मी गाईचें दूध घाला.

**आकलशेषु वर्धते** ॥ हा सोम कलशाकडे धाव घेत आहे आणि त्याकरितांच दशापवित्रावर तो ओतिला जात आहे. यज्ञामध्यें स्तोत्रांच्या योगानें त्याचें माहात्म्य वर्णिलें जात असतें.

**सविता प॰ दीर्घमायुः** ॥ पश्चिमेस, पूर्वेस, उत्तरेस व दक्षिणेस असलेला सविता आमचे सर्व मनोरथ परिपूर्ण करो आणि तो सविताच आह्मांला दीर्घ आयुष्य देवो.

**श्रियै जात॰ मितद्रौ** ॥ सोम संपत्तीकरितां प्रकट होत असतो. (ह्मणजे सोमयागाच्या अनुष्ठानाचें फल संपत्ति हें येत असतें.) संपत्तीकरितांच सोम नांग्यांपासून बाहेर निघत असतो. तो बाहेर निघालेला सोम स्तवन करणाऱ्यांना श्री व अन्न देत असतो आणि त्या सोमानें दिलेल्या श्रीचा उपभोग घेणाऱ्या स्तोत्यांना मुक्ति प्राप्त होत असते. आणि सोमयागामुळें यजमानाला युद्धामध्यें जय येत असतो.

**ओषध॰ यामसि** ॥ 'हे राजा, आमचें सामर्थ्य जाणणारा ब्राह्मण ज्याला औषधोपचार करीत असतो त्या रोग्याला आह्मी रोगांतून पार पाडितों.' असा सोमराजासह ओषधि संवाद करीत असतात.

**इमं मे॰ सुषोमया** ॥ हे गंगे, हे यमुने, हे सरस्वति, हे शुतुद्रि, हे परुष्णि, हे असिक्नीसह मरुद्वृधे, हे वितस्तेसह व सोमेसह असणाऱ्ये आर्जीकीये, तुह्मी हें माझें स्तोत्र श्रवण करा.

**अश्वत्थे॰ पूरुषम्** ॥ हे ओषधिदेवतांनो, तुमचें बसणें अश्वत्था-

वर असून वास्तव्य पळसाचे ठिकाणीं आहे. तुह्मांला जर यज्ञपुरुषांचा आश्रय हवा असेल तर तुह्मी गाईंचा आश्रय करा.

**नवो नवो० मायुः ॥** हा चंद्रमा प्रत्यहीं नवा नवा होत असतो-हा तिथींचा ज्ञापक आहे. कृष्णपक्षामध्यें हा उषांच्या पूर्वी उदय पावत असतो; प्रत्यहीं येणारा हा चंद्रमा देवांना हविर्भाग देत असतो आणि आयुष्य पुष्कळ वृद्धिंगत करीत असतो.

**उच्चा दिवि० आयुः ॥** दक्षिणा देणारे यजमान स्वर्गामध्यें राहतात. त्यांपैकीं जे अश्व देणारे असतात, ते सूर्यांत वास्तव्य करीत असतात. जे हिरण्य देणारे असतात ते अमर होतात आणि, हे सोमा, वस्त्र देणारे आपलें आयुष्य वृद्धिंगत करीत असतात.

**ऋध्याम० मघाः ॥** हे अश्विनीकुमारांनों, आह्मी स्तोम वृद्धिंगत करूं आणि हवीरूप अन्न तुह्मांला अर्पण करूं. ह्या कर्मामध्यें येऊन आमच्या स्तोत्राचा तुह्मी स्वीकार करा. त्याचप्रमाणें गाईंच्या ठिकाणीं पक्व व मधुर असें जें क्षीराज्यादिरूप अन्न असतें तें महावीरांमध्यें घातलें जात असतांना त्याच्याहीकरितां तुह्मी या. असें ह्मणून भूतांशनामक ऋषीनें अश्विनीकुमारांचा मनोरथ पूर्ण केला.

**त्रायन्ता० असत् ॥** आमचें शरीर वगैरे पापरहित होईल अशा रीतीनें सर्व देव, मरुद्गण आणि सर्व भूतें आमचें रक्षण करोत.

**आपइ० षजम् ॥** उदकच खरोखर औषध असून रोगनाशक उदकच आहे. कोणत्याही प्राणिकोटींचें औषध उदकच आहे. तें उदकच तुला औषध देवो.

**हस्ताभ्यां० शामसि ॥** दशांगुलिरूप शाखांनीं युक्त असलेल्या प्रजापतीच्या हातांनीं उत्पन्न होणारी ही जिह्वा शब्दोच्चारणाकरितां व्याप्रुत होत असते. ह्या स्तव, त्याच आरोग्यदायक हातांनीं, हे स्तवन करणाऱ्या, आह्मी तुला स्पर्श करितों.

**गन्धद्वारा० श्रियम्** ॥ गंध हें जिचें ज्ञान होण्याचें द्वार आहे, जिच्यावर कोणाचाही हल्ला होणें शक्य नाहीं. जी अनेक प्रकारच्या धान्यादिकांनीं सर्वदाच पुष्ट असते आणि गोमयानें संपन्न असल्यामुळें जी लक्ष्मीरूप असते त्या सर्व भूतांची अधिपत्नी असलेल्या भूमीला मी आह्वान करीत आहें.

**काण्डात्का० शतेन च** ॥ हे दूर्वे, प्रत्येक मूळापासून वेगळी वेगळी वर येणारी आणि प्रत्येक पर्वाशीं मूळ धरणारी तूं आमचाही विस्तार आपल्याप्रमाणेंच शेंकडों हजारों प्रकारांनीं कर.

**पूर्णा० शतक्रतो** ॥ हे दर्वि, मूळचीच पूर्ण असलेली तूं इंद्राकडे जा आणि त्याच्या प्रसादानें तूं चांगली पूर्ण होऊन पुनरपि परत ये. हे इंद्रा, द्रव्य देऊन ज्याप्रमाणें लोक धान्य विकत घेतात त्याप्रमाणें आह्मी तुला शरनिष्क्रास देऊन तुझ्यापासून अन्न व रस विकत घेत आहों.

**आप० वर्चसे** ॥ सामर्थ्य, दीर्घ आयुष्य आणि तेज हीं प्राप्त होण्याकरितां उदक तुला आर्द्र करो.

**यत्पुण्यं० कुरुते** ॥ ह्या मंत्राचा अर्थ मुहूर्तविचार ( नक्षत्रमुहूर्त ) ह्या सदराखालीं आलेला आहे. पृष्ठ ६१

**तानि वा० कुरते** ॥ तीं हीं अनुराधापासून भरणी सुद्धां असलेलीं यमनक्षत्रें होत. ह्यारतत्र, कृत्तिकापासून विशाखापर्यंतचीं जीं देवनक्षत्रें त्यांवरच जें काय तुह्मांला करावयाचें असेल तें करावें; ह्मणजे तें पुण्य दिवशींच केल्यासारखें होतें.

**अष्टौ देवा० स्वस्ति** ॥ वसुसंज्ञक रमणीय देवही आठ आहेत आणि धनिष्ठा नक्षत्राच्या चमकणाऱ्या व जीर्ण न होणाऱ्या तारा चार आहेत. ते वसुदेव आणि त्या धनिष्ठा हीं, ह्या लोकाच्या पलीकडे

असलेला जो अविनाशी संवत्सरदेवतासंबंधी स्वर्ग लोक तो आमच्या-करितां सुरक्षित ठेवोत.

**ऋध्यास्म० सवीरा:** ।। नमस्कारानें व हवींनीं मित्रसंज्ञक देवाची आराधना करून आह्मी समृद्ध होऊं; ह्मणजे त्या मित्रामुळें आह्मांला कल्याण प्राप्त होईल. आह्मी अनुराधांना हवीच्या योगानें तृप्त करीत असल्यामुळें पुत्रादिकांसह शंभर वर्षें सुखानें राहूं.

**त्रीणि० तिष्ठति** ।। देवांची समृद्धिसाधनें तीन तीन आहेत. गायत्री, त्रिष्टुप् व जगती हे तीन छंद आहेत. प्रातःसवन, मध्यंदिन-सवन व तृतीयसवन हीं तीन सवनें आहेत आणि हे लोकही तीनच आहेत. ह्यास्तव, पांढऱ्या तीन प्रश्यांच्या साळपिसानें केशविभाग केला असतां देवांची समृद्धि, वीर्य व त्रैलोक्य ह्यांचा विभागी यजमान होतो.

**यस्मिन्ब्रह्मा० मामम्** ।। ज्या नक्षत्रावर ब्रह्मदेवानें तो स्वर्गलोक आणि हें जगत् असें हें सर्व जिंकिलें तें अभिजित्संज्ञक नक्षत्र शत्रूंची अजिंक्य संपत्ति जिंकून आह्मांला देवो.

**अहे बु० सताम्** ।। हे अवध्य व जगताच्या पूर्वी उत्पन्न झाल, त्या आवसथ्या, ( अग्ने, ) तीन वेद जाणणारे ऋषि जो मंत्रसमुदाय जाणीत आहेत त्या माझ्या मंत्रसमुदायाचें रक्षण कर. कारण-ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद हींच सन्माननिष्ठ लोकांची अक्षय्य संपत्ति होय.

## उपनयनमंत्रार्थ.

**युवं वस्त्राणि० सचेथे** ।। हे मित्रावरुणहो, आच्छादनयोग्य वस्त्रें तुह्मी धारण करीत असतां तुमच्या सृष्टि अविच्छिन्न असून विचार-णीय आहेत. तुह्मी आमच्या सर्व पापांचें निरसन करा आणि यज्ञ-फलाशीं आमची गांठ घालून द्या.

**तत्सवितु० धीमहि** ॥ सर्व भोग्य वस्तु देणारें, अत्यंत प्रशंसनीय आणि उपभोगास योग्य अशा त्या प्रेरक देवाच्या धनाची आह्मी इच्छा करीत आहों. शत्रूंची हिंसा करणाऱ्या तशाच प्रकारच्या धनाचा उपभोग सवित्याच्या कृपेमुळें आह्मांला घडावा.

**अग्न आयूं०नाम्** ॥ हे पवमान अग्ने, तूं आमच्या आयुष्याचें रक्षण करीत आहेस. तूं आह्मांला अन्नरस अथवा अन्न मुख्यतः दे आणि राक्षस आह्मांपासून दूर आहेत तोंच तूं त्यांचा नाश कर.

**अग्निर्ऋ० गयम्** ॥ पवमानरूप, सर्वद्रष्टा, कर्माकरितां ऋत्विजांनीं पुढें स्थापिलेला, मोठ्या मोठ्या यज्ञशाळांनीं संपन्न आणि चार वर्ण व निषाद ह्या पांचही जनांचे मनोरथ परिपूर्ण करणारा जो अग्नि त्याच्यापाशी आह्मी धनादिकाची याचना करीत आहों.

**अग्ने पवस्व०पोषम्** ॥ हे अग्ने, उत्कृष्ट कर्म करणारा तूं आह्मांला उत्कृष्ट वीर्यानें संपन्न असें तेज दे. त्याचप्रमाणें गोधन व पुष्टि तूं आह्मांला दे.

**स्वस्ति नो०चेतुना** ॥ अश्विनीकुमार, भग; देवी आदिति अनर्वण, शत्रूंचें निरसन करणारा पूषा आणि उत्कृष्ट ज्ञानानें संपन्न असलेल्या द्यावापृथिवी आमचें कल्याण करोत.

**मयि मेधां० दधातु** ॥ अग्नि मला धारणाशक्ति, प्रजा व तेज देवो. इंद्र मला धारणाशक्ति, प्रजा व इंद्रियसामर्थ्य देवो आणि सूर्य मला धारणाशक्ति, प्रजा व ओज देवो.

**यत्ते अग्ने० भूयासम्** ॥ हे अग्ने, तुझ्या ठिकाणीं जें तेज आहे त्याच्या योगानें मी तेजस्वी व्हावें. हे अग्ने, तुझ्या ठिकाणीं जें बल आहे त्याच्या योगानें मी बलाढ्य व्हावें आणि, हे अग्ने, तुझ्या ठिकाणीं लोकांचा चित्तें आकर्षण करणारा जो गुण आहे त्यानेंही मी संपन्न असावें.

**सात्रमंत्रांचा अर्थ दिलेला नाहीं.**

# अथाग्निकार्यं ब्रह्मचारिणः ॥

श्रीः ॥ ब्रह्मचारी सन्ध्योपासनोत्तरं आचम्य प्राणानायम्य देशकालाद्युच्चार्य श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं प्रातरग्निकार्यं (सायंकाले तु सायमग्निकार्यं) करिष्य इति संकल्प्य अग्निं ध्यात्वा अग्नेः परितस्त्रिवारं सोदकेन पाणिना परिसमूहनं त्रिवारं पर्युक्षणं च कृत्वा समिधमादाय अग्नये समिधमित्यस्य हिरण्यगर्भोऽग्निर्बृहती ॥ समिदाधाने विनियोगः ॥ ॐ अग्नये समिधमाहार्षं बृहते जातवेदसे ॥ तया त्वमग्ने वर्धस्व समिधा ब्रह्मणा वयं स्वाहा ॥ इति समिधमग्नौ प्रास्य अग्नय इदं न ममेति त्यागमुच्चरेत् ॥ ततः पाणी प्रक्षाल्याग्नौ प्रताप्य ॥ ॐ तेजसा मा समनज्मि इति मुखमवाङ् निमृज्य पाणी प्रक्षाल्य एवं पुनर्द्विवारं कृत्वा ॥ उपस्थानं कुर्यात् ॥ मयि मेधामिति षण्णां हिरण्यगर्भ ऋषिः ॥ पूर्वेषां त्रयाणामग्नीन्द्रसूर्या देवताः ॥ उत्तरत्रयाणामग्निर्देवता ॥

गायत्री छन्दः ॥ अग्न्युपस्थाने विनियोगः ॥ ॐ मयिं मेधां मयिं प्रजां मय्यग्निस्तेजों दधातु ॥ मयिं मेधां मयिं प्रजां मयीन्द्रं इन्द्रियं दधातु ॥ मयिं मेधां मयिं प्रजां मयिं सूर्यो भ्राजों दधातु ॥ यत्तें अग्ने तेजस्तेनाहं तेजस्वीं भूयासम् ॥ यत्तें अग्ने वर्चस्तेनाहं वर्चस्वीं भूयासम् ॥ यत्तें अग्ने हरस्तेनाहं हरस्वीं भूयासम् ॥ इत्यग्निमुपस्थाय ॥ मा नस्तोक इत्यस्य कुत्सो रुद्रो जगती ॥ विभूतिग्रहणे विनियोगः ॥ ॐ मा नस्तोके तनये मा नं आयौ मानो गोषु मानो अश्वेषु रीरिषः ॥ वीरान्मा नों रुद्र भामितो वधीर्हविष्मन्तः- सदमित्त्वा हवामहे ॥ त्र्यायुषं जमदग्नेरिति ललाटे ॥ कश्यपस्य त्र्यायुषमिति कण्ठे ॥ अगस्त्यस्य त्र्यायुषमिति नाभौ ॥ यद्देवानां त्र्यायुषमिति दक्षिणस्कन्धे ॥ तन्मे अस्तु त्र्यायुषमिति वामस्कन्धे ॥ सर्वमस्तु शता- युषमिति शिरसि ॥ ॐ चं मे स्वरश्च मे यज्ञो-

पंचते नमश्च ॥ यत्ते न्यूनं तस्मै त उपयत्तेऽतिरिक्तं तस्मै ते नमः ॥ अग्नये नमः ॐ स्वस्ति ॥ श्रद्धां मेधां यशः प्रज्ञां विद्यां बुद्धिं श्रियं बलम् ॥ आयुष्यं तेज आरोग्यं देहि मे हव्यवाहन ॥ देहि मे हव्यवाहनोऽन्नम इति ॥ इति संप्रार्थ्य ॥ अनेन प्रातरग्निकार्यहोमेन भगवान् श्रीअग्निनारायणः प्रीयताम् ॥ सायं तु सायमग्निकार्यहोमेनेत्यूहः ॥

## ॥ इत्यग्निकार्यप्रयोगः ॥

## ग्रहयज्ञो मात्स्योक्तः ॥

श्रीः ॥ कर्ता नित्यक्रियो द्विराचम्य पवित्रपाणिः प्राणानायम्य ग्रहयज्ञं करिष्ये इति संकल्प्य गणपतिपूजनस्वस्तिवाचनमातृकापूजननांदीश्राद्धानि कृत्वा आचार्यादीन्वृणुयात् ॥ ग्रहमंडलं विलिख्य ग्रहान्स्थापयेत् ॥ यथा ॥ ग्रहवेद्यां वस्त्रेऽष्टदलं पद्मं गन्धादिना कृत्वा ॥ प्रणवस्य परब्रह्म ऋषिः परमात्मा देवता दैवी गायत्री छन्दः, व्याहृतीनां क्रमेण जमदग्निभरद्वाजभृगव ऋषयः । अग्निवायुसूर्या देवताः दैवी गायत्री दैवी उष्णिग्दैवी बृहत्यश्छन्दांसि सूर्याद्यावाहने विनियोगः॥

ग्रहपीठस्य मध्ये वर्तुले द्वादशांगुले प्राङ्मुखं सूर्यं रक्तपुष्पाक्षतैः॥ आकृष्णेन हिरण्यस्तूपः सविता त्रिष्टुप् । सूर्यावाहने वि० ॥ ॐ आकृष्णे न० ॥ ॐ भूर्भुवःस्वः कलिंगदेशोद्भव काश्यपसगोत्र सूर्यहागच्छेह तिष्ठ सूर्याय नमः सूर्यमावाहयामीति सूर्यं स्थापयेत् ॥ १ ॥

तत आग्नेये चतुरस्रे चतुर्विंशाङ्गुले प्रत्यङ्मुखं सोमं श्वेतपुष्पाक्षतैः ॥ आप्यायस्व गोतमः सोमो गायत्री । सोमावाहने वि० ॥ ॐ आप्यायस्व समेतु ते० ॥ ॐ भूर्भुवः स्वः यमुनातीरोद्भवात्रेयसगोत्र सोमेहागच्छेह तिष्ठेति स्थापयेत् २ ॥ ततो दक्षिणे त्रिकोणे त्र्यंगुले मण्डले दक्षिणाभिमुखं भौमं रक्तपुष्पाक्षतैः ॥ अग्निर्मूर्धा विरूपाऽङ्गारको गायत्री अङ्गारकावाहने विनि० ॥ ॐ अग्निर्मूर्धा दिवः ककुत्० ॥ ॐ भूर्भुवः स्वः अवन्तिदेशोद्भवभारद्वाजसगोत्र-भौमेहागच्छेह तिष्ठेति स्थापयेत् ३ ॥ तत ऐशान्यां बाणाकारे चतुरंगुले मंडले उदङ्मुखं बुधं पीतपुष्पाक्षतैः ॥ उद्बुध्यस्वं बुधो बुधस्त्रिष्टुप् बुधावाहने विनियोगः ॐ उद्बुध्यस्वं समनसः सखायः० ॐ भूर्भुवः स्वः मगधदेशोद्भवात्रेयसगोत्र बुधेहागच्छेह तिष्ठ० ४ ॥ तत उत्तरे दीर्घचतुरस्रे द्व्यंगुले मण्डले उदङ्मुखं बृहस्पतिं पीतपुष्पाक्षतैः ॥ बृहस्पते गृत्समदो बृहस्पतिस्त्रिष्टुप् बृहस्पत्यावाहने विनि० ॐ बृहस्पते अति यदर्यो अर्हद्० ॐ भूर्भुवः स्वः सिंधुदेशोद्भवाङ्गिरसगोत्र बृहस्पते इहागच्छेह तिष्ठेति० ५ ॥ ततः पूर्वे पञ्चकोणे नवाङ्गुले मण्डले प्राङ्मुखं शुक्रं शुक्लपुष्पाक्षतैः ॥ शुक्रः पराशरः शुक्रो द्विपदा विराट् शुक्रावाहने विनियोगः ॥ ॐ शुक्रः शुशुक्वाँ उषो न० ॥ ॐ भूर्भुवः स्वः भोजकटदेशोद्भव भार्गवसगोत्र शुक्रेहागच्छेह तिष्ठेति स्थापयेत् ६ ॥ ततः पश्चिमे धनुराकारे द्व्यंगुले मण्डले प्रत्यङ्मुखं शनिं कृष्णपुष्पाक्षतैः ॥ शमग्निरिरिंबिठिः शनिरुष्णिक् शन्यावाहने विनि० ॥ शमग्निरग्निभिः० ॥ ॐ भूर्भुवःस्वः सौराष्ट्रदेशोद्भव काश्यपसगोत्र शनैश्चरेहागच्छेह तिष्ठेति० ७ ॥ ततो नैर्ऋत्ये शूर्पाकारे द्वादशाङ्गुले मण्डले दक्षिणाभिमुखं राहुं कृष्णपुष्पाक्षतैः ॥ कया नो वामदेवो राहुर्गायत्री राह्वावाहने विनि० ॥ ॐ कया नश्चित्र आभुव०॥ ॐ भूर्भुवः स्वः राठिनापुरोद्भव पैठीनसगोत्र राहो इहागच्छेह तिष्ठेति० ८ ॥ ततो वायव्ये ध्वजाकारे षडङ्गुले मण्डले दक्षिणाभिमुखं केतुं

धूम्रपुष्पाक्षतैः।। केतुं कृण्वन्मधुच्छन्दाः केतुर्गायत्री केत्वावाहने विनि०।। ॐ केतुं कृण्वन्नकेतवे० ।। ॐ भूर्भुवः स्वः अन्तर्वेदिसमुद्भव जैमिनिसगोत्र केतो इहागच्छेह तिष्ठेति० ९ ।। यथोक्तकुसुमतण्डुलाभावे यथालाभमुपपन्नैः कुसुमतंडुलैः स्थापयेत् ।। अथाधिदेवताः ।। त्र्यम्बकं वसिष्ठो रुद्रोऽनुष्टुप् रुद्रावाहने वि० ।। ॐ त्र्यम्बकं यजामहे सु० ।। ॐ भूर्भुवः स्वः सूर्यदक्षिणपार्श्वे ईश्वरेहागच्छेह तिष्ठेति० १ ।। गौरीर्मिमाय दीर्घतमा उमा जगती उमावाहने विनियोगः ।।ॐ गौरीर्मिमायस०।। ॐ भूर्भुवः स्वः उमेइहागच्छे त्यावाह्येह तिष्ठेति सोमदक्षिणपार्श्वे उमां स्थापयेत् २ ।। यदक्रन्दो दीर्घतमाः स्कन्दस्त्रिष्टुप् स्कन्दावाहने विनियोगः ।। ॐ यदक्रन्दः प्रथमं० ।। भूर्भुवः स्वः स्कन्देहागच्छेह तिष्ठेति भौमदक्षिणपार्श्वे स्कन्दं० ३ ।। विष्णोर्नु कं दीर्घतमा नारायणस्त्रिष्टुप् । नारायणावाहने विनियोगः ।। ॐ विष्णोर्नु कं वीर्याणि० । ॐ भूर्भुवःस्वः नारायणेहागच्छेत्यावाह्येहः तिष्ठेति बुधदक्षिणपार्श्वे नारायणम् ४ ।। ब्रह्म जज्ञानं वामदेवो ब्रह्मात्रिष्टुप् ब्रह्मावाहने विनियोगः ।। ॐ ब्रह्म जज्ञानं प्रथमं० ।। ॐ भूर्भुवः स्व ब्रह्मन्निहागच्छेत्यावाह्येह तिष्ठेति बृहस्पतिदक्षिणपार्श्वे ब्रह्माणं० ५ ।। इन्द्रं वो मधुच्छन्दा इन्द्रो गायत्री इन्द्रावाहने विनियोगः ।। ॐ इन्द्रं वो विश्वतस्परि० ।। भूर्भुवः स्वः इन्द्रेहागच्छेह तिष्ठेति शुक्रदक्षिणपार्श्वे इन्द्रं ६ ।। यमाय सोमं यमो यमोऽनुष्टुप् यमावाहने विनियोगः ।। ॐ यमाय सोमं सुनुत० ।। ॐ भूर्भुवः स्वः यमेहागच्छेह तिष्ठेति शनैश्चरदक्षिणपार्श्वे यमं ७ ।। मोषुणः कण्वः कालो गायत्री कालावाहने विनियोगः ॐ मोषुणः परापरा० ।। ॐ भूर्भुवः स्वः कालेहागच्छेह तिष्ठेति राहुदक्षिणपार्श्वे कालं ८ ।। उषो वाजंप्रस्कण्वश्चित्रगुप्तो बृहती चित्रगुप्तावाहने विनियोगः । ॐ उषो वाजं हि वं स्वय० ।। ॐ भूर्भुवः स्वः चित्रगुप्तेहागच्छेह तिष्ठेति केतुदक्षिणपार्श्वे चित्रगुप्तं ९ ।। ततः शुक्लपुष्पाक्षतैः सर्वाः प्रत्यधि—

देवताः स्थापयेत ॥ अग्निं दूतं मेधातिथिरग्निर्गायत्री अग्न्यावाहने वि० ॥ ॐ अग्निं दूतं वृणीमहे० ॥ ॐ भूर्भुवःस्वः अग्ने इहागच्छेह तिष्ठेति सूर्यवामपार्श्वेऽग्निं० १ ॥ अप्सु मे मेधातिथिरापोऽनुष्टुप् अब्वावा० ॥ ॐ अप्सु मे सोमो० ॥ ॐ भूर्भुवःस्वः आप इहागच्छ तेह तिष्ठतेति सोमवामपार्श्वे अपः २ ॥ स्योना मेधातिथिर्भूमिर्गायत्री भूम्यावाहने० ॥ ॐ स्योना पृथिवि० ॥ ॐ भूर्भुवःस्वः भूमे इहागच्छेह तिष्ठेति भौमवामपार्श्वे भूमिं ३ ॥ इदं विष्णुर्मेधातिथिर्विष्णुर्गायत्री विष्ण्वावाहने० ॥ ॐ इदं विष्णुर्वि० ॥ ॐ भूर्भु० विष्णो इहागच्छेह तिष्ठेति बुधवामपार्श्वे विष्णुं ४ ॥ इन्द्र श्रेष्ठानि-गृत्समद इन्द्रस्त्रिष्टुप् इन्द्रावाहने० ॥ ॐ इन्द्रश्रेष्ठानि० ॥ ॐ भूर्भु इन्द्रेहागच्छेहतिष्ठेति बृहस्पतिवामपार्श्वे इन्द्र ५ इन्द्राणीं वृषाकपिरिन्द्राणी पंक्तिः इन्द्राण्यावा० ॥ ॐ इन्द्राणीमासु सुनारिषु० ॥ ॐ भूर्भु० इन्द्राणीहागच्छेह तिष्ठेति शुक्रवामपार्श्वे इन्द्राणीं ६ ॥ प्रजापते हिरण्यगर्भः प्रजापतिस्त्रिष्टुप् प्रजापत्यावाहने० ॥ ॐ प्रजापते न त्व० ॥ ॐ भूर्भुवःस्वः प्रजापते इहागच्छेह तिष्ठेति शनिवामपार्श्वे प्रजापतिं ७ ॥ आ यं गौः सार्पराज्ञी सर्पा गायत्री सर्पावाहने० ॥ ॐ आ यं गौः पृश्नि० ॥ ॐ भूर्भुवःस्वः सर्पा इहागच्छतेह तिष्ठध्वमिति राहुवामपार्श्वे सर्पान् ८ ॥ ब्रह्म जज्ञानं वामदेवो ब्रह्मा त्रिष्टुप् ब्रह्मावाहने वि० ॥ ॐ ब्रह्मजज्ञानं० ॥ ॐ भूर्भुवःस्वः ब्रह्मन्निहा गच्छेह तिष्ठेति केतुवामपार्श्वे ब्रह्माणं ९ ॥ ततः शुक्लपुष्पाक्षतैर्गणपत्यादिपञ्चदेवताः स्थापयेत् ॥ गणानां त्वा गृत्समदो गणपतिर्जगती गणपत्यावाहने० ॥ ॐ गणानां त्वा गणपतिं० ॥ ॐ भूर्भुवःस्वः ॥ गणपते इहागच्छेह तिष्ठेति राहोरुत्तरतो गणपतिं १ ॥ जातवेदसे कश्यपो दुर्गा त्रिष्टुप् दुर्गावाहने० ॥ ॐ जातवेदसे० ॥ ॐ भूर्भुवःस्वः दुर्गे इहागच्छेह तिष्ठेति शनेरुत्तरतो दुर्गां २ ॥ तव वायो व्यश्वो वायुर्गायत्री वाय्वावाहने वि० ॥ ॐ तव वायवृतस्पते० ॥ ॐ भूर्भुवःस्वः वायो इहागच्छेह तिष्ठेति रवेरुत्तरतो वायुं ३ ॥

आदिद्वत्स आकाशो गायत्री आकाशावाहने वि० ॥ ॐ आदित्प्रत्नस्य रेतसो० ॥ ॐ भूर्भुवःस्वः आकाशेहागच्छेह तिष्ठेति राहोर्दक्षिणे आकाशं ४ ॥ एषो उषाः प्रस्कण्वोऽश्विनौ गायत्री अश्व्यावाहने० ॥ ॐ एषो उषा अपूर्व्या० ॥ ॐ भूर्भुवःस्वः अश्विनाविहागच्छतमिह तिष्ठतमिति केतोर्दक्षिणेऽश्विनौ ५॥ यद्वा विनायकादीनप्यशेत्तरतः स्थापयेत् ॥ ततो ग्रहपीठगता वक्ष्यमाणदेवताः स्थापयेत् ॥ उत्तरे क्षेत्राधिपतिं वास्तोष्पतिं चावाहयेदित्येके ॥ क्षेत्रस्य पतिना वामदेवः क्षेत्रपालोऽनुष्टुप् क्षेत्रपालावाहने वि० ॥ ॐ क्षेत्रस्य पतिना० ॥ ॐ भूर्भुवःस्वः क्षेत्रपालेहागच्छेह तिष्ठेति क्षेत्रपालं ६ ॥ वास्तोष्पते वसिष्ठो वास्तोष्पतिस्त्रिष्टुप् वास्तोष्पत्यावाहने० ॥ ॐ वास्तोष्पते० ॥ ॐ भूर्भुवःस्वः वास्तोष्पते इहागच्छेह तिष्ठेति तदुत्तरे वास्तोष्पतिं ७ ॥ ततः प्रागादिदलाग्रेषु इन्द्रादिलोकपालान्पूर्वाभिमुखानावाहयेत् ॥ तत्र मंत्राश्च इन्द्रं विश्वाजेतेन्द्रोऽनुष्टुप् ॥ पूर्वे इन्द्रावाहने० ॥ ॐ इन्द्रं विश्वा अवीवृधन्० ॥ ॐ भूर्भुवःस्वः इन्द्रेहागच्छेह तिष्ठेति पूर्ववत् १ ॥ एवमुत्तरत्रापि ॥ अग्निं दूतं मेधातिथिरग्निर्गायत्री । अग्न्यावाहने वि० ॐ अग्निं दूतं वृणीमहे० २ यमाय सोमं यमो यमोऽनुष्टुप् यमावाहने० ॥ ॐ यमाय सोमं० ३ ॥ मोषुणः कण्वो निर्ऋतिर्गायत्री निर्ऋत्यावाह० ॥ ॐ मोषुणः परापरा० ४ ॥ तत्त्वा यामि शुनःशेपो वरुणस्त्रिष्टुप् वरुणावाह० ।ॐ तत्त्वा यामि ब्रह्मणा० ५ ॥ तव वायो व्यश्वो वायुर्गायत्री वाय्वावाह० ॥ ॐ तव वायवृतस्पते० ६ ॥ सोमो धेनुं गोतमः सोमस्त्रिष्टुप् सोमावाहने० ॥ ॐ सोमो धेनुं० ७ ॥ तमीशानं गोतम ईशानो जगती ईशानावाह० ॥ ॐ तमीशानं जगत० ८ ॥ एवमीशानान्ता देवता आवाह्य ॥ तदस्तु मित्रावरुणा० गृहा वै प्रतिष्ठा० इति प्रतिष्ठाप्योक्ततत्तन्मंत्रैरादित्याय नम इत्येवमादिभिर्नाममंत्रैर्वा षोडशोपचारैः संपूज्य ग्रहवेदीशानभागे मही द्यौः पृथिवी च न इत्यादिभिर्विधिना कलशस्थापनं कृत्वा तदुपरि तत्त्वा यामीति मंत्रेण वरुणं संपूज्य तत्र कलशे समुद्रनद्या-

वाहनं कुर्यात् ॥ सर्वे समुद्राः सरितस्तीर्थानि जलदा नदाः ॥ आयान्तु यजमानस्य दुरितक्षयकारिकाः ततः कलशाभिमन्त्रणं कलशस्य मुखे विष्णुरित्यादि० ॥ ततः । कलशप्रार्थना ॥ देवदानवसंवादे मथ्यमाने महोदधौ । उत्पन्नोऽसि तदा कुम्भ विधृतो विष्णुना स्वयम् ॥ त्वत्तो ये सर्वतीर्थानि देवाः सर्वे त्वयि स्थिताः ॥ त्वयि तिष्ठन्ति भूतानि त्वयि प्राणाः प्रतिष्ठिताः ॥ शिवः स्वयं त्वमेवासि विष्णुस्त्वं च प्रजापतिः । आदित्या वसवो रुद्रा विश्वेदेवाः सपैतृकाः ॥ त्वयि तिष्ठन्ति सर्वेऽपि यतः कामफलप्रदाः ॥ त्वत्प्रसादादिमं यज्ञं कर्तुमीह जलोद्भव ॥ सान्निध्यं कुरु देवेश प्रसन्नो भव सर्वदा ॥ तत आचार्योऽन्वादध्यात् ॥ तत्र प्रधानकीर्तने विशेषः ॥ सूर्यं सोममंङ्गारकं बुधं बृहस्पतिं शुक्रं शनिं राहुं केतुं च एता प्रधानदेवता अमुकसंख्याकाभिरर्कादिजातीयसमिदाहुतिभिश्चर्वाहुतिभिस्तावतीराज्याहुतिभिश्च ॥ ईश्वरं उमां स्कन्दं नारायणं ब्रह्माणं इन्द्रं यमं कालं चित्रगुप्तं अग्निं अपः भूमिं विष्णुं इन्द्रं इन्द्राणीं प्रजापतिं सर्पां ब्रह्माणं एता देवता-अमुकसंख्याकाभिरष्टाभिर्वा तदाहुतिभिः ॥ विनायकं दुर्गां वायुमाकाशं अश्विनौ क्षेत्रपालं वास्तोष्पतिं इन्द्रमग्निं यमं निर्ऋतिं वरुणं वायुं सोममीशानं एता देवताः अमुकसंख्याकाभिः समिदाहुतिभिराज्याहुतिभिश्च शेषेण स्विष्टकृतमित्यादि ॥ आज्यसंस्कारकाले सूर्याय त्वा जुष्टं निर्वपामीति चतुरो मुष्टीन्निरुप्यैवं सोमाय मङ्गलाय त्वेत्यादिप्रकारेण ग्रहेभ्यश्चतुरश्चतुरो मुष्टीन्निरुप्य इतरासां देवतानां कृते देवेभ्यो जुष्टं निर्वपामीति चतुरो मुष्टीन्निर्वपेत् ॥ गृहसिद्धान्नेन वा होमः ॥ आज्येन सह गृहसिद्धान्नस्य च पर्यग्निकरणम् ॥ दर्वीस्रुवसंमार्गान्ते गृहसिद्धान्नं स्थाल्यामादाय अग्नावधिश्रित्याभिघारणादिर्बर्हिष्यासादनान्तं कुर्यात् ॥ अर्कादितत्तद्ग्रहोक्तयज्ञियतरुजातीयाः समिधश्च तत्रैवासाद्य अङ्गदर्चनाद्याज्यभागवराहुत्यन्ते यजमानोऽन्वाधानानुसारेण एतत्संख्याहुतिपर्याप्तं अर्कादिजातीयसमिच्चर्वाज्यात्मकं हविस्त्रयं सूर्याय

सोमायेत्यादि न ममेत्येवं त्यागपूर्वकं तदंगदेवताभ्योऽपि त्यक्ता एवं त्यागे कृते ऋत्विगाचार्योऽर्कादिसमिधो दधिमध्वाक्ताश्चर्वाहुतीराज्याहुतीश्च संकल्पानुसारिसंख्याका जुहुयात् ॥ ततः स्विष्टकृदादिप्रायश्चित्तहोमान्तं कृत्वा दिक्पालादिभ्यः सदीपमाषभक्तबलिसंकल्पं यजमानद्वारा कारयेत् ॥

# अथ बलिदानम् ॥

श्रीः ॥ सपत्नीको यजमानः प्रतिबलिं संकल्प्य साक्षतजलं त्यजेत् । तद्यथा ॥ अग्न्यायतनस्य समन्तादिक्षु माषभक्तबलीन्दिक्पालेभ्यो दद्यात् ॥ त्रातारमिन्द्रं गर्ग इन्द्रस्त्रिष्टुप् इन्द्रप्रीत्यर्थे बलिदाने विनियोगः ॥ ॐ त्रातारमिन्द्र० ॥ इन्द्राय साङ्गाय सपरिवाराय सायुधाय सशक्तिकाय एष माषभक्तबलिर्न मम ॥ भो इन्द्र दिशं रक्ष बलिं भुङ्क्ष्व मम यजमानस्य सकुटुम्बस्यायुः कर्ता क्षेमकर्ता शान्तिकर्ता पुष्टिकर्ता तुष्टिकर्ता आरोग्यकर्ता निर्विघ्नकर्ता वरदो भवेति पुष्पाक्षतजलानि पूर्वाभिमुखस्त्यजेत ॥ १ ॥ अग्निं दूतं मेधातिथिरग्निर्गायत्री अग्निप्रीत्यर्थे बलिदाने वि० ॥ ॐ अग्निं दूतं वृणीमहे० अग्नये साङ्गाय० २ ॥ यमाय सोमं यमो यमोऽनुष्टुप् यमप्रीत्यर्थे बलिदाने वि० ॥ ॐयमाय सोमं० ॥ यमाय साङ्गाय० ३ ॥ मो षु णः कण्वो निर्ऋतिर्गायत्री निर्ऋतिप्रीत्यर्थे बलि० ॥ ॐ मो षु णः परापरा० ॥ निर्ऋतये साङ्गाय० ४ ॥ तत्त्वा यामि शुनःशेपो वरुणस्त्रिष्टुप् वरुणप्रीत्यर्थे० ॥ ॐ तत्त्वा यामि ब्रह्मणा० वरुणाय साङ्गाय० ५ ॥ तव वायो व्यश्वो वायुर्गायत्री वायुप्रीत्यर्थे बलि० ॥ ॐ तव वायावृतस्पते० वायवे साङ्गाय० ६ ॥ सोमो धेनुं गोतमः सोमस्त्रिष्टुप् सोमप्रीत्यर्थे० ॥ ॐ सोमो धेनुं सोमो अर्वन्त० ॥ सोमाय सांगाय० ७ ॥ तमीशानं गोतम ईशानो जगती ईशानप्रीत्यर्थे० ॥ ॐतमीशानं जगतः० ईशानाय:० ८ ॥ आकाशभूमि-

भ्यां० ॥ ततो ग्रहबलयो देयाः । तत्र पूर्वं आकृष्णेन हिरण्यस्तूपः सविता त्रिष्टुप् सूर्यप्रीत्यर्थे० ॐआकृष्णेन रजसा० ॥ आदित्याय साङ्गाय सपरिवाराय ईश्वराग्निरूपाधिदेवताप्रत्याधिदेवतासहितायेमं सदीपमाषभक्तबलिं समर्पयामि इति पुष्पाञ्जलिं क्षिपेत् भो आदित्येमं बलिं गृहाण मम यजमानस्य० १॥ आप्यायस्व गोतमः सोमो गायत्री सोमप्रीत्यर्थे० ॥ ॐआप्यायस्व समेतु० ॥ सोमाय सांगाय० उमारूपाधिदेवताप्रत्यधिदेवतासहितायेत्यादि० २ ॥ अग्निर्मूर्धा विरूपोऽङ्गारको गायत्री भौमप्रीत्यर्थे बलिदाने० ॐ अग्निर्मूर्धा दिवः० ॥ भौमाय साङ्गाय० स्कन्दभूमिरूपाधिदेवताप्रत्यधिदेवतासहितायेत्यादि० ३ ॥ उद्बुध्यस्वं बुधो बुधस्त्रिष्टुप् बुधप्रीत्यर्थे ॐ उद्बुध्यस्वं समनसः० बुधाय साङ्गाय० नारायणविष्णुरूपाधिदेवताप्रत्यधिदवतासहितायेत्यादि० ४॥ बृहस्पते गृत्समदो बृहस्पतिस्त्रिष्टुप् बृहस्पतिप्रीत्यर्थे बलि० ॥ ॐ बृहस्पेत अति०बृहस्पतये साङ्गाय० ब्रह्मेन्द्ररूपाधिदेवताप्रत्यधिदेवतासहितायेत्यादि० ५ ॥ शुक्रः पराशरः शुक्रोः द्विपदा विराट शुक्रप्रीत्यर्थे बलि० ॥ शुक्रः शुशुक्वाँ उषो न० शुक्राय साङ्गाय० इन्द्राणीरूपाधिदेवताप्रत्यधिदेवतासहितायेत्यादि० ६ ॥ शमग्निरिरिम्बिठिः शनिरुष्णिक् शनिप्रीत्यर्थे० शमग्निरग्निभिः० शनैश्चराय साङ्गाय० यमप्रजापतिरूपाधिदेवता प्रत्यधिदेवतासाधितायेत्यादि ७ ॥ कया नो वामदेवो राहुर्गायत्री राहुप्रीत्यर्थे बलि० ॥ ॐ कया नश्चित्र ० ॥ राहवे सांङ्गाय० कालसर्परूपाधिदेवताप्रत्यधिदेवतासहितायेत्यादि० ८ ॥ केतुं कृण्वन्मधुच्छंदाः केतुर्गायत्री केतुप्रीत्यर्थे बलिः ॥ ॐ केतुं कृण्वन्न० केतवे साङ्गाय सपरिवाराय० चित्रगुप्तब्रह्मरूपाधिदेवताप्रत्यधिदेवतासहितयेत्यादि० ॥ ततः गणानां त्वा गृत्समदो गणपतिर्जगती गणपतिप्रीत्यर्थे बलिदाने० ॥ ॐ गणानां त्वा गणपति० गणपतये सांगाय सपरिवाराय सायुधाय सशक्तिकाय ऋद्धिबुद्धिसहितायेत्यादि० ॥ १ जातवेदसे कश्यपो

दुर्गा त्रिष्टुप् दुर्गाप्रीत्यर्थे ० ॥ ॐ जातवेदसे सुनवाम० दुर्गायै सांगायै सपरिवारायै सायुधायै सशक्तिकायै इमं बलिं० भो दुर्गे मम यजमानस्यायुष्कर्त्री पुष्टिकर्त्री तुष्टिकर्त्री ऋद्धिकर्त्री भव २॥ तव वायो व्यश्वो वायुर्गायत्री वायुप्रीत्यर्थं० ॥ ॐ तव वायवृत० वायवे सांगायेत्यादि ० ३ ॥ आदित्प्रत्नस्य वत्स आकाशो गायत्री आकाशप्रीत्यर्थे० ॥ ॐ आदित्प्रत्नस्य रेतसो० आकाशाय सांगायेत्यादि० ४॥ एषो उषाः प्रस्कण्वोऽश्विनौ गायत्री अश्विप्रीत्यर्थे बलिदाने० ॐ एषो उषा अपूर्व्या० अश्विभ्यां सांगाभ्यां सपरिवाराभ्यां सायुधाभ्यां सशक्तिकाभ्यामिमं माषभक्तबलिं० ॥ भो अश्विनौ अमुं बलिं गृण्हीतं मम यजमानस्य आयुःकर्तारौ क्षेमकर्तारौ भवतम् ५ ॥ वास्तोष्पते वसिष्ठो वास्तोष्पतिस्त्रिष्टुप् वास्तोष्पतिप्रीत्यर्थे०॥ ॐ वास्तोष्पते०॥ वास्तोष्पतये सांगायेत्यादि ६ ॥ ततः क्षेत्रपालबलिः ॥ क्षेत्रस्य वामदेवः क्षेत्रपालोनुष्टुप् क्षेत्रपालप्रीत्यर्थे० ॥ ॐ क्षेत्रस्य पतिना० क्षेत्रपालाय सांगाय सपरिवाराय भूतप्रेतपिशाचराक्षसडाकिनीशाकिनवेतालपरिवारयुताय इममि ादि ॥ ततः शूद्रादिना तद्बलिनयने कृते शान्ता पृथिवीति भुवं प्रोक्ष्य सयजमान आचार्यः प्रक्षालितपाणिपाद आचान्तः सर्वकर्मप्रपूर्णा भद्रद्रव्यदां पूर्णाहुतिं होष्ये इति संकल्प्य, स्रुचि द्वादशगृहीतमाज्यं फलसंयुतं गृहीत्वा तस्यां गन्धपुष्पाक्षतालंकृताग्रं स्रुवमधोबिलं निधाय स्रुक्स्रुवं शंखमुद्रया गृहीत्वोर्ध्वस्तिष्ठन् ॥मूर्धान भरद्वाजोऽग्निर्वैश्वानरस्त्रिष्टुप् पूर्णाहुतौ विनियोगः ॥ ॐ मूर्धानं दिवो०॥ अनेन पूर्णाहुतिं हुत्वा अग्नये वैश्वानरायेदं न ममेति त्यागः यद्वा मूर्धानं० पुनस्त्वाग्निर्वसुरुद्रादित्यास्त्रिष्टुप्॥ पूर्णा दर्वि विश्वेदेवाः शतक्रतुरनुष्टुप् सप्त ते अग्ने सप्तवानग्निर्जगती ॥ पूर्णाहुतौ वि० ॥ इति चतुर्भिर्हुत्वा इदमग्नये वैश्वानराय वसुरुद्रादित्येभ्यः शतक्रतवे सप्तवतेऽग्नये च नममेति त्यागः कार्यः ॥ ततः संस्त्रवहोमादिकर्मशेषं समापयेत् ॥ ततः सर्वौषधैः सर्वगन्धैश्च विलिप्तांगं प्राङ्मुखं यजमानं सपरिवारं चत्वारो

विप्रा उदङ्मुखा ऐशानीमुखाद्वाग्रहकुम्भोदकेन समुद्रज्येष्ठा इत्याद्यैरभि-षेकमन्त्रैर्ग्रहमन्त्रैः सुरास्त्वामभिषिञ्चन्त्वित्यादिपौराणमन्त्रैश्चाभिञ्चेयु: ततः स्नात्वाशुक्लाम्बरगन्धमाल्यधरः प्राङ्मुखो यजमानो ग्रहादीनां चोत्त-रपूजां विधायाग्निं संपूज्य विभूतिं धारयेत् ॥ ततोवरणक्रमेणर्त्विजो यजमानहस्ते श्रेयःसंपादनं कुर्युः ॥

# पुण्याहवाचनप्रयोग.

सपत्नीकः कर्ता कृतनित्यक्रियः कृतमांगलिकस्नानः स्वलंकृतो बद्ध-शिखः पवित्रपाणिराचम्य प्राणानायम्येष्टदेवतादिनमस्कारपूर्वकं सुमुख-श्चेत्यादीन्मंगलश्लोकान्पठित्वा देशकालौ संकीर्त्यामुकं कर्मकरिष्ये। तदंग-त्वेन पुण्याहवाचनं मातृकापूजनं नांदीश्राद्धं च करिष्ये इतिसंकल्पंकुर्यात् तत्रादौ निर्विघ्नतासिद्ध्यै गणपतिपूजनं करिष्ये । गणानां त्वाशौनकोगृ-त्समदो गणपतिर्जगती गणपत्यावाहने विनियोगः ॥ ॐ गणानां त्वा गणपतिंहवामहेकविंकवीनामुपमश्रवस्तमम् ॥ ज्येष्ठराजंब्रह्मणांब्रह्मणस्पत आनः शृण्वन्नूतिभिःसीदसादनम्॥ऋद्धिसिद्धिसहिताय गणपतयेनमः।ऋ-द्धिसिद्धि सहितं गणपतिमावाहयामीत्यावाह्यनर्य प्रजामिति प्रतिष्ठाप्य आस-नादिदक्षिणादानान्तैरुपचारैः संपूज्य पुष्पाञ्जलिं दत्वा मन्त्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं गजानन । यत्पूजितं मया देव परिपूर्णं तदस्तु मे ॥ वक्र-तुण्ड० सर्वदा ॥ इति संप्रार्थ्य विघ्नेश्वराय वरदाय सुरप्रियाय लम्बोद-राय विकटाय गजाननाय। विनायकाय श्रुतियज्ञविभूषिताय गौरीसुताय गणनाथ नमो नमस्ते इति नमस्कुर्यात्। विसर्जनं तु कर्मसमाप्त्यन्त इति शिष्टाः । एवं सर्वत्र ॥

कलशस्थापनम्॥ॐ महीद्यौः पृथिवीचनइमंयज्ञंमिमिक्षताम्॥ पिपृतांनो-भरीमभिः इतिमंत्रावृत्त्यादक्षिणोत्तरतश्चभूमिंस्पृष्ट्वा॥ॐ ओषधयःसंवदन्ते सोमेन सह राज्ञा ॥ यस्मै कृणोति ब्राह्मणस्तं राजन्पारयामसि॥ स्पृष्ट-देशयोरुपकल्पितप्रस्थधान्यस्य द्वौपुंजौकृत्वा ॥ ॐ आकलशेषु धावति

पवित्रे परि षिच्यते ॥ उक्थैर्यज्ञेषु वर्धते ॥ इति तयोः पुञ्जयोरुपरि द्वौ कलशौ निधाय ॥ ॐ इमं मे गंगे यमुने सरस्वति शुतुद्रि स्तोमं सचता परुष्ण्या ॥ असिक्न्या मरुद्वृधे वितस्तयार्जीकीये शृणुह्या सुषोमया ॥ उपकल्पितकलशोदकाभ्यां तौ पूरयित्वा ॥ ॐ गंधद्वारां दुराधर्षां नित्यपुष्टां करीषिणीं ॥ ईश्वरीं सर्वभूतानां तामिहोपह्वये श्रियम् ॥ इति गंधं प्रक्षिप्य ॥ ॐ काण्डात्काण्डात्प्ररोहन्ती परुषः परुषः परि ॥ एवा नो दूर्वे प्रतनु सहस्रेण शतेन च ॥ इति दूर्वाः ॥ ॐ अश्वत्थे वो निषदनं पर्णे वो वसतिष्कृता ॥ गोभाज इत्किलासथ यत्सनवथ पूरुषम् ॥ इति पल्लवान् ॥ ॐ याः फलिनीर्या अफला अपुष्पा याश्च पुष्पिणीः ॥ बृहस्पतिप्रसूतास्ता नो मुञ्चन्त्वंहसः ॥ इति फलम् ॥ ॐ स हि रत्नानि दाशुषे सुवाति सविता भगः ॥ तं भागं चित्रमीमहे ॥ इति रत्नानि ॥ ॐ हिरण्यरूपः स हिरण्यसंदृगपान्नपात्सेदु हिरण्यवर्णः ॥ हिरण्ययात्परियोनेर्निषद्या हिरण्यदा ददत्यन्नमस्मै ॥ इति हिरण्यम् ॥ ॐ युवासुवासः परिवीत आगात्स उ श्रेयान्भवति जायमानः ॥ तं धीरासः कवय उन्नयन्ति स्वाध्यो३ मनसा देवयन्तः ॥ इति वस्त्राभ्यां तौ वेष्टयेत् ॥ ॐ पूर्णा दर्वि परापत सुपूर्णा पुनरापत ॥ वस्नेव विक्रीणावहा इष मूर्जं शतक्रतो ॥ इति सतन्दुलाभ्यां पूर्णपात्राभ्यांकलशयोराननेपिदध्यात ॥ तत्त्वा यामि शुनःशेपोवरुणस्त्रिष्टुप् ॥ वरुणावाहने० ॥ ॐ तत्त्वायामि ब्रह्मणा वन्दमानस्तदाशास्ते यजमानो हविर्भिः ॥ अहेळमानो वरुणेह बोध्युरुशंस मा न आयुः प्रमोषीः ॥ उत्तरकलशे वरुणमावाह्य नर्यं प्रजामिति प्रतिष्ठाप्य पूजयेत् । कलशद्वयेपि वरुणावाहनमिति केचिदिति प्रयोगदर्पणे ॥ ततस्तत्रैव देवता आवाहयेत् ॥ कलशस्य मुखे विष्णुः कण्ठे रुद्रः समाश्रितः ॥ मूले तत्र स्थितो ब्रह्मा मध्ये मातृगणाः स्मृताः ॥ कुक्षौ तु सागराः सर्वे सप्तद्वीपा वसुन्धरा ॥ ऋग्वेदोऽथ यजुर्वेदः सामवेदो ह्यथर्वणः ॥ अङ्गैश्च सहिताः सर्वे कलशं तु समाश्रिताः ॥ अत्र गायत्री सावित्री शान्तिपुष्टिकरी तथा ॥

आयांतु मम शान्त्यर्थं दुरितक्षयकारिकाः ॥ सर्वे समुद्राः सरितस्तीर्थानि जलदा नदाः । आयान्तु मम शान्त्यर्थं दुरितक्षयकारकाः ॥ इत्यावाह्य संपूज्य उत्तरकलशे अक्षतान्क्षिपेत ॥ मातृदेवो भव ॥ पितृदेवो भव ॥ आचार्यदेवो भव ॥ अतिथिदेवो भव ॥ सर्वेभ्यो ब्राह्मणेभ्योनमो-नमः ॥ ततः ॥ अवनिकृतजानुमण्डलः कमलमुकुलसदृशमञ्जलिं शिरस्याधाय दक्षिणेन पाणिना सुवर्णपूर्णकलशं धारयित्वा आशिषः प्रार्थयते ॥ एताः सत्या आशिषः सन्तु ॥ दीर्घा नागा नद्यो गिरय-स्त्रीणि विष्णुपदानि च तेनायुःप्रमाणेन पुण्याहं दीर्घमायुरस्तु ॥ विप्राः सन्त्वस्त्विति यथायोग्यं प्रत्युत्तरं दद्युः । ततः कर्ता । शिवा आपः सन्तु । सौमनस्यमस्तु । अक्षतं चारिष्टं चास्तु । गन्धाः पान्तु । सौमंगल्यं चास्तु । अक्षताः पान्तु । आयुष्यमस्तु । पुष्पाणि पान्तु । सौश्रियमस्तु । ताम्बूलानि पान्तु । ऐश्वर्यमस्तु । दक्षिणाः पान्तु ॥ बहु देयं चास्तु ॥ दीर्घमायुः श्रेयः शान्तिः पुष्टिस्तुष्टिश्चास्तु ॥ श्रीर्य-शो विद्या विनयो वित्तं बहुपुत्रं चायुष्यं चास्तु ॥ यं कृत्वा सर्ववेदय-ज्ञक्रियाकरणकर्मारम्भाः शुभाः शोभनाः प्रवर्तन्ते तमहमोंकारमादिं कृत्वा ऋग्यजुःसामाशीर्वचनं बहुऋषिमतं संविज्ञातं भवद्भिरनुज्ञातः पुण्यं पुण्याहं वाचयिष्ये ॥ इति वदेत । वाच्यतामिति विप्राः ॥ ततो यजमानः ॥ ॐभद्रं कर्णेभिः श्रृणुयाम देवा भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ॥ स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिर्व्यशेम देवहितं यदायुः ॥ ॐ द्रविणोदा द्रविणसस्तुरस्य द्रविणोदाः स नरस्य प्रयंसत ॥ द्रविणोदा वीरवती मिषं नो द्रविणोदा रासते दीर्घमायुः ॥ ॐ सविता पश्चातात्सविता पुरस्तात्सवितोत्तरात्तात्सविताधरात्तात् ॥ सविता नः सुवतु सर्वतातिं सविता नो रासतां दीर्घमायुः ॥ ॐ नवो नवो भवति जायमानो-ह्नां केतुरुषसामेत्यग्रम् ॥ भागं देवेभ्यो विदधात्यायन्प्रचन्द्रमा स्तिरते दीर्घमायुः ॥ ॐ उच्चा दिवि दक्षिणावन्तो अस्थुर्ये अश्वदा सह ते सूर्येण ॥ हिरण्यदा अमृतत्वं भजन्ते वासोदाः सोम प्रतिरन्त

आयुः ॥ ॐ आप उन्दन्तु जीवसे दीर्घायुत्वाय वर्चसे ॥ यस्त्वा हृदा कीरिणा मन्यमानोऽमर्त्यं मर्त्यो जोहवीमि । जातवेदो यशो अस्मासु धेहि प्रजाभिरग्ने अमृतत्वमश्याम ॥ यस्मै त्वं सुकृते जातवेद उ लोकमग्ने कृणवस्योनम् । अश्विनं सपुत्रिणं वीरवन्तं गोमन्तं रयिं नशते स्वस्ति ॥ संत्वासिञ्चामि यजुषा प्रजामायुर्धनं च ॥ व्रतनियमतपःस्वाध्यायक्रतु-दमदानविशिष्टानां ब्राह्मणानां मनः समाधीयताम् । इति विप्रान्प्रार्थयेत् ॥ विप्राः समाहितमनसः स्मः । यजमानः ॥ प्रसीदन्तु भवन्तः ॥ विप्राः प्रसन्नाः स्मः । यजमानः १ शान्तिरस्तु २ पुष्टिरस्तु ३ तुष्टिरस्तु ४ वृद्धिरस्तु ५ अविघ्नमस्तु ६ आयुष्यमस्तु ७ आरोग्यमस्तु ८ शिवं कर्मास्तु ९ कर्मसमृद्धिरस्तु १० धर्मसमृद्धिरस्तु ११ वेदसमृद्धिरस्तु शास्त्रसमृद्धिरस्तु १३ पुत्रसमृद्धिरस्तु १४ धनधान्यसमृद्धिरस्तु १५ इष्टसंपदस्तु । बहिर्देशे १६ अरिष्टनिरसनमस्तु १७ यत्पापं तत्प्रति-हतमस्तु १८ यच्छ्रेयस्तदस्तु १९ उत्तरे कर्मण्यविघ्नमस्तु २० उत्तरो-त्तरमहरहरभिवृद्धिरस्तु २१ उत्तरोत्तराः क्रियाः शुभाः शोभनाः संपद्यताम् २२ तिथिकरणमुहूर्तनक्षत्रसंपदस्तु २३ तिथिकरण-मुहूर्तनक्षत्रग्रहलग्नाधिदेवताः प्रीयन्ताम् २४ तिथिकरणे मुहूर्तनक्षत्रे सग्रहे सदैवते प्रीयेताम् २५ दुर्गापाञ्चाल्यौ प्रीयेताम् २६ अग्निपुरोगा विश्वेदेवाः प्रीयन्ताम् २७ इन्द्रपुरोगा मरुद्गणाः प्रीयन्ताम् २८ ब्रह्मपुरोगाः सर्वे वेदाः प्रीयन्ताम् २९ विष्णुपुरोगाः सर्वे देवाः प्रीयन्ताम् ३० माहेश्वरीपुरोगा उमा मातरः प्रीयन्ताम् ३१ वसिष्ठपुरोगा ऋषिगणाः प्रीयताम् ३२ अरुन्धतीपुरोगा एकपत्न्यः प्रीयताम् ३३ ऋषयश्छन्दांस्याचार्या देवा वेदा यज्ञाश्च प्रीयताम् ३४ ब्रह्म च ब्राह्मणाश्च प्रीयन्ताम् ३५ श्रीसरस्वत्यौ प्रीयेताम् ३६ श्रद्धामेधे प्रीयेन्ताम् ३७ भगवती कात्यायनी प्रीयताम् ३८ भगवती माहेश्वरी प्रीयताम् ३९ भगवती पुष्टिकरी प्रीयताम् ४० भगवती तुष्टिकरी प्रीयताम् ४१ भगवती ऋद्धिकरी प्रीयताम् ४२ भगवती वृद्धिकरी ॥ ।

ताम् ४३ भगवन्तौ विघ्नविनायकौ प्रीयेताम् ४४ भगवान्स्वामी महादेवो महासेनः सपत्नीकः ससुतः सपार्षदः सर्वस्थानगतः प्रीयताम् ४५ हरिहराहिरण्यगर्भाः प्रीयन्ताम् ४६ सर्वा ग्रामदेवताः प्रीयन्ताम् ४७ सर्वा कुलदेवताः प्रीयन्ताम् ४८ सर्वा इष्टदेवताः प्रीयन्ताम् ॥ बहिरपः ४९ हता ब्रह्मद्विषः ५० हताः परिपन्थिनः ५१ हता अस्य कर्मणो विघ्नकर्तारः ५२ शत्रवः पराभवं यान्तु ५३ शाम्यन्तु घोराणि ५४ शाम्यन्तु पापानि ५५ शाम्यन्त्वीतयः ५६ शुभानि वर्धन्ताम् ५७ शिवा आपः सन्तु ५८ शिवा ऋतवः सन्तु ५९ शिवा अग्नयः सन्तु ६० शिवा आहुतयः सन्तु ६१ शिवा ओषधयः सन्तु ६२ शिवा वनस्पतयः सन्तु ६३ शिवा अतिथयः सन्तु ६४ अहोरात्रे शिवे स्याताम् ६५ निकामे निकामे नः पर्जन्यो वर्षतु ६६ फलिन्यो न ओषधयः पच्यन्ताम् ६७ योगक्षेमो नः कल्पताम् ६८ शुक्राङ्गारकबुधबृहस्पतिशनैश्चरराहुकेतुसोमसहिता आदित्यपुरोगाः सर्वे ग्रहाः प्रीयन्ताम् ६९ भगवान्नारायणः प्रीयताम् ७० भगवान्पर्जन्यः प्रीयताम् ७१ भगवान्स्वामी महासेनः प्रीयन्ताम् ॥ पुण्याहकालान्वाचयिष्ये ॥ वाच्यतामिति विप्राः ॥ ततः कर्ता ॥ ॐ उद्गातेव शकुने साम गायसि ब्रह्मपुत्र इव सवनेषु शंससि ॥ वृषेव वाजी शिशुमतीरपीत्या सर्वतो नः शकुने भद्र मावद विश्वतो नः शकुने पुण्यमावद ॥ याज्यया यजति प्रत्तिर्वै याज्या पुण्यैव लक्ष्मीः पुण्यामेव तल्लक्ष्मीं संभावयति पुण्यां लक्ष्मीं संस्कुरुते ॥ यत्पुण्यं नक्षत्रम् ॥ तद्वट्कुर्वीतोपव्युषम् ॥ यदा वै सूर्य उदेति ॥ अथ नक्षत्रं नैति ॥ यावति तत्र सूर्यो गच्छेत् यत्र जघन्यं पश्येत् ॥ तावति कुर्वीत यत्कारी स्यात् ॥ पुण्याह एव कुरुते ॥ तानि वा एतानि यमनक्षत्राणि ॥ यान्येव देवनक्षत्राणि तेषु कुर्वीत ॥ यत्कारी स्यात् पुण्याह एव कुरुते ॥ महांसकुटुम्बिने महाजनान्नमस्कुर्वाणाय आशीर्वचनमपेक्षमाणायामुककर्मणः पुण्याहं भवन्तो ब्रुवन्त्विति त्रिर्वदेत् ॥ ॐपुण्याहमिति त्रिर्विप्राः ॥

ॐ स्वस्तये वायुमुपब्रवामहै सोमं स्वस्ति भुवनस्य यस्पतिः। बृहस्पतिं सर्वगणं स्वस्तये स्वस्त्य आदित्यासो भवन्तु नः॥ आदित्य उदयनीयः पथ्यैवेतः स्वस्त्या प्रयन्ति पथ्यां स्वस्तिमभ्युद्यन्ति स्वस्त्यैवेतः प्रयन्ति स्वस्त्युद्यन्ति स्वस्त्युद्यन्ति॥ ॐ स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः। स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः। स्वस्ति नस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः। स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु। अष्टौ देवा वसवः सोम्यासः। चतस्रो देवीरजराः श्रविष्ठाः। ते यज्ञं पान्तु रजसः परस्तात्। संवत्सरीणममृतं स्वस्ति॥ मह्यं सकुटुम्बिने महाजनान्नमस्कुर्वाणायाशीर्वचनमपेक्षमाणायामुकस्याप कर्मणे स्वस्ति भवन्तो ब्रुवन्त्विति त्रिः॥ ॐ आयुष्मते स्वस्ति प्रतिवचनं त्रिः॥ ॐ ऋध्याम स्तोमं सनुयाम वाजमानो मन्त्रं सरथे होपयातम्॥ दशो न पक्कं मधु गोष्वन्तरा भूतांशो अश्विनोः काममप्राः॥ सर्वामृद्धिमृध्नुयामिति तं वै तेजसैव पुरस्तात्सर्वभवच्छन्दोभिर्मध्यते ऽक्षैररुपाणिष्टाद्रायत्या सर्वतो द्वादशाहं परिभूय सर्वामृद्धिमार्ध्नो सर्वामृद्धिमृध्नोति य एवं वेद॥ ऋध्यास्म हव्यैर्नमसोपसद्य॥ मित्रं देवं मित्रधेयं नो अस्तु अनूराधान्हविषा वर्धयन्तः। शतं जीवेम शरदः सवीराः॥ त्रीणि त्रीणि वै देवानामृद्धानि त्रीणि च्छंदांसि त्रीणि सवनानि त्रय इमे लोकाः॥ ऋध्यामेव तद्वीर्य एषु लोकेषु प्रतितिष्ठति॥ मह्यं सकुटुम्बिने महाजनान्नमस्कुर्वाणायाशीर्वचनमपेक्षमाणायामुककर्मणः ऋद्धिं भवन्तो ब्रुवन्त्विति त्रिः॥ ॐ ऋध्यतामिति प्रतिवचनं त्रिः॥ ॐ श्रिये जातः श्रिय आनिरियाय श्रियं वयो जरितृभ्यो दधाति॥ श्रियं वसाना अमृतत्वमायन्भवन्ति सत्या समिथा मितद्रौ॥ श्रिय एवैनं तच्छ्रियामादधाति संततमृचा वषट्कृत्यं संतत्यै संधीयते प्रजया पशुभिर्य एवं वेद॥ यस्मिन्ब्रह्माभ्यजयत्सर्वमेतत्। अमुं च लोकमिदमूच सर्वम्। तन्नो नक्षत्रमभिजिद्विजित्य श्रियं दधात्वहृणीयमानम्॥ अहेबुध्निय मन्त्रं मे गोपाय यमृषयस्त्रैविदा विदुः। ऋचः सामानि यजूंषि सा हि श्रीरमृता सताम्॥ मह्यं सकुटुम्बिने महाजनान्नमस्कुर्वाणायाशीर्वचनमपेक्षा

माणायामुककर्मणः श्रीरस्त्विति भवन्तो ब्रुवन्त्विति त्रिः ॥ ॐ अस्तु श्रीरिति त्रिर्विप्राः ॥ अत्र सुवासिनीभिर्नीराजनं कारयेयुराचारात् ॥ ततः कर्ता । वर्षशतं पूर्णमस्तु मंगलानि भवन्तु ॥ शिवं कर्मास्तु । गोत्राभिवृद्धिरस्तु ॥ कर्मांगदेवता प्रीयताम् ॥ बौधायनोक्ततत्तत्कर्मदेवता नाम प्रथमया विभक्त्या संकीर्त्य प्रीयतां प्रीयेतां प्रीयन्तामिति देवतैकत्वाद्यनुसारेणोक्त्वा पात्रे जलं क्षिपेत् । अनादेशे देवतासंदेहे च प्रजापतिर्देवता ज्ञेया । ततः । ॐ शुक्रेभिरंगैरज आततन्वान्क्रतुं पुनानः कविभिः पवित्रैः ॥ शोचिर्वसानः पर्यायुरपां श्रियो मिमीते बृहतीरनूनाः ॥ तदप्येष श्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुतस्यावसन्गृहे ॥ आविक्षितस्य कामप्रेर्विश्वे देवाः सभासद इति ॥ तत उत्तरकलशं दक्षिणहस्ते दक्षिणकलशं वामहस्ते गृहीत्वा ताभ्यां धाराद्वयं संततं पात्रे निषिञ्चेदेभिर्मन्त्रैः ॥ (वास्तोष्पत इति चतसृणां वसिष्ठो वास्तोष्पतिस्त्रिष्टुबंत्या गायत्री उदकसेचने वि०) ॥ ॐ वास्तोष्पते प्रति जानीह्यस्मान्त्स्वावेशो अनमीवो भवा नः ॥ यत्त्वेमहे प्रति तन्नो जुषस्व शं नो भव द्विपदे शं चतुष्पदे ॥ वास्तोष्पते प्रतरणो न एधि गयस्फानो गोभिरश्वेभिरिन्दो ॥ अजरासस्ते सख्ये स्याम पितेव पुत्रान्प्रति नो जुषस्व ॥ वास्तोष्पते शग्मया संसदा ते सक्षीमहि रण्वया गातुमत्या ॥ पाहि क्षेम उत योगे वरं नो यूयं पात स्वस्तिभिः सदा नः ॥ अमीवहा वास्तोष्पते विश्वा रूपाण्याविशन् ॥ सखा सुशेव एधि नः ॥ शिवं शिवं शिवं ॥ ततो विप्राः कर्तुर्गमनः पत्नीमुपवेश्य पात्रे पातितेन जलेन पल्लवदूर्वादिभिरुदङ्मुखास्तिष्ठन्तउपविष्टा वा सपत्नीकं कर्तारमभिषिञ्चेयुः ॥ ( समुद्रज्येष्ठा इति चतसृणां वसिष्ठ आपस्त्रिष्टुप् ॥ त्रयन्तामिति तिसृणां विश्वामित्रजमदग्निवसिष्ठा आपोऽनुष्टुप् ॥ इमा आप इति तिसृणामैतरेय आपोऽनुष्टुब्जगत्यनुष्टुभः ॥ देवस्य त्वेत्यस्यैतरेयः सविताऽश्विनौ पूषा च यजुः ॥ समस्त्र्याद्यस्तीनां परमेष्ठी प्रजापतिः प्रजापतिर्बृहती ॥ अभिषेके वि० ॥ ॐ समुद्रज्येष्ठाः सलिलस्य मध्या-

स्पुनाना यन्त्यनिविशमानाः। इन्द्रो या वज्री वृषभो रराद ता आपो देवी-रिह मामवन्तु ॥ या आपो दिव्या उत वा स्रवन्ती खनित्रिमा उत वा याः स्वयंजाः । समुद्रार्था याः शुचयः पावकास्ता आपो देवीरिह मामवन्तु ॥ यासां राजा वरुणो याति मध्ये सत्यानृते अवपश्यञ्जनानाम्। मधुश्चुतः शुचयो याः पावकास्ता आपो देवीरिह मामवन्तु ॥ यासु राजा वरुणो यासु सोमो विश्वे देवा यासूर्जं मदन्ति। वैश्वानरो यास्वग्निः प्रविष्टस्ता आपो देवीरिह मामवन्तु ॥ त्रायन्तामिह देवास्त्रायतां मरुतां गणः । त्रायन्तां विश्वा भूतानि यथायमरपा असत ॥ आप इद्वा उ भेषजीरापो अमीवचातनीः । आपः सर्वस्य भेषजीस्तास्ते कृण्वन्तु भेषजम् ॥ हस्ताभ्यां दशशाखाभ्यां जिह्वा वाचः पुरोगवी ॥ अनामयित्नुभ्यां त्वा ताभ्यां त्वोपस्पृशामसि ॥ इमा आपः शिवतमा इमाः सर्वस्य भेषजीः ॥ इमा राष्ट्रस्य वर्धनीरिमा राष्ट्रभृतोऽमृताः ॥ याभिरिन्द्रमभ्य-षिञ्चत्प्रजापतिः सोमं राजानं वरुणं यमं मनुम् ॥ ताभिरद्भिरभि-षिञ्चामि त्वामहं राज्ञो त्वमधिराजो भवेह ॥ महान्तं त्वा महीनां सम्राजं चर्षणीनाम्। देवी जनित्र्यजीजनद्भद्रा जनित्र्यजीजनत ॥ देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णोः हस्ताभ्यामग्नेस्तेजसा सूर्यस्य वर्चसेन्द्रस्येन्द्रियेणाभिषिञ्चामि ॥ बलाय श्रियै यशसेऽन्ना-द्याय ॥ ॐ भूर्भुवः स्वः अमृताभिषेकोऽस्तु ॥ शांतिः पुष्टिस्तुष्टि-श्चास्तु ॥ द्विराचामेत् ॥ इति पुण्याहवाचनं ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

## मातृकापूजनप्रयोगः ।

अथ प्रयोगः। कर्ता पुण्याहवाचनसंकल्पकाले यदि मातृकापूजन-संकल्पो न कृतस्तदाऽमुककर्माङ्गभूतं मातृकापूजनं करिष्य इति संकल्पं कृत्वा मातृपितामहीप्रपितामहीमातामहीमातुःपितामहीमातुः-प्रपितामहीपितृष्वसृमातृष्वसॄणां मध्ये यावत्यो जीवन्ति तावतीः कुङ्कु-मादिभिर्यथायोग्यं संपूज्य गोमयेनोपलिप्ते रङ्गवल्ल्याद्यलंकृते देशे कृता-

न्युत्तारणप्राणप्रतिष्ठासु संस्थापितासु प्रतिमासु अभावे पटादौ लिखितास्वक्षतपुञ्जेषु वा गौर्यादिदेवता आवाहयेत् ।

तद्यथा—गौर्यै नमो गौरीमावाहयामि । पद्मायै नमः पद्मामावाहयामि । शच्यै नमः शचीमावाहयामि । मेधायै नमो मेधामावाहयमि । सावित्र्यै नमः सावित्रीमावाहयामि । विजयायै नमो विजयामावाहयामि । जयायै नमो जयामावाहयामि । देवसेनायै नमो देवसेनामावाहयामि । स्वधायै नमः स्वधामावाहयामि । स्वाहायै नमः स्वाहामावाहयामि । मातृभ्यो नमो मातृरावाहयामि । लोकमातृभ्यो नमो लोकमातृरावाहयामि । धृत्यै नमो धृतिमावाहयामि । पुष्ट्यै नमः पुष्टिमावाहयामि । तुष्ट्यै नमस्तुष्टिमावाहयामि । अमुकनाम्न्यै कुलदेवतायै नमऽमुकनाम्नीं कुलदेवतामावाहयामि । ब्राह्म्यै नमो ब्राह्मीमावाहयामि । माहेश्वर्यै नमो माहेश्वरीमावाहयामि । कौमार्यै नमः कौमारीमावाहयामि । वैष्णव्यै नमो वैष्णवीमावाहयामि । वाराह्यै नमो वाराहीमावाहयामि । इन्द्राण्यै नम इन्द्राणीमावाहयामि । चामुण्डायै नमश्चामुण्डामावाहयामि । गणाधिपाय नमो गणाधिपमावाहयामि । दुर्गायै नमो दुर्गामावाहयामि । क्षेत्रपालाय नमः क्षेत्रपालमावाहयामि । वास्तोष्पतये नमो वास्तोष्पतिमावाहयामि । इत्यावाहयेत् ।

गौर्याः पूर्वं वा गणाधिपावाहनम् । ततस्तत्तन्नाममन्त्रैः काण्डानुसमयेन पदार्थानुसमयन वा षोडशोपचारैः पूजयेत । गौर्याद्यावाहितदेवताभ्यो नम इति समुदितरूपेण वा पूजनम् । गौर्याः पूर्वं गणाधिपावाहनपक्षे गणाधिपाद्यावाहितदेवताभ्यो नम इति प्रयोगः । नान्दीश्राद्धस्य पार्थक्येन संकल्पकरणे मातृकापूजनोत्तरं पाकान्तरेण वैश्वदेवं कृत्वा तत्कर्तव्यम् । पुण्याहवाचनसंकल्पेन सहैतत्संकल्पे तु पुण्याहवाचनात्पूर्वं वैश्वदेवः पाकान्तरेणैव कार्यः । वस्तुतस्तु पार्थक्येनैव संकल्पो युक्तः ।

## नान्दीश्राद्धप्रयोगः।

कर्ता सदूर्वाङ्कुरं साक्षतं जलमादाय—सत्यवसुसंज्ञका विश्वे देवा नान्दीमुखा भूर्भुवः स्वरिदं वः पाद्यं स्वाहा न ममेयं च वृद्धिरिति पात्रे क्षिपेत् । एवमग्रेऽपि । मातृपितामहीप्रपितामह्यो नान्दीमुखा भूर्भुवः स्वरिदं वः पाद्यं स्वाहा न ममेयं च वृद्धिः । नान्दीमुख्य इति केचित । पितृपितामहप्रपितामहा नान्दीमुखा भूर्भुवः स्वरिदं वः पाद्यं स्वाहा न ममेयं च वृद्धिः । मातामहमातुःपितामहमातुःप्रपितामहाः पत्नीसहिता नान्दीमुखा भूर्भुवः स्वरिदं वः पाद्यं स्वाहा न ममेयं च वृद्धिः ।

ततः सदूर्वाङ्कुरं साक्षतगन्धपुष्पजलमादाय सत्यवसुसंज्ञका विश्वे देवा नान्दीमुखा भूर्भुवः स्वरिदं व आसनगन्धाद्युपचारकल्पनं स्वाहा न ममेयं च वृद्धिरिति पात्रे क्षिपेत् । एवमग्रेऽपि । मातृपितामहीप्रपितामह्यो नान्दीमुखा भूर्भुवः स्वरिदं व आसनगन्धाद्युपचारकल्पनं स्वाहा न ममेयं च वृद्धिः । पितृपितामहप्रपितामहा नान्दीमुखा भूर्भुवः स्वरिदं व आसनगन्धाद्युपचारकल्पनं स्वाहा न ममेयं च वृद्धिः । मातामहमातुःपितामहमातुःप्रपितामहाः पत्नीसहिता नान्दीमुखा भूर्भुवः स्वरिदं व आसनगन्धाद्युपचारकल्पनं स्वाहा न ममेयं च वृद्धिः ।

ततो गौर्यादिषोडशमातरो ब्राह्म्यादिसप्तमातरो गणाधिपदुर्गाक्षेत्रपालवसोष्पतयश्च भूर्भुवः स्वरिदं वो युष्मद्ब्राह्मणभोजनपर्याप्तान्ननिष्क्रयीभूतं चतुर्गुणं द्विगुणं समं वा हिरण्यममृतरूपेण स्वाहा न ममेयं च वृद्धिः । इति विभवानुसारेण दद्यात् । गौर्याः पूर्वं गणाधिपपूजनमिति पक्षे गणाधिपगौर्यादिषोडशमातरो ब्रह्म्यादिसप्तमातरो दुर्गाक्षेत्रपालवास्तोष्पतयश्च भूर्भुवः स्वरित्यादिप्रयोगो ज्ञेयः ।

ततः—सत्यवसुसंज्ञका विश्वे देवा नान्दीमुखा भूर्भुवः स्वरिदं

वो युग्मब्राह्मणभोजनपर्याप्तान्ननिष्क्रयीभूतं चतुर्गु० । मातृपितामही-प्रपितामह्यो नान्दीमुखा भूर्भुवः स्वरिदं वो युग्मब्रा० । पितृपितामह-प्रपितामहा नान्दीमुखा भूर्भुवः स्वरिदं वो युग्मब्राह्म० । मातामहमातुः पितामहमातुःप्रपितामहाः पत्नीसहिता नान्दीमुखा भूर्भुवः स्वरिद वो युग्म० । इति क्रमेण दद्यात् ।

ततः—उपास्मै गायता नरः ० वता मधु ९ । अक्षन्नमी० हरी इति श्रावयित्वा कृतस्य नांदीश्राद्धस्य संपूर्णतासिद्धये प्रतिविप्रं कुडव-परिमितान्प्रस्थपरिमितान्वा यथासंभवं वा द्राक्षामलकमूलयवांस्तन्नि-ष्क्रयीभूतं द्रव्यं वा दक्षिणां दत्त्वा प्रजापते न त्वदेता० रयीणामिति पठित्वा कुलदेवतां नमस्कृत्य

माता पितामही चैव तथैव प्रपितामही ।
पिता पितामहश्चैव तथैव प्रपितामहः ॥
मातामहस्तत्पिता च प्रमातामहकादयः ।
एते भवन्तु सुप्रीताः प्रयच्छन्तु च मङ्गलम् ॥

इति श्लोकद्वयं पठेत् । (ऽअत्राऽ) ऽऽदिशब्देन गुणत्वेन प्रविष्टा मातामह्यादयो ग्राह्याः । मातामहासत्त्वे प्रमातामहकस्तथैव पठेत । चतुप्रमातामहकादय इति । ) तत्तत्पार्वणाद्यजीवनवशेन यस्य कस्य-चित्पार्वणस्य लोपे तु तत्पार्पणविषयकश्लोकैकदेशस्यापि लोपः कार्यः । सूक्तवाकवाददृष्टदेवतासंस्कारार्थत्वाच्छ्लोकपाठस्य । केवलमातृपार्वण एता भवन्तु सुप्रीत्रा इत्यूहः । केवलमातृपार्वणे देवलोपः ।

ततः—इडामग्न० भूयिस्म इति मन्त्रं पठन्पात्रान्तरेण किंचिद्द्रव्यं संघट्टयेत । ततोऽनेन नान्दीश्राद्धेन नान्दीमुखदेवताः प्रीयन्तां वृद्धि-रस्त्विति वदेत । वरुणादिदेवताः कर्मसमाप्त्यन्ते विसर्जयेत । विवाहो-पनयनव्यतिरिक्तेष्वनेकदिनसाध्येषु कर्मसु तु तद्दिन एव विसर्जनम् । एतच्चानुकल्पानुष्ठानं मुख्यकल्पासंभवे वेदितव्यम् । स च मुख्यकल्पः श्राद्धप्रकरणे वक्ष्यते । इत्याभ्युदयिकश्राद्धम् ।

# अथ मण्डपदेवताप्रतिष्ठा ।

दूर्वाशमीपल्लवकुलदेवतावृक्षपल्लवानाम्रादिप्रशस्तवृक्षपत्रवेष्टितान्सूत्रेण षोढा वेष्टयेत् ॥ तत्रैकत्र मुसलमेकत्र च छुरिकादिशस्त्रं मध्ये प्रक्षिप्य वेष्टयेत ॥ तानि षड्वंशपात्रे निधाय तन्मध्ये उदक्संस्थेषु चतुर्षु नन्दिनीं नलिनीं मैत्रां उमां पशुवर्धिनीं भगवतीं चावाह्य तण्डुलपूर्णे हरिद्राखण्डपूगीफलयुते न्युब्जशरावपिहिते शरावेण सह सूत्रवेष्टिते हरिद्रादिरञ्जिते कलशे अविघ्नसंज्ञं गणपतिं चावाह्य तदस्तु गृहा वै प्रतिष्ठा इति प्रतिष्ठाप्य नीराज्य आसनाद्याचमनान्तं कृत्वा तैलेद्वर्त-नोष्णोदकैरभ्यङ्गस्नानं षण्णां वेष्टितानां कारयित्वा गन्धादिदक्षि-णान्तोपचारैः पूजयित्वा नीराज्य सपत्नीक उत्थाय आग्नेयकोणस्थ-मण्डपस्तम्भोपरि नन्दिनीं तदस्तु गृहा वै इति प्रतिष्ठाप्य समुद्रज्येष्ठा आपो हि ष्ठेति मन्त्राभ्यां प्रोक्ष्य गन्धद्वारामिति गन्धाक्षतानुदधिक्राव्ण इति दधि काण्डात्काण्डादिति दूर्वाः पुष्पाणि च समर्पयेत ॥ ततो नैर्ऋत्यवायव्यैशानस्तम्भेषु मण्डपमध्योपरिभागे काष्ठे च क्रमेण नालि-नीमैत्रोमापशुवर्धिनीनामकवेष्टितानि उक्तवत्स्थापयित्वा पूजयेत् ॥ या आपो दिव्या इति नलिन्याः प्रोक्षणे मन्त्रः ॥ यासां राजेति मैत्रायाः ॥ यासु राजेत्युमायाः ॥ समुद्रज्येष्ठा इत्यादि चत्वारोऽपि पशु-वर्धिन्याः ॥ अन्यत्सर्वं समानम ॥ ततो वंशपात्रेण सह भगवतीं गौर्यादिमातृकास्थापितवंशपात्रं स्वयं गृहीत्वा अविघ्नकलशं च पत्न्या ग्राहयित्वा सहब्राह्मणः कनिक्रदज्जनुषमिति सूक्तं पठन्मङ्गलवाद्य-घोषेण गृहान्तर्गत्वा ईशानदेशे तण्डुलादिपुञ्जत्रयोपरि त्रीण्यपि तदस्तु गृहा वै इति स्थापयित्वा चन्दनादिना संपूज्य स्थापितदेवताप्रीत्यर्थं ब्राह्मणसुवासिनीभोजनं संकल्प्य भूयसीं दद्यात ॥ ततो नीराजिताभ्यां दम्पतीभ्यां सुहृदो वस्त्राणि युवं वस्त्राणि० अभिवस्त्रा० भद्रावस्त्रा० वसिष्वाहि० सतुवस्त्रा० उभाउनूनं इत्यादिमन्त्रैर्दद्युः ॥ ततोतिक्रान्त-जातकर्मादिसंस्कारानुष्ठानम् ॥ इति मण्डपदेवताप्रतिष्ठा ॥

# उपनयनप्रयोगः ॥

श्रीः॥ कर्ता कृतनित्यक्रियः कृतमङ्गलस्नानमलंकृतं कुमारं मात्रा सह भोजयित्वा देशकालौ संकीर्त्य अस्य कुमारस्योपनयनं कर्तुं तत्प्राच्यांगभूतं वापनादि करिष्ये इति संकल्प्य कृतवापनं स्नापितं बद्धशिखं कुमारं मङ्गलतिलकं कुर्युः ॥ अत्र मौहूर्तिकं संपूज्य तदुक्ते शुभमुहूर्ते आचार्यो वेद्यां प्राङ्मुख उपविष्टस्तं ( मंगलाष्टकपद्यपाठपुरःसरं ) स्वसमीपमानीय तन्मुखं सम्यगीक्षेत ॥ कृतनमस्कारं च तं स्वाङ्के कुर्वीत ॥ अथाचारतः ये यज्ञेनेतिसूक्तेन बृहस्पते प्रथमश्चिन्त्यस्तेन तदस्तु गृहा वै इति मन्त्रैर्ब्राह्मणा उभयोः शिरस्यक्षतान्क्षिपेयुः ॥ ततस्तं स्वदक्षिणत उपवेश्य स्थण्डिलोपलेपनादि समुद्भवनामाग्निप्रतिष्ठान्तं कृत्वा ॥ समिद्द्वयमादाय क्रियमाणे उपनयनहोमे देवतापरिग्रहार्थमन्वाधानं करिष्ये ॥ अस्मिन्नन्वाहितेऽग्नावित्याद्याघाराज्येनेत्यन्तमुक्त्वाऽत्र प्रधानम् ॥ त्रिरग्निं पवमानं प्रजापतिं चाज्येन शेषेण स्विष्टकृतमित्याद्याज्यसंस्कारान्तं कृत्वा कौपीनार्थं त्रिवृत्तं कार्पाससूत्रं कटावाबध्य कौपीनं परिधाप्य ॥ युवं वस्त्राणीत्यस्यौचथ्यो दीर्घतमा मित्रावरुणौ त्रिष्टुप् ॥ वासोधारणे विनियोगः ॥ ॐ युवं वस्त्राणि पीवसा वसाथे युवोरच्छिद्रा मन्तवो ह सर्गाः॥ अवातिरतमनृतानि विश्व ऋतेन मित्रावरुणा सचेथे ॥ इति मन्त्रेण शुक्लं वासः परिधाप्यान्येन काषायवाससा तेनैव मन्त्रेण तथैव प्रावारयत् ॥ मित्रस्य चक्षुरित्यस्य वामदेवोऽजिनं त्रिष्टुप् ॥ अजिनधारणे विनियोगः ॥ ॐ मित्रस्य चक्षुर्धरुणं बलीयस्तेजो यशस्वी स्थविरं समिद्धम् ॥ अनाहनस्यं वसनं जरिष्णु परीदं वाज्यजिनं दधेऽहम् ॥ इत्यजिनं धारयित्वा ततो गायत्र्या दशकृत्वो मन्त्रितमद्भिरुपवीतं प्रोक्ष्य धारयेत ॥ यज्ञोपवीतमिति मन्त्रस्य परब्रह्मपरमात्मा त्रिष्टुप् ॥ श्रौतस्मार्तकर्मानुष्ठानसिद्ध्यर्थं यज्ञोपवीतधारणे विनियोगः ॥ ॐ यज्ञोपवीतं

परमं पवित्रं प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात् ॥ आयुष्यमग्र्यं प्रतिमुञ्च शुभ्रं यज्ञोपवीतं बलमस्तु तेजः ॥ इति मन्त्रं वाचयित्वा दक्षिणबाहुमुद्धार्थ उपवीतं धारयित्वा कुमारमात्मनेऽग्रेश्च मध्येन यज्ञपात्रोत्तरभागं गमयित्वा ॥ ततस्त्रिविधिवदाचमय्य पुनस्तीर्थेन तथैवानीय स्वदक्षिणत उपवेश्य बर्हिःस्तरणाद्याघारहोमान्तं कृत्वा ॥ अग्न आयूंषीति तिसृणां शतं वैखानसा ऋषयः ॥ अग्निः पवमानो देवता गायत्री छन्दः ॥ उपनयनप्रधानाज्यहोमे विनियोगः ॥ ॐ अग्न आयूंषि पवस० स्वाहा अग्नये पवमानायेदं० ॥ ॐ अग्निर्ऋषिः० स्वाहा ॥ अग्नये पवमानायेदं० ॥ ॐ अग्ने पव० स्वाहा ॥ अग्नये पवमानायेदं० ॥ प्रजापते हिरण्यगर्भः प्रजापतिस्त्रिष्टुप् ॥ उपनयनप्रधानाज्यहोमे विनियोगः ॥ ॐ प्रजापते न त्व० स्वाहा ॥ प्रजापतयेदं० ॥ अथाचार्य उत्तरतोऽग्नेः प्राङ्मुखस्तिष्ठेत् ॥ कुमारोऽप्यग्न्याचार्ययोर्मध्येन गत्वाचार्याभिमुखस्तिष्ठेत् ॥ अथाचार्यः कुमारस्य शुचित्वसिद्धये सवितृदेवतातृप्तये चाञ्जलिक्षारणं करिष्ये ॥ शुद्धोदकेन शिष्याञ्जलिमपूर्य स्वस्याञ्जलिमन्येन पूरयित्वा ॥ तत्सवितुरित्यस्य श्यावाश्वः सविताऽनुष्टुप् ॥ अवक्षारणे विनियोगः ॥ ॐ तत्सवितुर्वृणीमहे वयं देवस्य भोजनम् ॥ श्रेष्ठं सर्वधातमं तुरं भगस्य धीमहि ॥ अनेन स्वाञ्जल्युदकं शिष्याञ्जलाववक्षार्य तज्जलं कुमाराञ्जलिनैवावक्षारयेत् ॥ ततः शिष्यत्वसिद्ध्यर्थं बटोर्हस्तं साङ्गुष्ठं गृह्णीयात् ॥ तत्र मन्त्रः ॥ ॐ देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्यां हस्तं गृह्णामि अमुकशर्मन् ॥ पुनः पूर्ववदुदकपूरणावक्षारयेत् ॥ द्वितीये हस्तग्रहणे मन्त्रविशेषः ॥ ॐ सविता ते हस्तमग्रभीत् अमुकशर्मन् ॥ पुनरपि पूर्ववत्पूरयित्वाऽवक्षार्य ॐ अग्निराचार्यस्तव अमुकशर्मन् इति तृतीये अथाचार्यो ब्रह्मचारिणा सह निष्क्रम्य ॐ देव सवितरेष ब्रह्मचारी तं गोपाय समामृतेत्युक्त्वा ॥ संरक्षणार्थं व्रतपतये आदित्याय बटुं ददामीति मनसा स्मरन्ब्रह्मचारिणामादित्यमीक्षयेत् ॥ ततोऽन्योन्याभिमुखौ

तिष्ठेताम् ॥ अथाचार्यः कस्य ब्रह्मचार्यसि प्राणस्य ब्रह्मचार्यसि कस्त्वा कमुपनयते काय त्वा परिददामि इति मन्त्रं जपन्कुमारं प्रजापतये मनसा समर्प्य ॥ युवा सुवासा इत्यस्य कौशिको विश्वामित्रा यूपस्त्रिष्टुप् ॥ पूर्वार्धर्चस्य प्रदक्षिणावर्तने उत्तरार्धर्चस्य पाणिभ्यां बटुहृदयालम्भने विनियोगः ॥ ॐ युवा सुवासाः परीवीत आगात्स उ श्रेयान्भवति जायमानः ॥ इति बटुं प्रदक्षिणमावर्तयेन प्राङ्मुखमवस्थाप्य ॥ तदंसयोरुपरि स्वपाणी गमयित्वा ॥ ॐ तं धीरासः कवय उन्नयन्ति स्वाध्यो ३ऽ मनसा देवयन्तः इति पाणिभ्यां बटुहृदयं स्पृशेत ॥ तत आत्मानमग्निं चान्तरा बटुं नीत्वा प्रत्यगग्नेः स्वयमुपविश्य स्वस्य दक्षिणतः प्राङ्मुखं तमुपवेशयेत् ॥ ततो बटुरग्नं परिसमूहनपर्युक्षणे कृत्वा ॥ अग्नये समिधमित्यस्य हिरण्यगर्भोऽग्निर्बृहती ॥ समिदाधाने विनियोगः ॥ ॐ अग्नये समिधमाहार्षं बृहते जातवेदसे ॥ तया त्वमग्ने वर्धस्व समिधा ब्रह्मणा वयं स्वाहा ॥ अग्नय इदं न मम॥ दक्षिणं पाणिं प्रक्षाल्याग्नौ प्रताप्य॥ ॐ तेजसा मा समनज्मि इति मुखमवाङ्गनिमृज्य पाणिं प्रक्षाल्यैवं पुनर्द्विः ॥ ततस्तिष्ठन्प्रणतिमुद्रां कृत्वा ॥ मयि मेधामिति षण्णां हिरण्यगर्भ ऋषिः ॥ पूर्वेषां त्रयाणामग्नीन्द्रसूर्या देवताः ॥ उत्तरत्रयणामग्निर्देवता ॥ गायत्री छन्दः ॥ अग्न्युपस्थाने विनयोगः ॥ ॐ मयि मेधां मयि प्रजां मय्यग्निस्तेजो दधातु ॥ मयि मेधां मयि प्रजां मयीन्द्र इन्द्रियं दधातु ॥ मयि मेधां मयि प्रजां मयि सूर्यो भ्राजो दधातु ॥ यत्ते अग्ने तेजस्तेनाहं तेजस्वी भूयासम् ॥ यत्ते अग्ने वर्चस्तेनाहं वर्चस्वी भूयासम् ॥ यत्त अग्ने हरस्तेनाहं हरस्वी भूयासम् इति । षण्मन्त्रैरग्निमुपस्थाय ॥ मा नस्तोक इति कुत्सो रुद्रो जगती ॥ विभूतिग्रहणे विनियोगः ॥ ॐ मा नस्तोके तनये मा न आयौ मानो गोषु मा नो अश्वेषु रीरिषः ॥ वीरान्मा नो रुद्र भामितो वधीर्हविष्मन्तः सदमित्त्वा हवामहे ॥ इत्यनेन भस्मादाय यथाचारं त्र्यायुषं जमदग्नेरिति ललाटे ॥ कश्यपस्य त्र्यायुषमिति

कण्ठे ॥ अगस्त्यस्य त्र्यायुषमिति नाभौ ॥ यद्देवानां त्र्यायुषमिति दक्षिणस्कन्धे ॥ तन्मे अस्तु त्र्यायुषमिति वामस्कन्धे ॥ सर्वमस्तु शतायुषमिति शिरसि धृत्वा पुनः परिसमूहनपर्युक्षणे कृत्वा कृताञ्जलिस्तिष्ठन् ॥ ॐ च मे स्वरश्च मे यज्ञोपचते नमश्च ॥ यत्ते न्यूनं तस्मै त उप यत्तेऽतिरिक्तं तस्मै ते नमः ॥ अग्नये नमः ॥ ॐ स्वस्ति ॥ श्रद्धां मेधां यशः प्रज्ञां विद्यां बुद्धिं श्रियं बलम् ॥ आयुष्यं तेज आरोग्यं देहि मे हव्यवाहन ॥ इत्यग्निमुपस्थाय ॥ अग्नेरुत्तरतो गत्वा प्रत्यङ्मुखीभूयाचार्याभिमुखो भूत्वा दक्षिणं जानु भूतले निधाय पाणिभ्यां यथा सव्यदक्षिणं श्रोत्रे संस्पृश्य व्यस्तपाणिराचार्यस्य दक्षिणपादं स्वदक्षिणहस्तेन सव्यं च सव्यहस्तेन जानुप्रभृतिपादपर्यन्तं स्पृष्ट्वाऽमुकगोत्रोऽमुकशर्माऽहं भो अभिवादये इत्यभिवादयेत् ॥ आचार्येण आयुष्मान्भव सौम्य देवदत्ता ३ इति प्रयुक्ताशीर्वादः सावित्र्युपदेशं वाञ्छन् अधीहि भोः सावित्रीं भो अनुब्रू ३ हि इत्याचार्यमुक्त्वा स्ववामपाणिमुत्तानीकृत्य दक्षिणपाणिं न्यङ्मुखीकृत्य संधाय पाणिपृष्ठमंगुलीश्चाङ्गुष्ठौ च दृढीकृत्य कृतं ब्रह्माञ्जलिं दक्षिणांके निधायाचार्यान्तिकमासीत ॥ अथाचार्यस्तदञ्जलिं तत्परिधानीयवाससाच्छाद्य स्वपाणिभ्यां तदञ्जलिं परिगृह्य ॥ प्रणवस्य परब्रह्म ऋषिः परमात्मा देवता दैवी गायत्री छन्दः ॥ व्याहृतीनां परमेष्ठी प्रजापतिः प्रजापतिर्बृहती ॥ गायत्र्या विश्वामित्रः सविता गायत्री ॥ उपनयनोपदेशे विनियोगः ॥ प्रणवव्याहृतिपूर्विकां गायत्रीं पच्छोऽर्धर्चशः सर्वां अशक्तौ यथाशक्ति वा त्रिवारं स्वयमुक्त्वा वाचयेत ॥ ततः मम व्रत इत्यस्य प्रजापतिर्बृहस्पतिस्त्रिष्टुप् ॥ बटोर्हृदये ऊर्ध्वाङ्गुलिपाणिनिधाने विनियोगः ॥ ॐ मम व्रते हृदयं ते दधामि मम चित्तमनुचित्तं ते अस्तु ॥ मम वाचमेकव्रतो जुषस्व बृहस्पतिष्ट्वा नियुनक्तु मह्यम् ॥ इति स्वपाणिमूर्ध्वाङ्गुलिं बटुहृदये निधाय ॥ तस्य रक्षार्थं शुद्ध्यर्थं च मेखलामाबध्नीयात् ॥ इयं दुरुक्तादिति द्वयोर्वामदेवो मेखला त्रिष्टुप् ॥ मेखला-

बन्धने विनियोगः ॥ ॐ इयं दुरुक्तात्परिबाधमाना वर्णं पवित्रं पुनती न आगात् ॥ प्राणापानाभ्यां बलमाभरन्ती प्रिया देवानां सुभगा मेखलेयम् ॥ ऋतस्य गोप्त्री तपसः परस्पी घ्नती रक्षः सहमाना अरातीः ॥ सा नः समन्तमनु परीहि भद्रया भर्तारस्ते मेखले मा रिषाम ॥ इति मन्त्रं वाचयित्वा मेखलां त्रिरावर्त्य नाभिप्रदेशे ग्रन्थित्रयं कुर्यात् ॥ तदा बटुः साहस्याङ्कसहितवेदत्रयेण वृतोऽहमिति मन्येत ॥ तत आचार्यः ॥ स्वस्ति न इत्यस्य स्वस्त्यात्रेयो विश्वेदेवास्त्रिष्टुप् ॥ दण्डदाने विनियोगः ॥ ॐ स्वस्ति नो मिमीतामश्विना भगः स्वस्ति देव्य दितिरनर्वणः ॥ स्वस्ति पूषा असुरो दधातु नः स्वस्ति द्यावापृथिवी सुचेतुना ॥ इति मन्त्रेण दण्डं दद्यात् ॥ ततो बटोस्तद्ग्रहणे मन्त्रः ॥ अदान्तं दमयिता मां मार्गे संस्थापयन्स्वयम् ॥ दण्डः करे स्थितो यस्मात्तस्माद्रक्ष यतो भयम ॥ इति वाचयेत् ॥ ततः कुमारस्याचारमादिशेत् ॥ ब्रह्मचार्यसि ॥ अपोऽशान ॥ आचमनं कुरु ॥ मूत्रपुरीषादौ शुद्ध्यर्थमित्यर्थः ॥ कर्म कुरु ॥ संध्योपासनादीत्यर्थः ॥ दिवा मा स्वाप्सीः ॥ आचार्याधीनो वेदमधीष्व ॥ सायंप्रातर्भिक्षेथाः ॥ सायं प्रातः समिधमाधेहि ॥ द्वादश वर्षाणि वेदग्रहणान्तं वा ब्रह्मचर्यं चर ॥ अप्रत्याख्यायिनमग्रे भिक्षेथाः ॥ अप्रत्याख्यायिनीं वा ॥ ततः स्विष्टकृदादिहोमशेषं समाप्याग्निं मेधाजननान्तं रक्षेत् ॥ तत्रैव सायंप्रातरग्निकार्यं कुर्यात् ॥ ततोऽनुप्रवचनीयहोमब्राह्मणभोजनपर्याप्तां तण्डुलरूपां भिक्षां याचयेत् । तत्र क्रमः ॥ एवं मातुः स्वसारं स्वभगिनीमन्यामपि च न धवानप्रत्याख्यायिने ऽप्रत्याख्यायिनीश्च याचित्वा भैक्षमाचार्याय निवेद्य मध्याह्नसन्ध्यां कुर्यान्न वा ॥ ब्रह्मयज्ञस्तु द्वितीयदिनमारभ्य गायत्र्या कार्यः ॥ अस्मिन्कर्मणि शतं ब्राह्मणा भोज्याः ॥ इत्युपनयनप्रयोगः ॥

## अथानुप्रवचनीयहोमः ॥

श्रीः ॥ सायंसंध्योत्तरं कृतोपनयनहोमाग्नेः पश्चिमतो ब्रह्मचारिणा

सहोपविश्याचम्य प्राणानायम्य देशकालौ संकीर्त्य उपनयनाङ्गभूतम-
नुप्रवचनीयहोमं करिष्ये ॥ इति संकल्प्य ॥ अग्निं ध्यात्वा समिद्द्वय-
मादाय क्रियमाणेऽनुप्रवचनीयहोमे देवतापरिग्रहार्थमित्याद्याघाराज्ये-
नेत्यन्तमुक्त्वा ॥ अत्र प्रधानं सदसस्पतिं सवितारं ऋषींश्च चरुद्रव्येण ॥
शेषेण स्विष्टकृतमित्यादिपूर्णपात्रनिधानान्तं कृत्वा भिक्षान्नस्य देवता-
त्रयार्थं तूष्णीं चतुरश्चतुरो मुष्टीन्निरुप्य तथैव प्रोक्ष्य हविःश्रपणाघार-
होमान्तं कृत्वा अवदानधर्मेण चरुमवदाय ॥ सदसस्पतिमित्यस्य
काण्वो मेधातिथिः सदसस्पतिर्गायत्री ॥ अनुप्रवचनीयप्रधानचरुहोमे
विनियोगः ॥ ॐ सदसस्पतिमद्भुतं प्रियमिन्द्रस्य काम्यम् ॥ सनिं
मेधामयासिषं स्वाहा ॥ सदसस्पतय इदं न मम ॥ तत्सवितुरित्यस्य
गाथिनो विश्वामित्रः सविता गायत्री ॥ अनुप्रव० ॥ ॐ तत्सवितु०
स्वाहा ॥ सवित्र इदं न मम ॥ ऋषिभ्यः स्वाहा ऋषिभ्य इदं न० ॥
इति चर्वाहुतित्रयं हुत्वा स्विष्टकृदादिहोमशेषं समाप्य हविःशेषेणान्येन
वाऽन्नेन त्रीन् त्र्यवरान्वा ब्राह्मणान्भोजयेत् ॥ इत्यनुप्रवचनीयहोमः ॥

## अथ मेधाजननप्रयोगः ॥

श्रीः ॥ चतुर्थदिवसे आचम्य प्राणानायम्य देशकालौ संकीर्त्य
ममास्य कुमारस्योपनयनव्रतसमाप्तिवेदग्रहणसामर्थ्यलक्षणमेधासिद्धिद्वारा
श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं मेधाजननाख्यं कर्म करिष्ये ॥ इति संकल्प्य पुण्या-
हवाचनं कृत्वा अकृत्वा वा मेधापरनामकब्रह्मवृक्षपूजां करिष्ये ॥ वेद्यां
पलाशशाखां प्रतिष्ठाप्य तत्र मेधायै नम इति मन्त्रेणावाहनाद्युपचारा-
न्कृत्वा यावकसक्तुमिश्रमन्नं मोदकांश्च निवेद्य पुनश्च पूर्ववदभ्यर्च्य
ब्रह्मचारिणा प्रणमय्य शुद्धजलपात्रोदकेन सेचनं कुर्वता बटुना त्रिः
प्रदक्षिणं कारयन्मंत्रं वाचयेत ॥ ॐ सुश्रवः सुश्रवा असि यथा
त्वं सुश्रवः सुश्रवा अस्येवं मां सुश्रवः सौश्रवसं कुरु ॥
यथा त्वं देवानां यज्ञस्य निधिपोऽस्येवमहं मनुष्याणां वेदस्य

निधिपो भूयासम ॥ प्रतिप्रदक्षिणं मंत्रावृत्ति प्रणामं च कारयेत ॥ ततो ब्रह्मचारी स्नात्वा नवान्यज्ञोपवीताजिनमेखलादंडानुपनयनवत्स-मन्त्रकं धृत्वा पुराणानि पलाशसन्निधौ विसृज्य पूर्वधृतवाससी गुरवे दत्त्वा मेधा मह्यमिति सूक्तं विप्रैः पाठयित्वा अस्य कर्मणः पुण्याहं भवन्तो ब्रुवन्त्विति स्वस्तिवाचनं कुर्यात् ॥ ॐ मेधां मह्यमंगिरसो मेधां सप्तर्षयो ददुः । मेधामिंद्रश्चाग्निश्च मेधां धाता ददातु मे ॥ मेधां मे वरुणो राजा मेधां देवी सरस्वती ॥ मेधां मे अश्विनौ देवावाधत्तां पुष्करस्रजा ॥ या मेधा अप्सरस्सु गन्धर्वेषु च यन्मनः दैवी या मानुषी मेधा सा मामाविशतादिमाम् यन्मे नोक्तं तद्रमतां शकेयं यदनुब्रुवे निशा-मतन्निशामहै मयि व्रतं सह व्रतेषु भूयासं ब्रह्मणा संगमेमहि शरीरं मे विचक्षणं वाङ्मे मधुदमद्दुहा ॥ अवृद्धमहमसौ सूर्यो ब्रह्मणानीस्थः श्रुतं मे मा प्रहासीः ॥ मेधां देवीं मनसा रेजमानां गंधर्वजुष्टां प्रति नो जुषस्व । मह्यं मेधां वद मह्यं श्रियं वद मेधावी भूयासमजरा जरिष्णु ॥ सदस-स्पतिमद्भुतं प्रियमिन्द्रस्य काम्यम ॥ सनिं मेधामयासिषम ॥ यां मेधां देवगणाः पितरश्चोपासते तया मा मेधया मे मेधाविनं कुरु मेधाव्य १ हं सुमनाः सुप्रतीकः श्रद्धामनाः सत्यमतिः सुशेवः ॥ महायशा धार-यिष्णुः प्रवक्ता भूयासमस्य स्वधाया प्रयोगे॥इति मेधाजननान्त उपनयन-प्रयोगः ॥

# अनेक अभिप्रायांपैकीं फक्त एकच अभिप्राय.

वे. शा. काशीनाथ दीक्षित लेले यांनीं केलेलीं वेदांतसूत्रें व गीता यांवरील शांकरभाष्यांचीं भाषांतरें आणि विष्णुपुराणादिक इतर धार्मिक ग्रंथांचीं भाषांतरें आमचे पहाण्यांत असून वेळोवेळीं त्यांतील कांहीं कांहीं भागांचा आह्मीं सूक्ष्मरीत्या विचारही केलेला आहे. त्यावरून हीं भाषांतरें चांगलीं व सुबोध झालीं आहेत असें ह्मणण्यास आह्मांस कांहींच हरकत दिसत नाहीं. शास्त्रीबुवांचा अशा प्रकारच्या धार्मिक ग्रंथांवर आज सुमारें चाळीस वर्षांचा व्यासंग असून मराठीभाषा लिहिण्याचाहि त्यांस चांगला सराव असल्यामुळें ह्या व असल्या ग्रंथांचीं भाषांतरें करण्याच्या कामीं त्यांच्याप्रमाणें अधिकारी नेहमींच फार थोडे असणार हें सांगावयास नको. भारतासारख्या ग्रंथाचें भाषांतर करण्यास श्रुतिस्मृतिपुराणांची बरीच माहिति असावी लागते. ती शास्त्रीबोवांस आहे इतकेंच नव्हे तर महाभारताच्या व इतर ग्रंथांच्या भाषांतराबरोबरच मूळ ग्रंथहि जेथल्या तेथेंच त्यांनीं दिलेला आहे हा त्यांच्या ग्रंथांचा विशेष गुण आहे व त्यामुळें हे ग्रंथ अधिक संग्राह्य झाले आहेत. पण महाभारताचें भाषांतर अपुरें राहिल्यामुळें तें जितकें पुढें यावें तितकें आलें नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. त्यासाठीं शास्त्रीबुवांनीं तें भाषांतर शक्य तितक्या लवकर पुरें करावें अशी त्यांस आमची सूचना आहे. महाभारताचें मुळासह भाषांतर छापणें हें काम अवघड खरें. पण जवळ जवळ निम्म भाग ज्याअर्थी पुरा झालेला आहे त्याअर्थी तें होण्यास आश्रयदात्यांची उणीव पडेल असें आह्मांस वाटत नाहीं. कसेंही असो. महाभारताचें आणि ऋग्वेदसंहितादि दुसऱ्या त्यांच्या अपुऱ्या भाषांतर ग्रंथांचें काम त्यांच्याच हातून पुरें होणें इष्ट व जरूर आहे, व लोकाश्रयानें तें लवकरच घडून येईल अशी आह्मांस उमेद आहे.

पुणें जुलै १९१४.

बाळ गंगाधर टिळक.

# महाभारत.

(द्रोणपर्व किं. रु. ६. आगाऊ ४ रु. ट. हं. शिवाय.)

**मार्च अखेर पुस्तक रवाना.**

आकार रायल ८ पत्री कागद ६० रत्तली मोहारदार.

महाभारताचीं पहिल्या पांच पर्वांचीं पुस्तकें ६ रु० ३७॥ सवलतीची किंमत रुपये २५ ट. हं. वगैरे शिवाय.

**शारीरभाष्य रुपये १०. गीताभाष्य रुपये ७.**

# संस्कारादर्श किं. रुपये २॥.

विष्णुपुराण १॥, स्पर्शास्पर्श अथवा चारी वर्णांचा परस्परव्यवहार, ४, पुराणनिरीक्षण २, वेदविचार ३, दासोपंतांचीं पदें (सोळाशें) ४, दोन भाष्यांसह रुद्र २, मार्कंडेयपुराण ४, सप्तशती प्रकार चार ४, (भाषांतरासह, अनुलोम पाठ, विलोम पाठ व सपल्लव पाठ प्रत्येकीं १), भारतांतील सुरस आख्यानें ४०० पृष्ठें २, सभाष्य उपनिषदें तीन (ईश ८१२ केन १८६ व कठ १८९) ३८११, पुरुषसूक्त तीन भाष्यें व प्रस्तावना ह्यांसह १, बालकांड १॥, सज्याभिषेक १, ऋग्वेदसंहिता प्रथम अष्टक ६, (भाषांतरासह मूळ व भाष्य, पदें, ऋग्विधान व उपोद्घात ह्यांसह) धर्माचीं सात वर्षांचीं बांधीव पुस्तकें. किंमत प्रत्येकीं २८४, सनत्सुजात भाष्य १॥ रु.

टपालहंशील अथवा पार्सलचा आकार सर्वांसच वेगळा पडेल.

व्ही. पी. मागविणारानें १ रु. अगाऊ पाठवावा.

**काशीनाथ वामन लेले, मुंबई, नं. ४.**

# अग्निमुखविधि.

**प्राचीनप्रवण उदीचीनप्रवणे प्रागुदक्प्रवणे समे वा देश उद्धत्यावोक्ष्य**

असें हिरण्यकेशिसूत्र आहे. पूर्वेकडे, उत्तरेकडे अथवा ईशान्येकडे उतरत्या असलेल्या प्रदेशावर किंवा सारख्या असलेल्या प्रदेशावर खणून अवोक्षण करावें. अवोक्षण म्हणजे पालथ्या हातानें प्रोक्षण.

अग्नीचें आयतन केवढें असावें ह्याविषयीं हिरण्यकेशिशुल्व सूत्रामध्यें

**पिशीलमात्रा भवन्तीति धिष्णियानां विज्ञायते**

असें सांगितलें आहे. पिशील हें माप आहे. धिष्णिय म्हणजे अग्निस्थान. पिशीलाचे सहा प्रकार आहेत. अठरा अंगुलें, वीस अंगुलें, दोन बाहूंमधील अंतर, कोंपरापासून बद्धमुष्टि रत्नि, चोवीस अंगुलें आणि छत्तीस अंगुलें.

अंगुलप्रमाण बौधायनसूत्रामध्यें

**अथाङ्गुलप्रमाणं चतुर्दशाणवश्चतुस्त्रिंशत्तिलाः प्रतिसंश्लिष्टा इत्यपरम् ।**

असें सांगितलें आहे. अणु म्हणून एक व्रीहींतील जात आहे. चवदा अणु अथवा चवतीस तिळ म्हणजे एक अंगुल. तिळ थोडासा पसरट असतो. बारीक सुई घेऊन तिच्यांत पसरट भाग एकमेकांना लागेल असे चवतीस तिळ एकमेकांना चिकटून ओवले म्हणजे जी लांबी होईल तें एक अंगुल. अंगुल म्हणजे अंगुष्ठपर्व अथवा मधल्या बोटाचें मधलें पेरें असेंही कोणी म्हणतात. हें अंगुलप्रमाण गृह्यकर्मांत यजमानाचें आणि श्रौतकर्मांत यजमानाचें अथवा अध्वर्यूचें घ्यावें.

अरत्निमात्रं विज्ञेयमग्नेरायतनं शुभम् ।
श्रौते चौपासने कण्ठखातयोनिविवर्जितम् १ ॥
मेखलाद्वितयं कार्यं रेखालग्नं तु बाह्यतः २
बाह्या द्व्यङ्गुलविस्ताराऽभ्यन्तरा चतुरङ्गुला ।
बाह्या षडङ्गुलोत्सेधाऽभ्यन्तरा द्वादशाङ्गुला ३

अशीं स्मृतिवचनें आहेत. ह्या स्मृतिवचनामध्यें जो औपासन-शब्द आहे तो गृह्योक्त व लौकिकाग्निसाध्य अशा सर्व कर्मांकरितां घातलेला आहे असें समजावें. अरत्नि ह्मणजे चोवीस अंगुलें. अग्नीचें आयतन चोवीस अंगुलें चौरस चौरस—श्रौतकर्माविषयीं व गृह्योक्त औपासन-साध्य आणि लौकिकाग्निसाध्य कर्माविषयीं—समजावें. ह्या आयतनाच्या बाहेर दोन मेखला असाव्या. एक बाह्य मेखला आणि दुसरी अभ्यं-तर मेखला. बाह्य मेखला दोन अंगुलें रुंद व आंतील मेखला चार अंगुलें रुंद. त्याचप्रमाणें बाह्य मेखला सहा अंगुलें उंच व आंतील मेखला बारा अंगुलें उंच.

कुंडरूप अग्निस्थान होणें शक्य नसल्यास

**कुण्डे वा स्थण्डिले वाऽपि होमकर्म समाचरेत् ।**

ह्या स्मृतिसारोक्तीवरून स्थंडिलावरही होम करावा.

**हस्तमात्रं चतुष्कोणं बाहुमात्रमथापि वा ।**
**चतुरङ्गुलमुच्छ्रायं स्थण्डिलं सर्वकर्मसु ॥**

असें गृह्यकारिकांत सांगितलें आहे. उच्छ्राय=उंची. बाहुमात्र=खाकहात. हीं जीं दोन प्रमाणें सांगितलीं आहेत त्यांची व्यवस्था होमानुसार समजावी.

चतुरस्रं च सुश्लक्ष्णं तुल्यं सूत्रेण साधयेत् ।
समं वेदाङ्गुलोच्छ्रायं प्रागुदक्प्रवणं भवेत् ॥
अधिकं वेधुमात्रं वा कुर्याद्धोमानुसारतः ।

असें संग्रहामध्यें आहे.

आपस्तंबांनीं इषूचें प्रमाण तीन अरत्नि पुढील वचनांत सांगितलें आहे.

त्रिररत्निरिषुः स्मृतः ॥ आ० ॥

चतुर्विंशत्यङ्गुलयोऽरत्निस्तदर्धं प्रादेशः ।

असें शुल्बसूत्र आहे. अरत्नि ह्मणजे चोवीस अंगुळें आणि प्रादेश ह्मणजे बारा अंगुळें. असें ह्या सूत्रावरून ठरत आहे. कोपरापासून कनिष्ठिकेच्या अग्रापर्यंत असलेल्या लांबीलाही अरत्नि असें ह्मणतात. शतपथब्राह्मणामध्यें

पञ्चप्रादेश इषुर्भवति ।

असेंही इषुप्रमाण सांगितलेलें आहे. बौधायनसूत्रामध्यें स्थंडिल-करितां मृत्तिका कशी व किती असावी हें सांगितलेलें आहे.

**पञ्चप्रस्थसिकताः शुचयः शुक्ला आर्द्रा अरत्निमात्रं समचतुरस्रं ब्राह्मणस्य रक्तवर्णं त्रिकोणं क्षत्रियस्य पीतवर्णं रथचक्रवद्वैश्यस्य प्राक्प्रवणमुदक्प्रवणं वा स्थण्डिलं करोति ।**

असें बौधायनसूत्र आहे. पांच प्रस्थ सिकता हें प्रमाण हस्तमात्र स्थंडिलाविषयीं समजावें. सिकता ह्मणजे बारीक माती. पांच शेर शुद्ध व श्वेतवर्ण अशी कोरडी माती आणून समचतुरस्र व औरस चौरस अरत्निमात्र असें ब्राह्मणाचें स्थंडिल करावें. क्षत्रियाचें स्थंडिल रक्तवर्ण व त्रिकोणी असावें आणि वैश्याचें रथाच्या चाकाप्रमाणें व पीतवर्ण असावें. स्थंडिल पूर्वेकडे अथवा उत्तरेकडे उतरतें असावें.

**सिकताश्चतुरङ्गुलं प्राचीमुच्छ्रयति पञ्चाङ्गुलं पश्चादूर्ध्वाङ्गुलविशेषं दक्षिणत ऊर्ध्वाङ्गुलिप्रमाणं दक्षिणतः ।**

असा स्थंडिल करण्याचा प्रकारही बौधायनसूत्रांत सांगितला आहे. उर्ध्वाङ्गुलिप्रमाण ह्मणजे बोटाच्या लांबीइतकें प्रमाण असा अर्थ नव्हे. उदक सोडितेवेळीं जसा आपण हात करितों तसा हात धरिल्यास तर्जनी व अनामिका ह्या दोन बोटांच्या मधलें जें अंतर तें ऊर्ध्वांगु-लिप्रमाण होय. पूर्वेकडे स्थंडिलाची उंची चार अंगुळें व पश्चिमेकडे

तो पांच अंगुलें असावी. म्हणजे प्राचीनप्रवण स्थंडिल होईल. त्याच प्रमाणें दक्षिणेकडे उंची एक ऊर्ध्वांगुलि जास्त आणि उत्तरेकडे एक ऊर्ध्वांगुलि कमी असें केल्यानें उदीचीनप्रवण स्थंडिल होतें.

**प्राक्प्रवणमुदक्प्रवणं वा स्थण्डिलं करोति । पञ्चाङ्गुलोच्छ्रायं पश्चाच्चतुरङ्गुलोच्छ्रायं पुरत एवमेवान्यत्र ।**

असें दुसऱ्या एका सूत्रांत सांगितलेलें आहे. "पूर्वेकडे स्थंडिल उतरतें करावयाचें असल्यास पश्चिमेकडील उंची पांच अंगुलें व पूर्वेकडील उंची चार अंगुलें करावी आणि उत्तरेकडे उतरतें करावयाचें असल्यास दक्षिणेकडील उंची पांच अंगुलें व उत्तरेकडे उंची चार अंगुलें करावी" हें ह्याचें तात्पर्य होय.

**प्राचीनप्रवणं ब्रह्मवर्चसकामस्योदीचीनप्रवणमन्नाद्यकामस्य प्रागुदक्प्रवणं प्रजाकामस्य समं प्रतिष्ठाकामस्य ।**

ह्या बौधायनसूत्रामध्यें काम्य पक्ष दर्शविले आहेत. " ब्रह्मवर्चसकामना असल्यास स्थंडिल पूर्वेकडे उतरतें; अन्नाद्यकामना असल्यास उत्तरेकडे उतरतें; यजमान प्रजाकाम असल्यास ईशान्येकडे उतरतें आणि प्रतिष्ठाकाम असल्यास स्थंडिल सारखें" असें सूत्राचें तात्पर्य आहे.

## सिकतादोष.

सिकतादोष बौधायनसूत्रांत सांगितले आहेत ते येणें प्रमाणें:—

**अथातः सिकतादोषान्व्याख्यास्यामो भस्मकेशतुषकपालशर्करातृणास्थिपिपीलिकावतीभिरार्द्राभिः सिकताभिर्वर्जयेद्भस्मना यजमानक्षयः केशेन स्त्रीमरणं तुषैः पुत्रनाशः कपालैरर्थनाशः शर्कराभिर्बन्धुवियोगस्तृणेन कर्मक्षयोऽस्था ग्रामनाशः पिपीलिकाभी राष्ट्रनाश आर्द्रसिकताभिर्भयं भवतीत्याह भगवान्बौधायनः ।**

ह्या सूत्राचें तात्पर्य येणें प्रमाणें:—मातींत राख असल्यास यजमानाचा क्षय, केश असल्यास स्त्रीमरण, कोंडा असल्यास पुत्रघात,

विट्कुरें अथवा खापरें असल्यास द्रव्यनाश, शर्करा असल्यास बंधु-वियोग, गवत असल्यास कर्मक्षय, अस्थि असल्यास गांवाचा नाश, मुंग्या असल्यास राष्ट्राचा नाश आणि ओलेपणा असल्यास भय.

होमप्रसंगीं स्थंडिलाच्या मृत्तिकेविषयीं कोठेंच काळजी घेतली जात नाहीं. परंतु, काळजी न घेणें हें किती भयंकर आहे हें ह्यावरून समजेल. पिपीलिकाशब्द इतर कीटकांच्याही उपलक्षणाकरितां आहे ह्मणून समजावें. विधानपारिजातामध्यें होमाच्या मानानें स्थंडिलाच्या उंचीचें प्रमाण सांगितलें आहे तें येणें प्रमाणें:—

कार्या शतार्धेऽङ्गुलसंमितोच्छ्रितिः
शताहुतौ द्व्यङ्गुलसंमितोच्छ्रितिः ।
सहस्रहोमे चतुरङ्गुलोच्छ्रिति-
र्वस्वङ्गुला स्यादयुते समुच्छ्रितिः ॥ १ ॥
नृपाङ्गुला लक्षहुतौ समुच्छ्रिति-
र्विंशाङ्गुला स्यात्प्रयुते समुन्नतिः ।
तत्त्वाङ्गुला कोटिमखे समुच्छ्रिति-
स्ततोऽधिकं नो विदधीत मानकम् ॥ २ ॥

"पन्नास आहुतींपर्यंतच्या होमाचें स्थंडिल अर्धांगुल उंच; पन्नास आहुतींनंतर शंभर आहुतींपर्यंतच्या होमाचें स्थंडिल दोन अंगुलें उंच; पुढें सहस्र होमापर्यंत चार अंगुलें; पुढें दहा हजार होमापर्यंत आठ अंगुलें; पुढें लक्ष होमापर्यंत चवदा अंगुलें; पुढें दहा लक्ष होमांपर्यंत वीस अंगुलें आणि पुढें कोटि होमापर्यंत चोवीस अंगुलें. ह्यापेक्षां अधिक उंचीचें प्रमाण नाहीं." हें ह्या श्लोकांचें तात्पर्य होय,

एकुणपन्नास आहुतींपर्यंत स्थंडिलच असावें व तें स्थंडिल अठरा अंगुलें चौरस चौरस असून अंगठ्या इतकें उंच असावें. पन्नास पासून पुढल्या होमाविषयीं कुंड असणें बरें; अशक्त पक्षीं स्थंडिलालाही हरकत

नाहीं. पंन्नासापासून नव्याण्णवापर्यंतच्या होमाचें औरसचौरस कुंड रत्नि मात्र असावें. पुढें नऊशें नव्याण्णव आहुतींपर्यंत अरत्निमात्र असावें. सहस्रापासूनच्या होमाविषयीं कुंड हस्तमात्र असावें. दहा हजारांपासूनच्या होमाविषयीं दोन हात कुंड असावें. लक्षापासून चार हात कुंड असावें. दशलक्षापासून सहा हात असावें. कोटि होमापासून आठ अथवा दहा हात कुंड असावें. दहा हजारांपासूनच्या होमाविषयीं व पुढल्या होमाविषयीं जे दोन हात, चार हात वगैरे प्रमाण सांगितलें आहे तें प्रमाण एकेका बाजूंचें असें समजूं नये. सर्व स्थंडिलें अथवा कुंडें औरसचौरस सारखींच व्हावयाचीं असतात. तेव्हां चार हात कुंड ह्मणजे प्रत्येक बाजू दोन दोन हात. दोन्ही बाजूंचा मिळून गुणाकार अथवा सर्व बाजू सारख्याच असल्यामुळें बाजूच्या एका लांबीचा वर्ग चार हात होईल इतकी एकेका बाजूची लांबी समजावी. दोन हात, सहा हात इत्यादिकांविषयीं हाच न्याय समजावा. गणित केलें असतां दोन हात, चार हात वगैरे कुंडांच्या बाजूचें प्रमाण जें निघतें तें येणें प्रमाणें:—हात ह्मणजे चोवीस अंगुलें. अंगुल ह्मणजे आडवे ठेविलेले आठ यव; अथवा मधल्या बोटाचें मधलें पेरें; किंवा मुठ ह्मणजे चार अंगुलें. चवतीस अंगुलांना अर्धा यव कमी इतकी लांबी एकेका बाजूची दोन हात कुंड करावयाचें असल्यास होते. तीन हात कुंडाची बाजू साडेएकेचाळीस अंगुलें. चार हात कुंडाची बाजू अठ्ठेचाळीस अंगुलें. पांच हात कुंडाची बाजू पावणे चोपन्न अंगुलें. सहा हात कुंडाची बाजू पावणेएकुणसाठ अंगुलें. सात हात कुंडाची बाजू साडेत्रेसष्ट अंगुलें. अडुसष्ट अंगुलाला एक यव कमी इतकी लांबी आठ हात कुंडाच्या बाजूची होते. नऊ हात कुंडाची बाजू बहात्तर अंगुलें आणि दहा हात कुंडाची बाजू शहात्तर अंगुलें. व्यास, खात, नाभि, कंठ, मेखला व योनि हीं कुंडांचीं अंगें आहेत. तीं इतर ग्रंथांवरून जाणावीं.

# उपलेपन.

गोमयानें स्थंडिल सारवावें असें सांगितलेलें असतें. ह्याला उपलेपन असें ह्मणतात. ह्याचें कारण स्मृतिरत्नाकरामध्यें घेतलेल्या पुराणवचनांत पुढीलप्रमाणें निर्दिष्ट केलें आहे.

**सर्वत्र वसुधा मेध्या सशैलवनकानना ।**
**अथ विष्णुपदाक्रान्तोपलेपनमिदं कुतः ॥**
**पुरा शक्रो हि वज्रेण वृत्रं हत्वा महासुरम् ।**
**तन्मेदसा हि निर्लिप्ता तदर्थमुपलेपनम् ।**

"पर्वत, वनें व अरण्यें ह्यांसह पृथ्वी मूळची सर्वत्र पवित्र असून नंतर विष्णुपदांनीं ती व्याप्त झाली आहे. तेव्हां हें उपलेपन कशाला? पूर्वीं इंद्रानें ज्या वृत्रासुराचा वध केला त्याच्या मेदानें पृथ्वी लिप्त झाल्यामुळें उपलेपन अवश्य आहे." असें ह्या श्लोकांत सांगितलें आहे. स्थंडिलाचें उद्धनन झाल्यानंतर त्याच्यावरून कुत्रें वगैरे गेल्यास किंवा गाईनें अथवा अश्वानें मूत्र व पुरीष ह्यांचा अथवा रेताचा उत्सर्ग केल्यास किंवा दुसऱ्या कोण्या श्वापदाचा पाय पडल्यास त्याच्यावर प्रोक्षण करून आणि पडलेले अशुद्ध पदार्थ काढून टाकून

**पृथिवि देवयजन्योषध्यास्ते मूलं मा हिꣳसिषम् ।**

ह्या मंत्राचा जप करावा आणि जितकें कर्म झालें असेल त्याच्या पुढें करावें. असें धर्मसूत्रांत सांगितलें आहे.

**यस्मिन्प्रदेशेऽग्निमुपसमाधास्यन्स्यात्तत्र प्राचीरुदीचीश्च तिस्रस्तिस्रो रेखा लिखित्वाऽद्भिरवोक्ष्योत्सिच्य तदुदकशेषमुत्तरेण पूर्वेण वाऽन्यदुपनिदध्यात् ।**

असें धर्मसूत्रांत सांगितलें आहे. जेथें अग्निस्थापना करावयाची असेल तेथें पश्चिमेकडून पूर्वेकडे व दक्षिणेकडून उत्तरेकडे अशा तीन तीन रेषा काढून त्यावर उदक शिंपडावें. तें उदक त्या अग्नि-

स्थानाच्या उत्तरेस किंवा पूर्वेस टाकावें आणि कर्माकरितां दुसरें उदक घ्यावें. असें ह्या सूत्राचें तात्पर्य आहे. हें रेखाकरण उद्धनन करण्याच्या पूर्वीच करावें.

## रेखाउल्लेखनसाधन.

**न लोष्टेन न काष्ठेन न शर्करया न नखेन ।**
**काष्ठेन वै व्याधितः स्याल्लोष्टेन कुलनाशनम् ॥**
**शर्करया पुत्रनाशः स्यान्नखेन बन्धुनाशनम् ।**

**तस्मात्सुवर्णरजतताम्रशकलेन व्रीहिभिर्यवैर्वा दर्भैरङ्गुष्ठेन च महानाम्न्या चोपसंगृह्य तस्य मध्यमं प्राचीनं संततमृजुमुल्लिखेत्**

असें बौधायन गृह्यसूत्रांत सांगितलें आहे. "काष्ठानें व्याधि, डिखळानें कुलनाश, शर्करेनें पुत्रनाश व नखानें बंधुनाश होत असतो. ह्यास्तव, सुवर्णाच्या, रजताच्या अथवा ताम्राच्या शकलानें, व्रीहींनीं अथवा यवांनीं तें शकल अथवा धान्य दर्भांत गुंडाळून आणि अंगुष्ठ व अनामिका ह्या दोन बोटांत धरून सरळ रेषा काढावी. लोष्टानें, काष्ठानें, शर्करेनें अथवा नखानें रेषा काढूं नयें." असें या सूत्राचें तात्पर्य आहे. लोष्ट ह्मणजे डिखूळ.

**न नखेन न काष्ठेन नाश्मना मृण्मयेन वा ।**
**प्रोल्लिखेत्स्थण्डिलं विप्रः सिद्धिकामस्तु यो भवेत् १ ॥**
**भवेन्नखेन कुनखी काष्ठेन व्याधिमृच्छति ।**
**अश्मना धननाशः स्यान्मृण्मयेन कलिर्ध्रुवम् ॥ २ ॥**
**फलेन सुसमृद्धः स्यात्पुष्पेण श्रियमृच्छति ।**
**वर्णेन धनलाभः स्याद्दीर्घमायुः कुशेन वा ॥ ३ ॥**
**ताम्रशलाकयुतेनाद्यौ लिखेत्स्थण्डिलमुत्तमम् ॥ ४ ॥**

असें गोभिलपरिशिष्टांत सांगितलें आहे. "नखानें, काष्ठानें पाषाणानें अथवा मृत्तिकेच्या पदार्थानें स्थंडिलरेषा सिद्धीच्छु विप्रानें काढूं

नये१. नखानें कर्ता कुनखी व काष्ठानें व्याधिग्रस्त होत असून पाषाणानें धननाश व मृण्मयानें निःसंशय कलह होतो. फलानें चांगली समृद्धि, पुष्पानें संपत्ति, पानानें धनलाभ व दर्भानें दीर्घ आयुष्य प्राप्त होतें. ह्यास्तव, ताम्रशकलयुक्त फळानें, पुष्पानें, पानानें अथवा दर्भानें प्रथम स्थंडिलावर रेखाकरण करावें" असें ह्या वचनांचें तात्पर्य आहे.

## अवोक्षणलक्षण.

**अवार्चीनेन हस्तेन कर्तव्यं स्यादवोक्षणम् ।**

ह्या संग्रहोक्त वचनामध्यें पालथ्या हातानें जें कर्तव्य तें अवोक्षण असें सांगितलें आहे.

## अग्नि कोठला असावा ?

**अग्निं मथित्वा लौकिकं वाऽऽहृत्य न्युप्योपसमादधाति**

असें हिरण्यकेशी गृह्य सूत्र आहे. मंथनानें काढिलेला अथवा लौकिक अग्नि आणून स्थापावा असें ह्या सूत्रांत सांगितलें आहे.

## अग्नि कोठें स्थापावा ?

**कुण्डे वा स्थण्डिले वाऽपि तत्तन्नाम्ना हविर्भुजम् ।**
**व्याहृतीभिर्मध्यदेशे योग्यं स्वाभिमुखं क्षिपेत् ॥**

असें वचन स्मृतिसार ग्रंथामध्यें आहे. "कुंडाच्या अथवा स्थंडिलाच्या मध्यभागीं त्या त्या नांवानें अग्नीची स्थापना व्याहृतींनीं करावी" असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे.

## अग्नीचें महत्त्व.

अग्नीचें महत्व दोन प्रकारचें आहे. जेथून काढावयाचा किंवा आणावयाचा त्या स्थानासंबंधानें योग्यता आणि प्रदीप्तिप्रभृति गुण.

**उत्तमोऽरणिजन्योऽग्निरुत्तमः सूर्यकान्तजः ।**

मध्यमः श्रोत्रियागाराद्धमः स्वगृहादिजः ।

असें वचन सिद्धान्तशेखरामध्यें आहे. "अरणि व सूर्यकान्त ह्यांपासून काढिलेला अग्नि उत्तम, श्रोत्रियाच्या घरांतून आणिलेला मध्यम आणि इतर कनिष्ठ" असें ह्या वचनांत सांगितलें आहे.

कुण्डे वा स्थण्डिले वाऽपि मध्यदेशे हविर्भुजम् ।
दीप्तवह्न्यङ्गारमयं निर्धूमं स्थापयेद्बुधः ।

असें वचन स्मृत्यर्थसारामध्यें आहे. दुसऱ्या प्रकारची योग्यता ह्या वचनांत निर्दिष्ट आहे.

## अग्निप्रणयनपात्र.

सौवर्णं राजतं ताम्रं तदभावे तु मृण्मयम् ।
पात्रान्तरेण पिहितमग्निप्रणयने स्मृतम् ॥

असें अत्रिवचन आहे.

पात्रान्तरेण पिहिते ताम्रपात्रादिके शुभे ।
अग्निप्रणयनं कुर्याच्छरावे तादृशेऽपि वा ॥

असें गोभिलवचन आहे आणि

तैजसे ताम्रपात्रे वा शरावेऽभिनवे तु वा ।

असें वचन नारदपंचरात्रांत आहे.

अग्निप्रणयनाला सोन्याचे, रुप्याचे, तांब्याचें अथवा मृत्तिकेचें पात्र असावें आणि त्या पात्रांत अग्नि घालून व दुसरें पात्र त्यावर पालथें घालून अग्निप्रणयन करावें." शराव ह्मणजे मातीचा परळ.

शरावे भिन्नपात्रे वा कपाले त्वायसेऽपि वा ।
नाग्निप्रणयनं कुर्याद्व्याधिहानिभयावहम् ॥

असें वचन स्मृतिसारामध्यें आहे. येथें जो अग्निप्रणयनाविषयीं मृत्तिकेच्या परळाचा निषेध सांगितलेला आहे तो जुन्या परळासंबंधानें समजावा. जुना परळ, फुटकें पात्र, खापर अगर लोखंडी पात्र अग्निप्रणयनाला वापरल्यास व्याधि व हानि ह्यांचें भय असतें.

**कपालैर्भिन्नपात्रैर्वा न त्वामैर्गोमयेन वा ।**
**अग्निप्रणयनं कार्यं यजमानभयावहम् ॥**

असें गोभिलपरिशिष्टांत सांगितलें आहे. खापर, कौल, फुटकें पात्र, कच्चें मृत्तिकापात्र अथवा गोमय, यजमानाला भय उत्पन्न करणारें असल्यामुळें त्याच्या योगानें अग्निप्रणयन करूं नये. गोरीवर अग्नि नेऊं नये हें विशेष लक्ष्यांत ठेविलें पाहिजे.

**अल्पः प्रणीतो विच्छिन्नोऽसमिद्धश्चापरिष्कृतः ।**
**त्वरया पुनरानीतो यजमानभयावहः ॥ १ ॥**
**तस्माच्छुभेन पात्रेण अविच्छिन्नाकृशं बहु ।**
**अग्निप्रणयनं कुर्याद्यजमानशुभावहम् ॥ २ ॥**
**शुभं पात्रं तु कर्तव्यं यजमानसुखावहम् ।**
**शुभं पात्रं तु कांस्यं स्यात्तेनाग्निं प्रणयेद्बुधः ॥ ३ ॥**
**तस्याभावे शरावेण नवेनाभिमुखं च तम् ॥ ४ ॥**

असेंही गोभिलपरिशिष्टांतच सांगितलें आहे. अल्प=कर्माला न पुरेसा. विच्छिन्न=बारके बारके अंगार असलेला, फोफाटा. अपरिष्कृत=दुसरें पात्र वर असणें इत्यादि संस्कारांनीं रहित. असमिद्ध=प्रदीप्त नसलेला. कांस्यपात्र अथवा नवा परळ अग्निप्रणयनास शुभ होय असें ह्या ठिकाणीं सांगितलें आहे.

**अग्निसंस्थापनं कुर्याद्वाग्यतः संयतेन्द्रियः ।**

असें प्रयोगदर्पणांत संग्रहांतील वचन असल्यामुळें अग्निस्थापना जितेंद्रिय पुरुषानें मौनधारणपूर्वक करावी.

**स्नास्यतो वरुणः कान्तिं जुह्वतोऽपि श्रियं हरेत् ।**
**भुञ्जतो मृत्युरायुष्यं तस्मान्मौनं त्रिषु स्मृतम् ॥**

असें स्मृतिवचन प्रयोगपारिजातांत घेतलेलें आहे. "मौनधारण न करितां स्नान करणाऱ्याची कांति वरुण हरण करितो; हवन करणाऱ्याची संपत्ति अग्नि हरण करितो आणि भोजन करणाऱ्याचें

आयुष्य मृत्यु हरण करितो. ह्मणून ह्या तीन कर्मांमध्यें मौन अवश्य आहे." असें तात्पर्य आहे. पारिजात ग्रंथामध्यें कोणत्या कर्माला कोणत्या नांवाचा अग्नि हें सांगितलें आहे.

## कर्मसंबंधीं अग्नीचीं नांवें.

पावको लौकिको ह्यग्निः प्रथमः परिकीर्तितः ।
अग्निस्तु मारुतो नाम गर्भाधाने विधीयते ।
ततः पुंसवने ज्ञेयः पवमानस्तथैव च ।
सीमन्ते मङ्गलो नाम प्रबलो जातकर्मणि २
नाम्नि वै पार्थिवो ह्यग्निः प्राशने तु शुचिः स्मृतः ।
सत्यनामा तु चौले स्याद्व्रतादेशे समुद्भवः ३
गोदाने सूर्यनामाऽग्निर्विवाहे योजकः स्मृतः ।
चतुर्थ्यां तु शिखी प्रोक्तो धृतिरग्निरथापि वा ४
आवसथ्ये द्विजो ज्ञेयो वैश्वदेवे तु रुक्मकः ।
प्रायश्चित्ते तु विट्चैव पाकयज्ञेषु पावकः ५
देवानां हव्यवाहश्च पितृणां कव्यवाहनः ।
शान्तिके वरदः प्रोक्तः पौष्टिके बलवर्धनः ६
पूर्णाहुत्यामिडो नाम क्रोधोऽग्निश्चाभिचारिके ।
वश्यार्थे कामदो नाम वनदाहे तु दूषकः ७
कुक्षौ तु जाठरो ज्ञेयः क्रव्यादो मृतदाहने ।
वह्निनामा लक्षहोमे कोटिहोमे हुताशनः ८
समुद्रे वाडवो ह्यग्निः क्षये संवर्तकस्तथा ।
ब्रह्मा वै गार्हपत्यस्तु ईश्वरो दक्षिणस्तथा ९
विष्णुराहवनीयस्तु अग्निहोत्रे त्रयोऽग्नयः ।
ज्ञात्वैवमग्निनामानि गृह्यकर्म समारभेत् १०

शेवटल्या सार्ध श्लोकांपैकीं पहिल्या श्लोकांत "अग्निहोत्राचे गार्हपत्य, दक्षिण व आहवनीय हे तीन अग्नि अनुक्रमें ब्रह्मा, विष्णु महेश्वर होत" असें सांगितलें आहे.

व्याहृतींनीं अग्निस्थापना सांगितलेली आहे. तथापि '**भूर्भुवः स्वरोमित्यग्निं प्रतिष्ठापयति ।** असें भरद्वाजवचन असल्यामुळें प्रणवान्त व्याहृतींनीं अग्निस्थापना करावी.

**नाप्रोक्षितमिन्धनमग्नावादध्यात् ।**

असें हिरण्यकेशिधर्मसूत्रांत सांगितलें आहे. 'श्रौत, स्मार्त अथवा लौकिक अग्नीमध्यें प्रोक्षणाशिवाय इंधन घालूं नये.' असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे.

मनुस्मृतीमध्यें मुखानें अग्निप्रज्वलनाचा निषेध सांगितलें आहे. परंतु,

**मुखेनोपधमेदग्निं मुखादग्निरजायत ।**

असें दुसरें स्मृतिवचन आहे. त्यावरून मुखानें फुंकर घालावा किंवा न घालावा असा विकल्प होणार ह्मणून कोणी ह्मणतात. परंतु, हा विकल्प नाहीं. फुंकणी घेतल्याशिवाय नुसत्या तोंडानें फुंकर मारूं नये असें निषेधवचनाचें तात्पर्य आहे. कारण, मुखांतील थुंकीचे शिंतोडे अग्नीवर पडण्याचें भय असल्यामुळें केवल मुखानें अग्निधमन निषिद्ध सांगितलेलें आहे.

**मुखादग्निरजायत तस्मान्मुखेनोपसमिध्यते ।**

ह्या वाजसनेयि श्रुतीमध्यें मुखानेंच अग्निप्रज्वलन सांगितलें आहे व ईश्वराच्या मुखापासून अग्नीची उत्पत्ति हें त्याचें कारण सांगितलें आहे.

**धमनीमन्तरा कृत्वा तृणं वा काष्ठमेव वा ।**
**मुखेनोपधमेदग्निं मुखादग्निरजायत ॥**
**वेणोरग्नेः प्रसूतत्वाद्वेणुरग्निश्च पावनः ।**
**तस्माद्वेणुधमन्यैव धमेदग्निं विचक्षणः ॥**

अशीं वचनें संग्रहामध्यें आहेत. तृण, काष्ठ अथवा फुंकणी मध्यंतरीं घेऊन मुखानें फुंकर घालावा. कारण, मुखापासून अग्नि उत्पन्न झाला आहे. वेणूपासून अग्नि उत्पन्न होत असल्यामुळें

वेणु व अग्नि हीं दोन्हीं पवित्र होत. ह्मणून कळकाच्या फुंकणीनेंच अग्नि प्रज्वलित करावा असें तात्पर्य आहे.

**तेजो वै वेणुः । तेजः प्रवर्ग्यः । तेजसैव तेजः समर्धयति ।**

असें तैत्तिरीय आरण्यकामध्यें प्रवर्ग्यप्रकरणांत सांगितलें आहे. ह्या श्रुतीमध्यें वेणु ह्मणजे कळक हेंच तेज होय असें स्पष्ट सांगितलें आहे.

**न वेणुनाऽग्निं संस्पृशेत् ।**

ह्या वचनामध्यें वेणूनें अग्नीला स्पर्श करूं नये असें सांगितलें आहे. ह्यास्तव, अग्नीला फुंकणी लावूं नये. कळकाचें सर्पण वर्ज्य असण्याचेंही कारण हेंच.

**वस्त्रेण वाऽथ पर्णेन पाणिशूर्पास्यदारुभिः ।**
**न कुर्यादग्निधमनं न कुर्याद्व्यजनादिना ॥**

असें देवलवचन आहे. वस्त्र, पान, हात, सूप, मुख, काष्ठ व विंझोणा वगैरे हीं अग्नि चेतविण्याविषयीं ह्या वचनांत वर्ज्य सांगितलेलीं आहेत.

**पर्णेन धमने व्याधिः शूर्पेण धननाशनम् ।**
**पाणिना मृत्युमाप्नोति दारुणा कान्तिनाशनम् ॥**
**वस्त्रेण स्त्रीविनाशः स्यादास्येनायुष्क्षयो भवेत् ।**

अशीं वचनें संग्रहामध्यें आहेत. पानानें वारा घातल्यास व्याधि, सुपानें धननाश, हातानें मृत्यु, काष्ठानें कांतिनाश, वस्त्रानें स्त्रीविनाश आणि मुखानें आयुष्याचा क्षय होतो असें ह्यांचें तात्पर्य आहे.

**व्याहृतिभिर्न्युप्योपसमाधायोपतिष्ठते जुष्टो दमूना अतिथिर्दुरोण इति ।**

असें बौधायनवचन आहे. ह्यावरून अग्निस्थापनेनंतर त्याचें उपस्थान करणें अवश्य आहे.

## अग्निध्यान.

होष्यन्नग्नेर्विजातीयात्स्वरूपं श्रुतिचोदितम् ।
अजानता कृतं कर्म तदल्पफलमिष्यते ॥

असें गोभिलवचन आहे. होम कर्तव्य असतांना अग्नीचें श्रुत्युक्त स्वरूप जाणावें. तें न जाणितां केलेल्या कर्माचें फळ थोडें येतें.

वैश्वानरं स्थितं ध्यायेत्समिद्धोमेषु देशिकः ।
शयानमाज्यहोमेषु निषण्णं शेषवस्तुषु ॥

असें वचन शारदातिलकामध्यें आहे. " समिधांचें हवन असल्यास अग्नि उभा असल्याचें, आज्यहोम असल्यास निजला असल्याचें आणि इतर द्रव्यांचें हवन असल्यास तो बसला असल्याचें मनांत आणावें. " असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे.

## अन्वाधान.

अन्वाधान करणें तें आचारप्राप्त ह्मणून करावें. अन्वाधानाकरितां लहु लहु तीन समिधा घ्याव्या. लहु लहु तीन समिधा अग्नीवर देणें ह्यासच अन्वाधान ह्मणतात. अन्वाधानसमयीं देवतानिर्देश करण्याचाही शिष्टसंप्रदाय आहे.

## परिस्तरण.

प्रागग्रैर्दर्भैरग्निं परिस्तृणात्यपि वोदगग्राः पश्चात्पुरस्ताच्च भवन्ति दक्षिणानुत्तरानुत्तरानधरान्यदि प्रागुदगग्राः ।

असें हिरण्यकेशिगृह्यसूत्र आहे. "अग्नीच्या भोंवतीं चारी दिशेस प्रागग्र दर्भ पसरावे; किंवा दक्षिणेकडील व उत्तरेकडील दर्भ उदगग्र असावे. प्रागग्र व उदगग्र दर्भ परिस्तरणांकरितां घातल्यास दक्षिणेकडील दर्भ—पूर्वेकडील व पश्चिमेकडील दर्भांच्या—वर असावे आणि उत्तरेकडील दर्भ खालीं असावे " असें ह्या सूत्राचें तात्पर्य आहे. प्रत्येक बाजूस चार चार तरी दर्भ परिस्तरणांकरितां असावे.

## परिस्तरणप्रदेश.

**दशाङ्गुलप्रमाणेन परिस्तीर्य कुशान्क्रमात् ।**

असें कश्यपवचन आहे. ह्यावरून अग्नीच्या आयतनापासून परिस्तरणें दहा अंगुलें लांब असावीं असें ठरतें.

**त्रिभिश्चैव चतुर्भिश्च पञ्चभिः षड्भिरङ्गुलैः ।**
**सेचनं परिधींश्चैव स्तरणं पूजनं तथा ॥**

असेंहीं एक स्मृतिवचन आहे. "परिषेक, परिधि, दर्भास्तरण व पूजन हीं अग्नीच्या आयतनापासून अथवा बाहेरल्या मेखलेपासून अनुक्रमें तीन, चार, पांच व सहा अंगुळांवर करावीं." असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे. ह्यावरून परिस्तरणें पांच अंगुलें अंतरावर अथवा दहा अंगुलें अंतरावर घालावीं असा विकल्प ठरतो. हवन पुष्कळ व्हावयाचें असल्यास अग्निही पुष्कळ अवश्य असल्यामुळें परिस्तरणें दहा अंगुलें लांबीवर असावीं; आणि हवन कमी असल्यास तीं पांच अंगुलें लांबीवर असावीं; कारण, परिस्तरणें दग्ध झाल्यास प्रायश्चित्त आहे. हिरण्यकेशिसूत्रानुसारी लोकांनीं आयतनाला चिकटूनच परिस्तरणें घातलीं पाहिजेत असें गोपीनाथ दीक्षित ह्मणतात.

## बर्हि.

गृह्यसूत्रामध्यें बर्हि सांगितलेली नाहीं. तथापि, ती श्रौतसूत्रांत, सांगितली असल्यामुळें व ती घेण्याचा शिष्टाचार असल्यामुळें घ्यावी.

**सन्नियानां तृणानां तु अग्रे प्रादेशमात्रतः ।**
**प्रच्छिद्य प्रतिगृह्णीयान्मुष्टिमात्रं तु बर्हिषि ॥**

असें स्मृतिवचन आहे. एक मूठ दर्भ बर्हीकरितां घ्यावे. त्यांचीं अग्रें बरोबर जुळावीं. नंतर अग्रापासून एक टीच लांबीवर दर्भ कापावे. हे जे टीचभर लांबीचे मूठभर साग्र दर्भ ती बर्हि होय. एक हवि असल्यास एवढी बर्हि पुरी आहे; अनेक हवि असल्यास त्या

सर्वांचें आसादन होण्याला पुरेशी बर्हि असावी. ह्याविषयीं 'अर्थात्परिमाणम् ।' हें कात्यायनसूत्र प्रमाण आहे.

## इध्मकाष्ठसंख्या.

**एकविँशतिदारुमिध्मँसंनह्यत्याहुतिपरिमाणं वा तस्मिञ्छम्याः परिधीनिध्ममुपसंनह्यति ।**

असें हिरण्यकेशिगृह्यसूत्र आहे. इध्म्यामध्यें काष्ठें एकवीस असावींत व त्यांत तीन परिधि असावे. परिधींची लांबी शम्यामात्र असावी. परिधींशिवाय इध्मकाष्ठें अठरा असावीं. किंवा आहुतींची जितकी संख्या असेल तितकीं असावीं. अंग व प्रधान ह्यांच्या आहुतींइतकीं इध्मकाष्ठांची संख्या असावी असें कोणी ह्मणतात. अंग, प्रधान व जयादि उपहोम ह्यांच्या आहुतींइतकीं इध्मकाष्ठें असावीं असेंही कोणी ह्मणतात. शम्याकार परिधि असावे असें सूत्रांत सांगितलें आहे. शम्याकार ह्मणजे मुळाशीं जाड व अग्राशीं लहान. शम्या ह्मणून जे यज्ञायुध आहे त्याची लांबी छत्तीस अंगुळें असते. श्रौतकर्मामध्यें परिधि त्वचेसह असावे असें सांगितलें आहे. परंतु, गृह्यसूत्रामध्यें परिधि शम्याकृति सांगितले असल्यामुळें व तासल्याशिवाय ते तसे होणें शक्य नसल्यामुळें 'सत्वक्का भवन्ति' ह्या श्रौतसूत्राचा स्मार्तकर्मामध्यें बाध होत आहे असें समजावें.

## इध्मवृक्षादि.

इध्मा पळसाचा अथवा खैराचा असावा असें श्रौतसूत्रांत सांगितलें आहे. परिधि कोणत्याही यज्ञिय वृक्षाचे असले तरी चालतात. परिधि ओले असावे अथवा शुष्क असावे.

**स्थविष्ठो मध्यमोऽणीयान्द्राघीयान्दक्षिणार्ध्योऽणिष्ठो ह्रसिष्ठ उत्तरार्ध्यः ।**

असें हिरण्यकेशि श्रौत सूत्र आहे. मधला परिधि सर्वांत जाड आणि लांबीच्या मानानें मध्यम असावा; दक्षिणेकडील परिधि मध्यम परि-

धीपेक्षां लांबीला अधिक व जाडीला कमी असावा आणि उत्तरेकडील परिधि सर्वांत बारीक व आंखुड असावा.

द्विप्रादेश इध्मस्त्रिप्रादेशाः परिधयः ।

असें बैजकि व कात्यायन ह्यांचें ह्मणणें आहे.

शम्यामात्रा बाहुमात्रा वा परिधयः ।

असें भारद्वाजसूत्रांत सांगितलें आहे. शम्यामात्र ह्मणजे छत्तीस अंगुलें आणि बाहुमात्र ह्मणजे बेचाळिस अंगुलें.

समित्पवित्रं वेदाश्च त्रयः प्रादेशसंमिताः ।
इध्मस्तु द्विगुणः कार्यस्त्रिगुणः परिधिः स्मृतः ॥
स्मार्ते प्रादेश इध्मो वा द्विगुणः परिधिः स्मृतः ।

अशीं वचनें संग्रहामध्यें आहेत. "समिधा, पवित्र व वेद हीं तीन प्रादेशमात्र, इध्मा दोन प्रादेश आणि परिधि तीन प्रादेश. स्मार्तामध्यें दोन प्रादेश इध्मा व परिधि उक्त आहेत" हें ह्या वचनांचें तात्पर्य होय. दोन प्रादेश परिधि हा पक्ष तीन प्रादेश मिळण्याचा संभव नसल्यास ग्राह्य.

तिस्रः शम्याः परिधीन्करोति मध्यमाङ्गुलिरनामिका कनिष्ठिकाः ।

असें बौधायनगृह्यसूत्रामध्यें सांगितलें आहे. बाहुमूलापासून मधल्या बोटाच्या अग्रापर्यंत लांबीचा परिधि दक्षिणेस; बाहुमूलापासून अनामिकाग्रापर्यंतचा परिधि मध्यें आणि बाहुमूलापासून कनिष्ठिकाग्रापर्यंतचा परिधि उत्तरेस.

हें सर्व परिधिप्रकार श्रौतामधले आहेत. स्मार्तकर्मांमध्यें

शम्याभिः परिदधाति ।

हें सूत्र प्रमाण असल्यामुळें सर्व परिधि छत्तीस अंगुलेंच लांब असणें योग्य आहे. मूळाशीं बारीक आणि अग्राशीं जाड असे परिधि स्मार्तामध्यें असणें अवश्य आहे.

## शुल्ब.

**समूलानाममूलानां वा दर्भाणामयुग्धातु शुल्बं कृत्वा प्रागग्रमुदगग्रं वा निदधाति ।**

असें हिरण्यकेशि श्रौत सूत्र आहे. "समूल अथवा मूळरहित दर्भांचें विषम सांध्यांनीं युक्त असें शुल्ब करावें व तें प्रागग्र किंवा उदगग्र ठेवावें" असा ह्या सूत्राचा आशय आहे. धातु ह्मणजे संधि. इध्मा बांधितां येण्याइतकें शुल्ब लांब असलें पाहिजे. ह्याकरितां सांधे विषम असले ह्मणजे झालें. तीन अथवा पांचच सांधे असले पाहिजेत असा नियम नाहीं.

## पात्रासादन.

**दर्वीं कूर्चमाज्यस्थालीं प्रणीताप्रणयमं येन चार्थः सकृदेव सर्वाणि यथोपपादं वा ।**

असें हिरण्यकेशिगृह्यसूत्र आहे. येन चार्थः ह्मणजे ज्याची गरज लागेल तें. पात्रें एकदमच सर्व ठेवावीं अथवा जशीं लागतील तशीं ठेवावीं असें ह्या सूत्रांत सांगितलें आहे. हीं पात्रें पालथीं ठेवावीं. कारण, प्रोक्षणसमयीं पात्रें उताणीं करावीं असें पुढें सांगितलेलें आहे.

**यदेकमेकꣳ संभरेत्पितृदेवत्यानि स्युर्यत्सह सर्वाणि मानुषाणि द्वे द्वे संभरति ।**

अशी श्रुति तैत्तिरीयसंहितेमध्यें आहे. "पात्रासादनसमयीं एकेक पात्र ठेविल्यास तीं पात्रें पितृदेवत्य होतील. आणि एकदम सर्व पात्रें ठेविल्यास तीं मनुष्यकर्मोपयोगींच होतील; परंतु, दोन दोन पात्रें ठेविल्यास तीं दैविक कर्मांच्या उपयोगी होतील." असा ह्या श्रुतीचा आशय आहे. उपनयनादि मानुष कर्मांमध्यें सर्व पात्रें एकदम ठेवण्यास हरकत नाहीं.

## ब्रह्मा.

**एतस्मिन्काले ब्रह्मा यज्ञोपवीतं कृत्वाऽप आचम्यापरेणाग्निं दक्षिणाऽतिक्रम्य ब्रह्मसदनात्तृणं निरस्याप उपस्पृश्याग्निमभिमुख उपविशति ।**

असें गृह्यसूत्र आहे. पात्रासादनानंतर ब्रह्मा ह्या ऋत्विजानें यज्ञोपवीती करून आचमन करावें आणि अग्नीच्या पश्चिमेकडून उजवा पाय टाकून दक्षिणेस जावें. नंतर ब्रह्मसदनापासून एक तृण काढून टाकून उदकस्पर्श करावा आणि अग्नीच्या संमुख बसावें. स्मार्त कर्मामध्यें पात्रासादनानंतर ब्रह्मत्व अवश्य आहे. परंतु, पुष्कळ ठिकाणीं ब्रह्मा म्हणून ऋत्विज वेगळा वरण्याची चालढकल करण्यांत येते. ब्रह्मा न मिळाल्यास ब्रह्मसदनावर यज्ञोपवीत अथवा कमंडलु ठेवावा.

## पवित्रकरण.

**समावप्रच्छिन्नाग्रौ दर्भौ प्रादेशमात्रौ पवित्रे कृत्वाऽन्येननखाच्छित्त्वाऽद्भिरनुमृज्य पवित्रान्तर्हिते पात्रेऽप आनीयोपबिलं पूरयित्वोदगग्राभ्यां पवित्राभ्यां त्रिरुत्पूयोत्तरेणाग्निं दर्भेषु सादयित्वा दर्भैरपिदधाति ॥**

असें हिरण्यकेशिगृह्यसूत्र आहे. वर्ण व रूप ह्यांनीं सारखे असलेले दोन दर्भ घ्यावे. ते अग्राकडून प्रादेशमात्र मापून नखाशिवाय इतर साधनानें तोडावे. नंतर मूळापासून अग्रापर्यंत उदकयुक्त हातानें तें सर्व मलरहित करावे. तीं दर्भरूप दोन पवित्रें प्रणीताप्रणयनपात्रावर ठेवावीं आणि त्या पात्रांत पाणी घालून तें जवळ जवळ कांठापर्यंत भरावें. नंतर तीं पवित्रें उदगग्र धरून त्यांच्या योगानें तीन वेळां त्या उदकाचें उत्पवन करावें. नंतर अग्नीच्या उत्तरेस अग्नीच्या जवळच दर्भांवर प्रणीता ठेवून त्यांवर दुसऱ्या दर्भांनीं झांकण घालावें.

# प्रोक्षणीसंस्कार.

तिरःपवित्रं प्रोक्षणीः सꣳस्कृत्य यथा पुरस्ताद्बिलवन्त्युत्तानानि कृत्वा विषायेध्मं त्रिः सर्वाभिः प्रोक्षति ।

असें हिरण्यकेशिगृह्यसूत्र आहे. ज्या उदकानें प्रोक्षण करावयाचें असतें त्या उदकाला प्रोक्षणी असें ह्मणतात व हें उदक ज्या पात्रांत ठेविलें जातें त्या पात्रालाही प्रोक्षणी अथवा प्रोक्षणीपात्र असें ह्मणतात. प्रोक्षणीपात्र पूर्वाग्र ठेवून त्याच्यावर तीं दर्भमय पवित्रें आडवीं उदगग्र ठेवावीं. नंतर त्या पवित्रांवरून उदक त्या पात्रांत पाडावें. नंतर त्या उदकाचा उत्पवनसंस्कार करावा. तदनंतर तीं पवित्रें हातांत घ्यावीं आणि जीं बिलयुक्त पात्रें प्रथम पालथीं घातलेलीं आहेत तीं उताणीं करून आणि इध्म्याचेंही शुल्ब सोडून प्रोक्षणीपात्रांतील सर्व उदकानें तीन वेळां त्या पात्रांवर व इध्म्यावर प्रोक्षण करावें.

# प्रोक्षण व अभ्युक्षण.

उत्तानेन तु हस्तेन कर्तव्यं प्रोक्षणं भवेत् ।
मुष्टीकृत्वा तु तत्तोयमभ्युक्षणमिति स्मृतम् ॥

असें वचन संग्रहामध्यें आहे. उताण्या हातानें प्रोक्षण करावें. कर्त्यानें उदक मुठींत घेतल्यासारिखें करून मुठीनें प्रोक्षण करणें ह्याला अभ्युक्षण असें ह्मणतात.

# दर्वीसंस्कार.

दर्वीं निष्टप्य संमृज्य पुनर्निष्टप्य निदधाति संमार्गानभ्युक्ष्याग्नावादधाति ।

असें हिरण्यकेशि गृह्यसूत्र आहे. संमार्ग ह्मणजे संमार्ग करण्याचे दर्भ अथवा झाडणें. (पात्र ही संज्ञा दांड्याला नसून अवदान वगैरे घेण्याकरितां जो पुढला खोदिलेला भाग असतो त्यालाच आहे हें लक्ष्यांत ठेवावें)

दर्वी अग्नीवर पालथी करून तापवावी. नंतर तिचा संमार्ग करावा. तदनंतर ती पुनरपि तापवावी आणि दर्भांवर प्रागग्र उताणी ठेवावी. दर्वीचा संमार्ग जुहूप्रमाणें करावा. डाव्या हातांत दर्वी घ्यावी. नंतर संमार्ग दर्भ उजव्या हातांत घेऊन त्या दर्भांच्या अग्रांनीं पश्चिमेकडून पूर्वेकडे ती आंतून झाडावी. नंतर दर्भांच्या मध्य भागांनीं दर्वी बाहेरल्या बाजूनें जसा तिचा आकार असेल तशी पूर्वेकडून पश्चिमेकडे झाडावी आणि नंतर दर्भांच्या मुळांनीं दांडा झाडावा. हा संमार्ग होय. ज्या कर्मामध्यें स्रुव्याची आवश्यकता असेल त्या कर्मामध्यें स्रुव्याचाही संस्कार करावा. आसादन, प्रोक्षण, निष्टपन व संमार्ग इतक्या गोष्टी स्रुवसंस्कारामध्यें येतात. स्रुवा डाव्या हातांत घेऊन तापवावा. नंतर संमार्गदर्भांच्या अग्रांनीं त्याचा आकार असेल तसा तो आंतून झाडावा; ह्मणजे आंतला केर सर्व बाजूंनीं उकरून बाहेर काढल्यासारखें करावें. नंतर बाहेरून सर्व बाजूंनीं बिलाकडे संमार्ग करावा आणि दर्भांच्या मुळांनीं दांड्याला संमार्ग करावा. संमार्ग केल्यानंतर स्रुवा तापवून दर्भांवर उताणा ठेवावा. तदनंतर संमार्गदर्भांवर अभ्युक्षण करावें आणि त्या दर्भांचें उदक झाडून नंतर ते दर्भ अग्नीवर द्यावे. नवाशिक्या याज्ञिकांना ज्या बऱ्याच गोष्टी कळत नाहींत त्यांपैकीं ही एक आहे. संमार्गदर्भांवर अभ्युक्षण केल्यानंतर त्यांतील पाणी जर झाडिलें नाहीं तर अग्नींत थेंब पडतात व अग्नीचा उपघात होतो. दर्भाला कांहीं ओलावा राहणारच. परंतु, तेवढ्यानें अग्नीचा उपघात होत नाहीं. प्रोक्षण केल्याशिवाय अग्नींमध्यें इंधनही घालूं नये असें वचन आहे. परंतु, प्रोक्षण केलेलें इंधन घातल्यानें अग्नीचा उपघात होत नाहीं. असेंच हें समजावें.

## आज्यसंस्कार.

आज्यं विलाप्य पवित्रान्तर्हितायामाज्यस्थाल्यामाज्यं

**निरूप्योदीचोऽङ्गारान्निरूह्य तेष्वधिश्रित्यावद्योत्य दर्भतरुणाभ्यां प्रत्यस्य त्रिः पर्यग्नि कृत्वोदगुद्वास्याङ्गारान्प्रत्यूह्योदगग्राभ्यां पवित्राभ्यां पुनराहारमाज्यं त्रिरुत्पूय पवित्रे अग्नावाधाय**

असें गृह्यसूत्र आहे. आज्यानिर्वाप कोठें करावा हें ह्या हिरण्यकेशि गृह्यसूत्रांत सांगितलेलें नाहीं. परंतु, अपरेणाग्निं असें आपस्तंब गृह्य-सूत्रांत सांगितलेलें आहे. 'अग्नीच्या पश्चिमेस' हा त्या सूत्राचा अर्थ होय. आज्य घट्ट असल्यास बाहेरच तें पातळ करावें. आज्य-स्थाली अग्नीच्या पश्चिमेस ठेवावी. तिच्यावर प्रोक्षणीसंस्कारानंतर दर्भ-मय पवित्रें पूर्वीच ठेविलेलीं असतात. त्या आज्यस्थालीमध्यें कर्माला पुरेसें आज्य घालावें. नंतर अग्नीच्या आयतनांतील उत्तरेकडील अंगार एखाद्या काष्ठानें उत्तरेकडे घ्यावे. त्यांवर तें आज्य ठेवावें. नंतर दर्भ पेटवून व त्यांची ज्वाला खालीं करून तें आज्यावर धरावें. तदनंतर अंगुष्ठपर्वाइतकीं लांब असलेलीं दोन दर्भाग्रें त्या आज्यांत टाकावीं. तदनंतर उल्मुकानें त्या आज्याला तीन वेळां पर्यग्निकरण करावें. पर्यग्निकरण ह्मणजे सभोंवतीं अग्नि फिरविणें. तदनंतर तें आज्य उत्तरेस उतरावें. नंतर त्याच काष्ठानें ते अंगार पुनरपि आय-तनांत टाकावे. नंतर उदगग्र पवित्रांच्या योगानें आज्याचें पुनराहार होईल अशा रीतीनें तीन वेळां उत्पवन करावें आणि पवित्रें अग्नीमध्यें अर्पण करावीं. पुनराहार ह्मणजे पुनरपि मागें आणणें. आज्यस्थाली-वर पवित्रसंज्ञक दोन दर्भ उदगग्र एकमेकांना न चिकटतां ठेवावे. डाव्या हाताचे अंगुष्ठ व मधलीं दोन बोटें ह्यांनीं तीं अग्रें धरावीं आणि उजव्या हाताचें अंगुष्ठ व मधलीं दोन बोटें ह्यांनीं त्या पवित्रांचे बुडखे धरावे. अशा रीतीनें धरिलेलीं तीं पवित्रें आज्यांत मधला भाग बुडेल अशा रीतीनें आज्यांतच अगदीं पश्चिमेस धरावीं. नंतर पश्चिमेकडून आज्यस्थालीच्या पूर्व भागापर्यंत तीं न्यावीं आणि पुन-रपि पूर्वेपासून पश्चिमेकडे आणून तीं पवित्रें वर उचलावीं. ह्याला पुनराहार उत्पवन ह्मणतात. असें उत्पवन आज्याचें तीनदां करावें.

अथाज्यस्थालीमादाय तस्यामाज्यं निषिच्य च ।
उदगग्नेर्निरूढेषु त्वङ्गारेषु सभस्मसु ॥ १ ॥
विलाप्यैतदधिश्रित्य अवज्वाल्य ज्वलत्तृणैः ।
आज्ये प्रत्यस्य दर्भाग्रे अङ्गुष्ठपर्वमात्रके ॥ २ ॥

अशीं वचनें प्रयोगपारिजातामध्यें आहेत. ह्यांचें तात्पर्य पूर्वी येऊन गेलेलेंच आहे.

निरूढशब्दाचा अर्थ स्मृतिदीपिकेमध्यें

निरूढः स्याद्विभक्तोऽग्निर्यः परिस्तरणाद्बहिः ।
अनिरूढः स वै वह्निर्यः परिस्तृतिमध्यगः ॥

असा दिला आहे. "आयतनापासून परिस्तरणाच्या बाहेर काढिलेला अग्नि निरूढ आणि परिस्तरणाच्या आंत वेगळा केलेला अनिरूढ" असें ह्या श्लोकाचें तात्पर्य आहे. परंतु, अग्नि जो विभक्त केला गेला तो, परिस्तरणाच्या आंत असो किंवा बाहेर असो, निरूढच समजावा.

## परिधिपरिधान.

**शम्याभिः परिदधात्यपरेणाग्निमुदीचीनकुम्बां मध्यमां निदधाति दक्षिणेनाग्निꣳ संस्पृष्टां मध्यमया प्राचीनकुम्बामुत्तरेणाग्निꣳ संस्पृष्टां मध्यमया प्राचीनकुम्बामपरेणाग्निं प्राङ्मुख उपविशति ।**

असें हिरण्यकेशिगृह्यसूत्र आहे. शम्याकृति परिधि घालावे. अग्नीच्या पश्चिमेस उत्तरेकडे स्थूलप्रदेश करून मधला परिधि घालावा; अग्नीच्या दक्षिणेस मधल्या परिधीला चिकटवून व पूर्वेकडे अग्राकडील स्थूल प्रदेश करून दक्षिण परिधि घालावा आणि नंतर अग्नीच्या उत्तरेस मधल्या परिधीला चिकटवून व अग्राकडील स्थूलप्रदेश पूर्वेकडे करून उत्तर परिधि घालावा. ह्याप्रमाणें परिधिपरिधान झाल्यानंतर ज्याचा संस्कार व्हावयाचा असेल त्या व्यक्तीनें अग्नीच्या पश्चिमेस प्राङ्मुख बसावें.

# परिधि किती दूर घालावे ?

" परिस्तरणांवर परिधि घालावे असें भाष्य असल्यामुळें व ते अग्नीच्या आयतनाच्या चिकटून असावे असें सूत्रकारानें अपरेणाग्निं, दक्षिणेनाग्निं व उत्तरेणाग्निं ह्या परिधिपरिधानसूत्रांतील पदांनीं दर्शविलें असल्यामुळें परिस्तरणें पूर्वनिर्दिष्ट स्मृतिवचनाप्रमाणें सत्याषाढसूत्रानुसारी लोकांनीं अग्नीच्या आयतनापासून पांच अंगुलें अथवा नऊ अंगुलें दूर घालण्याचें कारण नाहीं. " असें संस्काररत्नमालाकार दीक्षित गोपीनाथ भट्टांचें ह्मणणें आहे. परंतु, सत्याषाढसूत्रानुसारी लोकांनीं परिस्तरणांवर परिधि कां घातले पाहिजेत ? हें कळत नाहीं. त्याचप्रमाणें

**उत्तरेणाग्निं दर्भेषु सादयित्वा दर्भैरपि दधाति ।**

हें जें प्रणीतासंबंधानें सूत्र आहे त्याचें व्याख्यान

**उत्तरतोऽग्नेः संनिकृष्टतरे देशे दर्भेषु सादयित्वा दर्भैरपि दधातीत्यर्थः ।**

असें दीक्षितांनीं केलेलें आहे. संनिकृष्ट ह्मणजे जवळचा. संनिकृष्टतर ह्मणजे अधिक जवळचा. प्रणीतापात्र जर अग्नीच्या उत्तरेस संनिकृष्टतर देशामध्यें ठेवावें असें दीक्षित ह्मणत आहेत तर उत्तरेकडील परिस्तरण प्रणीतापात्राच्या बाहेर असावयाचें किंवा काय ? परिस्तरणें प्रणीताप्रणयनाच्या पूर्वींच घातलेलीं आहेत. परिस्तरणांवर परिधिपरिधान केलें पाहिजे असें दीक्षित ह्मणत आहेत आणि अग्नीच्या संनिकृष्टतर प्रदेशामध्यें प्रणीतापात्र ठेवावें असें तेच ह्मणत आहेत. तेव्हां प्रणीतापात्राच्या बाहेर उत्तरेकडील परिस्तरण व त्यावर उत्तरेकडील परिधि असें ठरू पाहतें. परंतु, दीक्षितांना हेंही संमत नाहीं. कारण, शम्याभिः परिदधाति । ह्या सूत्रामध्यें अपरेणाग्निं, दक्षिणेनाग्निं व उत्तरेणाग्निं अशा तिन्हीं ठिकाणीं जें अग्निपद आहे त्याचा उद्देश

इहाधिकारादेव सिद्धे त्रीण्यग्निग्रहणानि केवलस्याग्नेः संप्रत्ययः स्यात्परिस्तरणस्य मा भूदित्येतदर्थम्। तेनोपर्येव परिस्तरणानामग्नेः परिधिभिः परिधानं कार्यं न बाह्यत इति।

असा त्यांनीं दर्शविला आहे. ह्मणजे केवल परिधि व अग्नि ह्यांमध्यें दुसरें कांहीं एक नसावें असें ते दर्शवीत आहेत आणि ह्मणूनच परिस्तरणांच्या वर परिधि घालावे असें त्यांना ह्मणावें लागलें आहे. तेव्हां प्रणीताप्रणयनपात्र–परिस्तरण व परिधि ह्यांच्या–बाहेर येणार. परंतु, तें बाहेर आलें ह्मणजे "अग्नीच्या उत्तरेस संनिकृष्टतर (अर्थात अग्नीचे जवळच्या) प्रदेशावर ते ठेवावें." ह्या त्यांच्या ह्मणण्याला बाध येणार. ह्या ह्मणण्याला बाध येऊं नये ह्मणून प्रणीतापात्र संनिकृष्टतर प्रदेशामध्यें ठेवावें व त्याच्या आंत ह्मणजे संनिकृष्टतम प्रदेशामध्यें उत्तरेकडील परिस्तरण व परिधि हीं घालावीं असें जर मानिलें तर अग्नीच्या संनिकृष्टतम प्रदेशावर ह्मणजे अग्नीला चिकटून. अग्नीला चिकटून परिधि घालणें आणि अग्नीमध्यें इंधन अर्पण करणें ह्यांच्यामध्यें अंतर काय? आयतनाला चिकटून असें जर दीक्षितांचें ह्मणणें असेल तर कुंडामध्यें अग्नि असल्यास आंतल्या मेखलेवर आंतल्या बाजूलाच परिधि व परिस्तरणें येतील व तीं प्रदीप्त अग्नीमुळें एका क्षणांत दग्ध होतील. परिधिपरिधान कुंडपक्ष असल्यास कुंडाच्या बाह्य मेखलेच्या बाहेरच होत असतें. तेव्हां बाह्य मेखलेची बाहेरील बाजू व अग्न्यायतन ह्यांमध्यें सहा अंगुळें तरी अंतर राहणारच आहे. हें जर सहा अंगुळें अंतर राहणार आहे तर

यत्तु स्मृत्यन्तर उक्तं त्रिभिश्चैव चतुर्भिश्च पञ्चभिः षड्भिरङ्गुलैः। सेचनं परिधींश्चैव स्तरणं पूजनं तथेति चतुरङ्गुलात्मकपरिधिपरिधानदेशावधिकथनं यच्च कश्यपोक्तं नवाङ्गुलप्रमाणेन विधिना परिधीन्न्यसेदिति नवाङ्गुलात्मक-

**परिधिपरिधानदेशावधिकथनं तच्छाखान्तरविषयं न सत्याषाढसूत्रानुसारिविषयम् । भाष्यकृता परिस्तरणानामुपर्येव परिधिपरिधानस्योक्तत्वात् ।**

हें दीक्षितांचें ह्मणणें जुळत नाहीं. दीक्षितांना चार अंगुलेंही अग्नीचें आयतन व परिधि ह्यांमध्यें अंतर नको आहे. भाष्यकारांनीं परिस्तरणांवर परिधिपरिधान सांगितलें आहे आणि परिधि व अग्नि ह्यांमध्यें दुसरें कांहींही उपयोगी नाहीं अशी दीक्षितांची समजूत झालेली आहे; ह्मणून त्यांनीं कश्यपवचन व स्मृत्यन्तरवचन शाखान्तरविषय आहे असें ह्मटलें आहे. परंतु, भाष्यकारांनीं जरी परिस्तरणांवर परिधि सांगितले आहेत तरी अग्नि व परिधि ह्यांमध्यें दुसरें कांहीं एक नसलें पाहिजे असें कसें ठरणार?

**प्रागग्रैर्दर्भैरग्निं परिस्तृणाति ।**

असें सूत्र आहे आणि

**अपि वोदगग्राः पश्चात्पुरस्ताच्च भवन्ति ।**

असा दुसरा पक्ष सूत्रकारानें दर्शविला आहे. परंतु, पहिला पक्ष स्वीकारिल्यास पश्चिमेकडील व पूर्वेकडील परिस्तरणांचे दर्भ प्रागग्र पसरावे लागणार. **दर्भाग्रैरग्निं परिस्तृणाति ।** असें ह्मटलेलें नाहीं; **प्रागग्रैर्दर्भैः** असें ह्मटलेलें आहे. तेव्हां ह्या दर्भांची लांबी निदान प्रादेशमात्रापेक्षां तरी कमी नाहीं. कारण, पवित्रांकरितां दोन दर्भ साग्र व सम घेऊन ते तोडून प्रादेशमात्र करावे असें सांगितलें आहे. प्रादेशमात्र ह्मणजे बारा अंगुलें. पश्चिमेकडील परिस्तरणदर्भांची पूर्वपश्चिम लांबी जर बारा अंगुलें खास आहे तर पश्चिमेकडील परिधि अग्नीच्या आयतनापासून चार अंगुलांवर किंवा नऊ अंगुलांवर ठेविला तरी परिस्तरणांवर येणारच हें उघड आहे. जसे परिस्तरणाकरितां पश्चिमेकडे दर्भ पसरावयाचे असतात तसेच दक्षिणेकडे व उत्तरेकडे ते पसरावयाचे असतात; ह्मणजे अग्नीच्या आयतनापासून

दक्षिणेकडील व उत्तरेकडील जागा निदान बारा अंगुलें (प्रादेश-मात्र) तरी व्यापिली जाणारच आहे. तेव्हां भाष्यकारांच्या ह्मणण्या-प्रमाणें परिस्तरणावरही परिधि येतील. कारण, परिस्तरणें व अग्नि ह्यांमध्यें अंतर पांच अंगुलें असावें असें स्मृत्यन्तरवचनांत सांगित-लेलें आहे आणि कश्यपानें परिधि व अग्नि ह्यांमध्यें नऊ अंगुलें अंतर असावें असें सांगितलें आहे. परिस्तरणावरच परिधि घालावे असें ज्याअर्थीं भाष्यकारांनीं सांगितलेलें आहे त्याअर्थीं परिधि भूमीला न लागतां परिस्तरणदर्भांवर राहील इतकी रुंद जागा दक्षिणेकडील व उत्तरेकडील परिस्तरणदर्भांनीं व्यापणें अवश्य आहे. केवळ चार चार दर्भ दक्षिणेस व उत्तरेस परिस्तरणाकरितां ठेविल्यानें भागणार नाहीं. सारांश, पिंडपितृयज्ञामध्यें अथवा श्राद्धा-मध्यें पिंडप्रदानाकरितां जितक्या रुंदीची बर्हि भूमीवर पसरावी लागते तितकी रुंद भूमि तरी जवळ जवळ दक्षिणेकडील व उत्तरेकडील परिस्तरणदर्भांनीं व्यापणें अवश्य आहे. ह्या अग्निमुखविधीमध्यें परिस्तरण, परिधिपरिधान इत्यादि कर्मं महत्त्वाचीं असल्यामुळें इतकी वाटाघाट करणें अवश्य झालें आहे.

## परिषेक.

अथ परिषिञ्चत्यदितेऽनुमन्यस्वेति दक्षिणतःप्राचीन-मनुमतेऽनुमन्यस्वेति पश्चादुदीचीनँ सरस्वतेऽनुमन्यस्वेत्युत्त-रतःप्राचीनं देव सवितः प्रसुवेति सर्वतः प्रदक्षिणं परि-षिच्येध्ममङ्क्त्वाऽभ्यादधात्ययं त इध्मा आत्मा जातवेदस्ते० समेधय स्वाहा।

असें हिरण्यकेशिगृह्यसूत्र आहे. "नंतर परिषेक करावा. अदितेऽ-नुमन्यस्व ह्या मंत्रानें अग्नीच्या दक्षिणेस नैर्ऋत्य कोपऱ्यापासून तों आग्नेय कोपऱ्यापर्यंत पूर्वेकडे उदकसिंचन करावें. अनुमतेऽनु-

**मन्यस्व** ह्या मंत्रानें अग्नीच्या पश्चिमेस आग्नेय कोनापासून तो वायव्यकोणापर्यंत उदगपवर्ग उदक सिंचन करावें. **सरस्वतेऽनुमन्यस्व** ह्या मंत्रानें अग्नीच्या उत्तरेस वायव्येपासून ईशान्येपर्यंत प्रागपवर्ग उदक सिंचन करावें आणि नंतर **देव सवितः प्रसुव** ह्या मंत्रानें ईशान्यकोणापासून सर्व बाजूंनीं प्रदक्षिणक परिषेक करावा. नंतर इध्म्याला अंजन करून अयं त इध्मः ह्या मंत्रानें तो अग्नीमध्यें अर्पण करावा" असें तात्पर्य आहे. **इध्ममङ्क्त्वा** असें सूत्र आहे व "इध्म्याला अंजन करून" असा त्याचा अर्थ आहे. परंतु, अंजन करणें ह्मणजे सर्व समिधांना तूप चोपडावें असा अर्थ समजावयाचा? किंवा इध्मकाष्ठांपैकीं कोणत्या तरी काष्ठाला अथवा काष्ठांना कोठें तरी तूप लावावयाचें? असा संशय उपस्थित होत आहे. श्रौतकर्मामध्यें पशुबंधप्रकरणांत यूपांजनकर्म प्रसिद्ध आहे. परंतु, यूपांजन ह्मणजे यूपाला कोठें तरी तुपाचें बोट लावणें असा अर्थ नाहीं. यूपांजन तुपानेंच करावयाचें असतें. परंतु, तूप न मिळाल्यास तें तेलानें करावें असें

**यथा यूपाञ्जने सर्पिषोऽभावे तैलं**

ह्या सूत्रांत सत्याषाढसूत्रकार सिद्धवत्‌च सांगत आहेत. पशुयाग करणारा कितीही जरी दरिद्री असला तरी तुपानें थोडेंसें बोट ओलें करून तें बोट यूपाला लावण्याइतकें तूप त्याच्यापाशीं असतेंच. तेव्हां 'सर्पिषोऽभावे तैलं' हें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. शिवाय, **'यूपायाज्यमानायानुब्रूहि'** असा अध्वर्यूनें प्रैष दिल्यानंतर होत्यानें **'अञ्जन्ति त्वामध्वरे देवयन्तः'** ही ऋचा तीन वेळां ह्मणावयाची असते व ती अंजनकर्म चाललें असतांना ह्मणावयाची असते. नुसतेंच जर तुपाचें बोट लावावयाचें असेल तर 'यूपायाज्यमानायानुब्रूहि' ह्या प्रैषामध्यें स्वारस्यच राहत नाहीं. शिवाय, शिष्टाचारही यूपाचा सर्व दृश्य भाग तुपानें मारखून काढण्याचा आहे. तेव्हां इध्म्यांतील समिधा

सर्व मारवून काढाव्या असेंही ह्मणतां येईल. परंतु, अवदान घेतल्यानंतर प्रस्तराला व बर्हीला 'प्रस्तरबर्हिः समनक्तीति विज्ञायते' ह्या आधारानें जेव्हां अंजन करीत असतात; तेव्हां नुसता तुपानें भरलेला स्त्रुवाच दोन ठिकाणीं लावीत असतात शिवाय प्रत्येक वेळीं अथवा केव्हांही सर्व बर्हि अथवा प्रस्तर तुपानें माखून वेळेवर अनुष्ठान होणें शक्यही नाहीं. त्याचप्रमाणें

**स्त्रुक्षु प्रस्तरमनक्ति**

ह्या श्रुतीप्रमाणें याग झाल्यानंतर जेव्हां स्त्रुचांमध्यें प्रस्तराला अंजन करावें लागतें तेव्हां प्रस्तर सर्व माखणें शक्यच नसतें. तेव्हां 'इध्ममङ्क्त्वा' ह्याचा अर्थ काय करावा हें एक मोठें कोडें आहे. तथापि तें माझ्या समजुतीनें उलगडण्यासारखें आहे. इध्मा जेव्हां आर्द्र असेल तेव्हां तो तुपानें माखावा आणि जेव्हां शुष्क असेल तेव्हां त्याला नुसतें तूप बुडखा, मध्यभाग व अग्रें अशा तीन ठिकाणीं लावण्याचा संप्रदाय आहे. उपनयनसंस्कारांतील सप्तपलाशसमिद्धोम हा ह्याविषयीं आधार आहे.

**अथ सप्त पालाशीः समिध आर्द्रा अप्रच्छिन्नाग्राः प्रादेशमात्रीर्घृतान्वक्ता अभ्याधापयति ।**

असें हिरण्यकेशी गृह्यसूत्र आहे. येथें आर्द्र समिधा असल्यामुळें नुसते 'अक्ताः' असें न ह्मणतां 'घृतान्वक्ताः' असे ह्मटलें आहे आणि ह्या समिधा घृतामध्यें अगदीं चबचबीत करून देण्याचा आचार आहे.

## समिध कशी धरावी ?

**मूलतः कर्मनाशः स्यान्मध्यतः पुत्रनाशनम् ।**
**अग्रेण मुञ्चतो व्याधिरेकपाणेर्धनक्षयः ॥**
**मूलमध्यममध्येन समिद्धोमस्य लक्षणम् ।**

अशीं वचनें संग्रहामध्यें आहेत. "समिध बुडख्याशीं धरून अग्नींत दिली असतां कर्म निष्फळ होतें; मधोमध धरून ती दिल्यास पुत्राचा नाश होतो; शेंड्याला धरून दिल्यास रोग होतो आणि एका हातानें दिल्यास धनक्षय होतो. सारांश, मूळ व मध्य ह्यांच्यामध्यें धरून समिध अग्नींत द्यावी." असें ह्या वचनांचें तात्पर्य आहे.

## स्रुवा कसा धरावा?

अग्रे धृतो विनाशाय धृतो मध्ये प्रजाक्षयी ।
मूले धृतस्तु होतुस्तु मृतिं दद्यात्स्रुवो ध्रुवम् ॥
अग्रान्मध्याच्च मध्ये तु मूलान्मध्याच्च मध्यतः ।
स्रुवः प्रधार्यो विद्वद्भिः सर्वकामार्थसिद्धये ॥

अशीं वचनें विधानमालेमध्यें आहेत. दंडाचे पांच भाग करून दुसऱ्या अथवा चवथ्या भागामध्यें स्रुवा धरावा असा जो दीक्षितांनीं ह्या वचनांचा अर्थ केलेला आहे, तो बरा आहे.

काठिनद्रव्यहोमे तु मुष्टिना धारणं स्रुचः ।
द्रवद्द्रव्यस्य होमे तु उत्तानाङ्गुलिभिः स्मृतम् ॥

असें वचन प्रयोगार्णवामध्यें आहे. 'कठिण द्रव्याचा होम असल्यास स्रुची व स्रुवा हीं मुठीनें धरावीं. द्रव्य पातळ असल्यास उताण्या बोटांनीं धरावी' असें ह्या वचनाचें तात्पर्य आहे.

स्रुवग्रहणं दैविकं सौम्येन ।

असें बौधायनसूत्रांत सांगितलें आहे. ह्यावरून दैविक कर्म असल्यास स्रुची किंवा स्रुवा हें होमसाधन सौम्य तीर्थानें धरावें असें होतें. बोटांच्या मूळाशीं स्रुची अथवा स्रुवा धरणें हें सौम्य तीर्थ होय.

## आघारहोमादि.

अथ दर्व्या जुहोत्युत्तरं परिधिसंधिमन्ववहृत्य दर्वीं प्रजापतये मनवे स्वाहेति मनसा ध्यायन्दक्षिणाप्राञ्चमृजुं

दीर्घ९ संततं दक्षिणं परिधिसंधिमन्ववहृत्येन्द्राय स्वाहेति प्राञ्चमुदञ्चमृजुमाघारावाघार्याज्यभागौ जुहोत्यग्नये स्वाहेत्युत्तरार्धपूर्वार्धे सोमाय स्वाहेति दक्षिणार्धपूर्वार्धे तावन्तरेणेतरा जुहोति युक्तो वह जातवेदः पुरस्तादग्ने विद्धि कर्म क्रियमाणं यथेदम्। त्वं भिषग्भेषजस्यासि कर्ता त्वया गा अश्वान्पुरुषान्सनेम स्वाहा । या तिरश्ची निपद्यसेऽहं विधरणी इति । तां त्वा घृतस्य धारयाग्नौ सꣳराधनीं यजे स्वाहा। सꣳराधन्यै देव्यै स्वाहा प्रसाधन्यै देव्यै स्वाहा ।

असें हिरण्यकेशिगृह्यसूत्र आहे. इध्माधानानंतर आघार घालावे. प्रजापतये मनवे स्वाहा हा मंत्र मनांत ह्मणून पहिला आघार घालावा. उत्तर परिधीचा संधि वायव्य कोपऱ्याला असतो. त्या संधीपासून दर्वी आग्नेयटोकापर्यंत सरळ व धारा मध्यंतरीं विच्छिन्न न होऊं देतां एकसारखी पाडावी. हा पहिला आघार होय. नंतर 'इंद्राय स्वाहा' हा मंत्र ह्मणून नैर्ऋत्येस असलेल्या दक्षिणपरिधिसंधीपासून अग्न्यायतनाच्या ईशान्यकोनापर्यंत तसाच सरळ दुसरा आघार घालावा. नंतर आज्यभाग घालावे. आज्यभागांना चक्षुषी अशी संज्ञा आहे. आयतनाच्या उत्तरार्धपूर्वार्धांत 'अग्नये स्वाहा' ह्या मंत्रानें आहुति घालावी आणि नंतर दक्षिणार्धपूर्वार्धांत 'सोमाय स्वाहा' ही आहुति घालावी. ह्या आहुतींच्यामध्यें इतर आहुति घालाव्या. 'युक्तो वह, या तिरश्ची, सꣳराधन्यै आणि प्रसाधन्यै' ह्या आहुति घातल्यानंतर व्यस्तसमस्त व्याहृति घालाव्या.

भूर्भुवः सुवरिति व्याहृतिभिर्जुहोत्येकैकशः समस्ताभिश्च ।

असें सूत्र आहे. प्रसाधनी आहुति झाल्यानंतर 'भूः स्वाहा, भुवः स्वाहा आणि सुवः स्वाहा' अशा तीन आहुति घालाव्या. हा व्यस्त व्याहृतिहोम होय. ह्या तीन आहुतींनंतर 'भूर्भुवःसुवः स्वाहा' ही आहुति घालावी. हा समस्तव्याहृतिहोम होय.

व्याहृति सात असल्यामुळें सातही घालावयाच्या किंवा सातांपैकीं कोणत्या तरी घालावयाच्या हा संशय राहूं नये ह्मणून सूत्रकारांनीं 'भूर्भुवःसुवरिति व्याहृतिभिः' असें स्पष्ट ह्मटलें आहे. इतकें पूर्वतंत्र झाल्यानंतर जें कर्म प्रधान असेल त्या कर्माच्या प्रधान आहुति घालाव्या. प्रधानाहुति झाल्यानंतर कर्मसमृद्धिसंपादक उत्तर तंत्र आहे. त्याविषयीं सूत्र येणेंप्रमाणें:—

**इमं मे वरुण तत्त्वायामि त्वं नो अग्ने स त्वं नो अग्ने त्वमग्ने अयास्ययासन्मनसाहितः । अयासन्हव्यमूहिषेऽया नो धेहि भेषज ँ स्वाहा । प्रजापत इत्येषा । यदस्य कर्मणोऽत्यरीरिचं यद्वा न्यूनमिहाकरम्। अग्निष्टत्स्विष्टकृद्विद्वान्सर्व ँ स्विष्ट ँ सुहुतं करोतु मे। अग्नये स्विष्टकृते सुहुतहुते सर्वहुत आहुतीनां कामाना ँ समर्धयित्रे स्वाहेत्युत्तरार्धपूर्वार्धेऽस ँ सक्तामित-राभिराहुतिभिर्जुहोत्यत्रैके जयाभ्याताना राष्ट्रभृत इत्युपजुहृति पुरस्तात्स्विष्टकृतश्चित्तं च स्वाहा चित्तिश्च स्वाहेति जयाञ्जुहोति चित्ताय स्वाहा चित्तये स्वाहेति वाऽग्निर्भूतानामधिपतिः स मा-वत्वित्यभ्यातानानस्मिन्ब्रह्मन्नस्मिन्क्षत्र इत्यभ्यातानेष्वनुषजति पितरः पितामहा इति प्राचीनावीती जुहोत्युपतिष्ठते वर्ताषाड्-तधामेति राष्ट्रभृतः पर्यायमनुद्रुत्य तस्मै स्वाहेति पूर्वामाहुतिं जुहोति ताभ्यः स्वाहेत्युत्तराम् ।**

असें गृह्यसूत्र आहे. इमं मे वरुण श्रुधि०, तत्त्वायामि ब्रह्मणा०' त्वं नो अग्ने वरुणस्य०, स त्वं नो अग्नेऽवमो भवोती०, त्वमग्ने० आणि प्रजापते नत्व० ह्या सहा आहुति घालाव्या. नंतर यदस्य कर्मणः ही स्विष्टकृताची आहुति घालावी. ती उत्तरार्धपूर्वार्धांत घालावी व इतर आहुतींशीं तिचा संसर्ग होऊं देऊं नये. ह्या कर्मामध्यें जयहोम, अभ्यातानहोम व राष्ट्रभृद्धोम हे (अभ्युदयकारक) उपहोम स्विष्ट-कृताच्या पूर्वीं उपनयनसंस्कारकर्मामध्यें घालीत असतात. उपनयन-

संस्कारामध्यें हे उपहोम सूत्रकाराच्या मतानें अवश्य आहेत; प्रायश्चित्तार्थ पुनरुपनयनामध्यें अवश्य नाहींत. कर्मसमृद्धीकरितां हे उपहोम श्रौत, गार्ह्य व स्मार्त कर्मामध्यें सांगितलेले आहेत व ते स्विष्टकृताच्या पूर्वींच करावयाचे आहेत. कांहीं कर्मांमध्यें हे अवश्य आहेत व कांहींमध्यें ते न केले असतां प्रत्यवाय नाहीं. तथापि जेथें ते करूं नयेत असें सांगितलें नसेल तेथें कर्मसमृद्धीकरितां ते करणें बरें. चित्तं च स्वाहा चित्तिश्च स्वाहा अशा रीतीनें जयहोम करावेत. जयहोम, अभ्यातानहोम आणि राष्ट्रभृद्धोम ह्यासंबंधाचे तीन अनुवाक तैत्तिरीयसंहितेच्या तृतीय-कांडाच्या चवथ्या प्रपाठकांत (चार, पांच व सात असे) आहेत. ह्या तीन अनुवाकांत मंत्र आहेत आणि सहाव्या अनुवाकांत ह्या होमांचें विधान आहे. 'चित्तं च चित्तिश्चाकूतं चाकूतिश्च' असे जयहोम-विषयक मंत्र चवथ्या अनुवाकांत आहेत. हे मंत्र होमसमयीं 'चित्तं च स्वाहा चित्तिश्च स्वाहा' अशा रीतीनें ह्मणावेत किंवा 'चित्ताय स्वाहा चित्तये स्वाहा' अशा रीतीनें ह्मणावेत. हे एकंदर तेरा मंत्र आहेत. 'चित्तं च स्वाहा चित्तिश्च स्वाहा' अशा रीतीनें होम करावयाचा असल्यास जसा पाठ आहे तशाच तेरा आहुति घालाव-याच्या. परंतु, चित्ताय स्वाहा, चित्तये स्वाहा, हा पक्ष स्वीकाराव-याचा असल्यास बारा आहुति चतुर्थ्यंत घालावयाच्या आणि प्रजा-पतिर्जयानिन्द्राय० हव्यो बभूव' ह्या मंत्राच्या शेवटीं स्वाहाकार लावून ह्मणजे मंत्रांतील शेवटलें पद तसेंच अविकृत ठेवून तेरावी आहुति घालावयाची. ह्या जयहोमानंतर अभ्यातानहोम आहे. त्याचे मंत्र पांचव्या अनुवाकांत आहेत. ते आठरा मंत्र आहेत. 'अग्निर्भूतानामधि-पतिः समावत्विन्द्रो ज्येष्ठानां यमः पृथिव्याः' इत्यादि ते मंत्र होत. ह्या अनुवाकाच्या शेवटीं 'अस्मिन्ब्रह्मन्नस्मिन्क्षत्रेऽस्यामाशिष्यस्यां पुरो-धायामस्मिन्कर्मन्नस्यां देवहूत्यां' असें आहे आणि पहिल्या मंत्राच्या

निर्देशानंतर समावतु असें आहे. तेव्हां प्रत्येक मंत्रांतील दुसऱ्या षष्ठयन्त पदानंतर अधिपतिः समावत्वस्मिन्ब्रह्मन्नस्मिन्' इत्यादि जोडून एकेक मंत्र करावयाचा आहे आणि देवहूत्यां ह्या पदानंतर स्वाहा-शब्द उच्चारून आहुति द्यावयाची आहे. अग्नि, इंद्र वगैरे ज्या देवता पुल्लिंगीं व एकवचनी आहेत त्या देवतांचे मंत्र 'अग्निर्भूतानामधिपतिः स मावत्वस्मि०,इन्द्रो ज्येष्ठानामधिपतिः स मावत्वस्मिन्' अशा प्रकारचे समजावे. अन्नशब्द नपुंसकलिंगी असल्यामुळें मंत्रबोधक अनुवाकामध्येंच 'अन्नः साम्राज्यानामधिपति तन्मावतु' असें दर्शविलें आहे. त्याचप्रमाणें गणवाचक मरुच्छब्द बहुवचनान्त असल्यामुळें 'मरुतो गणानामधिपतयस्ते माऽवन्तु' असेंही त्या मंत्रबोधक अनुवाकांतच दर्शविलें आहे. अभ्यातानहोमांतील जो 'पितरः पितामहाः' हा शेवटला मंत्र त्यानें प्राचीनावीती करून आहुति द्यावी किंवा प्राचीनावीती करून केवळ त्या मंत्रानें उपस्थान करावें असा विकल्प सूत्रामध्यें सांगितला आहे.

## राष्ट्रभृद्धोम.

अभ्यातानहोमानंतर राष्ट्रभृद्धोम आहे. ह्याचे बारा मंत्र आहेत व ते सातव्या अनुवाकांत सांगितलेले आहेत. परंतु, सातवा व शेवटला हे दोन मंत्र खेरीज करून बाकीच्या मंत्रांना दोन दोन आहुति आहेत. एक पूर्वाहुति आणि दुसरी उत्तराहुति. तस्मै स्वाहा असें ह्मणून पहिली आहुति द्यावयाची आणि ताभ्यः स्वाहा असें ह्मणून दुसरी आहुति द्यावयाची.

ह्या राष्ट्रभृद्धोमाचे तीन प्रकार आहेत. पहिला प्रकारः—

**ऋताषाडृतधामाऽग्निर्गन्धर्वस्तस्यौषधयोऽप्सरस ऊर्जो नाम स इदं ब्रह्मक्षत्रं पातु ता इदं ब्रह्मक्षत्रं पान्तु तस्मै स्वाहा ॥**

ही पहिली आहुति. ताभ्यः स्वाहा ही दुसरी आहुति. असाच क्रम पुढें. दुसरा प्रकारः—**ऋत.षाडृतधामा० स इदं ब्रह्मक्षत्रं पातु ता इदं ब्रह्मक्षत्रं पान्तु तस्मै स्वाहा ।** ही पहिली आहुति आणि **ऋताषा० स इदं ब्रह्मक्षत्रं पातु ता इदं ब्रह्मक्षत्रं पान्तु** ताभ्यः स्वाहा ही दुसरी आहुति. असाच क्रम पुढें. तिसरा प्रकारः—**ऋताषा० गन्धर्वः स इदं ब्रह्म क्षत्रं पातु तस्मै स्वाहा** ही पहिली आहुति आणि **तस्यौषधयोऽप्सरस ऊर्जो नाम ता इदं ब्रह्म क्षत्रं पान्तु ताभ्यः स्वाहा । ही** दुसरी आहुति. असाच क्रम पुढें.

## होम करण्याचें स्थान.

कोणताही होम यज्ञपुरुषाच्या जिव्हेवरच केला पाहिजे.

**यत्र काष्ठं तत्र कर्णौ हुनेच्चैद्व्याधिकृन्नरः ।**
**धूमस्थानं शिरः प्रोक्तं मनोदुःखं भवेदिह १**
**यत्राल्पज्वलनं नेत्रं यजमानस्य नाशनम् ।**
**भस्मस्थाने तु क्लेशः स्यात्स्थाननाशो धनक्षयः २**
**अङ्गारे नासिकां विद्यान्मनोदुःखं विदुर्बुधाः ।**
**यत्र प्रज्वलनं तत्र जिह्वा चैव प्रकीर्तिता ३**
**गजवाजिप्रणादी तु वन्हिः शुभफलप्रदः ।**

अशीं वचनें संग्रहामध्यें आहेत. "काष्ठ हे अग्नीचे कान होत; तेथें हवन केल्यास रोग होतो. धूम हें मस्तक होय; तेथें हवन केल्यानें मानसिक दुःख होतें १. अल्प ज्वलन हे नेत्र होत; तेथें केलेलें हवन यजमानाच्या नाशाला कारण होतें भस्म हें यज्ञपुरुषाचें क्लेशस्थान होय; तेथें हवन केलें असतां स्थानाचा व धनाचा नाश होतो २. अंगार ही नासिका होय. तेथें केलेलें हवन मानसिक दुःखाला कारण होतें. जेथें चांगली ज्वाला असते तेथें जिव्हा असते ३. गज व अश्व ह्याप्रमाणें ध्वनि करणारा अग्नि शुभफलप्रद होय." असें ह्या वचनांचे तात्पर्य आहे.

## यज्ञपुरुषाच्या जिव्हा.

काली कराली च मनोजवा च
सुलोहिनी या च सुधूम्रवर्णा ।
स्फुलिङ्गिनी विश्वरुची च देवी
लेलायमाना इति सप्त जिह्वाः ॥

असें वचन संग्रहामध्येंच आहे. ह्या वचनांत सात जिव्हा सांगितल्या आहेत. दुसऱ्या ग्रंथांत ह्या जिव्हांसंबंधानें वेगळा मजकूर आढळतो.

सुवर्णा कनका रक्ता कृष्णा चैव तु सुप्रभा ।
बहुरूपाऽतिरक्ता च सप्त जिह्वाः प्रकीर्तिताः १
सुवर्णा वारुणी जिह्वा मध्यमा कनका स्मृता ।
रक्ता चैवोत्तरा जिह्वा कृष्णा याम्यदिशि स्मृता २
सुप्रभा पूर्वदिग्जिव्हा ह्यतिरक्ताऽग्निगोचरे ।
ऐशाने बहुरूपा च जिह्वास्थानान्यनुक्रमात् ३
विवाहे वारुणी जिह्वा मध्यमा यज्ञकर्मसु ।
उत्तरा चोपनयने दक्षिणा पितृकर्मसु ४
प्राचीना सर्वकार्येषु आग्नेयी शान्तिकर्मसु ।
ऐशानी चोग्रकार्येषु ह्येतद्धोमस्य लक्षणम् ५

ह्या वचनांचें तात्पर्य सहज कळण्यासारखें आहे. वारुणी ह्मणजे पश्चिमेकडील. अग्निगोचरे ह्मणजे आग्नेयी दिशेस आणि ऐशाने ह्मणजे ईशान्य दिशेस. मध्यमा ह्मणजे मध्यस्थानीं असलेली. आज्यहोमाविषयीं हा जिह्वानियम लागूं आहे; कठिन द्रव्यांचें हवन असल्यास एका आहुतीचें हुत झालें नसतांनाच तिच्यावर इतर आहुति पडण्याचा संभव असल्यामुळें हा नियम लागूं नाहीं. ह्या जिह्वा आज्यभागांच्या मधला जो ज्वालायुक्त प्रदेश तेथेंच स्थानभेदानें समजावयाच्या आहेत.

## उत्तर परिषेक वगैरे.

अथ परिषिञ्चति यथा पुरस्तादन्वम ँ स्थाः प्रासावीरिति मन्त्रान्तान्संनमति ।

असें गृह्यसूत्र आहे. राष्ट्रभृद्धोम झाल्यानंतर पूर्वींप्रमाणेंच परिषेक करावा. परंतु, 'अनुमन्यस्व' ह्या पदाच्या ऐवजीं 'अन्वम ँ स्थाः' असें पद योजावें आणि 'प्रसुव' ह्या पदाचे ऐवजीं 'प्रासावीः' असें पद योजावें.

## दक्षिणा.

यो ह्यदक्षिणेन यज्ञेन यजेत स यज्ञः प्रक्षामोऽनायुरुर्वरा समृद्धा देया सा प्रायश्चित्तिः ।

असें सूत्र आहे. जो दक्षिणारहित यज्ञ करितो त्याचा तो यज्ञ दग्ध होतो. त्यामुळें यजमानाचें आयुष्य कमी होतें. ह्यास्तव, चांगलें पीक येणारी जमीन देणें हें त्या दोषाचें प्रायश्चित्त होय.

## ब्रम्ह्याची दक्षिणा.

पूर्णपात्रं दक्षिणां ब्रह्मणे दद्यात्क ँ सं चमसं वाऽन्नस्य पूरयित्वा कृतस्य वाऽकृतस्य वाऽपि वा फलानामेवैतत्पूर्णपात्रमित्याचक्षते ।

असें छांदोग्य गोभिलगृह्यांत सांगितलें आहे. ब्रम्ह्याला पूर्ण पात्र दक्षिणा द्यावी. पूर्णपात्र ह्मणजे सडिक अथवा असडी तांदुळानें किंवा फळांनीं भरलेलें पात्र अथवा पाळें.

## अग्निपूजा.

गन्धपुष्पादिभिर्वह्निं होमान्ते परिपूजयेत् ।

असें स्मृतिवचन आहे. गंधपुष्पादिकांपासून अग्नीची पूजा होम झाल्यानंतर करावी व ती अग्नीपासून सहा अंगुळें लांबीवर करावी.

कारण, परिस्तरणें अग्नीपासून किती लांब घालावी ह्याविषयीं जें पूर्वी वचन दिलेलें आहे त्यामध्यें अग्नीची पूजा आयतनापासून सहा अंगुलांतर करावी असें सांगितलें आहे. गंधपुष्पादिभिः असें ह्या वचनांत सांगितलें असल्यामुळें पूर्वीचें उपचार करण्याचें प्रयोजन नाहीं. अग्निपूजनाविषयीं आरक्त वर्ण गंधपुष्पादिक शिष्ट लोक वर्ज्य करीत असतात; दिव्य प्रकरणांतील अग्निपूजनाविषयीं हा निषेध नाहीं.

## विभूतिधारण.

**स्नात्वा पुण्ड्रं मृदा कुर्याद्धुत्वा चैव तु भस्मना ।**
**देवानभ्यर्च्य गन्धेन सर्वपापापनुत्तये ॥**

असें वचन ब्रह्मांडपुराणांत आहे. "होम झाल्यानंतर भस्मानें त्रिपुंड्र करावा" असें ह्या वचनांत सांगितलें आहे. होमसमयीं अग्नि व यजमान ह्यांच्या मधून कोणी जाऊं नये. कारण,

**होमकाले तथा दोहे स्वाध्याये दारसंग्रहे ।**
**अन्तरेण यदा गच्छेद्द्विजश्चान्द्रायणं चरेत् ॥**

असें पराशरमुनींचें वचन आहे. "होम चालूं असतांना अग्नि व यजमान ह्यांच्यामधून ऋत्विजांशिवाय इतर कोणी द्विज गेल्यास त्यानें चांद्रायण प्रायश्चित्त करावें." असें ह्या वचनांत सांगितलें आहे. धार काढण्यास तयार झालेली गाय वगैरे आणि धार काढणारा, वेदाध्ययन करणारे द्विज आणि विवाहसंस्कार ज्यांचा चालू आहे असे वधूवर ह्यांच्यामधून जाणाऱ्यालाही हें प्रायश्चित्त आहे. वेद ह्मणणाऱ्या ब्राह्मणांमधून कोणी जात नाहींत त्याचप्रमाणें विवाह चालूं असतांना केव्हांही वधूवरांनीं चालण्याचा प्रसंग आल्यास परस्परांच्या वस्त्रांना गाठी मारण्याचा जो आचार आहे त्याला हें वचन प्रमाण आहे.

## यजनकर्म व राष्ट्रहित.

अग्निमुखामध्यें जयहोम, अभ्यातानहोम आणि राष्ट्रभृद्धोम असे तीन उपहोम सांगितलेले आहेत. हे उपहोम उपनयनसंस्कारामध्यें अवश्यच असून इतर कर्मांमध्यें ते वैकल्पिक आहेत. ह्या जयादि उपहोमांचा विचार केला असतां जाति, ग्राम, देश व राष्ट्र ह्यांच्या हिताविषयीं ह्या वैदिकधर्मी राष्ट्रांतील अतिप्राचीन द्विजांच्या अंतःकरणामध्यें किती कळकळ वसत होती हें सहज लक्ष्यांत येण्यासारखें आहे. उपनयन संस्कारानें द्विजकुलोत्पन्नाला खरें खरें द्विजत्व प्राप्त होत असतें. ह्या उपनयनसंस्कारामध्यें ह्या जयादि उपहोमांची आवश्यकता ज्या सूत्रकारांनीं सांगितलेली आहे त्यांचा उद्देश-ज्ञाति, ग्राम, देश व राष्ट्र ह्यांच्या हिताविषयीं शक्तीप्रमाणें व अधिकाराप्रमाणें आजन्म खटपट करणें हें आपल्या मुख्य जन्माचें कर्तव्य होय ही गोष्ट प्रत्येक उपनीत द्विजाच्या मनामध्यें बिंबविणें--हा होय. हे जयादि उपहोम कोणत्याही कर्मामध्यें स्विष्टकृताच्या पूर्वीच व्हावयाचे असतात. स्विष्टकृत हा एक यजनकर्मांतील मुख्य भाग आहे. तो भाग होण्यापूर्वी हे जयादि उपहोम सांगितलेले आहेत. ह्यावरून कोणतेंही कर्म करण्यामध्यें ज्ञाति, ग्राम व राष्ट्र ह्यांच्या कल्याणाची बुद्धि जागृत ठेवूनच तें कर्म केलें पाहिजे असें ठरतें. जयहोम ह्या नांवावरूनच हा होम जयप्रद असावा असें लक्ष्यांत येतें आणि वास्तविक तसा प्रकार आहेही. ह्या जयहोमामध्यें जो शेवटला मंत्र आहे त्याचा अर्थ फारच महत्त्वाचा आहे.

**प्रजापतिर्जयानिन्द्राय वृष्णे प्रायच्छदुग्रः पृतनाज्येषु तस्मै विशः समनमन्त सर्वाः स उग्रः स हि हव्यो बभूव**

असा जयहोमांतील शेवटला मंत्र आहे. 'चित्तं च चित्तिश्च' इत्यादि तेरा मंत्र जयाचें कारण असल्यामुळें त्यांना जय अशी संज्ञा आहे.

" वृष्टि करणाऱ्या इंद्राला प्रजापतीनें हे जयसंज्ञक मंत्र दिले. ते मंत्र प्राप्त झाल्यामुळें सर्व प्रजा इंद्राच्या आज्ञेप्रमाणें वागूं लागल्या. तो इंद्र प्रजाजनांमध्यें उग्र झाला आणि यज्ञकर्मांतील हविर्भाग प्राप्त करून घेण्याला तो योग्य झाला. " उग्र ह्मणजे दृष्टीं पडतांक्षणींच प्रजाजनांच्या मनांत भीति उत्पन्न होईल असा. इंद्राला ह्या जयमंत्राची प्राप्ति होण्याचें कारण काय? हेंही जयहोमविषयक श्रुतीमध्यें सांगितलेलें आहे. ती श्रुति येणेंप्रमाणें:—

**देवासुराः संयत्ता आसन्स इन्द्रः प्रजापतिमुपाधावत्तस्मा एताञ्जयान्प्रायच्छत्तानजुहोत्ततो वै देवा असुरानजयन्यदजयन्तज्जयानां जयत्वम् ।**

देव आणि असुर हे परस्परांशीं युद्ध करण्याविषयीं उद्युक्त झाले असतां देवांचा अधिपति जो इंद्र तो ब्रह्मदेवांकडे धांवला. तेव्हां ब्रह्मदेवानें त्याला हे जयमंत्र दिले. त्या मंत्रांनीं इंद्रानें हवन केलें व त्यामुळेंच देवांनीं असुरांना जिंकिलें. ज्याअर्थीं ह्या मंत्रांच्या योगानें देवांनीं असुरांना जिंकलें त्याअर्थीं ह्या मंत्रांना जय ही संज्ञा प्राप्त झाली. हें ह्या श्रुतीचें तात्पर्य होय.

## हा जयहोम कोणीं करावा?

**स्पर्धमानेनैते होतव्या जयत्येव तां पृतनाम् ।**

अशी श्रुति आहे. " जो शत्रूंशीं स्पर्धा करीत असेल त्यानें हे जयहोम करावे; ह्मणजे तो शत्रूचें तें सैन्य जिंकितोच. " असें ह्या श्रुतीचें तात्पर्य आहे.

## अभ्यातानहोम.

**देवा वै यद्यज्ञेऽकुर्वत तदसुरा अकुर्वत ते देवा एतानभ्यातानानपश्यन्तानभ्यातन्वत यद्देवानां कर्मासीदार्ध्यत त-**

**यदसुराणां न तदार्ध्यंत येन कर्मणेत्सेत्तत्र होतव्यां ऋध्नोत्येव तेन कर्मणा ।**

अशी श्रुति आहे. देवांनीं यज्ञामध्यें जें केलें तेंच असुरानीं केलें. तथापि, हे अभ्यातान मंत्र कर्मसमृद्धीचें कारण आहेत असें त्या मंत्रांची स्फूर्ति झाल्यावर देवांच्या लक्ष्यांत आलें. तेव्हां मंत्र उज्ज्वल राहण्यास अवश्य असलेलें आचरण वगैरे कायम ठेवून देवांनीं ते मंत्र आपल्या ताब्यांत ठेविले आणि त्या मंत्रांनीं हवन केलें. त्यामुळें देवांचें कर्म सफल झालें. परंतु, ते होम न केल्यामुळें असुरांचें कर्म समृद्ध झालें नाहीं. ह्यास्तव, ज्या कर्मानें अभ्युदय प्राप्त करून घेण्याची इच्छा द्विजाला असेल त्या कर्मामध्यें त्यानें ह्या अभ्यातानमंत्रांनीं हवन करावें; ह्मणजे त्याचें तें कर्म अभ्युदयाला कारण होतेंच." असें ह्या श्रुतीचें तात्पर्य आहे.

अभ्युदय ह्मणजे ऐहिक उत्कर्ष कोणाला नको आहे? प्रत्येकाला तो हवाच आहे आणि तो प्राप्त करून घेण्याकरितांच प्रत्येक मनुष्य यथाशक्ति प्रयत्न करीत आहे. परंतु, ऐहिक उत्कर्षाचें मुख्य कारण जें भगवान् श्रीकृष्णांनीं गीतेमध्यें अर्जुनाचें निमित्त करून आह्मांला सांगितलें आहे त्या यज्ञरूप कारणाचें आह्मी अवलंबन करीत नाहीं. मग तें यज्ञरूप कर्म खरें खरें अभ्युदयप्रद होण्याकरितां अवश्य जो त्या कर्मामध्यें अभ्यातानहोम त्याची तर आह्मांला दादही नाहीं. प्राचीन महर्षींनीं वेदांचें संरक्षण करून यज्ञरूप, संस्काररूप अथवा कर्मरूप अभ्युदयसाधनें आह्मां वैदिकधर्मी लोकांकरितां ठेविलीं असतांनाहीं व आह्मांला अभ्युदयप्राप्तीची इच्छा असतांनाही आह्मी अभ्युदयरूप हिरा हुडकण्याकरितां कोळशाच्या खाणीमध्यें आपलें आयुष्य घालवीत आहों. परंतु, त्यामुळें आमचा उत्कर्ष न होतां उलट आमचा ऱ्हास मात्र होत

चालला आहे. अभ्युदयार्थ मनुष्यानें इतर उद्योग करूंच नयेत असें कोणाचें ह्मणणें नाहीं. परंतु, ते उद्योग सफल होण्याचें मुख्य कारण जें यजनाध्ययनादि कर्म तें आह्मीं सोडून दिलें आहे. अस्तु. आतां जयहोम, अभ्यातानहोम व राष्ट्रभृद्धोम ह्या तिहींचें अवलंबन केल्यानें काय होतें तें पाहूं.

## जयसाधन.

**यद्विश्वे देवाः समभरन्तस्मादभ्याताना वैश्वदेवा यत्प्रजापतिर्जयान्प्रायच्छत्तस्माज्जयाः प्राजापत्या यद्राष्ट्रभृद्भी राष्ट्रमाददत तद्राष्ट्रभृता राष्ट्रभृत्त्वं ते देवा अभ्यातानैरसुरानभ्यातन्वत जयैरजयन्राष्ट्रभृद्भी राष्ट्रमाददत यद्देवा अभ्यातानैरसुरानभ्यातन्वत तदभ्यातानानामभ्यातानत्वं यज्जयैर जयन्तज्जयानां जयत्वं यद्राष्ट्रभृद्भी राष्ट्रमाददत तद्राष्ट्रभृतः राष्ट्रभृत्त्वं ततो देवा अभवन्पराऽसुराः**

अशी श्रुति आहे. "पूर्वोक्त प्रकारानें ज्याअर्थीं देवांनीं हे अभ्यातानमंत्र संपादन केले त्याअर्थीं ह्या मंत्रांना वैश्वदेव असें ह्मणतात. ज्याअर्थीं प्रजापतीनें इंद्राला जयसंज्ञक मंत्र दिले त्याअर्थीं त्या जयांना प्राजापत्य असें ह्मणतात आणि ज्याअर्थीं राष्ट्रभृत्संज्ञक मंत्रांनीं असुरसंबंधी राष्ट्राचा देवांनीं स्वीकार केला त्याअर्थीं त्या मंत्रांना राष्ट्रभृत असें ह्मणतात. देवांनीं अभ्यातानांच्या योगानें असुरांना आपल्या कचाट्यांत आणिलें; जयांच्या योगानें देवांनीं त्यांना ऐश्वर्यहीन केलें आणि राष्ट्रभृतांच्या योगानें असुरांचें राष्ट्रही देवांनीं हरण केलें; म्हणून त्या होममंत्रांना अभ्यातान, जय व राष्ट्रभृत ह्या संज्ञा प्राप्त झाल्या. ह्या तीन होमांनीं मिळून देवांचा विजय झाला व हे होम नसल्यामुळें असुरांचा पराजय झाला" असें ह्या श्रुतीचें तात्पर्य आहे. अद्यापि ह्या भरतखंडामध्यें द्विज असून त्यांचा अगदीं गौण

पद्धतीनें कां होईना वेदाध्ययनाधिकारप्राप्त्यर्थ उपनयनसंस्कार होत आहे. तेव्हां ह्या द्विजांनीं सदाचारानें राहून जर वेदाध्ययन केलें आणि वेदविहित कर्मे केलीं तर आज जी सर्वस्वीं ह्या राष्ट्राची हलाखी झाली आहे ती नाहींशी होऊन अभ्युदयाची स्थिति प्राप्त होईल.

**यो भ्रातृव्यवान्स्यात्स एताञ्जुहुयादभ्यातानैरेव भ्रातृव्यानभ्यातनुते जयैर्जयति राष्ट्रभृद्भी राष्ट्रमादत्ते भवत्यात्मना पराऽस्य भ्रातृव्यो भवति ।**

अशी श्रुति आहे. ज्याला शत्रु असतील त्यानें हे होम करावे; ह्मणजे अभ्यातानांच्या योगानें तो शत्रूंना वश करून घेतो; जयांच्या योगानें तो शत्रूंना ऐश्वर्यहीन करितो आणि राष्ट्रभृतांच्या योगानें तो त्यांच्या राष्ट्राचा स्वीकार करितो. सारांश, हे तीन होम करणारा यजमान सर्वत्र विजयी होतो आणि त्याच्या शत्रूंचा पराजय होतो. असें ह्या श्रुतीचें तात्पर्य आहे. ह्यास्तव, कोणत्याही विहित कर्मापासून हें त्रिविध फल प्राप्त होण्याकरितां हे होम करणें अवश्य आहे.

जैमीनि महर्षींनीं पूर्वमीमांसेच्या तिसऱ्या अध्यायांतील चवथ्या पादामध्यें हे जयहोम, अभ्यातानहोम व राष्ट्रभृद्धोम ह्यांचें वैदिक कर्मामध्येंच अवलंबन करावें असा सिद्धांत दर्शविला आहे.

## राष्ट्रभृत्संज्ञक होम व त्याचें फल वगैरे.

ह्या होमाचे मंत्र तैत्तिरीयसंहितांतर्गत तृतीय कांडांतील चतुर्थ प्रपाठकाच्या सातव्या अनुवाकांत दिलेले आहेत व आठव्या अनुवाकांत ह्या होमाच्या फलादिकांसंबंधानें विशेष खुलासा केलाला आहे. राष्ट्र कशाला ह्मणावें हें ह्या अनुवाकांत सांगितलेलें आहे. ह्या अनुवाकांतील श्रुति क्रमानें दर्शवून त्यांचें तात्पर्य दर्शवितों.

**राष्ट्रकामाय होतव्या राष्ट्रं वै राष्ट्रभृतो राष्ट्रेणैवास्मै राष्ट्र-मवरुन्धे राष्ट्रमेव भवति ।**

ह्या श्रुतीमध्यें एका प्रयोगाचें विधान केलेलें आहे. राष्ट्रभृत्संज्ञक जे मंत्र ते राष्ट्रप्राप्तीचें कारण आहेत; ह्मणून त्यांनाच राष्ट्र अशी संज्ञा आहे. तेव्हां ज्याला राष्ट्रप्राप्तीची इच्छा असेल त्या यजमाना-करितां राष्ट्रभृत्संज्ञक मंत्रांनीं होम करावा. ह्या राष्ट्रभृत्संज्ञक मंत्र-होमरूप राष्ट्राच्या योगानें यजमानाला अध्वर्यु विशिष्टभूमिरूप राष्ट्र संपादन करून देत असतो व त्या यजमानाला राष्ट्र प्राप्त होतच असतें. ह्यास्तव, राष्ट्रप्राप्तीची इच्छा असणाऱ्या यजमाना-करितां ह्या मंत्रांचा अवश्य होम करावा. राष्ट्र ह्या शब्दाचा अर्थ भाष्यकारांनीं ह्या ठिकाणीं भूमि असा केलेला आहे. तेव्हां भूमीची इच्छा कोणाला नाहीं? देशांतील भूमि सुपीक व्हावी ही इच्छा सर्वांची आहे. आपल्या भूमीवर आपलीच सत्ता रहावी हीही इच्छा जमीनदार, जहागीरदार वगैरे लोकांची असतेच आणि आपण जेथें राहतों ती भूमि आपल्या कल्याणाला कारण व्हावी ही इच्छा सर्व विचारी लोकांची असते. तेव्हां ह्या राष्ट्रभृद्धोमाची आवश्यकता सर्वांनाच आहे.

## उत्कर्षाकरितां राष्ट्रभृद्धोम.

**आत्मने होतव्या राष्ट्रं वै राष्ट्रभृतो राष्ट्रं प्रजा राष्ट्रं पशवो राष्ट्रं यच्छ्रेष्ठो भवति राष्ट्रेणैव राष्ट्रमवरुन्धे वसिष्ठः समा-नानां भवति ।**

अशी श्रुति आहे. आपला उत्कर्ष व्हावा एतदर्थ राष्ट्रभृत्संज्ञक मंत्रांनीं हवन अवश्य केलें पाहिजे. अल्पस्वल्प भूमि, गांव, देश इत्यादिकांवर सत्ता हें जें राष्ट्र तें कमीअधिक मानानें कांहीं लोकांना प्राप्त झालेलें असतें. परंतु, नुसती भूमि वगैरे प्राप्त होऊन कराव-

चयाचें काय ? प्रजा, पशु व श्रेष्ठता ह्यांचा जर अभाव असेल तर त्या भूमिप्रभृतींचा योग्य उपभोगच घडण्याचा संभव नाहीं. ह्यास्तव, प्रजा, पशु व श्रेष्ठता ह्या गोष्टी अवश्य आहेत. कारण, नुसती भूमि असणें ह्मणजे राष्ट्र असणें असें ह्मणतां येणार नाहीं. प्रजा हें राष्ट्र होय. पशु हेंच राष्ट्र होय आणि श्रेष्ठता हेंच राष्ट्र होय. समजा एका राजाची एका देशावर सत्ता आहे किंवा एका जमीनदाराची पुष्कळ जमीनींवर मालकी आहे. देशांतील प्रजेचाच जर व्यभिचारादि कारणांमुळें व इतर कारणामुळें र्‍हास होऊं लागला तर त्या राजाची सत्ता त्या देशावर कायम असूनही प्रजेचा उत्तरोत्तर अभाव होत चालल्यास त्याची सत्ताही आपोआपच नाहींशी होईल. कारण, लोकांचा अभाव झाल्यास सत्ता चालवावयाची कोणावर ? त्याचप्रमाणें जमीनदाराची मालकी जर लक्षावधि एकर जमीनींवर असली आणि त्याला जर संतति नसली किंवा असूनही दुर्वृत्त निपजली असली तर त्या जमीनीवरील मालकीपासून त्याला सुख होणार नाहीं व योग्य प्रजेच्या अभावामुळें त्या जमिनींवरील सत्ताही त्याच्या कुलांत राहण्याचा संभव नाहीं. ह्यास्तव, चांगली प्रजा अवश्य आहे आणि ह्मणूनच प्रजा ह्मणजे राष्ट्र असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे.

जमीनीवर अथवा देशावर सत्ता असून प्रजाही चांगली आहे. परंतु, पशूंचा जर अभाव असेल तर त्या भूमीवरील व राज्यावरील सत्तेमुळें व प्रजेमुळें सुख होणार नाहीं. इतकेंच नव्हे परंतु, पशूंचा अभाव असल्यास प्रजेचाच नाश होईल. बालक जन्मास येण्यापूर्वींच ज्याप्रमाणें परमेश्वरानें मातेच्या स्तनामध्यें त्याचें जीवनसाधन उत्पन्न केलेलें असतें त्याचप्रमाणें परमेश्वरानें मनुष्यें उत्पन्न करण्यापूर्वींच त्यांच्या जीवनार्थ अवश्य असलेले गवादि पशु उत्पन्न केलेले आहेत

आणि ह्मणूनच पुरुषसूक्तादिकांमध्यें गवाश्वादि पशूंची उत्पत्ति प्रथम सांगितलेली असून ब्राह्मणादि मनुष्यांची उत्पत्ति नंतर सांगितली आहे. तेव्हां बालकाचें जीवन ज्याप्रमाणें मातेच्या रक्षणावर व पुष्टीवर अवलंबून आहे त्याचप्रमाणें प्रजेचें व स्वतःचें जीवन पशूंच्या रक्षणावर व पुष्टीवर अवलंबून आहे. उत्कृष्ट जमीन, हवा तसा पर्जन्य आणि उद्योगी शेतकरी हे तीन जरी असले तरी जमीन नांगरणें, कुळवणें, पेरणें, धान्य मळणें इत्यादिकांना अवश्य जे पशु त्यांचाच अभाव असल्यास त्या पर्जन्यादिकांचा उपयोग काय ? ह्यास्तव, पशुसंपत्ति अवश्य आहे आणि ह्मणूनच श्रुतिस्मृतीमध्यें गोधनरूप संपत्तीची प्रशंसा केलेली आहे. ह्याच कारणाकरितां ह्या श्रुतीमध्यें राष्ट्र ह्मणजे पशु असें ह्मटलें आहे.

आपण ज्या ज्ञातीमध्यें अथवा कुलामध्यें जन्मलों त्या ज्ञातीचें अथवा कुलाचें कल्याण जर आपल्या हातून झालें नाहीं तर आपला जन्म व्यर्थ होय. ह्यास्तव, सजातीयांमध्यें आपला उत्कर्ष असणें अवश्य आहे; ह्मणून सजातीयांमध्यें उत्कृष्टता हेंच राष्ट्र होय. हें राष्ट्र आपणांला प्राप्त झालें ह्मणजे समानांमध्यें ह्मणजे सजातीय लोकांमध्यें पुरुष वसिष्ट होतो. वसु ह्मणजे निवास करणें. वसु=निवास करणारा; वास्तव्याला कारण होणारा. वसिष्ट=वास्तव्याला कारण होणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ. अर्थात् आपल्या सजातीयांच्या आणि आपल्या समाजबंधूंच्या निवासाला ह्मणजे उत्कर्षाला जो कारण होतो तो समानांमध्यें वसिष्ठ होय. ह्यास्तव, प्रजा, पशु व स्वतःसह सजातीयांचा उत्कर्ष होण्याकरितां अवश्य असणारें श्रेष्ठत्व हीं प्राप्त होण्याकरितां राष्ट्रभृत्संज्ञक मंत्रांचें हवन अवश्य आहे.

## ग्रामप्राप्तीकरितां राष्ट्रभृद्धोम.

**ग्रामकामाय होतव्या राष्ट्रं वै राष्ट्रभृतो राष्ट्र ँ सजाता राष्ट्रेणैवास्मै राष्ट्र ँ सजातानवरुन्धे ग्राम्येव भवति ।**

अशी श्रुति आहे. **स्वेन सहोत्पन्ना ज्ञातय एकग्रामनिवासिनश्च सजातास्तेषु सर्वेषु सत्सु राष्ट्रं संपूर्णं भवतीति तेषां राष्ट्रत्व-मतो मन्त्ररूपेण राष्ट्रेण सजातरूपं राष्ट्रमवरुन्धे ग्रामस्वामी भवत्येव ।** असें ह्या श्रुतीवर भाष्य आहे. सजात ह्मणजे एका गांमांत राहणारे व आपल्याबरोबर उत्पन्न झालेले ज्ञातिबांधव. आपले ज्ञातिबांधव, ग्रामबंधु व देशबंधु उत्कर्षस्थितींत असल्याशिवाय राष्ट्राला पूर्णता येत नाहीं; ह्मणून आपल्या गांवांत राहाणारे लोक, आपल्या ज्ञातींतिल लोक आणि आपल्या देशांतील लोक ह्यांनाच राष्ट्र अशी संज्ञा आहे. ह्यास्तव, जो राष्ट्रभृत्संज्ञक होम करितो त्याच्या ज्ञातींचा, ग्रामबंधूंचा व देशबंधूंचा उत्कर्ष होतो.

## राष्ट्रभृद्धोम कोठें करावा ?

**अधिदेवने जुहोत्यधिदेवन एवास्मै सजातानवरुन्धे त एनमवरुद्धा उपतिष्ठन्ते ।**

अशी श्रुति आहे. अधिदेवन=द्यूतक्रीडेचें स्थान, जुगारीची जागा. द्यूतस्थानीं हा होम केला असतां होम करणाऱ्याचे ज्ञातिबांधव वगैरे त्याच्या अधीन होतात व ते अधीन राहूनच त्याची सेवा करितात.

## राष्ट्रभृद्धोम बलप्राप्तीचें साधन आहे.

**रथमुख ओजस्कामस्य होतव्या ओजो वै राष्ट्रभृत ओजो रथ ओजसैवास्मा ओजोऽवरुन्ध ओजस्व्येव भवति ।**

ओज ह्मणजे बल. सप्त धातूंचें जें परम तेज त्याला वैद्यशास्त्रामध्यें ओज अशी संज्ञा आहे. हें ओज असेल तरच प्राण्यांचे ठिकाणीं बल असतें ह्मणून ओजालाच बल असें ह्मणतात. ज्याच्या ठिकाणीं ओज नसेल अथवा ज्याच्या गांवांतील अथवा देशांतील लोकांचे ठिकाणीं

ओज नसेल त्याच्या करितां हा राष्ट्रभृत्संज्ञक होम रथाच्या दांडीचें अग्र अग्नीवर धरून त्याच्या वरून करावा. कारण, राष्ट्रभृत्संज्ञक मंत्र हें एक प्रत्यक्ष ओजच आहे आणि रथही ओजच आहे. अशा रीतीनें होम केला असतां सर्व प्रकारचें बळ यजमानाच्या स्वाधीन होतें व तो बलाढ्य होतो.

## राष्ट्रप्राप्तीचें साधन.

**यो राष्ट्रादपभूतः स्यात्तस्मै होतव्या यावन्तोऽस्य रथाः स्युस्तान्ब्रूयाद्युङ्ग्ध्वमिति राष्ट्रमेवास्मै युनक्ति ।**

आपल्या राष्ट्रापासून जो भ्रष्ट झाला असेल त्याच्या करितां हा होम करावा आणि जितके रथ त्याच्या ताब्यांत असतील तितके सर्व जोडा अशी आज्ञा करावी; ह्मणजे ह्या होमानें व त्या प्रैषानें त्याला पुनरपि राष्ट्र प्राप्त होतें." असें ह्या श्रुतीचें तात्पर्य आहे. रथ प्रत्यक्ष जोडण्याचें कारण नाहीं. **यावन्तोऽस्य रथाः स्युस्तान्ब्रूयाद्युङ्ग्ध्वं** असा फक्त प्रैष द्यावयाचा आहे. तेव्हां ज्याच्या करितां हा होम करावयाचा आहे त्याच्या पाशीं रथ असलेच पाहिजेत असें नाहीं. सारांश, राजा आपल्या राज्यापासून च्युत झाला असल्यास त्याला ह्या होमामुळें पुनरपि राज्यपद प्राप्त होतें. त्याचप्रमाणें अधिकारभ्रष्टाला अधिकार प्राप्त होतो आणि जो आपल्या कुलापासून, गांवापासून अथवा देशापासून भ्रष्ट झालेला असेल त्याला कुलाची, गांवाची अथवा देशाची प्राप्ति होते. गांवाची वगैरे मालकीच ज्याच्याकडे असेल त्यालाच अनुलक्षून गेलेली ती मालकी पुनरपि प्राप्त होण्याकरितां हा होम विहित आहे असें नाहीं. गांवावर अथवा देशावर मालकी नसतांनाही ज्याचा जेथें जम बसला असेल तेथून कांहीं कारणामुळें त्याला दुसरीकडे जाण्याचा प्रसंग येतो. त्याचप्रमाणें देशाधिपतीची

अवकृपा झाल्यास कोणावर हद्दपारीचा वगैरे प्रसंग येतो. त्याच-प्रमाणें राजाच्या अवकृपेमुळें कोणाला कारागृहवास वगैरे प्राप्त झाल्यास त्याला त्या स्थितीमुळें सर्व जगतच पारखें होत असतें. तेव्हां कोणत्याही रीतीनें कोणत्याहीप्रकारच्या पदापासून अथवा अधिकारापासून अथवा स्थितीपासून ज्याची च्युति झाली असेल त्याच्याकरितां हा होम करावा; ह्मणजे त्याला पूर्वस्थिति प्राप्त होते. असें आहे ह्मणूनच प्रत्येक वैदिक कर्मामध्यें हा होम सांगितलेला आहे. नाहींतर जो कोणी देशाचा अधिपति राजा असेल त्यालाच अनुलक्षून हा होम सूत्रकारांनीं सांगितला असता.

## राष्ट्र समर्थ होण्याचें साधन.

**आहुतयो वा एतस्याक्लृप्ता यस्य राष्ट्रं न कल्पते स्वरथस्य दक्षिणं चक्रं प्रवृह्य नाडीमभि जुहुयादाहुतीरेवास्य कल्पयति ता अस्य कल्पमाना राष्ट्रमनु कल्पते ।**

अशी श्रुति आहे. "ज्याचें राष्ट्र स्वकार्य करण्यास असमर्थ होतें त्यानें आपल्या रथाचें उजवें चाक अग्नीवर धरून त्याच्या रंध्रांतून राष्ट्रभृत्संज्ञक आहुति घालाव्या; ह्मणजे हवन करणारा त्या आहुतींनाच समर्थ करितो ह्मणजे त्यांच्यापासून जें फल उद्दिष्ट आहे तें प्राप्त करून देण्यास त्यांना समर्थ करितो आणि त्या आहुति समर्थ झाल्या असतां आपल्या मागोमाग त्या राष्ट्रालाही स्वकार्यक्षम करितात." असें ह्या श्रुतीचें तात्पर्य आहे. राष्ट्र ह्मणजे प्रजा, पशु, श्रेष्ठता, ज्ञाति-बांधव, देशबांधव व ओज असें पूर्वी ठरलें गेलें आहे. तेव्हां ज्याच्या राष्ट्रांतील प्रजा, पशु वगैरे आपलें कार्य करण्यास समर्थ नसतील त्यानें राष्ट्रभृद्धोम केल्यास प्रजादिकांना आपआपलें कार्य करण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें.

## युद्धामध्यें जय येण्याचें साधन.

सङ्ग्रामे संयत्ते होतव्या राष्ट्रं वै राष्ट्रभृतो राष्ट्रं खलु वा एते व्यायच्छन्ते ये संग्रामं संयन्ति यस्य पूर्वस्य जुह्वति स एव भवति जयति तं संग्रामम्।

"राष्ट्राकरितां जे परस्पर युद्ध करण्यास प्रवृत्त होतात त्यांतकीं जो प्रथम राष्ट्रभृत्संज्ञक होम करण्यास प्रवृत्त झालेला असतो आणि ज्याच्या करितां ऋत्विज राष्ट्रभृत्संज्ञक होम करितात तोच प्रतिपक्ष्याला जिंकण्यास समर्थ होतो व त्या युद्धांत त्याला जय मिळतो." असें ह्या श्रुतीचें तात्पर्य आहे.

मान्धुक इध्मो भवत्यङ्गारा एव प्रतिवेष्टमाना अमित्राणामस्य सेनां प्रतिवेष्टयन्ति।

अशी श्रुति आहे. संग्रामामध्यें विजय प्राप्त होण्याकरितां राष्ट्रभृद्धोम करावयाचा असल्यास त्या होमाला मान्धुक इध्म अवश्य आहे. मांधुक ह्मणजे मोहाचा वृक्ष. मांधुक इध्म्यापासून होणारें जे अंगार तेज ह्या यजमानाच्या शत्रूंच्या सेनेला घेरून टाकितात. सारांश, ह्या इध्म्याच्या अभ्याधानामुळें शत्रूंच्या सैन्यामध्यें आग लागणें, घातुक ज्वर फैलावणें इत्यादि प्रकारची अग्निबाधा होते.

## उन्माद रोग नष्ट होण्याचें साधन.

य उन्माद्येत्तस्मै होतव्या गन्धर्वाप्सरसो वा एतमुन्मादयन्ति य उन्माद्यत्येते खलु वै गन्धर्वाप्सरसो यद्राष्ट्रभृतस्तस्मै स्वाहा ताभ्यः स्वाहेति जुहोति तेनैवैनाञ्छमयति।

अशी श्रुति आहे. "जो पुरुष उन्मत्त होतो त्याच्या उन्मादरोगाचा परिहार होण्याकरितां राष्ट्रभृत्संज्ञक होम करावा. (कारण, ह्या राष्ट्रभृद्धोमाशीं गंधर्व आणि अप्सरा ह्यांचाच विशेष संबंध आहे.) जो उन्मत्त

होतो त्याला गंधर्व आणि अप्सरा ह्यींच उन्मादरोगानें ग्रस्त करीत असतात. राष्ट्रभृत्संज्ञक मंत्रच खरोखर गंधर्व व अप्सरा होत. ह्यास्तव, गंधर्वांना उद्देशून मंत्राच्या अंतीं तस्मै स्वाहा असें ह्मणून व अप्सरांना उद्देशून ताभ्यः स्वाहा असें ह्मणून हवन करावें; ह्मणजे त्या होमाच्या योगानें उन्माद उत्पन्न करणाऱ्या गंधर्वांना व अप्सरांना होमकर्ता शांत करितो." असें ह्या श्रुतीचें तात्पर्य आहे. ह्या श्रुतीमध्यें 'उन्मादयेत्, उन्मादयन्ति, उन्माद्यति' अशीं पदें आहेत. उन्मादशब्दाचा अर्थ उन्मादरोग असाही आहे आणि अतिशय मद, बेफामपणा, बेपर्वाई, अतोनात गर्व, कार्याकार्य विचार नसणें, अथवा अविवेक असाही आहे. राष्ट्रभृद्धोमामुळें गंधर्व आणि अप्सरा शांत होत असतात. परंतु, जे राष्ट्रभृद्धोम करित नाहींत ते गंधर्व आणि अप्सरा ह्यांच्या कचाट्यांत सांपडतात. ह्यांच्या कचाट्यांत सांपडलेले लाखों लोक आजपर्यंत धुळीस मिळाले आहेत, मिळत आहेत व मिळतील. वेश्या ही जाति अप्सरांपासून उत्पन्न झालेली आहे. अर्थात् वेश्या हें अप्सरांचें रूप होय. गायन ही गंधर्वांची विद्या होय. गंधर्वांचा ज्याप्रमाणें अप्सरांशीं संबंध असतो त्याचप्रमाणें मोठमोठ्या गवई लोकांचाही प्रायः वेश्यांशीं संबंध असतो आणि वैदिक धर्माची पर्वा नसल्यामुळें राष्ट्रभृद्धोमापासून अलिप्त असणारे श्रीमान् द्विज प्रायः ह्या गंधर्वांच्या व अप्सरांच्या तावडींत सापडतात आणि ह्यांचे तावडींत सांपडलेल्या श्रीमान् लोकांना खरोखर एक प्रकारचा उन्मादच झालेला असतो. ह्या भरतवर्षामध्यें संस्थानिक, जहागीरदार, जमीनदार, सावकार व व्यापारी असे द्विज बरेच आहेत. परंतु, त्यांच्या द्रव्याचा व्यय ह्या गंधर्वांकडे व अप्सरांकडे जितका होत असतो तितक्याच्या दशांशही वैदिकधर्माकडे होत नाहीं. अशीं उदाहरणें प्रत्येक ठिकाणीं हवीं तितकीं आहेत. अप्सरांना एकेका

बैठकीला हजारांनीं द्रव्य देणारे लोक आजमितीला शेंकडो आहेत. वेदशास्त्रांच्या शाळेकरितां किंवा कोटिलिंगार्चनासारख्या सत्कृत्याकरितां ज्यांना शेंपन्नास रुपये देण्याचें मोठें जड जातें त्यांनीं अनेक हजार रुपये एका गोत्रें प्रांतांतील अप्सरेला एका दिवशीं दिल्याचें ह्या लेखकाला ठाऊक आहे. पूर्वीपार चालत आलेला दहा वीस रुपयांतील दानधर्म) महागाई, प्रपचांचा वाढता खर्च इत्यादि कारणांमुळें सुरू ठेवणें ज्यांच्या जीवावर येत असतें ते शेंकड्यांनीं रुपये अप्सरांना देत असतात. एका संगीत नाटकमंडळीमध्यें फाटाफूट होऊन जेव्हां त्या एका मंडळीच्या दोन संगीत नाटकमंडळ्या झाल्या तेव्हां कुळपरंपरेनें चालत आलेली संस्थानांतील श्रावणमासाची दक्षिणा बंद करून वेदशाळा नामशेष करणाऱ्या एका संस्थानिकानें त्या दुसऱ्या मंडळीचा आश्रित ह्मणून स्वीकार केला. श्रीमंत लोकांच्या मंगल कार्यांत पुरोहिताच्या अहेराचें काम नारळावर भागतें; परंतु, नाचणाऱ्या नायकिणींना शालूपैठण्यांचेही अहेर पुरेसे होत नाहींत. ज्या श्रीमान् व जहागीरदार लोकांच्या घरीं देवांचे उत्सव वगैरे होत असतात त्यांत सुद्धां उत्सवांतील पूजनादिकांकडे खर्च होणाऱ्या द्रव्यापेक्षां गवई, नायकिणी इत्यादिकांकडे अनेकपट द्रव्य खर्च होत असतें. लहानमोठ्या गांवांतून बहिरोबा, खंडोबा, नागोबा, अंबाबाई इत्यादि ग्रामदेवतादिकांचे सार्वजनिक उत्सव होत असतात व त्यांना जत्रा असें ह्मणतात. ह्या उत्सवामध्यें देवतांच्या यथाविधि पूजनाकडे जो खर्च होत असतो त्यापेक्षां शेंकडो पटींनीं खर्च नाच, तमाशा व गाणें ह्यांतच होत असतो. महाराष्ट्रांतील महाराज ह्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या व बायाबापड्यांना साधु ह्मणून मान्य झालेल्या एका ब्रह्मकुलोत्पन्नांनीं एका अप्सरेचा सहवास करण्याचें व्रतच स्वीकारिलें आहे आणि हें ह्यांचें अत्यंत गर्ह्य कृत्य शिष्य ह्मणविणाऱ्या त्यांच्या शेंकडों भक्तांना मोठें

प्रशंसनीय वाटूं लागलें आहे. राष्ट्रभृत्संज्ञक होमाचें अनुष्ठान हातून न झाल्यामुळें भोळ्याभावड्या लोकांच्या व बायाबापड्यांच्या दृष्टीनें साधु व अवतारी ठरणारेही लोक जर पूर्णपणें ह्या अप्सरांच्या अधीन होतात तर बोलूनचालूनच जे प्रपंचांत पडलेले लोक ते ह्या अप्सरांच्या व गंधर्वांच्या तावडींत सांपडतात ह्यांत नवल तें काय? तुह्मी कोणत्याही प्रांतांत जाऊन पहा; जिकडे तिकडे ह्या गंधर्वाप्सरांनं लोकांचें चित्त व वित्त हरण करण्याची पराकाष्ठा चालविली आहे आणि ह्मणूनच नाटकांतील नट, गवई व वेश्या ह्यांच्याकडे स्वधर्मानुष्ठानार्थ खर्च झालेल्या पैशांपेक्षां अधिक पैसे खर्च न झालेला धनाढ्य सांपडणें आज मोठ्या मुष्किलीचें झालें आहे. तस्मात्, गंधर्व आणि अप्सरा ह्यांच्या तावडींत सांपडून आपण उन्मादग्रस्त होऊं नये अशी इच्छा करणाऱ्यानें राष्ट्रभृद्धोम अवश्य केला पाहिजे.

## गंधर्व व अप्सरा ह्यांचें निवासस्थान.

नैयग्रोध औदुम्बर आश्वत्थः प्लाक्ष इतीध्मो भवत्येते वै गन्धर्वाप्सरसां गृहाः स्व एवैनानायतने शमयति ।

उन्मादनिरसनार्थ राष्ट्रभृद्धोम करावयाचा असल्यास "वड, पिंपळ, उंबर व पायरी ह्या वृक्षांचा इध्मा करावा. कारण, वड, उंबर, पिंपळ व पायरी हे वृक्षच ह्या गंधर्वाप्सरांचीं निवासस्थानें होत. ह्यास्तव, ह्या वृक्षांच्या काष्ठांचा इध्मा केला असतां गंधर्व आणि अप्सरा ह्यांना त्यांच्या निवासस्थानामध्येंच होमकर्ता शांत करितो."* असें ह्या श्रुतीचें तात्पर्य आहे.

## राष्ट्र कशाला ह्मणावें?

अमुक योजनें क्षेत्रफळ असलेल्या भूमीवरील प्रदेशाला राष्ट्र अथवा राज्य ह्मणावें असें कोठें सांगितलेलें नाहीं. भूमीवरील वित्र-

क्षित क्षेत्रफळाच्या प्रदेशाला जर राष्ट्र ह्मणतां येईल तर कच्छाचें रण, मोठीं मोठीं अरण्यें, दक्षिण व उत्तर ध्रुवाकडील बर्फानें आच्छादिलेला प्रदेश, समुद्राचीं अफाट वाळवंटें इत्यादिकांनाही राष्ट्र ही संज्ञा प्राप्त होऊं लागेल. परंतु, राष्ट्र अथवा राज्य ही संज्ञा केवल विवक्षित क्षेत्रफळाच्या भूप्रदेशाला नाहीं. सुपीक जमीन, गवाश्वादि पशु, स्वतंत्र व ज्ञानसंपन्न लोक, प्रजेचें आयुष्य, धैर्य, बल, आरोग्य, सुख, परस्पर प्रेम, सदाचरण इत्यादि गोष्टींच्या समुदायाला राष्ट्र अशी संज्ञा आहे आणि ह्मणूनच ज्ञातिबांधव, ग्रामबंधु, देशबांधव, ओज, रथ, प्रजा, पशु इत्यादिकांना राष्ट्र अशी संज्ञा श्रुतीमध्यें दिलेली आहे. राष्ट्रामध्यें स्थिति कशी असावी हें तैत्तिरीय संहितेंतील एका अनुवाकांत दर्शविलें आहे. त्यावरून राष्ट्र ही संज्ञा खऱ्या खऱ्या रीतीनें कशाला देतां येईल हें कळण्यासारखें आहे.

आब्रह्मन्ब्राह्मणो ब्रह्मवर्चसी जायतामास्मिन्राष्ट्रे राजन्य इषव्यः शूरो महारथो जायतां दोग्ध्री धेनुर्वोढाऽनड्वानाशुः सप्तिः पुरन्धिर्योषा जिष्णू रथेष्ठाः सभेयो युवाऽस्य यजमानस्य वीरो जायतां निकामे निकामे नः पर्जन्यो वर्षतु फलिन्यो न ओषधयः पच्यन्तां योगक्षेमो नः कल्पताम् ।

ह्या श्रुतीमध्यें जें सांगितलें आहे तें सर्व राष्ट्र ही संज्ञा खऱ्या खऱ्या अर्थानें प्राप्त होण्याला अवश्य आहे. राष्ट्रभृद्धोमविषयक अनुवाकामध्यें प्रजा, पशु, ओज, सजात व रथ ह्यांना राष्ट्र अशी संज्ञा दिलेली आहे. परंतु, राष्ट्र, ह्या संज्ञेस पात्र असणारे पशु कोणते? प्रजा कोणती? इत्यादि गोष्टींचा उलगडा "आब्रह्मन्ब्राह्मणः" ह्या वर दिलेल्या श्रुतीमध्येंच आहे. त्या श्रुतीचें तात्पर्य कळलें ह्मणजे राष्ट्रामध्यें कशाकशाचा अंतर्भाव होत असतो हे समजेल. ब्रह्म ह्मणजे वेद आणि वर्चस् ह्मणजे तेज. वेदसंबंधि तेजानें जो संपन्न तो ब्रह्म-

वर्चस्वी. ह्या राष्ट्रामध्यें ब्राह्मणवर्ण वेदसंबंधि तेजानें संपन्न होवो. क्षत्रियवर्ण शस्त्रास्त्रामध्यें निपुण, शौर्यसंपन्न व महारथी निपजो. गाई सर्वही धेनु ह्मणजे विपुल दूध देणाऱ्या निपजोत. बैल भार वाहण्यास समर्थ निपजोत. अश्व शीघ्रगमन करणारे निपजोत. स्त्रिया रूपसंपन्न निपजोत. यज्ञकर्म करणाऱ्याची संतति विजयशील, रथी, सभ्य, तारुण्यसंपन्न व वीर्यसंपन्न निपजो. आह्मांला जेव्हां जेव्हां पर्जन्याची अपेक्षा असेल तेव्हां तेव्हां पर्जन्य पडो. शेतांतील पिकें धान्यसमृद्धीनें संपन्न असोत. ह्या राष्ट्रामध्यें जी कांहीं उणीव असेल ती भरून निघो. ह्मणजे जें धन वगैरे अप्राप्त असेल तें प्राप्त होवो आणि जें प्राप्त झालेलें असेल त्याचें रक्षण होवो. असें ह्या श्रुतींत सांगितलेलें आहे. ह्या श्रुतींत ज्या गोष्टी सांगितलेल्या आहेत त्यांनीं संपन्न असलेल्या भूमीला राष्ट्र अशी संज्ञा आहे. तेव्हां ही श्रुति व राष्ट्रभृद्धोमविषयक श्रुति ह्यावरून राष्ट्रलक्षण येणेंप्रमाणें:—

तेजस्वी प्रजा, लोकांचा उत्कर्ष, (विपुल दूध देणाऱ्या गाई, मोठीं मोठीं ओझीं ओढणारे व वाहून नेणारे बैल, शीघ्र गमन करणारे अश्व इत्यादि मनुष्यांच्या सुखाकरितां अवश्य असलेल्या ) पशूंची समृद्धि, सुशीलतादि गुण व सौंदर्य ह्यांनीं युक्त असलेला स्त्रीवर्ग, वेदसंबंधि तेजानें संपन्न असलेला ब्राह्मणवर्ग, शस्त्रास्त्रनिपुण, शौर्यसंपन्न व महारथी क्षत्रियवर्ण; हातीं घेतलेल्या कामांत यशस्वी होणारा, अध्ययनादि गुणांनीं संपन्न असल्यामुळें सभ्य ह्मणजे सभेंत सभाविष्ट होण्यास योग्य, वीर्यसंपन्न व शौर्यसंपन्न असा तरुण वर्ग, हवा तसा पडणारा पर्जन्य, विपुल धान्य देणारी भूमि, सर्व गोष्टींची संपन्नता आणि प्राप्त झालेल्या वित्तादिकांचें संरक्षण इतक्या गोष्टींचा अंतर्भाव राष्ट्र ह्या शब्दांत होत असतो व राष्ट्रभृद्धोम द्विजांनीं यथाविधि त्या त्या कर्मांमध्यें केल्यास ह्या सर्व गोष्टींनीं देशसंपन्न होत असतो.

# प्रायश्चित्तसंग्रहकारिकाः ।

विहितस्याननुष्ठानेऽन्यथाऽनुष्ठान एव च ।
श्रुतिलक्षणकं प्रायश्चित्तं कृत्स्नं विधीयते १
प्रायो विनाशपर्यायः संधानं चित्तमीरितम् ।
तच्च ज्ञेयं द्विधा प्रत्यक्षातीन्द्रियविभेदतः २
बहिर्गतस्यानलस्य तत्र संस्थापनं पुनः ।
स्कन्नस्य हविषः शुद्धदेशस्थस्य पुनर्ग्रहः ३
बुधैश्चित्तं ह्येवमादि प्रत्यक्षं परिकीर्तितम् ।
जपहोमादिकं चित्तं बुधैः स्मृतमतीन्द्रियम् ४
प्रायश्चित्तनिमित्ते चेद्यत्संख्यावचनादिकम् ।
श्रूयमाणं भवेत्तच्च विज्ञेयमविवक्षितम् ५
आज्यं संस्कृत्य वन्हेस्तु परिस्तरणमाचरेत् ।
परिषिच्य ततोऽद्भिस्तं शुक्लपुष्पाक्षतादिभिः ६
अलंकृत्याग्निमाधाय पालाशीं समिधं ततः ।
सस्वाहाकारमन्त्रेण जुहुयाद्विहिताहुतिम् ७
दर्व्या संस्कृतया ज्ञेयः प्रायश्चित्तहुतौ विधिः ।
अथवा श्रौतसूत्रोक्ताः श्रौतसूत्रोक्तरीतितः ८
चित्तहोमाः प्रकर्तव्या नियमेन विचक्षणैः ।
शास्त्रान्तरोक्ताः सर्वे तु स्युर्गाथाविधि नैव हि ९
एते विवेचयिष्यामः समनन्तरमेव तु ।
श्रौते भवेत्स्रुचा होमो नियता समिदाहुतिः १०
अनेकाहुतिके होमे तावत्यः समिधः स्मृताः ।

परिस्तृतौ विकल्पः स्यात्परिषेकस्त्वमन्त्रकः ११
परीत्यानलमन्त्रेण तस्य दक्षिणतः स्थितः ।
नाभिं प्रति स्रुचं धृत्वा जुहुयाद्विहिताहुतिम् १२
अनेकाहुतिके होमे निग्राहं होम ईरितः ।
यत्र स्रुवाहुतिविधिस्तत्र नासादयेत्स्रुचम् १३
गृह्ये स्रुवाहुतिविधावपि दर्व्येव कीर्तिता ।
द्विस्त्रिर्गृहीतादिहोमे स्यात्स्रुवोऽप्युभयत्र तु १४
ग्रहणार्थं स्रुवस्यापि कर्तव्यं सादनं त्विह ।
दर्व्याः स्रुचो वा संमार्गात्पूर्वं संमार्ग ईरितः १५
श्रौतस्रुवस्यैव भवेत्संमार्गो मन्त्रवर्जितः ।
संमार्गदर्भाधानात्प्राक्चित्तहोमो यदाऽऽपतेत् १६
तदा संस्कृत्य चित्तार्थमाज्यं तेन हुतिं चरेत् ।
निर्वापकाले चित्तं चेत्तदाऽऽज्यं त्वेकमेव हि १७
चित्तार्थमथ कर्मार्थं नात्रोत्पत्तिः पृथग्भवेत् ।
श्रौतोक्तारीत्या होमेऽपि गृह्योक्तैवाज्यसंस्कृतिः १८
अग्नेः परिस्तृतेरूर्ध्वं नैव कार्या परिस्तृतिः ।
न कार्यं समिदाधानमिध्माधानादनन्तरम् १९
प्रायश्चित्तस्य कालस्तु निमित्तानन्तरं स्मृतः ।
प्रधानहोमतः प्राग्वा बौधायनमुनिस्मृतेः २०
प्रायश्चित्तविशेषो न यत्र प्रोक्तस्तु तत्र वै ।
समस्ताभिर्व्याहृतिभिरेकाहुतिरुदीरिता २१
भवेद्दर्व्या स्रुचा वेयमाहुतिर्न स्रुवेण तु ।

एतदेव स्मृतं सर्वप्रायश्चित्तं हि याज्ञिकैः २२
यत्र होमस्त्वदृष्टार्थं विहितो न भवेद्यदि ।
सर्वाभिधानकं प्रायश्चित्तं तत्र तदाचरेत् २३
यत्र होमस्त्वदृष्टार्थं विहितोऽपि भवेद्यदि ।
सर्वाभिधानकं चित्तं तत्रापि च समाचरेत् २४
पूर्वमालेखनमतमाश्मरथ्यमतं परम् ।
पात्रानुक्तौ चित्तहोमे श्रौते स्रुग्घोमसाधनम् २५
गार्ह्ये भवेच्चित्तहोमे दर्विका होमसाधनम् ।
संख्यानुक्तौ सकृद्धोमो द्रव्यानुक्तौ घृतं स्मृतम् २६
कर्महोमस्य कर्ता यः स एवात्र प्रकीर्तितः ।
दाने कर्ता पतिः प्रोक्तः पत्नी स्यात्तदसंनिधौ २७
एवं त्यागेऽपि विज्ञेयं कात्यायनमुनिस्मृतेः ।
अनाहिताग्नेश्चित्ते ह्येवस्थाने स्युः पाकधर्मतः २८
सर्वत्र चरवः शास्त्रान्तराज्ज्ञेयं बुधैरिदम् ।
पूर्णाहुतिरशक्तौ स्यात्तत्प्रकारोऽधुनोच्यते २९
चतुर्वारं गृहीत्वाऽऽज्यमष्टवारमथापि वा ।
स्रुचि द्वादशवारं वा दर्विकायामथापि वा ३०
उपोत्तमेनान्तिमेन सह वा ग्रहणेन तु ।
अभिपूर्याज्येन तां तु स्वाहाशब्दसमन्वितम् ३१
चतुर्थ्यन्तां देवतायां नाम प्रोक्त्वा तयाऽऽहुतिः ।
स्वाहान्ते तु बुधैर्देया पूर्णाहुतिरियं स्मृता ३२
पूर्णस्रुवेणात्यशक्तौ पूर्णाहुतिरुदीरिता ।

सर्वत्रानाज्ञातजपो वैष्णव्यृग्जप एव च ३३
समस्तव्याहृतीनां च जपः कार्यो विपश्चिता ।
द्रव्यस्य विहितस्यात्राभावश्चेत्स्यात्स्वरूपतः ३४
स्वीकर्तव्यः प्रतिनिधिः प्रायश्चित्तं न चात्र तु ।
अर्थद्रव्यविरोधेऽर्थो बलीयान्संप्रकीर्तितः ३५
तत्र स्वरूपसत्तायामपि प्रकृतकर्मणः ।
प्रधानकार्याशक्तत्व एष न्यायः प्रकीर्तितः ३६
विरोधे द्रव्यगुणयोर्बलवद्द्रव्यमीरितम् ।
प्रधानकार्यशक्तत्वे गुणसंपादनाय न ३७
उपादानं प्रतिनिधेस्तत्रैष न्याय ईरितः ।
लोपे स्वराक्षरादीनामाभिरित्याहुतिः स्मृता ३८
मंत्रलोपे प्रोक्षणादिलोपे च व्यत्यये तथा ।
त्वं नः स त्वं न इत्याभ्यां जुहुयादाहुतिद्वयम् ३९
यदि प्रधानयागात्प्राग्लुप्तस्य स्मरणं भवेत् ।
तदा चित्तोत्तरमनिष्पन्नार्थाङ्गस्य वै क्रिया ४०
निष्पन्नार्थं यदाऽङ्गं चेच्चित्तमेव न तु क्रिया ।
उदाहरणमेतस्य ज्ञेयमिध्मेन्धनादिकम् ४१
आज्यभागोत्तरं मुख्याहुतितः प्राक्स्मृतिर्यदि ।
तदेध्ममनले दत्त्वा विपर्यासार्थचित्तकम् ४२
ऊर्ध्वं चेच्चित्तमेव स्यादिति सूत्रे निदानके ।
आज्यभागाद्यङ्गलोपे त्वं नः स त्वं न आहुती ४३
अकाले चेत्कृतं कर्म भवेद्यत्तस्य नैव तु ।

क्रमार्थं पुनरावृत्तिरित्युक्तं कठसूत्रके ४४
परिस्तरणदर्भाणां परिधीनां च बर्हिषः ।
इध्मोपवेषशुल्वानां दाहे च च्छेदने तथा ४५
मूत्राद्यैरुपघाते च सर्वथा च विनाशने ।
तज्जातीयं च तद्रूपं तत्प्रमाणं तथैव च ४६
आहृत्य तद्यथापूर्वं यथास्थानं निवेश्य च ।
तेन कर्म प्रकर्तव्यं नैवोपहतसंग्रहः ४७
द्वे त्वमग्ने अयाः प्राजापत्यर्चा च स्रुवाहुती ।
इध्मे न्यूना समिच्चेत्स्याद्यत्पाकत्राहुतिं तदा ४८
हुत्वा संपादयेन्न्यूनमुक्तसंस्कारपूर्वकम् ।
अधिके त्वधिकं त्याज्यं भवेद्वापि साऽऽहुतिः ४९
बर्हिरिध्मादिपतने स्थालीपाकादिकर्मसु ।
संस्थाप्य तूष्णीं स्वस्थाने जुहुयात्सर्वप्रायश्चित्तकम् ५०
आधेयाग्न्युपघाते तु पुनस्त्वामन्त्रतः समित् ।
एतेनैवाहुतिस्त्वेका होतव्योपहतेऽनले ५१
यदा कदाचिदग्निश्चेत्स्वयं प्रज्वलितस्तदा ।
उद्दीप्यस्वेति मन्त्राभ्यां द्वाभ्यामग्नौ समिद्द्वयम् ५२
प्रणीतानां प्रोक्षणीनां स्कन्दने पात्रपूरणम् ।
आपो हिष्ठादिभिः कुर्यात्ततमित्याहुतिस्ततः ५३
शोषे स्रावेऽप्येवमेव प्रायश्चित्तं प्रकीर्तितम् ।
समुत्सर्पेदायतनाद्बहिरग्निः स चेद्यदि ५४
पुनः प्रक्षेपणे योग्यस्तं धृष्ट्याऽऽदाय वै पुनः ।

स्वस्थाने व्याहृतीभिस्तं प्रक्षिपेत्तदनन्तरम् ५५
सर्वप्रायश्चित्तमनाज्ञातत्रयजपादि च ।
अध्वर्य्वग्नीध्रहोतॄणां प्रयाजानां तथैव च ५६
अभाग्नाभ्मा तम इति चित्तं नैतद्भवेदिह ।
अङ्गारो यद्यायतनात्पतितश्चेद्बहिः स च ५७
श्रौताग्नेर्लौकिकाग्नेर्वा सांनिध्याज्ज्ञायते न हि ।
कस्यानलस्यायमिति तदाऽङ्गारमुपेक्ष्य तम् ५८
सर्वाख्यचित्तं जुहुयादित्युक्तं द्विशतीकृता ।
श्रौताग्नावथ गृह्याग्नौ होतव्यं सर्वचित्तकम् ५९
निर्वापादूर्ध्वमाज्यं चेत्स्कन्देदुत्पवनात्पुरा ।
वरं दत्त्वा ब्राह्मणाय देवाञ्जनमगान्निति ६०
एतैर्मन्त्रैः पञ्चभिर्यत्स्कन्नं तदनुमन्त्रयेत् ।
उत्पूयमानमाज्यं चेत्स्कन्देद्दत्त्वा तदा वरम् ६१
अजां गां वा प्रदत्त्वा च देवानित्यादि पूर्ववत् ।
स्कन्देदुत्पूतमाज्यं चेत्तदा यत्स्वगृहे भवेत् ६२
मुख्यं द्रव्यं प्रदत्त्वा तद्देवानित्यादि पूर्ववत् ।
गृहीताज्यस्कन्दने तु वरदानानुमन्त्रणे ६३
विधाय भूपतय इत्येतेन मनुना पुरः ।
स्कन्नाज्यस्य प्रकुर्वीत प्रादेशं तदनन्तरम् ६४
भुवनेति तु मन्त्रेण तस्य दक्षिणतो भवेत् ।
भूतानां पतय इति तस्य पश्चिमतो भवेत् ६५
भूतायेत्युत्तरे तस्योर्ध्वं तु व्याहृतिभिः स्मृतः ।

स्वाहान्ता मन्त्रो ज्ञेया बुधैर्व्याहृतिभिर्विना ६६
स्कन्नोपरि ततो वारि सिञ्चेत्सं त्वेति मन्त्रतः ।
प्रक्षिपेच्छुचिदेशस्थं चेद्यज्ञस्येति मन्त्रतः ६७
अभिमन्त्र्याशुचिस्थं चेद्गृह्णीयात्स्थानतः पुनः ।
हविःस्कन्देऽयमेव प्रायश्चित्तविधिः स्मृतः ६८
स्कन्दनं स्रुवपर्याप्तस्याधिकस्यापि वा यदि ।
एतत्स्कन्दनचिह्नं तु तदा ज्ञेयं विचक्षणैः ६९
स्रुवपर्याप्तता न्यूनस्कन्दे सर्वाभिधं भवेत् ।
द्रवद्रव्येषु सर्वेष्वप्येवमेव प्रकीर्तितम् ७०
सर्वेषु कठिनद्रव्येष्वङ्गुष्ठपरुषोऽधिकम् ।
स्कन्नं यदि भवेत्पूर्वं चिह्नमूने तु सर्वकम् ७१
नैव चिह्नं भवेत्स्कन्दे बर्हिर्भस्मानलादिषु ।
अग्निक्षिप्ताहुतेः स्कन्दो बहिष्परिधि चेद्भवेत् ७२
संकल्प्याञ्जलिना तां तु जुहुयान्मा यजेत्यतः ।
स्वस्यैव कर्तृताऽत्र स्यादाग्नीध्र स्तदसंभवात् ७३
एतां संकल्प्य जुहुधीत्येतल्लोपोऽत्र एव तु ।
पूर्णपात्रप्रदानस्यापि लोपोऽत्र प्रकीर्तितः ७४
निर्वापादावविहितां देवतां योजयेद्यदि ।
तस्मिन्द्रव्ये तु संयोज्य विहितां देवतां तदा ७५
यद्वो देवा अतीत्येतन्मनुना जुहुयात्ततः ।
देवतां वेदविहितां संस्मरन्निष्टवांस्तदा ७६
प्रायश्चित्तमिदं कृत्वा यागमावर्तयेत्कृतम् ।

एतदेव भवेच्चित्तमौपासनहुताग्नपि ७७
विपर्यासो यदि भवेत्स्वाहाकारप्रदानयोः ।
तदा मनोज्योतिरिति जुहुयाद्वै मनस्वतीम् ७८
अवदानद्रव्ययागदेवमन्त्रविपर्यये ।
ज्ञाते तन्त्रसमाप्तेः प्राक्त्वं नः स त्वं न आहुती ७९
जुहुयाद्वै ततः सर्वप्रायश्चित्तादिकं स्मृतम् ।
यन्मुख्यं स्वगृहे द्रव्यं दद्याद्विप्राय वै ततः ८०
तन्त्रावृत्तिः पुनः कार्याऽत ऊर्ध्वं न भवेद्धुतिः ।
प्रधानद्रव्यस्यैकस्यानेकस्याप्यथवा पुनः ८१
बहुप्रधाने होमेऽनुत्पादे स्याद्यदि यागतः ।
पूर्वं स्मृतिस्तदा त्वं नः सत्वं नो अग्न आहुती ८२
हुत्वा द्रव्यं तदुत्पाद्य यागं कुर्याद्यथास्थितम् ।
स्मृते यागादुत्तरं तु कर्मारब्धं समापयेत् ८३
चित्तं ततोऽनन्तरोक्तमाहुत्यात्मकमाचरेत् ।
साङ्गस्यान्तरितस्यैव प्रधानस्य ततः कृतिः ८४
एकदेशापहारेऽग्नेर्मनस्वत्याहुतिर्भवेत् ।
औपासनहुतौ प्रातर्होमे चेदग्नये हुतम् ८५
सायं होमे तु सूर्याय हुतं चेत्स्यात्पुनः क्रिया ।
तदा होमस्य कर्तव्या पक्षश्चेत्स्वीकृतो भवेत् ८६
तदैव चित्तमेतत्स्यान्नान्यपक्षे भवेदिदम् ।
एकावदानाग्रहणे ज्ञाते यागात्परो यदि ८७
त्वं नः सत्वं न इत्याभ्यां जुहुयादाहुतिद्वयम् ।

अवदानं गृहीत्वा तद्यागं कुर्याद्यथास्थितम् ८८
यागोत्तरं यदि ज्ञातमाहुतिद्वयमेव तु ।
होतव्यं न तदा यागः पुनः कार्यो मनीषिभिः ८९
अथ वक्ष्ये हविर्दोषान्यैर्हविर्दुष्टतामियात् ।
अशुचिर्मक्षिका नीला याऽश्वदेहे च वर्तते ९०
कुशातिका गवामङ्गे तल्पादिषु च मत्कुणः ।
यूका चैलशिरःस्था स्यात्कीटश्च मलपिण्डकृत् ९१
मार्जारो नकुलश्चाखुर्विष्ठा वायसकुक्कुटौ ।
श्वा वानरो वस्त्रदशा छिन्नकेशनखानि च ९२
अशुचि स्याच्छरीरस्थमपि कुत्सितकं नखम् ।
द्रव्याणि पूतिगन्धीनि घुणाख्यः कीट एव च ९३
द्रप्सस्वेदाश्रुवसृक्स्नेहकासक्षवथवस्तथा ।
नासिकामुखजो बिन्दुर्द्रप्सो ज्ञेयो हि सूरिभिः ९४
शरीरजं जलं स्वेदो वार्यश्रूक्तं हि नेत्रजम् ।
असृग्ज्ञेयं हि रुधिरं स्नेहो घ्राणमलः स्मृतः ९५
कासः श्लेष्मविकारः स्याद्वदनाद्यो विनिर्गतः ।
क्षवथुः क्षुतमित्युक्तं गोपालाख्येन सूरिणा ९६
मूत्रमज्जे वसाशुक्रे कर्णविट्पूयसस्तथा ।
एतैरशुचिभिः स्पृष्टमन्यैरेतादृशैरपि ९७
उदक्यासूतिकाभ्यां वा चण्डालपतितादिभिः ।
शिशुर्यज्वा गर्भिणी च ब्राह्मणो नृप इत्यमी ९८
भ्रूणा एतद्धिहन्तारः स्मृता भ्रूणहनो बुधैः ।

एतैरन्यैश्च पापिष्ठैः स्पृष्टं दृष्टं च यद्भवेत् ९९
यत्र प्रसूयते नारी म्रियते दह्यतेऽपि वा ।
चण्डालाध्युषिते यत्र यत्र विष्ठादिसंगतिः १००
तस्मिन्नमेध्ये देशे यन्निहितं तच्च दुष्यति ।
दुष्टे प्रधानयागात्प्राग्घविर्यदि भवेत्तदा १
शुद्धवारिणि हस्तेन तद्धविः प्रक्षिपेत्ततः ।
द्वे पिन्दे जुहुयात्सर्व प्रायश्चित्तादिकं तथा २
पुनर्हविस्तावदेवोत्पाद्य यागः क्रमाद्भवेत् ।
अत्यशक्तौ पुनर्यागमाज्येनैव समाचरेत् ३
दुष्टे यागोत्तरं शेषमाज्येनैव समापयेत् ।
दुष्टेन हविषा यागः कृतश्चेज्जुहुयात्तदा ४
प्रणवेन व्याहृतिभिर्जुहुयाद्द्वे स्रुवाहुती ।
पुनर्यागो नात्र भवेत्कात्यायनमुनिस्मृतेः ५
अवदानस्य ग्रहणे दोषज्ञानं यदा भवेत् ।
प्रक्षिपेत्तद्धविः सर्वं दुष्टं शुद्धजले ततः ६
पुनर्हविः समुत्पाद्य त्वं नः स त्वं न आहुती ।
हुत्वा यागं तेन कुर्यादनाज्ञातजपादि च ७
मध्यात्पूर्वार्धतोऽवत्तं गृहीतं दोषगामि चेत् ।
तत्प्रक्षिप्य जले शुद्धे मध्यात्पूर्वार्धतः पुनः ८
अवदाय यजेत्सर्वं प्रायश्चित्तादिकं ततः ।
प्रधानयागद्रव्यस्य प्रधानात्प्राग्विनाशनम् ९
ज्ञाते भवेत्तदा तस्मिन्नेव तन्त्रे तदैव तु ।

नष्टं हविः समुत्पाद्य तेन यागं समाचरत् ११०
यागे बहुहविश्चेत्स्यात्सर्वेषां हविषां यदि ।
नाशो दोषोऽपहारो वा प्रतिसंख्याय देवताः ११
इष्ट्वाऽऽज्येनैव सर्वास्ता यागमावर्तयेत्पुनः ।
अवर्जनीयैः क्षुद्रैश्चेन्मक्षिकाकीटकादिभिः १२
पिपीलिकादिभिश्चैव जीवैः स्याद्धविषो यदि ।
योगः पञ्चाधिकैर्ज्ञेया तदा तस्य सदोषता १३
न्यूनैश्चेत्पतिताञ्जीवानुद्धृत्याद्भिः समुक्ष्य च ।
लौकिकाभ्यां पवित्राभ्यां पवनात्तस्य योग्यता १४
हविष्यपक्वे चित्तं तु कर्मारब्धं समाप्य तत् ।
चतुःशरावमात्रं तु पक्त्वा सुशृतमोदनम् १५
भोजयेत्तेन चतुरः सुशीलान्ब्राह्मणाञ्छुचीन् ।
तेषां भार्गव एकः स्यात्तेभ्यो देया वराः समाः १६
कृत्स्नं दग्धं यदा तत्स्यात्पुनरुत्पादयेद्धविः ।
स एव यागः कर्तव्यो न पुनर्याग इष्यते १७
स्वल्पं हविरदग्धं चेत्तदा सर्वाभिधानकम् ।
प्रायश्चित्तं प्रकुर्वीत ततो यागं च शेषतः १८
समापयेद्घृतेनान्यन्न पुनर्याग इष्यते ।
अधुना हविरुत्सेकप्रायश्चित्तं प्रवक्ष्यते १९
प्राच्यां दिशि समुत्सेकेऽग्नये स्वाहाहुतिर्भवेत् ।
दक्षिणस्यां यमायेति वरुणायेति पश्चिमे १२०
सोमायेत्युत्तरस्यां स्यात्सर्वाभ्यः सर्वदिक्षु चेत् ।

यद्यवान्तरादेशु स्याद्धोमो व्याहृतिभिस्तदा २१
सर्वेष्वेतेषु होमत्वात्स्वाहाकारान्तता भवेत् ।
आप्यायस्वेति संमिति चाज्येनाप्याययेद्धविः २२
द्वे मिन्दे जुहुयात्सर्वप्रायश्चित्तादिकं तथा ।
यागान्वाधानयोर्मध्ये यदि सूर्यग्रहो भवेत् २३
उद्वयं तमसस्पर्युदुत्यं चित्रमिति त्रिभिः ।
जुहुयादाहुतीस्तिस्रः प्रधानात्पूर्वमेव तु २४
कैश्चिन्मन्त्रत्रयेणात्रोपस्थानमपि कीर्तितम् ।
मध्ये चन्द्रग्रहश्चेत्प्राक्प्रधानादाहुतिद्वयम् २५
नवो नवो यमादित्या इत्याभ्यां जुहुयात्तदा ।
कैश्चिन्मन्त्रद्वयेनात्रोपस्थानमपि कीर्तितम् २६
अन्वाधानाक्रियायां तु न प्रायश्चित्तमिष्यते ।
वानस्पत्यस्य पात्रस्य भेदनेऽन्यत्समाहरेत् २७
गृह्याग्नौ ज्वलितं भिन्नं प्राग्दण्डं प्रहरेत्ततः ।
लौकिकानलसाध्यायां क्रियायां लौकिकेऽनले २८
वानस्पत्यस्य भिन्नस्य प्रक्षेपः पूर्ववद्भवेत् ।
मृन्मयं चेद्विभिद्येत भूमिर्भूमिमगादिति २९
ब्रह्माभिमन्त्रितं भिन्नमभावे स्वाभिमन्त्रितम् ।
क्षिपेत्पात्रं जले शुद्धे तत्कार्येऽन्यन्नियोजयेत् १३०
क्रियाकाले विधिमिमं प्राहुरन्ये तु सर्वदा ।
यत्किंचित्पात्रभेदे तु प्रणवेन घृताहुतिः ३१
समस्तव्याहृतीभिर्वा होतव्या यज्ञपार्श्वतः ।

आज्याधिश्रयणात्पूर्वं निरूढाग्नेर्विनाशनम् ३२
भवेद्यदि तदास्थानात्पुनः कुर्यान्निरूहणम् ।
ततश्चतुर्गृहीतेन मनस्वत्याहुतिर्भवेत् ३३
आज्यस्योद्वासनादूर्ध्वं निरूढाग्नेर्विनाशने ।
मनस्वत्येव होतव्या न तु तत्र निरूहणम् ३४
प्रधानाहुतिसंसृष्टा स्याच्चेत्स्विष्टकृदाहुतिः ।
तदा सर्वाभिधं चित्तमनाज्ञातजपादि च ३५
अन्वाधानोत्तरं स्वप्ने भवेत्स्वाम्यृत्विजां यदि ।
रेतःपातस्तदेमं मे तत्त्वा यामीति चाहुती ३६
हुत्वा व्याहृतिभिश्चैकां सूर्यं संपूजयेत्ततः ।
पुनर्मामनुवाकस्य जपस्त्रिरथ वा सकृत् ३७
विसर्गो बुद्धिपूर्वं चेत्तदा व्रातपतोऽधिकः ।
स्थालीपाकः प्रकर्तव्यः पूर्णाहुतिरथापि वा ३८
नैमित्तिको विरामश्चेत्किंचित्प्रारब्धकर्मणि ।
तदा सर्वाभिधं चित्तं हुत्वा शेषं समापयेत् ३९
चतुष्पाद्द्विपादानां कर्ममध्ये भवेद्यदि ।
ऋत्विजामृत्विगग्न्योर्वा पतिहोत्रोरथापि वा ॥१४०॥
चेद्वा भवेत्स्वामिपत्न्योरन्तरा गमनं तदा ।
मिन्दादिसंज्ञं दुर्गादिसंज्ञं वा जुहुयाद्गणम् ४१
दर्व्यां द्वादशवारं तु गृहीत्वा स्रुचि वा घृतम् ।
तेन पञ्चाहुतीः कार्या दुर्गादिगणहोमके ४२
एतत्कर्तुमशक्तश्चेज्जुहुयात्सर्वचित्तकम् ।

मिन्दाहुतिद्वयं चैव व्याहृत्यः प्रणवाधिका: ४२
वारुण्यस्तन्तुमत्यश्चानुख्या चैव मनस्वती ।
महाव्याहृतयः सप्त ते प्रजापत एव च ४४
एष मन्त्रसमूहः स्यान्मिन्दादिगणसंज्ञकः ।
जातवेदस आद्यः स्यान्मनोज्योतिर्द्वितीयकः ४५
महाव्याहृतयस्तिस्त्र एष दुर्गाग्निको गणः ।
अन्वाहिताग्निरथ चेत्प्रयास्यञ्जुहुयात्तदा ४६
तुभ्यमित्याहुतिं हुत्वाऽरण्योः समिधि वा ततः ।
समारोप्यानलं यत्र वसेत्तत्र तु मन्थनम् ४७
उपावरोहमन्त्रेण कृत्वा कर्म समापयेत् ।
प्रमादादिष्टयकरणमन्वाधानोत्तरं यदि ४८
व्यस्ताभिश्च समस्ताभिः स्यादाहुतिचतुष्टयम् ।
औपासनाहुतिद्रव्यं कठिनं वाऽथ चेद्द्रुतम् ४९
स्कन्देदस्कान्द्यौरस्कानित्येताभ्यामभिमन्त्रय ततः ।
उन्नम्भयेति तस्याथोपरिष्टात्प्रक्षिपेज्जलम् १५०
अनाज्ञातजपं कृत्वा सर्वचित्तं विधाय च ।
स्कन्नं द्रव्यं समादद्याद्गत्वोत्तरदिशं ततः ५१
उद्घाटितबिलां कुर्याद्वल्मीकस्य वपां शुचिम् ।
उपस्पृश्य जलं शुद्धं दक्षिणेन करेण तु ५२
स्कन्नं सर्वं समादाय प्रजापत इति हृचा ।
तस्मिन्बिले क्षिपेद्भूरित्युपतिष्ठेदृचा ततः ५३
जुहोतिचोदनाभावान्नर्चि स्वाहाकृतिर्भवेत् ।

पुनर्होमं प्रकुर्वीत संकल्पादि च पूर्ववत् ५४
औपासनाहुतिद्रव्ये कठिने वा द्रुतेऽपि वा ।
अमेध्यसेवी पिण्डस्य कर्ता कीटो यदा पतेत् ५५
प्रायश्चित्तं तदा तत्र पूर्ववत्तु समाचरेत् ।
तत्रादानं त्वन्तिमेन मध्यमेनाथवा भवेत् ५६
पलाशस्य च पर्णेन मही द्यौः पृथिवीत्यृचा ।
अन्तःपरिधिदेशे तत्त्यजेत्पात्रस्य संस्कृतिम् ५७
विदधीत ततो योग्यामन्यत्सर्वं तु पूर्ववत् ।
पयसौपासनहुतौ स्थाल्याश्चेत्स्रवणं भवेत् ५८
गर्भं स्रवन्तमगदमित्येतेनाभिमन्त्रयेत् ।
सूर्यास्ततो होमकालः प्रोक्तस्तु नव नाडिकाः ५९
तदतिक्रमणे हुत्वाऽऽहुतिं दोषेति मन्त्रतः ।
एतस्या आहुतेर्देवो वरुणः परिकीर्तितः १६०
प्राक्तनं समिदाधानात्कर्म कुर्याद्यथास्थितम् ।
रुन्ध्याद्यावद्बलं श्वासं वरं दद्यादनन्तरम् ६१
समस्तव्याहृतीरुक्त्वा नित्यं होमं समाचरेत् ।
व्याहृतीभिरुपस्थाय होमशेषं समाप्य च ६२
वरुणाय चरुः कार्यः पूर्णाहुतिरथापि वा ।
प्रातर्होमस्य कालस्तु घट्यो द्वादश वा दश ६३
संगवः सूरिभिः प्रोक्तः प्रहरात्मक एव वा ।
एतस्यातिक्रमे प्रातरित्येतेनाहुतिर्भवेत् ६४
एतस्या आहुतेर्देवो मित्रः सूर्योऽथवा स्मृतः ।

पूर्वं च समिदाधानात् श्वासरोधो यथाबलम् ६५
वरदानं प्रकुर्वीत व्याहृत्युच्चारणं तथा ।
नित्यहोममुपस्थानं व्याहृतीभिस्तथैव च ६६
होमशेषं समाप्याथ मन्त्रसौयचरू स्मृतौ ।
वक्ष्ये होमस्य विच्छेदे प्रायश्चित्तमथाधुना ६७
अयाश्चेत्याहुतिः कार्या विच्छेदेऽर्वाक्त्रिरात्रतः ।
मनस्वत्या द्वितीया स्यादर्वाक्चेत्सप्तरात्रतः ६८
तन्तुमत्या तृतीया स्यादर्वाक्चेद्द्वादशाहतः ।
तत्रापि होमविच्छेदे पुनराहितिरेव तु ६९
जुहुयात्प्रतिसंख्याय वैतान्होमान्महापदि ।
ऊर्ध्वं चेदेष आपत्तावपि कल्पो न युज्यते १७०
खण्डस्याक्षेपकत्वेऽपि वस्तुतः प्रबलत्वतः ।
श्रौतमेव भवेच्चित्तं नाया इत्यादिकं भवेत् ७१
तद्धि शास्त्रान्तरोक्तत्वाद्दुर्बलं नात्र युज्यते ।
श्रौतं चित्तं तदधुना सुस्पष्टं संप्रवक्ष्यते ७२
द्वयोस्त्रयाणामेकस्य वा होमस्यातिपातनम् ।
सप्तहोतृमनस्वत्यौ जुहुयात्तदनन्तरम् ७३
समाचरेदतिक्रान्तं होमं नेत्यपरे जगुः ।
एवमेव प्रातरौपासनहोमं समाचरेत् ७४
चतुर्थादिषु षष्ठान्तेष्वेकस्य त्वतिपातनम् ।
सप्तान्तेष्विति केचित्तु बुधाः प्राहुः पुरातनाः ७५
द्वयोस्त्रयाणां सर्वेषां वा स्यात्तन्तुमते चरुः ।

अष्टमादिष्वपि चरुरेव तान्तुमतो भवेत् ७६
अत ऊर्ध्वमतिक्रामे भवेत्तु पुनराहितिः ।
उतैकाहमिति श्रुत्यैकाहं वा द्व्यहमेव च ७७
होमातिपत्तौ चित्तं न भवेत्केऽिचादितीरितम् ।
यद्यस्तमितावभ्रान्त्या जुहुयादस्वकालके ७८
साङ्गो होमः पुनः कार्यस्तस्मिन्नेवानले ततः ।
जातत्वाग्न पुनः कार्यं प्रादुष्करणमत्र तु ७९
होमानन्तरमग्नेस्तु भवतं न उपस्थितिः ।
एवमेवोदितभ्रान्तौ प्रायश्चित्तं प्रकीर्तितम् १८०
ऊर्ध्वं प्रादुष्कृतेर्होमात्पूर्वं स्वामी समाचरेत् ।
भक्षणं चेद्धुतेः पूर्वं तस्मिन्नेवानले ततः ८१
कुर्याद्व्रातपतस्थालीपाकं स्याद्वाऽऽहुतिद्वयम् ।
यत्ते वयं यथा हेति होममन्त्रौ प्रकीर्तितौ ८२
समिधौ वा समादध्यादथवा प्रजपेदिमौ ।
पत्न्यामप्येवमेवेदं प्रायश्चित्तं प्रकीर्तितम् ८३
अतिसंकटतः प्रातर्होमो यदि न जायते ।
तदैतस्मिन्दिने स्वामी भोजनं न समाचरेत् ८४
सायंहोमे तु तद्रात्रौ भोजनं न समाचरेत् ।
एतावता होमसिद्धिः प्रायश्चित्तं न हीष्यते ८५
पूर्वाहुतेश्चेदुपरि स्कन्दः स्यादुत्तराहुतेः ।
तदा यत्रेत्यृचा वह्नौ वानस्पत्याभिधानया ८६
आदध्यात्समिधं पश्चात्स्कन्नशेषेण तूत्तराम् ।

तूष्णीं हुत्वाऽऽहुतिं सर्वं होमशेषं समापयेत् ८७
पुनर्होमं ततः कुर्यादग्निहोमे ऽप्ययं भवेत् ।
उत्तराहुतिपर्याप्तद्रव्यसत्त्वे भवेन्न हि ८८
औपासनाहुतिद्रव्ये वृष्टिबिन्दुः पतेद्यदि ।
उपसाद्य हविः कूर्चे प्राकृतां समिदाहितिम् ८९
कृत्वा जपेद्व्याहृतीस्तु तेनैव हविषा ततः ।
मित्रो जनान्कल्पयतीत्यनया प्रथमाहुतिः १९०
उत्तराहुतिहोमादिहोमशेषं ततश्चरेत् ।
ततः संकल्पप्रभृति पुनर्होमं समाचरेत् ।
प्रादुष्करणकालस्यातिक्रमे सर्वाचित्तकम् ।
औपासनहुतौ स्याच्चेद्द्वितीयाहुतिविस्मृतिः ९२
समाप्तेः कर्मणः प्राक्सा होतव्याऽन्तरिताऽऽहुतिः ।
उत्तरं चेत्स्मृतिः सर्वाचित्तमेव न चाहुतिः ९३
आद्याहुतेर्विस्मृतौ तु कृत्स्नं होमं पुनश्चरेत् ।
स्वकाले यद्यनारम्भः स्यादाद्यौपासनाहुतेः ९४
तदा परेद्युः सायं स्यात्सप्तहोत्राहुतीस्तथा ।
मनस्वत्या द्वितीया स्यात्ततो होमं समारभेत् ९५
पिण्डयज्ञात्यये सप्तहोतृहोमः प्रकीर्तितः ।
औपासनाग्नेर्गमन उपलेपादि पूर्ववत् ९६
आहृत्य श्रोत्रियागारात्प्रतिष्ठाप्य हविर्भुजम् ।
विवाहे यदि निर्मन्थ्यो मथितव्यस्तदाऽनलः ९७
आऽन्यस्माद्धोमकालात्स्त्री नाश्नीयादथवा गृही ।

उपोषणाशक्ततायां विध्यन्तरमथोच्यते ९८
उपलेपादिकं वह्निस्थापनान्तं तु पूर्ववत् ।
पात्राणि च समासाद्य कुर्यात्प्राग्वत्पवित्रके ९९
संस्कृत्य प्रोक्षणीः पश्चात्पात्राणां प्रोक्षणं ततः ।
दर्वीं संमृज्य संस्कृत्याज्यं प्रागुक्तविधानतः २००
परिस्तीर्यानलं पश्चात्परिषेकं समाचरेत् ।
अलंकारं प्रकुर्वीताभ्याधानं समिधस्तथा १
अयाश्चेत्याहुतिं हुत्वा विसृज्य स्तरणानि तु ।
कृत्वोत्तरं ततः सेकं होमं नित्यं समाचरेत् २
अपोढे वर्तमाने तु मुख्योऽग्निर्यदि गच्छति ।
अपोढाग्नेरेकदेशं मुख्याग्न्यायतने ततः ३
निधाय सर्वचित्तं तु जुहुयाद्ध्रुव आहुतिम् ।
शान्तिके पौष्टिके चैव गृह्यानुक्ते तु कर्मणि ४
अग्नेरनुगतिश्चेत्स्यात्तद्भस्म प्रक्षिपेद्बहिः ।
अनन्तरं स्थण्डिलस्योपलेपोल्लेखनादिकम् ५
कृत्वा संस्थाप्य तत्राग्निमाज्यसंस्कृतिमाचरेत् ।
जुहुयात्तेन सर्वाख्यचित्तं संस्थापितेऽनले ६
अयाश्चेत्यपि होतव्यमिति केचिद्बुधा जगुः ।
औपासनाग्न्यनुगतावेवायाा इति चित्तकम् ७
इत्येतस्मिन्मते नैतद्भवेदुपनयादिषु ।
किं त्वेतेष्वपि विज्ञेयं सर्वाख्यं चित्तमेव हि ८
गायत्र्या उपदेशात्प्राङ्मुख्यहोमादनन्तरम् ।

उपनायेऽग्निनाशश्चेदग्निं संस्थाप्य पूर्ववत् ९
हुत्वा मुख्याहुती तत्र जुहुयात्सर्वचित्तकम् ।
उपदेशोत्तरं नाशे स्यात्सर्वाभिधमात्रकम् २१०
पाणिग्रहणतः प्राक्चेद्विवाहेऽनलनाशनम् ।
तदा मुख्याहुतीरेव नायाश्चेत्यादि चित्तकम् ११
अत ऊर्ध्वं त्वेतदेव सर्वाख्यमुभयत्र तु ।
संसर्गे कुणपोदक्यासूतिकापतितादिभिः १२
अन्याग्निभिश्च संसर्गे स्यात्तत्र पुनराहितिः ।
क्षेपकत्वे तु खण्डस्य वैविचश्चरुरेव तु १३
भवेदन्याग्निसंसर्गे नैवात्र पुनराहितिः ।
श्रौतातिदेशात्सूत्याद्यैः संसर्ग इयमेव तु १४
गृह्याग्निद्वयसंसर्गे गृह्याग्निस्वामिनावुभौ ।
गृहीत्वा समिधौ तास्मिन्संसृष्टाग्निं सहैव तु १५
मन्त्रेण तु समारोप्य ततस्तं लौकिकानलम् ।
मन्त्रेणाच्छा गिर इति विभज्योभौ ततोऽनले १६
स्वे स्वे स्वां स्वां च समिधमुपावेति तु मन्त्रतः ।
निक्षिपेत्तां ततः पाको वैविचस्तूभयोर्भवेत् १७
पृथग्गतोऽन्येकदेशः संसृष्टो लौकिकाग्निना ।
श्रौताग्निना वाऽथ यदि वैविचो न तदा भवेत् १८
किंतूपेक्ष्यैकदेशं तं जुहुयात्सर्वचित्तकम् ।
शातह्रयीकृद्धरदराजाभ्यामित्थमीरितम् १९
वनदाहाग्निसंसर्गे भवेद्व्रातभृतश्चरुः ।
चरुस्तदा स्याच्छुचये चेत्संसर्गः शवाग्निना २२०
सूतिकानलसंसर्गे भवेत्सांकुसुकश्चरुः ।

वैद्युतानलसंसर्गे भवेदाप्सुमतश्चरुः २१
चरूणां वैविचादीनां पञ्चानां संनिपातने ।
निमित्तक्रमसत्त्वेऽपि ज्ञेयो वाचनिकः क्रमः २२
विविचिश्च शुचिः पश्चाद्व्रतभृच्चाप्सुमांस्ततः ।
ततः संकुसुक इति क्रमस्तत्रैवमेव तु २३
संनिपाते क्षामवतोऽप्यन्त एव भवेदयम् ।
चतुरादिषु यस्य स्यान्निमित्तस्य त्वसंभवः २४
तावन्मात्रं परित्यज्यान्यः क्रमः पूर्ववद्भवेत् ।
स्थालीपाकातिपत्तौ तु चरुः पाथिकृतो भवेत् २५
द्वयोरतिक्रमे वैश्वानरपाथिकृतौ चरू ।
तृतीयाद्यतिपत्तौ तु स्यात्तत्र पुनराहितिः २६
क्षेपकत्वे तु खण्डस्य स्थालीपाकातिपातने ।
श्रौत एव प्रकारः स्यात्स इदानीं प्रवक्ष्यते २७
आरब्धौ पार्वणस्थालीपाकौ चेदतिपन्नकौ ।
स्यातां तदा पाथिकृतं स्थालीपाकं समाचरेत् २८
भवेतां यद्यनारब्धावेतौ चेदतिपन्नकौ ।
तदा वैश्वानरस्थालीपाकं कुर्याद्विचक्षणः २९
प्रथमस्य प्रयोगस्य संकल्पोत्तरमक्रिया ।
चेद्विभ्रेपनिमित्तं तु प्रकर्तव्यं चरुत्रयम् ३०
स्थालीपाकप्रकरणे तत्प्रकारः प्रदर्श्यते ।
कर्मणो गौणकालश्चेत्ततस्तस्याप्यनुष्ठितिः ३१
प्रकारान्तरमप्यत्राधुनाऽतिपतने ब्रुवे ।
आरब्धयोर्द्वयोः पातः स्याच्चेत्पाथिकृतश्चरुः ३२
ऊर्ध्वयोरपि पातश्चेत्तदा वैश्वानरश्चरुः ।
स्वकाले यद्यनारम्भश्चेत्स्थालीपाकयोर्द्वयोः ३३
विभ्रेषार्थं तदा कार्यं स्थालीपाकत्रयं बुधैः ।
पर्वणि व्रतलोपे तु कुर्याद्व्रातपतं चरुम् ३४
पर्वण्यार्त्याऽश्रुपाते तु कुर्याद्व्रातभृतं चरुम् ।

पवित्रस्य विनाशे तु स्यात्पवित्रवते चरुः ३५
हिरण्यस्य विनाशे तु स्याद्धिरण्यवते चरुः ।
स्वकीयगृहदाहे तु कुर्यात्क्षामवते चरुम् ३६
होममौपासनं दर्शस्थालीपाकादिकं तथा ।
जुहुयात्प्रातरस्नातश्चेत्तदा वारुणश्चरुः ३७
ऋत्विक्स्याद्यदि सुस्नातोऽस्नातश्चाथ स्वयं भवेत् ।
तदाऽपि वारुणः कार्यो नात्यन्तातुर एष तु ३८
विज्ञेयं प्रातरेवेदं सायं स्यात्सर्वचित्तकम् ।
अदने सूतकान्नस्य भवेत्तन्तुमते चरुः ३९
भार्या युग्मप्रसूर्गौर्वा स्यात्तदा मारुतश्चरुः ।
यमौ जातौ पुमांसौ चेत्तयोरेकोऽपि वा पुमान् २४०
वैश्वानरो मारुतश्चेत्येवं केचिद्बुधा जगुः ।
एवंरूपाणीति सूत्राद्गृह्योक्तोऽप्याद्भुतो विधिः ४१
समुच्चीयत एवात्र भवेदौपासने स च ।
कात्यायनादिभिर्ह्येतस्याप्युक्ताऽद्भुतताऽस्ति वै ४२
य आहिताग्नेरित्येतच्छास्त्राङ्गीकार एव तु ।
स्थालीपाको भवेदेषोऽनङ्गीकारे स्वयं न हि ४३
गृह्योक्तविधिमेवात्र कल्पेऽस्मिस्तु समाचरेत् ।
स्नातकस्य यदा गौः स्याद्युग्मसूर्लौकिकानले ४४
प्रकुर्वीत तदा स्थालीपाकं गार्ह्यविधिं च सः ।
गृह्योक्तविधिमात्रं वा स्थालीपाको भवेन्न तु ४५
वर्णिनो विधुरस्यापि विधिरेवं प्रकीर्तितः ।
कात्यायनोक्तमेवात्र विधिं केचित्समूचिरे ४६
सर्वेऽपीमं विधिं कुर्युरिति प्राहुर्बुधाः परे ।
पुमानन्यतरः सोऽपि मृतस्तत्रापि मारुतः ४७
आहिताग्नेर्भवेदिष्टिरिष्टी चेति यथाप्रथम् ।
कात्यायनोक्तस्य विधेर्विकल्पः स्यादनुष्ठितौ ४८
मृतशब्दश्रुतौ स्वस्य स्यात्सौरभिमतश्चरुः ।

अनिष्ट्वाऽऽग्रयणेनान्नं भक्षयेद्यदि नूतनम् ४९
वैश्वानराख्यदेवत्यं चरुं कुर्वीत तत्र तु ।
अविप्रतिग्रहेऽप्येष हिरण्यं दक्षिणाऽत्र तु २५०
विद्विषाणस्य चेदन्नं भुञ्जीयात्स्याच्तदाऽप्ययम् ।
अग्निर्गुणी भवेदेषु विविच्याद्या गुणाः स्मृताः ५१
स्थालीपाके त्वतिक्रान्ते यद्यन्याग्नौ स्वयं यजेत् ।
स्वाग्नावन्यो यजेद्यद्वा स्याद्वाग्नावैष्णवश्चरुः ५२
प्रधानोत्तरविज्ञान एवैष चरुरीरतः ।
स्थालीपाकं पुनः कुर्यादनिषिद्धे दिने बुधः ५३
पूर्वं चेत्तत्परित्यज्य हविः सर्वाख्यचिराकम् ।
तदा होतव्यमेतावदेव चित्तं चरुनं तु ५४
अत्रापि स्थालीपाकस्याहुराचार्याः पुनः क्रियाम् ।
सर्वेष्वेतेषु कर्तव्या पूर्णाहुतिरथापि वा २५५
स्थालीपाके त्वनारब्धे नियतैषा प्रकीर्तिता २५६

इति संक्षेपेण प्रायश्चित्तानि ॥

विहित कर्माचें अनुष्ठान न झाल्यास किंवा भलत्याच रीतीनें झाल्यास श्रुतिविहित प्रायश्चित्त अवश्य आहे १. प्रायः ह्मणजे विनाश आणि चित्त ह्मणजे संधान. प्रायश्चित्त ह्मणजे जें नष्ट झालें असेल त्याची जोडणी. तें प्रत्यक्ष व अतींद्रिय ह्या भेदानें दोन प्रकारचें आहे २. बाहेर पडलेला अग्नि पुनरपि आयतनांत ठेवणें, शुद्ध प्रदेशावर सांडलेलें हवि पुनः घेणें ३ इत्यादि प्रकारचें प्रत्यक्ष चित्त ह्मणजे संधान होय. जप, होम वगैरे हें अतींद्रिय प्रायश्चित्त होय ४. प्रायश्चित्तनिमित्तांमध्यें जे संख्या, वचन इत्यादि श्रुत असेल तें अविवक्षित असतें असें समजावें ५. आज्यसंस्कार करून अग्नीला परिस्तरणें घालावीं. नंतर उदकानें परिषेक करून त्या अग्नीला शुक्ल, पुष्पें, अक्षता इत्यादिकांनीं ६ अलंकृत करावें. नंतर पळसाची समिध देऊन स्वाहाकारयुक्त मंत्रांनें विहित आहुति संस्कृत दर्वीनें द्यावी. हा प्रायश्चित्तहवनाविषयीं विधि होय. अथवा श्रौतसूत्रोक्त प्रायश्चित्तहोम श्रौतसूत्रोक्त पद्धतीनेंच करावे आणि शास्त्रान्तरानें विहित असलेले सर्व प्रायश्चित्तहोम

गृह्यसूत्रोक्त विधीनेंच करावें ७, ८, ९. ह्याचें विवेचन पुढेंच आहे श्रौतकर्मांमध्यें प्रायश्चित्तहोम स्रुचीनें करणें व पूर्वी समिध् देणें अवश्य आहे १०. होमाच्या जितक्या आहुति तितक्या समिधा द्याव्या. परिस्त-रणाविषयीं विकल्प आहे. परिषेक अमंत्रक होय ११. अग्नीच्या पुढून जाऊन त्याच्या दक्षिणेस उभें रहावें आणि नाभीशीं स्रुचा धरून विहित आहुति घालावी १२. होमाच्या आहुति अनेक असल्यास प्रत्येक आहु-तीला धार थांबून थांबून होम करावा. जेथें स्रुव्यानें आहुति सांगितली असेल तेथें स्रुची पात्रासादनाचे वेळीं घेण्याचें कारणच नाहीं १३. गृह्य कर्मांमध्यें स्रुवाहुति विहित असल्यासही दर्वीच उक्त आहे. परंतु, एकापेक्षां अधिक वेळां हवि घेऊन जेथें ( द्विर्गृहीत, त्रिर्गृहित, चतुर्गृहीत वगैरे प्रकारानें ) होम विहित असेल तेथें श्रौत व स्मार्त ह्या दोहों ठिकाणीं स्रुवा अवश्यच आहे १४. हविर्ग्रहणाकरितां स्रुवाही पात्रासादनाचे वेळीं ठेवणें अवश्य आहे. स्रुव्याचा संमार्ग दर्वीच्या अथवा स्रुचीच्या संमर्गाचे पूर्वी करावा १५ व तो श्रौत स्रुव्याच्या संमार्गाप्रमाणें अमंत्रक करावा. संमार्ग-दर्भ ठेवण्याच्या पूर्वींच प्रायश्चित्तहोम प्राप्त झाल्यास १६ प्रायश्चित्ताकरितां आज्यसंस्कार करून त्यानें आहुति घालावी. निर्वापकालींच प्रायश्चित्त उपस्थित झाल्यास त्यावेळीं आज्य एकच असतें. प्रायश्चित्ताकरितां व कर्मा-करितां असा वेगळा प्रकार तेव्हां प्राप्तच नसतो १७. श्रौतोक्त रीतीनें प्राय-श्चित्तहोम व्हावयाचा असल्यासही आज्यसंस्कार गृह्योक्त रीतीप्रमाणेंच होणें अवश्य आहे १८. अग्नीला परिस्तरणें घातलेलीं असल्यास प्रायश्चित्ताकरितां पुनरपि परिस्तरणें घालण्याचें आणि इध्मा अर्पण केलेला असल्यास प्राय-श्चित्ताकरितां पुनरपि समिध् अथवा समिधा देण्याचें कारण नाहीं १९. निमित्त घडतांक्षणीं प्रायश्चित्त करावें. किंवा बौधायनमुनींच्या वचनावरून प्रधान होमाच्या पूर्वी तें करावें २०. जेथें विशेष प्रायश्चित्त उक्त नसेल तेथें समस्त व्याहृतींनीं एक आहुति समजावी २१. ही आहुति स्रुव्यानें न घालितां दर्वीनें अथवा स्रुचीनेंच घालावी. ह्या आहुतीलाच याज्ञिक सर्व प्रायश्चित्त ह्मणतात २२. ज्या ठिकाणीं प्रायश्चित्त होम विहित नसेल त्या ठिकाणीं अदृष्ट दोषाच्या निरसनार्थ सर्व प्रायश्चित्त घालावें २३ आणि

जेथें प्रायश्चित्तहोम विहित असेल तेथेंही तें घालावेंच २४. पहिलें आले-खनाचें मत असून दुसरें आश्मरथ्याचें मत आहे. प्रायश्चित्तहोमाला पात्र उक्त नसल्यास श्रौतामध्यें स्रुची व गृह्यकर्मांमध्यें दर्वी होमसाधन होय. संख्या सांगितलेली नसल्यास एकदा हविर्ग्रहण आणि हविर्द्रव्य सांगितलेलें नसल्यास घृत २५,२६. जो कर्महोमाचा कर्ता तोच प्रायश्चित्तहोमाचा. दानाविषयीं मुख्य कर्ता पति; परंतु, तो संनिध नसल्यास पत्नी २७. ह्याप्रमाणें कात्यायनमुनींच्या वचनावरून त्यागाविषयींही समजावें. जो आहिताग्नि नसेल त्याला इष्टिस्थानीं सर्वत्र पात्रधर्मानेंच चरु उक्त होय. हे चरु प्राज्ञ लोकांनीं शास्त्रान्तरावरून समजावें. अशक्तपक्षीं पूर्णाहुति घालावी. तिचा प्रकार येणेंप्रमाणें:—२८,२९. स्रुचीमध्यें अथवा दर्वी-मध्यें चार वेळां, आठ वेळां अथवा बारा वेळां आज्य घ्यावें ३०. शेवट-ल्या अथवा उपान्त्य आज्यग्रहणानें ती दर्वी अथवा स्रुची भरावी. नंतर स्वाहाशब्दानें युक्त असें ३१ चतुर्थ्यन्त देवतानाम उच्चारून स्वाहाकाराचे अंतीं ह्या स्रुचीनें अथवा दर्वीनें आहुति द्यावी. हिला पूर्णाहुति असें ह्मणतात ३२. यजमान अतिशय गरीब असल्यास एका भरलेल्या स्रुव्यानेंही पूर्णाहुति होते. सर्वत्र **अनाज्ञातं** ह्या मंत्रांचा, **इदं विष्णुः** ह्या मंत्राचा ३३ आणि समस्त व्याहृतींचा जप करावा. प्रायश्चित्ता-करितां विहित असलेल्या द्रव्यांचा स्वरूपतः अभाव असल्यास ३४ द्रव्य-प्रतिनिधिच स्वीकारावा. प्रतिनिधि स्वीकारिल्याबद्दल प्रायश्चित्त नाहीं. अर्थ व द्रव्य ह्यांचा विरोध आल्यास अर्थ प्रबल ( द्रव्य ह्मणजे होमद्रव्य ) ३५. तेव्हां प्रकृत जें कर्म तें होण्याला होमद्रव्याच्या अभावामुळें अडचण अस-ल्यास ह्मणजे उक्त होमद्रव्यानें प्रधानकार्य होणें शक्य नसल्यास प्रकृत जें कर्म त्याच्या स्वरूपसत्तेविषयीं ह्मणजे त्याच्या अनुष्ठानाविषयीं हा न्याय समजावा. ( सारांश, द्रव्याच्या प्रतिनिधीनें कर्मस्वरूप उत्पन्न होतें असें समजावें ) ३६. द्रव्य आणि गुण ह्यांमध्यें विरोध असल्यास प्रधान कार्य पार पाडण्याविषयीं द्रव्य प्रबल समजावें. गुणसंपादनाकरितां प्रतिनिधि स्वीकारूं नये. हा न्याय द्रव्यगुणविरोधासंबंधानें समजावा. स्वर, अक्षरें इत्यादिकांच्या लोपाविषयीं **आभिर्गीर्भिः** ही आहुति होय ३७, ३८.

मंत्रलोप, प्रोक्षणादि कर्मांचा लोप आणि त्याचप्रमाणें मंत्रव्यत्यय ह्मणजे दुसऱ्याच मंत्रानें दुसरेंच कार्य असा प्रकार झाल्यास त्वं नः स त्वं नः ह्या मंत्रानें दोन आहुति घालाव्या ३९. प्रधानयागाच्या पूर्वीच लुप्त अंगाचें स्मरण झाल्यास प्रायश्चित्तानंतर त्या लुप्त अंगाचें अनुष्ठान करावें ४०. परंतु, अंगकर्माचें कार्य उरकलें असल्यास प्रायश्चित्तच घालावें; तें अंगकर्म करूं नये. ह्याचें उदाहरण इध्मबंधनादि समजावें ४१. आज्यभागानंतर व मुख्य आहुतीचे पूर्वी जर इध्म्याचें स्मरण झालें तर अग्नीमध्यें इध्मा देऊन विपर्यासदोषार्थ प्रायश्चित्त करावें ४२. प्रधान होमानंतर जर इध्म्याचें स्मरण झालें तर प्रायश्चित्तच घालावें. असें निदानसूत्रांत सांगितलें आहे. आज्यभागादि अंगांचा लोप झाल्यास त्वं नः स त्वं नः ह्या दोन आहुति घालाव्या ४३. जें कर्म अकालीं होईल ते क्रमानें होण्याकरितां त्याची पुनरावृत्ति करण्याचें कारण नाहीं असें दृष्टसूत्रांत सांगितलें आहे ४४. परिस्तरणाचे दर्भ, परिधि, बर्हि, इध्मा, उपवेष व शुल्व ह्यांपैकीं कांहीं दग्ध झाल्यास, छिन्न झाल्यास ४५, अथवा मूत्रादिकांनीं उपहत होऊन सर्वथा नष्ट झाल्यास त्या जातीचें, त्या स्वरूपाच, त्या प्रमाणाचें व तसेंच ४६ दुसरें आणून पूर्वीप्रमाणें योग्य ठिकाणीं ठेवून त्याच्या योगानें कर्म करावें. परंतु दूषिताचा स्वीकार करूं नये ४७. त्वमग्ने अयासि आणि प्रजापते ह्या दोन मंत्रांनीं दोन स्रुवाहुती परिस्तरणादिकांचा उपघात झाल्यास घालाव्या. इध्म्यामध्यें समिध अथवा समिधा कमी असल्यास ‘ यत्पाकत्रा ’ ह्या मंत्रानें आहुति ४८ घालून उक्तसंस्कारपूर्वक न्यूनता भरून काढावी. एकापेक्षां अधिक समिधा कमी असल्यास जितक्या समिधा कमी असतील तितक्याच आज्याहुती त्या मंत्रानें घालाव्या आणि न्यूनता संस्कारपूर्वक भरून काढावी ४९. स्थालीपाकादि कर्मामध्यें बर्हि, इध्मा इत्यादिकांचें पतन झाल्यास जें पडलें असेल ते अमंत्रक स्वस्थानीं ठेवून सर्वप्रायश्चित्त करावें ५०. सिद्ध करावयाचा जो अग्नि त्याचा उपघात झाल्यास पुनस्त्वादित्याः ह्या मंत्रानें समिध द्यावी आणि अन्नाचा उपघात झाल्यास ह्याच मंत्रानें एक आज्याहुती घालावी ५१. अग्नि आपोआप प्रज्वलित झाल्यास

'उद्दीप्यस्व' ह्या दोन मंत्रांनीं अग्नीमध्यें दोन समिधा घालाव्या ५२. प्रणीता अथवा प्रोक्षणी सांडल्यास आपोहिष्ठादि तीन मंत्रांनीं उदकानें पात्रपूरण करावें आणि 'ततं म आपः' ह्या मंत्रानें आज्याहुति घालावी ५३. प्रणीता अथवा प्रोक्षणी आटून गेल्यास अथवा गळून गेल्यास हेंच प्रायश्चित्त होय. आयतनाच्या बाहेर जर अग्नि जाईल ५४ आणि तो जर पुनः आयतनांत घालण्याला योग्य असेल तर तो धृष्टीनें घ्यावा. व्याहृतिमंत्रानें नंतर तो स्वस्थानीं टाकावा आणि नंतर ५५ सर्व प्रायश्चित्त घालून 'अनाज्ञातं' ह्या तीन मंत्रांचा जप करावा व विष्णुस्मरण करावें. प्रयाजांचा अभाव झाल्यास अध्वर्यु, आग्नीध्र व होता ह्यांनीं 'मा तमो मा यज्ञः' ह्या मंत्राचा जप करावा किंवा ह्या मंत्रानें अध्वर्यूनें प्रायश्चित्त घालावें. अंगार जर आयतनाच्या बाहेर पडला असेल आणि तो ५६, ५७ श्रौताग्नि व लौकिकाग्नि हे संनिधच असल्यामुळें कोणत्या अग्नीपैकीं आहे असें जर न समजेल तर त्या अंगाराची उपेक्षा करून ५८ सर्व प्रायश्चित्त घालावें असें द्विशतीकारानें ह्मटलें आहे. तें सर्व प्रायश्चित्त श्रौताग्नीवर अथवा गृह्याग्नीवर घालावें ५९. निर्वापानंतर आणि उत्पवनाच्या पूर्वी आज्य सांडल्यास ब्राह्मणाला वर देऊन देवाञ्जनमगन् ६० ह्या पांच मंत्रांनीं त्या सांडलेल्या आज्याचें अनुमंत्रण करावें. उत्पवन होत असतांना आज्य सांडल्यास ब्राह्मणाला वर देऊन ६१ किंवा अजा अथवा गाय देऊन 'देवाञ्जनं' इत्यादि मंत्रांनीं पूर्वींप्रमाणेंच त्या सांडलेल्या आज्याचें अनुमंत्रण करावें. उत्पवन झालेलें आज्य सांडल्यास जें घरांत ६२ मुख्य द्रव्य असेल तें देऊन 'देवाञ्जनं' इत्यादि मंत्रांनीं त्या सांडलेल्या आज्याचें अनुमंत्रण करावें. ग्रहण केलेलें आज्य सांडल्यास वरदान व अनुमंत्रण ६३ करून 'भूपतये नमः स्वाहा, भुवनपतये नमः स्वाहा, भूतानां पतये नमः स्वाहाः, भूताय स्वाहा आणि भूर्भुवः सुवः' ह्या पांच मंत्रांनीं त्या सांडलेल्या आज्याच्या पूर्वेस, दक्षिणेस, पश्चिमेस, उत्तरेस व वर अनुक्रमें प्रादेश करावे ६४,६५,६६; तदनंतर 'सं त्वा सिञ्चामि' ह्या मंत्रानें त्या सांडलेल्या आज्यावर उदकसिंचन करावें आणि शुद्ध प्रदेशावर आज्य सांडलें तर तें यज्ञस्य० ह्या मंत्रानें अभिमंत्रण करून ज्यांतून सांडलें असेल त्यांत घालावें. परंतु, अशुद्ध प्रदेशांतच जर सांडलेलें असे •

तर पुनरपि घ्यावें. हविःस्कंदनाविषयींही हाच प्रायश्चित्तविधि होय ६७,६८. एक स्रुवाभर अथवा अधिक आज्य सांडलें असल्यास हें प्रायश्चित समजावें. ६९. परंतु, स्रुव्यापेक्षां कमी आज्य सांडलेलें असल्यास सर्व प्रायश्चित घालावें. सर्व द्रवद्रव्याविषयींही हेंच प्रायश्चित्त होय ७०. कोणतेंही कठिन द्रव्य अंगुष्ठपर्वापेक्षां जर अधिक सांडेल तर पूर्वींचें प्रायश्चित्त आणि कमी सांडेल तर सर्व प्रायश्चित्त ७१. परंतु बर्हि, भस्म, अग्नि इत्यादिकांचे ठिकाणीं हवि सांडल्यास प्रायश्चित्ताचें कारण नाहीं. अग्नीमध्यें घातलेली आहुति परिधीच्या बाहेर पडल्यास ७२ ती ओंजळीनें गोळा करून ' मा यजमानं० ' ह्या मंत्रानें अग्नींत द्यावी. ह्या कर्माचें कर्तृत्व आग्नीध्राकडे नसून स्वतःकडेच आहे ७३. आग्नीध्राचा संभव नसल्यामुळें व स्वतःच होम कर्तव्य असल्यामुळें ' एतां संक्रुध्य जुहुधि ' असा प्रैष देण्याचें कारण नाहीं-ह्या ठिकाणीं पूर्णपात्रदानाचाही लोपच समजावा ७४. निर्वापादिकांमध्यें जर अध्वर्यूनें अविहित देवतेचा निर्देश केला तर त्या द्रव्याचे ठिकाणीं विहित देवतेची योजना करून ७५ ' यद्वो देवा अतिपादयानि' ह्या मंत्रानें त्या द्रव्याची आहुति घालावी. अविहित देवतेचाच निर्देश होऊन जर याग झाला असेल ७६ तर हें प्रायश्चित्त करून केलेला याग पुनः करावा. हेंच प्रायश्चित्त औपासन होमाविषयीं समजावें ७७. स्वाहाकार व प्रदान ह्यांमध्यें विपर्यास झाल्यास ' मनोज्योतिः ' ह्या मंत्रानें मनस्वती आहुति घालावी. ७८. अवदानद्रव्य, याग देव व मंत्र ह्यांमध्यें विपर्यास झाल्यास व तो तंत्र-समाप्तीचे पूर्वी समजल्यास ' त्वं नः सत्वं न ' ह्या आहुति ७९ दोन घालाव्या. नंतर सर्व प्रायश्चित्त वगैरे. नंतर घरांत जें मुख्य द्रव्य असेल तें ब्राह्मणाला द्यावें ८० आणि पुनरपि तंत्राची आवृत्ति करावी. ह्या-नंतर हवनाचें कारण नाहीं. ज्या होमामध्यें प्रधानें अनेक आहेत अशा होमाचे प्रसंगीं एक अथवा अनेक प्रधान द्रव्यें तयार झालीं नाहींत असें जर यागाच्या पूर्वी स्मरण झालें तर ' त्वं न. स त्वं नः ' ह्या आहुति ८१, ८२ घालून व तें होमद्रव्य उत्पन्न करून यथाविधि याग करावा. परंतु, यागानंतर स्मरण झाल्यास आरंभिलेलें कर्म संपवावें ८३; तदनंतर पुढें सांगितलेलें आहुतिरूप प्रायश्चित्त करावें. नंतर अंतरलेलें सांग

प्रधान कर्म पुनरपि करावें ८४. अग्नीच्या एकदेशाचा अपहार झाल्यास ह्मणजे थोडासा अग्नि बाहेर नेला गेल्यास "मनोज्योतिः" ही आहुति घालावी. औपासनाग्नीवर प्रातर्होमाचे वेळीं अग्निदेवतेला आणि सायंहोमाचे वेळीं सूर्यदेवतेला अनुलक्षून चुकीनें हवन झाल्यास होमाची पुनरावृत्ति करावी. परंतु, सकाळीं सूर्यदेवता व सायंकाळीं अग्निदेवता असा पक्ष स्वीकारिला असल्यास हें प्रायश्चित होय ८५, ८६. दुसरा पक्ष स्वीकारिला असल्यास हें प्रायश्चित नाहीं. एक अवदान घ्यावयाचें राहिलें असें जर यागाचे पूर्वी कळलें ८७ तर 'त्वं नः स त्वं नः ह्या मंत्रानें दोन आहुति घालाव्या आणि तें अवदान घेऊन यथाविधि याग करावा ८८. परंतु, यागानंतर जर कळलें तर दोन आहुतिच घालाव्या; पुनरपि याग करूं नये ८९. आतां ज्यांच्या योगानें हविर्द्रव्य दुष्ट होतें ते हविर्दोष सांगतों. घोड्याच्या अंगावरील नीलवर्ण मक्षिका ९०, गाईच्या अंगावरील गोमाशा, शय्यादिकांतील ढेकूण, वस्त्रावरील अथवा डोक्यांतील उंवा, मलपिंड करणारे कीटक ९१, मांजर, उंदीर, मुंगूस, विष्ठा, कावळा, कोंबडें, श्वान, वानर, वस्त्रदशा, गुंतवळ, नखें ९२, शरीरावर असलेलें कुत्सित नख, दुर्गंधि द्रव्यें, मुंगा ९३, नाकापासून व मुखापासून पडलेला बिंदु, घाम, अश्रु, रक्त, शेंबूड, खाकरा, शिंक ९४, ९५, ९६, मूत्र, मज्जा, वसा, शुक्र, कानांतील मळ, पूं ह्या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या अशुद्ध पदार्थांनीं ९७ स्पृष्ट झालेले आणि त्याचप्रमाणें रजस्वला, दहा दिवसांतील बाळंतीण, चंडाल, पतित इत्यादिकांचा स्पर्श झालेलें आणि त्याचप्रमाणें शिशु, याग करणारा, गर्भिणी, ब्राह्मण व नृप ९८ ह्यांचा घात करणारा भ्रूणघ्न ह्यांनीं व इतर पापी लोकांनीं स्पर्श केलेलें अथवा पाहिलेलें जें असेल ९९, त्याचप्रमाणें स्त्रीप्रसूतीचें स्थान, मरणस्थान, शवदहनस्थान, चंडालवसतिस्थान आणि विष्ठा वगैरे असलेलें स्थान १०० असल्या अपवित्र ठिकाणीं ठेविलेलें हवि दूषित होतें. प्रधानयागाचे पूर्वी हवि दुष्ट झाल्यास १ तें हवि हातानें शुद्ध उदकांत टाकावें आणि दोन मिंदाहुती घालून सर्व प्रायश्चित्तादिक करावें २ आणि पुनरपि तितकेंच हवि उत्पन्न करून क्रमानें याग करावा. परंतु, यजमान अतिशय अशक्त असल्यास पुनरपि याग करणें तो आज्यानेंच करावा ३-

यागानंतर हवि दुष्ट झाल्यास शेष कर्म आज्यानेंच पुरें करावें. दुष्ट हवीनें याग झाला असल्यास प्रणव व समस्त व्याहृति ह्या मंत्रांनीं दोन स्रुवाहुती घालाव्या; फिरून याग नको. असें कात्यायन मुनीचें मत आहे ४,५. अवदान घेतेवेळीं दोषज्ञान झाल्यास तें सर्व दुष्ट हवि शुद्ध उदकांत टाकावें ६. पुनरपि हवि तयार करून 'त्वं नः स त्वं नः' ह्या दोन आहुति घालाव्या. नंतर त्या हवीनें याग करावा व 'अनाज्ञातं' इत्यादि तीन मंत्रांचा जप करून विष्णुस्मरण करावें ७. पुरोडाशाच्या मध्यापासून व पूर्वार्धापासून घेतलेलें अवदान जर दोषयुक्त असेल तर तें शुद्ध उदकांत टाकून पुनरपि मध्यापासून व पूर्वार्धापासून ८ अवदान घ्यावें व सर्व प्रायश्चित्तादिक घालावें. प्रधानयागद्रव्याचा प्रधानाच्या पूर्वी नाश झाल्याचें ९ समजून आल्यास त्याच तंत्रामध्यें त्याच वेळीं नष्ट हवि उत्पन्न करून त्यानें याग करावा १०. ज्यांत हवि अनेक आहेत अशा यागांतील सर्व हवींचा नाश वगैरे झाल्यास देवता भेदून ११ त्या सर्वांना उद्देशून आज्याहुति घालाव्या व पुनरपि याग करावा. वरून पडलेल्या क्षुद्र मक्षिकाकीटकादि व पिपीलिकादिक १२ अशा पांचांपेक्षां अधिक जीवांचा हवीशीं संबंध झाल्यास हवि दुष्ट होत असल्याचें समजावें १३. त्यांपेक्षां कमी जीवांचा संबंध असल्यास पडलेले जीव काढून टाकून त्या हवीवर उदकानें प्रोक्षण करावें आणि दोन लौकिक पवित्रांनीं म्हणजे दर्भांनीं त्याचें उत्पवन करावें; म्हणजे तें हवि योग्य होतें १४. हवि अपक्क असतांना याग झाल्यास आरंभिलेलें कर्म संपवावें. नंतर प्रायश्चित्त येणेंप्रमाणें:—चार शराव तांदूळ घेऊन सुतप्त ओदन तयार करावें १५. आणि त्याच्या योगानें सुशील व शुचि अशा चार ब्राह्मणांना भोजन घालावें. त्यांपैकीं एक भार्गवगोत्री असावा आणि त्या सर्वांना दक्षिणार्थ सारखे वर द्यावेत १६. हवि सर्व दग्ध झाल्यास पुनरपि तें उत्पन्न करून तोच याग करावा; पुनरपि सर्व याग करण्याचें कारण नाहीं १७. हवि थोडें दग्ध न होतां शिल्लक असल्यास सर्व प्रायश्चित्त घालून त्या हवीनें याग करावा १८ आणि इतर कर्म आज्यानें पुरें करावें; पुनरपि यागाचें कारण नाहीं.

## हविरुत्सेकप्रायश्चित्त.

पूर्वेस, दक्षिणेस, पश्चिमेस, उत्तरेस व सर्व दिशांप्रत हवीचा उत्सेक

झाल्यास अनुक्रमें अग्नि, यम, वरुण, सोम आणि ह्या सर्व देवता ह्यांना उद्देशून आज्याहुति घालाव्या आणि अवान्तर दिशांप्रत हवींचा उल्लेक झाल्यास व्याहृतींनीं होम करावा १९,१२०,२१ हे सर्वहा होम असल्यामुळें 'अग्नये स्वाहा, यमाय स्वाहा' असे स्वाहाकारान्त होत. 'आप्यायस्व समेतु ते आणि संते' ह्या दोन मंत्रांनीं आज्यानें हवींचें आप्यायन करावें २२. नंतर दोन मिंदाहुति व सर्व प्रायश्चित्तादि घालावें. याग व अन्वाधान ह्यांच्यामध्यें सूर्यग्रहण झाल्यास २३ 'उद्वयं तमसस्परि, उदुत्यं व चित्रं' ह्या तीन मंत्रांनीं तीन आहुति प्रधानाच्या पूर्वी घालाव्या २४. कोणी तीन मंत्रांनीं उपस्थानही सांगितलें आहे. याग व अन्वाधान ह्यांच्यामध्यें चंद्रग्रहण झाल्यास प्रधानाच्या पूर्वी 'नवो नवो आणि यमादित्या' ह्या दोन मंत्रांनीं दोन आहुति घालाव्या. ह्या दोन मंत्रांनीं उपस्थानही करावें असें कोणी म्हणतात २५,२६. अन्वाधानकर्मसमयीं ग्रहण झाल्यास प्रायश्चित्त नाहीं. काष्ठपात्र फुटल्यास दुसरें घ्यावें २७ आणि तें फुटकें पात्र फुटके दोहा करून वृक्षाखालीं टाकावें. लौकिक अग्नीवर ठेवावें कर्ण पक्षलक असतांना फुटलेलें काष्ठपात्र पूर्वेस दोहा करून लौकिक अग्नीवर टाकावें. मृत्तिकेचें पात्र फुटल्यास 'भूमिर्भूमिमगात्' हा मंत्र व 'मममज्ञानं' ह्या मंत्रानें त्याचें अभिमंत्रण करून तें पात्र शुद्ध उदकांत टाकावें आणि दुसरें घ्यावें. परंतु, मृत्तिकेचें पात्र हरवल्यास 'भूमिर्भूमिमगात्' हा मंत्र जपावा व त्यानें होणाऱ्या कार्याकरितां दुसऱ्याची योजना करावी २८,२९,१३०. यज्ञकालींच हा विधि आहे असें कोणी म्हणतात व कित्येक हाच विधि होय असेंही कोणाचें मत आहे. कोणतेही पात्र फुटलें असतां क्रमानें प्रथम समस्त व्याहृतींनीं आज्याहुति घालावी असें यज्ञपार्श्वाचें मत आहे. आज्य वर टाकण्याचे पूर्वी जर निरुढ अग्नीचा नाश झाला ३१,३२ तर त्याच ठिकाणाहून पुनः निरूहण करावें. नंतर चतुर्गृहीत आज्य घेऊन 'मनो ज्योतिः' ह्या मंत्रानें आहुति घालावी ३३. आज्य निरुढाग्नीपासून खालीं उतरल्यानंतर निरुढाग्नीचा नाश झाल्यास केवल 'मनो ज्योतिः' ही आहुतीच घालावी; निरूहणाचें कारण नाहीं, (आज्यसंस्काराकरितां आयतनापासून जे बाहेर काढिलेले अंगार त्यांना निरुढ अग्नि असें म्हणतात आणि अंगार बाहेर

कढणें ह्या क्रियेला रिङ्हण असें ह्मणतात) ३४. प्रधानाहुतीशीं जर स्विष्टकृदाहुतीचा संसर्ग झाला तर सर्व प्रायश्चित्त घालून अनाज्ञातजप करावा ३५. अन्वाधानानंतर यजमान व ऋत्विज ह्यांपैकीं कोणाला स्वप्नावस्था झाल्यास ' इमं मे वरुण व तत्वायामि ' ह्या मंत्रांनीं दोन आहुति ३६ व समस्त व्याहृतींनीं एक आहुति घालावी. नंतर सूर्याचें पूजन करून ' पुनर्मामैत्विन्द्रियं ' ह्या अनुवाकाचा तीन वेळां अथवा एक वेळां जप करावा ३७. परंतु, बुद्धिपूर्वक शुक्रविसर्ग झाला असल्यास व्रातपत स्थालीपाक करावा किंवा पूर्णाहुति घालावी ३८. कर्मारंभ झाल्यावर कांहीं निमित्तामुळें विराम करावा लागल्यास सर्व प्रायश्चित्त घालून उरलेलें कर्म संपवावें ३९. कर्म सुरू असतांना ऋत्विजांमधून, ऋत्विज व अग्नि ह्यांच्यामधून, यजमान व ऋत्विज ह्यांच्या मधून किंवा यजमान व यजमानपत्नी ह्यांच्यामधून कोणी चतुष्पाद अथवा द्विपाद गेल्यास मिंदादि अथवा दुर्गादि गणाचें हवन करावें १४०,४१. दर्वीमध्यें किंवा स्रुवांमध्यें बारा वेळां तूप घेऊन दुर्गादिगणांचा होम कर्तव्य असल्यास पांच आहुति घालाव्या ४२. परंतु, हें करण्यास असमर्थ असणाऱ्यानें सर्व प्रायश्चित्त घालावें, दोन मिंदाहुति, व्याहृति, प्रणव ४३, चार वारुणी, तीन तन्तुमती, अनुमोद्यानुमती, मनोज्योति, महाव्याहृति, सप्त ते अग्ने व प्रजापते न त्वदेतानि ४४ ह्या मंत्रसमूहाला मिन्दादिगण असें ह्मणतात. ' जातवेदसे सुनवाम, मनोज्योतिः ४५ आणि तीन महाव्याहृति हा दुर्गादिगण होय. अन्वाधान केल्यानंतर प्रयाज कर्तव्य असल्यांस ४६ ' तुभ्यं ता आङ्गिरस्तम ' ही आहुति घालून अरणींचे ठिकाणीं किंवा समिधेचे ठिकाणीं अग्नीचा समारोप करावा आणि जेथें वास्तव्य होईल तेथें 'उपावरोह जातवेदः' ह्या मंत्रानें मंथन करून कर्म संपवावें. अन्वाधानानंतर प्रमादानें इष्टि राहिल्यास ४७,४८ व्यस्त समस्त व्याहृतींनीं चार आहुति घालाव्या. औपासन अग्नीवर होणाऱ्या होमाचें कठिन अथवा द्रवरूप द्रव्य ४९ सांडल्यास 'अस्कान्द्यौः पृथिवीं आणि अस्कानजनि प्राजनि' ह्या मंत्रांनीं त्याचें अभिमंत्रण करावें. ' उन्नम्भय पृथिवीं ' ह्या मंत्रानें त्याच्यावर उदक शिंपडावें १५० आणि ' अनाज्ञातं ' इत्यादि मंत्रांचा जप करून सर्व प्रायश्चित्त घालावें. नंतर सांडलेलें द्रव्य

घेऊन उत्तरेस जावें ५१. नंतर एका शुद्ध ठिकाणच्या वारुळाचें तोंड मोकळें करावें. तदनंतर शुद्ध उदकाला स्पर्श करावा. तदनंतर उजव्या हातानें ५२ सर्व सांडलेलें द्रव्य घेऊन 'प्रजापते न त्वदेतानि' ह्या ऋचेनें त्या बिळांत घालावें आणि 'भूः' असें मनांत ह्मणून उपस्थान करावें ५३. ह्यासंबंधानें "जुहोति" असा विधि नसल्यामुळें 'प्रजापते' ह्या ऋचेच्या अंतीं स्वाहाकार नाहीं ५४. नंतर पुनरपि होम करावा आणि संकल्प वगैरे पूर्वींप्रमाणेंच करावें. औपासनाग्नीवर ज्याचा होम व्हावयाचा आहे अशा कठिन अथवा द्रवरूप हविर्द्रव्यामध्यें घाण खाणारा व विष्ठा करणारा कीटक जर पडेल ५५ तर पूर्वींप्रमाणेंच प्रायश्चित्त करावें. नंतर पळसाच्या मधल्या अथवा शेवटल्या पानानें तें हविर्द्रव्य घेऊन 'मही द्यौः पृथिवी' ह्या मंत्रानें आयतन व परिधि ह्यांच्यामध्यें तें टाकावें. नंतर पात्राचा संस्कार ५६,५७ योग्य रीतीनें करावा व इतर सर्व पूर्वींप्रमाणें करावें. औपासन अग्नीवर दुधानें होम कर्तव्य असतांना स्थालीपासून दुध गळल्यास ५८ 'गर्भं स्रवन्तमगदमकः' ह्या मंत्रानें त्याचें अभिमंत्रण करावें. सूर्यास्तापासून नऊ घटिकांपर्यंत होमकाल सांगितलेला आहे. त्याचें अतिक्रमण झाल्यास 'दोषावस्तः' ह्या मंत्रानें आज्याहुति घालावी. ह्या आहुतीचा देव वरुण ५९,६०. नंतर समिध् देण्याच्या पूर्वीपर्यंतचें कर्म यथाविधि करावें. नंतर शक्य तितका श्वास आंवरून धरून वर द्यावा ६१ आणि समस्त व्याहृतींचा जप करून नित्य होम करावा. व्याहृतींनीं उपस्थान करून होमांतील शेषकर्म संपवावें ६२ आणि नंतर वरुणाला उद्देशून चरु करावा अथवा पूर्णाहुति घालावी. प्रातःकालीं होमाचा काल बारा घटिका, दहा घटिका ६३, संगवसमाप्तीपर्यंत अथवा प्रहर होईपर्यंत आहे. ह्याचें अतिक्रमण झाल्यास 'प्रातर्वस्तः' ह्या मंत्रानें आहुति घालावी ६४. ह्या आहुतीचा देव मित्र अथवा सूर्य. समिध देण्याच्या पूर्वी यथाशक्ति श्वासनिरोध करावा ६५. वर द्यावा; समस्त व्याहृति ह्मणाव्या; नित्य होम करावा; व्याहृतींनीं उपस्थान करावें ६६. होमांतील अवशिष्ट कर्म संपवून मैत्र व सौर्य असे दोन चरु करावे.

## होमविच्छेदप्रायश्चित्त.

होम बंद पडून त्रिरात्र लोटले नसल्यास 'अयाश्चाग्ने' ही आहुति, त्रिरा-

त्रानंतर व सात रात्री लोटण्यापूर्वी ती आहुति घालून 'मनोज्योतिः' ही दुसरी आहुति ६७,६८ आणि सात रात्रींनंतर व बारा रात्रींपूर्वी पूर्वींच्या दोन आहुति व 'तन्तुमती' ही तिसरी आहुति. त्यानंतरही होमविच्छेद झाल्यास पुनराधानच केलें पाहिजे ६९. फारच मोठी आपत्ति असल्यास अंतरलेल्या सर्व होमांची बेरीज करून होम द्यावे. परंतु, बारा दिवस लोटल्यानंतर आपत्कालीं सुद्धां हा प्रकार नाहीं १७०. 'पाणिग्रहणादिरग्निः' हें खंड क्षेपक आहे असें जरी मत असलें तरी सुद्धां वस्तुतः प्रबल असल्यामुळें प्रायश्चित्तच अवश्य आहे. 'अयाश्चाग्ने' इत्यादि प्रायश्चित होणार नाहीं ७१. कारण, तें शास्त्रान्तरांत सांगितलें असल्यामुळें दुर्बल होय. त्याचा येथें उपयोग नाहीं.

## श्रौत प्रायश्चित्त.

एक, दोन अथवा तीन होम अंतरल्यास 'सप्त होता व मनोज्योतिः' ह्या मंत्रांनीं आहुति घालाव्या ७२,७३ आणि नंतर अंतरलेला होम करावा. परंतु, कांहींच्या मतानें अंतरलेला होम करण्याचें कारण नाहीं. त्याचप्रमाणें प्रातःकालचाही औपासन होम करावा ७४. पुढल्या चवथ्या दिवसापासून सहा अथवा कामाच्या मतानें सात दिवसांमध्यें एक, दोन, तीन अथवा चारही होमांचा लोप झाल्यास तन्तुमान् अग्नीला अनुलक्षून चरु अवश्य आहे. आठव्या दिवसापासूनही बारा दिवसांपर्यंत होम अंतरल्यास तसाच चरु अवश्य आहे ७५, ७६. परंतु, त्याच्याही नंतर होमाचें अतिक्रमण झाल्यास पुनराधानच अवश्य आहे.

उतैकाहमुत द्व्यहं जुह्वति न हुतमेवास्य भवति ।

अशी श्रुति असल्यामुळें एक अथवा दोन दिवस ७७ होम अंतरल्यास प्रायश्चित्तच नाहीं असें कांहीं म्हणतात. सूर्यास्ताचा भ्रम झाल्यामुळें जर कोणी होमाची वेळ नसतांना होम केला ७८ तर त्याच अग्नीवर पुनरपि होम द्यावा. परंतु, प्रादुष्करण ( म्हणजे अग्नि भस्मांतून बाहेर काढणें हें) कर्म एकदा झालेलें असल्यामुळें पुनरपि तें करण्याचें कारण नाहीं ७९. होमानंतर 'भवतं नः समनसौ' ह्या मंत्रानें अग्नीचें उपस्थान करावें. सूर्योदयभ्रांतीमुळें पूर्वी होम झाल्यासही हेंच प्रायश्चित १८०. प्रादुष्करणानंतर

होम होण्याच्या पूर्वी यजमान जर कांहीं खाईल तर त्याच अग्नीवर ८१ व्रात-पत स्थालीपाक करावा आणि ' यत्तेवय पुरुषत्रा व यथा ह तद्वसवः ह्या दोन आहुति घालाव्या. ८२ अथवा ह्या मंत्रांनीं दोन समिधा द्याव्यात किंवा त्या मंत्रांचा जप करावा. पत्नीनें भक्षण केल्यासही हेंच प्रायश्चित्त होय ८३. अतिसंकटामुळें प्रातर्होम न झाल्यास त्या यजमानानें भोजन करूं नये ८४ आणि सायंहोम न झाल्यास रात्रीं भोजन करूं नये. एवढ्यानेंच होमाची सिद्धि होते; प्रायश्चित्ताचें कारण नाहीं ८५. पहिली आहुति दिल्या-नंतर दुसऱ्या आहुतीचें द्रव्य जर सांडून गेलें तर ' यत्र वेत्थ वनस्पते ' ह्या मंत्रानें समिध द्यावी आणि नंतर सांडून जें शेष राहिलें असेल त्यानें दुसरी आहुति अमंत्रक देऊन होमांतील सर्व शेष कर्म संपवावें ८६,८७. नंतर पुनरपि होम करावा. त्याचप्रमाणें पहिल्या आहुतीवरच जरी दुसरी आहुति होमकर्त्यानें घातली तरी सुद्धां हेंच प्रायश्चित्त. परंतु, दुसरी आहुति घालण्या-पुरतें जर द्रव्य शिल्लक असेल तर मात्र प्रायश्चित्त नाहीं ८८. औपासन होमाच्या आहुतिद्रव्यांत जर पावसाचा थेंब पडला तर तें हवि कुशांवर ठेवून एक समिध द्यावी ८९. नंतर व्याहृतींचा जप करून त्याच हवीनें ' मित्रो जनान्कल्पयति ' ह्या मंत्रानें पहिली आहुति द्यावी १९० आणि दुसरी आहुति वगैरे देऊन होमांतील शेष कर्म संपवावें आणि नंतर संकल्पापासून पुनरपि होम करावा ९१. प्रादुष्करणाची वेळ टळून गेल्यास सर्व प्रायश्चित्त घालावें. औपासन होमामध्यें दुसरी आहुति विसरून राहिल्यास ९२ कर्मसमाप्ती-च्या पूर्वी ती अंतरलेली आहुति घालावी. परंतु, कर्म संपल्यानंतरच जर तिची आठवण झाली तर सर्व प्रायश्चित्त घालावें; आहुति घालूं नये ९३. पहिल्या आहुतीचें विस्मरण पडल्यास संपूर्ण होम पुनः करावा. योग्य कालीं जर प्रथम औपासन होमाला आरंभ न होईल ९४ तर दुसऱ्या दिवशीं सायंकालीं सप्त होता व मनो ज्योतिः अशा दोन आज्याहुति घालून नंतर होमाला आरंभ करावा ९५ पिंडपितृयज्ञ अंतरल्यास सप्त-होतृमंत्रानें होम करावा. औपासन अग्नि गेल्यास आयतनाचें उद्-लेपन वगैरे पूर्वीप्रमाणेंच करावें ९६ आणि श्रोत्रिय ब्राह्मणाच्या घरांतून अग्नि आणून स्थापावा. विवाहामध्यें जर विवाहहोमाकरितां मथन करून अग्नि काढिलेला असेल तर त्यावेळींही मंथनच करावें ९७. दुसऱ्या

होमकालपर्यंत पत्नीनें अथवा पतीनें भोजन करूं नये. परंतु, उपोषण होणें शक्य नसल्यास दुसरा विधि येणेंप्रमाणें:—उपलेपादिकांपासून अग्नि-स्थापनेपर्यंतचें कर्म पूर्वीप्रमाणेंच करावें. नंतर पात्रासादन करून पूर्वी-प्रमाणें पवित्रक करावें ९८, ९९. नंतर प्रोक्षणीसंस्कार करून पात्रप्रोक्षण करावें. नंतर दर्वीचा संमार्ग व आज्यसंस्कार करून २०० अग्नीला परि-स्तरणें घालावीं आणि नंतर परिषेक करावा. नंतर अलंकार करून एक समिध् द्यावी १. नंतर 'अयाश्च' ही आहुति घालून परिस्तरणें काढावीं. नंतर उत्तर परिषेक करून रोजचा होम द्यावा २. आयतनापासून दूर नेलेला अग्नि असतांना जर मुख्य अग्नि जाईल तर त्या अग्नीं-तील थोडासा अग्नि मुख्य अग्नीच्या आयतनामध्यें ३ ठेवावा आणि सर्व प्रायश्चित्त घालून 'भुवः स्वाहा' ही आहुति घालावी. गृह्यांत न सांगितलेल्या शान्तिक व पौष्टिक कर्मांमध्यें ४ अग्नि गेल्यास तें भस्म बाहेर काढून टाकून स्थण्डिलकरणादि कर्म ५ करावें. नंतर अग्निस्थापना करून आज्यसंस्कार करावा व स्थापिलेल्या अग्नीवर त्या आज्यानें सर्व प्रायश्चित्त घालावें ६. 'अयाश्चाग्नेऽस्य०' हीही आहुति घालावी असें कोणी म्हणतात. औपासन अग्नि गेला तरच अयाश्च हें प्रायश्चित्त ७ ह्या मताप्रमाणें उपनयनादि कर्मांमध्यें अग्नि गेल्यास 'अयाश्च' प्रायश्चित्त नाहीं; परंतु, सर्व प्रायश्चित्तच होय ८. गायत्र्युपदेशाच्या पूर्वी व मुख्य होमानंतर उपनयनसंस्कारामध्यें अग्नि गेल्यास पूर्वीप्रमाणें अग्निस्थापना करावी आाण नंतर ९ मुख्य आहुति दोन व सर्व प्रायश्चित्त हीं घालावीं. गायत्र्युपदेशानंतर अग्नि गेल्यास केवल सर्व प्रायश्चित्तच घालावें २१०. विवाहामध्यें पाणिग्रहणाच्या पूर्वी अग्नि गेल्यास मुख्य आहुतिच घालाव्या; 'अयाश्च' हें प्रायश्चित्त घालूं नये ११. परंतु, पाणिग्रहणानंतर अग्नि गेल्यास हें सर्व प्रायश्चित्तच होय. शव, रजस्वला, बाळंतीण, पतित इत्यादिकांचा संसर्ग १२ झाल्यास किंवा अन्य अग्नीशीं संसर्ग झाल्यास पुनराधानच अवश्य होय. खंड क्षेपक मानिल्यास अन्य अग्नीशीं संसर्ग झाला असतां पुनराधान नसून वैविच चरुच श्रौतातिदेशामुळें प्राप्त आहे. सूतिकादिकांचा संसर्ग झाल्यास मात्र पुनराधान अवश्यच १३, १४.

दोन गृह्याग्नि संसृष्ट झाल्यास दोन्हीं यजमानांनीं दोन समिधा घेऊन प्रत्येकानें आपआपल्या समिधेचे टिकाणीं एकदमच त्या संसृष्टाग्नींचा १५ समंत्रक समारोप करावा आणि नंतर ' अच्छा गिरो मतयः ' ह्या मंत्रानें दोघांनीं त्या लौकिकाग्नीचे विभाग करून घ्यावे. तदनंतर त्या अग्नीवर १६ ह्मणजे आपआपल्या अग्नीवर आपआपली समिध् ' उपावरोह ' ह्या मंत्रानें द्यावी आणि उभयतांनींही वैविच स्थालीपाक करावा १७. अग्नींतील कांहीं वेगळा भाग लौकिकाग्नीशीं किंवा श्रौताग्नीशीं संसृष्ट झाल्यास वैविच स्थालीपाकाचें कारण नाहीं १८. त्या संसृष्ट अग्नीची उपेक्षा करून मुख्य अग्नीवर सर्व प्रायश्चित्त घालावें असें द्विशतीकार व वरदराज ह्यांचें ह्मणणें आहे १९ वनांतील वणव्याशीं अग्नीचा संसर्ग झाल्यास व्रातभृत चरु होय. शवाग्नीशीं संसर्ग झाल्यास ' अग्नये शुचये ' हा चरु होय. ( ह्मणजे चरु करून ' अग्नये शुचये स्वाहा ' ही आहुति होय) २०. सूतिकाग्नीचा ससंर्ग झाल्यास सांकुसुक चरु, विद्युत्संबंधी अग्नीचा संसर्ग झाल्यास आप्सुमत चरु २१. वैविच, व्रातभृत, शुचि, सांकुसुक व आप्सुमत हे पांचही चरु एकदम प्राप्त झाल्यास निमित्तांचा क्रम जरी वेगळा असला तरी तो लक्ष्यांत न घेतां पुढील वाचनिक क्रम समजावा २२. विविच, शुचि, व्रतभृत, अप्सुमान् आणि संकुसुक हा क्रम होय २३. हे सर्व चरु अथवा ह्यांपैकीं अनेक चरु प्राप्त झाल्यास क्षामवत चरु शेवटीं अवश्य होय. ह्या पांचांपैकीं ज्याच्या अग्नीचे ठिकाणीं जें निमित्त कमी असेल तेवढ्यालाच उद्देशून असलेला चरु सोडून इतर सर्व क्रमानेंच पूर्वीप्रमाणें करावें. स्थालीपाक अंतरल्यास पाथिकृत चरु करावा २४,२५. दोन स्थालीपाक अंतरल्यास वैश्वानर व पाथिकृत हे दोन चरु करावे. दोहोंपेक्षां अधिक अंतरल्यास पुनराधान २६. खंड क्षेपक हा पक्ष मान्य केला तर स्थालीपाक अंतरल्यास श्रौतच प्रकार अवश्य. तो येणेंप्रमाणें २७. पार्वणस्थालीपाकाला आरंभ होऊन नंतर स्थालीपाक अंतरल्यास पाथिकृत स्थालीपाक करावा २८. परंतु, त्यांला आरंभ न होतां स्थालीपाक अंतरल्यास वैश्वानरस्थालीपाक करावा २९. पहिल्या प्रयोगाचा संकल्प होऊन स्थालीपाक न झाल्यास त्रिप्रनिमित्त तीन चरु करावे २३०. स्थालीपाकाच्या प्रकरणांत त्यांचा प्रकार दर्शविला जाईल.

कर्माचा गौण काल असल्यासही कर्माचें अनुष्ठान होतें ३१. आतां अंतरित स्थालीपाकासंबंधानें दुसरा प्रकार सांगतों. आरंभिलेले दोन्हीं स्थालीपाक ह्मणजे पौर्णमास स्थालीपाक व दर्शस्थालीपाक अंतरल्यास पथिकृत चरु ३२. आरंभ होऊन कांहीं दिवस अनुष्ठान सुरू राहिल्यानंतर पुढें ते दोन स्थालीपाक अंतरल्यास वैश्वानर चरु, पौर्णमासस्थालीपाक व दर्शस्थालीपाक ह्या दोहोंचा स्वकालीं आरंभ झालेला नसल्यास ३३ विशेषार्थ तीन स्थालीपाक करावे. पर्वदिवशीं व्रतलोप झाल्यास व्रातपत चरु करावा ३४. पर्वदिवशीं दुःखामुळें अश्रुपात झाल्यास व्रतभृत चरु करावा. पवित्रकाचा नाश झाल्यास पवित्रवान् अग्नि ह्या देवतेला उद्देशून चरु करावा ३५. हिरण्याचा ह्मणजे सुवर्णाचा नाश झाल्यास हिरण्यवान् अग्नि ह्या देवतेला उद्देशून चरु करावा. स्वकीय गृह दग्ध झाल्यास क्षामवान् अग्नि ह्या देवतेला उद्देशून चरु करावा ३६. औपासन होम, दर्शस्थालीपाक इत्यादि पारोशानें केल्यास वारुण चरु करावा ३७. ऋत्विक् सुस्नात आणि यजमान अस्नात असल्यासही वारुण चरु. परंतु, यजमान अत्यंत आतुर असल्यास हा वारुण चरु नको ३८. हें प्रातःकालच्या कर्मासंबंधानेंच समजावें. सायंकालीं सर्व प्रायश्चित्तच घालावें. सूतकान्न भक्षण झाल्यास तन्तुमान् अग्नि ह्या देवतेला उद्देशून चरु करावा ३९. भार्येला अथवा गाईला जुळें झाल्यास मारुत चरु. जुळ्यांतील एक अथवा दोन्हीं पुरुष असल्यास २४० वैश्वानर च मारुत हे दोन चरु असें कोणी ह्मणतात. 'एवंरूपाणि' असें सूत्र असल्यामुळें गृह्योक्त अद्भुत ४१. त्या विधीचाही येथे समुच्चय अवश्य आहे. तो विधि औपासनाग्नीवर करावा. कात्यायनादिकांनीं ह्यालाही अद्भुतत्व सांगितलें आहे ४२. 'य आहिताग्नेः' हें शास्त्र स्वीकारल्यास हा स्थालीपाक आहे; न स्वीकारिल्यास नाहीं ४३. न स्वीकारल्यास गृह्योक्त विधिच करावा. स्नातक पुरुषाच्या गाईला दोन वांसरें झाल्यास लौकिकाग्नीवर ४४ स्थालीपाक व गार्ह्य विधि त्यानें करावा किंवा गृह्योक्तविधिच करावा. स्थालीपाक करूं नये ४५. विधुरासंबंधानेंही हाच विधि होय. कात्यायनोक्त विधिच विधुरानें करावा असें कोणी ह्मणतात ४६. सर्वांनींही हाच विधि करावा असेंही कोणाचें मत आहे. जुळ्यापैकीं एक पुरुष व तोही मृत झाल्यास मारुत

चरु. आहिताग्नीला एक व दोन इष्टि निमित्ताप्रमाणें अवश्य आहेत. कात्यायनोक्त विधीच्या अनुष्ठानाविषयीं विकल्प होय ४८. स्वतःला मृत शब्दाचें श्रवण झाल्यास सुरभिमान् अग्नि ह्या देवतेला उद्देशून चरु. आग्रयण न करितां नूतन अन्न भक्षण झाल्यास ४९ वैश्वानर चरु. भेल्यांचा प्रतिग्रह झाल्यासहीं वैश्वानर चरु व हिरण्य दक्षिणा २५०. द्वेष्टयाचें अन्न भक्षण केल्यास हाच चरु. ह्या निमित्तामुळें होणाऱ्या स्थालीपाकामध्यें अग्नि गुणांनीं युक्त असतो-विविचि वगैरे गुण होत ५१. स्थालीपाकाला आरंभ झाल्यावर दुसऱ्याच्या अग्नीवर स्वतः किंवा आपल्या अग्नीवर दुसरा याग करील तर अग्नावैष्णव चरु ५२. प्रधानानंतर समजल्यासच हा चरु. नंतर निषिद्ध नसलेल्या दिवशीं पुनरपि स्थालीपाक करावा ५३. परंतु, प्रधान होमाच्या पूर्वीं समजल्यास हांवे टाकून देऊन सर्व प्रायश्चित्ता घालावें. एवढेंच प्रायश्चित होय; चरूचें कारण नाहीं ५४. अशा प्रसंगींही स्थालीपाक पुनः करावा असें आचार्य ह्मणतात. अथवा ह्या सर्व निमित्तामुळें प्राप्त होणाऱ्या स्थालीपाकांच्या ऐवजीं पूर्णाहुतिच घालावी २५५. स्थालीपाकाचा आरंभ झाला नसल्यास ही पूर्णाहुति नित्यच आहे २५६. ह्याप्रमाणें संक्षेपानें प्रायश्चित्तें आहेत.

## प्रायश्चित्तांतील सौत्र मंत्र.

**देवाञ्जनमगन्यज्ञस्ततो मा यज्ञस्याशीरागच्छतु वर्धताम् । गन्धर्वाञ्जनमगन्यज्ञस्ततो मा यज्ञस्याशीरागच्छतु वर्धताम् ॥ पितॄञ्जनम० वर्धताम् ॥ आप ओषधीर्वनस्पतीञ्जनम० वर्धताम् । पञ्चजनाञ्जनम० वर्धताम् ॥**

ह्या मंत्रांचा विनियोग स्कन्नानुमंत्रणाकडे आहे.

**यज्ञस्य त्वा प्रमयाऽभिमया वि मयोन्मया परिगृह्णामि ।**

ह्या मंत्राचा विनियोग स्कन्नाभिमंत्रणाकडे अथवा स्कन्नाच्या स्वस्थानीं प्रक्षेपणाकडे आहे.

**भूमिर्भूमिमगान्माता मातरमप्यगात् । ऋध्यास्म पुत्रैः पशुभिर्यो नो द्वेष्टि स भिद्यताम् ॥**

ह्या मंत्राचा विनियोग फुटक्या मृण्मय पात्राच्या अभिमंत्रणाकडे आहे.

१ दोषावस्तर्नमः स्वाहा । २ प्रातर्वस्तर्नमः स्वाहा ।

ह्या मंत्रांचा विनियोग अनुक्रमें सायंकाळच्या व सकाळच्या होमाची वेळ चुकल्यास पडणाऱ्या प्रायश्चित्ताकडे आहे.

## शास्त्रान्तरोक्त प्रायश्चित्तें.

स्वराक्षरादिलोपश्च इध्मादेश्छेदनादिकम् ।
इध्मकाष्ठातिरेकश्चेध्मकाष्ठन्यूनता तथा १
अनलस्योपघातश्च स्वयं प्रज्वलनं तथा ।
प्रणीताप्रोक्षणीस्कन्दः शोषणस्रवणे तथा २
हविषो दोष उत्सेकः सूर्यचन्द्रग्रहस्तथा ।
पात्रभेदो निरूढाग्नेर्विनाशो वीर्यपातनम् ३
होममध्येऽशनं होमानारम्भः समये स्वके ।
पिण्डयज्ञात्ययो वह्निपत्न्यृत्विक्स्वामिमध्यतः ४
द्विपादाद्यागमोऽन्वाहित्युत्तरं वाऽकृतिर्यजेः ।
एतेषां तु भवेत्प्रायश्चित्तं शास्त्रान्तरीयकम् ५

स्वराक्षरादिकांचा लोप, इध्मादिकांचें छेदन वगैरे, इध्मामध्यें काष्ठें अधिक अथवा कमी असणें १, अग्नीचा उपघात, अग्नि आपोआप प्रज्वलित होणें, प्रणीता अथवा प्रोक्षणी सांडणें, आटणें अथवा गळणें २, हविर्दोष, हविरुत्सेक, सूर्यग्रहण, पात्र फुटणें, निरूढ अग्नीचा नाश, वीर्यपात ३, होमाच्या पूर्वी भोजन, होमाला योग्य वेळीं आरंभ न होणें, पिंडपितृयज्ञलोप, अग्नि, पत्नी, ऋत्विज व यजमान ह्यांच्यामधून ४ द्विपादादिकांनीं जाणें आणि अन्वाधानानंतर याग न होणें ह्या गोष्टींसंबंधानें शास्त्रांतरोक्त प्रायश्चित्त आहे ५. हिरण्यकेशि श्रौतसूत्रामध्येंच गृह्य कर्मं सांगितलेलीं असल्यामुळें ह्या गोष्टींसंबंधानें गृह्य कर्मांतही श्रौतोक्त प्रायश्चित्त प्राप्त आहे. तथापि, स्वसूत्रविरोध येत नसल्यास शास्त्रान्तरोक्त प्रायश्चित्तही प्राप्त आहे. अथवा सर्वत्र सर्व प्रायश्चित्तानेंही काम भागतें.

# अथ सौरसूक्तानि ॥

उदुत्यमिति त्रयोदशर्चस्य सूक्तस्य काण्वः प्रस्कण्वः सूर्यो नवाद्या गायत्र्योऽन्त्याश्चतस्रोऽनुष्टुभोऽन्त्यस्तृचो रोगघ्न उपनिषदन्त्योऽर्धर्चो द्विषघ्नः । चित्रं देवानामिति षळर्चस्य सूक्तस्य आङ्गिरसः कुत्सः सूर्यस्त्रिष्टुप् । इन्द्रं मित्रमिति द्वयोरौचथ्यो दीर्घतमाः सूर्यस्त्रिष्टुप् । हंसः शुचिषदित्यस्य गौतमो वामदेवः सूर्यो जगती । यत्त्वेति भौमात्रिः सूर्योऽनुष्टुप् । यदद्येत्येका उत्सूर्य इति तिस्र उद्वेतीति चतस्रोऽर्धपञ्चमाः । एतासां मैत्रावरुणिर्वसिष्ठः सूर्यस्त्रिष्टुप् । उदुत्यद्दर्शतमिति तृचस्य मैत्रावरुणिर्वसिष्ठः सूर्यः । आद्या बृहती द्वितीया सतोबृहती तृतीया पुरउष्णिक् । बण्महानिति द्वयोर्भार्गवो जमदग्निः सूर्यो बार्हतप्रगाथः । नमो मित्रस्येति द्वादशर्चस्य सूक्तस्य सौर्योऽभितपाः सूर्यो जगती दशमी त्रिष्टुप् । सूर्यो न

इति पञ्चर्चस्य सूक्तस्य सौर्यश्चक्षुः सूर्यो गायत्री । विभ्राड्बृहदिति चतुर्ऋचस्य सूक्तस्याभितपाः सूर्यः सौर्यो जगती । अन्त्या प्रस्तारपङ्क्तिः । आयं गौरिति तृचस्य सार्पराज्ञी सूर्यो गायत्री । ऋतं चेति तृचस्य माधुच्छन्दसोऽघमर्षणो भाववृत्तमनुष्टुप् । श्रीसवितृसूर्यनारायणप्रीत्यर्थे सौरसूक्तमन्त्रजपे विनियोगः ।

ॐ उदु त्यं जातवेदसं देवं वहन्ति केतवः । दृशे विश्वाय सूर्यम् ॥ १ ॥ अप त्ये तायवो यथा नक्षत्रा यन्त्यक्तुभिः । सूराय विश्वचक्षसे ॥ २ ॥ अदृश्रमस्य केतवो वि रश्मयो जनाँ अनु । भ्राजन्तो अग्नयो यथा ॥ ३ ॥ तरणिर्विश्वदर्शतो ज्योतिष्कृदसि सूर्य । विश्वमा भासि रोचनम् ॥ ४ ॥ प्रत्यङ्देवानां विशः प्रत्यङ्ङुदेषि मानुषान् । प्रत्यङ् विश्वं स्वर्दृशे ॥ ५ ॥ १ ॥ येना पावक चक्षसा भुरण्यन्तं

जनाँ अनु । त्वं वरुण पश्यसि ॥ ६ ॥ वि
द्यामेषि रजस्पृथ्वहा मिमानो अक्तुभिः ।
पश्यञ्जन्मानि सूर्य ॥ ७ ॥ सप्त त्वा हरितो
रथे वहन्ति देव सूर्य । शोचिष्केशं विचक्षण
॥ ८ ॥ अयुक्त सप्त शुन्ध्युवः सूरो रथस्य
नप्त्यः । ताभिर्याति स्वयुक्तिभिः ॥ ९ ॥ उद्वयं
तमसस्परि ज्योतिष्पश्यन्त उत्तरम् । देवं देवत्रा
सूर्यमगन्म ज्योतिरुत्तमम् ॥ १० ॥ उद्यन्नद्य
मित्रमह आरोहन्नुत्तरां दिवम् । हृद्रोगं मम
सूर्य हरिमाणं च नाशय ॥ ११ ॥ शुकेषु मे
हरिमाणं रोपणाकासु दध्मसि । अथो हारि-
द्रवेषु मे हरिमाणं नि दध्मसि ॥ १२ ॥ उदगा-
गादयमादित्यो विश्वेन सहसा सह । द्विषन्तं
मह्यं रन्धयन्मो अहं द्विषते रधम् ॥ १३ ॥ २ ॥

चित्रं देवानामुदगादनीकं चक्षुर्मित्रस्य
वरुणस्याग्नेः । आ प्रा द्यावापृथिवी अन्तरिक्षं
सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च ॥ १ ॥ सूर्यो

देवीमुषसं रोचमानां मर्यो न योषामभ्येति
पश्चात् । यत्रा नरो देवयन्तो युगानि वि
तन्वते प्रति भद्राय भद्रम् ॥ २ ॥ भद्रा अश्वा
हरितः सूर्यस्य चित्रा एतग्वा अनुमाद्यासः ।
नमस्यन्तो दिव आ पृष्ठमस्थुः परि द्यावापृ-
थिवी यन्ति सद्यः ॥ ३ ॥ तत्सूर्यस्य देवत्वं
तन्महित्वं मध्या कर्तोर्विततं संजभार । यदे-
दयुक्त हरितः सधस्थादाद्रात्री वासस्तनुते
सिमस्मै ॥ ४ ॥ तन्मित्रस्य वरुणस्याभिचक्षे
सूर्यो रूपं कृणुते द्योरुपस्थे । अनन्तमन्यद्रु-
शदस्य पाजः कृष्णमन्यद्धरितः संभरन्ति ॥५॥
अद्या देवा उदिता सूर्यस्य निरंहसः पिपृता
निरवद्यात् । तन्नो मित्रो वरुणो मामहन्ताम-
दितिः सिन्धुः पृथिवी उत द्यौः ॥ ६ ॥ ३ ॥

इन्द्रं मित्रं वरुणमग्निमाहुरथो दिव्यः स
सुपर्णो गरुत्मान् । एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्य-
ग्निं यमं मातरिश्वानमाहुः ॥ १ ॥ कृष्णं नि

यानं हरयः सुपर्णा अपो वसाना दिवमुत्पतन्ति । त आववृत्रन्त्सदनादृतस्यादिद्घृतेन पृथिवी व्युद्यते ॥ २ ॥

हंसः शुचिषद्वसुरन्तरिक्षसद्धोता वेदिषदतिथिर्दुरोणसत् । नृषद्वरसदृतसद्व्योमसदब्जा गोजा ऋतजा अद्रिजा ऋतम् ॥ १ ॥

यत्त्वा सूर्य स्वर्भानुस्तमसा विध्यदासुरः । अक्षेत्रविद्यथा मुग्धो भुवनान्यदीधयुः ॥ १ ॥

यदद्य सूर्य ब्रवोनागा उद्यन्मित्राय वरुणाय सत्यम् । वयं देवत्रादिते स्याम तव प्रियासो अर्यमन्गृणन्तः ॥ १ ॥

उत्सूर्यो बृहदर्चींष्यश्रेत्पुरु विश्वा जनिम मानुषाणाम् । समो दिवा ददृशे रोचमानः क्रत्वा कृतः सुकृतः कर्तृभिर्भूत् ॥ १ ॥ स सूर्य प्रति पुरो न उद्गा एभिः स्तोमेभिरेतशेभिरेवैः । प्र नो मित्राय वरुणाय वोचोनागसो अर्यम्णे अग्नये च ॥ २ ॥ वि नः सहस्रं शुरुधो

रदन्त्वृतावानो वरुणो मित्रो अग्निः । यच्छन्तु चन्द्रा उपमं नो अर्कमानः कामं पूपुरन्तु स्तवानाः ॥ ३ ॥

उद्वेति सुभगो विश्वचक्षाः साधारणः सूर्यो मानुषाणाम् । चक्षुर्मित्रस्य वरुणस्य देवश्चर्मेव यः समविव्यक्तमांसि ॥ १ ॥ उद्वेति प्रसवीता जनानां महान्केतुरर्णवः सूर्यस्य । समानं चक्रं पर्याविवृत्सन्यदेतशो वहति धूर्षु युक्तः ॥ २ ॥ विभ्राजमान उषसामुपस्थाद्रेभैरुदेत्यनुमद्यमानः । एष मे देवः सविता चच्छन्द यः समानं न प्रमिनाति धाम ॥ ३ ॥ दिवो रुक्म उरुचक्षा उदेति दूरे अर्थस्तरणिर्भ्राजमानः । नूनं जनाः सूर्येण प्रसूता अयन्नर्थानि कृणवन्नपांसि ॥ ४ ॥

यत्रा चक्रुरमृता गातुमस्मै श्येनो न दीयन्नन्वेति पाथः ॥ उदुत्यदर्शतं वपुर्दिव एति प्रतिह्वरे । यदीमाशुर्वहति देव एतशो विश्वं-

स्मै चक्षसे अरम् ॥ १ ॥ शीर्ष्णः शीर्ष्णो जगतस्तस्थुषस्पतिं समया विश्वमा रजः । सप्त स्वसारः सुवितायु सूर्यं वहन्ति हरितो रथे ॥ २ ॥

तच्चक्षुर्देवहितं शुक्रमुच्चरत् । पश्येम शरदः शतं जीवेम शरदः शतम् ॥ १ ॥

बण्महाँ असि सूर्य बळादित्य महाँ असि । महस्ते सतो महिमा पनस्यतेद्धा देव महाँ असि ॥१॥ बट् सूर्य श्रवसा महाँ असि सत्रा देव महाँ असि । मह्ना देवानामसुर्यः पुरोहितो विभुज्योतिरदाभ्यम् ॥ २ ॥

नमो मित्रस्य वरुणस्य चक्षसे महो देवाय तदृतं सपर्यत । दूरे दृशे देवजाताय केतवे दिवस्पुत्राय सूर्याय शंसत ॥ १ ॥ सा मां सत्योक्तिः परिपातु विश्वतो द्यावा च यत्र ततनन्नहानि च । विश्वमन्यं निविशते यदेजति विश्वाहापो विश्वाहोदेति सूर्यः ॥ २ ॥

न ते अदेवः प्रदिवो निवासते यदेतशेभिः पतरै रथर्यसि । प्राचीनमन्यदनु वर्तते रज उदन्येन ज्योतिषा यासि सूर्य ॥ ३ ॥ येन सूर्य ज्योतिषा बाधसे तमो जगच्च विश्वमुदियर्षि भानुना । तेनास्मद्विश्वामनिरामनाहुतिमपामीवामप दुष्वप्न्यं सुव ॥ ४ ॥ विश्वस्य हि प्रेषितो रक्षसि व्रतमहेळयन्नुच्चरसि स्वधा अनु । यदद्य त्वा सूर्योपब्रवामहै तन्नो देवा अनुमंसीरत क्रतुम् ॥ ५ ॥ तं नो द्यावापृथिवी तन्न ऽआप इन्द्रः शृण्वन्तु मरुतो हवं वचः । मा शूने भूम सूर्यस्य संदृशि भद्रं जीवन्तो जरणामशीमहि ॥ ६ ॥ विश्वाहा त्वा सुमनसः सुचक्षसः प्रजावन्तो अनमीवा अनागसः । उद्यन्तं त्वा मित्रमहो दिवे दिवे ज्योग्जीवाः प्रति पश्येम सूर्य ॥ ७ ॥ महि ज्योतिर्बिभ्रतं त्वा विचक्षण भास्वन्तं चक्षुषे चक्षुषे मयः । आरोहन्तं बृहतः पाजस-

स्परि वयं जीवाः प्रतिपश्येम सूर्य ॥ ८ ॥ यस्यं
ते विश्वा भुवनानि केतुना प्रचेरंते नि चं वि-
शन्ते अक्तुभिः । अनागास्त्वेनं हरिकेश सूर्या-
ह्नाह्ना नो वस्यंसा वस्यसोदिंहि ॥ ९ ॥ शं
नो भव चक्षंसा शं नो अह्ना शं भानुना शं
हिमा शं घृणेनं । यथा शमध्वंच्छमसंद्दुरोणे
तत्सूंर्य द्रविणं धेहि चित्रम् ॥ १० ॥ अस्माकं
देवा उभयाय जन्मने शर्म यच्छत द्विपदे
चतुंष्पदे । अदत्पिबंदूर्जयंमानमाशितं तदस्मे
शं योररपो दधातन ॥ ११ ॥ यद्वो देवाश्चकृम
जिव्हया गुरु मनंसो वा प्रयुती देवहेळंनम् ।
अरावा यो नो अभि दुंच्छुनायते तस्मिन्तदेनो
वसवो निधेतन ॥ १२ ॥

सूर्यो नो दिवस्पातु वातो अन्तरिक्षात् ।
अग्निर्नः पार्थिवेभ्यः ॥ १ ॥ जोषा सवितर्यस्यं
ते हरः शतं सवाँ अर्हति । पाहि नो दिद्युतः
पतन्त्याः ॥ २ ॥ चक्षुर्नो देवः सविता चक्षुर्न

उत पर्वतः । चक्षुर्धाता दधातु नः ॥ ३ ॥
चक्षुर्नो धेहि चक्षुषे चक्षुर्विख्यै तनूभ्यः । सं
चेदं वि च पश्येम ॥ ४ ॥ सुसंदृशं त्वा वयं
प्रति पश्येम सूर्य । वि पश्येम नृचक्षसः ॥ ५ ॥

विभ्राड्बृहत्पिबतु सोम्यं मध्वायुर्दधद्यज्ञप-
ताववि॑ह्रुतम् । वातजूतो यो अभिरक्षति त्मना
प्रजाः पुपोष पुरुधा वि राजति ॥ १ ॥ विभ्रा-
ड्बृहत्सुभृतं वाजसातमं धर्मन्दिवो धरुणे
सत्यमर्पितम् । अमित्रहा वृत्रहा दस्युहन्तमं
ज्योतिर्जज्ञे असुरहा सपत्नहा ॥ २ ॥ इदं श्रेष्ठं
ज्योतिषां ज्योतिरुत्तमं विश्वजिद्धनजिदुच्यते
बृहत् । विश्वभ्राड् भ्राजो महि सूर्यो दृश उरु
पप्रथे सह ओजो अच्युतम् ॥ ३ ॥ विभ्राजं
ज्योतिषा स्व१रगच्छो रोचनं दिवः । येनेमा
विश्वा भुवनान्याभृता विश्वकर्मणा विश्वदे-
व्यावता ॥ ४ ॥

आ यं गौः पृश्निरक्रमीदसंन्मातरं पुरः । पितरं च प्रयन्त्स्वः ॥ १ ॥ अन्तश्चरति रोचनास्य प्राणादंपानती । व्यंख्यन्महिषो दिवम् ॥ ॥ २ ॥ त्रिंशद्धाम विराजति वाक्पंतङ्गायं धीयते । प्रतिवस्तोरहद्युभिः ॥ ३ ॥

ऋतं चं सत्यं चाभीद्धात्तपसोऽध्यंजायत । ततो रात्र्यंजायत ततः समुद्रो अंर्णवः ॥ १ ॥ समुद्रादंर्णवादधिं संवत्सरो अंजायत । अहोरात्राणिं विदधद्विश्वस्य मिषतो वशी ॥ २ ॥ सूर्याचन्द्रमसौं धाता यंथापूर्वमंकल्पयत् । दिवं च पृथिवीं चान्तरिक्षमथो स्वः ॥ ३ ॥

सविता पश्चात्तांत्सविता पुरस्तांत्सवितोत्तरात्तांत्सविताधरात्तांत् । सविता नंः सुवतु सर्वतांतिं सविता नों रासतां दीर्घमायुः ॥ १ ॥

॥ श्रीसूर्यनारायणार्पणमस्तु ॥

इति सौरसूक्तानि समाप्तानि ॥

# सौरसूक्तें.

'उदुत्यं' ह्या सूक्ताच्या ऋचा तेरा असून त्याचा ऋषि काण्व प्रस्कण्व होय; देवता सूर्य होय; पहिल्या नऊ ऋचांचा छंद गायत्री असून शेवटल्या चोहोंचा अनुष्टुप् आहे. शेवटल्या तीन ऋचा रोगनाशक आहेत आणि शेवटली दीड ऋचा शत्रुनाशक आहे. ( केतु ह्मणजे सूर्याचे अश्व अथवा सूर्याचीं किरणें. जातवेदस् ह्मणजे उत्पन्न झालेल्या प्राण्यांना जाणणारा ) सर्व जगताला प्राप्त होण्याकरितां उत्पन्न झालेले प्राणी जाणणाऱ्या सूर्य देवाला त्याचीं किरणें अथवा अश्व ऊर्ध्व प्रदेशामध्यें धारण करीत असतात १. ( तायु ह्मणजे चोर आणि अक्तु ह्मणजे रात्रि. विश्वचक्षस् ह्मणजे विश्वप्रकाशक ) विश्वप्रकाशक सूर्याचें आगमन होणार असें पाहून चोरांप्रमाणें रात्रीसह नक्षत्रें भीतीनें पळून जात असतात २. देदीप्यमान अग्निप्रमाणें असलेलीं ह्या सूर्याचीं किरणें जनांना क्रमानें पहात असतात; ह्मणजे क्रमानेंच सर्व जगत् प्रकाशित करीत असतात ३. ( तरणि ह्मणजे तारक अथवा दुर्गम मार्गही चालून जाणारा. विश्वदर्शत ह्मणजे सर्व प्राण्यांना दर्शनीय किंवा ज्याच्या योगानें सर्व विश्व प्रकाशित केलें जात असतें तो. ज्योतिष्कृत् ह्मणजे प्रकाशकर्ता, सर्व वस्तूंचा प्रकाशक अथवा चंद्रादिकांना प्रकाश देणारा. रोचन ह्मणजे झळकणारें. ) हे सूर्या, तूं उपासकांना रोगांपासून तारणारा आहेस. सर्व प्राण्यांना तूं दर्शनीय आहेस आणि सर्व वस्तूंचा प्रकाशक आहेस. तूं व्यापक असलेलें अन्तरिक्ष प्रकाशित करीत असतोस. अथवा, हे सर्वप्रेरक परमात्म्या, (सूर्या), तूं संसारसागरांतून तारणारा आहेस. तूं सूर्यादि ज्योतींचा कर्ता आहेस. सर्व मुमुक्षूंना तुझाच साक्षात्कार व्हावा लागत असतो. तूं चित्स्वरूप असल्यामुळें सर्व विश्व देदीप्यमान होईल अशा रीतीनें प्रकाशित

असतोस ४. हे सूर्या, तूं मरुत्संज्ञक देवांकडे जात जात उदय पावत असतोस; त्याचप्रमाणें मनुष्यांच्या संमुख जात जातच उदय पावत असतोस; ह्मणजे आपल्या अभिमुखच सूर्य येत आहे असें सर्वांना वाटत असतें. त्याचप्रमाणें व्यापक जो स्वर्लोक तो पाहण्याकरितां तूं उदय पावत असतोस. सारांश, स्वर्गामध्यें राहणारे लोक तुला आपापल्या संमुख येत असल्याचें पाहतील अशा रीतीनें तूं उदय पावत असतोस ५. ( पावक ह्मणजे शोधक. चक्षस् ह्मणजे प्रकाश. भुरण्यन्तं ह्मणजे पोषण करणाऱ्या ) हे सर्व शोधक वरुणा, ह्मणजे हे अनिष्टनिवारक सूर्या, तूं उत्पन्न झालेल्या प्राण्यांना धारण करणाऱ्या अथवा त्यांचें पोषण करणाऱ्या ह्या लोकाला ज्या प्रकाशाच्या योगानें क्रमानें प्रकाशित करीत असतोस त्या प्रकाशाचें आह्मी स्तवन करीत आहों ६. हे सूर्या, रात्रीसह दिवस उत्पन्न करणारा व जन्मास येणाऱ्या प्राण्यांना प्रकाशित करणारा तूं विस्तीर्ण अशा अंतरिक्षलोकामध्यें विशेषतः गमन करीत असतोस ७. ( विचक्षण ह्मणजे सर्वप्रकाशक. हरित् ह्मणजे अश्व अथवा किरणें. शोचिष्केश ह्मणजे तेजोरूप केशांनीं युक्त. ) हे सूर्या, हे सर्वप्रकाशका, तेज हेंच ज्याच्या ठिकाणीं केशाप्रमाणें दिसत असतें असा तूं रथामध्यें असतांना सात अश्व अथवा किरणें तुला वाहून नेत असतात ८. सूर्यानें सात शोधक घोड्या आपल्या रथाला जोडिल्या आहेत. त्या जोडिल्या ह्मणजे रथ भलत्या मार्गानें जाऊन पडत नाहीं. स्वतः योजिलेल्या ह्या घोड्यांच्या योगानें सूर्य गमन करीत असतो ९. आह्मी पापरहित आणि उत्कृष्ट तेजस्वी असा जो सूर्यच देवांमध्यें झळकणारा आहे त्याची उपासना केली असतां त्या उत्कृष्ट सूर्यरूप ज्योतीप्रत आह्मी प्राप्त होऊं १०. हरिमा ह्मणजे पिंवळा रंग अथवा शरीरकान्ति नष्ट करणारा बाह्य रोग. हे सर्वप्रेरक मित्रा, हे सर्वांना अनुकूल प्रकाश धारण कर-

णाऱ्या सूर्या, त्या वेळीं उंच अंतरिक्षामध्यें आरोहण करणारा तूं माझ्या अन्तस्थ रोगाचा आणि शरीराची कान्ति नाहींशी करणाऱ्या बाह्य रोगाचा नाश कर ११. स्वतःचा पिंवळट वर्ण शुकांच्या ठिकाणीं व सारिकांच्या ठिकाणीं आह्मी स्थापन करीत आहों आणि त्याचप्रमाणें तशा रंगाच्या वृक्षांचे ठिकाणीं आह्मी तो ठेवीत आहों १२. माझा द्वेष करणाऱ्या शत्रूचा अथवा मला उपद्रव देणाऱ्या रोगाचा नाश करणारा हा अदितिपुत्र सूर्य सर्व बलासह उदय पावला आहे. मीं स्वतः माझा द्वेष करणाऱ्याची हिंसा करीत नाहीं १३.

'चित्रं देवानां' हें जे सहा ऋचांचें सूक्त त्याचा ऋषि अंगिरस कुत्स असून देवता सूर्य आहे व छंद त्रिष्टुप् आहे. दैत्यवधाविषयीं देवांचें आश्चर्यकारक बल आणि मित्र, वरुण व अग्नि ह्यांचा प्रकाशक असलेला तो सूर्य उदयाप्रत प्राप्त झालेला आहे आणि सर्व चराचर जगताचा आत्मा असलेल्या ह्या सूर्यानें अंतरिक्ष व अंडकपालें हीं व्याप्त केलीं आहेत १. ज्याप्रमाणें कोणी मनुष्य मनोहर अवयवांनीं युक्त अशी आपली तरुणी स्त्री जाऊं लागली असतां एकसारखा तिच्या मागोमाग जातो त्याप्रमाणें झळकणाऱ्या उषा देवतेच्या मागोमाग सूर्य येत असतो. ती उषा प्राप्त झाली असतां यागाकरितां देवांची इच्छा करणारे यजमान सपत्नीक होऊन कल्याणाकरितां अग्निहोत्रादिरूप मंगलकर्मे करूं लागतात २. मनोहर व व्यापनशील असे सूर्याचे एतग्वसंज्ञक कल्याणकारक अश्व अनुक्रमें सर्वांनांच स्तुत्य आहेत आणि आह्मांकडून त्यांना वंदन होऊं लागलें असतां ते अंतरिक्षाचें पृष्ठ व्याप्त करीत असतात; (ह्मणजे नभस्तलाचें अवलंबन करीत असतात) आणि तत्काल ते द्यावाप्थिवींना व्याप्त करीत असतात ३. कृष्यादिरूप कर्म चालूं असतांना अस्ताचलाप्रत जाणारा सूर्य ह्या लोकापासून स्वतःच्या ठिकाणीं आपलीं किरणें आवरून घेत असतो आणि सूर्य अस्तास जात

असल्याचें अवलोकन करून कामकरी लोकही आपलें सुरू केलेलें काम अर्धवट टाकीत असतात. हें सर्वप्रेरक ईश्वराचें स्वातंत्र्य व महात्म्य आहे. शिवाय सूर्य जेव्हां रथापासून आपले हरिद्वर्ण अश्व (अथवा किरणें) सोडितो तेव्हां रात्री, सर्व लोकांमध्यें आच्छादक तम तो पसरवीत असतो ४. त्या उदयाचे वेळीं मित्र व वरुण ह्यांचे (अर्थात् सर्व जगताचें) संमुख सर्वप्रेरक सूर्य आकाशामध्यें आपलें तेजोमयरूप प्रकट करीत असतो. अत्यंत प्रबल तमाचेंही निवारण करण्यास समर्थ असें ह्याचें देदीप्यमान अमर्याद तेज, ह्याचे हरिद्वर्ण अश्व, स्वकीय आगमनानें दिवस निष्पन्न करीत असतात आणि त्याचप्रमाणें ते हरिद्वर्ण अश्व आपल्या गमनामुळें दुसरें कृष्णवर्ण तम उत्पन्न करीत असतात ५. हे देदीप्यमान सूर्यकिरणांनों, सूर्याचा उदय झाला असतां तुह्मी गर्ह्य पापापासून आमचें रक्षण करा ६. ॥ २ ॥ ह्या आमच्या ह्मणण्याला मित्र, वरुण, अदिति, सिंधु, पृथिवी व स्वर्ग ह्यांचें अनुमोदन असो.

इन्द्रं मित्रं ह्या दोन ऋचांचा ऋषि औचथ्य दीर्घतमा देवता सूर्य आणि छंद त्रिष्टुप आहे. ह्या आदित्याला ऐश्वर्यसंपन्न इंद्र असें ह्मणतात. हाच मरणापासून तारणारा दिनाभिमानी मित्र. पापनिवारक व रात्रीचा अधिपति वरुणही ह्यालाच ह्मणतात. सुपर्ण ह्या नांवाचा (अथवा उत्कृष्ट पंखांनीं युक्त) असा जो गरुत्मान् ह्या नांवाचा दिव्यपक्षी हा वस्तुतः एकच असतांना विप्र ह्याला अग्नि, यम व वायु अशा अनेक प्रकारांनीं जाणीत असतात १. कृष्णवर्ण व नियमानें गमन करणाऱ्या मेघाचे ठिकाणीं उत्कृष्ट गतींनीं युक्त असलेलीं जलाकर्षक किरणें उदकाची स्थापना करीत असतात आणि असें करीत करीत तीं द्युलोकाप्रत गमन करीत असतात. तीं किरणें ऋताच्या सदनापासून ह्मणजे उदकाच्या स्थानापासून अर्थात् आदित्यमंडलापासून अलीकडे येत असतात आणि लगेच उदकाच्या योगानें

पृथ्वी नानाप्रकारांनीं भिजवून टाकीत असतात. 'हंसः शुचिषत्' ह्या मंत्राचा ऋषि गौतम वामदेव, देवता सूर्य आणि छंद जगती आहे. (पाप हनन करणारा असल्यामुळें) हंस, (पुण्यक्षेत्रादिकांचे ठिकाणीं रहात असल्यामुळें) वसु, (वायुरूपानें अंतरिक्षांत रहात असल्यामुळें अंतरिक्षसत्, (अग्निरूप असल्यामुळें) होता, (वेदीमध्यें रहात असल्यामुळें) वेदिषत्, (अतिथीप्रमाणें पूज्य असल्यामुळें) अतिथि, (विदीर्ण हृत्कमलामध्यें वास्तव्य करीत असल्यामुळें) दुरोणसत्, मनुष्यादि प्राण्यांचे ठिकाणीं प्राणरूपानें राहत असल्यामुळें) नृषत् (उत्कृष्ट स्थानामध्यें राहत असल्यामुळें) वरसत् (यज्ञाचे ठिकाणीं अथवा सत्याचे ठिकाणी रहात असल्यामुळें ऋतसत्, (नक्षत्रादिकांच्या रूपानें अंतरिक्षांत रहात असल्यामुळें) व्योमसत्, (उदकापासून उत्पन्न होणारा असल्यामुळें) अब्जा, (पृथ्वीरूप गाईचे ठिकाणीं उत्पन्न होत असल्यामुळें) गोजा, (सत्यस्वरूप परमात्म्यापासून उत्पन्न होत असल्यामुळें) ऋतजा व [पर्वताचे ठिकाणीं पाषाणादिरूपानें उत्पन्न होत असल्यामुळें] अद्रिजा हा सूर्य आहे. ह्या मंत्राचें दुसरेंही एक भाषांतर होण्यासारखें आहे. तें येणेंप्रमाणें:- पुण्यक्षेत्रामध्यें राहणारा, जगताचें निवासस्थान; अंतरिक्षामध्यें राहणारा, देवांना आह्वान करणारा, वेदीमध्यें वास्तव्य करणारा, अतिथि, गृहांचें अवलंबन करणारा, प्राण्यांचे ठिकाणीं वास्तव्य करणारा, जाठराग्नीच्या रूपानें मनुष्यांचा आश्रय करणारा, श्रेष्ठ स्थलाचा अवलंब करणारा, यज्ञामध्यें भोक्ता ह्या नात्यानें उत्पन्न झालेला व सूर्यरूपानें अंतरिक्षामध्यें राहणारा परमात्मा उदक, गाय, यज्ञ व पर्वत ह्यांचे ठिकाणीं उत्पन्न झालेला आहे १.

'यस्त्वा सूर्य' ह्या मंत्राचा ऋषि सोमात्रि, देवता सूर्य आणि छंद अनुष्टुप्. हे सूर्या, जेव्हां तुला स्वर्भानुसंज्ञक आसुर तमानें व्यात

करितो तेव्हां ठिकाण ठाऊक नसलेले लोक जसे गोंधळून जातात तशीं सर्व भुवनें गोंधळून जात असल्याचें दृष्टीं पडतें.

यदद्य ह्या मंत्राचा ऋषि मैत्रावरुणि वसिष्ठ, देवता सूर्य आणि छंद त्रिष्टुप्. हे सूर्या, आज आह्मी निष्पाप आहोंत असें जर तूं देवांमध्यें मित्र व वरुण ह्यांना उदय पावतां पावतां सांगितलेंस तर, हे अदिते, हे दानशूर, देवांमध्यें तुझी स्तुति करणारे आह्मी तुझेच प्रिय होऊं १.

उत्सूर्यो बृहत्, स सूर्य व विन ह्या तीन मंत्रांचा ऋषि, देवता व छंद पूर्वींप्रमाणेंच. मनुष्यांच्या सर्व समुदायांना जाणणारा आणि सर्वांना प्रेरणा करणारा तो देव त्या मनुष्यसमुदायांच्या दृष्टीनें अत्यंत उंच असलेल्या तेजांचा आश्रय करीत असतो. दिवसां झळकणारा तो सूर्य प्रत्यहीं सारखाच दिसत असतो. प्रजापतीनें संपादिलेला तो सर्वकर्ता देव स्तुति करणाऱ्यांमुळें अति तेजस्वी होत असतो ? हे सूर्या, ह्या प्रशंसनीय, एतशवर्ण व गमनशील अश्वांच्या योगानें अथवा किरणांच्या योगानें तूं पूर्वेकडून वर ये आणि आह्मी निष्पाप आहों असें मित्र, वरुण, अर्यमा व अग्नि ह्यांना सांग २. दुखाचा निरोध करणारे, सत्यनिष्ठ व आनंददायक असे जे वरुण, मित्र व अग्नि हे देव ते सहस्रसंख्येनें युक्त असलेलें धन आह्मांला देवोत आणि आह्मी त्यांची स्तुति करूं लागलों असतां ते आमचा मनोरथ परिपूर्ण करोत ३.

उद्वेति येथून साडेचार मंत्रांचा ऋषि, देवता व छंद पूर्वींप्रमाणेंच. उत्कृष्ट भाग्यानें युक्त, सर्व पहाणारा आणि सर्व मनुष्यांना साधारण असून मित्र व वरुण ह्यांचा प्रकाश असलेला सूर्य देव उदयाप्रत येत आहे आणि चर्मामध्यें जसें कांहीं तम गुंडाळून ठेवीत आहे १. रथाच्या जुंवाला जोडिलेला हरितवर्ण अश्व जें सर्वांना एकसारखें दिसणारें चाक ओढीत असतो तें चाक फिरविण्याची इच्छा करणारा,

उदक देणारा, सर्वांचा ज्ञापक, पूज्य व सर्व कर्मांना अनुज्ञा देणारा हा सूर्य उदयास येत आहे २. सर्व प्राण्यांना एकरूपच असलेल्या आपल्या स्वकीय तेजःस्थानाचा जो संकोच करीत नाहीं व जो प्रकाशमान होणारा सविता माझे मनोरथ परिपूर्ण करीत असतो तो हा स्तुति करण्यामुळें आनंदित होणारा सूर्य विशेषतः देदीप्यमान असून उषांच्या शेवटीं उगवत असतो ३. दूर गमन करणारा, उपासकांचा तारक असलेला आणि महातेजस्वी असून अंतरिक्ष लोकाचें भूषण असलेला हा सूर्य उदय पावत आहे. खरोखर सर्वप्राणिप्रेरक सूर्याची अनुज्ञा झाल्यावरच आपआपलीं कर्तव्य कर्मं करीत असतात ४. प्रशंसनीय गतीनें युक्त असलेल्या श्येनपक्ष्यांप्रमाणें शीघ्र गमन करणारा हा सूर्य पूर्वीच्या अमर देवांनीं अंतरिक्षामध्यें ह्याच्या करितां जो मार्ग तयार केलेला आहे त्या मार्गानेंच गमन करीत असतो ४.

'उदु त्यद्दर्शतं' ह्या तीन ऋचांचा ऋषि मैत्रावरुणि वसिष्ठ, देवता सूर्य आणि छंद त्रिष्टुप्. सर्व जगताला चांगलें दृष्टिसामर्थ्य प्राप्त होण्याकरितां हरितवर्ण शीघ्रगामी अश्व जें धारण करीत असतो तें दर्शनीय मंडळ क्षितिजावर उदय पावत आहे १. सर्वांमध्यें श्रेष्ठ, चराचर जगताचा अधिपति आणि रथामध्यें असणारा जो सूर्य त्याला आपण होऊन गमन करणारे हरितवर्ण सात अश्व कल्याणाकरितां सर्व लोकांच्या समीप नेत असतात २. सर्व जगताचें प्रकाशक, देवांना हितावह आणि पूर्व दिशेस उदय पावणारें तें शुद्धस्वरूप ब्रह्म शंभर वर्षेंपर्यंत आम्हीं अवलोकन करावें (१०० वर्षें आम्हीं वांचावें) ३.

'बण्महां' ह्या दोन मंत्रांचा ऋषि भार्गव जमदग्नि, देवता सूर्य आणि छंद बार्हत प्रगाथ. हे सूर्या, तूं खरोखर तेजानें अधिक आहेस. हे आदित्या, तूं खरोखर बलानें अधिक आहेस. श्रेष्ठ असलेल्या तुझ्या महत्त्वाची प्रशंसा होत असते. हे देवा, तूं निःसंशय वीर्यानेंही अधिक आहेस १. हे सूर्या, तूं श्रवणानेंही सर्वांपेक्षां अधिक आहेस हें

सत्य आहे. हे देवा, तूं देवांमध्यें महत्त्वामुळें मोठा आहेस; तूं खरो-खरच असुरांचा घातक आहेस; तूं देवतांना हितोपदेश करणारा आहेस आणि तुझें तेज अतिशय असून कोणाच्याही हातून त्याला अडथळा होणें शक्य नाहीं.

'नमो मित्रस्य' ह्या सूक्ताचा ऋषि सौर्य अभितपा, देवता सूर्य व छंद जगती; परंतु, दहाव्या ऋचेचा त्रिष्टुप्. हे ऋत्विजांनों, मित्र व वरूण ह्यांना अवलोकन करणारा, मोठा, प्रकाशमान, दूर असूनही अवलोकन करणारा, देवांकरितां उत्पन्न झालेला, स्वर्गदेवतेचा पुत्र आणि विश्व दर्शविणारा जो सूर्य त्याला नमस्कार करून तें विहित असलेलें यागादिरूप कर्म तुम्ही करा आणि त्या सूर्याचेंच आराधन करा १. ज्या सत्योक्तीमुळें दोन्हीं अंडकपालें कायम राहात असून अहोरात्रें होत असतात, ज्या सत्योक्तीवर इतर सर्व भूतें अवलंबून आहेत, ज्या सत्योक्तीमुळें सर्व प्राणी चलनवलन करीत असतात, ज्या सत्योक्तीमुळें उदक सर्वदा वहात असतें आणि ज्या सत्योक्तीमुळें सूर्य प्रत्यहीं उगवत असतो ती सत्योक्ति सर्व बाजूंनीं माझें सर्व प्रकारें रक्षण करो २. हे सूर्या, तूं जेव्हां गमनशील अश्व रथाला जोडण्याची इच्छा करीत असतोस तेव्हां तुझ्यासमीप देवाशिवाय कोणीही पुरातन असुर अथवा राक्षस राहत नसतो. तुझ्यापूर्वी दुसरी चंद्रसंज्ञक ज्योति तुझ्या आश्रयानेंच प्रकाशित होत असतें आणि तूं दुसऱ्या ज्योतीसह उदय पावत असतोस ३. हे सूर्या, तूं ज्या तेजाच्या योगानें अंधकाराचें निवारण करीत असतोस आणि ज्या तेजाच्या योगानें सर्व जगत् ह्मणजे जंगम प्राणी तूं उत्कर्षाप्रत पोंचवीत असतोस त्या ज्योतीच्या योगानें तूं आह्मांपासून सर्व प्रकारची अन्नाची टंचाई व सर्व प्रकारचे रोग नाहींसे कर आणि दुःस्वप्नमूलक अरिष्टाचेंही तूं निरसन कर ४. हे प्रेरणा करणाऱ्या सूर्या, तूं सर्व यजमानांच्या कर्माचें, यज्ञविध्वंसक राक्षसांपासून

क्रुद्ध न होतां, रक्षण करीत असतोस आणि हवींच्या मागून तूं उदय पावत असतोस. सारांश, प्रातर्होम झाल्यानंतर तूं उदय पावत असतोस. हे सूर्या, आज ज्याअर्थी आह्मी तुझ्यासंनिध प्रार्थना करीत आहों त्याअर्थी त्या आमच्या कर्माला देवांनीं अनुमोदन द्यावें ५. द्यावापृथिवी, जलदेवता, इंद्र व मरुद्गण तें आमचें आव्हान व तें आमचें स्तुतिरूप भाषण श्रवण करोत. सूर्य असतांना आह्मांला मोठें दुःख प्राप्त न होवो. दीर्घ कालपर्यंत वांचणारे आह्मी कल्याणास पात्र व्हावें आणि वृद्ध व अमर व्हावें ६. हे सूर्या, संतोष, विवेक, प्रजा, आरोग्य व अपराधराहित्य ह्यांनीं आह्मीं युक्त व्हावें आणि आमच्या हातून सर्वदा तुझें यजन व्हावें. हे मित्रांचें पूजन करणाऱ्या सूर्या, प्रत्यहीं उदय पावणाऱ्या तुला आह्मीं चिरकाल अवलोकन करावें ७. हे विशेषतः अवलोकन करणाऱ्या, सूर्या, सर्व दृष्टिसंपन्न प्राण्यांना सुखकर, प्रचंड तेज धारण करणाऱ्या दीप्तीनें युक्त असलेल्या आणि प्रचंड व बलसंपन्न समुद्रोदकाच्या वर आरोहण करणाऱ्या तुला आह्मीं चिरकाल जिवंत राहून प्रत्यहीं पहावें ८. हे हरितवर्ण केशांनीं संपन्न असलेल्या सूर्या, ज्या तुझ्या सामर्थ्यामुळें सर्व भुवनें वेगानें संचार करीत आहेत, ज्या तुझ्या प्रकाशामुळें सर्व प्राणिसमुदाय व्यवहार करीत असतात आणि रात्रीं विश्रांति घेत असतात तो तूं उत्तरोत्तर आह्मांला आमच्या अपराधराहित्यामुळें चांगले दिवस दाखवीत दाखवीत उदय पावत जा ९. हे सूर्या, तेज, दिवस, किरणसमुदाय, शैत्य आणि उष्णता ह्यांच्या योगानें तूं आह्मांला कल्याणकारक हो आणि ज्याच्या योगानें आह्मांला प्रवासामध्यें व घरीं असतांना सुखच होईल तें उत्कृष्ट धन तूं आह्मांला दे १०. हे देवांनो, (सूर्याची अनुज्ञा झालेले) तुह्मी आमच्या द्विपाद व चतुष्पाद अशा दोन्ही प्रकारच्या प्राण्यांना सुख द्या. त्याचप्रमाणें ज्याच्या योगानें आमचे पुत्रादिक अन्नपानानें, बलानें व पचनसाम-

र्थ्यानें संपन्न होतील तें रोगनाश करणारें सुख, विषयसुख आणि निष्पापत्व तुह्मीं आह्मांला द्या ११. हे वसुदेवहो, आह्मीं वाणीनें अथवा मनानें जे तुह्मां देवांची अवहेलना होण्यासारखें पातक केलें असेल तें पातक तुह्मीं आमच्या विरुद्ध वागणाऱ्या व आह्मांला उद्विग्न करणाऱ्या आमच्या शत्रूचे ठिकाणीं स्थापन करा १२.

'सूर्यो नः' ह्या पांच ऋचांच्या सूक्ताचा ऋषि सौर्य चक्षु, देवता सूर्य व छंद गायत्री. सूर्य स्वर्गवासी लोकांपासून आमचें रक्षण करो; वायु अन्तरिक्षचर प्राण्यांपासून आमचें रक्षण करो आणि अग्नि भूमीवरील शत्रूंपासून आमचें रक्षण करो १. हे सवित्या, तूं आमच्या स्तुतीचा वगैरे स्वीकार कर आणि शत्रूंकडून फेंकिलेल्या जाणाऱ्या आयुधांपासून तूं आमचें रक्षण कर. तुझें रस आकर्षण करून घेणारें तेज शेंकडों यज्ञांना योग्यता आणीत असतें २. सविता, पर्वतसंज्ञक देव आणि विधाता आह्मांला इंद्रियसामर्थ्य देणारें तेज देवोत ३. हे सूर्या, चक्षुरिंद्रियानें संपन्न असलेल्या मला तूं तेज दे. आमच्या पुत्रांना तूं आपला प्रकाश प्रसिद्धीकरितां दे. तुझ्या तेजामुळें आह्मांला ह्या सर्व जगताचें सामान्यतः व विशेषतः ज्ञान व्हावें ४. हे सूर्या, उत्कृष्ट दृष्टीनें युक्त असलेल्या तुला आह्मीं प्रत्येकानें अवलोकन करावें आणि आह्मांसारख्या मनुष्यांना ज्या पदार्थांचें ज्ञान होणें शक्य आहे त्या पदार्थांचें ज्ञान आह्मांला व्हावें ५.

'विभ्राड्बृहत्' ह्या ऋचांच्या सूक्ताचा ऋषि अभितपा सूर्य, देवता सूर्य आणि छंद जगती. शेवटल्या ऋचेचा छंद प्रस्तारपंक्ति. यज्ञ करणाऱ्या यजमानाला दुःखरहित आयुष्य देणारा व विशेषतः देदीप्यमान असलेला हा सूर्य सोममय उत्कृष्ट मधु सेवन करो. जो सूर्य वाऱ्यानें प्रेरित होत असल्यामुळें स्वतः सर्व जगताचें सर्व बाजूंनीं रक्षण करितो तो सूर्य प्रजाजनाचें पोषण करीत असतो. आणि नानाप्रकारांनीं विशेषतः झळकत असतो १. विशेषतः झळ-

कणारें, मोठें, अतिशय पुष्ट, अन्न अथवा बल देणाऱ्यांमध्यें अत्यंत श्रेष्ठ, आणि वायूनें ज्याचें धारण होत असतें अशा सूर्यमंडलामध्यें ठेविलेलें, अविनाशि, शत्रुनाशक, वृत्रविनाशक, दस्यूंचा अतिशय नाश करणारें, असुरांचा घात करणारें व सहज शत्रूंचें घातक अशा प्रकारचें सूर्यतेज प्रकट होत आहे २. इतर ज्योतींचेंही प्रकाशक असलेलें, उत्कृष्ट व अत्यंत श्रेष्ठ असें जें हें सूर्यतेज तें सर्वांना जिंकणारें, धन जिंकणारें व प्रचंड आहे असें सर्व ह्मणतात. विश्वप्रकाशक, देदीप्यमान व मोठा असलेला हा सूर्य लोकांना दृष्टि प्राप्त होण्याकरितां—विस्तीर्ण तमाचा नाश करणारें आणि अविनाशि अशा तेजोरूप बलाचा विस्तार करीत असतो ३. ज्या तेजाच्या योगानें हीं सर्व उदकें सांठविलीं जातात, सर्व व्यापार ज्या तेजावर अवलंबून आहेत आणि सर्व देवांना हितावह असणारीं यज्ञकर्में ज्या तेजामुळें होत असतात त्या तेजानें, हे सूर्या, सर्व जगत प्रकाशित करणारा तूं स्वर्गलोकांतील प्रकाशमय प्रदेशाप्रत प्राप्त झाला आहेस ४.

'आय गौः' ह्या तीन ऋचांच्या सूक्ताचा ऋषि सार्पराज्ञी, देवत, सूर्य आणि छंद गायत्री. हा गमनशील व तेजस्वी सूर्य पूर्व दिशेस उदयाचलाप्रत प्राप्त झाला आहे. हा सर्व भूतें निर्माण करणाऱ्या पृथ्वीप्रत प्राप्त होत आहे आणि पालक जो द्युलोक त्यामध्यें शीघ्र गतीनें संचार करणारा हा चांगला शोभत आहे १. नासिकादिद्वारा वायु वर नेणारी आणि पुनरपि खालीं नेणारी ह्मणजे श्वासप्रश्वासांना कारणीभूत असलेली ह्या सूर्याची दीप्ति ह्या शरीरामध्यें मुख्य प्राणरूपानें असते; ह्मणूनच अशा प्रकारच्या दीप्तीनें संपन्न असलेला हा प्रचंड सूर्य अंतरिक्ष प्रकाशित करीत असतो २. अहोरात्रावयवरूप असलेले तीस मुहूर्त सूर्याच्या प्रकाशामुळें विशेषतः झळकत असतात आणि त्या सूर्यालाच अनुलक्षून स्तवन करणारे

वाणीचा उच्चार करीत असतात ( मुहूर्त=दिनाचा किंवा रात्रीचा १५ वा अंश ) ३.

'ऋतं च' ह्या तीन ऋचांच्या सूक्ताचा ऋषि माधुच्छंदस, देवता अघमर्षण आणि छंद मात्रवृत्त अनुष्टुप्. सर्वतः दीप्त असलेल्या परमात्म्यापासून तपानंतर ऋत (ह्मणजे यथार्थ भाषण) व सत्य (ह्मणजे यथार्थ संकल्प) हीं उत्पन्न झालीं. नंतर रात्रि उत्पन्न झाली आणि नंतर समुद्र उत्पन्न झाला १. अर्णव समुद्रानंतर अहोरात्रें करणारा आणि निमेषादियुक्त विश्वाला स्वाधीन करणारा संवत्सर उत्पन्न झाला २. परमेश्वरानें सूर्य, चंद्र, द्युलोक, पृथ्वी, अंतरिक्ष आणि महरादि लोक हीं पूर्वकल्पानुसार उत्पन्न केलीं ३. पश्चिमेस, पूर्वेस, उत्तरेस व दक्षिणेस असलेला सविता आमचे सर्व मनोरथ परिपूर्ण करो आणि आह्मांला दीर्घ आयुष्य देवो १.

## भस्मधारणविधि.

संध्या करणाऱ्यानें तिन्ही संध्यांचे वेळीं 'सद्योजातं' इत्यादि पांच ब्रह्ममंत्रांनीं त्रेताग्निजन्य भस्म अथवा त्याचे अभावीं स्मार्ताग्निजन्य भस्म, घ्यावें. तदनंतर तें भस्म ताम्रादि पात्रामध्यें ठेवून 'अग्निरिति भस्म' ह्या मंत्रानें त्याचें अभिमंत्रण करावें. ताम्रादि पात्र नसल्यास डाव्या हातांतच भस्म घेऊन त्याचें अभिमंत्रण करावें. अभिमंत्रण झाल्यावर 'मा नस्तोके' ह्या मंत्रानें पात्रांतील भस्म डाव्या हातावर घ्यावें. पात्राच्या अभावीं डाव्या हातांतच जर भस्म असेल तर 'मा नस्तोके' हा मंत्र मात्र ह्मणावा. नंतर 'ओमापो ज्योती रसोऽमृतं ब्रह्म भूर्भुवः सुवरोम् ।' ह्या मंत्रानें ब्रह्मानुसंधानपूर्वक त्या भस्मामध्यें उदक घालावें. तदनंतर मस्तकापासून तों पायाच्या तळव्यासुद्धां सर्व अंगाला भस्म लावावें. ह्याला भस्मोद्धूलन असें ह्मणतात. भस्मोद्धूलन अग्निरित्यादि सात मंत्रांनीं करावें. हें भस्मोद्धूलन प्रथमतः कोरड्या भस्मानेंही करण्याचा संप्रदाय आहे. भस्मो-

द्धूलन झाल्यानंतर 'त्र्यायुषं जमदग्नेः' ह्या मंत्रानें मधल्या तीन बोटांनीं ललाटावर डाव्या भिवईच्या कानाकडील टोंकापासून तों उजव्या भिवईच्या कानाकडील टोंकापर्यंत त्रिपुंड्र करावा. त्रिपुंड्र म्हणजे वेगळ्या वेगळ्या तीन रेषा. नंतर 'कश्यपस्य त्र्यायुषं' ह्या मंत्रानें उजव्या स्कंधावर व नंतर 'त्र्यम्बकं' इत्यादि मंत्रानें नाभीवर त्रिपुंड्र करावा. नंतर दोनदां आचमन करून हात धुवावे.

अग्निहोत्रसमुत्पन्नं भस्मादायादरेण तु ।
श्रौतं भस्म द्विजा मुख्यं स्मार्तं गौणं प्रकीर्तितम् ॥

इत्यादि वचनें सूतसंहितेंत असल्यावरून अग्निहोत्रभस्मच मुख्य होय. भस्मधारणविधींतील मंत्र येणेप्रमाणें:---

सद्योजातं प्रपद्यामि सद्योजाताय वै नमो
नमः । भवेभवे नातिभवे भवस्व माम् । भवो-
द्भवाय नमः १ वामदेवाय नमो ज्येष्ठाय नमः
श्रेष्ठाय नमो रुद्राय नमः कालाय नमः कलवि-
करणाय नमो बलविकरणाय नमो बलाय नमो
बलप्रमथनाय नमः सर्वभूतदमनाय नमो मनो-
न्मनाय नमः २ अघोरेभ्योऽथ घोरेभ्यो घोरघोर-
तरेभ्यः । सर्वेभ्यः सर्व शर्वेभ्यो नमस्ते अस्तु रुद्र-
रूपेभ्यः ३ तत्पुरुषाय विद्महे महादेवाय धीमहि ।
तन्नो रुद्रः प्रचोदयात् ४ ईशानः सर्वविद्यानामी-
श्वरः सर्वभूतानां ब्रह्माधिपतिर्ब्रह्मणोऽधिपतिर्ब्र-

ह्मा शिवो मे अस्तु सदाशिवोम् ५ अग्निरिति भस्म। वायुरिति०॥ जलमिति०॥ स्थलमिति०॥ व्योमेति०॥ सर्वं ँ ह वा इदं भस्म। मन एतानि चक्षूंषि भस्मानि ६ मा नस्तोके तनये मा न आयुषि मा नो गोषु मा नो अश्वेषु रीरिषः। वीरान्मा नो रुद्र भामितो वधीर्हविष्मन्तो नमसा विधेम ते ७ ओमापो ज्योती रसोऽमृतं ब्रह्म भूर्भुवः सुवरोम् ८ त्र्यायुषं जमदग्नेः कश्यपस्य त्र्यायुषं यद्देवानां त्र्यायुषं तन्मे अस्तु त्र्यायुषम् ९ त्र्यम्बकं यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनम्। उर्वारुकमिव बन्धनान्मृत्योर्मुक्षीय माऽमृतात् ॥१०॥

पांच मुखांनीं युक्त असलेल्या शंकराचें सद्योजातनांवाचें पश्चिमेकडील मुख आहे. पश्चिममुखस्वरूप परमेश्वराप्रत मी प्राप्त होत आहें. त्या सद्योजाताला नमस्कार असो. हे सद्योजात शंकरा, तूं वारंवार जन्म प्राप्त होण्याकरितां मला प्रेरणा करूं नको. जन्माचें अतिक्रमण व्हावें एतदर्थ तत्त्वज्ञानाकडे तूं माझी प्रवृत्ति कर. संसारापासून उद्धार करणाऱ्या सद्योजाताला नमस्कार असो १.

वामदेव हें शंकराचें उत्तरेकडील मुख होय; ह्मणजे वामदेव हा उत्तरमुखरूप आहे. ज्येष्ठ, श्रेष्ठ, रुद्र, काल वगैरे दहा त्याचींच वेगळीं वेगळीं रूपें आहेत. ह्या वामदेवादिकांना नमस्कार असो २.

अघोर हें शंकराचें दक्षिणेकडील मुखाचें नांव आहे. दक्षिण-

मुखरूप देव हा अघोर होय. अघोर ह्मणजे सत्वगुणानें संपन्न असल्यामुळें शांत; घोर ह्मणजे राजस गुणानें संपन्न असल्यामुळें उग्र आणि घोरघोरतर ह्मणजे तामस गुणानें संपन्न असल्यामुळें उग्रापेक्षांही उग्र. हे शर्व परमेश्वरा, अघोर, घोर आणि घोरघोरतर अशीं जीं तुझीं तीन प्रकारचीं रुद्ररूपें सर्व देहाचे ठिकाणीं मिळून सर्वदा असतात त्या तुझ्या सर्व रुद्ररूपांना नमस्कार असो ३.

तत्पुरुष हें शंकराचें पूर्वेकडील मुख होय. तत्पुरुषसंज्ञक देव हा प्राग्वक्त्र देव होय. 'तत्पुरुषाय' ही चतुर्थी विभक्ति द्वितीयार्थी आहे. तत्पुरुषदेव आह्मी गुरु व शास्त्र ह्यांच्या उपदेशामुळें जाणूं आणि जाणिल्यानंतर आह्मी त्या महादेवाचें ध्यान करूं. तस्मात्, तो रुद्र देव ज्ञानाकरितां व ध्यानाकरितां आह्मांला प्रेरणा करो ४.

'ईशानः सर्वविद्यानां' इत्यादि मंत्र शंकराच्या ऊर्ध्वमुखाचें प्रतिपादन करणारा आहे. हा ऊर्ध्वमुख देव वेदशास्त्रादि सर्व विद्यांचा नियामक आहे; हा सर्व भूतांचा अधिपति आहे; हा वेदाचा संरक्षक आहे आणि हा ब्रह्मदेवाचाही अधिपति आहे. हा जो ब्रह्मस्वरूप परमात्मा तो माझ्यावर अनुग्रह करण्याकरितां शांत असो. तोच सदाशिव मी व्हावें ५.

अग्नि, वायु, जल, स्थल (ह्मणजे पृथ्वी) व आकाश हीं पंचमहाभूतें आणि त्यांचीं सर्व घटपटादि कार्यें व इंद्रियवृत्तिरूप ज्ञानें हें सर्व अद्वैत ब्रह्मच होय अशी भावना करावी. भस्म ह्मणजे स्वतः प्रकाशित होणारें ब्रह्म ६.

हे रुद्रा, आमच्या पुत्रांचा, पौत्राचा, आयुष्याचा, गाईचा व अश्वांचा तूं नाश करूं नको आणि त्याचप्रमाणें तूं क्रुद्ध होऊन आमच्या वीरांचाही वध करूं नकोस. आह्मी हव्ययुक्त होऊन नमस्काराच्या योगानें तुझी सेवा करूं ७.

ॐ ह्मणजे ब्रह्म. उदक, सूर्यादि ज्योति, मधुरादि रस, देवांना

सेव्य असलेले अमृत, वेद व भूरादि लोक हें सर्व ब्रह्मच होय ८.

बाल्य, यौवन व वार्धक्य हीं तीन आयुष्यें हा त्र्यायुषशब्दाचा अर्थ होय. जगदग्नि, कश्यप आणि देव ह्यांचें जसें त्र्यायुष आहे तसें त्र्यायुष माझें असो ९.

सुगंधि व पुष्टिवर्धक अशा तुज त्र्यंबकाचें आह्मी यजन करीत आहों. ज्याप्रमाणें खर्बुज पक्क झालें असतां देंठापासून सुटतें त्याप्रमाणें मृत्यूपासून तूं आह्मांला मुक्त कर; मोक्षापासून तूं आह्मांला मुक्त करूं नकोस १०.

## त्रिसुपर्ण ॥

ॐ ब्रह्ममेतु माम् । मधुमेतु माम् । ब्रह्मेव मधुमे० । यास्ते सोम प्रजा वत्सोऽभि सो अहम् । दुष्ष्वप्नहन्दुरुष्षह । यास्ते सोम प्राणा ँ स्ताञ्जुहोमि । त्रिसुपर्णमयाचितं ब्राह्मणाय दद्यात् । ब्रह्महत्यां वा एते घ्नन्ति । ये ब्राह्मणास्त्रिसुपर्णं पठन्ति । ते सोमं प्राप्नुवन्ति । आसहस्रात्पंक्तिं पुनन्ति ॥ ॐ

ब्रह्म मेधया । मधु० । ब्रह्ममेव० । अद्या नो देव सवितः प्रजावत्सावीः सौभगम् । परा दुष्ष्वप्निय ँ सुव । विश्वानि देव सवितर्दुरितानि परासुव । यद्भद्रं तन्म आसुव । मधु वाता ऋतायते मधु क्षरन्ति सिन्धवः । माध्वीर्नः सन्त्वोषधीः ।

मधु नक्तमुतोषसि मधुमत्पार्थिवꣳरजः । मधु द्यौरस्तु नः पिता । मधुमान्नो वनस्पतिर्मधुमाꣳ अस्तु सूर्यः । माध्वीर्गावो भवन्तु नः । य इमं त्रिसुपर्णमयाचितं ब्राह्मणाय दद्यात् । भ्रूणहत्यां वा एते घ्नन्ति । ये० पुनन्ति। ॐ

ब्रह्म मेधवा । मधु मेधवा । ब्रह्ममेव मधु मेधवा । ब्रह्मा देवानां पदवीः कवीनामृषिर्विप्राणां महिषो मृगाणाम् । श्येनो गृध्राणाꣳ स्वधितिर्वनानाꣳ सोमः पवित्रमत्येति रेभन् । हꣳसः शुचिषद्वसुरन्तरिक्षसद्धोता वेदिषदतिथिर्दुरोणसत् । नृषद्वरसदृतसद्व्योमसदब्जा गोजा ऋतजा अद्रिजा ऋतं बृहत् । ऋचे त्वा रुचे त्वा समित्स्रवन्ति सरितो न धेनाः । अन्तर्हृदा मनसा पूयमानाः । घृतस्य धारा अभिचाकशीमि । हिरण्ययो वेतसो मध्य आसाम् । तस्मिन्त्सुपर्णो मधुकृत्कुलायी भजन्नास्ते मधु देवताभ्यः । तस्यासते हरयः सप्त तीरे स्वधां दुहाना अमृतस्य धाराम् ।

य इदं त्रिसुपर्णमयाचितं ब्राह्मणाय दद्यात् । वीरहत्यां वा एते घ्नन्ति । ये० पुनन्ति । ॐ

तस्यैवं विदुषो यज्ञस्यात्मा यजमानः श्रद्धा पत्नी शरीरमिध्ममुरो वेदिर्लोमानि बर्हिर्वेदः शिखा हृदयं यूपः काम आज्यं मन्युः पशुस्तपोऽग्निर्दमः शमयिता दक्षिणा वाग्घोता प्राण उद्गाता चक्षुरध्वर्युर्मनो ब्रह्मा श्रोत्रमग्नीद्यावद्ध्रियते सा दीक्षा यदश्नाति तद्धविर्यत्पिबति तदस्य सोमपानं यद्रमते तदुपसदो यत्संचरत्युपविशत्युत्तिष्ठते च स प्रवर्ग्यो यन्मुखं तदाहवनीयो या व्याहृतिराहुतिर्यदस्य विज्ञानं तज्जुहोति यत्सायं प्रातरत्ति तत्समिधं यत्प्रातर्मध्यंदिनꣳ सायं च तानि सवनानि ये अहोरात्रे ते दर्शपूर्णमासौ येऽर्धमासाश्च मासाश्च ते चातुर्मास्यानि य ऋतवस्ते पशुबन्धा ये संवत्सराश्च परिवत्सराश्च तेऽहर्गणाः सर्ववेदसं वा एतत्सत्रं यन्मरणं तदवभृथं एतद्वै जरामर्यमग्निहोत्रꣳ सत्रं य

एवं विद्वानुदगयने प्रमीयते देवानामेव महिमानं गत्वाऽऽदित्यस्य सायुज्यं गच्छत्यथयो दक्षिणे प्रमीयते पितृणामेव महिमानं गत्वा चन्द्रमसः सायुज्यꣳ सलोकतामाप्नोत्येतौ वै सूर्याचन्द्रमसोर्महिमानौ ब्राह्मणो विद्वानभिजयति तस्माद्ब्रह्मणो महिमानमाप्नोति तस्माद्ब्रह्मणो महिमानम् ॥

१ ब्रह्मरूप परमात्मतत्त्व मला प्राप्त होवो. २ परमानंदरूप माधुर्यानें संपन्न असलेलें ब्रह्म मला प्राप्त होवो. ३ माधुर्यसंपन्न ब्रह्मच मला प्राप्त होवो. ४ हे उमासंज्ञक ब्रह्मविद्येसह असणाऱ्या परमात्म्या, तुझ्या ज्या देवमनुष्यादि प्रजा आहेत त्यांमध्यें मी तुझी सेवा करणारा बालाप्रमाणें तुझ्या करुणेस पात्र आहे. ५ हे ( संसाररूप ) दुःखप्राचा नाश करणाऱ्या परमात्म्या, तूं दुःखाचा समूळ नाश कर. ६ हे परमात्म्या, तूं जी मनोवागादि इंद्रियें मला दिलीं आहेस ती मी तुझ्याच ठिकाणीं लीन करीत आहे ( सारांश, विषयांपासून इंद्रियें परावृत्त करून मी तुझ्याच ठिकाणीं लय लावीन ) ७ मला त्रिसुपर्ण पढवा ह्मणून जरी कोणी विनंति केली नाहीं तरी योग्य ब्राह्मण शिष्य पाहून त्याची याचना नसतांनाही त्या ब्राह्मणाला त्रिसुपर्ण पढवावें. ८, ९. कारण, जे ब्राह्मण त्रिसुपर्णाचा जप करितात तें ब्रह्महत्येचाही नाश करितात १०. त्यांना ब्रह्मविद्येसह ब्रह्माची प्राप्ति होते ११. ते ज्या पंक्तीमध्यें बसतात ती पंक्ति जरी सहस्र ब्राह्मणांपर्यंत मोटी असली तरी तिला शुद्ध करितात १२. ओंकाररूप प्रणवानें प्रतिपाद्य असलेला परमात्माच त्रिसुपर्णमंत्राची देवता होय ॥ १ ॥

मेधा ह्मणजे गुरुनें उपदेशिलेलें जें महावाक्य तें अर्थासह धारण करण्याची शक्ति १. मेधेच्या योगानें मला ब्रह्माची प्राप्ति होवो २. मेधेच्या योगानें परमानन्दरूप माधुर्यानें संपन्न असलेलें ब्रह्मच मला प्राप्त होवो ३. मधुर ब्रह्मच मला मेधेच्या योगानें प्राप्त होवो ४. आह्मां शिष्याना तूं शिष्य

प्रशिष्यांनीं संपन्न असें भाग्य आज दे ५ आणि दुष्ट स्वप्नांप्रमाणें असणाऱ्या द्वैताभासा ) चें तूं निरसन कर ६. हे प्रेरक देवा, ज्ञानप्रतिबंधक अशा सर्व पातकांचें तूं निराकरण कर ७ आणि जें कल्याण ( कारक असें असंभावना व विपरीत भावना ह्यांनीं रहित तत्त्वज्ञान ) आहे तें तूं आह्मांला पूर्णपणें दे ८. परब्रह्माची इच्छा करणाऱ्या माझ्याकरितां वायु मला सुख होईल अशा रीतीनें वाहोत. नद्या आरोग्यकारक उदकाच्या प्रवाहानें युक्त होवोत ९. व्रीहियवादि ओषधि आह्मांला पथ्यरूप होवोत १०. रात्रीची वेळ व दिवसाची वेळ अशा दोन्ही वेळा मला सुखकर होवोत. हा भूलोक आह्मांला मातेप्रमाणें सुखकर होवोत ११. द्युलोकही आह्मांला पित्याप्रमाणें सुखकर होवो. ( सारांश, अतिवृष्टि, अनावृष्टि इत्यादि अनर्थ स्वर्गलोकापासून आह्मांला प्राप्त न होवोत. ) १२ वनस्पतिवर्ग आह्मांला मधुरफलादि देण्याच्या द्वारानें सुखावह होवोत आणि सूर्यही आह्मांला हितावह होवो १३. गाई आह्मांला सुखावह होवोत १४. हें त्रिसुपर्ण जो ब्राह्मणाला अयाचित देतो ( त्याला ब्रह्मप्राप्ति होते ) १५, १६. (भ्रूण ह्मणजे गर्भ) ॥ २ ॥

( मेध ह्मणजे यज्ञ. यज्ञानुष्ठानानें चित्तशुद्धि झाल्यावर ब्रह्मज्ञान होत असल्यामुळें ब्रह्मालाच मेधवा ह्मणजे मेधवत् अर्थात् यज्ञसंपन्न असें ह्मटलें आहे. ) १ यज्ञानुष्ठानानें साध्य होणारें ब्रह्म मला प्राप्त होवो. यज्ञानुष्ठानानें साध्य होणारें परमानंदरूप माधुर्यानें संपन्न असें जें ब्रह्म तें मला प्राप्त होवो. ३ यज्ञानुष्ठानानें मिळणारें मधुर ब्रह्मच मला प्राप्त होवो. ४ देवांमध्यें परमात्मा चतुर्मुख ब्रह्मा होऊन नियामक ह्या नात्यानें राहतो. काव्यनाटकादि करणाऱ्या कवींमध्यें हा परमात्मा व्यासवाल्मीकिप्रभृतींच्या रूपानें शब्दसामर्थ्य जाणणारा होऊन राहतो. वैदिक मार्गानें वागणाऱ्या ब्राह्मणांमध्यें परमात्मा गोत्रप्रवर्तक ऋषि होत असतो. चतुष्पादांमध्यें महाबलाढ्य महिषही हा होत असतो. गृध्रादि सर्व पक्ष्यांमध्यें प्रबल असलेला श्येनपक्षीही हाच. वृक्षसमूहरूप वनामध्यें कुऱ्हाडीच्या रूपानें राहणारा हाच परमात्मा. यज्ञकारणभूत वल्लीरूप सोमही हाच असतो आणि हा सोमरूप परमात्मा गंगोदक, दर्भ इत्यादि जीं जीं ह्मणून कांहीं शोधक आहेत त्या सर्वांचें, मंत्रशब्दानें युक्त होऊन, अतिक्रमण करितो. ( सारांश, समंत्रक सोमपान हें सर्व शुद्धिकारणांमध्यें श्रेष्ठ होय. ) ५ हंसः हा मंत्र सौरसूक्त

क्तांत आहे. तेथें अथ पहावा. ६ हे परमात्म्या, ऋग्वेदरूप व तेजोरूप असलेल्या तुझ्याच उद्देशानें समिदादि द्रव्यें अर्पिलीं जात असतात. ७ हृत्कमलस्थ मनानें पवित्र होणाऱ्या व देवांकडून सेविल्या जाणाऱ्या घृतधारा, नद्यांप्रमाणें तुझ्याकरितां स्रवत आहेत. त्या घृतधारा मी देवतांना अर्पण करीत आहें. देवतांना मधुर हवि वांटून देणारा, घरट्यामध्यें राहणारा, स्वर्गादि सुख देणारा, तेजोमय व बहुद्रव्यसंपन्न त्रिसुपर्ण ह्या घृतधारांच्या मध्यभागीं असतो. त्याच्या सभोंवतीं—अमृतधारातुल्य असलेली हव्यद्रव्यपरंपरा देवतांना अर्पण करणारे—पापनाशक सप्तऋषि असतात ॥ ३ ॥

ह्याप्रमाणें ब्रह्मसाक्षात्कार झालेल्या जीवन्मुक्ताचा जो यज्ञ आहे त्या यज्ञाचा यजमान आत्माच होय. श्रद्धा ही यजमान पत्नी होय. शरीर हा इध्मा होय. वक्षःस्थल वेदि होय. लोम बर्हि होय. वेद ही शिखा होय. हृदय हा यूप ह्मणजे यज्ञस्तंभ होय. काम हें आज्य होय. क्रोध हा पशु होय. तपच अग्नि होय. इंद्रियदमन हाच पशु मारणारा शमिता आणि दक्षिणा होय. होता हा वागिंद्रिय होय. उद्गाता हा प्राण होय. चक्षुरिंद्रिय अध्वर्यु होय. चित्त ब्रह्मा होय आणि श्रवणेंद्रिय आग्नीध्र होय. जोंपर्यंत (अन्नावांचून) राहतां येतें तोंपर्यंतचा काल दीक्षा होय. जें कांहीं तो खातो तें हवि होय. जें पितो तें सोमपान होय. त्याचें रमणें हीच उपसदा इष्टि. संचार, बसणें व उठणें हा प्रवर्ग्य. मुख हा आहवनीय व भाषण ही आहुति. विज्ञान हें हवन. सायंप्रातर्भोजन ही समिध होय. प्रातःकाल, मध्यंदिनकाल व सायंकाल हीं सवनें होत. दिवस व रात्र हे दर्शपूर्णमास होत. पक्ष व महिने चातुर्मास्यें होत. ऋतु हे पशुबंध होत. संवत्सर व परिवत्सर हे अहर्गण होत. हें सर्व वेदससत्र होय आणि मरण हे अवभृथ होय. जरामरणापर्यंतचें चरित्र हें अग्निहोत्र व सत्र होय. ह्याप्रमाणें उपासना करणारा जो उत्तरायणामध्यें मरतो त्याला देवांचें ऐश्वर्य प्राप्त होऊन, सूर्याचें तादात्म्य प्राप्त होतें. परंतु, जो दक्षिणायनांत मरतो त्याला पितरांचें ऐश्वर्य प्राप्त होऊन चंद्राचें सायुज्य व सलोकता प्राप्त होते. ह्याप्रमाणें सूर्यचंद्रांचें माहात्म्य अनुभविणारा जो ब्राह्मण त्याचा जय होतो. (ह्मणजे त्याला हिरण्यगर्भाचें ऐश्वर्य प्राप्त होतें आणि त्यानंतर ब्रह्माचें महत्व प्राप्त होतें.